# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिाांक ०५ एप्रिल २००२ ते २८ फेब्रुवारी २००३**

**रजि. क्र. ०४**

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ६.४.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शनिवार दिनांक ६.४.२००२ रोजी मा. सभापती श्री. प्रशांत देसरडा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम् " या गिताने सुरु झाली आणि सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. मीर हिदायत अली मिर बसालत अली
२) श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३) श्री. इलियास किरमानी शे. उमर
४) श्री. औताडे रावसाहेब ममतू पाटील
५) श्री. ओक जयवंत केशवराव
६) श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
७) डॉ. आशा उत्तम बिनवडे
८) सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
९) श्री. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
१०) श्रीमती मानकापे पार्वती लहानु
११) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
१२) श्री. चंद्रशेखर लक्ष्मीनारायण जैस्वाल
१३) श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान
१४) श्री. ठकुजी रामसिंग वाणी

**विषय क्र. १ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम पिठासन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे चे कलम २१(१) अन्वये स्थायी समिती अधिकारी कलम २१ (१) अन्वये स्थायी समिती सभापती पदासाठी निवड करणे.

पदासाठी निवड करण्याकरीता दि. २२.३.२००२ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रं. ४४, ४५, ४७ व ६५ अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार दि. २६.३.२००२ ते २.४.०२ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असुन दि. २.४.२००२ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सभापती पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

१. श्री. वाणी ठकुजी रामसिंग
२. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
४. श्री. मीर हिदायतअली मिर बसालत अली

आता नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यांत येत आहे. ( मा. सभापती नामनिर्देशन पत्रांची छाननी करतात.) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रं. ४४,४७ व ६५ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असुन खालील उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहेत.

१. श्री. वाणी ठकुजी रामसिंग
२. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
४. श्री. मीर हिदायत अली मिर बसालत अली

वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपण उमेदवारी परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक यापैकी एखादा उपस्थित नसेल तर इच्छुकात या दोहोपैंकी जो कोणी सभेला उपस्थित आहे त्यांच्या संमतीने ३० मिनिटाच्या अवधीत म्हणजे १२.२५ वाजेपर्यंत आले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना स्थायी समिती सभापती पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव १२.२५ वाजेपर्यंत परत घेता येईल.

मात्र वेळेनंतर स्थायी समिती सभापती पदासाठी नामनिर्देशन पत्र घेता येणार नाही. कृपया याची सर्वानी नोंद घ्यावी.

स्थायी समिती सभापती पदासाठी ४ उमेदावारापैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारांनी अर्ज परत घेतले आहेत.

| अ. क्र. | उमेदवार परत घेणाऱ्यांची नांवे |
|---|---|
| १. | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| २. | सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश |
| ३. | |

आता स्थायी समिती सभापती निवडणुकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिगंणात आहेत.

| अ. क्र. | उमेदवारांची नावे |
|---|---|
| १. | श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव |
| २. | श्री. मीर हिदायत अली मिर बसालत अली |

मतदानाबाबत गोपनीयता पाळता यावी म्हणुन मतपत्रिकेच्या स्थळ प्रतीवर अनुक्रमांक राहील. मात्र मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सरमिसळ करण्यांत येईल. तसेच स्थळ प्रतीवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका १५ मिनीटात तयार होतील. व मतदानाला सुमारे १२.४५ वाजता सुरुवात होईल तरी मतपत्रिका तयार करण्यांसाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी/अधिकारी यांनी मतपत्रिका तयार करुन घ्यावी व त्यांनतर नगरसचिव यांनी सर्व स. सदस्यांच्या माहिती नमुना मतपत्रिका सभागृहात फळकावर लावण्याची व्यवस्था करावी. मतपेटीजवळ नियुक्त केलेले मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवुन द्यावे व मतपेटीला कुलूप लावुन तिची चावी माझ्याकडे आणुन द्यावी व मतपेटी मोहोरबंद करुन घ्यावी.

सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रं. ५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वत: उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्याकरीता एखाद्या

सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणुन पाठविता येईल. त्यासाठी मतदान सूरू होण्यापुर्वी म्हणजेच आता त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे.

तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासदांनी कृपया गर्दी करु नये.

नगर सचिव यांनी कृपया मतदानासंबंधीच्या सुचना सभागृहाच्या निर्दशनास आणुन द्याव्यात.

**नगरसचिव :**

१. मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना सन्माननीय सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील.
२. महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.
३. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा. पिठासन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.
४. नियम क्र. ५० प्रमाणे प्रत्येक सदस्यांना एक मत देण्याचा अधिकार आहे. मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मतपत्रिकेत उजव्या बाजुला ज्या इच्छुकाला मत द्यावयाचे असेल त्यांच्या नांवासमोर गुणाकाराची (X) फुली करावी.
५. सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र. ४५ (जे) मधील तरतुदीनुसार खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैध समजली जाईल
    १) जर मतपत्रिकेवर सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहीला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर काही खुण केलेली असेल अथवा
    २) जी छिद्रांकित (परफोरेटेड) नसेल अथवा
    ३) जिच्यावर मत नोंदविले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरुपयोगी आहे.

    नमुना मतपत्रिका सभागृहात फलकावर लावण्यात आलेली असुन अ. क्र. १ वर स. सदस्य श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव यांचे तर अ. क्र. २ वर स. सदस्य श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली यांचे नांव आहे.

**मा. पिठासन अधिकारी :** नमुना मतपत्रिका फलकावर चिकटविण्यात आलेली आहे. आता मतदानाला सुरुवात होत आहे. सन्माननीय सभासदांची नांवे पुकारण्यात येतील. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (एफ) च्या अनुषंगाने मतदानासाठी ३० मिनिटांचा कालावधी देण्यांत येत असुन सभागृहातील घडयाळाप्रमाणे आता दुपारचा १.०० वाजला असुन मतदान दुपारी १.३० वाजता संपेल. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (जी) प्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर स्थायी समिती सभापती पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स. सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यास सहकार्य करावे अशी सर्वांना विनंती आहे. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियम क्र. ४५ च्या तरतुदी प्रमाणे कार्यालयीन आदेश क्र. मनपा/नस/२००२/२१० दि. ३.४.२००२ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची केलेली नियुक्ती कायम करण्यात येत असुन

सदर आदेशाद्वारे ज्यांना ज्यांना जी कामे नेमुन देण्यात आलेली आहेत. त्यांनी ती कामे जबाबदारीने पार पाडावीत.

**जनसंपर्क अधिकारी :** मतदानासाठी सन्माननीय सदस्यांची नांवे पुकारल्यानुसार स. सदस्य श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली स. सदस्य श्री. शिंदे किशोर रावसाहेब, स. सदस्य श्री. किरमाणी इलियास शेख उमर, स. सदस्य श्री. औताडे रावसाहेब ममतु, स. सदस्य श्री. ओक जयवंत केशवराव, स. सदस्य श्री. फुलारी नंदकुमार माधवराव, स. सदस्या डॉ. बिनवडे आश उत्तम, स. सदस्या सौ. जेजुरकर ताराबाई, स. सदस्या सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश, स. सदस्या श्रीमती मानकापे पार्वती लहानु, स. सदस्य श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव, स. सदस्य श्री. चंद्रशेखर लक्ष्मीनारायण जैस्वाल, स. सदस्य श्री. कैसरखान बद्रोधीन खान, स. सदस्य श्री वाणी ठकुजी रामसिंग यांनी मतदानात भाग घेतला तर पिठासन अधिकारी तथा सभापती श्री. देसराडा प्रशांत यांचे मतदानासाठी नांव पुकारल्यानंतर त्यांनी मतदान केले. तोपर्यंत स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी पिठासन अधिकारी म्हणुन काम पाहिले. अशा प्रकारे एकुण १५ सदस्यांनी मतदानात भाग घेतला. मतदान केलयांनतर मा. सभापती श्री. देसरडा प्रशांत यांनी पिठासन अधिकारी म्हणुन पुन्हा आसन ग्रहण केले.

**पिठासन अधिकारी :** आता दुपारचे १.३० वाजले असुन मतदान संपले आहे असे मी घोषित करतो. मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांनी किंवा त्यांनी केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स. सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करु नये व सभागृहात शांतता ठेवुन निवडणुक प्रक्रिया पुर्ण करण्यास सहकार्य करावे ही विनंती. मतमोजणीचे काम पुर्ण झाले आहे.

| | | |
|---|---|---|
| एकुण मतदान | - | १५ |
| अवैध मते | - | ०० |
| वैध मते | - | १५ |

उमेदवारांना पडलेली मते खालील प्रमाणे आहेत.

१) स. सदस्य श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव - १० मते
२) स. सदस्य श्री. मीर हिदायतअली मीर बसालत अली - ०५ मते

मतमोजणीच्या निकालावरुन मी असे घोषित करतो की, सभापती, स्थायी समिती पदासाठी सन्माननीय सदस्य श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव यांची निवड झाली असुन मी त्यांचे अभिनंदन करतो.

यानंतर नुतन सभापती यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रशासनातर्फे मा. आयुक्तांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

**प्रस्ताव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) अन्वये स्थायी समिती सभापती पदासाठी सभागृहात झालेल्या मतदानानुसार मी श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव यांची सभापती म्हणुन बहुमताने झालेल्या निवडीस मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती स्थायी समिती यांनी घोषित केले.

नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

सभापती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ७.५.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मंगळवार दिनांक ७.५.२००२ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेस मा. आयुक्त तसेच संबंधीत अधिकारी यांचेसह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री. प्रशांत देसरडा
२. श्री. मीर हिदायत अली मिर बसालत अली
३. श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
४. श्री. औताडे रावसाहेब ममतु
५. श्री. ओक जयवंत केशवराव
६. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
७. डॉ. आशा उत्तम बिनवडे
८. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर
९. श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१०. श्री. चंद्रशेखर लक्ष्मीनारायण जैस्वाल
११. श्री. कैसरखान बद्रोधीन खान
१२. श्री. ठकुजी रामसिंग वाणी

**मा. सभापती :** आजची सभा ही माझ्या अध्यक्षतेखाली पहिली सभा होत आहे. त्याबद्दल सर्व स. सदस्य, मा. आयुक्त, संबंधित अधिकारी तसेच पत्रकार बंधु यांचे सर्वांचे मी मन:पुर्वक स्वागत करुन या बैठकीच्या कामकाजास सुरुवात करीत आहे.

**विषय क्र. २ :**

दिनांक ५.२.२००२ (सुधारित अंदाजपत्रक) दि. २०.२.२००२ (दोन सभांचे इतिवृत्त) दिनांक २७.२.२००२, दि. ५.३.२००२ दिनांक ११.३.२००२ (अर्थसंकल्पीय सभा) व दिनांक ६.४.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** मागील काही सभांचे इतिवृत्त मिळालेले नाही. खुलासा द्यावा.

**डॉ. आशा बिनवडे :** मागील ६ बैठकांचे इतिवृत्त सादर केलेले आहे. परंतु १८.३.२००२ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त का देण्यात आलेले नाही ? या बैठकीत आरोग्य विभागासंबंधीची चर्चा व निर्णय झालेले आहेत

**मा. सभापती :** नगरसचिव खुलासा करतील दि. १८.३.२००२ चे इतिवृत्त का दिले नाही ?

**नगरसचिव :** जेवढे इतिवृत्त तयार झाले तेवढे सभागृहासमोर ठेवलेले आहे. इतिवृत्ताच्या नोंदी घेऊन ते लिहुन देण्यासाठी एक ठराविक वेतनावर लघुटंकलेखक या विभागात काम करतात. त्यांच्याकडे सर्वसाधारण सभा, विशेष समित्या,

स्थायी समिती सभा तसेच महिला व बालकल्याण समिती इ. सर्व सभांचे इतिवृत्त घेण्याचे काम करावे लागते. त्यांनी ज्या जया सभांचे इतिवृत्त माझ्याकडे दिले व त्यांचेकडुन जेवढे जेवढे कामे झाली त्या सभांचे इतिवृत्त माझ्याकडे दिले व त्यांचेकडुन जेवढे जेवढे कामे झाली त्या सभांचे इतिवृत्त त्यांनी माझ्याकडे दिल्यानुसार सादर केलेले आहे. या विभागात टंकलेखनासाठी आणखी एक कर्मचारी व लघुटंकलेखक कार्यालयीन अधिक्षक असे दिल्यास वेळेवर इतिवृत्त देणे शक्य होईल.

**डॉ. आशा बिनवडे :** कर्मचारी वर्ग कमी आहे, स्टेनो नाही हे सभागृह मान्य करेल. परंतु दि. ११.३.२००२ नंतर १८.३.२००२ ला स्थायी समितीची सभा संपन्न झालेली आहे. त्यानंतरचे दिनांक ६.४.२००२ च्या सभेचे इतिवृत्त तयार केलेले असुन नंतरचे तयार केले. दिनांक १८.३.२००२ चे का तयार केलेले नाही.

**मा. सभापती :** आताच सचिवांकडून माहिति घेतली असता आणखी तीन सभांचे इतिवृत्त द्यायचे बाकी आहे, त्यात १३.३.२००२, १८.३.२००२, २७.३.२००२ च्या सभेचे इतिवृत्त दिलेले नाही. सदर इतिवृत्त मोठया स्वरुपाचे असुन तयार करण्यास वेळ लागेल. नगरसचिव यांनी खुलासा करावा.

**श्री. जयवंत ओक :** सचिव यांना स्टेनो व एक टंकलेखकाची आवश्यकता आहे. आताच खुलासा केला. नगरसचिव यांनी तशी मागणी प्रशासनाकडे या अगोदर केलेली आहे.

**नगरसचिव :** जी परिस्थिती आहे ती मी मांडलेली आहे. दि. १३.३.२००२ च्या अर्थसंकल्पीन तसेच १०.३.२००२ व २७.३.२००२ च्या सभांचे इतिवृत्त जास्त पानांचे आहे. जे कामी पानांचे होते ते तयार करुन दिलेले आहे. जे इतिवृत्त राहिले ते लिहिण्यास बराच वेळ लागणार आहे. शंका घेण्याचे काही कारण नाही व तसा काही उद्देश यामागे नाही. सत्य जी परिस्थिती आहे त्या बाबतीत सभागृहात अगोदरच माहिती दिलेले आहे.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी मागणी बरोबर आहे. नंतरचे इतिवृत्त दिले जाते व अगोदरचे का नाही. नगरसचिव यांचे स्टाफ कमी आहे, स्टेनो नाही, किती वेळेस प्रशासनाकडे मागणी केली. लेखी स्वरुपात केली की, तोंडी स्वरुपात, खुलासा द्यावा.

**नगरसचिव :** मा. आयुक्त यांना त्यांचे दालनात होणाऱ्या सभात तोंडी तसेच लेखी स्वरुपात वेळोवेळी मागणी केलेली आहे. काही दिवसांपुर्वी माझ्या विभागात एका लिपीकाची बदली झाली त्यांना कार्यमुक्त केले. परंतु त्यांना विभागात रुजु होऊ दिले नाही. मागील ४ ते ४ १/२ वर्षापासुन कार्यालय अधिक्षक नाही. तसेच मागील वेळेस गेल्या वर्षी मी सुटीवर होतो, त्यावेळी या विभागातील दोन लिपीक परस्पर कार्यमुक्त करुन घेतले. तेव्हापांसुन कर्मचारीच दिलेले नाही. या विभागात बरेचशे काम टंकलेखनाचे आहे. टंकलेखनाचे जास्त कर्मचारी लागतात. सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभांचे जवळपास १०० पानांचे इतिवृत्त होतात याची जाणीव आपल्याला आहे. ती सर्व कामे करण्यासाठी कर्मचारी लागतात. लघुटंकलेखक कडुन इतिवृत्त तपासणे ते टंकलेखनास देणे, त्यांवर टंकलेखन तपासणे दुरुस्त्या करणे, प्रतिकाढणे, लावणे, प्रति बरोबर चक्रमुदीत झाले किंवा ते तपासणे इ. साठी वेळ लागतो. याची जाणीव ठेवुन कृपया समजुन घ्यावे.

**डॉ. आशा बिनवडे :** मागील बैठकीचे इतिवृत्त पुढील बैठकीत दिले पाहिजे असे पान क्र. २१ वर नियमात आहे. म्हणुन इतिवृत्त कायम न होता सभेचे कामकाज करु नये. जेव्हा इतिवृत्त तयार होईल तेव्हाच ही सभा बोलवावी.

**मा. सभापती :** नगर सचिव विभागात किती कर्मचारी वर्ग मंजुर आहे. किती कर्मचाऱ्यांची व कोणत्या संवर्गातील कर्मचारी लागतात याची टिप्पणी तयार करुन सादर करावी.

**श्री. मिर हिदायत अली :** जेथे कर्मचारी आहे तेथे कामे होत नाही. वार्डात साफसफाईचे कामासाठी व इतर कामासाठी कर्मचारी मागितले तर दिले जात नाहीत. झोन अधिकाऱ्यांची भेट होत नाही. झाली तरी आश्वासने देतात कर्मचारी देत नाही. वार्डात घाण पाणी येते. साफसफाई व्यवस्थीत होत नाही. ही परिस्थिती बऱ्याच वार्डात आहे.

**मा. सभापती :** नगरसचिव यांचेकडे काय वाढलेले आहे. महिला व बालकल्याण समिती, प्रभाग समिती इतर कामे यात वाढ झालेली आहे. नगरसचिव यांनी कर्मचारी वर्ग मागितला. प्रशासनाला काय अडचण आहे, खुलासा करावा.

**उपआयुक्त :** सचिवांनी कर्मचाऱ्यांची वेळोवेळी मागणी केलेली आहे व जे उपलब्ध कर्मचारी आहेत. त्यांचेकडुनच काम करुन घेण्याची विनंती केलेली आहे. सचिवांकडे दैनिक वेतनावर लघुटंकलेखक आहे. सचिवांना किती स्टेनो व किती कर्मचारी लागतात यासंबंधिचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवल्यास त्यानुसार कार्यवाही करता येईल. तुर्त सध्या दोन लिपीक देण्यास येतील.

**श्री. जयवंत ओक :** सचिवांनी प्रामुख्याने स्टेनोची मागणी केलेली आहे. स्टेनो असेल तरच इतिवृत्तांत तात्काळ तयार होईल. तेव्हा अशी अडचण येणार नाही.

**मा. आयुक्त :** क्लार्कची आता पदच नाही. क्लार्क कम - टायपीस्ट असे पद आहे. जे क्लार्क आहे. त्यांना टंकलेखन आलेच पाहिजे. येत नसेल तरी सक्तीचे टंकलेखनाची कामे करुन घ्यावी. त्यांना सहा महिन्यात टंकलेखन आले पाहिजे नसता विभाग प्रमुखांनी तसे कळवावे. वेतनवाढ बंद करावी लागेल. नगरसचिव यांनी स्टेनोची मागणी केलेली आहे. त्यांना एक स्टेनो व एक लिपीक देण्यात यावे.

**मा. सभापती :** सभागृहात इतिवृत्त हा सर्वात महत्तवाचा विषय असतो. मागील इतिवृत्त पुढील सभेत देणे गरजेचे असते. त्यात बदल न होणे व शंका निर्माण न होणे यासाठी ते तात्काळ मंजुर करुन घेणे आवश्यक असते व त्यावर वाचन होऊन चर्चा करुन मंजुर झाल्यानंतर पुढील सर्व कामे करता येतात. या सर्व गोष्टींची प्रशासन व सचिव यांनी विचार करुन यापुढे बैठकीच्या ३ दिवसाच्या आत स. सदस्यांना इतिवृत्त द्यावे व प्रशासनाला सुचना करण्यात येते की, सचिवांना जो कर्मचारी वर्ग लागतो तो तात्काळ देण्यात यावा. व ज्या बैठकांचे इतिवृत्त देण्याचे बाकी आहे ते पुढील बैठकीत देण्यात यावे.

इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**डॉ. आशा बिनवडे :** मागील दिनांक १८.३.२००२ च्या बैठकीत आरोग्य विभागाच्या संबंधाने काही निर्णय घेण्यात आलेले होते त्या संबंधिची प्रशासनाने काय अंमलबजावणी केली मागील इतिवृत्त येत नाही तोपर्यंत हे इतिवृत्त कायम करणे बरोबर नाही.

**श्री. प्रशांत देसरडा :** इतिवृत्त आता आले नसले तरी काही फरक पडत नाही, जी रुलींग देण्यात आली त्याचे काय झाले ते सांगता येईल का ?

**श्री. जयवंत ओक :** जे इतिवृत्त दिले नाही ते येणाऱ्या बैठकीमध्ये द्यावे अशी सचिव यांना सुचना करावी.

**मा. सभापती :** सचिवांना सुचना देण्यांत येत आहे की ज्या २ ते ३ बैठकांचे इतिवृत्त देण्याचे बाकी आहे हे पुढील बैठकीत देण्यात यावे. त्यावर सखोल चर्चा करुन योग्य तो निर्णय घेता येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** १८.३.२००२ च्या बैठकीत सखोल चर्चा होऊन निर्णय घेण्यात आलेले आहे. डॉ. देशपांडे यांनी औषधी व साहित्य खरेदी प्रकरणात निर्णय झालेले आहे. जो सभागृहाने निर्णय घेतला त्यानुसार कार्यवाही झालेली आहे का? इतिवृत्त नाही म्हणुन कार्यवाही करण्यास वेळ लागणार अशी शंका येते.

**मा. सभापती :** स. सदस्यांचे मतांची इतिवृत्तात नोंद घेतलेली आहे. आता इतिवृत्तांवर चर्चा करु नये. प्रशासनांने सुचना करण्यात आलेल्या आहेत. पुढील बैठकीत इतिवृत्त देण्यात येईल.

**श्री. इलियास किरयाणी :** ऑडीट रिर्पोटवर बैठक बोलवावी. प्रशासकीय अहवाल दिलेला नाही.

**मा. सभापती :** आपण केलेल्या सुचनेनुसार एका वर्षाचे ऑडिट मंजुर करायचे बाकी आहे. त्यावर लवकरच बैठक बोलविण्यात येईल.

**श्री. इलियास किरमाणी :** प्रशासकीय अहवाल का दिला नाही. मागील बैठकीत यासंबंधी मी प्रश्न उपस्थित केलेला होता.

**उपआयुक्त (प्र.):** यापुर्वीच प्रशासकीय अहवाल तयार करुन स्थायी समिती सभापती यांचेकडे दिलेले आहे. फक्त सन ९९, २०००, २००१ या तीन वर्षाचे प्रशासकीय अहवाल तयार करण्याचे काम चालु आहे. तीन महिन्याच्या आत सभागृहासमोर सादर करण्यात येईल.

**मा. सभापती :** नियमाने दर वर्षाचा अहवाल वेळीच सादर करणे आवश्यक आहे. यापुढे दरवर्षाचे अहवाल वेळीच सादर करावे. विषय क्र. १ कायम करण्यात मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक ५.२.२००२, दि. २०.२.२००२ दि. २७.२.२००२, दि. ५.३.२००२ दि. ११.३.२००२ व दि. ६.४.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या तजविजीनुसार प्रस्ताव सादर करीत ओह की, रेल्वेस्टेशन येथील मनपा व्यापारी संकुलातील गाळा क्र. ३६ व ३७ सिनियर सुपरीटेंडेड ऑफ पोस्ट ऑफिस यांना नियमानुसार अनामत रक्कम व भाडे स्विकारुन देणे बाबत मंजुरी झाली आहे.

परंतु सिनियर सुपरीटेंडेड ऑफ पोस्ट ऑफिस यांनी दि. १९.६.२००१ रोजी पत्र देऊन कळविलेले आहे की, केंद्र सरकारतर्फे पोस्ट ऑफिस चालविले जात असल्यामुळे विशेष बाब म्हणुन आम्हाला गाळयाची अनामत रक्कम न लावता फक्त भाडे लावुन गाळे देण्यात यावे, आम्ही नियमाप्रमाणे भाडे भरणा करण्यास तयार आहोत. सबब उपरोक्त

गाळयाची अनामत रक्कम न स्विकारता भाडे स्विकारत गाळे देणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** अनामत रक्कम किती घेणार आहे, अशी पध्दतीने इमारत देता येते का?

**मालमत्त अधिकारी :** ५०००/- रुपये अनामत रक्कम ठेवलेली आहे. परंतु केंद्र सरकारतर्फे पोस्ट ऑफिस चालविले जात असल्यामुळे अनामत रक्कम न लावता फक्त भाडे आकरण्याची मागणी या विभागाकडुन झालेली आहे. जसा निर्णय होईल त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** सर्वाच्या संमतीने विषय क्र. २ मंजुर करण्यात येत आहे. भाडे वेळेवर वसुल करावे. प्रशासनाची जबाबदारी राहील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन येथील मनपा व्यापारी संकुलातील गाळा क्र. ३६ व ३७ च्या संदर्भात सिनियर सुपरीटेंडेड ऑफ पोस्ट ऑफिस यांनी दिनांक १९.६.२००१ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार केंद्र सरकारतर्फे पोस्ट ऑफिस चालविले जात असल्यामुळे विशेष बाब म्हणुन गाळयाची अनामत रक्कम न लावता फक्त भाडे लावुन गाळे देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**श्री. नंदकुमार फुलारी :** मागील बैठकीत चर्चा झालेली होती. अधिऱ्यांना स्वतंत्र माईकची व्यवस्था करणार होते. अद्याप कार्यवाही नाही.

**मा. सभापती :** प्रशासनास काय अडचण आहे खुलासा द्यावा. सभागृहात दोन्ही बाजुने सदस्य बसतात. सदस्यांना बोलण्यासाठी सुध्दा माईक लावण्यात यावेत.

**मा. आयुक्त :** संबंधित अधिकारी यांनी अंदाजपत्रक तयार करुन सादर करावे. मंजुरी देण्यात येईल. दोन्ही बाजुने ४-४ असे ८ माईक लावण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**कार्यकारी अभियंता (विद्युत) :** पुढील बैठकीपर्यंत माईकची व्यवस्था करण्याचा अटोकाट प्रयत्न करण्यात येईल.

**मा. सभापती :** पुढील बैठकीपर्यंत सभागृहात अधिकाऱ्यांना खुलासा करण्यासाठी एक माईक व स. सदस्यांना बोलण्यासाठी दोन्ही बाजुने ४-४ माईक लावण्याबाबत तात्काळ कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे हर्सुल खाम तलाव येथील माती विक्रीसाठी दैनिक सकाळ, अजिंठा, औरंगाबाद टाईम्स या वर्तामानपत्रात क्र. /मनपा/मामऊ/११०/२००२ दि. २९.१.२००२ अन्वये तसेच सावंगी तलाव येथील माती विक्रीसाठी दैनिक लोकविजय, विश्वमित्र, लोकमत समाचार, या वर्तमानपत्रात क्र.मनपा /मामऊ/११०/२००२ दि. १३.३.२००२ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द करुन सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्रीचे अंतिम दि. २०.३.२००२ पर्यंत चार निविदा विकल्या गेल्या व दर भरलेल्या सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतीम दि. २१.३.२००२ पर्यंत तीन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत. हर्सुल तलाव : सिलबंद

लिफाफ्यात मागविल्या असता कोरे निविदा विक्रीचे अंतिम दि. ६.२.२००२ पर्यंत निविदा विक्रीचे अंतिम दि. ६.२.२००२ पर्यंत तीन निविदा विकल्या व दर भरलेल्या सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतीम दि. ८.२.२००२ पर्यन्त दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदामध्ये सांवगी तलावाकरीता तीन व हर्सुल तलावाकरीता दोन अशा निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्या खालील प्रमाणे आहे.

**सांवगी तलाव :**

| | |
|---|---|
| १. श्री. शेख रशिद नगीना पटेल | रक्कम रु. १,७१,०००/- |
| २. श्री अब्दुल मजीद शेख चाँद | रक्कम रु. १,६६,६६६/- |
| ३. श्री. लाला शिवन कांबळे | रक्कम रु. १,६०,००१/- |

**हर्सुल तलाव :**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मोहमंद सोहेल सिध्दीकी | रक्कम रु. १,६७,०००/- |
| २. | श्री. तोताराम भागाजी कांबळे | रक्कम रु. १,४०,१५१/- |

या प्रमाणे प्राप्त निविदामध्ये सांवगी तलाव माती विक्रीसाठी श्री. शे. रशिद नगीना पटेल रक्कम रु. १,७१,०००/- जेकी, सर्वात जास्त आहे.

हर्सुल तलाव माती विक्रीसाठी श्री. मोहमंद सोहेल सिध्दीकी र. रु. १,६८,०००/- जे की, सर्वात जास्त आहे. करिता प्राप्त दरात सर्वात जास्त दराचे निविदाधारकाचे दर स्थायी समितीसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रस्तावासंबंधी थोडक्यात खुलासा करण्यात यावा.

**प्र. मालमत्ता अधिकारी :** दरवर्षी हर्सुल तलाव व सांवगी तलाव येथील मातीची विक्री केली जाते. सांवगी तलाव येथील माती विक्रीसाठी श्री. शे. रशिद नगीना पटेल यांची सर्वात जास्त र. रु. १,७१,०००/- ची निविदा भरुन आलेली आहे. तर हर्सुल तलावाच्या माती विक्रीसाठी श्री. मोहमंद सोहेल सिध्दीकी यांची रु. १,६८,०००/- ची निविदा भरुन आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७७, ७८ प्रमाणे या प्रस्तावास स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. म्हणुन तसा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**श्री. प्रशांत देसरडा :** मागच्या वर्षी किती रकमेचे टेंडर भरुन आलेले होते. किती कालावधीची टेंडर दिलेले होते.

**प्र. मालमत्ता अधिकारी :** मागील वर्षाचा संदर्भात संचिका मागवुन पुढील बैठकीत माहिती सादर करण्यात येईल. १२ महिन्यांसाठी करार केला जातो. १ एप्रिल पासुन ते ३१ मार्च पर्यन्तचा करार केलेला असतो.

**मा. सभापती :** स्थायी समितीसमोर असे प्रस्ताव दरवर्षी मंजुरीसाठी यावेत. प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीचे हर्सुल खाम तलाव व सांवगी तलाव येथील माती विक्रीसाठी मागविण्यात आलेल्या निविदापैकी सर्वात जास्त दराचे अनुक्रमे हर्सुल तलावाकरीता श्री. मोहमंद सोहेल सिध्दीकी यांची रक्कम रु. १,६८,०००/- व सांवगी तलावाकरीता श्री. शेख रशिद नगिना पटेल यांची रक्कम रु. १,७१,०००/- या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टाऊन हॉल परिसरात जमा झालेले भंगार साहित्य विक्री करण्याकरीता प्रथम जाहीर प्रगटन देऊन बोली पध्दतीने लिलाव करण्यात आल असता प्रथम वेळी मे. ए. के. ट्रेडर्स यांचे रु. र. २९००/- प्रति टन असे जास्तीचे दर प्राप्त झाले होते. परंतु मनपाने सदरील भंगाराचे दर रु. ७०००/- प्रति टन असे निश्चित केले आहेत. म्हणजे सदर भंगारची रक्कम रु. २,७४,७५०/- इतकी किमंत निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे आलेले दर हे अत्यंत कमी असल्याने दुसऱ्यांदा लॉट पध्दतीने सदर भंगाराचा जाहीर लिलाव बोली द्वारे करण्यात आला असता मे. गुडलक स्क्रॅप यांनी सदर भंगारासाठी रक्कम रु. १,१०,०००/- इतकी बोली बोलली होती. सदर रक्कम ही निश्चित केलेल्या रक्कमेपेक्षा अत्यंत कमी आल्याने परत तिसऱ्यांदा लॉट पध्दतीने भंगार साहित्य विक्रीकरिता दर पत्रके मागविण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

१. श्री. अली रजा आबेदी
२. श्री. आगारखान मियाखान
३. मे. साईकृपा स्क्रॅप
४. मे. गुडलक स्क्रॅप
५. श्री. मोहमंद रफिक मो. अहेमद
६. मे. सजरी ट्रेडिंग कं.
७. मे. सुंदर कन्स्ट्रक्शन
८. श्री. रियाज अहेमद
९. श्री. मोहमंद अहेमद

वरील प्राप्त दरापैकी श्री. रजा आबेदी यांनी दिलेले दर सर्वात जास्त असुन रक्कम रु. ३,५०,०००/-इतके आहेत व सदरील दर निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्तीचे प्राप्त झाले आहेत.

परंतु श्री. अली रजा आबेदी यांनी दि. ८.४.२००२ रोजी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रासह अर्ज देवुन कळविले आहे की, मी आजारी असल्याने सदरील साहित्य उचलु शकत नाही. सदरील साहित्य लवकरात लवकर उचलणे आवश्यक आहे.

यासाठी आलेल्या दुसऱ्या क्रमांकाचे श्री आगाखान मियाँ खान यांचे दर रु. २,६१,७८६/- इतके आहेत. त्यांना सदरील साहित्य प्रथम क्रमांकाचे दरात म्हणजे र. रु. ३,५०,०००/- मध्ये उचलण्यास तयार आहात काय याबाबत विचारणा केली असता त्यांनी लेखी कळविले आहे की, सदरील साहित्य मी प्रथम क्रमांकाचे दरात म्हणजे रु. ३,५०,०००/- मध्ये उचलण्यास तयार नाही. मी जे दर दिलेले आहेत त्याच दरात म्हणजे र. रु. २,६१,७८६/- मध्ये उचलण्यास तयार आहे.

तरी मे. आली रजा आबेदी यांनी सदरील साहित्य उचलण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे त्यांची अनामत रक्कम रु. २५,०००/- जप्त करण्याची तसेच त्यांना मनपामध्ये यापुढें कुठलेही काम न देण्याची तसेच प्रथम क्रमांकाचे व द्वितीय क्रमांकाचे दरात असलेली तफावत र. रु. २१४/- इतकी रक्कम त्यांच्याकडुन (एरियर्स ऑफ लँड रिव्हेन्यु) वसुल करुन घेण्याची कार्यवाही करणे बाबत व सदरील भंगार साहित्य दुसऱ्या क्रमांकाचे दर असलेले श्री आगाखान मियाखान यांना त्यांनी दिलेल्या दरात म्हणजे र. रु. २,६१,७८६/- मध्ये विक्री करण्याच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**अति. शहर अभियंता :** लॉट पध्दतीने पाहिल्यास १.१० लक्षाची निविदा भरुन आलेली होती. परंतु मनपाने भंगाराची अपेक्षित रक्कम रु. २,७४,७५०/- अशी निश्चित केलेली असल्याने कमी दर प्राप्त झाले म्हणुन पुन्हा दुसऱ्यांदा टेंडर काढले. पुन्हा १.१० लक्ष दर आले. पुन्हा तिसऱ्यांदा लॉट पध्दतीने भंगार साहित्य विक्रीकरीता दरपत्रके मागविली असता सर्वात जास्त श्री अल रजा आबेदी यांचे रु. ३,५०,०००/- रुपयांचे दर भरुन आले त्यांना आर्डर दिलेले आहे. परंतु ते आजारी असल्याने हे भंगार उचलू शकत नाही म्हणुन त्यांनी कळविले. त्यानंतर त्यांना पत्र देऊन इमारतीचे उद्घाटन करायचे म्हणुन कळविले. त्यांनी काम करण्यास असमर्थता दर्शविली. दुसऱ्या क्रमांकाचे श्री आगाखान मिया खान यांना विचारणा करुन पहिल्या क्रमांकाच्या दराप्रमाणे भंगार विक्री करण्यास तयार नाही असे त्यांनी उत्तर दिले. जे रु. २,६१,७८६/- प्रमाणे जे दरपत्रक भरुन दिले त्याप्रमाणे भंगार उचलण्यास तयार आहे. त्यानुसार त्यांना पाच दिवसाची मुदत दिलेली म्हणुन कार्यवाही होत आहे. या प्रस्तावास मंजुरी द्यावी.

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊन हॉल परिसरात जमा झालेले भंगार साहित्य विक्री करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात जास्त म्हणजे र. रु. ३,५०,०००/- या दराचे दरपत्रक धारक श्री अल रजा आबेदी यांनी साहित्य उचलण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे त्यांची अनामत रक्कम रु. २५,०००/- जप्त करुन त्यांना यापुढे मनपामध्ये कुठलेही काम देण्यात येऊ नये. तसेच प्रथम व द्वितीय क्रमांकाचे दरामध्ये असलेली तफावत र. रु. ८८,२१४/- इतकी रक्कम संबंधितांकडुन (एरीयर्स ऑफ लॅन्ड रिव्हेन्यु) वसुल करण्याची कार्यवाही करण्यात येऊन सदरील भंगार साहित्य दुसऱ्या क्रमांकाचे दर असलेले श्री. आगाखान मियाखान यांना त्यांनी दिलेल्या दरात म्हणजे र. रु. २,६१,७८६/- मध्ये विक्री करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका मालकीचे हर्षनगर येथील व्यापारी संकुलातील ३ दुकाने ३० वर्षाच्या भाडे पट्टयाने देण्यास्तव भाडे १५५/- प्रति चौ. मी. प्रतिमहा व अनामत रक्कम ४०००/- प्रति चौ. मी. ठरविण्यात आलेले आहे. दै. नवा मराठा, लोकमत या वर्तमानपत्रात क्र. मनपा/मामऊ/७१/२००२ दिनांक १९.१.२००२ अन्वये जाहिर निविदा प्रसिध्द करुन एकुण ३ दुकानासाठी सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे अंतीम दिनांक २९.१.०२ पर्यंत एक निविदा विकली गेली व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतीम दिनांक २.२.२००२ पर्यन्त एक सिलबंद निविदा प्राप्त झाली आहे. उर्वरीत दोन दुकानाकरीता पुन्हा जाहीर निविदा मागविण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

दुकान क्र. ३ साठी एकच निविदा प्राप्त झाली असुन आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त आहे. ती खालील प्रमाणे

| अ. क्र. | दुकान क्र. | क्षेत्रफळ | अधारभुत किमंत ४०००/- प्रति चौ. मी. प्रमाणे | निविदा भरणाऱ्याचे नांव | निविदेतील रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०३ | १७.१४ चौ. मी. | ३८,६००/- | श्री. खिजरोहीन सिध्दीकी | रु. ६९,४५८/- |

वरील तक्त्यात दुकान क्र. ३ साठी एक निविदा प्राप्त झाली आहे. निविदेतील दर आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त असल्याने निविदाधारकाचे दर स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी या प्रस्तावासंबधी सविस्तर माहिती द्यावी.

**प्र. मालमत्ता अधिकारी :** शहरात एकुण ९ व्यापारी संकुल बांधलेली आहेत. दोन भाजी मंडईसाठी दुकाने बांधलेली आहेत. शासन निर्देशानुसार मागासर्गीयासाठी ५% प्रमाणे दुकाने राखीव ठेवणे आवश्यक आहे. दोन भाजी मंडई मिळुन ३३ ओटे बांधण्यात ओटे बांधण्यात आलेले आहेत. दोन ५% प्रमाणे मागासवर्गीयांसाठी राखीव ठेवण्यात आलेले आहेत. नऊ व्यापारी संकुलात २३६ दुकाने बांधलेली असुन ५% प्रमाणे मागासवर्गीयांसाठी राखीव आहे. त्यापैकी १० दुकाने दिलेली आहे. आता विषय ५ नुसार हर्षनगर येथील ३ दुकानासाठी निविदा भरुन मागविल्या असता फक्त क्रं. ३ च्या दुकानासाठी एक निविदा भरुन आलेली आहे. सदर निविदा रु. ३८,६००/- रकमेने भरुन आलेली आहे.

**श्री. प्रशांत देसरडा :** महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावी म्हणुन वेळोवेळी सभागृहात मुद्दे मांडण्यात आले. त्यातच खाजगी तत्वाने विकसीत करता येईल का ? आयुक्तांचे अभिनंदन हर्षनगर येथील दुकान सन ९३-९४ साली बांधलेली असुन आज प्रस्ताव येतो. ९४ ते २००२ ही ८ वर्ष होता. ८ वर्षापासुन दुकाने बांधुन ठेवली. भाडयाने दिले असते. यास जबाबदार कोण?

आज ३ दुकानाचे निविदा दिल्या. एकाच दुकानासाठी निविदा भरुन येते. ती एकाच व्यक्तीने पाठविलेली आहे.

**मालमत्ता अधिकारी :** यापुर्वी निविदा काढलेल्या होत्या. प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा निविदा काढण्यात येऊन प्रस्ताव सादर केलेला आहे. या बाबतची संचिका मागवुन माहिती देता येईल.

**मा. सभापती :** नुकसान होत असेल तर जबाबदारी फिक्स करावी. सभागृहात प्रस्ताव सादर करतांना मागील परिस्थिती काय होती याचे अधिकाऱ्याने वाचन केले पाहिजे. सभागृहात माहिती देता आली पाहिजे.

**श्री. प्रशांत देसरडा :** सादिया मार्केट नेहरुभवन व्यापार संकुल असो, दुकाने घेण्यास प्रतिसाद मिळत नाही. कारण संबंधितांना डिपॉझिट व स्टॅम्प डुयटीचा खर्च मोठया प्रमाणात येतो. सादिया मार्केटच्या दुकानाचा ५ वेळेस टेंडर झाले. अद्याप संपुर्ण दुकाने दिलेली नाहीत. त्यासाठी जी अनामत रक्कम घेण्यात येते ती जास्तीची आहे. त्यात काही कमी करता येतील का? तसे भाडे

कमिटीला कळवावे व पुढील कार्यवाही करावी. जेणे करुन लोक दुकाने घेण्यास पुढे येतील व मनपास उत्पन्न ही मिळेल. आतापर्यंत ४० लोकांनी ५ हजार डिपॉझीट रक्कम मनपास सोडुन दिलेली आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** जवाहर कॉलनी येथे मनपाने भाजी मंडई बांधलेली आहे. एकुण २५ दुकाने असुन ५ वेळेस टेंडर होऊनही त्यास प्रतिसाद मिळालेला नाही व ती दुकाने तशीच पडुन आहेत. त्या मालमत्तेची माती होत आहे. मनपाचा लाखो, रुपये तेथे खर्च झाला. परंतु तडजोड करुन कार्यवाही करण्यास प्रशासनाचे लक्ष नाही. भाजी विक्रेते हे जास्त रक्कमा देऊन व दुकाने घेऊ शकत नाही. ते सध्या रस्त्याच्या बाजुला भाजी विक्री करतात. ४ ते ५ हजार रुपये फिक्स डिपॉझिट ठेवल्यास व दरमहा १०० ते २०० रु. भाडे ठेवल्यास प्रतिसाद मिळेल. ४ वर्षापासुन दुकाने बांधलेली असुन त्यापासुन महानगरपालिकेस शुन्य उत्पन्न आहे. यास जबाबदार कोण ?

**श्री. जयवंत ओक :** सहा वर्षापासुन दुकाने झाली. आज निविदेचा प्रस्ताव येतो. जे नुकसान झाले त्यास जबाबदार कोण. दुकाने पडुन राहण्यापेक्षा वाजवी दरात द्यावे. अटी शर्तीचे पालन करण्यास बंधनकारक ठेवावे. तसेच आताच स. सदस्य श्री देसरडा यांनी सुचना केल्याप्रमाणे कबाडीपुरा येथे सुध्दा व्यापारी संकुल आहे ते सुध्दा रिकामे आहे. भाडेतत्वावर जात असतील तर तशी कार्यवाही करावी. आज प्रस्ताव उत्पन्नाचे सादर झालेले मा. आयुक्तांनी यात लक्ष घातलेले दिसते. आणखी लक्ष देऊन मनपाचे जास्तीत जास्त उत्पन्न कसे वाढेल यासाठी प्रयत्न करावे. तसेच औरंगपुरा येथे प्रिया मार्केट १० वर्षापासुन झाले. परंतु ४ महिन्यापुर्वी ४ दुकानाचे टेंडरचा प्रस्ताव होता. १० वर्षाचे उत्पन्न गेले. यात मनपाचे नुकसान होते. यास जबाबदार कोण ?

जबाबदारी फिक्स करावी. वेळीच अधिऱ्यांनी कार्यवाही केली पहिजे. तरच यात मनपाचा फायदा आहे.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** मागासवर्गीयांसाठी ५% दुकाने राखीव ठेवता त्याचप्रमाणे महिलांसाठी सुध्दा काही दुकाने राखीव ठेवण्यात यावी. जे भाजी विक्रेते रस्त्यावर विक्री करतात त्यांना दंडात्मक कार्यवाही करावी. जेणे करुन दुकाने घेण्यास प्रतिसाद मिळेल.

**मा. सभापती :** सादिया मार्केट या मनपाच्या मालकीची दुकाने घेण्यास प्रतिसाद का मिळत नाही. मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

**प्र. मालमत्ता अधिकारी :** सादिया मार्केटच्या संदर्भात खुलासा देण्यात येतो की, या दुकानाच्या निविदा भरला आलेल्या होत्या. १ वर्षाच्या करार पध्दतीने काही लोकांनी भाडे भरलेले होते. यात २ ते ३ लोकांनी दुकाने घेतल्या. उर्वरीत लोकांना वारंवार पत्र देऊनही चांगला प्रतिसाद मिळालेला नाही. ही बाब सभागृहाच्या निर्देशनास आणुन देत आहे.

**श्री. जयवंत ओक :** प्रतिसाद का मिळत नाही. काही तरी तडजोड करावी. उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न असावा. हे सभागृहाचे मत आहे.

**श्री. प्रशांत देसरडा :** सादिया टॉकीजलगत मागील २५ वर्षापासुन दुकाने आहेत. तेथे १.५ लाख अनामत व ५००० भाडयाने दुकाने मिळतात कशाला लोक मनपा दुकान केंद्राकडे जातील. अनामत रक्कम कमी करता येईल का ते पहावे.

**मा. आयुक्त :** ज्यांनी १.५० लक्ष डिपॉझिट भरले त्यांना दुकानाचा कब्जा घेतला नसेल व प्रतिसाद देत नसेल तर जे भाडे निश्चित केले ते डिपॉझिट मधुन वसुल होईल व त्यांची वाट न पाहता फेर निविदा मागविता येईल.

**प्र. मालमत्ता अधि. :** किती दुकानावर अतिक्रमण झालेले आहे याचा अहवाल मागवुन पुढील बैठकीत करण्यात येईल.

**श्री. जयवंत ओक :** ज्यांना दुकाने देण्यात यावी. वाटाघाटी कशा झाल्या, करारनामा काय झाला, खुलासा द्यावा. २४ लोकांना दुकाने दिलेली आहे, त्यांनी मनपाच्या मालकीची किती व्यापारी संकुल आहेत, किती भाडयाने दिली, भाडे आकारण्यात येते. किती दुकानावर अतिक्रमण याचा संपुर्ण तपशील मागवावा. मनपाचे हे उत्पन्नाचे साधन असुन त्यात मनपाचे लाखो रुपये खर्च झाले. सर्वच मार्केटच्या संचिका मागवुन घ्याव्यात व पुढील बैठकीत सविस्तर माहिती द्यावी.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** जवाहर कॉलनी भागात व गजानन महाराज मंदीर जवळील रस्त्यावर भाजी मंडई भरते रहदारीसाठी जागा राहात नाही. महानगरपालिकेची भाजी मंडई बांधलेली वास्तु खराब होते.

**मा. आयुक्त :** जे मार्केट बांधलेले आहे ते योग्य ठिकाणी बांधलेले नाही. ५-६ वेळेस निविदा मागवुन कुणी घेण्यास तयार नाही. मार्केट चालणार की, नाही हे विचारात न घेता बांधलेले आहे. उत्पन्न मिळेल की, नाही हे पाहीलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. ती डावलता येणार नाही. आता प्रश्न असा आहे जे डिपॉझिट ठेवले ते कमी करुन त्यास प्रतिसाद मिळेल का? तोटयातच आहे.

**श्री. जयवंत ओक :** ज्यांची निविदा भरुन आली व ते घेण्यास तयार नाही दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर जे थोड्याफार फरकाने निविदा भरुन आलेली असेल अशांना त्यांचे बरोबर वाटाघाटी करुन दुकाने देण्यात यावीत, जे डिपॉझिट ठेवले ते कमी करुन देता येत असेल तर तसा निर्णय घ्यावा. १०-२० हजार देण्यास तयार आहे.

**मा. आयुक्त :** याबाबतीत सर्वच मार्केटचा सर्व्हे करण्याची गरज आहे. त्यानुसार माहिती मिळेल. प्रस्तावातील दर हे अपेक्षापेक्षा जास्त आहेत. मंजुर करण्यास हरकत नसावी. यापेक्षा जास्त रक्कम येऊ शकत नाही.

**श्री. नंदकुमार फुलारी :** किती लोकांनी रक्कम भरलेल्या नाही, चेक बाऊन्स झाले ?

**प्र. मालमत्ता अधि. :** अमानत रक्कमा भरलेल्या आहेत. भाडे भरलेले नाही. प्रस्तावानुसार अपेक्षापेक्षा जास्त दर आलेले आहे. त्यामुळे प्रस्ताव मंजुर करावा.

**श्री. कैसरखान बद्रोधीन खान :** एकच निविदा प्राप्त झालेली आहे दबाव आणला असेल त्यामुळे स्पर्धा झालेली नाही. नामंजुर किंवा स्थगित करावा.

**मा. सभापती :** मागच्या वेळेस ५०,०००/- रु. आलेले होते. यावेळेस त्यापेक्षा जास्त आहे. पुन्हा रिकॉल केल्यास कमी येऊ शकेल. त्यामुळे नुकसान होईल.

**मा. आयुक्त :** ३८ हजारचे ६९,४५८ येत आहेत. पुन्हा टेंडर मागवुन कमी आले तर नुकसान होईल.

**श्री. कैसर खान बद्रोदीनखान :** ३ गाळयांपैकी एकच गाळा घेण्यास तयार आहे. उर्वरीत दोन कुणीही घेणार नाही. संबंधितहेच गुत्तेदार त्या दोन दुकानाचा वापर करतील अशी शंका येते. म्हणुन प्रस्ताव स्थगित करवा चौकशी व्हावी. पुढील बैठकीत मंजुर करता येईल.

**मा. सभापती :** प्रस्ताव स्थगीत करण्यात येत आहे.

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवण्यात येतो.

**विषय क्र. ७ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे कबाडीपुरा येथे १७ दुकानाचे व्यापारी संकुलाचे बांधकाम सुरु आहे. वरील १७ दुकाने ३० वर्षाच्या भाडे पट्टयाने देण्यास्तव भाडे १५५/- प्रती चौ. मी. प्रतिमहा व अनामत रक्कम ४०००/- प्रती चौ. मी. ठरविण्यात आले आहे. दैनिक नवा मराठा/मामअ/७१/२००२ दिनांक १९.१.२००२ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द करुन एकुण १७ दुकानासाठी सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे अंतिम दिनांक २९.१.२००२ पर्यंत तीन निविदा विकल्या गेलया व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतिम दि. २.२.२००२ पर्यंत तीन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत. दुकान नं. २ साठी भरलेले निविदा आधारभुत रक्कमेपेक्षा कमी दराची असल्याने रद्द करण्यात आली आहे. उर्वरीत दुकानाकरीता पुन्हा जाहीर निविदा मागविण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

दुकान क्र. ४ , ६ साठी एकएक निविदा प्राप्त झाली आहे. निविदाधारकाचे नांव खालील प्रमाणे आहे. दुकान क्र. ४ साठी भरलेली निविदा आधारभुत रकमेपेक्षा कमी असल्यामुळे तसेच दुकान क्र. ६ साठी भरलेली निविदा आधारभुत रक्कमेच्या दृष्टीकोनाने व अपेक्षापेक्षा कमी असल्याने मा. आयुक्तांचे दालनात १९.३.२००२ रोजी १२.३० वाजता वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले होते.

वाटाघाटीअंती ठरविण्यात आलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | दुकान क्र. | क्षेत्रफळ | आधारभुत किमंत ४०००/- प्र. चौ. मी. प्रमाणे | निविदा भरणाऱ्याचे नाव | निविदेतील रक्कम | वाटाघाटी तील रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ०४ | १९.५ | ७८,०००/- | श्री. मो. इस्माईल शेख बद्रोद्दीन | ७०,०४२/- | ८५,०००/- |
| २. | ०६ | १०.५ | ४२,०००/- | श्री. मो. खिजरोद्दीन सिध्दीकी | ४२,५२५/- | ४४,०००/- |

वरील तक्त्यात दुकान क्र. ४ व ६ साठी एक एक निविदा प्राप्त झाली आहे. दुकान क्र. ४ साठी अनामत रक्कम आधारभुत किमंतीपेक्षा कमी असल्यामुळे तसेच दुकान क्र. ६ या दुकानाच्या निविदेमध्ये अपेक्षापेक्षा अनामत रक्कम कमी असल्याने दुकानाचे वाटाघाटी करण्यात आली आहे. करीता वाटाघाटी अंती ठरविण्यात आलेले दर स्थायी समितीसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**प्र. मालमत्ता अधिकारी :** कबाडीपुरा येथील १७ दुकानाचे व्यापारी संकुलाचे बांधकाम सुरु आहे.

**श्री. नंदकुमार फुलारी :** दुकाने भाडयाने देण्याऐवजी विक्री करावे. मनपाचे उत्पन्न वाढेल. दुकान बांधण्यास खर्च येतो. शिवाय भाडे वसुल होत नसेल तर मनपाचे नुकसान होते.

**डॉ. आशा बिनवडे :** डेड इन्व्हेस्टमेंट तेथे काय निर्णय घेणार.

**मा. आयुक्त :** प्रस्ताव मंजुर करावा. बांधकाम चालुच आहे. त्या अगोदर आपण टेंडर करुन दर मागणी केलेली आहे. आधारभुत रकमेपेक्षा जो जास्तीत जास्त देईल त्यांनाच देणार आहोत. यात वाटाघाटी केलेली आहे. मंजुर करण्यास हरकत नसावी.

**मा. सभापती :** विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या मालकीचे कबाडीपुरा येथील १७ दुकाने ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव मागविण्यात आलेल्या निविदानुसार प्राप्त झालेलया निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार अनुक्रमे रु. ८५,०००/- रकमेची श्री. मो. इस्माईल शेख बद्रोधीन यांची व रु. ४४,०००/- रकमेची श्री. मो. खिजरोधीन सिध्दीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८ :**

उपआयुक्त (म. ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे सादिया टॉकीज मागील व्यापारी संकुलातील उर्वरीत ८ दुकाने ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव भाडे ५०/- प्रती चौ.मी. प्रतिमहा मागील बाजुचे व ६०/- प्रती चौ.मी. प्रतिमहा समोरचे बाजुचे, अनामत रक्कम रु. ४०००/- प्रती चौ.मी. ठरविण्यात आले आहे. दै. नवा मराठा, लोकमत या वर्तमानपत्रात क्र. मनपा/मामऊ/७१/२००२ दि. १९.१.२००२ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द करुन उर्वरीत ८ दुकानांसाठी सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे अंतीम व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतीम दिनांक २.२.२००७ पर्यंत एक सिलबंद निविदा प्राप्त झाली आहे. उर्वरीत ७ दुकानाकरीता पुन्हा जाहीर निविदा मागविण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

दुकान क्र. ६ (एस) साठी एकच निविदा प्राप्त झाली आहे निविदाधारकाचे नांव खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | दुकान क्र. | क्षेत्रफळ | आधारभुत किमंत ४०००/- प्र. चौ. मी. प्रमाणे | निविदा भरणाऱ्याचे नाव | निविदेतील रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०८ (एफ) | ५.७९ चौ. मी. | २३,१६०/- | श्री. सय्यद अब्दुल सय्यद अली मोद्दीम | २५,०००/- |

वरील तक्त्यात दुकान क्र. ८ (एस) साठी एकच निविदा प्राप्त झाली आहे. निविदेतील दर आधारभुत रकमेपेक्षा जास्त असल्याने निविदाधारकाचे दर स्थायी समितीसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीचे सादिया टॉकीज, मागील व्यापारी संकुलातील उर्वरीत ८ दुकाने ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव मागविण्यात आलेल्या निविदानुसार दुकान क्र. ८ (एस) साठी प्राप्त झालेली श्री. सय्यद अब्दुल हक सय्यद उली मोधीन यांची र. रु. २५,०००/- रकमेची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे नेहरुभवन येथील व्यापारी संकुलातील १० दुकाने ३० वर्षाच्या भाडे पट्टयाने देण्यास्तव भाडे ९७ /- प्रति चौ.मी. प्रतिमहा व अनामत रु. ४०००/- प्रती चौ. मी. ठरविण्यात आले आहे. दै. नवा मराठा, लोकमत या वर्तमानपत्रात क्र. मनपा/मामऊ/७१/२००२ दि. १९.१.२००२ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द करुन एकुण १० दुकानासाठी सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे गेल्या व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतीम दि. २.२.२००२ पर्यंत तेरा सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत.

दुकान क्र. २,३,४,५,६,७,९ व १० साठी विकलेली निविदा व प्राप्त झालेल्या निविदाचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | दुकान क्र. | विकलेली निविदा | प्राप्त झालेली निविदा |
|---|---|---|---|
| १. | ०२ | ०१ | ०१ |
| २. | ०३ | ०१ | ०१ |
| ३. | ०४ | ०१ | ०१ |
| ४. | ०५ | ०२ | ०२ |
| ५. | ०६ | ०१ | ०१ |
| ६. | ०७ | ०१ | ०१ |
| ७. | ०९ | ०२ | ०२ |
| ८. | १० | ०४ | ०४ |

आधारभुत रकमेपेक्षा कमी रकमेच्या निविदा कमी रकमेच्या निविदा धारकांना मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या दालनात वाटाघाटीसाठी दि. १९.३.२००२ रोजी १२.३० वाजता बोलावुन खालील प्रमाणे वाटाघाटी करण्यात आली आहे.

| अ. क्र. | दुकान क्र. | क्षेत्रफळ | अधारीुत किमंत ४०००/- प्रती चौ. मी. प्रमाणे | निविदा भरणाऱ्याचे नांव | निविदेतील रक्कम | वाटाघाटीतील रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ०२ | ९.८४ | ३९,३६०/- | श्री. शे. हसनोद्दीन | ३२,००० | ५०,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | ०३ | --/-- | --/-- | --//-- | ३२,००० | ५०,००० |
| ३. | ०४ | --/-- | --/-- | शे. शेसखर शे. अन्वर | ४२,६०० | ४५,००० |
| ४. | ०५ | --/-- | --/-- | --//-- | ४२,६०० | ४५,००० |
| ५. | ०६ | --/-- | --/-- | भी. अ. रज्जाक खान अहेमद खान | ४२,६०० | ४५,००० |
| ६. | ०७ | --/-- | --/-- | --//-- | ४२,००० | ४५,००० |
| ७. | ०९ | --/-- | --/-- | श्री. शे. जाफर शे. अहमद | ६०,८०८६ | - |
| ८. | १० | --/-- | --/-- | श्री. अ. अय्युबखान हाजी खान | ९०,००० | - |

वरील प्रमाणे दुकान क्र. २ व ३ मध्ये अनामत रक्कम आधारभुत किमंतीपेक्षा कमी असल्यामुळे तसेच दुकान क्र. ४,५,६, व ७ या दुकानाचा निविदामध्ये अपेक्षापेक्षा अनामत रक्कम कमी असल्यामुळे दुकान क्र. २,३,४,५,६,७ या दुकानाचे वाटाघाटी करण्यात आली आहे. करिता निविदाधारकाने दर स्थायी समितीसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**प्र. मालमत्ता अधि. :** यात दुकान क्र. २ व ३ चे अनामत रक्कम आधारभुत किमंतीपेक्षा कमी आहे. बाकीच्या दुकानाचे जास्त आहे.

**मा. आयुक्त :** प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नसावी. वाटाघाटी केलेल्या आहेत.

**मा. सभापती :** सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीचे नेहरुभवन येथील व्यापारी संकुलातील १० दुकाने ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव मागविण्यात आलेल्या निविदानुसार दुकान क्र. २, ३, ४, ५, ६, ७, ९ व १० या दुकानासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकांपैकी दुकान क्र. २, ३, ४, ५, ६, ७ या दुकानासाठी आलेल्या वाटाघाटीनुसार व दुकान क्र. ९ व १० साठी प्राप्त झालेल्या खालील दर दिलेल्या दराच्या निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | दुकान क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेती /वाटाघाटीअंतीची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | ०२ | श्री. शे. हसनोद्दीन | ५०,०००/- |
| २. | ०३ | --//-- | ५०,०००/- |
| ३. | ०४ | श्री. शे. सखर शेख अन्वर | ४५,०००/- |
| ४. | ०५ | --//-- | ४५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | ०६ | श्री. अ. रज्जाक खान अहेमद खान | ४५,०००/- |
| ६. | ०७ | --//-- | ४५,०००/- |
| ७. | ०९ | श्री. शेख जाफर शे. अहेमद | ८०,७८६/- |
| ८. | १० | श्री. अ. अय्युब खान हाजी खान | ९०,०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १० :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे संजयनगर भाजी मंडई येथील व्यापारी संकुलातील ८ दुकाने ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव भाडे १५५/- प्रति चौ.मी. प्रतिमहा व अनामत रक्कम ४०००/- प्रति चौ.मी. ठरविण्यात आले आहे. दै. नवा मराठा, लोकमत या वर्तमानपत्रात क्र. मनपा/मामऊ/७१/२००२ दि. १९.१.२००२ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द करुन एकुण ८ दुकानासाठी सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे अंतीम दि. २९.१.२००२ पर्यन्त तेरा निविदा विकल्या गेल्या व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतिम दि. २.२.२००२ पर्यंत तेरा सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत.

दुकान क्र. १, २, ४ व ५ साठी विकलेली निविदा व प्राप्त झालेली निविदेचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | दुकान क्र. | विकलेली निविदा | प्राप्त झालेली निविदा |
|---|---|---|---|
| १. | १ | ३ | २ |
| २. | २ | २ | २ |
| ३. | ३ | २ | १ |
| ४. | ४ | ६ | १ |

आधारभुत रकमेपेक्षा जास्त रकमेच्या भरलेल्या निविदा व निविदाधारकाचे नांव खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | दुकान क्र. | क्षेत्रफळ | अधारीुत किमंत ४०००/- प्रती चौ. मी. प्रमाणे | निविदा भरणाऱ्याचे नांव | निविदेतील रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०१ | ६.३ चौ. मी. | २५,००० | श्री. रघुनाथ यमाजी काकडे | ३०,५००/- |
| २. | ०२ | --/-- | --/-- | श्री. जगताप मोतीलाल कायस्थ | २९,५१६/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | ०४ | --/-- | --/-- | श्री. गणेश सांडु रत्नपारखे | २९,३१४/- |
| ४. | ०६ | --/-- | --/-- | श्री. एस. बी. पाचनकर | २०,०००/- |

वरील दुकान क्र. ६ साठी भरलेले निविदेतील अनामत रक्कम आधारभुत रकमेपेक्षा कमी असल्यामुळे मा. आयुक्त यांचे दालनात दि. १९.२.२००२ रोजी १२.३० वाजता वाटाघाटी करण्यात आली आहे. ती खालील प्रमाणे.

| **अ. क्र.** | **दुकान क्र.** | **क्षेत्रफळ** | **अधारीत किमंत ४०००/- प्रती चौ. मी. प्रमाणे** | **निविदा भरणाऱ्याचे नांव** | **निविदेतील रक्कम** | **वाटाघाटीतील रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ०६ | ६.३ | २५,२०० | श्री. एस. बी. पाचनकर | २०,००० | २६,०००/- |

वरील प्रमाणे दुकान क्र. १, २ व ४ साठी निविदेतील भरलेली अनामत रक्कम आधारभुत रकमेपेक्षा जास्त असल्याने निविदाधारकाचे दर तसेच दुकान क्र. ६ साठी वाटाघाटी अंती ठरविण्यात आलेली दराची निविदा स्थायी समितीसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**प्र. मालमत्ता अधिकारी :** संजयनगर येथे ८ दुकाने देण्यासाठी निविदा काढलेल्या होत्या फक्त ४ दुकानाकरीता निविदा प्राप्त झाल्या. दुकान क्र. ६ चे अनामत रक्कम आधारभुत रक्कमेपेक्षा कमी आलेले होते. त्यामुळे त्यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले होते.

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीचे संजयनगर भाजी मंडई येथील व्यापारी संकुलातील ८ दुकाने ३० वर्षाच्या भाडे पट्टयाने देण्यास्तव मागविण्यात आलेल्या निविदानुसार दुकान क्र. १, २, ४ साठी प्राप्त झालेल्या जास्त रकमेच्या निविदा तसेच दुकान क्र. ६ साठी वाटाघाटीअंती ठरल्यानुसार प्राप्त झालेली खालील दर्शविलेल्या दरांच्या निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| **अ. क्र.** | **दुकान क्र.** | **निविदाधारकांचे नांव** | **निविदा/ वाटाघाटी तील रक्कम** |
|---|---|---|---|
| १. | ०१ | श्री रघुनाथ यमाजी काकडे | ३०,५००/- |
| २. | ०२ | श्री जगताप मोतीलाल कायस्थ | २९,५१६/- |
| ३. | ०४ | श्री गणेश सांडु रत्नपारखे | २९,३१४/- |
| ४. | ०६ | श्री एस. बी. पाचनकर | २६,०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे औरंगपुरा (रिया मार्केट) पहिला मजला येथील व्यापारी संकुलातील ३१ दुकाने ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव भाडे १५५/- प्रती चौ. मी. ठरविण्यात आले आहे. दै. नवा मराठा, लोकमत या वर्तमानपत्रात क्र. मनपा/मामऊ/७१/२००२ दि. १९.१.२००२ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द  करुन एकुण ३१ दुकानांसाठी सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे अंतीम दिनांक २९.१.२००२ पर्यंत १५ निविदा विकल्या गेल्या व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतीम  दि. २.२.२००२ पर्यंत १० (दहा) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत. उर्वरीत दुकानाकरीता पुन्हा जाहीर निविदा मागविण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

दुकान क्र. १ साठी तीन निविदा प्राप्त झाल्या दुकान क्र. २ साठी तीन निविदा विकल्या व सिलबंद १ निविदा प्राप्त झाली, दुकान क्र. ४ साठी तीन निविदा विकल्या गेल्या व सिलबंद २ निविदा प्राप्त झाल्या, दुकान क्र. ५ साठी दोन निविदा विकल्या गेल्या व सिलबंद ०१ निविदा  प्राप्त झाली, दुकान क्र. ७ साठी दोन निविदा विकल्या गेल्या व सिलबंद एकच निविदा प्राप्त झाली, दु. क्रं. ८ साठी एकच निविदा विक्री झाली व प्राप्त झाली. दु. क्रं. १३ साठी एकच निविदा विकली गेली व सिलबंद एक निविदा प्राप्त झाली आहे. आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त रकमेच्या भरलेल्या निविदा व निविदाधारकांने नांव खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | दुकान क्र. | क्षेत्रफळ | अधारीत किमंत ४०००/- प्रती चौ. मी. प्रमाणे | निविदा भरणाऱ्याचे नांव | निविदेतील रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०१ | ७.० चौ. मी. | २८,८००/- | श्री. दिवाकर एकनाथ मोरे | ७५,५००/- |
| २. | ०२ | --//-- | २८,८००/- | श्री सत्येन सुखदेव वाघ | ४३,२००/- |
| ३. | ०४ | --//-- | २८,८००/- | श्री अश्विनकुमार खुमकर | ५१,१११/- |
| ४. | ०५ | --//-- | २८,८००/- | श्री मधुकर नारायण काथार | ४५,००९/- |
| ५. | ०७ | --//-- | २८,८००/- | श्री राजेंद्र बबनराव अगडे | ५२,०००/- |
| ६. | ०८ | --//-- | २८,८००/- | श्री आभु सोनवणे | २०,५००/- |
| ७. | १३ | --//-- | २८,८००/- | चेतन इन्टरप्रायईजेस | २८,९००/- |

वरील तक्त्यात  दुकान क्र. ८ साठी भरलेली निविदा अनामत न भरल्या मुळे (निविदेतील अटीशर्ती प्रमाणे अनामत रक्कम भरणे आवश्यक होते. परंतु संबंधिताने अनामत रक्कम भरलेली नाही) व आधारभुत रक्कमेपेक्षा कमी दराची निविदा भरल्यामुळे रद्द करण्यात आली आहे. तसेच दुकान क्र. १, २, ४, ५, ७, १३ साठी निविदेतील भरलेली

रक्कम आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त असल्याने निविदाधारकाचे दर स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**प्र. मालमत्ता अधिकारी :** औरंगपुरा (पिया मार्केट) पहील मजला येथील ३१ दुकाने देण्याकरीता निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. ३१ पैकी ७ दुकानाकरीता निविदा भरलेल्या असुन यापैकी दुकान क्र. ८ साठी भरलेली निविदा अनामत रक्कम न भरल्यामुळे व आधारभुत रक्कमेपेक्षा कमी दराची निविदा भरल्यामुळे रद्द करण्यात आलेली आहे.

**श्री. जयवंत ओक :** संचिका मागवावी. जे वेळेवर भाडे भरीत असतील त्यांना सुविधा द्याव्यात.

**श्री प्रशांत देसरडा :** रंगारगल्लीरस्ता रुंदीकरणात काही लोकांच्या जागा गेलेल्या आहेत त्यामुळे त्यांनी त्या बदल्यात त्यांनी मनपाच्या मालकीची दुकाने अतिक्रमण करुन ताब्यात घेतलेली आहेत. भाडे भरीत नाही. पाच लोक असे डबल आहेत. रंगारगल्लीत जागा गेली नाही तेही लोक आहेत.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी चांगले प्रश्न उपस्थित केले. औरंगपुरा मार्केट मनपाच्या मालकीची दुकाने घेण्यास प्रतिसाद का मिळत नाही. अतिक्रमण झाले ? कुणे केले ? औरंगपुरा येथील भाजी मार्केटमध्ये अतिक्रमण आहे काय ? असेल तर खुलासा द्यावा. पिया मार्केटमध्ये ३१ गाळे केलेले आहेत. अतिक्रमण किती लोकांनी केले. खुलासा करावा. माहिती नसेल तर माहिती द्यावी. येथील २३ जी दुकाने दिली ती कोणत्या पध्दतीने दिली. मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा. औरंगपुरा येथील २४ गाळे दिलेले असुन रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली दिलेले आहे. परंतु त्या बाबतीत अटी शर्ती काय ? अटी शर्ती पुर्ण केलेल्या आहेत किंवा नाही याची पुर्नतपासणी करणे आवश्यक आहे. सर्वच दुकानांची चौकशी करुन सविस्तर अहवाल प्रशासनाने सादर करावा. प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**श्री. जयवंत ओक :** दुसऱ्या तिसऱ्या क्रमांाकाची ज्याची निविदा भरत आलेली असेल थोडया रक्कमेचा फरक असेल तर वाटाघाटी करत मनपाचा फायदा होत असेल तर मा. आयुक्तांनी अशा निविदाधारकांचा विचार करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाचे मालकीचे औरंगपुरा (पिया मार्केट) पहिला मजला येथील व्यापारी संकुलातील ३१ दुकाने ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव मागविण्यात आलेल्या निविदानुसार प्राप्त झालेल्या खालील दर्शविलेल्या जास्त रक्कमेच्या निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | दुकान क्र. | निविदा भरणाऱ्याचे नांव | निविदेतील रक्कम |
|---|---|---|---|
| १. | ०१ | श्री. दिवाकर एकनाथ मोरे | ७५,५००/- |
| २. | ०२ | श्री. सत्येन सुखदेव वाघ | ४३,२००/- |
| ३. | ०४ | श्री. अश्विनकुमार खुमकर | ५१,१११.११/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | ०५ | श्री. मधुकर नारायण काथार | ४५,००९/- |
| ५. | ०७ | श्री. राजेंद्र बबनराव मगरे | ५२,०००/- |
| ६. | १३ | चेतन एन्टरप्रायजेस | २८,९००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या मालकीचे औरंगपुरा (पिया मार्केट ) तळमजला येथील उर्वरीत ४ दुकाने दुकान क्रं. २, ३, ६ व २६ हया ३० वर्षाच्या भाडे पट्टयाने देण्यास्तव भाडे ८०/- प्रति चौ.मी. ठरविण्यात आलेले आहे. दै. नवा मराठा, दै. लोकमत या वर्तमानपत्रात क्र. मनपा/मामऊ/२००२ दि. १९.१.२००२ अन्वये जाहिर निविदा प्रसिध्द करुन सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्रीचे अंतिम दि. २९.१.२००२ पर्यंत १९ निविदा विकल्या गेल्या व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतिम दि. २.३.२००२ पर्यन्त १२ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| **अ. क्र.** | **दुकान क्र.** | **निविदा विक्री** | **प्राप्त निविदा** |
|---|---|---|---|
| १. | ०२ | ०४ | ०२ |
| २. | ०३ | ०६ | ०२ |
| ३. | ०६ | ०८ | ०७ |
| ४. | २६ | ०१ | ०१ |

वरील प्रमाणे दु. क्रं. २, ३, ६ व २६ प्राप्त झालेली जी निविदा आधारभुत रक्कमेपेक्षा सर्वात जास्त आहे ती खालील प्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **दूकान क्र.** | **क्षेत्रफळ** | **आधारभुत रक्कम ४००० प्र. चौ. मी प्रमाणे** | **निविदा भरणाऱ्याचे नांव** | **निविदेतील रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०२ | ७.२ चौ. मी. | २८,६००/- | श्री. कचरु धर्माजी सोनवणे | १,५१,०००/- |
| २. | ०३ | --//-- | --//-- | श्री.कमळ येसाजी दांडगे | ५०,०००/- |
| ३. | ०६ | --//-- | --//-- | श्री. राजश्री राजेंद्र मुळे | १,०३,०००/- |
| ४. | २६ | --//-- | --//-- | श्री. आप्पासाहेब शिवनीप जाधव | ५०,०००/- |

वरील दुकान क्र. २, ३, ६ व २६ साठी प्राप्त झालेल्या निविदा व निविदेतील दर आधारभुत रक्कमेपेक्षा सर्वात जास्त आहेत. करिता वरील दुकानांसाठी भरलेली निविदाधारकाचे दर स्थायी समितीसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**प्र. मालमत्ता अधिकारी :**आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त रक्कम प्राप्त झालेली आहे.

**श्री. जयवंत ओक :** ८ वर्षापासुन ही दुकाने बांधुन झालेली आहेत. आतपर्यंत भाडे तत्त्वावर न दिल्याने ४-५ लक्ष रुपयांचे नुकसान झाले यास कोण जबाबदार आहे. उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने व्यापारी संकुल उभारणी केलेली आहे. याचा विचार प्रशासनाने करावा.

**मा. आयुक्त :** जो अहवाल मा. सभापती यांनी मागविला त्यात सर्वच माहिती सादर होईल. निविदा केव्हा काढल्या किती वेळा काढलेल्या होत्या याची सर्व माहिती अहवालात असेल. दुकान दिल्यानंतर जे रक्कमा भरणार नाही त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

**श्री. जयवंत ओक :** ज्यांची निविदा भरुन आली ते घेण्यास तयार नसतील तर दुसऱ्या, तिसऱ्या क्रमांकावर जे १००/- ते २००/- रु. फरकाने असेल त्यात वाटाघाटी करुन देण्यात यावे. मनपाचे उत्पन्न वाढेल.

**मा. आयुक्त :** कुणी वाटाघाटी करण्यास तयार असेल तर तशी कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** हा प्रस्ताव मंजुर करीत असतांना प्रशासनाला सुचना करण्यात येत आहे की, ज्या - ज्या दुकानाचे टेंडर भरुन आले नाही व ज्या दुकाना रिकाम्या असतील अशा सर्व दुकानांचे शॉर्ट टेंडर नोटिस काढुन तात्काळ पुन्हा पुढील कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**श्री. प्रशांत देसरडा :** मोंढा भागात दवाखान्यासमोर व दुकाने मागच्या बाजुने आहे. कुणीही घेणार नाही त्यासाठी दवाखाना मागे घ्यावा व दुकाने पुढील बाजुने करावी. प्रशासनाला तसे आदेश करावेत.

**मा. सभापती :** म. सदस्य श्री. प्रशांत देसरडा यांनी सुचना केल्याप्रमाणे मनपाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीचे औरंगपुरा (पिया मार्केट) तळमजला येथील उर्वरीत ४ दुकाने दुकान क्रं. २, ३, ६ व २६ हया ३० वर्षाच्या भाडे पट्टयाने देण्या करीता मागविण्यात आलेल्या निविदानुसार खालील दर्शविल्याप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | दूकान क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील रक्कम |
|---|---|---|---|
| १. | ०२ | श्री. कचरु धर्माजी सोनवणे | १,५१,०००/- |
| २. | ०३ | श्री. कमल येसाजी दांडगे | ५०,०००/- |
| ३. | ०६ | श्री. राजश्री राजेंद्र मुळे | १,०३,०००/- |
| ४. | २६ | श्री. अप्पासाहेब शिवनाथ जाधव | ५०,०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३ :**

आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेची जकात वसुली ही अपेक्षा प्रमाणे होत नसल्यामुळे प्रायोगिक तत्वावर जकात वसुली ही खाजगी अभियंत्या मार्फत वसुल करण्यात यावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ मधील कलम ३५ अनुसार स्थायी समितीच्या मान्यतेनुसार अशी वसुली ही कोणत्याही कालावधीकरीता करण्यात येऊ शकते. त्यामुळे खाजगी अभियंत्यामार्फत जकात वसुलीचा कालावधी दि. १ जुलै २००२ ते ३० जुन २००३ असा ठेवण्यात यावा असे प्रशासनाचे मत आहे.

शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार जकात वसुलीचे वार्षीक मुल्य रक्कम रु. ६४.५६ कोटीचे उपरोक्त कालावधी करीता निश्चित करण्यात यावे.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. मीर हिदायत अली :** हा प्रस्ताव अत्यंत महत्त्वाचा असुन मंजुर करावा व महापालिकेचे जकातीचे खाजगीकरण करावे. मागील वर्षीची वसुली विचारात घेतली असता महानगरपालिकेला ८ कोटीचे नुकसान झालेले आहे. प्रस्ताव मंजुर करावा व निविदा काढावी.

**श्री. जयवंत ओक :** महापालिकेच्या फायद्याचा प्रस्ताव आहे. इतर महापालिकेत खाजगीकरण करण्यात आलेले आहे. त्याचा रिर्पोट आपल्याकडे आहे. आणखी काही महानगरपालिकांकडुन माहिती घेऊन हा प्रस्ताव पुढील बैठकीत घेऊन सविस्तर चर्चा करावी.

**श्री. प्रशांत देसरडा :** जकातीचे खाजगीकरण करावे किंवा नाही यावर चर्चा होत आहे. आपण अभ्यासु आहात तीन वेळा स्थायी समिती सभापती झालात. गेल्या वर्षभराचे पेपर काढले व ते वाचले. महाराष्ट्रातील महानगरपालिकेमध्ये आपली एकमेव महानगरपालिका आहे ज्यांची जकात वसुली टक्केवारीमध्ये सर्वात जास्त आहे. जकात विभागाचे अधिकारी तसेच काहि कर्मचारी यांचा सत्कार केला. एका वर्षात महानगरपालिकेच्या जकात उत्पन्नापासुन मनपाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न झालेला आहे त्या विभागाची अधिकारी /कर्मचारी यांनी प्रगती करुन दाखविली आणि लगेच दुसऱ्या वर्षी खाजगीकरण करतो. आपण ज्यांना प्रोत्साहन देण्याऐवजी त्याचेवरील विश्वास कमी दाखवतो असे वाटेल म्हणुन लगेच निर्णय घेणे बरोबर नाही. कोल्हापुर मनपा मध्ये खाजगीकरण झाले होते. मा. आयुक्त तेव्हा तेथेच होते. त्यांना सर्व परिस्थिती माहित आहे. मुंबई मनपाचा सुध्दा अनुभव सांगावा. सर्व अभ्यास करुनच जकात खाजगीकरणाचा निर्णय घेण्यात यावा.

**श्री. इबियास किरमाणी :** अधिकारी /कर्मचारी यांना कुणालाही दोषी ठरवायचे नाही. कुणाचे खच्चीकरण होत नाही. महानगरपालिकेचा फायदा बघावा. तेथील २०० कर्मचारी पाणीपट्टी मालमत्ता कराच्या वसुलीसाठी घेता येईल. मनपाचे उत्पन्न वाढेल याचा विचार करुन तात्काळ खाजगीकरण करण्यात यावे. व तसा निर्णय घेण्यात यावा.

**श्री. मीर हिदायत अली :** खाजगी करणासंदर्भात व्यापाऱ्यांनी विरोध केला एकीकडे विरोध करतात व जकात न भरता गाडया शहरात आणतात. त्यात त्यांचा फायदा होतो. किती चोरीची प्रकरणे उजेडात आली व्यापारी लोक यास विरोध

करणारच परंतु मनपाचा फायदा कशामध्ये आहे. याचा विचार सभागृहाने करावा.

**मा. सभापती :** या विषयावर या सभागृहामध्ये चांगली चर्चा घडुन आणलेली आहे. बऱ्याच सदस्यांनी मत व्यक्त केले की, इतर महानगरपालिकेमध्ये खाजगीकरण केलेले होते. तेथील अनुभव विचारात घ्यावा. जे की, फायदा काय, तोटा काय होतो. त्यासाठी सभागृहाच्या संमतीने एक कमिटी स्थापन करण्यात येते व त्या कमिटीने ज्या काही मनपामध्ये खाजगीकरण झाले होते त्या महानगरपालिकेचा कमिटी सर्व करेल व तसा अहवाल या सभागृहामध्ये सादर करावा. कमिटीतील सदस्य नंदकुमार फुलारी, श्री. चंद्रशेखर जैस्वाल, श्री. इजियास किरमाणी, श्री. प्रशांत देसरडा, श्री. मिर हिदायत अल तसेच प्रशासनातर्फे लेखाधिकारी यांचा समावेश करण्यात येत आहे. एका आठवडयात अहवाल सादर करावा. कमिटीचा प्रवास व इतर खर्चासाठी प्रशासनाने व्यवस्था करावी.

**मा. उपआयुक्त :** सभागृहाच्या निर्दशनास आणुन देऊ इच्छितो की, औरंगाबाद शहरात महाराष्ट्र डिस्टीलरीज व इतर दारु तयार करण्याच्या ज्या कंपन्या आहेत त्यांचे एक प्रकरण येथील उच्च न्यायालयामध्ये महापालिकेचा बाजुने निकाल लागुन ५% प्रमाणे जकात वसुल करीत होतो. जे रेक्टीफाईड स्पीरिट, डीन ॲक्यर स्पीरिट अशा पध्दतीचे प्रकार जे होते त्यामुळे मनपास वर्षाला ३ ते ४ कोटी उत्पन्न मिळत होते. सदरील प्रकरण महाराष्ट्र डिस्टीलरील कंपनीने सुप्रिम कोर्टात दाखल केले. सुप्रिम कोर्टात मागील १७ तारखेला निर्णय लागलेला आहेव रेक्टीफाईड स्पीरीट, जिन ॲक्यर स्पीरीट जे आहे हे मनुष्याचे खाण्याचे उपयोगाच्या वस्तु नसल्यामुळे यावरील जकात ५% किंवा ७ % प्रमाणे वसुल करता येणार नाही. २% प्रमाणे वसुल करावा. त्याबाबत सुप्रिम कोर्टामध्ये शुक्रवारी जाऊन काल पुन्हा प्रतिज्ञापत्र सुप्रिम कोर्टात दाखल केलेले आहे. लिव्ह पिटीशन दाखल केलेले आहे व विनंती केलेली आहे की, महापालिकेला ७% प्रमाणे जकात वसुल करण्याची परवानगी द्यावी.

**मा. सभापती :** आताच निर्णय घेतल्याप्रमाणे कमिटीने आगामी स्थायी समिती सभेत अहवाल सादर करावा. योग्य निर्णय घेता येईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेअंती असे ठरले की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या जकात वसुलीचे खाजगीकरण करण्यापुर्वी ज्या महापालिकांमध्ये खाजगीकरणाद्वारे जकात वसुली केली जाते. त्या मनपांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील अनुभव विचारात घ्यावा. याकरिता एक कमिटी स्थापन करण्यात येते. या कमिटीमध्ये स. सदस्य श्री. नंदकुमार फुलारी, श्री. चंद्रशेखर जैस्वाल, श्री. इलियास किरमाणी , श्री. प्रशांत देसरडा, श्री. मिर हिदायत अली, तसेच प्रशासनातर्फे लेखाधिकारी यांचा समावेश करण्यात येतो. या समितीने इतर मनपांना भेटी देवुन अहवाल एक आठवडयाचे आत स्थायी समितीसमोर सादर करावा. तसेच या कमिटीत इतर महानगरपालिकांना भेट देण्याकरीता प्रवास खर्च व इतर प्रसंगानुरुप खर्चाची तसेच प्रवास करीता वाहनाची व्यवस्था प्रशासनाने करावी. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**मा. सभापती :** औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे "बायो मेडीकल वेस्ट" प्रकल्प उभारण्या संबंधिचा एक ऐनवेळचा प्रस्ताव आरोग्य विभागाचा आलेला आहे.

**श्री. मीर हिदायत अली, डॉ. आशा बिनवडे :** ऐनवेळी हा प्रस्ताव दिलेला आहे. अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा. पुढील बैठकीत तो घेण्यात यावा अधिकारीही उपस्थित नाहीत.

**श्री. नंदकुमार :** सदर प्रस्ताव पुढील बैठकीत घेण्यात यावा. संबंधित विभागाचे अधिकारी (आ. वै. अधि.) सुध्दा उपस्थित नाहीत.

**डॉ. आशा बिनवडे :** सभागृहात अधिकारी उत्तरे देण्यास तयार असतील तर घेण्यास हरकत नसावी. जे अधिकारी उपस्थित आहेत त्यांचा खुलासा घ्यावा. जैविक कचरा, घन कचरा कशी विल्हेवाट लावणार जैविक कचरा म्हणजे काय ?

**प्र. आरोग्य वैद्य. अधिकारी :** संचिकेचा अभ्यास करण्यासाठी मला वेळ मिळालेला नाही.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** ४०४८ चौ.मी. जागा देणार. १ रुपयाप्रमाणे ४००० रुपये होतात. ४००० ऐवजी रु. १०,०००/- घेण्यात यावे. मनपाचा फायदा बघावा.

**मा. आयुक्त :** या प्रकल्पासाठी सर्व खर्च ते करणार आहेत. मिळणाऱ्या उत्पन्नातुन २१ ते २७% महानगरपालिकेस मिळणार आहेत.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** पुढील बैठकीत हा विषय घेण्यात यावा. सविस्तर चर्चा करता येईल.

**मा. सभापती :** सदर विषय पुढील सभेत घेण्यात येईल. त्यावेळी संबंधित अधिकारी उपस्थित असतील माहिती घेता येईल.

**चर्चा :**

**श्री. मीर हिदायत अली :** ४-५ दिवसापासुन वार्डात साफसफाई होत नाही. पाणी सुध्दा नाही. अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अधिकाऱ्यांना सुचना करुनही प्रत्यक्ष पाहणीसाठी येत नाहीत. नुसते आश्वासन देतात. ज्या त्या विभागातील कोणत्याही अधिकाऱ्याचे काम पडल्यास सुचना केल्यानुसार पाहणी करुन तेथील समस्या सोडवली पाहिजे. अधिकाऱ्यांकडुन कामे होत नसतील तर वेगळया पध्दतीने कार्यवाही करावी लागेल. प्रशासन जबाबदार राहिल.

**श्री. प्रशांत देसरडा :** पाण्यासाठी शहरातील जनता त्रस्त आहे. नुकताच एका टँकरखाली एका मुलाचा मृत्यु झाला. यास प्रशासनच जबाबदार आहे. जनतेला किमान पाणी तरी मुबलक द्यावे. साफसफाईचे गाडया काढुन पाण्यासाठी टाकी बसवुन वापरले जाते.

**मा. सभापती :** वार्डात कोणतीही समस्या उद्‌भवल्यास तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे. कालच्या बैठकीत टँकरखाली मृत्यु झालेल्या मुलाच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देणार आहोत.

**श्री. मीर हिदायत अली :** उपअभियंता, कनिष्ठ अभियंताना ४-४ वेळेस बोलावुन सुध्दा वार्डात येत नाहीत.

**मा. आयुक्त :** चार टँकर भाडयाने घ्यावेत. कचऱ्याच्या गाडया परत करावे.

**श्री. प्रशांत देसरडा :** तांत्रिक विभागामध्ये काहि गाडया दुरुस्तीसाठी पडलेल्या. टँकर दुरुस्त करुन घ्यावे. भाडयाने घेण्याची गरज पडणार नाही.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** झोन नं. ४ मध्ये सुध्दा कचरा उचलला जात नाही. ४-४ दिवस कचरा कुंडयात पडुन असतो. ए. सी. एन. ला मुलाखती येतात.

**श्री. जयवंत ओक :** शहरातील नागरिकांना लाईट, पाणी व साफसफाई इ. सुध्दा तात्काळ मिळाल्या पाहिजे. जे पाणी सोडतात ते दोषी आहेत कधी जास्त वेळ पाणी सोडतात. त्यांचा खोडसाळपणा होतो. साफसफाई वेळेवर व्हावी ही भावना सदस्यांची आहे. साफसफाईसाठी गाडया नसतील तर मागवाव्या. अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या होतात. कामे होत नाही. आश्वासने दिली जातात. यात नगरसेवक व मनपाची बदनामी होते. वृत्तपत्रात तशा बातम्या येतात. याबाबत गांभीर्याने विचार व्हावा. यापुर्वी विद्युत विभागात तक्रार नोंद रजिस्टर होते. त्यानुसार तक्रारीचे निवारनण होत असे. ती पध्दत आता बंद केली. पुन्हा चालु करावी. नविन विद्युतचे साहित्य आहे. कोठे लावण्यात आले. खुलासा द्यावा. विद्युत विभागाच्या संदर्भात तक्रार आल्यास १ ते २ दिवसात कार्यवाही झाली. पाहिजे. टेलीफोन विभाग रस्त्यावर खड्डे करतात पुन्हा बुजवत नाही. यात मनपाचे नुकसान होते. खड्डे बुजवण्याचे काम त्या विभागाचे आहे. मनपाने का नुकसान सोसायचे. याबाबतीतही वेळेवर कार्यवाही व्हावी. उत्पन्नात होण्याचा धोका टळेल.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** टेलीफोन विभागाने रस्ते दुरुस्ती म्हणुन काही रक्कम भरतात का? रस्त्याची दुर्दशा वाईट होत आहे. तत्कालीन आयुक्त श्री भोगे साहेब हे प्रत्यक्ष रस्त्याची पाहणी करीत असत. त्याप्रमाणे आताचे मा. आयुक्तांनी सुध्दा करावी. परिस्थिती समजुन घ्यावी. कामांना प्राधान्य द्यावे.

**श्री. इलियास किरमाणी :** कार्यकारी अभियंता (पापु) यांचे विभागात कामाचा व्याप वाढलेला असुन सर्वच कामे कार्यकारी अभियंता यांनाच पहावी लागतात. सर्व लोक त्यांचेकडे मागणी करतात. या विभागातील जे. ई. याचेवर तसेच उपअभियंता यांचेवर काही ठराविक जबाबदारी सोपवावी. सर्वच कामे एकाच अधिकाऱ्यांकडुन करुन घेणे बरोबर नाही. प्रमाणकानुसार काम असावे. वार्डात ९ दिवसांपासुन पाणी नाही. या संदर्भात जे. ई. अभियंता यांना प्रत्यक्ष सुचना दिल्या. तरी हे कर्मचारी वार्डात आलेले नाही. जे काम करण्यास इच्छुक नसतील त्यांच्या बदल्या कराव्या. स्टाफ वाढवावा.

**मा. सभापती :** स.सदस्य सौ. मानकापे, स.स. श्री ओक यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यानुसार टेलिफोन विभाग मनपाकडे रक्कम भरतात का? परवानगी घेतात का ?

**अति. शहर अभियंता :** टेलीफोन विभागाचे कर्मचारी रस्त्यावर खड्डे करतात व जे ओ. एफ. सी. केबल टाकत आहे त्या संदर्भाने या विभागाने मनपाकडे पैसे भरलेले आहेत. डांबरीकरण तो विभाग करणार नाही. मनपाला करावे लागणार आहे. तसे काम मनपातर्फे सिटीचौक ते गुलमंडी रस्त्यावर सुरु केलेले आहे. अगोदर खडीकरण करुन डांबरीकरण करावे लागणार आहे.

**श्री. जयवंत ओक :** खड्डे केल्यानंतर डांबरीकरण झालेच पाहिजे. नसता पावसाळयाचे दिवस येतील. आणखी घाण होईल. रस्ते खराब होतील. नवीन जी कामे चालु आहेत त्या बाबतीत परवानगी घेतली का ? खड्डे केल्यानंतर ते बुजवण्याचे काम नियमाने त्या विभागाचे आहे. नवीन काही बदल झाला असेल तर माहिती नाही. ती जबाबदारी त्या विभागाची आहे.

**मा. आयुक्त :** यापुर्वी आपण सेक्युरीटी डिपॉझिट घेत होतो. आपल्या निकषाप्रमाणे काम व्हावे. निकष वाढवुन घेतले. एकुण रकमेच्या १०% सेक्युरीटी डिपॉझिट ठेवले. जर काम व्यवस्थीत केले नाही तर डिपॉझिट मधुन रक्कम वळती करुन पुढील कार्यवाही करता येईल. तसेच आपल्या संबंधित विभागाला सुचना देणार आहोत की, ७ जुनला पावासाळा सुरु होतो.त्यापुर्वी सर्व कामे झाले पाहिजे. पावसाळयात खड्डा दिसता कामा नये व यापुढे रस्ते खोदण्याची परवानगी देऊ नये. द्यायची असेल तर पावसाळा संपल्यानंतर परवानगी देता येईल. दुसरा प्रश्न साफसफाईचा उपस्थित झाला. साफसफाईचे ४ ट्रक पाणी पुरवठयासाठी दिलेले आहेत. म्हणुन संबंधित अधिकाऱ्यांना सुचना देण्यात येते की, त्यांनी सफाईचे ट्रक त्या विभागाकडे द्यावे. पाण्यासाठी नवीन टँकर भाडयाने मागवावे. किती टँकर लागतील त्यांनी सांगावे.

**कार्य. अभि. (पापु) :** एकुण आठ टँकर लागणार आहेत.

**मा. सभापती :** पाण्याचा फार गंभीर प्रश्न आहे. आजच्या शॉर्ट टेंडर नोटीस काढुन भाडायने टँकर मागवावे. साफसफाई विभागाचे ट्रक परत करावे. जे अधिकारी उपअभियंता विभागात आहेत त्यांना सुध्दा कामे द्यावीत. बसुन पगार देणे योग्य नाही. काम करीत नसतील तर त्यांचेवर कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त :** चार ट्रक्स पाणी पुरवठा विभागात सफाईचे दिलेले आहेत ते लगेच त्या विभागाकडे देता येतील. झोन निहाय नियोजन केल्यानुसार साफसफाईचे काम होते की नाही हे बघण्याची जबाबदारी त्या-त्या झोन अधिकाऱ्याची आहे.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** स्वच्छता मोहिम राबवावी.

**मा. आयुक्त :** या अगोदर १ एप्रिल पासुन १५ एप्रिल पर्यंत १५ दिवस स्वच्छता मोहिम राबविली होती. पुन्हा राबविता येईल. नाल्याची सफाई सुध्दा पावसाळया पुर्वी झाली पाहिजे.

**मा. सभापती :** सोनी साहेब निवडणुकीच्या कामामध्ये आहेत. त्यामुळे त्यांना वेळ मिळत नाही. तरी झोन क्र. ६ मधील समस्यांना दुर करण्यासाठी उपआयुक्त (प्र.) यांनी पाहणी करुन कार्यवाही करावी.

**श्री. प्रशांत देसरडा :** नाले सफाईसाठी मशीन येणार होते.

**प्र. आरोग्य वैद्य. अधिकारी :** पावसाळयामध्ये पाऊस पडल्यानंतर शहरातील विधि नाल्यातुन पाणी वाहते. हे पाणी आजुबाजूला राहणाऱ्या नागरिकांच्या घरामध्ये जाते. असे १२-१३ नाल्यांची यादी प्राधान्याने काढलेली आहे. त्या नाल्यांची सफाई करण्यासाठी मागच्या स्थायी समितीमध्ये १५ लक्षाची तरतुद करण्यात आलेली आहे. मशीनचे छायाचित्र माझ्याकडे उपलब्ध आहे. सर्व स. सदस्यांना दाखविण्यात येईल. याबाबतची संचिका अभिप्रायासाठी गेली असता त्याचे बजेट टाकुन सदर संचिका तांत्रिका विभागाकडे वर्ग करावी. देखभाल दुरुस्ती तांत्रिक विभाग करणार आहे.

**मा. सभापती :** मशीन येण्यास उशीर लागेल. तत्पुर्वी नाले साफ सफाईसाठी शॉर्ट टेंडर नोटीस काढुन कार्यवाही करावी. पावसाळा जवळ आलेला आहे. तसेच नदीची सुध्दा साफसफाईचे काम करावे. शहरातुन खाम नदी जाते. १०० फुटाचे पात्र आहे. परंतु ते सध्या उपलब्ध होत नाही. अतिक्रमण फार वाढलेले आहे. या बाबतीत सुध्दा कार्यवाही व्हावी.

**श्री. इलियास किरमाणी, श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** माझ्या वार्डातही नाल्याच्या बाजुला प्लॉट पाडुन घरे बांधली काय कार्यवाही करणार आहोत ?

**मा. सभापती :** स. सदस्यांनी आताच सुचना केल्या प्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी व आजच्या सभेला सर्वांनी चांगले सहकार्य केल्याबद्दल धन्यवाद देतो.

या बरोबरच "जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

सभापती<br>(स्थायी समिती)<br>महानगरपालिका, औरंगाबाद

नगरसचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १७.५.२००२ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दिनांक १७.५.२००२ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.०० वा. "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त यांचे सह संबंधित अधिकारी व खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री. प्रशांत सुभाष देसरडा
२. श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली
३. श्री. शेख इलियास किरमाणी
४. श्री. औताडे रावसाहेब ममतु
५. श्री. ओक जयवंत केशवराव
६. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
७. डॉ. आशा उत्तम बिनवडे
८. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
९. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
१०. श्रीमती मानकापे पार्वतीबाई लहानु
११. श्री. चंद्रशेखर जैस्वाल
१२. श्री. कैसरखान बद्रोधीनखान
१३. श्री. ठकुजी रामसिंग वाणी

**विषय १४ :**

दिनांक १८.३.२००२ व दि. २७.३.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**डॉ. अशा बिनवडे :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार होते. आज सभेला ते आलेले नाहीत. खुलासा द्यावा.

**मा. आयुक्त :** वैद्यकीय रजेवर आहेत. रजा संपल्यावर येतील.

**डॉ. आशा बिनवडे :** मागील बैठकीला सुध्दा संबंधित अधिकारी उपस्थित नव्हते. नेहमी कोणत्यातरी कारणावरून सभेला गैरहजर राहतात. इतिवृत्तांत नोंद व्हावी. आजच्या बैठकीत दि. १८.३.२००२ च्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यासाठी सादर झालेले आहे. इतिवृत्त कायम करीत असतांना १८ मार्चच्या बैठकीत आरोग्य विभागासाठी खरेदी केलेली औषधी व उपकरणे या संबंधिची चर्चा झालेली होती. त्यापुर्वी चर्चा झालेली होती. त्यानुसार मुख्य लेखा परिक्षक यांचा अंतरीम अहवाल वाचुन दाखविला होता. तसेच संबंधित आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी केलेला खुलासा सुध्दा वाचुन दाखविण्यात आलेला होता. त्यावर मुख्य लेखा परिक्षक यांनी दिलेला अहवाल सुध्दा वाचुन दाखविण्यात आला. अहवालावरुन व त्या संदर्भात सभागृहात झालेल्या

चर्चेच्या अनुषंगाने जी औषधी व उपकरणे खरेदी केली ती कोणत्याही कंपनीचे नांव नमुद न करता खरेदी केलेली आहे. निकृष्ट दर्जाची खरेदी केलेली असून एमआरपी पेक्षा जास्त दराने खरेदी केली हे रिपोर्टवर स्पष्ट झाले. त्यांचे २८ वर्षाच्या सेवेत त्यांनी जी-जी औषधी खरेदी केलीली जीवनावश्यक आहे म्हणुन खरेदी केली असे भासवुन प्रशासनाची व त्याचबरोबर या सभागृहाची दिशाभुल केलेली आहे. या बाबतीत चर्चा होऊन जो सभागृहाने निर्णय घेतलेला होता त्या बाबतीत प्रशासनाने आतपर्यंत काय कार्यवाही केलेली आहे? खुलासा द्यावा.

**मा. सभापती :** आपण जी चर्चा करीत आहात ती सर्व मागील इतिवृत्तांमध्ये आहे. जास्त चर्चा न करता थोडक्यात मत मांडावे.

**डॉ. आशा बिनवडे :** मागील सभेचे इतिवृत्त कायम होत आहे. त्यावरच चर्चा करीत आहे. सदर सभेत संबंधित अधिकारी यांनी सन ९५ पासुनची खरेदी केलेली औषधी उपकरणे यांची सखोल चौकशी करण्यासाठी आयोग नेमावा म्हणुन निर्णय घेतलेला होता सक्तीच्या रजेवर पाठवावे हा सुध्दा निर्णय घेतलेला असुन संबंधित कंपन्यावर गुन्हे दाखल करावे अधिकाऱ्यांवर सुध्दा पोलीस गुन्हा दाखल करावा म्हणुन निर्णय घेतलेला होता. चौकशी समिती नेमलेली आहे का संबंधित अधिकारी यांचेवर काय कार्यवाही होणार ? या बाबत प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे ?

**श्री. कैसरखान बद्रोधीनखान :** मागील बैठकीत जी चर्चा झाली तीच आता पुन्हा होत आहे. संबंधित अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे असे निर्देश देण्याचे अधिकार स्थायी समिती सभेला आहेत का ? ही कार्यवाही प्रशासन करु शकते.

**मा. सभापती :** दिर्घ मुदतीच्या रजेवर पाठविण्याचा अधिकार आहे का ? प्रशासनाने खुलासा करावा.

**मा. आयुक्त :** मागील तीन-चार महिन्यांपासुन औषधी खरेदी प्रकरणावर चर्चा होत आहे. दरवर्षी ऑडीट होऊन स्थायी समिती सभेने सविस्तर चर्चा करुन योग्य ते निर्णय घेऊन शिफारस करुन सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी पाठविले पाहिजे. दरवर्षी ऑडीट झाले असते तर सन ९५ पासुनची औषधी खरेदी प्रकरणाची ७ वर्षापुर्वी पासुनची चर्चा करण्याची गरज पडली नसती. दुसरा मुद्दा असा की, दोषी अधिकाऱ्यांवर निलंबीत करणे किंवा सक्तीच्या रजेवर पाठविण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे किंवा काय याची तपासणी करावी लागेल. दोषी अधिकाऱ्यांना निलंबीत करण्याचे अधिकार स्थायी समितीला असतील असे मला वाटत नाही. आयुक्तांनी कार्यवाही केली. त्यानंतर संबंधित अधिकारी /कर्मचारी याना मान्य नसेल तर तसे अपील स्थायी समितीकडे जाते व नंतर सर्वसाधारण सभेपुढे आणले जाते. काहि अधिकाऱ्यांना आयुक्तांनी निलंबीत केले व ते संविधानिक पद (स्टॅच्युटरी पोस्ट) असेल तर ६ महिन्याच्या आत सर्वसाधारण सभेत कायम करुन घ्यावे लागते कोणत्याही खात्यामध्ये भ्रष्टाचार झाला असेल, गैर व्यवहार झाला असेल त्या बाबतीत स्थायी समितीचे चौकशी करण्याची सुचना आयुक्तांना करावी लागते. त्यानुसार सुचनेची दखल घेऊन चौकशी करण्याचे काम प्रशासन करावे सन २०००-२००१ व २००१ - २००२ चे ऑडित रिपोर्ट प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये आरोग्य विभागातील औषधी खरेदी संदर्भातील

अहवाल प्राप्त झालेला आहे. या संदर्भात उपसंचालक आरोग्य विभाग यांचे मत झालेले आहे. फक्त चौकशी अधिकारी नेमण्याचे राहिलेले आहे. सन ९५ ते ९९ पर्यंत जे काही खरेदीचे व्यवहार झाले ते सिध्द होत नाही तो पर्यंत काही करता येणार नाही. चौकशी आयोग नेमण्याबाबत कार्यवाही चालु आहे. स्थायी समितीने निलंबन करण्याचे अधिकार आहे असे मी कुठेही कायद्यामध्ये वाचलेले नाही. सक्तीच्या रजेवर पाठवावे अशी सुचना स्थायी समिती देऊ शकते. याबाबत विधी सल्लागार मत देतील.

**मा. सभापती :** निलंबन करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे का ? विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**श्री. इबियास किरमानी :** संबंधित अधिकारी यांना सक्तीने रजेवर पाठविण्याचा निर्णय मागील सभेत घेतलेला असुन तसे अधिकार स्थायी समितीला आहे की नाही याचा खुलासा करावा. असतील तर आतापर्यंत का पाठविले नाही.

**विधी सल्लागार :** निलंबना संबंधि ज्या कायद्यात तरतुदी केलेल्या आहेत त्या सभागृहाच्या निदर्शनास आणुन देऊ इच्छितो "मुंबई प्रांतिक महापालिका"अधिनियम १९४९ चे कलम ५६ मध्ये निलंबनासंबंधि जी तरतुद केलेली आहे ती खालील प्रमाणे

"एखादा नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी विभागीय नियमांचा शिस्तीचा भंग केल्याबद्दल किंवा निष्काळजीपणा किंवा कर्तव्यात हयगत केल्याबद्दल किंवा अन्य गैर वर्तणुकी बद्दल दोषी आहे किंवा तो अक्षम आहे या बाबत सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास त्यास या अधिनियमाच्या तरतुदीचा अधिन राहुन अशा अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यांवर पोट कलम (२) मध्ये निनिर्दिष्ट केलेल्या शास्ती पैकी कोणतीही शास्ती लावता येईल.

अ) भत्ते वगळुन ज्याचे मासीक वेतन (एक हजार रुपयाहुन) अधिक आहे अशा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास स्थायी समितीच्या पुर्व संमती वाचुन आयुक्तांकडुन बडतर्फ केले जाणार नाही.

ब) आयुक्त प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी असलेला परिवहन अधिकारी वगळुन महानगरपालिकेने किंवा अन्य कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या असा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास महानगरपालिकेच्या आदेश होईपर्यंत निलंबीत करु शकेल व अशा प्रकारे निलंबीत करण्यात आलेला अधिकारी हा असा परिवहन व्यवस्थापन किंवा कलम ४५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असेल तर असे निलंबन व त्या संबंधिची करणे आयुक्ताने ताबडतोब महापालिकेस कळविली पाहिजेत व महानगरपालिकेने अशा निलंबनाच्या तारखेपासुन सहा महिन्याच्या मुदतीत असे निलंबन कायम केले नाही तर ते निलंबन संपुष्टात येईल. "

**श्री. इलियास किरमानी :** सक्तीच्या रजेवर पाठविता येईल की नाही याचा खुलासा द्यावा.

**श्री. प्रशांत देसरडा :** इतिवृत्तांत सर्वांनी वाचले असते तर गरजच पडली नसती. ठरावात सुध्दा शिफारसच केलेली आहे. नियमानुसार संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करावा तसेच एमआरपी पेक्षा जास्त दराने ज्या एजन्सीने औषधांची विक्री केली आहे त्यांचेवर गुन्हे दाखल करावे असे सभागृहात मागणी झाली. त्याबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी आणि समितीचा अहवाल येईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांस निलंबीत करावे किंवा सक्तीच्या

रजेवर पाठवणेसही शिफारस करण्यात येते. सन १९९५ पासुन ते २००२ पर्यंतचे सर्व अभिलेख संचिका, कागदपत्रे इ. सर्व या आयुक्तांनी सील करावे असे ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी. असा ठराव झाला. त्यानुसार प्रशासनाने काय काय कार्यवाही केली ही मागणी सभागृहाची आहे.

एमआरपी पेक्षा जास्त दराने एजन्सीने औषधी दिली त्यांचे दर गुन्हे का दाखल केलेले नाही. प्रशासनाने खुलासा करावा.

**मा. सभापती :** इतिवृत्तातील पान क्र. १३ वर आपण सभापती असतांना या बैठकीत ठराव घेऊन कमिटी स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला होता. आपण जी नावे सुचविलेली आहेत त्या सर्वांना पत्रव्यवहार करुन कळविलेले आहे. पुढील कार्यवाही प्रशासन करीत आहे.

**श्री. इलियास किरमणी :** सभागृहात जी चर्चा होती की टाळण्याच्या प्रयत्न घेऊ नये. चर्चा करण्याचा अधिकार आम्हाला आहे. विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने दिले पाहिजे.

**श्री. कैसरखान :** प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. सभागृहात माहिती द्यावी व पुढील कामकाज सुरु करावे.

**मा. सभापती :** जी कमिटी नियुक्त केलेली होती त्या सदस्यांना प्रशासनाने चौकशी करण्या संदर्भात संमती मागविलेली आहे. तसे पत्र दिलेले आहे ते पत्र नगरसचिव वाचुन दाखवतील.

**नगरसचिव :** प्रशासनाने कमिटीच्या सदस्यांची संमती घेण्याबाबत पाठविलेले पत्र मा. सभापती यांनी सुचना केल्यानुसार सभागृहाला वाचुन दाखविण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या विविध आरोग्य केंद्रासाठी लागणारे औषधी व साहित्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी एमआरपी पेक्षा जास्त दराने खरेदी केल्याचे निर्दशनास आल्याने आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी केलेले औषधी व साहित्याचा खरेदीत अपहार केल्याच्या आरोपाची चौकशी करण्यासाठी खालील सदस्यांची चौकशी समिती गठीत करण्याचा निर्णय दि. १८.३.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत घेतला आहे.

१) आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद.
२) उपसंचालक आरोग्य सेवा औरंगाबाद.
३) सहा. संचालक एच. डी. ए. औरंगाबाद.
४) मुख्य लेखा परिक्षक, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
५) प्राध्यापक, औषधी विभाग, वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद.

स्थायी समितीच्या निर्णयानुसार सदर प्रकरणात उक्त चौकशी करुन अहवाल समितीकडे सादर करावयाचा असल्याने कृपया चौकशी समितीने सदस्य म्हणुन कामकाज पाहण्यासाठी आपली संमती दर्शवावी व तशी संमती असल्याचे आठ दिवसाच्या आत या कार्यालयास कळविण्यात यावे हि विनंती.

प्रति,

१) उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद.
२) सहा. संचालक, एफ. डी. ए. औरंगाबाद.
३) मुख्य लेखा परिक्षक, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
४) प्राध्यापक, औषधी विभाग वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद.

**मा. आयुक्त :** घेतलेला ठराव आजच्या सभेत कायम होत आहे. ठराव कायम होत नाही तोपर्यंत कार्यवाही सुरु करता येत नाही तरी सुध्दा कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. नैसर्गीक न्याय तत्वानुसार ऑडिट रिपोर्टवर अशी कार्यवाही करता येणार नाही. चौकशी करणारे व शिक्षा देणारे अधिकारी एक होऊ शकत नाही. यात मुलभूत चुक झालेली आहे. चौकशी करणारे हे शिक्षा देणाऱ्यापेक्षा कमी दर्जाचे असावेता. शिक्षा आयुक्तांनी द्यावी. स्थायी समिती ही अपिलेट ॲपारिटी आहे. चौकशीसाठी बाहेरचे अधिकारी नेमावयाचे असेल त्यांची संमती घेणे आवश्यक आहे. त्यांची संमती मागविलेली आहे. सविस्तर चैाकशी करायची असेल तर यात दोन पर्याय आहे. एक तर स्वतंत्र चौकशी अधिकारी नेमणे व उपसंचालक आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना मदतीसाठी बोलाविणे दुसरा पर्याय शासनामार्फत चौकशी करता येते. यापैकी सभागृहाने निर्णय घेतला तर प्रशासन त्यानुसार कार्यवाही करेल. नसता दोन वर्षाच्या ऑडिट रिर्पोट नुसार चौकशी होईल. त्यानंतर पोलिस गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही होईल. चौकशी रिर्पोट आल्यानंतरच पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासन करेल.

**श्री. कैसर खान :** ठराव दुरुस्त करुन पुढील बैठकीमध्ये हा विषय घेण्यात यावा.

**डॉ. आशा बिनवडे :** जो ठराव करण्यात आलेला आहे. त्यात सुध्दा कार्यवाही करण्याची शिफारस सभागृहाने केलेली आहे. कमिटीच्या सदस्यांना पत्र पाठविले त्याबद्दल प्रशासनाने अभिनंदन करते. परंतु जी औषधी खरेदी केलेली आहे ती एमआरपी पेक्षा जास्त दराने खरेदी केलेली आहे. याबाबत चौकशीच्या अहवालाची आवश्यकता नाही.

**मा. सभापती :** मागील बैठकीत रिर्पोट आलेला होता. त्यावर समिती गठीत करण्यात आलेली होती. आज इतिवृत्त काय करीत आहोत प्रशासन कार्यवाही करीत आहे. ठरावात काय दुरुस्ती करायची ते सुचविण्यात यावे. एमआरपी पेक्षा जास्त दराने औषधी खरेदी केली हा टेक्नीकल मुद्दा आहे. जे कुणी तज्ञ असतील त्यांचेकडुन चौकशी करावी लागेल.

**मा. आयुक्त :** ज्या-ज्या ॲटममधील औषधी एमआरपी पेक्षा जास्त दराने खरेदी केलेली असेल व्यासाठी सल्ला मागविलेला आहे. दोष आढळुन आल्यास प्रशासन कोणत्याही अधिकाऱ्याला पाठीशी घालणार नाही. प्रशासनाची भुमिका कडक आहे. जे दोषी ठरतील त्यांना शिक्षा मिळालीच पाहिजे. यात शंका नाही. परंतु चुक ही निष्पन्न झाली पहिजे. शिक्षेपुर्वी दोष सिध्द होणे आवश्यक आहे. नैसर्गिक न्याय तत्वाप्रमाणे सुनावणीची संधी द्यावयास पाहिजे.

**मा. सभापती :** चौकशी करण्यासाठी किंवा सल्ला घेण्याचा प्रश्न असेल त्यासाठी वेळ निश्चित असावयास पाहिजे.

**मा. आयुक्त :** एमआरपी पेक्षा जास्त दराने औषधी खरेदी केलेली आहे की नाही याबाबती सर्व तपासण्याची आवश्यकता आहे. ऑडीट नुसार उपसंचालक आरोग्य विभाग यांचे मत घेतले. कार्यवाही चालु आहे. त्यानंतरच पुढील कार्यवाही होईल.

**श्री. जयवंत ओक :** भ्रष्टाचार झाला असेल तर कार्यवाही झालीच पाहिजे. फाशीवर लटकवा. परंतु ते जोपर्यन्त सिध्द होत नाही तोपर्यन्त शिक्षा देता येणार नाही. आताच प्रशासनाने खुलासा केलेला आहे.

**मा. सभापती :** चौकशी अहवाल येईल त्यानुसार प्रशासन कार्यवाही करेल. निलंबन करावे किंवा सक्तीच्या रजेवर पाठवावे हे शब्द वगळण्यात यावे.

**श्री. प्रशांत देसरडा :** निलंबन किंवा सक्तीच्या रजेवर पाठविण्याबाबत शिफारस केलेली आहे. हे शब्द वगळण्यात येऊ नयेत. कोणत्याही सदस्यांनी मागणी केलेली नाही. दुरुस्ती करु नये. सभागृहाच्या संमतीने कार्यवाही करण्याची शिफारस केलेली आहे. जो अधिकार होता तसा निर्णय घेतलेला आहे. अधिकाऱ्यांना निलंबीत करावेच असे म्हटलेलेच नाही. शिफारस केलेली आहे. पुर्ण चौकशी करा. नंतर निलंबन करा. आजच पाठवा असे शब्द वापरलेले नाही.

**मा. सभापती :** निर्णय घेतलेला आहे. तो विषय आता संपलेला आहे.

**अति. शहर अभि.:** दि. २७.३.२००२ च्या इतिवृत्तातील पान क्र. ६ वर ठराव क्र. ६६/६ मध्ये "एक वर्षा ऐवजी ७ वर्षाच्या प्रायोगिक तत्वांवर " अशी दुरुस्ती व्हावी.

**मा. सभापती :** दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

**उपआयुक्त (म.) :** दि. १८.३.२००२ च्या इतिवृत्तातील पान क्र. २ वर ठराव क्र. ८१/५ मध्ये निवृत्त न्यायाधीश निवृत्त अधिकारी अशी दुरूस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. दुरुस्ती करावी. विषय क्र. १ कायम करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक १८.३.२००२ रोजीच्या स्थायी समिती सभेतील ठराव क्र. ७७/१ मध्ये "निलंबन करावे किंवा सक्तीच्या रजेवर पाठवावे" हे शब्द वगळण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच इतिवृत्त पान क्र. २० वर ठराव क्र. ८१/५ मध्ये "निवृत्त जिल्हा न्यायाधीश /निवृत्त न्यायाधिश निवृत्त अधिकारी" अशी दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

तसेच दिनांक २७.३.२००२ रोजीच्या स्थायी समिती सभेतील इतिवृत्त पान क्र. ६ वरील ठराव क्र. ८८/६ मध्ये "एक वर्ष " ऐवजी "७ वर्षाच्या प्रायोगिक तत्त्वावर " अशी दुरूस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

या व इतर दुरुस्त्यांसह दिनांक १८.३.२००२ व दिनांक २७.३.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त काय करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५ :**

शिक्षणाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शिक्षण विभागांतर्गत प्राथमिक शाळांनार पुरेशी विद्यार्थी संख्या उपलब्ध व्हावी म्हणुन महानगरपालिकेने प्रत्येक माध्यमांचा (मराठी/उर्दु) शाळे अंतर्गत एक/दोन अंगणवाडी बालवाडी वर्ग सुरु केले आहेत. मुलांना शिकविणाऱ्या शिक्षिकेस दरमहा मानधन ७००/- आणि मदतनीस दरमहा मानधन रु. ३००/- दिले जाते. या मानधनात वाढ व्हावी म्हणुन शासनाचे परिपत्रकानुसार जिल्हा परिषद अंगणवाडी शिक्षिकेस रु. ९००/- प्रति महिना व मदतनीस रु. ५००/- प्रति महिना या प्रमाणे प्रशासनाने प्रस्तावास मान्यता दिली आहे. सदरील प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** अंगणवाडी शिक्षिकेस दरमहा मानधन नमुद केल्यानुसार ९००/- ऐवजी ११००/- करावे तसेच मदतनीस यांना ५००/- ऐजवी ७००/- करावे आणखी २००/- ची वाढ करण्यात यावी. त्यांना दुरवरुन यावे लागते. खर्च लागतो

**मुख्य लेखाधिकारी :** शासनाने दर निश्चित केलेले आहेत. त्यानुसार प्रस्ताव सादर केलेला आहे. या शिक्षकांना पुर्णवेळ काम नसावे.

**श्री. प्रशांत देसरडा :** मनपाच्या शाळेची परिस्थिती पाहता या शिक्षकांना जास्त वेळ काम करावे लागते हि सत्य परिस्थिती आहे. आणखी २००/- वाढविण्यात यावेत. क. लिपीक नियुक्त केल्यास. १५००/- ठराविक वेतन देण्यात येते. या शिक्षकांना ११००/- द्यावेत अशी मागणी करीत आहोत.

**मुख्य लेखाधिकारी :** या शिक्षकांना सकाळी ८ ते ११ पर्यंत असे तीन तास काम करावे लागते. तसेच मदतनीस सुध्दा ३ तासच काम करतात.

**सौ. सुर्वणा चद्रात्रे :** १००-२०० आहेत. जास्त बोजा पडणार नाही.

**शिक्षणाधिकारी :** महानगरपालिका अंतर्गत बालवाडी शिक्षीका व मदतनीस सकाळी ८ ते ११ असे तीन तास काम करतात.

**मा. सभापती :** मुळ प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येणाऱ्या अंगणवाडी - बालवाडी मुलांना शिकविणाऱ्याना शिक्षिकेस दरमहा रु ७००/- ऐवजी रु. ९००/- (नऊशे) तसेच मदतनीसांना दरमहा रु. ३००/- ऐवजी रु. ५००/- (पाचशे) या प्रमाणे मानधनात वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६ :**

दिनांक १८.३.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र. ८१/५ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता की, औरंगाबाद महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यरत अधिकारी /कर्मचारी यांच्याविरुध्द कार्यालयीन अनियमितता व प्रशासकीय प्रकरणात विभागीय चौकशा प्रस्तावित करण्यात येत असतात. सदरच्या विभागीय चौकशी महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यरत वर्ग-१ व वर्ग -२ दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे दिल्या जातात. संबंधित अधिकाऱ्यांना स्वतःच्या विभागाचची कामे सांभाळुन अशा चौकशा कराव्या लागतात. परंतु त्यांच्याकडील कामाच्या व्यापामुळे अशा प्रकरणात ते पुरेसा वेळ देऊ शकत नाही, ज्यामुळे चौकशी प्रकरणे प्रलंबीत राहतात, या बाबीचा विचार करता भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी /निवृत्त जिल्हा न्यायधिक्ष /निवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची चौकशीच्या कामासाठी विशिष्ट मानधनावर नियुक्ती केल्यास चौकशी प्रकरणे एकाच अधिकाऱ्यामार्फत व निर्धारीत वेळेत निकाली निघू शकतील करिता औरंगाबाद शहरात वास्तव्यास असलेल्या निवृत्त अधिकारी/न्यायाधिशाकडुन सविस्तर तपशिलासह अर्ज मागविण्यात येतील.

या संदर्भात दि. १५.१२.२००१ रोजी स्थायी समिती सभेत ठरल्यानुसार मा. विभागीय आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधला असता त्यांचेकडुन अशा चौकशींसाठी अधिकारी उपलब्ध होणार नाहीत. असे त्यांनी कळविलेले आहे.

करीता यासंबंधान काही निवृत्त न्यायधिशांची समक्ष चर्चा केली असता, त्यांनी काही खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीवर अशी चौकशी प्रकरणात चौकशी करण्यासाठी संमती दिलेली आहे.

१) मोकळया चौकशी प्रकरणांसाठी त्यांना रु. १०,०००/- इतके मानधन देण्यात यावे.
२) किरकोळ स्वरुपाच्या चौकशी प्रकरणासाठी रु. ५०००/- इतके मानधन देण्यात यावे.

३) त्यांना बसण्यासाठी कार्यालयीन जागा व लिपीक उपलब्ध करुन देण्यात यावा.

४) चौकशी प्रकरणे अंतीम करण्यासाठी ३ महिने इतका कालावधी देण्यात यावा.

वरील प्रमाणे अटी - शर्तीची मान्यता झाल्यास त्याप्रमाणे निवृत्त जिल्हा न्यायाधीश तसेच निवृत्त इतर अधिकारी यांची नेमणुक करता येईल. प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. इलियास किरमाणी :** १०,०००/- मानधन, क्लार्कची मागणी केलेली आहे. तसेच कार्यालय देणार एवढा खर्च कोठुन करणार आहेत. सचिवांना कर्मचारी देण्यास टाळाटाळ होते व एवढा खर्च करणे बरोबर नाही. पुन्हा गाडीची मागणी होईल.

**मा. आयुक्त :** महानगरपालिकेस काही प्रकरणांची १० वर्षापासुन चौकशी चालु आहे. यात कर्मचाऱ्यांच्या बाबतीत केसेस आहेत. १०-१२ वर्षापासुन चौकशी चालु असल्याने ते तसेच बसलेले आहेत. मनपातील अधिकारी यांना स्वतःचे काम करुन चौकशीचे काम होत नाही व केले तरी बरोबर झाले नाही म्हणुन आरोप केले जातात. यात मोठया व गंभीर स्वरुपाची चौकशी प्रकरणात दहा हजार रुपये मानधन देणार आहेत. किरकोळ स्वरुपाच्या चौकशी प्रकरणात पाच हजार रुपये इतके मानधन देणार आहोत. प्रस्तावानुसार जे नमुद केले त्यानुसार फायदेशीर आहे. याउलट मनपाने चौकशी केल्यास यापेक्षा जास्त खर्च होतात. त्यांना वाहन देणार नाही. फक्त बसण्यासाठी जागा व प्रत्येक केसेस मागे मानधन घावे लागणार आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** प्रस्ताव चांगला असुन मनपाच्या फायद्याचा आहे. मनपाने चौकशी केली तर या पेक्षा जास्त खर्च होतात म्हणुन हा प्रस्ताव मंजुर करावा.

**श्री. मीर हिदायत अली :** मंजुरी द्यावी. चौकशीची जी मर्यादा घालुन दिली त्याच वेळात चौकशी व्हावी.

**श्री. नंदकुमार फुलारी :** निवृत्त न्यायाधिश न घेता फक्त अधिकाऱ्याचीच नेमणुक करावी. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. जयवंत ओक :** आताच दुरुस्ती केल्याप्रमाणे निवृत्त जिल्हा न्यायाधीश ऐवजी निवृत्त न्यायाधिश व निवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी या ऐवजी निवृत्त अधिकारी अशी दुरुस्ती करुन जे उपलब्ध होतील त्यांची सहा महिन्यांसाठी नियुक्ती करावी. सहा महिन्याचा अनुभव घ्यावा. नंतर पुढील कार्यवाही व्हावी.

**श्री. मीर हिदायत अली :** प्रथम सहा महिन्यासाठी नेमणुक करावी.

**मा. सभापती :** ठीक आहे. दुरुस्ती करण्यात येते. जे उपलब्ध होतील त्यांना सहा महिन्यासाठी घेण्यात यावे. प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द कार्यालयीन अनियमितता व प्रशासकीय प्रकरणात विभागीय चौकशी करण्यासाठी भारतीय प्रशासनीक सेवेतील निवृत्त अधिकारी व निवृत्त न्यायाधीश यांची सेवेतील निवृत्त अधिकारी व निवृत्त न्यायाधीश यांची प्रस्तावातील अं. क्र. १ ते ४ अटी व शर्तीस अधिन राहुन "चौकशी अधिकारी" म्हणुन प्रथम सहा महिन्यासाठी नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी सर्व्हे न. ९/२ येथील १२.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याचे खडीकरण, सरफेस , ड्रेसिंग साईड गटार व पुलाचे बांधकाम ही काम करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १२,२५,२५०/- च्या अंदाजपत्रकास मा. स्थायी समिती सभा विषय क्र. ५३/६ दिनांक १३.११.२००१ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण नऊ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी सात निविदा पत्रके भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. एस. एच असोसिएटस | ३०.३३ % | कमी दराने |
| २. | श्री. डी. अजितसिंग | २६.६१ % | --//-- |
| ३. | श्री. मन्नाखान | २१.८६ % | --//-- |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | १५.७७ % | --//-- |
| ५. | श्री. आर. एस. शेख | १७.७८६ % | --//-- |
| ६. | श्री. एस. एम. शेख | १३.८९ % | --//-- |
| ७. | श्री. एम. एम. मंडोरे | ०९.९० % | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ. प. दरापेक्षा ३०.३३% कमी मे. एस. एच. असोसिएटस यांचे निविदाचे दर आहेत. तरी तरी सदरील कामासाठी संबंधित ठेकेदाराकडुन ५% इतकी अनामत रक्कम घेवुन सदरील काम अं. प. दरापेक्षा ३०.३३% कमी दराने करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. इलियास किरमाणी :** ३०.३३% कमी दराने निविदा प्राप्त झाली आहे. कामाचा दर्जा कसा राहील याचा खुलासा द्यावा.

**अति. शहर अभियंता :** नियमाप्रमाणे काय करुन घेतले जाईल.

**श्री. कैसरखान :** काम पुर्ण झाल्यानंतर थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करावे. काम बरोबर झाले नाही तर अधिकाऱ्यांना जबाबदार धरावे.

**मा. आयुक्त :** २५, ४०, ४५ टक्के कमी दराची निविदा काही कामांमध्ये प्राप्त झालेल्या आहेत. ५० टक्के कमी दराची सुध्दा निविदा प्राप्त होतात. इतक्या कमी दराने संबंधित ठेकेदार चांगलया प्रतीचे काम करुच शकणार नाही, ही शका घेणे बरोबर होईल. काम चांगल्या प्रतीचे होण्यासाठी संबंधित ठेकेदाराचे काम चांगल्या प्रतीचे होण्यासाठी संबंधित ठेकेदाराचे ३ वर्षापर्यंत डिपॉझीट रक्कम ठेवण्याचा प्रस्ताव सादर केलेला होता. परंतु स्थायी समितीने डिपॉझिट मधील ५% रक्कम २ वर्षासाठी ठेवण्यात यावे असा निर्णय घेतलेला आहे. काहि महानगरपालिकां मध्ये २०% रक्कम पाच वर्ष ठेवण्यात येते. जास्तीत जास्त डिपॉझिट ठेवण्याचा प्रशासनाचा प्रयत्न होता.

**मा. सभापती :** निकषाप्रमाणे काम करुन घ्यावे. कर्मचारी वर्ग आपल्याकडे उपलब्ध आहे.

**अति. शहर अभि.** : चांगल्या प्रतीचे काम करुन घेण्यासाठी कर्मचारी द्यावे लागतात. सर्वात कमी दराची निविदा भरुन आलेली आहे. निकषाप्रमाणे काम करुन घ्यावे लागेल. त्यासाठी विशेष देखरेख करावी. लागेल. देखरेखीसाठी कर्मचारी वर्ग घेवुन देखरेख करावी लागेल. आपण थर्ड पार्टी तपासणी करतो. याही प्रकरणात लागु होईल.

**मा. सभापती** : प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. काम चांगल्या प्रतीचे करुन घेणे बाबत संबंधित अधिकारी यांनी लक्ष द्यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी सर्व्हे ९/२ येथील १२.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे खडीकरण सरफेस, ड्रेसिंग, गटार व पुलाचे बांधकाम ही कामे करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.३३% कमी दराची मे. एस. एच. असोसिएटस यांची निविदा त्यांचेकडुन ५% इतकी अनामत रक्कम घेऊन स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८ :**

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००२-०३ या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना खाद्य निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

मा. आयुक्त यांची मान्यता अन्वये त्याचा तपशिल खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

**१) बीफ खन्नी :** बीफ खन्नी करीता (१२) कोऱ्या निविदा पत्रकाची विक्री झालेली असुन (९) भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत पैकी एकाचा परवाना नुतनीकरण नसल्यामुळे निविदा उघडण्यात आली नाही.

| अ. क्र. | निविदाधारकांचे नांव | भाव प्रती किलो (रु.) |
|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल रहिम शे. छोटे | ९.९० |
| २. | श्री. अब्दुल हफीज अ. मजीद कुरेश | ११.७५ |
| ३. | श्री. हुसेन खान मजीद खान | १५.०० |
| ४. | श्री. शेख खलिल शेख चाँद | १६.७५ |
| ५. | श्री. शेख खुशिदोख अ. रहिम | १७.०० |
| ६. | श्री. मोहममद फारुक मो. ख्वाजा | १८.०० |
| ७. | श्री. फेरोमखान अब्दुल रहेमान खान | १८.०० |
| ८. | श्री. मोहम्मद सलीम मो. हनिफ कुरेशी | २०.०० |
| ९. | श्री. मोहमद इस्मा मो. शरीफ | परवाना नुतनीकरण नसल्यामुळे निविदा उघडली नाही. |

तुलनात्मक दृष्टीने श्री. अब्दुल रहिम शेख छोटे यांचे दर रु. ९.९० प्रति किलो सर्वात कमी आहे. करीता प्रस्ताव विचारास्तव सादर.

**२) लुर्सन घास :** लुर्सन घासाकरीता (३) कोरे निविदा पत्रकाची विक्री झाली असुन (३) निविदा पत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ. क्र. | निविदाधारकांचे नांव | भाव प्रती किलो (रु.) |
|---|---|---|
| १. | श्री. तुकाराम लक्ष्मण नरवडे पाटील | १.३५ |
| २. | श्री. संतोष रामनाथ लखोटिया | १.३९ |
| ३. | श्री. जनार्धन शेळके | १.४९ |

तुलनात्मक दृष्टीने श्री. तुकाराम लक्ष्मण नरवडे पाटील यांचे दर रु. १.३५ प्रती किलो सर्वात कमी आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**३) पशुखाद्य व कोंबडी खाद्य (गोदरेज) :** या करीता एकुण (५) कोरे निविदा पत्रकाची विक्री झाली असुन (३) निविदा पत्रके भरुन प्राप्त झाली आहेत.

| अ. क्र. | निविदाधारकांचे नांव | भाव प्रती पशुखाद्य | क्विंटल (रु.) कोंबडी खाद्य |
|---|---|---|---|
| १. | आकाश ट्रेडिंग कंपनी, औरंगाबाद | ८९०/- | १४००/- |
| २. | आतीफ खान फिकनखान | ११००/- | १६००/- |
| ३. | नैशनल ट्रेडिंग कंपनी | ११५०/- | १६००/- |

तुलनात्मकदृष्टीने मे. आकाश ट्रेडिंग कंपनी यांचे दर पशुखाद्यासाठी रु. ८०/- प्रति क्विंटल व कोंबडी खाद्यासाठी रु. १४००/- प्रती क्विंटल दर सर्वात कमी आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**४) ब्रेड :** ब्रेड करीता (२) कोरे निविदा पत्रकांची विक्री झाली असुन (२) निविदा पत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ. क्र. | निविदाधारकांचे नांव | भाव प्रती प्रती पुडा (रुपये) | |
|---|---|---|---|
| | | २०० ग्रॅम | २५० ग्रॅम |
| १. | सवेरा बेकरी, औरंगाबाद | ५.०० | ६.००० |
| २. | एलोरा बेकरी | ५.५० | ६.५० |

तुलनात्मक दृष्टीने सवेरा बेकरी, औंरगाबाद यांचे दर २०० ग्रॅम साठी ५० व २५० ग्रॅम साठी रु. ६ सर्वात कमी आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर. सदर दर गतवर्षीप्रमाणे समान आहेत. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. इलियास किरमाणी :** मृत्यु झालेल्या जनावरांचे मटण आणले जाते अशी शंका येते. चांगल्या प्रतीचे बिफ खन्नी ९.९० रुपये प्रती किलो प्रमाणे मिळु शकत नाही.

**श्री. कैसरखान :** जे मांस जप्त केले जाते ते कोठे जाते ?

**श्री. नंदकुमार फुलारी :** कोणत्या प्राण्यांना कोणत्या प्राण्याचे मांस दिले जाते. याचा खुलासा द्यावा. म्हशीचे मांस कोणते प्राणी खातात तर बैलाचे कोणते प्राणी खातात व दररोजचा त्यांचा आहार किती याचा सुध्दा खुलासा करावा.

**संचालक (प्रा. सं.):** जप्त केलेले मांस नारेगांव येथे ड्रेचिंग ग्राऊंडमध्ये पुरण्यात येते. त्यावेही पंचनामा सुध्दा केला जातो. जप्त केलेले मांस जनावरांना दिले जात नाही. शंका घेणे बरोबर नाही. औरंगाबाद महानगरपालिकेच्या पडेगांव येथे मुख्य स्लॉटर हाऊस असुन त्यामध्ये जनावरे आणली जातात. नियमानुसार शासकीय डॉक्टरने जनावर पास करुन दिल्यानंतर आपले कर्मचारी समोर असतात. पास करण्याची ३० रु. फीस आहे. जनावर कत्तल केल्यानंतर त्याचे तुकडे (मांस) आणतांना रिक्षात आणले जाते व रिक्षाबरोबर आपले कर्मचारी असतात व प्राणी संग्रहालयात आणल्यानंतर सुध्दा त्या मांसासाठी पुन्हा संबंधित विभागाकडुन तपासणी करुनच प्राण्यांना दिले जाते. प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संबंधित ठेकेदाराची निविदा मान्य केल्यास मागील वर्षाच्या तुलनेत या दराने महानगरपालिकेस दर महिन्याला रुपये ५०,०००/- होईल.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** दरारोजचे किती मांस लागते, कोणते प्राणी किती मांस खातात याचा हिशोब द्यावा.

**संचालक (प्रा. सं.) :** दररोज २२९ किलो मांस प्राण्यांना लागते.

**श्री. जयवंत ओक :** रु. ९.९० प्रती किलो प्रमाणे मांस पुरवठा करणार आहे. मनपाचा फायदा होत असेल तर घेण्यास हरकत नाही. परंतु चांगल्या प्रतीचे मिळावे याची खात्री करुन घ्यावी आता सुध्दा संबंधित ठेकेदार तीन महिन्यापासुन पुरवठा करीत आहे. कमी दराने घेत आहोत म्हणुन कशाची प्रकारचे मांस पुरवठा करणे योग्य होणार नाही. मराठवाडयात हे सर्वात मोठे उद्यान व प्राणी संग्रहालय या शहरातच आहे. मार्केटमध्ये ३० ते ४० रुपये प्रती किलोने बीफ मिळते. प्रस्तावातील दर व मार्केटचे दर यात फार तफावत आहे. या सर्व बाबींचा विचार करुन योग्य तो निर्णय घ्यावा. मांस प्राण्यांना देतांना योग्य ती तपासणी करुन दिले जाते. असे उत्तर अधिकाऱ्यांनी दिलेले आहे. त्यांना सुध्दा राष्ट्रपती पुरस्कार मिळालेला आहे. त्यांचे कामसुध्दा चांगले आहे. डॉक्टरांवर विश्वास ठेवुन मंजुर करण्यास हरकत नसावी.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** यापुर्वी जास्त दराने पुरवठा केलेला होता. या वर्षीच कमी दराने का करण्याचे मान्य केले याचे कारण काय ?

**श्री. मिर हिदायत अली :** मागील काही दिवसांपुर्वी वृत्तपत्रांत आलेले होते. प्राण्यांना मांस खराब दिले जाते. त्यासंबंधी प्रशासनाने संबंधितावर काय ॲक्शन घेतली आहे ?

**संचालक (प्रा. सं.) :** मागील एका महिन्यात एकावेळेस ३० किलो मांस खराब आलेले होते. ते परत केलेले आहे, ही बाब ताबडतोब निदर्शनास आलेली होती. आताच खुलासा केल्याप्रमाणे मांस घेतांना व प्राण्यांना देताना सर्व काळजी घेतली जाते.

**श्री. इलियास किरमाणी :** या बाबतीत थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करु शकत नाही. दररोजचा पुरवठा असतो. मागील वर्षापेक्षा कमी दर प्राप्त झालेले आहेत. शंका येत आहे. प्रस्ताव रिकॉल करावा.

**श्री. जयवंत ओक :** या प्राणी संग्रहालयात १० ते १५ लाखाचे एक-एक प्राणी आहेत. ९.९० रुपये किलोचे मांस (बीफ) चांगले मिळेल असे वाटत नाही. शंका येते.

**मा. आयुक्त :** मार्केटमध्ये ३० रुपये किलो असेल तर संबंधित व्यक्ती १० रुपये किलोने पुरवठा कसा करु शकतो. याबाबतीत शंका येते. कारण कुणीही व्यक्ती जो

व्यवसाय करतो तो दोन पैसे नफा मिळावा या उद्देशाने करीत असतात. १० रुपये किलोने विक्री केल्यास त्याचा नफा किती ? यावरुन चांगल्या प्रतीचे मांस देणार कसे, याबाबतीत शंका येते.

**संचालक (प्रा. सं.) :** मुंबईला होलसेलमध्ये २३ ते २४ रुपये किलोने देतात. मात्र कॉम्पीटीशन झाल्याने ९.९० रुपये किलोने देण्यास तयार आहे. मागील वर्षी २३ रु. किलोने पुरवठा झाला.

**श्रीमती मानकापे :** याची चौकशी व्हावी कमी दर आलेले आहेत.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** मांस तपासणी होते. आताच खुलासा केलेला आहे. मनपाचा यात फायदा होत असेल तर मंजुर करण्यास हरकत नसावी. एकीकडे १०० रु. वाढवत नाही.

**श्री. जयवंत ओक :** लाखो रुपयांची जनावरे खरेदी केली जातात चांगल्या प्रतीचे मांस दिले जात नाही अशी शंका येते व म्हणुन जनावरे मृत्युमुखी पडतात. यामुळे कोणत्या कारणाने मृत्यु झाला, कोण जबाबदार, प्रशासन काय करते. अशा बातम्या वर्तमानपत्रात येतात. महापालिकेची बदनामी होते. म्हैस, बैल या प्राण्यांचे मांस कोणत्या प्राण्यांना दिले जातात ? ज्या प्राण्यांचे मांस आणले जाते त्यांना कोणते आजार असतात व ज्या प्राण्यांना खाण्यासाठी दिले जाते व यापुर्वी मृत्यु झालेल्या प्राणी कोणत्या आजाराने मृत्यु झालेले आहेत. याचा पण खुलासा व्हावा.

**संचालक (प्रा. सं.)** : टी. बी. व इतर आजार प्राण्यांना होतात.

**श्री. जयवंत ओक :** ज्या प्राण्यांचे मांस दिले जाते त्यांना टी. बी. हा आजार असेल अशी जनावरे कत्तल करुन जनावरांना खाण्यासाठी दिल्यास या प्राण्यांना सुध्दा तो आजार होऊन मृत्यु झालेला असावा असे वाटते. याची दखल घेण्यात यावी.

**श्री. इलियास किरमाणी :** प्रस्ताव रिकॉल करावा. सविस्तर माहिती मागवली जनावरांना धोका निर्माण होऊ नये ही जबाबदारी महापालिकेची आहे.

**मा. सभापती :** प्रस्ताव रिकॉल करण्यात येत आहे.

**श्री जयवंत ओक :** जास्त दराने व चांगल्या प्रतीचे मांस (बीफ) घेण्यास हरकत नसावी. प्राण्यांचे जीव धोक्यात येऊ नये.

**मुख्यलेखाधिकारी :** बीफ खरेदीसाठी दर आलेले आहेत. प्रशासनातर्फे संबंधित अधिकारी डॉ. रझवी हे बीफ पुरवठा होते ते मांस (बीफ) चांगल्या प्रतीचे आहे किंवा नाही याची जबाबदारी अधिकाऱ्यावर असुन ते पर्चेस करतांना शासकीय अधिकाऱ्यामार्फत तपासणी करुन त्या जनावरांचे बीफ घेतले जाते. दर आठवडयात शासनाकडील सहाय्यक संचालक, पशुसंवर्धन विभाग यांचे मार्फत तपासणी होते. जी निविदा ९.९० रु. भरुन आली ती रद्द करता येणार नाही. फक्त चांगल्या प्रतीचे मांस (बीफ) मिळते की नाही हे तपासण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. टेंडर पध्दतीनुसार कार्यवाही झालेली आहे. रद्द केल्यास उद्या काही वाद निर्माण झाल्यास आपल्यावर जबाबदारी राहील. तसेच आर्थिकदृष्टया सुध्दा महापालिकेला परवडणारे आहे. या दराने घेणे बंधनकारक आहे.

**श्री. प्रशांत देसरडा :** प्रस्ताव रिकॉल करावा. ज्याचे दर भरुन आले त्यांची पुन्हा निविदा भरुन घेऊ नये. प्रस्ताव रद्द करता येणार नाही.

**श्री. जयवंत ओक :** जनावरांना चांगले खाद्य मिळाले पाहिजे. जास्त किमंतीचे व चांगल्या प्रतीचे खरेदी करावे. जनावरे मृत्युमूखी पडलेले आहे. याची कल्पना सर्वांना आहे. यात मनपाचे नुकसान होते. शंका निर्माण होत असेल तर प्रस्ताव रिकॉल करावा. टेंडर मागवावे.

**श्री. नंदकुमार फुलारी :** २३० किलो बीफ कोणत्या प्राण्यांना देता व कोणता प्राणी किती बीफ द्यावे लागते. कोणत्या प्रकारचे किती प्राणी आहेत. याची सविस्तर माहिती द्यावी.

**संचालक (प्रा. सं.) :** प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना जे खाद्य दिले जाते ते सेंट्रल ॲथॉरिटीजच्या डायरेक्टीव्ह प्रमाणे खाद्य देण्यात येत आहे. त्यानुसार वाघांना १२ किलो, तसेच सिहांना १४ किलो पर्यन्त व कोल्हा व इतरही काही प्राणी प्राणी आहेत. त्यांनाही मांस दिले जाते. त्याप्रमाणे २२९ किलो मांस लागते. प्रत्येक जनावरांना दररोज किती मांस दिले जाते याची रजिस्टरला नोंद होते. प्राणी संग्रहालयात ८ पांढरे वाघ, ६ सिंह, १ लांडगा, १० कोल्हे आहेत जे मांस दिले जाते त्यात मटन किंवा चिकन नसते. बीफ दिले जाते. नियमाप्रमाणे आठवडयातुन एक दिवस मांस दिले जात नाही.

**श्री. नंदकुमार फुलारी :** कोणत्या प्राण्यास किती मांस देतो, आठवडयाचे किती महिन्याचे किती व वर्षाचे किती मांस लागते ? याची आकडेवारी द्यावी. माझ्या माहिती प्रमाणे २३० किलो मांस लागत नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** सांयकाळच्या वेळेस जेव्हा मांस दिले जाते त्यावेळी शासकीय डॉक्टर्स स्लॉटर हाऊसमध्ये असतात का ?

**संचालक (प्रा. सं. ) :** मांसाहारी प्राण्यांना सायंकाळी एक वेळेसच मांस दिले जाते आठवडयातुन दर मंगळवारी बीफ सुध्दा देण्यात येत नाही. इतर काही प्राण्यांना दोन वेळेस बीफ दिले जाते. शासकीय डॉक्टर्स जनावरे सकाळीच पास करतात व त्यानंतर ते कत्तल केली जाते. १० वाजेच्या दरम्यान पुरवठा घेण्यात येतो.

**मा. सभापती :** हा प्रस्ताव स्थगित करुन पुढील बैठकीमध्ये सविस्तर माहितीसह सादर करावा.

**२) ल्युसर्न घास :**

**श्री कैसरखान :** ल्युसर्न घास घेताना प्रत्येक पेंढी मोजुन घेतली जाते का ? आपले कर्मचारी नसतात अशी माहिती मिळावी. संबंधित ठेकेदारच मोजुन आणुन टाकतात, फेकतात त्यामुळे नासधुस होते. हे बरोबर आहे का ? पाणी टाकुन वजन वाढविले जाते का ?

**संचालक (प्रा. सं.) :** कसल्याही अवस्थेत आणुन टाकतात असा काही प्रकार होत नाही. नुकसान नाही विनंती की, सर्व सदस्यांनी एक वेळेस येऊन प्रत्यक्ष पाहणी करावी. ल्युसर्न घास एकुण ३६५ किलो घेतला जातो. काही वेळ गवत बाहेर ठेवले जाते. नंतर वजन करुन घेतले जाते.

**श्री कैसरखान :** सविस्तर माहिती द्यावी. प्रस्ताव पुढील बैठकीत पुन्हा सादर करावा.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. सविस्तर माहिती पुढील सभेत ठेवावी.

**३) पशुखाद्य व कोबंडी खाद्य : (गोदरेज)**

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. परंतु कोणते प्राणी दररोज किती अन्न खातात, प्राण्यांचे नावासहित पुढील बैठकीच्या वेळी माहिती सादर करावी.

**४) ब्रेड :**

**नंदकुमार फुलारी :** ब्रेड कोणते प्राणी खातात, माहिती द्यावी.

**संचालक (प्रा. सं. ) :** माकडांना ब्रेड दिले जातात.

**मा. सभापती :** या प्रस्तावाच्या बाबतीत सुध्दा सविस्तर माहिती सादर करावी. प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००२-२००३ या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांकरीता मागविण्यात आलेल्या खाद्य निविदांचे संदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१) बीफ खन्नी पुरवठा करण्या संदर्भात सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सर्वानुमते असे ठरले की, तुर्त हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

२) ल्युसर्न घास खरेदी साठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची म्हणजे रु. १.३५ प्रती किलो या दराची श्री. तुकाराम लक्ष्मण नरवडे पाटील यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३) पशुखाद्य व कोंबडी खाद्य : (गोदरेज) खरेदीकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच पशुखाद्यासाठी रु. ८९०/-प्रती क्विंटल व कोंबडी खाद्यासाठी रु. १४००/- प्रती क्विंटल या दराची मे. आकाश ट्रेडिंग कंपनी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

४) ब्रेड : पुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी म्हणजेच २०० ग्रॅमसाठी रु. ५.०० व २५० ग्रॉमसाठी रु. ६.००या दराची सवेरा बेकरी, औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानूमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, बायो मेडीकल वेस्ट (मॅनेजमेंट ॲण्ड हॅण्डलींग) नियम १९९८ नुसार महानगरपालिकेचा "बायो मेडिकल वेस्ट प्रकल्प" उभारणे करीता निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदरील निविदा महाराष्ट्र टाईम्स, सकाळ (पुणे) व लोकमत (लोकमत) या वर्तमान पत्रातुन प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार एकुण दोन एजन्सीच्या निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे -

१) हिरण्य इक्वीपमेंन्ट प्रा. लि. कोल्हापुर

अ) महानगरपालिका देण्यात येणारी रॉयल्टी ३% ते ७%.

ब) सेवा शुल्क प्रत्येक ३ वर्षात १०% ते वाढवणे.

२) वॉटर ग्रेस प्रॅाडक्ट्स, नाशिक

अ) रॉयल्टी २१ % ते २७%

ब) दर कमी जास्त करणेस्तव महानगरपालिका व एजन्सी यांनी गरज भासल्यास संयुक्त निर्णय घ्यावा.

वरील दोन्ही निविदेचा विचार करता मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस, नाशिक यांनी सर्वात जास्त रॉयल्टी ऑफर केलेली आहे. सदरील प्रकल्प हा बोल्ट पध्दतीने असल्याने २० वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प महानगरपालिकेच्या मालकीचा राहणार आहे. प्राप्त निविदेचा विचार करुन वॉटर ग्रेस प्रॉडक्टस, नाशिक यांना चर्चेस बोलावुन वाटाघाटी करण्यात आल्या व खालील प्रमाणे अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या.

## बायोमेडीकल प्रकल्प उभा करणे करिता अटी व शर्ती

१) हे प्रकल्प उभारणे करिता लागणारी जागा संबंधित एजन्सीला एक एकर जमीन (४०४८ चौमी) रु. १/- चौ.मीटर प्रती वर्ष या प्रमाणे भाडे आकारुन महानगरपालिका उपलब्ध करुन देईल.

२) सदर भाडे प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च या तारखेपुर्वी संबंधिताने औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयात जमा करावे.

३) सदर प्रकल्प महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व केंद्रीय प्रदुषण मंडळ यांचे नॉर्मस प्रमाणे सर्व सोयी व यंत्र सामुग्रीसह उभा करावा. सटॅक्ची उंची ३० मीटर असावी (वन व पर्यावरण विभागाचे दि. २० जुलै १९९८ च्या अधिसुचनेप्रमाणे तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे दि. २ जुन २००० चे परिपत्रकाप्रमाणे असावी.)

४) बायोमेडीकल वेस्ट जाळल्यानंतर राख बंद कंटेनर मध्ये ठेवुन ही राख जवळील ट्रेंचिंग ग्राऊंड येथे लिरवा प्रुफ लॅण्ड फिल साईट मे. सत्यम बायोफर्टिलायझर प्रकल्पाच्या बाजुस असलेल्या जमिनीत सुरक्षितपणे ठेवावी.

५) या प्रकल्पासाठी लागणारी विज संबधिताने (ऑपरेटर) महाराष्ट्र विद्युत मंडळ, औरंगाबाद तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औंरगाबाद कडुन आवश्यक ती परवानगी घेऊन प्रकल्प उभा करावा. यासाठी लागणारा खर्च संबंधितास स्वत: करावा लागेल.

६) औरंगाबाद महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडुन प्रकल्प उभारणी इमारतीचे बांधकामासाठी परवानगी घ्यावी लागेल.

७) प्रकल्पाच्या संपुर्ण जागेत संबंधिताने स्वत:चे खर्चाने हरित लागवड करावी लागेल.

८) या प्रकल्पासाठी औरंगाबाद महानगरपालिका कोणताही खर्च करणार नाही.

९) ॲक्युपायरकडुन (खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणार) सेवा शुल्क सर्वसाधारण सभेने मान्य केलेल्या ठरावाप्रमाणे वसुल केले जाईल व वसुल झालेल्या सेवा शुल्काचे एकुण वसुलीची २१% रॉयल्टी पहिल्या पाच वर्षाकरीता महानगरपालिका कपात करेल. तदनंतरच्या प्रत्येक दोन वर्षात १% वाढ करुन रॉयल्टी कपात करुन संबंधितास प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेस उर्वरीत रक्कम दिल्या जाईल. काही कारणामुळे १५ तारखेपर्यंत रक्कम महानगरपालिका कडुन देय न झाल्यास त्यावर एजन्सीला व्याज आकारता येणार नाही.

१०) सदरील प्रकल्पामध्ये वैद्यकीय व्यवसायीमार्फत सेवा शुल्क वसुल करण्याची जबाबदारी एजन्सीची राहील. त्याकरीता महानगरपालिकेतर्फे त्यांना अधिकार पत्र दिले जाईल. त्यांनी केवळ धनादेश स्विकारावे रोख रक्कम त्यांना स्विकारता येणार नाही.

११) वैद्यकीय व्यवसायी यांना सभासद करुन घेण्यासाठी प्रवृत्त करणेस्तव एजन्सीला अधिकार पत्र दिल्या जाईल वेळोवेळी या प्रकल्पाची जाहिरात महानगरपालिकेच्या नियमानुसार व महानगरपालिका सांगेल त्यानुसार एजन्सी करु शकेल.

१२) महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने भविष्यात नियमामध्ये काही बदल केल्यास ते बदल एजन्सीला बंधकारक राहतील व त्यानुसार प्रकल्पामध्ये फेरबदल करण्याची जबाबदारी एजन्सीची राहिल.

१३) सभासद झालेल्या प्रत्येक वैद्यकीय व्यवसायीकडुन प्रती दिन बायो वेसट जमा करण्यात यावे जर प्रती दिन बायो वेस्ट न उचल्यास व तशी तक्रार सभासदांनी केल्यास प्रती दिन रु. ५००/- एजन्सीला दंड आकारण्यात येईल व सदर रक्कम त्यांना देय असलेल्या रकमेतुन कपात करण्यात येईल.

१४) जर इंधन खर्च, वाहतुक खर्च, सर्व्हिस चार्जेस इत्यादीमध्ये वाढ झाल्यास रॉयल्टी संबंधाने व अनुषंगीक बाबी संबंधाने परस्परांच्या विचार विनियाने दरात वाढ केली जाईल.

१५) हा करार बील्ट पध्दतीचा असुन २० वर्षाकरीता करार झालेल्या तारखेपासुन अमलात येईल. २० वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प महानगरपालिकेच्या मालकीचा राहील. एजन्सीला कोणताही हक्क त्यावर असणार नाही.

१६) संबंधितांने सुरक्षीत ठेव म्हणुन रु. १.०० लाख महानगरपालिकेच्या कार्यालयात जमा करावी लागेल. या रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही व प्रकल्पाची मुदत संपल्यानंतर सदर अनामत रक्कम संबंधितास परत करण्यात येईल.

१७) बायो मेडीकल वेस्ट ॲक्युपायरकडुन गोळा करणेसाठी संबंधिताने पुरेशा वाहनांचा वापर करावा. डिझेल वाहनचालक व प्रकल्पाच्या देखभालीसाठी येणारा खर्च संबंधिताने करावा.

१८) प्रकल्पाची संपुर्ण उभारणी व देखभाल खर्च संबंधिताने स्वतः करावा.

१९) या प्रकल्पामध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे एसआयएस कव्हरेज आरोग्याच्या दृष्टीने करण्यात यावे. सर्व कर्मचाऱ्यांची विमा योजना काढावी त्यांची पॉलीसी महानगरपालिकेकडे सुपूर्द करावी.

२०) वायु प्रदुषणसाठी प्रतिबंधक उपाय योजना करावी व वेळोवळी त्याचे नमुने घ्यावे व त्याव प्रतिबंधक उपाय केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे गाईडलाईन्स प्रमाणे कराव.

२१) प्रकल्पातील सर्व यंत्रणा, अवजारे यांची विमा पॉलिसी, चोरी, आग नैसर्गिक आपत्ती व इतर आपत्तीसाठी संबंधित (ऑपेरटर) यांनी स्वतः खर्च करावा. प्रकल्पाची कुठलीहि नासधुस (डॅमेज) झाल्यास कुठल्याहि कारणास्तव महानगरपालिका जबाबदार राहाणार नाही. व त्याची भरपाई देणार नाही.

२२) कुठल्याही कारणास्तव प्रकल्प बंद पडला तर संबंधीताने प्रकल्प चालु करण्याकरीता त्वरीत कार्यवाही करावी व बायो मडिकल वेस्टचे वरील कालावधीमध्ये स्वतःच्या खर्चाने निर्जंतुकीकरण करावे लागेल. प्रकल्प १ महिन्याचे कालावधीत पुन्हा सुरु न केल्यास रु. १०,०००/- प्रतीदिन दंड आकारला जाईल. सदर दंड आकारण्यापुर्वी समितीच्या अहवालानुसार कार्यवाही केली जाईल.

२३) महानगरपालिका व संबंधित यामध्ये कोणताही न्यायालयीन तंटा उद्‌भवल्यास औरंगाबाद येथील न्यायालयातच चालविला जाईल.

२४) औरंगाबाद महानगरपालिकेच्या रद्दीबाहेरील बायोमेडिकल वेस्ट आणुन प्रकल्पामध्ये प्रकिया करण्यास हरकत नाही. परंतु त्यावर होणारी रॉयल्टी महानगरपालिकेत भरणा करावी लागेल. औरंगाबाद महानगरपालिका रद्दीतील निघणाऱ्या वैद्यकीय व्यवसायी सभासदांची सर्व जैविक कचऱ्याची विल्हेवाट या प्रकल्पात लावली जाईल. प्रत्येक रुग्णालयातील खाटांची संख्या लॅबोरेटरी इत्यादीबाबत महानगरपालिका

सतर्क राहील. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी दररोज प्रकल्पाची पाहणी करतील.

२५) या प्रकल्पासाठी एक सल्लागार समिती नेमुन त्यामध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी महानगरपालिका औरंगाबाद, मा. अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद, आसमारे चे प्रतिनिधी, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी व वॉटर ग्रेस प्रॉडक्टस चे प्रतिनिधी या प्रकल्पास प्रत्येक महिन्यात भेट देवुन पाहणी करतील व प्रकल्पाबाबतच्या अडीअडचणीचा अहवाल मा. आयुक्तांना सादर करण्याचे अधिकार त्यांना राहतील.

२६) संबंधिताबरोबर वेळोवळी वाटाघाटी करुन प्रकल्पाच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना राहतील. सदरील बदल दोन्ही एजन्सीच्या चर्चेतुन करण्यात येईल.

उपरोक्त अटी व शर्तीनुसार वॉटर ग्रेस प्रॉडक्टस, नाशिक यांची निविदा मान्य करण्याची शिफारस करण्यात येते. करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. नंदकुमार फुलारी :** संबंधित अधिकारी उपस्थित नाहीत.

**श्री. मीर हिदायत अली :** हा प्रस्ताव महानगरपालिकेच्या हिताचा असुन याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आलेले आहेत. तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**श्री. नंदकुमार फुलारी :** यातुन आयुर्वेदीक व होमीओपॅथीक दवाखाने वगळण्यात यावेत.

**श्री. जयवंत ओक :** या प्रस्तावाच्या अनुषंगाने चर्चा करीत आहे. शहरात मोठया प्रमाणात कचरा साचतो. वेगवेगळया बातम्या वृत्तपत्रात येतात. त्यामुळे मनपाची बदनामी होते. महानगरपालिकेच्या फायद्याचा प्रस्ताव आहे. सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**डॉ. आशा बिनवडे :** बायो मेडिकल वेस्ट म्हणजे काय ? हा प्रकल्प कशा पध्दतीने उभा करणार? या प्रस्तावाची अंमलबजावणी केल्यास अटी-शर्ती काय आहेत ? याची सविस्तर माहिती घेणे गरजेचे आहे व शहरामध्ये किती कचरा निमार्ण होतो, हॉस्पीटल किती, दवाखाने किती, ब्लड बँक किती, कारखाने किती, पशु चिकीत्सालयाचे दवाखाने किती याची पुर्ण माहिती आपल्याकडे असावयास पाहिजे तसेच जैविक कचऱ्याची विल्हेवाट पाहिजे तसेच जैविक कचऱ्याची विल्हेवाट कशी लावणार, कॅटेगिरी कशी करणार याची माहिती व इतर सुध्दा माहिती मिळावी. त्यानंतर यावर चर्चा करता येईल. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी काय उपाययोजना राबविणार आहात सभासद होणेस पत्र देण्यात आले होते. ७ दिवसात सभासद व्हावे असे दिले होते आता तीन महिने झाले. त्यानुसार प्रतिसाद मिळालेला नाही. या प्रकल्पाविषयी संबंधित विभागाने सविस्तर माहिती द्यावी. त्यानुसार चर्चा करता येईल. किती सभासद झालेले आहेत ?

**प्रभारी आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** केंद्र शासनाच्या १९९८ ला निर्गमित केलेल्या अधिसुचनेनुसार राज्य शासनाने मनपाच्या रद्दीतील खाजगी, निमशासकीय, शासकीय दवाखाने, प्रयोगशाळा, कारखाने व तत्सम संस्था इ. ठिकाणी तयार होणाऱ्या जैविक कचऱ्याची म्हणजेच "बायोमेडिकल वेस्ट" ची

विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने लावण्यासाठी आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार बी. एम. डब्ल्यु. ची विल्हेवाट लावणे मनपाला बंधनकारक आहे. त्यासाठी बी.एम. डब्ल्यु. (मॅनेजमेंट व हँडलिंग) प्रकल्प मनपाने उभारण्याचे ठरविले आहे.

रुग्णांचे व प्राण्यांचे निदान, उपचार, लसीकरण किंवा संशोधन इ. च्या प्रक्रियेमध्ये जो कचरा तयार होतो त्यास जैविक कचरा किंवा बायो मेडिकल वेस्ट असे म्हणतात. यात शस्त्रक्रियेद्वारे काढलेले मानवी अवयव, प्लासेंटा, स्पिरीटचे बोळे, ड्रेसिंगचे साहित्य, पॅडस्, बॅड्स, प्लास्टर्स, सलाईन बाटल्या व सेट्स कॅथेरर्स, युरीन बॅग्जस राईल्स टयुब, ड्रेन्स, प्लास्टीक, स्काल्फ व्हेन सेटे, ग्लोव्हज, बेड्डस, मिडलस, रक्त व रक्ताचे घटक डिस्फाईड ड्रग्ज केमिकल वेस्ट (इसेक्टीसाईड) इन्सीनरेटर मधील राख इ. या समावेश होतो. हा कचरा इतर कचऱ्या बरोबर कचराकुंडीत टाकल्यास कचरा उचलणाऱ्या कामगारांच्या तसेच इतर लोकांच्या आरोग्याला धोका उत्पन्न होऊ शकतो. तसेच एड्स/हिपाटायटीस सारख्या गंभीर आजारांचा प्रसारही होऊ शकतो. त्या कारणास्तव या कचऱ्याची विशिष्ट पध्दतीनेच विल्हेवाट लावण्याचे इंडियन गॅझेटचे आदेश आहेत. यामध्ये -

१) कचऱ्याची प्रतवारी करुन विविध रंगाच्या बॅगमध्ये कचरा भरणे.
२) विशिष्ट प्रकारच्या ३ कप्पे असलेल्या स्पेशल व्हॅन मधुन कचऱ्याची वाहतुक प्रकल्पापर्यंत करणे.
३) प्रकल्पात शास्त्रोक्त पध्दतीने कचरा जाळणे.
४) उरलेली राख लॅन्डफील म्हणुन वापरण्यासाठी शास्त्रशुध्द पध्दतीने तिचे वितरण करणे.
५) या प्रकीयेत तयार होणारा वायु शुध्द स्वरुपात हवेत सोडणे व जो कचरा रिसायकल करता येतो तो निर्जंतुक करुन परत वापरात आणणे. या गोष्टींचा समावेश होतो.

कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कुठली पध्दत वापरावी हे ठरविणे सोपे जावे म्हणुन कचरा ठराविक म्हणजे पिवळया, लाल, हिरव्या किंवा काळया रंगाच्या पिशव्यामध्येच साठवण्याचे आदेश आहेत. या पिशव्यांवर बायो हर्जाड व सायटोऑक्सीन हर्जाड सिम्बॉल असावा तसेच हॅन्डल वुईथ केअर असे छापलेले असावे. कुठल्या कॅटेगरीचा कचरा कोणत्या रंगाच्या बॅगमध्ये भरावा या बाबतही इंडियन गॅझेटने सुचना दिलेल्या आहेत.

इंडियन गॅझेटने कचऱ्याची विल्हेवाट खालील पध्दतीने लावण्याचे आदेश दिलेले आहेत.

१) इनसिनरेशन - जाळणे
२) ऑटाकलव्हींग /मायक्रोव्हेवींग स्टीमद्वारे स्वच्छ करणे व केमिकल ट्रीटमेंट
३) डिस्ट्रक्शन, म्युटीलेशन ॲण्ड शेडींग
४) डीप बरीयल " नॉट ॲप्लीकेबल फॉर एम. सी. ए.
५) डिस्पोजल इन सेक्युअर्ड लॅन्डफील

वरील पध्दतीतील पहिल्या दोन पध्दतीचा वापर जास्त होत असल्यामुळे इनसिनरेटर बसविणे जरुरी आहे. इनसिनरेटरचय प्लॉन्टसाठी

अंदाजे २१ एकर जागा लागते. यात इनसिनरेटर इन्स्टॉल करणे, ससेगीगेशनसाठी खुली जागा सोडणे, वाहतुक व ऑफिस इ. साठी लागणाऱ्या जागेचा समावेश होतो.

इनसिनरेशन हि जैविक कचरा विल्हेवाट लावण्याची शास्त्र शुध्द पध्दत आहे व ती बऱ्याचशा वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये कार्यरतही आहे. इनसीनरेट मध्ये कचरा ओतल्यानंतर त्याची विल्हेवाट हे यंत्र ४ भागात करते. पहिल्या भागात (प्रायमरी चेंबर) ५० अंश तापमानात प्रती तासाला अंदाजे ५० कि. कचरा जाळला जातो. त्यानंतर तो दुसऱ्या भागात (प्रायमरी बर्नर) १०५० अंश इतक्या तापमानास एक्स्पोज केला जातो. या प्रक्रियेत सर्व सेंद्रीय कचरा जळुन त्याचे राख व वायुत रुपांतर होते. त्यानंतर तयार झालेला वायु स्क्रबर व डायलुटंट या भागात हवेत व पाण्यात मिसळण्यात येतो. त्यामुळे वायुमधील राखेचा पुर्ण अंश पाण्यात विरघळतो व उरणारी स्वच्छ हवा ३० मीटर उंचीच्या धुराडयातुन आकाशात सोडली जाते.

जो कचरा रिसायकल करता येऊ शकतो तो ऑटोक्लेव्ह किंवा मायक्रोव्हेव द्वारे निर्जंतुक करुन शेडींग मशीनमध्ये बारीक करण्यात येऊन अथवा रासायनिक प्रक्रिया करुन पुर्नवापरासाठी कारखान्यात पाठविता येतो.

सॉलीएन्ट पॉईन्टस :

१) पुर्ण प्लॉट व त्याची उभारणी व मेन्टेनन्स एम.पी.सी.बी. व सी.पी.सी.बी. च्या रुल्स प्रमाणे करणे जरुरी आहे.
२) कचऱ्यावर ४८ तासाच्या आत प्रक्रिया होणे जरुरी आहे.
३) इन्सिनरेटर मधील राख व निर्जंतुक कचरा हा व्हॉलटाईल ऑरगॅनिक कम्पाऊंड पासुन फ्री असला पाहिजे. तसेच केमिकली ॲक्टीव्ह पदार्थापासुन फ्री असला पाहिजे. तसेच तो २४ तासाच्या आत लॅन्डफिल साईटवर नेला पाहिजे.
४) मनपामध्ये १९० रुग्णालये असुन ४०० पेक्षा जास्त वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या खाजगी संस्था आहेत. एकुण ४००० हॉस्पीटल बेड्स औरंगाबाद शहरात आहेत परंतु १००० बेडर्सनीच बायोमेडीकल वेस्ट प्लॉन्टचे सभासद होण्यासाठी संमती दर्शविली आहे.

साधारणत: ५०० कि. ग्रॅ. कचरा रोज निघेल असा अंदाज ओह. बोल्ट पध्दतीने निविदा देण्याबाबत प्रस्ताव आल्यामुळे पुर्ण प्रकल्प इस्टॉब्लिश करणे व रन करणे याची पुर्ण जबाबदारी संबंधित कंपनीची राहणार आहे.

ऑक्युपायर - म्हणजे ज्या ठिकाणी जैविक कचरा तयार होतो त्या संस्था. यामध्ये सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी स्वंयसेवी /धर्मादाय संस्था, सर्व प्रकारचे वैद्यकीय व्यावसायी, रुग्णालये, दवाखाने रक्तपेढया, पॅथालॉजी लॅब, विज्ञान वैद्यकीय पशुविद्यालय व महाविद्यालय, संशोधन संस्था पशुवैद्यकीय रुग्णालय व कत्तलखाने, दुग्ध व्यवसाय केंद्र, कुकूटपालन केंद्र इ. चा समावेश होतो.

आतापर्यन्त प्रकल्प नाशिक, पुणे, मुंबई, ठाणे, कोल्हापुर, सांगली इ. ठिकाणी सुरु झालेला आहे.

प्रायव्हेट प्रॅक्टीशनर्सना दिलेली मुदत ३१ डिसेंबर २००२ आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** शहरात आतापर्यंन्त फक्त १००० सभासद म्हणुन संमती दर्शविलेली आहे.

**मा. आयुक्त :** हा प्रकल्प कार्यान्वित करण्यासंदर्भात सर्व नियम सेंट्रल गर्व्हमेंटने तयार केलेले आहेत. ज्या हॉस्पीटलमध्ये ५० पेक्षा जास्त खाटांची संख्या आहे आशा हॉस्पीटलने ३१ डिसेंबर २००१ पर्यन्त त्यांनी जैविक कचऱ्याच्या संदर्भात व्यवस्था करावयास पाहिजे होती. ति वेळ निघुन गेलेली असुन ५ ते ६ महिन्याचा कालावधी जास्त झालेला आहे. ज्या हॉस्पीटलमध्ये ५० खाटापेक्षा कमी असेल अशा प्रत्येक शहरातील बायो मेडीकल वेस्ट प्रकल्प डिसेंबर २००२ पर्यंत कार्यान्वीत झाला पाहिजे. आपण वृत्तपत्रात वाचतो. काही डॉक्टरांनी त्यांचा टेक्नॉलॉजीला विरोध केला आहे. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी ज्या अटी - शर्ती दिल्या त्या सर्व स्टेटला लागु असुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ ज्या ज्या वेळी सुचना करतील त्यानुसार हा प्रकल्प राबविण्यास बंधनकारक राहील. हा प्रकल्प सुरु करताना ए.ओ.सी. लागणार आहे व वेळोवळी सुचना केल्यानुसार त्याचे पालन करावे लागणार आहे. डॉक्टरांनी जो विरोध केला त्यात काही तथ्य नाही. परंतु जे दर लावण्यात आलेले आहेत ते थोडेफार जास्त लावण्यात आलेले आहेत. सुरुवातीला कमी दर होते. जेव्हा सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुर झाला त्यानुसार आयएमए चे पदाधिकारी, मेडीकल कॉलेजचे डीन व प्रतिष्ठित डॉक्टर्स यांचे बरोबर बैठक घेऊन आयएमए चे पदाधिकारी यांनी सुचना केली की, जो बायो मेडीकल वेस्ट होणार आहे तो वाहुन आणल्यास आम्हाला त्रास होणार आहे व संबंधित ठेकेदार यांनी उदा . हॉस्पीटल असेल तेथुन कचरा जमा करुन घेऊन जाण्याचा प्रयत्न करावा. वाटल्यास दरामध्ये वाढ करावी म्हणुन ३.५० रुपयाचे ४.०० रुपये करण्यात आलेले होते. तसा ठराव आपण घेतलेला आहे. त्यानंतर मध्यंतरीच्या काळात आयएमए चे पदाधिकारी बदलले. जे दर वाटाघाटीनुसार निश्चित केलेले होते ते सुध्दा यामध्ये घेतलेले होते. आतापर्यन्त १००० बेड्सची संमती मिळाली.

**डॉ. आशा बिनवडे :** कमलनयन बजाज हॉस्पीटल तसेच एम. जी. एम. हॉस्पीटल यांनी लेखी स्वरुपात दिलेले आहे. हे सोडुन १००० ते १५०० आहेत. पॅथॉलॉजी ब्लड बँक तयार नाहीत.

**मा. आयुक्त :** त्यांचे असे म्हणणे आहे की, रु. १.६० प्रमाणे कचरा उचलणारे ठेकेदार आहे. असे असेल तर आपण जी जाहीरात काढली ती औरंगाबाद शहरापुरती मर्यादीत नव्हती. ती संपुर्ण महाराष्ट्र पातळीवरील वर्तमानपत्रात दिलेली होती. त्यावेळी संबंधित ठेकेदाराने का निविदा भरलेली नाही. ज्यांनी प्रतिसाद दिला नाही व नियमाने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली नाही तर त्यांचेवर नियमाने कार्यवाही केली जाईल. शिवाय दंडात्मक कार्यवाही सुध्दा प्रस्तावित केलेली आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** घराघरातुन कचरा जमा होणार आहे. प्रत्येक व्यक्तीच्या घरातुन कचरा जमा करणे शक्य होणार नाही. बायो मेडीकल वेस्ट च्या संदर्भात वेगळी भुमिका असावी माझे मत आहे. जनतेचे आरोग्य चांगले ठेवायचे असेल तर कचऱ्याची विल्हेवाट योग्य तऱ्हेने लागली पाहिजे. घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. जैविक कचऱ्याची विल्हेवाट

लावण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने त्या त्या हॉस्पीटलची, डॉक्टरांची आहे. परंतु हा प्रकल्प राबवितांना फायदा म्हणुन याकडे बघितले जाऊ नये. आपण मदत करणारी संस्था (हेल्पींग इन्स्टीटयुट ) म्हणुन दृष्टीकोन ठेवावा. खेदाने बोलावे वाटते की, दि. २०.११.२००१ च्या बैठकीत या संबंधिचा प्रस्ताव पुरवणी विषय पत्रिकेवर सादर झालेला होता. सभासद फि ३००/- इतर बेड ३.५० असे दर दिलेले होते माझा विरोध असतांना सुध्दा प्रस्ताव मंजुर केला व पुन्हा सुधारीत प्रस्ताव डिसेंबरच्या बैठकीत ऐनवेळी सादर करण्यात आला.

**मा. सभापती :** सर्वसाधारण सभेची चर्चा या सभागृहात करणे योग्य नाही. या विषयासंबंधी आपणांस काय मत मांडायचे ते मांडावे.

**डॉ. आशा बिनवडे :** सर्वसाधारण सभेतील चर्चा करीत नाही. विषयाला धरुनच चर्चा होत आहे. हा प्रस्ताव ऐनवेळी सादर करुन ३.५० वरुन ४.०० रु दर करण्यात आले. घाई गडबडीने मंजुर केला. असा माझा आरोप आहे. वाढ केली प्रशासनास सहकार्य केले तर हा प्रकल्प यशस्वी होणार नाही म्हणुन पुन्हा सुधारीत प्रस्ताव सादर करुन योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे माझे मत आहे. दरात वाढ केल्यास एक तर कुणी सभासद होणार नाही व दुसरे असे की, जी परिस्थिती नारेगांवच्या प्रकल्पाची झाली तीच परिस्थिती या प्रकल्पाच्या बाबतीत होईल.

**मा. सभापती :** पुन्हा पुन्हा तीच चर्चा होत आहे. आपले मत मांडावे यात दुरुस्ती काय करायची ती सुचना करावी. जो विषय नाही ते येथे बोलु नये.

**डॉ. आशा बिनवडे :** माझे मत मला मांडु द्यावे. आपल्याला जो निर्णय घेता येईल तो घ्यावा परंतु निर्णय घेतांना सभागृहाच्या भावना लक्षात घ्याव्यात.

**मा. सभापती :** मा. आयुक्तांनी या संदर्भात डॉक्टरांच्या भावना लक्षात घेऊन डॉक्टरांशी चर्चा करुन जे काही म्हणणे असेल ते ऐकुण अंतिम करण्याचे अधिकार या आयुक्तांना देण्यात येतात. हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. वाटाघाटी झाल्यास त्या संबंधीचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यात येत आहेत.

**श्री. प्रशांत देसरडा :** विषयाच्या आधारेच चर्चा होत आहे. विषयाला सोडुन नाही. स. सदस्यांना त्यांचे मत मांडु द्यावे. नंतर आपल्याला काय तो निर्णय घ्यायचा तो घेता येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** नारेगांव येथील प्रकल्पाची जी परिस्थिती झाली त्याप्रमाणे या प्रकल्पाची होणार आहे. म्हणुन आपण निर्णय बदलुन योग्य तो निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :** विषय संपलेला आहे. निर्णय झालेला आहे.

**सौ. चंद्रात्रे :** या विषयाच्या अनुषंगाने व्यवस्थित माहिती व्हावी व्यवस्थित माहिती व्हावी. व्यवस्थित चर्चा व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बायो मेडिकल वेस्ट (मॅनेजमेंट ॲण्ड हॅडलींग) नियम १९९६ नुसार महानगरपालिकेचा "बायो मेडीकल वेस्ट" प्रकल्प उभारणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस, नाशिक या एजन्सीने सर्वात जास्त रॉयल्टी (२१% ते २७% रॉयल्टी) ऑफर केलेली असल्याने मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस, नाशिक यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे प्रस्तावातील अं. क्र. १ ते २६ च्या अटी व शर्ती नुसार त्यांची निविदा स्विकारणेस स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार

डॉक्टर व्यवसायिकाशी बायो मेडिकल वेस्ट उचलणे कामी द्यावयाचे दराबाबत चर्चा करुन अंतिम दर निश्चित करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यासही मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय २० :**

कार्यकारी अभियंता (पापु) प्रस्ताव सादर करीत आहे की, मिसारवाडी या अनाधिकृत वसाहतीमध्ये टॅकरद्वारे पाणी पुरवठा होतो. रविवार दि. २४.३.२००२ रोजी सकाळी एमएच-२०-५४४० टॅंकर हे मिसारवाडी भागात पाणी वितरणाकरीता गेले असता, चालु टॅंकरवर मागील बाजुस २०-२५ मुलांनी पाण्याकरीता चढण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी सतीश म्हस्के या १० वर्ष वयाच्या मुलाचा तोल गेल्याने तो टॅंकरच्या मागच्या चाकाखाली येऊन त्याचा मृत्यु झालेला आहे.

संबंधित मुलाच्या वडीलाने तसेच या प्रभागाचे नगरसेवक श्री. भगवान रगडे यांनी मनपातर्फे मयत मुलाच्या कुटूंबियास आर्थिक मदत मिळण्याकरीता विनंती अर्ज केलेला आहे.

यापुर्वी टॅंकरच्या दुर्घटनेत मृत्यु पावलेल्या मयताच्या कुटूंबियाना महानगरपालिकेने रु. १०,०००/- एवढी आर्थिक मदत केलेली आहे. मनपाकडुन सर्व टॅंकरचा विमा उतरविण्यात येत असल्याने नॅशनल इन्शुयरन्स कंपनीकडुन मयताच्या कुटूंबियास आर्थिक मदत मिळेल. अशा प्रकारे मयत झालेल्या मयताच्या कुटूंबियास आर्थिक मदत देण्याची महानगरपालिकेच्या नियमात तरतुद नाही. त्यामुळे टॅंकर दुर्घटनेमुळे मृत झालेल्या मयताच्या कुटूंबियास सहानुभूती म्हणुन रु. १०,०००/- आर्थिक मदत देणे या निर्णयाकरीता प्रस्ताव स्थायी समितीसमोर चर्चेकरीता तसेच योग्य मार्गदर्शनार्थ व आदेश मिळणे करीता सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** सतिश म्हस्के नावाच्या १० वर्षाच्या मुलाचा महानगरपालिकेच्या मालकीच्या पाण्याच्या टॅंकरखाली येऊन मृत्यु झाला होता. त्यानंतर संबंधित मुलाचे कुटूंबियानी आर्थिक मदतीची मागणी केल्याने संबंधित पाणी पुरवठा विभागाकडुन १०,०००/- रुपये आर्थिक मदत देण्याच्या संदर्भाने प्रस्ताव सादर झालेला आहे. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. या बाबतीत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दि. २४.३.२००२ रोजी एमएच-२०-५४४० या क्रमांकाच्या टॅंकर अपघातामध्ये मिसारवाडी भागातील सतिश म्हस्के या १० वर्षे वयाच्या मुलाचा दुदैवी मृत्यु झाल्याने सहानुभूती म्हणुन मयताच्या कुटूंबियास महानगरपालिकेतर्फे र. रु. १०,०००/- (दहा हजार रुपये मात्र) आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**श्री. प्रशांत देसरडा :** माझ्या वार्डातही पाणी पुरवठा विभागाची लाईन फुटून काही व्यावसायीक/दुकानदार आहेत त्यांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले. नुकसान भरपाई देण्याची मागणी केलेली आहे. अद्याप कार्यवाही केलेली नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** प्रशासकीय मंजुरीसाठी संचिका दाखल केलेली आहे.
**मा. सभापती :** नियमाने कार्यवाही करण्यात यावी.

याबरोबरच "जन गन मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

सभापती
(स्थायी समिती)
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १३.६.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक १३.६.२००२ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त यांचे सह संबंधित अधिकारी व खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. प्रशांत देसरडा
२) श्री. मीर हिदायत अली
३) श्री. किशोर शिंदे
४) श्री. शे. इलियास किरमाणी
५) श्री. औताडे रावसाहेब ममतु
६) श्री. ओक जयवंत केशवराव
७) श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
८) डॉ. आशा उत्तम बिनवडे
९) सौ. ताराबाई जेजुरकर
१०) श्री. सुर्वणा उमेश चंद्रात्रे
११) श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१२) श्री. चंद्रशेखर जैस्वाल
१३) श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** काल महापालिकेतर्फे संभाजी महाराजांचे पुतळयाचे अनावरणाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. या कार्यक्रमासाठी लोकसभेचे अध्यक्ष मा. ना. श्री. मनोहर जोशी आलेले होते. कार्यक्रमाचे नियोजन व्यवस्थीत करण्यात आलेले नाही. शुन्य नियोजन होते. जे अतिथी येणार होते. त्यांना बसण्यासाठी नीट व्यवस्था नव्हती पावसाळ्याचे दिवस असल्याने पाऊस येईल असा विचार समोर ठेवुन पत्रे किंवा शेड टाकुन व्यवस्था झालेली नव्हती. या कार्यक्रमाला सर्व राजकिय पक्षाचे लोक आलेले होते हा कार्यक्रम ठराविक पक्षाचा नव्हता, तसेच लोकसभा अध्यक्ष हे पद देशातील चौथ्या क्रमांकाचे पद आहे. सर्वोच्च पदावरील अतिथी येणार होते. योग्य व्यवस्था न झाल्यामुळे लोकसभेचे सभापती यांनी सुध्दा नाराजी व्यक्त केलेली आहे. कोणत्याही प्रकारची कमतरता या कार्यक्रमाचे वेळी भासणार नाही असे आयुक्तांचे सुध्दा वृत्तपत्रात स्टेटमेंट आलेले आहे. परंतु प्रशासनाने कोणतेच नियोजन नव्हते. म्हणुन जे अधिकारी या कामासाठी नेमलेले होते, त्यांवर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. नंदकुमार फुलारी :** मा. आयुक्तांना सुध्दा बसण्यास खुर्ची नव्हती ही सत्य परिस्थिती आहे. महापालिकेचे पदाधिकाऱ्यांना सुध्दा बसण्यास खुर्च्या नव्हत्या.

**अति. शहर अभि. :** या कार्यक्रमासाठी रात्रीच ९.३० ते १०.०० वाजेच्या दरम्यान पर्यंत मंडप व्यवस्था करण्यात आलेली होती. पत्रे लाऊन व्यवस्था केलेली होती. भारतीय बैठकीचे नियोजन केले होते. सर्व व्यवस्था झाल्यानंतर रात्री ११.३० ते १२.०० वाजेच्या दरम्यान वादळासह पाऊस आला, वादळाची तीव्रता फारच जास्त होती. पत्रे खाली पडले. त्यानंतर बऱ्याच वेळाने वादळ - पाऊस थांबल्यावर पाहणी केली असता सगळी व्यवस्था कोलमडल्या गेल्याचे दिसुन आले. त्यानंतर लगेचच पुन्हा व्यवस्था केली. पेंडॉल वरती ताडपत्र्या बांधल्या व सकाळपर्यंत पर्यंत सगळी व्यवस्था केली. भारतीय बैठकीची संपुर्ण व्यवस्था केली. सकाळी ९.३० ते १० वाजेपर्यंत सर्व काही व्यवस्थित होते. सकाळी १०.०० च्या सुमारास पुन्हा पाऊस सुरु झाला. त्यामुळे व्यासपिठावर पाणी आले. वाऱ्यामुळे ताडपत्रीस झोळ पडल्याने पाणी गळत होते. लगेचच खुर्च्या व पाहुण्यांसाठी महाराजा चेअर इत्यादी व्यवस्था करण्यात आली.

**मा. सभापती :** हे काम कुणाकडे सोपविलेले होते. प्रशासनाने खुलासा करावा.

**अति. शहर अभि**. या कामासाठी अभियंता संवर्गातील कर्मचारी होते. कार्यक्रमाचे संचालन कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आलेली होती.

**श्री. नंदकुमार फुलारी :** रात्री दोन वाजेपर्यंत मी तेथेच होतो. पाऊस बंद झाल्यानंतर पत्र्याचे शेड टाकावयास पाहिजे होते. सकाळी सुध्दा वेळ होता. ११ वाजता कार्यक्रम सुरु झालेला होता.

**श्री. जयवंत ओक :** स्टेजच्या वर पत्र्याचे शेड का टाकलेले नव्हते. प्रमुख अतिथींना बोलविले तशी व्यवस्था ठेवावयास पाहिजे होती. प्रशासनाने काहीच नियोजन त्या ठिकाणी नव्हते. आयुक्तांनी वृत्तपत्राद्वारे स्टेटमेंट दिले व्यवस्था राहिल. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. आजच्या बैठकीत आयुक्त का आलेले नाही. त्यांना प्रश्न विचारला असता. आपण स्वत: तेथे होतो. अधिकारी /कर्मचाऱ्यांवर जबाबदारी टाकली ती त्यांनी पार पाडावयास पाहिजे होती. ही भारतीय बैठक होती त्याप्रमाणे व्यवस्था केलेली नव्हती. जे गायन झाले ते सुध्दा पावसामुळे उभे राहुन करावे लागले अशी परिस्थिती झालेली होती. खेदजनक बाब आहे. संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांवर काय कार्यवाही करणार आहात.

**अति. शहर अभि. :** ताडपत्री टाकलेली होती. पत्रे टाकलेले होते. रात्री वादळामुळे ते पडले तरी सुध्दा पुन्हा व्यवस्थित करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केलेला होता.

**श्री. नंदकुमार फुलारी :** ताडपत्रीला छिद्र होती. त्यामुळे पाणी खाली पडत होते. पत्र्याचे शेड टाकले असते तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती. यात महापालिकेबरोबर सर्व पदाधिकाऱ्यांचा सुध्दा अपमान झालेला आहे. पाऊस बंद झाल्यानंतर वादळ नव्हते. त्यानंतर चांगल्या प्रकारे का केलेली नाही.

**अति. शहर अभि. :** सर्व व्यवस्था नियोजनाप्रमाणे व्यवस्थित केलेली होती. पत्रे मागवलेले होते. सर्व काही व्यवस्थित झाले होते. परंतु रात्रीच्या वादळामुळे हा प्रकार घडलेला आहे हे नैसर्गिक बाब उदभवल्यामुळे.

**श्री. जयवंत ओक :** अधिकारी दिशाभूल करीत आहेत. कोणत्याही प्रकारचे नियोजन नव्हते. अधिकाऱ्यांना बसण्यास खुर्च्या नव्हत्या. पदाधिकारी उभे होते. अतिथी ११ वाजता आले त्या अगोदर का ताडपत्र्या आणुन व्यवस्था केली नाही ? पाच तासांचा वेळ होता. शून्य नियोजन होते. जी जबाबदारी

सोपविलेली होती ती पार पाडण्यात अलेली नाही. संबंधित जे कुणी दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

**श्री. मीर हिदायत अली :** स. सदस्य श्री.ओक यांनी केलेली सुचना संदर्भात बोलु इच्छितो की, कार्यक्रम सार्वजनिक होता. व्यवस्था चांगली असावयास पाहिजे. महानगरपालिकेची पध्दत आहे. उद्‌घाटन कार्यक्रमाचा खर्च महानगरपालिका देत नाही. जास्त खर्च केल्यास मंजुरी घेण्यास टाळाटाळ होते. त्यासाठी महानगरपालिकेनेच हा स्टेज खरेदी करावा. नेहमीच काम पडते. विविध कार्यक्रम होतात. भाडयाने आणल्यास दोन ते तीन हजार रुपये मोजावे लागतात. त्याचा खर्च देण्याची तात्काळ कार्यवाही होत नाही. जास्तीत जास्त २ ते २.५० हजार खर्च होतात. माझ्या वार्डात मी कार्यक्रम घेतला. मी स्वत: खर्च केलेला आहे. महानगरपालिकेने त्याचा खर्च दिलेला नाही.

**मुख्यलेखा अधिकारी :** जो खर्च येणार आहे त्याची अगोदर मंजुरी घ्यावयास पाहिजे. नसता देय होत नाही. दोन हजार पासुन ते १२ हजार पर्यंत स्टेजच्या खर्चापोटी या अगोदर दिलेले आहेत.

**श्री. जयवंत ओक :** कार्यक्रम महानगरपालिकेने ठेवलेला होता. नियोजन असावयास पाहिजे होते. लोकसभेचे सभापती यांना अतिथी म्हणुन बोलविण्यात येते व व्यवस्था काहीच नाही. ॲडव्हॉन्स मंजुरीसाठी संचिका पाठविलेली होती का ?

**अति. शहर अभियंता :** अग्रीम रक्कमेसाठी संचिका पाठविण्यात आलेली होती. ६० हजार मागितले. परंतु अगोदर खर्च करावे असे सुचविलेले होते. त्यामुळे ॲडव्हॉन्स मिळालेले नाही.

**श्री. जयवंत ओक :** महानगरपालिकेचा कार्यक्रम होता. अगोदर खर्च कोण करणार असा प्रश्न निर्माण होतो. विविध वार्डातील कार्यक्रम होतात. यापुर्वीही ॲडव्हान्स दिलेले नाही का ? दिलेले नसतील तर योग्य नाही.

**मुख्यलेखा अधिकारी :** ४० हजार अग्रीम रक्कम मागितलेली होती. स्टेजचा खर्च १० ते १५ हजार रुपये होणार होता. ज्यांचा स्टेज असतो त्यांना कॅश रक्कम अदा करावी लागते. ५००/- रुपयांचे वर कॅश पेमेंट करता येत नाही. त्यामूळे अग्रीम अनुज्ञेय होणार नाही.

**श्री. जयवंत ओक :** नुसता कार्यक्रम ठेवला. परंतु खर्चाच्या बाबतीत व इतर बाबतीत शुन्य नियोजन दिसुन आले. जे अधिकारी जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करावी. कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात यावा नसता तोपर्यन्त आम्ही आपल्या डायससमोर बसत आहोत. (याचवेळी स. सदस्य श्री. ओक तसेच श्री. फुलारी हे मा. सभापती यांचे डायससमोर खाली बसतात. अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची मागणी करतात.) स. सदस्य तसेच उपआयुक्त यांना सुध्दा बसण्यास खुर्च्या नव्हत्या. ज्याचेकडे जबाबदारी सोपविलेली होती. त्यांचेवर कार्यवाही झालीच पाहिजे. यात महानगरपालिकेचे नांव बदनाम झालेले आहे. त्याच बरोबर पदाधिकाऱ्यांचे सुध्दा झाले. सर्वच पक्षाचे लोक आलेले होते.

**मा. सभापती :** आपल्या सुचनेची नोंद घेतलेली आहे. आपण जागेवर जाऊन बोलावे. योग्य तो निर्णय घेतला जाईल. (याचवेळी स. सदस्य श्री. ओक तसेच श्री. फुलारी हे आपपाल्या जागेवर जाऊन बसतात.)

**मा. सभापती :** कालचा जो प्रकार घडला तो अत्यंत निंदनीय आहे. लोकसभेचे अध्यक्ष यांना कार्यक्रमासाठी बोलविण्यात आले परंतु त्या ठिकाणी महानगर पालिकेतर्फे नियोजन दिसुन आलेले नाही. आर्थिक बाबीचा जो प्रश्न उपस्थित झाला त्या अनुषंगाने प्रशासनाला काही सुचना करतो की, कोणताही कार्यक्रम ठेवल्यावर तो नियोजनबध्द कसा करता येईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. जो खर्च लागतो तो नियोजनानुसारच खर्च करावयास पाहिजे. लोकसभेचे अध्यक्ष जे प्रमुख अतिथी होते त्यांनी सुध्दा या बाबतीत त्यांचे भाषणात नाराजी व्यक्त केलेली आहे. म्हणुन कोणताही कार्यक्रम आयोजित केल्यानंतर खर्चाचे नियोजन कसे करता येईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तात्काळ मंजुरी दिली पाहिजे या कार्यक्रमाची व्यवस्थीतपणे जबाबदारी पार पाडलेली नाही. जे कुणी दोषी असतील त्या बाबतीत प्रशासनाचे अधिकारी श्री. सी. एस. सोनी यांनी चौकशी करुन तसा अहवाल मा. आयुक्तांकडे सादर करावा व काय कार्यवाही केली त्याचा अहवाल सादर करण्यात यावा. आता विषय क्र. २१ वर इतिवृत्त कायम करण्याबाबत चर्चा करावी.

**विषय क्र. २१ :**

दिनांक १३.३.२००२ (अर्थसंकल्पीय सभा) व दि. १७.५.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. प्रशांत देसरडा :** दि. १७.५.२००२ च्या इतिवृत्तातील पान क्र. २७ वर मी चर्चा केलेली होती की, माझ्या वार्डात महापालिकेची पाण्याची लाईन फुटून काही व्यावसायी/दुकानदार यांचे मोठया प्रमाणांत नुकसान झालेले आहे. नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे. त्यावर संबंधित अधिकारी यांनी संचिका प्रशासकीय मंजुरीसाठी सादर केलेली आहे. असे उत्तर दिलेले आहे व नियमाने कार्यवाही करावी असे रुलींग दिलेले आहे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे पंचनामा काय करावा असा प्रश्न संबंधित विभागाला आहे. अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. अधिकाऱ्यांचा खुलासा घ्यावा. हे लोक १००% कर भरणारे आहेत. जे मोर्चा, अंदोलने करतात अशांनाच आर्थिक मदत करण्याची कार्यवाही होणार काय, आम्ही लोकशाही मार्गाने चालत आहोत. तसे आम्हालाही करता येते. तात्काळ कार्यवाही व्हावी.

**श्री. जयवंत ओक :** या शहरामध्ये महानगरपालिकेची पाईपलाईन फुटली त्यामुळे कुणाचे काही नुकसान झाले असेल किंवा होत असेल तर आर्थिक मदत देण्याबाबत एवढा वेळ लागण्याची आवश्यकत नाही. काय टिप्पणी करायची याचा विचार नको. तात्काळ मदत व्हावयास पाहिजे. पाणी आल्यास नुकसान भरपाई देणे बंधनकारक आहे.

**मा. सभापती :** आज संबंधित अधिकारी सभागृहात नाही. शहराला पाणी व्यवस्थेच्या बाबतीत काम करण्यासाठी गेलेले आहेत. आतापर्यंत काय कार्यवाही केली माहिती घेता येईल.

**श्री. प्रशांत देसरडा :** काहीही कार्यवाही झालेली नाही. पुढील बैठकीपर्यंत कार्यवाही केली नाही तर वार्डातील जनता पाणी पट्टी तसेच इतर कर भरणार नाही याची सुध्दा प्रशासनाने नोंद घ्यावी. या मध्ये एका महिलेचे १० संगणकाचे नुकसान झालेले आहे. ती महिला सध्या बेकार झालेली असुन आर्थिक अडचणीत आहे.

**श्री. जयवंत ओक :** एखादा कर्मचारी पोलवरुन पडला किंवा महानगरपालिकेची सेवा करत असतांना इतर काही अपघात वगैरे घटना घडल्यास अशा कर्मचाऱ्यांना तात्काळ मदत दिली पाहिजे.

**मा. सभापती :** सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यास मी सहमत आहे. परंतु आज संबंधित अधिकारी नाहीत. माहिती घ्यावी लागेल.

**श्री. मीर हिदायत अली :** मनपाचे एक दैनिक वेतनावरील लाईनमन कर्मचारी पोलवरुन पडले होते त्यांचा एक पाय मोडलेला होता ते दैनिक वेतनावर होते म्हणुन मदत देऊ शकलो नाही. परंतु असे प्रकार घडल्यास आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेतला पाहिजे. कोणीही अधिकारी संबंधित कर्मचाऱ्यास बघण्यास गेलेले नाही. सर्व काही मनमानी पणाने या महापालिकेत चालत आहे. आयुक्तांनी बदल्या केल्या तरी कर्मचारी त्या-त्या विभागात रुजु होत नाही. कामे व्यवस्थित करीत नाही. कर्मचाऱ्यांना कुणाचीही भिती राहीली नाही. असेच चालत राहिले तर महापालिका दिवाळखोरीत निघेल.

**मा. सभापती :** ज्यांचे नुकसान झाले त्यांना आर्थिक मदत दिलीच पाहिजे. या मताचा मी आहे. प्रशासनाने याबाबतीत दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करावी.

**डॉ. आशा बिनवडे :** दि. १७.५.०२ च्या इतिवृत्तातील पान क्र. २४ वर शहरात आतापर्यंत फक्त १००० सभासद म्हणुन संमती दर्शविलेली आहे असे वाक्य मी उच्चारलेच नाही. चार सभासदांनी १००० बेड्सची संमती दर्शविलेले आहे असे ते वाक्य आहे. दुरुस्ती करण्यात यावी तसेच पान क्र. २५ वर घराघरातुन कचरा जमा होणार आहे. बायो मेडीकल वेस्टचे सॉलीड वेस्टमध्ये वेस्टमध्ये मिक्स करणार आहात त्यासाठी काय कार्यवाही करणार, अशी सुचना मी मांडलेली होती. दुरुस्ती करावी. तसेच इतिवृत्तातील पान क्र. २६१२ जनतेने लोकप्रतिनिधी चर्चा करण्यासाठी पाठविले आहेत. मला माझे मत मांडण्याचा पुर्ण अधिकार आहे. माझे मत मला मांडु द्यावे. लोकप्रतिनिधी म्हणुन माझ्या भावना मला मांडता याव्या नसता मी निषेध करते असे मी वक्तव्य केलेले होते ते आलेले नाही. विशेष नोंद करावी व तशी दुरूस्ती करण्यात यावी. इतिवृत्तामध्ये आलेले नाही.

**नगरसचिव :** इतिवृत्तामध्ये सर्वच संभाषणाच्या नोंदी घेण्याचा प्रयत्न करण्यात येतो. लघुटंकलेखकाडुन जे इतिवृत्त तयार होऊन येते ते व मीही सभागृहात जी टिप्पणी घेतो त्यावरुन जेवढे काही शक्य आहे. तेवढे प्रयत्न करण्यात येते. तसेच या सभागृहात ध्वनी मुद्रणाची व्यवस्था नसल्यामुळे सर्वच सदस्यांचे संभाषण रेकॉर्डींग होत नाही. त्यामुळे इतिवृत्ताची पुर्नतपासणी करणेस अडचण निर्माण होते. लघुटंकलेखकाने दिल्यानंतरही त्याची तपासणी करुन जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे इतिवृत्त लिहीण्याचा प्रयत्न केलेला असतो व यापुढे करीत राहणार आहे.

**डॉ. बिनवडे आशा :** माईकची व्यवस्था तात्काळ करण्यात यावी व सर्व सभांचे कामकाजाचे ध्वनी मुद्रण यापुढे झाले पाहिजे याची दक्षता घेण्यात यावी.

**मा. सभापती :** सन्माननीय सदस्यांनी ज्या दुरुस्त्या सुचविल्या त्यानुसार दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. प्रशांत देसरडा :** बजेट मंजुर करतांना स्थायी समितीने ५ महत्त्वाचे प्रस्ताव सुचविलेले होते ते ठळक वैशिष्टयामध्ये आलेले आहेत. त्यात ज्यांना कर लागलेला नाही अशांचा खाजगी अभिकर्त्यामार्फत सर्व्हे करणे तसेच अनधिकृत मालमत्तेचा सर्व्हे करुन अधिकृत करण्याबाबत निर्णय घेतलेला आहे तसेच एका विभागाची (झोन) विद्युत देखभाल व दुरुस्ती खाजगी तत्वावर करण्याचा निर्णय घेतलेला होता. तत्वावर करण्याचा निर्णय घेतलेला होता. तसेच वार्डाची साफसफाई खाजगी तत्वावर करण्याचा निर्णय घेतलेला होता. आतापर्यंत काय काय कार्यवाही केलेली आहे.

**मा. सभापती :** आज इतिवृत्त कायम होत आहे. दुरुस्ती सुचवावी. यानंतर प्रशासन कार्यवाही करेल.

**श्री. प्रशांत देसरडा :** अर्थ संकल्पात मंजुर केलेली इतर काही कामे इतिवृत्त कायम न होता कशी करण्यात आली काही कामाचे उद्‌घाटन करण्यात आले ते कसे झाले, याची माहिती द्यावी. जे ठळक वैशिष्टयामध्ये निर्णय घेतलेले होते त्यावर का अंमलबजावणी केलेली नाही. अंमलबजावणी केली असती तर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्यास मदत झाली असती. सर्व्हे करण्याच्या दृष्टीने एजन्सी फिक्स करण्यासाठी टेंडर काढावयास पाहिजे होते.

**मा. उपआयुक्त (प्र.) :** अर्थ संकल्पाचे पुस्तक तयार करण्याचे काम चालु आहे. एक ते दोन दिवसात सर्व सदस्यांना व सर्व विभागांना वाटप करण्यात येईल. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने जे निर्णय घेतले, ज्या आवश्यक बाबी आहत त्या संबंधीची कार्यवाही ज्या-त्या विभागामार्फत करण्यात येईल.

**मुख्यलेखा अधिकारी :** अर्थ संकल्प सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. स्थायी समितीने ३१ मार्च पुर्वी बजेट मंजुर करुन सर्वसाधारण सभेपुढे ठेवायचे असते. स्थायी समितीने मंजुरी दिलेल्या बजेटला सर्वसाधारण सभेत मंजुरी झालेली आहे. ३१ मार्च पर्यंन्त सर्वसाधारण सभेने मंजुर केले नाही तर स्थायी समितीने मंजुर केलेलेच अंतीम असते सर्वसाधारण सभेने मंजुर करेपर्यंत अंतीम असते.

**श्री. प्रशांत देसरडा :** ४-५ निर्णय घेतले होते. शहरात २५% च मालमत्ता कर व नळपट्टी आकारलेली नसावी. यासाठी अभिकर्त्यामार्फत मालमत्तांचा सर्वे करण्याबाबत निर्णय घेतलेला होता. टेंडर काढुन पुढील कार्यवाही करावयास पाहिजे होती. अद्याप टेंडर काढलेले नाही. इतिवृत्त आज कायम होत असेल तरी पुढील प्रोसेस सुरु करावयास पाहिजे होती.

**मुख्य लेखाधिकारी :** कराधान नियम २१ नुसार दर चार वर्षानी मालमत्तांचे रिव्हीजन करण्यात आले पाहिजे. ही कार्यवाही कर आकारणी उपआयुक्त (म.) विभागातर्फे होऊ शकते. त्या विभागाकडुनच कार्यवाही अपेक्षित आहे.

**श्री. जयवंत ओक :** बजेट मंजुर झाल्यानुसार इतर कामे होत आहेत. परंतु निर्णय घेतल्यानुसार मालमत्तेचा सर्व्हेचे काम का हाती घेण्यात येत नाही. सर्व मालमत्तांचा सर्व्हे करुन संगणकीकरण करण्यात येऊन घरांना क्रमांक टाकण्यात यावेत असा निर्णय घेतलेला होता. जेणे करुन अनाधिकृत नळ कुणी घेतलेला असेल ते समजेल तसेच ज्यांनी मालमत्ता कर भरलेला नाही ते सुध्दा समोर येईल. यामुळे महापालिकेच्या वसुलीत भर पडणार आहे व

उत्पन्न वाढणार आहे. अनाधिकृत वस्त्या किती तसेच तळमजल्यास कर लागलेला असतो. तर वरील दोन मजल्यास कर लागलेला नाही अशी स्थिती आहे. उत्पन्नात घट होत आहे.

**श्री. प्रशांत देसरडा :** दर मंगळवारी लोक अदालत सुरु करण्याबाबतचा निर्णय झालेला होता. या माध्यमातुन जनतेच्या तक्रारी तसेच जी प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत ती निकाली काढणार होतो. आतापर्यंत किती प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. चांगला निर्णय घेतलेला होता. परंतु माझ्या माहितीप्रमाणे प्रशासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नाही. ५०० प्रकरण प्रलंबित आहेत. यातुन मनपाचे २ ते अडीच कोटी थकीत आहे. ही प्रकरणे निकाली निघाल्यास १ ते दीड महिन्यात वसुली करता येईल.

**उपआयुक्त (प्र.) :** जे निर्णय स्थायी समितीने घेतले ते सर्व सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आलेले होते. त्यात काय बदल झाला हे इतिवृत्तांत तयार झाल्यानंतर तसेच बजेट बुक मध्ये आल्यानंतरच कळेल. त्याशिवाय पुढील अंमलबजावणी करणे बरोबर होणार नाही.

**मा. सभापती :** आताच स. सदस्य श्री. प्रशांत देसरडा यांनी ठळक वैशिष्टयाबाबत जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्या संदर्भात प्रशासनाने आतापर्यंत का अंमलबजावणी केलेली नाही. आता प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी व १५ दिवसाच्या आत काय कार्यवाही केली याची माहिती कळवावी.

**श्री. जयवंत ओक :** दि. १७.५.२००२ च्या इतिवृत्तातील पान क्र. १६ वर बीफ खन्नी पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता. माहिती देणार होते. माहिती आलेली आहे का ?

**संचालक (प्राणी संग्रहालय) :** बीफ खन्नी पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव मागील बैठकीत स्थगित करण्यात आलेला होता. पुर्वी जो प्रस्ताव स्थायी समितीकडे केलेला होता तो पुरवठाधारक पुरवठा करीत आहे. ९.९० रूपये किलोने पुरवठा करीत होते. त्यानीं ३१ मे २००२ रोजी पत्र देऊन पुरवठा बंद करणार असे पत्र दिले. त्या नंतर पुन्हा प्रत्यक्ष येऊन सांगितले की पुरवठा बंद करणार नाही. लेखी पत्र दिल्यानंतर मुख्य लेखाधिकारी यांचेशी संपर्क साधला असता त्वरीत दुसऱ्या क्रमांकाचे जे पुरवठा धारक आहेत त्यांना विचारणा करुन २४ तासाच्या आत माहिती घेण्यास कळविण्यात यावे. त्यानुसार दुसऱ्या क्रमांकाचे पुरवठाधारकास पत्र देऊन माहिती मागविली. अद्याप संमती प्राप्त झालेली नाही. परंतु ज्यांना पुरवठा बंद करण्याचे पत्र दिले होते त्यांनी पुन्हा येऊन प्रत्यक्ष सांगितले की, पुरवठा बंद करणार नाही. आता सध्या पुरवठा चालु आहे.

**मा. सभापती :** पुर्वी जे पुरवठा करीत होते ते करण्यास तयार नाही त्यांनी तसे पत्र दिले. पुन्हा पुरवठा करतो म्हणुन सांगितले असे असतांना दुसऱ्या क्रमांकाचे पुरवठाधारक यांना पत्र देण्याची का गरज पडली ?

**संचालक (प्रा. स.) :** पुर्वीचे पुरवठा धारक यांनी लेखी पत्र दिल्यानंतर ज्या दराने पुरवठा होत त्याच दरात पुरवठा करण्यास तयार आहात का असे दुसऱ्या क्रमांकाचे पुरवठाधारक यांना पत्र दिलेले होते.

**मा.सभापती :** जे पुरवठा करीत होते त्यांनी लेखी पत्र काय दिले ते सभागृहात वाचुन दाखवावे.

**संचालक (प्रा. सं. ) :** प्रती मा. आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद (मार्फत-संचालक, प्राणी संग्रहालय, महानगरपालिका, औरंगाबाद)

विषय : प्राणी संग्रहालयातील बीफ खन्नी यांचा पुरवठा बंद करणे व अनामत र. रु. ५०,०००/- परत मिळणे बाबत.

महोदय,

वरील विषयी विनंती की, प्राणी संग्रहालयाकरीता बीफ (खन्नी) पुरवठा करण्याबाबत मी दि. ८.५.२००२ रोजी सादर केलेल्या निविदा आपण आपले संदर्भीय कार्यालयीन पत्रकान्वये मंजुर केली होती. निविदेत दिलेल्या दर मी रु. ९.९० पैसे प्रती किलो या प्रमाणे मी बीफ (खन्नी) चा दि. १.४.०२ पासुन दररोज नियमित पुरवठा करीत आहे. या कामाकरीता मी अनामत र. रु. ५०,०००/- कार्यालयात जमाही केलेली आहे.

मी दि. २७.५.२००२ रोजी आपल्या कार्यालयात अर्ज दिला होता की, बीफ (खन्नी) चा दर प्रती किलो २०/- रु. करण्यात यावा असे कळविले होते. या प्रकरणी मी आपणांस विनंती करतो की, मी वयोवृध्द असल्यामुळे माझी मनस्थिती बरोबर राहात नाही. निविदा सादर करतेवेळी माझी मनस्थिती बरोबर नसल्यामुळे निविदा फारच कमी दराने म्हणजे रु. २३/- प्री किलो ऐवजी रु. ९.९० सादर करण्यात आले व या दराने मी दि. १.४.०२ पासून नियमीत बीफ पुरवठा करीत आहे. त्यामुळे मला आजपावेतो अंदाजे १ लाख २५ हजार इतक्या रकमेचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे माझी आर्थिक परिस्थिती फारच बिकट झालेली आहे व माझ्या कुटूंबावर उपासमारीची पाळी आलेली आहे. मी आपल्या नजरेस आणु इच्छितो की, गेल्यावर्षी आपण रु. २३/- प्रति किलो बीफ पुरवठयाची निविदा मंजुर केली होती.

या संदर्भात मनपाकडुन दि. २९.५.२००२ रोजी माझ्या पत्राचे उत्तर दिले व नमुद केले. आपण करत असलेल्या बीफच्या दरात कोणतेही वाढ करण्यात येणार नाही व आपण देत असलेल्या रु. ९.९० पै. प्र. किलो या दरानेच बीफचा पुरवठा करण्यात यावा. मला कमी दरात बीफ पुरवठा करणे परवडत नसल्यामुळे मी दि. १.६.२००२ पासुन बीफ पुरवठा बंद करीत आहे. तरी मला माझी अनामत रक्कम रुपये ५०,०००/-परत करण्यात यावी. माझी मनस्थिती बरोबर राहात नाही. तसेच माझी प्रकृती खराब राहते. त्यामुळे मला बीफचा पुरवठा करता येत नाही. तसेच मला ह्दयाचा त्रास होत आहे व माझे अकरा किलो वजन कमी झाले आहे. माझी आर्थिक परिस्थिती चांगली नसुन मला रुपये ९.९० पै. मध्ये बीफ पुरवठा करणे परवडत नाही. त्यामुळे मी दिनांक १.६.२००२ पासुन बीफ पुरवठा बंद करत आहे. तरी माझी अनामत रक्कम रु. ५०,०००/- परत करण्यात यावे. हि विनंती.

अर्जदार
स्वाक्षरीत/-
(अब्दुल रहीम शेख छोटे)

दुसऱ्या क्रमांकाचे पुरवठा धारकांना जे पत्र दिले त्या सबंधिचे उत्तर संबंधितांकडुन प्राप्त झालेले नाही. ज्यांनी पुरवठा बंद करण्याचे पत्र दिले

होते त्यांनी परत १ तारखेला येऊन पुरवठा करणार आहे माझ्या अर्जाचा विचार करु नये असे सांगितले.

**श्री. जयवंत ओक :** मार्केट दर काय आहेत. चांगल्या प्रतीचे बीफ देईल का ? नसता जनावरे दगावतील ही जबाबदारी महानगरपालिकेची आहे. लाखो रुपये खर्चुन प्राणी आणलेले आहेत. ज्यांनी पत्र दिले त्यांनी त्याची जबाबदारी मनपावर टाकली. पुन्हा पुरवठा करतो म्हणुन सांगितले. आता चांगले बीफ दिले नाही तर जबाबदारी कुणाची असा प्रश्न आहे. जी कारणे दाखविली ती बरोबर वाटत नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** या अगोदरच्या बैठकीतच या बाबतीत शंका आलेली होती. आता पत्र दिले. बंद करणार, परवडत नाही. पुन्हा पुरवठा करणार. आता चांगल्या प्रतीचे देणार का? कोण जबाबदार राहणार आहे. जप्त केलेले मटन, बीफ, खन्नी कोठे जाते. पुरवठयात येते असे सांगितले होते. पंचनामाचा रिर्पोट दिला जातो का ?

**संचालक (प्रा. सं.) :** जप्त केलेले मांस नारेगांव येथील ट्रेचिंग ग्राऊंडमध्ये पुरण्यात येते. त्यावेळी पंचनामा होतो. पंचनाम्याचा रिर्पोट मा. आयुक्तांकडे सादर केला जातो. महिन्यामध्ये कोणत्या केसेसमध्ये किती मांस होते याचा रिपोर्ट दिला जातो.

**श्री. कैसरखान :** सभागृहात रिपोर्ट यावयास पाहिजे. सभापतींना त्याची प्रत यावयास पाहिजे. सर्व गोलमोल खुलासा करण्यात येत आहे. ही जबाबदारी अधिकाऱ्यांची असुन सभागृहाच्या निर्दशनास आणुन देणेचे काम अधिकाऱ्यांचे आहे.

**मा. सभापती :** जकातीची रोजची वसुली किती होते याबाबत जशी पदाधिकाऱ्यांना माहिती दिली जाते त्याप्रमाणेच दर महिन्याला किती जप्त केलेले मांस पुरण्यात येते, किती जप्त केले जाते याची माहिती पदाधिकाऱ्यांना द्यावयास पाहिजे. जो पुरवठाधारक होते त्यांनी लेखी स्वरुपात कळविले पुन्हा पुरवठा करतो म्हणुन संमती दिली व दुसऱ्या क्रमांकाचे पुरवठा धारकांना पत्र दिले त्याचा खुलासा नाही. या संदर्भात योग्य खुलासा मुख्य लेखाधिकारी यांनी करावा.

**मुख्यलेखा अधिकारी :** सदरील संचिका संबंधित अधिकारी यांनी लेखा विभागात सादर केलेली नाही. तोंडी स्वरुपात माहिती विचारलेली होती. त्यानुसार जे दुसऱ्या क्रमांकाचे आहे. त्यांना वरील दराप्रमाणे देण्यास तयार आहात का अशी विचारणा करावयास सांगितले होते. जे पुरवठा करीत होते त्यांनी नकार दिला त्याचे डिपॉझिट मधुन जो कुणी दुसऱ्या, तिसऱ्या क्रमांकाचा पुरवठाधारक पुरवठा करेल जो काही फरक येईल तो त्यांचे नावे पडुन डिपॉझिट मधुन वसुल केले जाईल. सदरील संचिका माझ्याकडे आल्यानंतर माझ्या अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. बँक गॅरंटी घेतलेली आहेच. त्या व्यतिरिक्त तशी नोटीस त्या पुरवठा धारकांना द्यावी. लागेल. त्यांनी टेंडर भरुन दिलेले आहे. करारनामा केलेला आहे.

**श्री. जयवंत ओक :** स्थायी समितीची मंजुरी न घेता दुसऱ्या क्रमांकाच्या पुरवठा धारकास पुरवठा करण्याबाबत पत्र कसे दिले. ज्याच्याशी करारनामा केला त्या बाबतीत स्थायी समितीची मान्यता घेतली होती का ?

**मा. सभापती :** स्थायी समितीची मान्यता घेण्याची आवश्यकता का पडली नाही. करारनामा मान्यतेशिवाय का करण्यात आलेला आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** सदरील निविदा ही मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आलेली होती. दरम्यानच्या काळात ३१ मार्च २००० ला जुने टेंडर संपल्यानंतर मागील बीफ (खन्नीचा) दर हा २३.०० रु दर होता. टेंडर ९.९० रु. किलोचे भरुन आले. मा. आयुक्तांनी त्याचे १० लक्षच्या अधिकारात जेवढा वेळ लागेल तेवढया कालावधीच्या खर्चाचे मा. आयुक्तांना कलम ६७ (३) नुसार जे विशेष अधिकार आहे व प्राण्यांची उपासमार होऊ नये त्यामुळे मा. आयुक्तांनी मा. स्थायी समितीची मान्यता होईपर्यन्त खर्चास मान्यता दिलेली आहे. त्यानंतर रेग्युलर स्थायी समितीच्या सभा सुरु झाल्या. त्यात हा विषय मागच्या बैठकीत मांडण्यात आलेला होता. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. आर्थिक बाबीचा प्रश्न येतो. स्थायी समिती मान्यता देईल यास अधिन राहुन मा. आयुक्तांनी तातडीची बाबत म्हणुन मान्यता दिलेली आहे.

**संचालक (प्रा. सं.) :** मार्चच्या बैठकीत या संबंधिची चर्चा झालेली होती. २३ रुपये किलो हे मागील दर होते. नवीन दर ९.९० रु. ने पुरवठा करणार. १३ रुपयांचा फरक येतो. व आयुक्तांची मंजुरी आल्यानंतर ही बाब सभागृहाच्या निर्दशनास आणुन दिलेली होती. यात महापालिकेचा फायदा आहे व मंजुरी मिळेल. या अधिन राहुन मंजुरी दिलेली आहे. २ ते ३ महिन्याच्या कालावधीसाठी जो पर्यंन्त ठराव पास होत नाही तो पर्यंन्त खरेदी करण्यास मंजुरी आहे. आयुक्तांनी त्यांचे अधिकारात मान्यता दिलेली आहे. त्यावेळी पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करावा असा निर्णय झाला होता व मागील बैठकीत तसा प्रस्ताव सादर केला व तो स्थगित ठेवलेला होता.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** मा. आयुक्तांची मंजुरी घेतली जाते व नंतर नॉमिनल सभागृहाच्या मंजुरीसाठी ठेवण्यात येते हे धोरण बरोबर नाही.

**श्री. जयवंत ओक :** ऐनवेळी प्रस्ताव सादर आलेला होता तो मंजुर करण्यात आलेला नाही. फक्त या बाबातीत चर्चा झालेली होती.

**मा. सभापती :** जे पुरवठा करीत होते त्यांनी पत्र देवुन नकार दिला. पुन्हा संमती दिली चांगल्या प्रतीचे बीफ खन्नी देईल याची गॅरंटी कोण घेणार आहे. मुख्य लेखा परिक्षक यांनी मत मांडावे.

**मुख्य लेखा परिक्षक :** मी वस्ती पाहिलेली नाही. चर्चा झाली. निविदा फेब्रवारी मध्ये काढण्यात आली. १ एप्रिल पासुन दर लागु होणार मा. आयुक्तांनी निविदा शिफारस करुन स्थायी समिती समोर पाठविली. ती मान्य करणे न करणे आपला अधिकार आहे. यात महानगरपालिकेचे हित आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम ७३ प्रमाणे स्थायी समितीच्या कार्यक्रम पत्रिकेवर विषय आल्यानंतर १५ दिवसांत निर्णय घ्यावा. अन्यथा संविदा मान्य झाली असे समजण्यात येईल. अशी तरतुद आहे.

**श्री. जयवंत ओक :** रुपये ९.९० प्रमाणे पुरवठा करणार नाही. म्हणुन लेखी पत्र दिले. पुन्हा संमती दिली. आता चांगल्या प्रतीचे बीफ देणार का ? हे पाहणे गरजेचे आहे.

**मुख्य लेखापरिक्षक :** त्यांनी टेंडर भरलेले आहे. करारनामा केलेला आहे. ९.९० रु. ने पुरवठा करणे बंधनकारक आहे. नसता संबंधितावर कायदेशिर कार्यवाही करता येईल व पुढील कार्यवाही प्रशासन करेल.

**श्री. जयवंत ओक :** रुपये २३ चे रुपये ९.९० प्रमाणे पुरवठा करण्यास संबंधित पुरवठाधारक कसा तयार होतो. याबाबतीत मा. आयुक्तांनी सुध्दा त्यांच्या संभाषणात मनोगत व्यक्त केले होते. कमी दराचे व निकृष्ट दर्जाचे बिफ खन्नी घेऊन जनावरे मृत्युमुखी पडु नये ही आमची कळकळीची मागणी आहे. नसता महानगरपालिकेचे नांव बदनाम होईल. लाखो रुपये खर्च झालेले आहेत.

**मा. सभापती :** या संदर्भात निकृष्ट मांस खरेदी करुन जनावराचे प्राण जाऊ नये ही भावना समोर ठेवुन चांगल्या प्रतीचे बीफ खरेदी करण्यात यावे असे मत स. सदस्यांनी मांडले. संदर्भात मा. आयुक्त, पदाधिकारी तसेच मुख्य लेखाअधिकारी यांचे समवेत बैठक घेऊन वाटाघाटी करुन लवकरच निर्णय घेता येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** दि. १३.३.२००२ च्या इतिवृत्तातील पान क्र. २१ वर शालेय विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आसन पट्टयांची मागणी केल्यानुसार मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा केलेला होता. आसनपट्टया का देण्यात आलेल्या नाही. आता शाळा सुरु झालेल्या असुन माझ्या वार्डात दोन मनपाच्या शाळा आहेत. एकही आसन पट्टी शाळेत नाही. १ली ते ४ थी पर्यंतच्या लहान मुलांना खाली फरशीवर बसावे लागते.

**मुख्य लेखाधिकारी :** हर्सुल कारागृहात आसनपट्टयांची मागणी केलेली होती. हा विभाग शासकीय आहे. जो सॅम्पल दाखविला होता त्याप्रमाणे पुरवठा केलेला नव्हता. म्हणुन जे सॅम्पल त्यानुसारच पुरवठा व्हावयास पाहिजे असे पत्राने कळविलेले आहे. आतापर्यंत ३ पत्र दिलेले आहे की परत घ्यावे. खुल्या बाजारातुन खरेदी करण्याची कार्यवाही पुढील आठवडयात करण्यात येईल.

**श्री. जयवंत ओक :** शालेय मुलानां जे गणवेश दिले जातात ते फार उशिरा दिले जातात. सोमवारपासुन शाळा सुरु झालेल्या आहेत. आतापासुन कार्यवाही करावी म्हणजे वेळेवर गणवेश दिले जातील. प्रत्येक वर्षी उशिरा गणवेश वाटप होत आलेले आहे. या वर्षी उशीर होऊ नये.तसेच जे साफसफाई कामगार आहेत त्यांचेसाठी लागणारे कामाचे साहित्य जसे फावडे, घमिले, बांबु व इतर काही जे साहित्य लागते ते अगोदरच खरेदी करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. तात्काळ टेंडर काढण्यात यावे.

**मुख्य लेखाधिकारी :** गणवेश खरेदी करण्याबाबतची निविदा काढलेली असुन एकुण ४ निविदा भरुन आलेल्या आहेत. सॅम्पल तपासणीसाठी पाठविलेले आहे. येणाऱ्या बैठकीमध्ये तसा प्रस्ताव सादर करण्यात येईल. तसेच साफसफाईसाठी लागणारे साहित्य खरेदीची निविदा सुध्दा काढलेली आहे.

**श्री. जयवंत ओक :** यापुर्वी वर्क वाईज बजेट केलेले आहे. ज्या -ज्या वार्डातील कामें घेतलेली आहे ती कामे तात्काळ घेण्याच्या दृष्टीकोनातुन प्रशासनाने कार्यवाही करावी तसे आदेश करावे. बजे ट बुक देणार आणि कामे वर्षाच्या शेवटी सुरू करणार हे बरोबर होणार नाही.

**मा. सभापती :** आताच खुलासा केल्याप्रमाणे बजेट बुक तयार करण्याचे काम चालु आहे. बजेट बुक तयार झाल्यानंतर वर्कवाईज जी जी कामे करण्याचे निश्चित केलेले ती सर्व कामे करण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्रीमती पावर्ततीबाई मानकापे :** शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाच्या वेळी त्या वार्डातील स. सदस्यांना बोलविण्यात यावे. काही शाळेत बोलविले जात नाही. अधिकारी गणवेश वाटप करतात. तसेच ज्या वार्डात शाळा नसतील त्या

वार्डात शाळा सुरु करण्यात याव्यात इमारती बांधाव्यात अशी माझी मागणी आहे. माझ्या वार्डात शाळेसाठी जागा आहे. त्वरीत शाळा बांधावी.

**श्री. जयवंत ओक :** ज्या - ज्या वार्डात कामे सुरु झाली त्यासंबंधी नगरसेवकांना कल्पना न देता सुरु करण्यात आलेली आहे. किमान माहिती द्यावी अशी आमची मागणी आहे. किमान माहिती द्यावी अशी आमची मागणी आहे. तसे प्रशासनातर्फे कळविण्यात आले पाहिजे. रुंलीग द्यावे.

**डॉ. अशा बिनवडे :** दि. ७-५-२००२ च्या इतिवृत्तातील पान क्र. १२ वर जी महानगरपालिकेच्या मालकीची व्यापारी संकुल आहेत ती दुकाने भाडयाने जात नाही. का जात नाही. या बाबतीत सर्वच मार्केटच्या सर्वे करण्याची गरज आहे. असे मा. आयुक्तांनी म्हटले होते. त्यानुसार जवाहर कॉलनी येथील दुकानांच्या सर्व्हे करण्याची कार्यवाही केलेली आहे ? डिपॉझिट कमी करुन कार्यवाही करु असे आयुक्तांनी म्हटले होते.

**मालमत्ता अधिकारी :** आतापर्यंन्त या दुकान भाडयाने देण्याबाबत ५ वेळेस टेंडर काढण्यात आलेले आहे. काहीही प्रतिसाद मिळालेला नाही. दुकाने रिकामी आहेत. पुढील प्रशासकीय कार्यवाही चालु आहे. भाडे कमीटीसमोर हे प्रकरण सादर करण्यात येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** दुकाने बांधुन चार वर्षे झाले. महानगरपालिकेचा पैसा खर्च झालेला आहे. उत्पन्न काहीच नाही. प्रतिसाद मिळत नसेल तर वाटाघाटी करुन प्रकरणे निकाली काढावी. उत्पन्न येण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** ज्या दुकानाबाबत प्रतिसाद मिळत नाही. अशा दुकानांबाबत तात्काळ प्रकरणे सविस्तर माहितीसह भाडे कमीटी समोर ठेवुन पुढील कार्यवाही करावी.

**श्री. जयवंत ओक :** करारनामा दोन स्थायी समितीच्या सदस्यांच्या सहया घेणे आवश्यक असतांना का घेण्यात येत नाही ?

**मुख्यलेखा अधिकारी :** १० लाखाचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत. १० लाखाच्या वरती जी कामे करावयाची आहेत व त्यासंबंधी जो करारनामा करावा लागणार आहे. त्यावर दोन सदस्यांच्या सहया घेण्या संदर्भात तशी संचिका सादर केलेली आहे. मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही होईल.

**मा. सभापती :** १० लक्षाच्या आत जी या आयुक्तांच्या अधिकारात कामे होतात त्याची सुध्दा सविस्तर विभाग वाईज माहिती सभागृहासमोर आली पाहिजे.

**सॉ. ताराबाई जेजुरकर :** संजयनगर भागातील ४ दुकानांचे संबंधित लोकांनी डिपॉझिट भरलेले असुन सुध्दा दुकाने देण्यात आलेली नाहीत.

**मालमत्ता अधिकारी :** आज इतिवृत्तात कायम होत आहे. पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी याबाबतीत कार्यवाही करावी. ज्यांनी डिपॉझिट भरलेले आहे त्यांना वेळ न लावता दुकाने देण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री. जयवंत ओक :** रंगारगल्ली भागातील लोकांनी दुकाने घेतलेली आहेत. कशी घेतली, कोणत्या नियमाने घेतली, नियमाचे पालन आहे की नाही याची चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच ज्या ज्या दुकानांच्या बाबतीत टेंडर भरुन आले, ज्यांनी टेंडर भरले, पहिल्या क्रमांकाचे घेण्यास तयार नसेल तर दुसऱ्या क्रमांकाच्या निविदा धारकांस वाटाघाटी करुन देण्याबाबत कार्यवाही व्हावी. सादिया मार्केटची दुकाने वाटाघाटी नंतर जातील. रिकामी राहु नये. उत्पन्न वाढेल असे प्रयत्न व्हावे.

**मा. सभापती :** मागील बैठकीत आपण सर्वच माहिती देण्याचे सुचविले होते. त्याप्रमाणे स. सदस्यांना माहिती देण्यात येत आहे. दुरुस्ती असेल तर करता येईल. विषय क्र. २१ मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक १३.३.२००२ (अर्थ संकल्पीयसभा) व दिनांक १७.५.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की स. नगरसेवक श्री तकी हसन खान यांच्या वार्डात संगणक प्रशिक्षण केंद्र त्यांच्या स्वेच्छानिधीतुन सुरु करण्याकरीता महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली असुन त्याप्रमाणे संगणक व इतर साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे.

सर्वसाधारण सभेने संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याकरीता ठराव क्र. १६७/७ द्वारे दि. १९.१२.२००१ नुसार मंजुरी दिली आहे. सदर संगणक प्रशिक्षण केंद्रासाठी ठराव क्र. ४४८/३ दि. १८.७.२००१ स्थायी समितीने नियमावलीस मंजुरी दिली आहे.

लोटाकारंजा येथे स. नगरसेवक तकी हसन खान यांच्या स्वेच्छा निधीतुन महानगरपालिकेच्या सर सय्यद हॉल येथे संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याकरीता एम.सी.ई.डी. या संस्थेकडुन मान्यता घेण्याकरीता पाठपुरावा करण्यात आला. सदर संस्थेने त्यांच्या नियम व अटीनुसार महानगरपालिकेकडे त्यांचा विहित नमुन्यात करारनामा पाठविला असुन सदर करारनामा विधितज्ञांकडुन तपासण्यात आला असुन त्यांनी करारनामा करुन घेण्यास हरकत नसल्याबाबत प्रमाणित केले आहे. सदर करारनाम्याच्या अटी व शर्ती प्रमाणे महानगरपालिकेला संगणक प्रशिक्षण केंद्र कार्यरत ठेवावे लागेल. सोबत करारनामा जोडला आहे. करीता स्थायी समितीसमोर सदर करारनाम्याचे प्रारुप मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. प्रशांत देसरडा :** या विषयाप्रमाणेच आणखी दोन स. सदस्यांच्या वार्डात संगणक प्रशिक्षण देण्याबाबतचे प्रस्ताव मंजुर केलेले होते. त्यात स. सदस्य श्री. तांदुळवाडीकर तसेच सौ. चंद्रात्रे सुवर्णा यांचे वार्डातील ते प्रस्ताव होते.

**प्रकल्प संचालक :** माझ्या माहितीप्रमाणे या प्रस्तावा व्यतिरिक्त इतर प्रस्ताव मंजुर झालेले नाही. हा प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर शासनाकडे पाठविण्यात आलेला होता. शासनाने सुध्दा मंजुरी दिलेली होती.

**मा. सभापती :** अशाच प्रकारचे दुसरे प्रस्ताव तपासुन घ्यावे त्यानुसार कार्यवाही करावी, प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लोटाकारंजा येथे स. नगरसेवक श्री तकी हसन खान यांच्या स्वेच्छा निधीतुन महानगरपालिकेच्या सर सय्यद हॉल येथील संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याकरीता सोबत जोडण्यात आलेल्या करारनाम्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३ :**

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या मालकीचे सादिया टॉकिज जवळील व्यापारी संकुलातील काहि दुकाने शहर अभियंता यांच्याकडुन प्रदान करण्यात आलेल्या आहेत. सौ. अनिता गुप्ता यांना दुकान क्र. २८ ब अनामत रक्कम रु. ५८०००/- आणि रु. ७५/- प्रती चौ.मी. प्रतिमहा भाडेनुसार देण्यात आले आहे. तथापी सदर दुकान हे नजरचुकीने लिलावामध्ये ठेवण्यात आल्यामुळे ते दुसऱ्यास दिले गेले. सौ. गुप्ता यांनी अनामत रक्कम कार्यालयात जमा केले आहे. लिलावामध्ये दुकान क्र. २८ब हे श्री उपाध्ये यांना देण्यात आले. त्यांना रु. ६०/- चौ.मी. प्रतिमहा प्रमाणे भाडे आकारण्यात आले आहे. करीता सौ. गुप्ता यांना देखील त्याच दराने म्हणजे रु. ६०/- प्रतीमहा प्रमाणे भाडे आकारण्याबाबत ठरले. करिता दुकान क्र. २८ ब जिचे क्षेत्र १४.६४ चौ.मी. आहे. सदरील दुकान श्री. उपाध्ये यांना देण्यात आली असुन दुकान क्र. ८ -ए सौ. गुप्ता यांचे संमतीने पर्यायी ज्याचे क्षेत्र -११.८३ चौ. मी. आहे. करीता दुकानाचे क्षेत्र ११.८३ चौ. मी. व अनामत रक्कम ४०००/- प्रती चौ.मी. प्रमाणे ४७,३२०/- इतके होते. सदर अनामत मधील फरकाची रक्कम रु. ११,२२२/- इतका आहे. फरकाची रक्कम भाडयात समायोजित करुन घेऊन दुकानाचा ताबा देणे बाबत मा. स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. प्रशांत देसरडा :** २८ ब क्रमांकाचे दुकान ७५/- प्रती चौ.मी प्रमाणे भाडयाने दिलेले होते. त्यानंतर आता ते ६०/- रु. प्रती चौ.मी. ने दिले नजर चुकीने रु. ६०/- देतो का. यात फरक येत आहे. लेखा परिक्षणामध्ये काही अडचण येईल का ? संबंधित अधिकाऱ्यांचा खुलासा घ्यावा.

**मुख्य लेखाधिकारी :** यात महापालिकेचे काहीही नुकसान झालेले नाही. नजरचुकीने टेंडरमध्ये घेतले गेलेले आहे. ते दुसऱ्यांना देण्यात आले. पर्यायी दुकान त्यांना देत आहोत. दर तेच असुन अनामत रक्कम तीच आहे. हे जे भाडे आहे ते भाडे कमिटीने निश्चित केलेले आहे.

**मुख्य लेखापरिक्षक :** हा विषय भाडे कमिटीकडून आलेले आहे. १/११/९९ रोजी भाडे कमिटीने भाडे निश्चित केलेले होते. ६०/- रु. प्रती चौ.मी. दराप्रमाणे मान्य केले आहे. मागच्या बाजुला दुकान आहे. सविस्तर माहिती संचिका पाहिल्यानंतर देता येईल.

**श्री. प्रशांत देसरडा :** १५/- रु. प्रती चौ.मीटरचा फरक येत आहे. ऑडीटमध्ये अक्षेप येईल. आताच दुरुस्ती करून घ्यावी.

**मा. सभापती :** सविस्तर संचिका वाचुन सभागृहाला नंतर माहिती द्यावी. (सभेच्या शेवटी मुख्य लेखापरिक्षक यासंबंधीचा खुलासा करतीाल).

**मुख्य लेखापरिक्षक :** हा प्रस्ताव मंजुर केल्यास ऑडीट आक्षेप येणार नाही. कारण २८-ब क्रमांकाचे दुकान हे समोरच्या बाजुने आहे. जेव्हा निविदा भरल्या तेव्हा ७५/- प्रती चौ.मी. हे दर फिक्स होते. सन ९८ मध्ये ७५/-रु. वरुन ६० रु. भाडे का केले याचा वेगळा खुलासा घेऊन अहवाल सादर करण्यात येईल. ८-ए क्रमांकाचे दुकान मागच्या बाजुला आहे. रु. ६०/- प्रती चौ.मी. दर बरोबर आहे.

**मा. सभापती :** या बाबतीत सविस्तर चौकशी करुन पुढील बैठकीत ठेवावे.

**ठराव :**

सदरील प्रकरणी सविस्तर चौकशी करुन पुढील बैठकीत ठेवावे, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २४ :**

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे व्यापारी संकुलातील सादिया टॉकिज मागील दुकान क्र. एस-११ व एस-१२ ही दोन दुकाने मनपा आरोग्य केंद्र चालविण्यासाठी घ्यावयाचे आहे. सदरील दुकानाचे व या इमारतीमधील दुकानाचे भाडे ५०/- मागील बाजुचे व रु. ६०/- समोरील रस्त्यावरील गाळयाचे प्रती चौ.मी. प्रतिमहा आहे. अनामत रक्कम ४०००/- प्रती चौ.मी. आहे. परंतु सदरचे गाळे ज्या उद्देशासाठी बांधलेले आहेत त्या व्यतिरिक्त वापर करावयाचे प्रस्तावित आहे. त्यामुळे धोरणात्मक बाब म्हणुन वरील भाडे मनपा आरोग्य केंद्र चालविण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेत विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. नंदकुमार फुलारी :** आरोग्य केंद्र चालु करण्यासाठीचा प्रस्ताव सादर केला परंतु तेवढा कर्मचारी वर्ग आपल्याकडे आहे का?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आहे त्या कर्मचाऱ्यांकडुन सेवा करुन घेणार आहोत. हा पार्टटाईप दवाखाना आहे. गरमपाणी येथील दवाखाना सकाळी व तेथील कर्मचारी येथे दुपारी काम करणार आहेत.

**डॉ. आशा बिनवडे :** विश्वभारती कॉलनी मध्ये दवाखाना स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** माझ्या वार्डातही दवाखाना सुरु करण्यात यावा. वार्डात गरीब लोक जास्त आहेत.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. सदस्यांची सुचना केल्याप्रमाणे वार्डाचा सर्व्हे करण्यात यावा व पुढील कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीचे सादिया टॉकिज मागील व्यापारी संकुलातील दुकान क्र. एस-११ व एस-१२ या दोन गाळयांमध्ये महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र चालविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५ :**

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००२-०३ या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना खाद्य निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. मा. आयुक्त यांचे मान्यते अन्वये त्याचा तपशिल खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

अ) मासे : मासेकरीता (२) कोऱ्या निविदाची विक्री झाली असुन (२) भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदाधारकांचे नांव | मासे प्रकार | भाव प्रती कि. रु. |
|---|---|---|---|
| १) | श्री. मुमताज अहमद | अ) कतला | रु. ६५.०० |

ब) रोहु रु. ६५.००
क) मिरगळ रु. ६५.००
ड) झिंगे रु. ११५.००

२) श्री. लालचंद चंद्रभान गांगुले अ) कतला रु. ६७.००
ब) रोहु रु. ६७.००
क) मिरगळ रु. ६७.००
ड) झिंगे रु. १२५.००

वरील प्रमाणे श्री. मुमताज अहमद यांचे दर सर्वात कमी असुन मा. आयुक्त यांचेशी चर्चेनंतर मासे रु. ६१.०० व झिंगे रु. ७७.०० प्रती किलो या दराने पुरवठा करणेस मान्यता दिली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

ब) शाळु ज्वारी बाटुक व कडबा : या करिता एकुण (३) कोरे निविदा पत्रकांची विक्री झाली असुन श्री. शेख रशीद यांनी अनामत रक्कम कमी भरल्यामुळे निविदा उघडण्यात आलेली नाही.

| अ. क्र. | निविदा धारकांचे नावं | शाळु बाटुक/टन | शाळु कडबा/टन |
|---|---|---|---|
| १. | श्री. जनार्दन शेळके | रु. ५३००.०० | रु. ४३००.०० |
| २. | श्री लालचंद गिरजाबा जाधव | रु. ५९९९.९९ | रु. ४९९९.०० |
| ३. | श्री. शेख रशीद | अनामत रक्कम कमी भरल्याने निविदा उघडण्यात आलेली नाही. | |

श्री जनार्दन शेळके यांचे सर्वात कमी असुन मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनंतर शाळु बाटुक रु. ५१००.०० प्र. टन व शाळु कडबा रु. ४०००.०० प्रति टन या दराने पुरवठा करणेस संमती दर्शविली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर (दिनांक १.७.२००२ ते दि. ३०.६.२००३ या कालावधीसाठी)

क) किराणा पदार्थ : या करीता एकच कोरी निविदा विक्री झाली असुन एकच निविदा प्राप्त झलेली आहे.
निविदा धारकाचे नांव : "ए-वन किराणा शॉपी" हरी मजीद, मोंढा, औरंगाबाद.

| **अ. क्र.** | **पदार्थाचे नांव** | **निविदेतील दर** | **मा. आयुक्त यांचेशी चर्चेनंतर कमी केलेले दर** |
|---|---|---|---|
| १. | हरभरे | रु. २६.०० प्र. की. | रु. २३.५० प्र. की. |
| २. | गहु | रु. ९.५० प्र. की. | रु. ०८.५० प्र. की. |
| ३. | तांदुळ | रु. १४.०० प्र. की. | रु. १२.५० प्र. की. |
| ४. | शेंगदाणे | रु. २९.०० प्र. की. | रु. २६.०० प्र. की. |
| ५. | गुळ | रु. १६.०० प्र. की. | रु. १४.५० प्र. की. |
| ६. | साखर | रु. १६.०० प्र. की. | रु. १६.०० प्र. की. |
| ७. | कॉफिवडी | रु. १२.०० प्र. नग | रु. १०.०० प्र. नग |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | निरमा पावडर | रु. १८.०० प्र. नग | रु. १७.०० प्र. नग |
| ९. | माचीस बॉक्स | रु. ०५.०० प्र. नग | रु. ०५.०० प्र. नग |
| १०. | लक्स सोफ | रु. ११.०० प्र. नग | रु. १०.०० प्र. नग |
| ११. | रिन सोफ | रु. १०.०० प्र. नग | रु. ०९.५० प्र. नग |
| १२ | लाईफबॉय सोफ | रु. ०९.०० प्र. नग | रु. ०८.५० प्र. नग |

वरीलप्रमाणे एकच निविदा प्राप्त झालेली असुन मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनंतर कमी केलेले दरास मान्यता देण्यात आलेली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

ड) भाजीपाला व फळफळावळ : या करीता (५) कोऱ्या निविदा पत्रकांची विक्री झाली असून (३) निविदा भरुन प्राप्त झाल्या आहे.

| अ. क्र. | मालाचे नांव | श्री प्रभाकर पवार प्र. कि. | श्री खान ॲण्ड सन्स प्र. कि. | श्री जनार्दन शेळके प्र. कि. |
|---|---|---|---|---|
| १. | केळी | रु. १३.५० | रु. १५.०० | रु. १२.०० |
| २. | मोसंबी | रु. २३.५० | रु. २५.०० | - |
| ३. | चिक्कु | रु. २०.५० | रु. २२.०० | रु. २४.०० |
| ४. | पि. टोमॅटो | रु. १८.५० | रु. १४.०० | - |
| ५. | काकडी (खिरे) | रु. १९.५० | रु. १२.०० | - |
| ६. | गाजर | रु. ०८.५० | रु. १२.०० | रु. ७.०० |
| ७. | बटाटे | रु. ११.५० | रु. १२.०० | - |
| ८. | कोबी | रु. १३.५० | रु. २०.०० | - |
| ९. | वांगी | रु. १२.५० | रु. १०.०० | - |
| १०. | पालकभाजी | रु. १४.५० | रु. १०.०० | - |

तुलनात्मकदृष्टीने श्री प्रभाकर पवार यांचे ॲटम क्र. १, ३, ७ व ८ चे दर कमी आहेत. श्री जनार्दन शेळके यांचे ॲटम क्र. १ व ७चे दर कमी आहेत व श्री खान ॲन्ड सन्स याचे ॲटम क्र. ४,५,९ व १० चे दर कमी आहेत. परंतु त्यांनी दर कमी करणेस नकार दर्शविल्याने त्यांचे ॲटम श्री प्रभाकर पवार यांनी कमी दरात पुरवठा करणेस संमती दर्शविल्याने खालील दराप्रमाणे पुरवठा करणेस तयार असुन यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र. | मालाचे नांव | श्री प्रभाकर पवार (प्र. कि.) | श्री जनार्दन शेळके (प्र. कि. ) |
|---|---|---|---|
| १. | केळी | - | रु. १०.०० |
| २. | मोसंबी | रु. २०.०० | - |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | चिक्कु | रु. १७.५० | - |
| ४. | पि. टोमॅटो | रु. १२.०० | - |
| ५. | काकडी (खिरे) | रु. १०.०० | - |
| ६. | गाजर | - | रु. ०६.०० |
| ७. | बटाटे | रु. ०९.७५ | - |
| ८. | कोबी | रु. ११.५० | - |
| ९. | वांगी | रु. ०८.५० | - |
| १०. | पालकभाजी | रु. ०८.५० | - |

वरील प्रमाणे दर कमी केले असुन प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रमाणे सन २००२-२००३ या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना खाद्य पुरवठयाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी खालील प्रमाणे निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते.
अ) मासे पुरवठयाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराचे निविदाधारक श्री मुमताज अहमद यांचेशी झालेल्या चर्चेअंती ठरल्यानुसार मासे ६१.०० रु. प्र. किलो व झिंगे ७७.०० प्रती किलो या दराने खरेदी करण्यास मान्यता देण्यात येते.

ब) शाळु ज्वारी बाटुक व कडबा पुरवठयाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी सर्वात कमी दराचे निविदा धारक श्री जनार्दन शेळके यांचेशी झालेल्या चर्चे अंती ठरल्यानुसार शाळु बाटुक रु. ५१००/- प्र. रु. व शाळु कडबा रु. ४०००/- प्र. रु. या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. (दि.१.७.२००२ ते ३०.६.२००३ या कालावधीकरीता)

क) किराणा पदार्थ पुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेल्या एकमेव निविदाधारक "ए-वन किराणा शॉपी, हरी मजीद मोंढा, औरंगाबाद" यांचेशी झालेल्या चर्चेअंती कमी करण्यात आलेले प्रस्तावात दर्शविलेल्या अ. क्र. १ ते १२ च्या ॲटमकरीताचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

ड) भाजीपाला व फळाफळावर पुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेल्या तुलनात्मक दृष्टीने श्री प्रभाकर पवार यांचे ॲटम क्र. २, ३, ७ व ८ व जनार्दन शेळके यांचे ॲटक क्र. १ व ७ तसेच श्री खान ॲण्ड सन्स यांचे ॲटम क्र. ४, ५, ९ व १० चे दर कमी असले तरी त्यांनी दर कमी करणेस नकार दर्शविल्याने त्यांचे ॲटम श्री प्रभाकर पवार यांनी कमी दरात पुरवठा करणेस संमती दर्शविल्याने खालील दर्शविल्याप्रमाणे दरांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| **अ. क्र.** | **मालाचे नांव** | **श्री प्रभाकर पवार** | **श्री जनार्दन शेळके** |
|---|---|---|---|

| | | (प्र. कि.) | (प्र. कि. ) |
|---|---|---|---|
| १. | केळी | - | रु. १०.०० |
| २. | मोसंबी | रु. २०.०० | - |
| ३. | चिक्कु | रु. १७.५० | - |
| ४. | पि. टोमॅटो | रु. १२.०० | - |
| ५. | काकडी (खिरे) | रु. १०.०० | - |
| ६. | गाजर | - | रु. ०६.०० |
| ७. | बटाटे | रु. ०९.७५ | - |
| ८. | कोबी | रु. ११.५० | - |
| ९. | वांगी | रु. ०८.५० | - |
| १०. | पालकभाजी | रु. ०८.५० | - |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आरोग्य विभागातर्फे करण्यात आलेल्या औषधी व साहित्य खरेदी संबंधी लेखा परिक्षण अहवालसंबंधी झालेल्या निर्णयात स्थायी समिती सभा दि. १८.३.२००२ च्या इतिवृत्तामधील पान क्र. १३ वर "प्रोफेसर इन मेडिसीन" चा मराठी अनुवाद "प्राध्यापक औषधी विभाग" असा करण्यात आलेला आहे. "प्रोफेसर इन मेडिसीन" चा मराठी अनुवाद "प्राध्यापक वैद्यकशास्त्र" असा होतो. करीता इतिवृत्तामध्ये "प्राध्यापक, वैद्यकशास्त्र" अशी दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आरोग्य विभागातर्फे करण्यात आलेल्या औषधी व साहित्य खरेदीसबंधी लेखा परिक्षण अहवालासंबंधी झालेल्या निर्णयात स्थायी समिती सभा दि. १८.३.२००२ च्या इतिवृत्तामधील पान क्र. १३ वर "प्रोफेसर इन मेडिसन" चा मराठी अनुवाद "प्राध्यापक, औषधी विभाग" या ऐवजी "प्राध्यापक, वैद्यकशास्त्र " अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७ :**

(दिनांक ७.५.२००२ रोजी स्थायी समिती सभेत स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव)

मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की. महानगरपालिकेचे जकात वसुली ही अपेक्षा प्रमाणे होत नसल्यामुळे प्रायोगित तत्वावर जकात वसुली ही खाजगी अभिकर्त्यांमार्फत वसुल करण्यात यावी. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ मधील कलम ३५ अनुसार स्थायी समितीच्या मान्यतेनुसार अशी वसुली ही कोणत्याही कालावधी करिता करण्यात येऊ शकते.

त्यामुळे खाजगी अभिकर्त्यामार्फत जकात वसुलीचा कालावधी दि. १ जुलै २००२ ते ३० जुन २००३ अस ठेवण्यात यावा असे प्रशासनाचे मत आहे.

शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार जकात वसुलीचे वार्षिक मुख्य रक्कम रुपये ६४.५६ कोटीचे उपरोक्त कालावधी करीता निश्चित करण्यात यावे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** मागील बैठकीत जकातीचे खाजगीकरणाचा प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता व कमिटी नियुक्त करुन इतर महानगरपालिकेत काय स्थिती खाजगीकरणामुळे झालेली आहे याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी कमिटी नियुक्त केलेली होती. कमिटीने अहवाल दर करण्याचा निर्णय घेतलेला होता. त्यानुसार अहवाल प्राप्त झालेला आहे.

तो नगरसचिव यांनी वाचुन दाखववावा.

## अहवाल

**नगरसचिव :** औरंगाबाद महानगरपालिकेच्या जकात वसुलीचे खाजगीकरण करण्या संबंधीच्या ठरावाचे अनुषंगाने स्थायी समिती सभेने गठित केलेल्या समितीने इतर महानगरपालिकेतील जकात खाजगीकरणाची पाहणी केली असुन त्या संबंधीचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

जकात खाजगीकरणा संबंधीच्या कामकाजांची इतर महानगरपालिकेमध्ये जाऊन पाहणी करण्यासाठी स्थायी समितीने गठित केलेल्या समितीमध्ये खालील प्रमाणे सदस्यांचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. नंदकुमार फुलारी | सदस्य स्था. स. |
| २. | श्री. चंद्रशेखर जैस्वात | --//-- |
| ३. | श्री. इलियास किरमाणी | --//-- |
| ४. | श्री. प्रशांत देसरडा | --//-- |
| ५. | श्री. मिर हिदायत अली | --//-- |
| ६. | श्री. संजय पवार | लेखाधिकारी मनपा, औरंगाबाद |

या समितीने उल्हासनगर महानगरपालिकेस भेट देऊन तेथील जकात खाजगीकरणासंबंधाने कामकाजाची पाहणी केली. त्या संदर्भात तेथील अधिकारी व्यापारी तसेच इतर संबंधीतांची चर्चा केली असता पुढील बाबी निदर्शनास आल्या.

१) उल्हासनगर महापालिकेने जकातीचे खाजगीकरण केल्यानंतर तेथील जकात वसुलीचे कामकाज सुरळीतपणे चालु आहे. तसे पुर्वी पेक्षा जकातीचे उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.

२) उल्हास नगर महापालिकेचे जकातीचे उद्दीष्टे प्रशासनाने २१ कोटी रुपयाचे अर्थसंकल्पामध्ये अपेक्षित धरले होते. जकात खाजगी करणाचा निर्णय तेथील महापालिकेने घेतल्यानंतर जकातीचा ठेका ४५ कोटी रुपयांना देण्यात आला. प्रत्येक वर्षी शासन नियमाप्रमाणे १० टक्के वाढ करुन खाजगीकरणाद्वारे वसुली सुरु आहे. त्यामुळे महापालिकेस जास्तीचे उत्पन्न मिळालेले आहे.

३) जकात खाजगीकरणामुळे वसुलीसाठी नेमण्यात आलेल्या खाजगी ठेकेदाराकडुन नागरिकांच्या कुठल्याही प्रकारचा त्रास होत नसल्याने दिसुन आले.

## निष्कर्ष

वरील बाबीवरुन समिती या निष्कर्षाप्रत येऊन पोहोचली आहे की, औरंगाबाद महानगरपालिक्चे उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीने जकात वसुलीचे खाजगीकरण करण्यास काही हरकत नाही. करीता जकात खाजगीकरण संबंधिचा प्रस्ताव मंजुर करण्याचे दृष्टीने विचार व्हावा.

| | |
|---|---|
| १) श्री. नंदकुमार फुलारी | - स्वाक्षरी - |
| २) श्री. इलियास किरमाणी | - स्वाक्षरी - |
| ३) श्री. मिर हिदायत अली | - स्वाक्षरी - |
| ४) श्री. चंद्रशेखर जैस्वाल | - स्वाक्षरी - |

**श्री. प्रशांत देसरडा :** अहवालात कमेटीने उल्हास नगर महापालिकेते भेट दिलेली होती. महापालिकेची स्थिती जाणुन घेतली. परंतु तेथील व्यापाऱ्यांच्या अडीअडचणी

जाणुन घेतलेल्या दिसुन येत नाहीत. तसा उल्लेख अहवालात नसून व्यापाऱ्यांचा यास फार विरोध झालेला आहे. कोल्हापुर महानगरपालिकेत सुध्दा जकातीचे खाजगीकरण झालेले होते. तेथेही ही योजना बारगळली व्यापाऱ्यांच्या अडचणी काय आहेत त्या लक्षात घेऊन त्यांना काय सवलती मनपाच्या माध्यमातुन देता येतील व हा प्रश्न योग्य तऱ्हेने कसा सोडवता येईल या दृष्टीकोनातुन पुढील कार्यवाही करावी असे माझे मत आहे. माझा यास विरोध आहे.

**श्री. किशोर शिंदे :** कमेटीने चांगल्या प्रकारे अहवाल सादर केलेला आहे. महापालिकेचा फायदा होणार आहे. एक वर्षासाठी तरी खाजगीकरण करुन पहावे.

**श्री. मीर हिदायत अली :** अहवालातुन २१ कोटीचे उद्दीष्ट ४५ कोटीवर गेले याचा अर्थ त्या महापालिकेस दुप्पटीने फायदा झालेला आहे. त्या प्रमाणे याही मनपास जकातीचे खाजगीकरण केल्यास फायदाच होणार आहे. एक वर्षासाठी खाजगीकरण करण्यात यावे.

**श्री. इलियास किरमाणी :** महापालिकेचे हित बघावे. व्यापांऱ्यांची बैठक घेण्याची गरज नाही. चोऱ्या होतात. वृत्तपत्रात बातम्या येतात. यात महापालिका व सदस्यांची बदनामी होते. एक वर्षासाठी खाजगीकरण करावे. मनपाचा यात फायदा असुन जकात विभागातील कर्मचारी मालमत्ता तसेच पाणीपट्टी वसुलीसाठी घेता येतील. त्यामुळे आणखी वसुलीत भर पडेल व विकास कामे करण्यास मदत होईल.

**श्री कैसारखान :** जकात खाजगीकरण करण्यात यावे. वसुली वाढेल. तसेच जकात विभागातील कर्मचारी इतर वसुलीसाठी घेता येतील. व्यापाऱ्यांशी पुन्हा एकदा चर्चा करुन मनपाच्या नियमाने वाटाघाटी करण्यास तयार असतील तर त्यांचे मत जाणुन घ्यावे. व्यापारी चोऱ्या करीत आहेत. दररोज वृत्तपत्रात बातम्या येत आहेत. व्यापारी विरोध करतात याचा अर्थ चोरी होते. विरोध कशासाठी करतात. एक वर्षासाठी ती जकात खाजगीकरणाचा निर्णय घेण्यात यावा.

**श्री इलियास किरमाणी :** गेल्या वर्षीच खाजगीकरण झाले असते तर आज जो प्रस्ताव दोन कोटीची कामे कमी करण्याचा सादर झाला तो झाला नसता. खाजगीकरण न झाल्यामुळे महानगरपालिकेस ८ कोटीचा तोटा झालेला आहे. उद्दीष्ट पुर्ण झालेले नाही.

**श्री. रावसाहेब औताडे :** महानगरपालिकेच्या फायद्याचा निर्णय व्हावा. एक वर्षासाठी जकात खाजगीकरण करुन पहावे. उत्पन्न वाढले तर दरवर्षी कार्यवाही करावी.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :**एक वेळेस खाजगीकरण होऊ द्यावे व ठराव मंजुर करावा.

**श्री नंदकुमार फुलारी :** सर्व विकास कामे, कर्मचाऱ्यांचे पगार भत्ते जकात उत्पन्नावर अवलंबुन आहेत. आजची परिस्थिती महानगरपालिकेचे फार डबघाईला आलेली आहे. खाजगीकरण करणे गरजेचे आहे. निर्णय घेण्यात यावा. व्यापाऱ्यांचा विरोध एक महिना किंवा १५ दिवस होईल.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** महापालिकेच्या फायद्याचा निर्णय घेण्यात यावा. व्यापाऱ्यांचे सुध्दा मत जाणुन घ्यावे.

**डॉ. आशा बिनवडे :** जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवलेला आहे. उत्पन्न वाढले पाहिजे. हे प्रशासनाच्या लक्षात आले असे दिसुन येते. सध्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती वाईट आहे. जास्तीत जास्त उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने

प्रयत्न होत असेल ते ते करण्यात यावे. उत्पन्न वाढले तर विकास कामे सुध्दा होतील हे सुध्दा लक्षात घेणे आवश्यक आहे.

**श्रीमती पार्वतीबाई :** जो कमिटीने अहवाल सादर केला व सखोल माहिती मनपाचा फायदा होण्याच्या दृष्टीने अहवाल सादर केलेला आहे. त्याबद्दल मी त्या कमेटीचे सर्व प्रथम अभिनंद करते. महापालिकेकडे पैसा नाही म्हणुन कामे होत नाहीत. जनता नाराज आहे. नगरसेवकांना जनतेला तोंड द्यावे लागते. उत्पन्न वाढल्यास परिस्थिती बदलेल. त्यासाठी खाजगीकरण होणे गरजेचे आहे.

**सौ. ताराबाई जेजुरकर :** जकातीचे खाजगीकरण व्हावे. उत्पन्न वाढेल.

**श्री जयवंत ओक :** खाजगीकरण व्हावे म्हणुन प्रशासकीय प्रस्ताव सादर झालेला आहे. सभागृहात या संबंधी नेहमीच चर्चा होत आलेली आहे. जकातीच्या उत्पन्नावर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अवलंबुन आहे. जकात हे प्रमुख उत्पन्नाचे साधन आहे. शहराचा विकास करावयाचा असेल तर महापालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे. तरच विकास कामे होऊ शकतात. माझ्या माहितीप्रमाणे जे मागील वर्षाचे उद्दीष्ट सुध्दा पुर्ण झालेले नाही. ५०कोटीच वसुल झाले अशी माहिती आहे. दोन कोटीचा तोटा निर्माण झालेला आहे. जकात दिल्यानंतर व्यापारी कमी दराने माल देत नाहीत. जकातीचे रक्कम नागरीकांकडुन वसुल करतात. सदस्यांची कमेटी नेमलेली होती. अहवाल आलेला आहे. एक वर्षासाठी तरी खाजगीकरण करावे. जकात खाजगी करणामुळे इतर जनतेला त्याचा त्रास होता कामा नये.

**श्री. प्रशांत देसरडा :** जकातीच्या माध्यमातुन व्यापारी लोक मनपास कर भरतात त्यांना दूर ठेवुन त्यांची विचार विनीमय न करता त्यांचे म्हणने एकुण न घेता निर्णय घेत असेल तर योग्य नाही. व्यापाऱ्यांचे मत जाणून घ्यावे. तडजोड करुन निर्णय घेण्यात यावा. प्रशासनाला चर्चा करण्यासाठी वेळ नसेल तर नंतर मोर्चे अंदोलने येतील. मनपा स्थापन झाल्यापासुन व्यापारी कर भरतात. जकात देतात. याचा विचार करावा नसता व्यापाऱ्यांनी शहराबाहेर गोडाऊन बांधली तर जकात सुध्दा येणार नाही.

**श्री इलियास किरमाणी :** महानगरपालिकेस जी जकात भरावी लागते तीच जकात खाजगी अभिकर्त्यांना द्यावी लागणार आहे. जे दर निश्चित आहेत त्या प्रमाणे वसुल होणार आहे. व्यापाऱ्यांचा विरोध का होतो. याचा अर्थ चोरी करतात.

**श्री हिदायत अली :** गेल्या वर्षीच खाजगीकरण झाले असते तर आता ८ कोटीचा फायदा झाला असता. त्या आठ कोटीत सर्व वार्डातील आणखी कामे करता आली असती.

**डॉ. आशा बिनवडे :** स. सदस्य श्री देसरडा यांनी सुचना केल्याप्रमाणे व्यापाऱ्यांचे मत जाणुन घ्यावे. त्यांचे मत दुर्लक्षित करण्यासारखे नाही. बायोमेडीकल वेस्ट प्रस्ताव डॉक्टरांच्या संमतीने त्यांची बैठक घेवुन म्हणणे ऐकावे. ज्या सुधारणा करता येतील त्या कराव्यात.

**श्री. जयवंत ओक :** व्यापारी मोर्चे, अंदोलने करतील असे मत मांडले याचा अर्थ जकातीत चोरी होते हे सिध्द होते. आता मनपास जकात करतात तोच खाजगी अभिकर्त्यांना भरावा. यात फरक काय ?

**श्री किशोर शिंदे :** प्रस्ताव प्रशासकीय आहे. ठराव मंजुर करावा. मनपाचे हित लक्षात घ्यावे. एक वर्षासाठी जकात खाजगीकरण करावे.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** व्यापाऱ्यांचे मत जाणुन घ्यावे. नंतरच निर्णय घेण्यात यावा.

**श्री. जयवंत ओक :** जकातीचे उद्दीष्टय पुर्ण झालेले आहे का? खाजगीकरण केल्यानंतर काय परिस्थिती बदलेल व खाजगीकरण करण्यात काही अडचण आहे का ? याचा खुलासा घ्यावा. स. सदस्यांनी आपापले मत मांडलेले आहे. व्यापाऱ्यांसह चर्चा करा.

**मा. सभापती :** या प्रस्तावासबंधीची सविस्तर माहिती मुख्य लेखाधिकारी यांनी द्यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** जकात खाजगीकरण प्रस्ताव दोन वर्षापासुन चर्चेत आहे. दोन वेळेस निविदा काढून प्रशासना मार्फत प्रयत्न झालेले आहेत. व्यापाऱ्यांचे मत लक्षात घ्यावे. अशी चर्चा आताच झाली पाहिजे. परंतु व्यापाऱ्यांसोबत आतापर्यंत तीन बैठका झालेल्या आहेत. तत्कालीन महापौर डॉ. कराड यांचे अध्यक्षते खाली बैठक झाली. त्यावेळी मा. आयुक्त शर्मासाहेब उपस्थित होते. त्यावेळी व्यापाऱ्यांनी असे आश्वासन दिले की, महानगरपालिकेचे जे टार्गेट ते पुर्ण करण्यात पुर्णपणे मदत होईल. परंतु असे निर्दशनास आले की, जे टार्गेट निश्चित केले होते ते पुर्ण झालेले नाही. याच दरम्यान जकात चोरी सुध्दा काही प्रकरणी उघडकीस आलेली आहेत. २८८ प्रकरणे उघडकीस आलेली आहेत. म्हणुन टार्गेट पुर्ण होत नाही म्हणुन जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे. व्याऱ्यांची पुर्णतः बाजु ऐकुण घेण्यात आलेली आहे. त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आहेत. जी आता जकात महापालिकेस देतात तीच रक्कम खाजगी अभिकर्त्यास द्यावी लागणार आहे. जे दर महापालिकेस निश्चित करेल त्या प्रमाणे जकात वसुल करणार आहोत. टेंडरमध्ये सर्व अटी नमुद झालेल्या आहेत. आता पुन्हा व्यापाऱ्यांचे मत जाणुन घेण्याची आवश्यकता वाटत नाही. निविदा काढल्या त्या वेळी बैठक घेतली त्यानंतर तत्कालीन महापौरांनी बैठक घेतली. तसेच अंतिम बैठक सुध्दा पुन्हा महापौर डॉ. कराड यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदस्यांनी सुध्दा खाजगीकरण करावे म्हणुन मत व्यक्त केले व प्रशासनातर्फे सुध्दा सभागृहास सांगु इच्छितो की, एक वर्षासाठी तरी खाजगीकरण करावे. निविदा काढण्यास मंजुर देत असेल तर १ जुलैचा जो कालावधी दिला त्या ऐवजी १ सप्टेंबर करावे. कारण एक महिना निविदा काढणे वगैरे या मध्ये जाणार आहे. तसेच वार्षिक जकातीचे जे मुल्य ठरविलेले आहे त्यात सुध्दा बदल होणार आहे. ठराव मंजुर करावयाचा असेल तर जे मुल्य आहे त्यात बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यात यावेत. आता निर्णय घेण्यात यावा. १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट असे वर्ष राहणार आहे. टार्गेट ६१ कोटीचे होते. रिवाईज मध्ये ५२ कोटी केले. वसुली ५१ कोटी झाली १ कोटीचा तोटा झालेला आहे. या वर्षी स्थायी समितीने ६३ कोटी निश्चित केलेले होते. सर्वसाधारण सभेत ६४ कोटी निश्चित करण्यात आले.

**मा. सभापती :** सर्व सदस्यांच्या भावना जाणून घेतलेल्या असुन माझे वैयक्तिक मत सुध्दा देणे योग्य वाटते. जकात खाजगीकरणाचे जे धोरण आहे यात मी ज्या पक्षाचे कार्य करतो त्या पक्षाचा यात विरोध आहे. २० वर्षापासुन मी या पक्षाचे काम करतो. म्हणुन या प्रस्तावात माझा विरोध राहील. परंतु हा धोरणात्मक निर्णय असल्याने व सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन निर्णय घ्यावयाचा आहे. त्यासाठी सर्वांनी हात वर करुन मत मांडावे त्यानुसार निर्णय घेता येईल (याच वेळी विरोध म्हणुन स. सदस्य श्री प्रशांत देसरडा

तसेच मा. सभापती श्री रतनकुमार पंडागळे यांनी हात वर केलेले नव्हते. उर्वरीत सर्व सदस्यांनी हात वर करुन संमती दर्शविली ) माझा या प्रस्तावास विरोध नोंदवुन व सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन हा प्रस्ताव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे. १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट असा कालावधी करण्यात येत आहे. तसेच ऑफसेट मुल्य काढणे इ. सर्व अधिकार मा. आयुक्तांना देण्यात येत आहेत.

**ठराव :**

जकात खाजगीकरणा संबंधी इतर महानगरपालिकेमधील पाहणी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार तसेच सभागृहात झालेल्या समितीच्या अहवालानुसार तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेची जकात वसुली खाजगी अभिकर्त्यामार्फत वसुल करण्यास बहुमताने मंजुरी देण्यात येते. खाजगी अभिकर्त्यामार्फत जकात वसुलीचा कालावधी १ सप्टेंबर २००२ ते ३१ ऑगस्ट २००३ असा ठेवण्यास आणि या कालावधी करीता शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार जकात वसुलीचे सुधारित वार्षिक मुल्य निश्चित करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यास बहुमताने मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००२-०३ या आर्थिक वर्षाकरीता माहे मार्च २००२ अखेर पर्यंतच्या स्पिल ओव्हरच्या कामांची अद्यावत यादी सर्व विभाग प्रमुखांकडुन प्राप्त झाली आहे. त्या प्रमाणे अद्यावत माहिती तयार करण्यात आलेली आहे. त्यानुसार ज्या लेखाशिर्ष अंतर्गत स्लिप ओव्हर रक्कम चालु आर्थिक वर्षातील नविन प्रस्तावित कामे रक्कमेपेक्षा करण्यात आलेली तरतुद जास्त आहे किंवा ज्या लेखाशिर्ष अंतर्गत अतिरिक्त रक्कम उपलब्ध आहे. अश्या सर्व लेखाशिर्ष अंतर्गतची रक्कम ज्या लेखाशिर्ष अंतर्गत कमी पडते, त्या लेखाशिर्षात वळती करावी. लागते व ज्या लेखा शिर्ष अंतर्गत ठेवलेली तरतुद स्पिल ओव्हरच्या रक्कमेपेक्षा कमी आहे. अश्या लेखाशिर्ष अंतर्गत चालु आर्थिक वर्षात प्रस्तावित केलेली कामे करावी लागतील किंवा जी कामे करणे गरजेची आहेत ती प्राध्यान्यानुसार उपलब्ध रक्कमेपर्यंत करावी लागतील.

चालु आर्थिक वर्षात विभागाने सादर केल्याप्रमाणे स्पिल ओव्हर रक्कम रु. १४.८० कोटी व विभागाने प्रस्तावित केलेली सर्व कामाची रक्कम रु. ३१.८२ कोटी आहे. त्यानुसार एकुण रु. ४६.६१ कोटी इतका निधी लागेल. परंतु चालु आर्थिक वर्षात सर्व विभागासाठी विविध लेखाशिर्ष अंतर्गत एकुण ४४.७३ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. त्या प्रमाणे एकुण १.८९ कोटीने तरतुद कमी पडते. त्यामुळे सन २००२-०३ या आर्थिक वर्षात प्रस्तावित केलेली एकुण कामातुन रु. १.८९ कोटी इतक्या रक्कमेची कामे रद्द किंवा कमी करावी लागतील. उर्वरीत ज्या कामांची नितांत गरज आहे अशीच कामे हाती घ्यावी लागतील व अशी सर्व कामे त्या त्या विभाग प्रमुखांनी ठरविणे योग्य राहील. करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** जकात खाजगी करण्याचा निर्णय आताच घेतलेला आहे. वसुलीत वाढ होणार आहे. त्यामुळे विकास कामे होतील. म्हणुन हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**मा. सभापती :** कोणती कामे कमी करावी, कोणती ठेवावी हा मोठा प्रश्न आहे. म्हणुन या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात येईल.

**ठराव :**

सदरील प्रस्तावर निर्णय घेण्याकरीता स्वतंत्र्य बैठकीचे आयोजन करण्यात यावे जो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांचे मार्फत महावीर चौकात बांधण्यात येणाऱ्या उड्डाण पुलास या पुर्वीच २.५.२००२ रोजी म.न.पा. कडुन ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

महावीर चौक येथे बांधण्यात येणाऱ्या उड्डाण पुलाचे नकाशा (प्लॅन) म.न.पा. औरंगाबाद यांचे कडुन संमती पत्र देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येतो. सदरहु नकाशा (प्लॅन) नुसार उड्डाण पुलाचे बांधणीसाठी महावीर स्तंभचे वर चिंचोळी ओपन टु स्काय डक्ट प्रस्तावित आहे. सहा ओपन डक्टची रुंदी मध्ये भागात ६.६० मी. (२१ फुट ८ इंच) आहे. महावीर स्तंभाचे पेडेस्टल भविष्यात पुलाचे बांधणी अनुरुप फेररचना करण्याबाबत प्रस्तावित आहे. सदा फेररचना करण्याबाबत प्रस्तावित आहे. सदर फेररचना महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांचे मार्फत उड्डाण पुल बांधणी सोबतच प्रस्तावित आहे. करीता प्रकरणी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांचेकडुन महावीर चौकात बांधावयाचे उड्डाण पुलाचे नकाशात (प्लॅन) संमती पत्र देण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभागृहाचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. प्रशांत देसरडा :** महावीर स्तंभ काढणार काय ? त्या जागेवरुन हलवणार का? जागा कमी करणार काय? खुलासा द्यावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी सविस्तर माहिती द्यावी.

**अति. शहर अभियंता :** महावीर चौक येथे उड्डाण बांधावयाचा आहे. महावीर स्तंभ खाली घ्यावयाचा आहे. ओपन टू स्काय करुन एक डक्ट सोडुन त्याची फेररचना करावी लागणार आहे. फेररचना करावी लागणार आहे. फेररचनेमध्ये महावीर स्तंभ वर घेऊ शकतो. त्यासाठी ६.६० मी (२१फुट ८ इंच) जागा ओपन सोडत आहेत. या ओपन स्पेसमध्ये महावीर स्तंभाची फेररचना करु शकतो. हा सर्व खर्च महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ करणार आहे. त्यासाठी फक्त एनओसी द्यायची आहे.

**श्री प्रशांत देसरडा :** लेखी पत्र घ्यावे. महावीर स्तंभाला काढण्यात येवु नये. काढले तरी जशास तसे वर घेता येत असेल व तशी कार्यवाही त्या विभागाकडुन होत असेल तर तसे लेखी पत्र घ्यावे कारण मागे काही कामे या विभागाकडुन झालेली असून या शहराचे तत्कालीन महापौर डॉ. कराड यांना एका कार्यक्रमात भाषण होऊ दिले नाही. अपमान केलेला होता.

**अति. शहर अभियंता :** स्तंभाला हात लावणार नाही. फ्लायओव्हरची उंची वाढवायची की, वरती घ्यावचा हा निर्णय घेण्यात यावा.

**श्री. जयवंत ओक :** स्तंभ ज्या पध्दतीने बांधलेला आहे तो तसाच राहावा जनतेला चांगले कसे दिसेल या दृष्टीने वेगळे काही करु नये. प्लॅन कसा आहे. नकाशा सादर करावा परिस्थिती समजेल. संबंधित विभागाची तशी लेखी संमती घ्यावी काही बदल होता कामा नये.

**श्री. प्रशांत देसरडा :** नाहरकत प्रमाणपत्र देतांना तसे लेखी पत्र घ्यावे. स्तांभामध्ये काहीही बदल होणार नाही. जशाच्या तसा राहील असे लेखी घेण्यात यावे. (याच वेळी संबंधित अधिकारी सदर जागेचा नकाशा दाखवितात.)

**मा. सभापती :** स. सदस्य श्री ओक, श्री, देसरडा यांनी केलेल्या सुचनेची नोंद घ्यावी. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. स्तंभामध्ये कोणताही बदल न होता कार्यवाही करावी. तसे पत्राने त्या विभागास कळवुन पुढील कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांचे मार्फत महावीर चौकात बांधण्यात येणाऱ्या उड्डाण पुलाचे नकाशा (प्लॅन) "महावीर स्तंभामध्ये कोणताही बदल होणार नाही" या अटीवर संमती पत्र देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचा विषय

**मा. सभापती :** एनवेळी प्रशासनाने एक प्रस्ताव दिलेला आहे. सुशिक्षीत बेरोजगारा संबंधीचा प्रस्ताव आहे. संबंधित अधिकारी वाचून दाखवतील विषय घ्यावयाचा किंवा काय हे सभागृहाने ठरवावे.

**प्रकल्प संचालक :** विषय वाचून दाखवितात.

**विषय क्र. ३० :**

शासन निर्णय क्र. सुबयो/१०/२००१/११४०/प्र. के./४७ नवि-३३ मंत्रालय - ३२ दि. २४.९.२००१ नुसार स्थानीक दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील प्रशिक्षीत बेरोजगारांना रोजगाराच्या रुपाने दैनदिंन तंत्र कौशल्याची उदा. इमारती निर्मीती, दुरुस्तीची कामे, सुतार काम, नळ दुरुस्ती, इलेक्ट्रीशियन, टि.व्ही. रेडीओ, रेफ्रीजरेटर दुरुस्ती आणि तत्सम सेवा पुरवून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करण्याच्या दृष्टीने लोकसेवा केंद्र स्वयंसेवी संस्था मार्फत सुरु करणे आहे. उदा. एखाद्या नागरीकास आपल्या घरचा फॅन दुरुस्त करावयाचा असल्यास नागरीक प्रशिक्षीत व्यक्तीच्या सेवीची मागणी दुरध्वनीवर नोंदवतील निर्धारीत दरपत्राकानुसार वरील सेवा प्रशिक्षीत बेरोजगारांकडुन केंद्रामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.

योजना व अटी शर्ती खालील प्रमाणे :-

१) लोकसेवा केंद्रासाठी दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीतुन लाभर्थ्यांची प्रशिक्षणासाठी निवड करुन त्यांना शासनाच्या खर्चाने प्रशिक्षण देण्यात यावे. किंवा यापुर्वी प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांना या योजनेत सहभागी करुन घ्यावे.

२) लाभार्थ्यांना दुरुस्तीचे साहित्य/अवजारांची पेटी योजनेच्या अनुदानातुन द्यावी. त्यासाठी रु. ६००/- ची मर्यादा विचारात घ्यावी.

३) महापालिकेच्या जागेत सुमारे १५"X१५" चे बांधकाम योजनेच्या निकषास अधिन राहुन सेवा केंद्र स्थापन करण्यात यावीत. त्यामध्ये प्रशिक्षीत तरुणांना बसण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध असावी. उपलब्ध समाज मंदीराचा वापर यासाठी करता येईल.
४) या समाज सेवा केंद्राच्या बांधकामाचा खर्च व इतर अनुषंगीक खर्च अंदाजे रुपये दोन लाखापर्यंतच्या मर्यादेत योजने अंतर्गत मुलभूत सोयीसाठी सहाय्य (युएसईपी इन्फ्रास्ट्रक्चर) तसेच सामाजिक संरचना या घटकांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीमधुन भागविण्यात यावा असे शासनाचे आदेश आहेत.
५) लोकसेवा केंद्रासाठी आवश्यक असलेले फर्निचर व एक दुरध्वनी महानगरपालिकांनी मोफत पुरवावयाचा असुन त्यावरील आवर्ती /अनावर्ती खर्च त्यांनीच स्वनिधीतुन भागवावा.
६) समाज सेवा केंद्रात नागरीकांची "सेवा तक्रार नोंदवही " ठेवण्यात यावी.
७) सेवा केंद्रा मार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांचे वाजवी दरे समाज विकास संस्थानी /महानगरपालिकांनी निश्चित करावेत.
८) सेवा केंद्रातील संबंधीत प्रशिक्षीत लाभार्थ्यांची नांवे नोंदविले ओळखपत्र देणे ही जबाबदारी महानगरपालिकांची राहिल.
९) सेवा केंद्राची माहिती महानगरपालिकांनी सर्व नागरीकांना स्थानीक केबल टी.व्ही. द्वारे (लोकल टि.व्ही. चॅनल) माहिती देण्यात यावी.
१०) सेवा केंद्राच्या बाजुला दुरुस्ती साठी आवश्यक असलेल्या सुटया भागाचे दुकान योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी उघडण्यात यावे.
११) सेवा केंद्राच्या दुरस्ती देखभालीची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.
१२) शासनाने महानगरपालिका/नगरपरिषदांना समान केंद्रास्थापन करण्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलबध करुन द्यावा. प्रसिध्दीचा भाग म्हणुन मा. महापौरांनी बातमी प्रकाशीत करुन योजना जाहीर केली. त्यास प्रतिसाद म्हणुन खालील संस्थांचे अर्ज प्राप्त झाले.

अ) सिडको भागासाठी झोन क्र. ७ येथील इमारतीमध्ये युवा सुशिक्षीत बेरोजगांराची रोजगार व स्वयंरोजगार संस्था हर्सुल, औरंगाबाद
ब) बन्सीलाल नगर सांस्कृतीक हॉल, येथील लोकसेवा केंद्र, महाराष्ट्र विकास युवा केंद्र दोन अशी दोन्ही संस्थाना चालविण्यास देणे बाबत दि. १४.२.२००२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

सदर दोन्ही संस्थाना मान्यता देणे बाबत तसेच लोकसेवा केंद्रांची व्यापक स्वरुपात प्रसिध्दी मिळविण्यासाठी एसीएन वर जाहिरात देणे योग्य. एक महिन्यासाठी रु. ४५००/- खर्च अपेक्षित आहे.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** जे सुशिक्षत बेरोजगार आहेत या सर्वांनाच या योजनेचा फायदा घेता येऊ शकतो. स्लम भागातील बेकारांना सुध्दा हे प्रशिक्षण घेता येऊ शकते. ५२ स्लम भाग आहेत. या भागातील दारिद्रय रेषेखालील सुशिक्षीत बेरोजगांराना सुध्दा संधी मिळावी. दोन केंद्र न ठेवता जास्त ठेवावे. अनुदान किती आलेले आहे, खुलासा करावा.

**श्री कैसर खान :** आमच्या भागात घ्यावे.

**श्री जयवंत ओक :** किराडपुरा, रोशनगेट, चिकलठाणा, मुकूंदवाडी आशा घ्यावे.

**डॉ. आशा बिनवडे :** तात्काळ व जलद करावे. मंजुरी घ्यावी. १००% झोपटपट्टीत राबवावी. दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी योजना आहे. कधी पेपरला आले.

**प्रकल्प संचालक :** संपुर्ण योजना बातमी म्हणुन झालेली आहे.

**मा. सभापती :** जाहिरात द्या. एक उर्दु पेपरला द्या. टारगेट किती किती लोकांना दिले, किती परत गेले?

**प्रकल्प संचालक :** १३६५ पैकी ४८५ आले. अनुदान परत जात नाही. आपण जाहिरात दिल्या. सर्व प्रयत्न करुन ४८५ आले.

**डॉ. आशा बिनवडे :** या विभागामार्फत मागे योजना राबविण्यात आलेली होती. १३६५ प्रशिक्षणार्थी घ्यावयाचे होते. त्यापैकी ४८५ च बेकार युवक मिळाले का प्रतिसाद मिळाला नाही?

**प्रकल्प संचालक :** या वर्षी पुन्हा प्रशिक्षणार्थींचे टारगेट पुर्ण करावे. लागणार आहे. बऱ्याच वेळा जाहिराती दिल्या, तसेच वार्डात सर्वेक्षणचे सुध्दा काम केलेले होते. सर्व प्रयत्न करुन सुध्दा ४८५ बेरोजगार युवक आपल्याला उपलब्ध झालेले आहेत. आपण जेव्हा जाहिरात दिली तेव्हाच महात्मा फुले महामंडळ, अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, वसंतराव नाईक विकास महामंडळ, अब्दुल कलाम आझाद महामंडळ या सर्व महामंडळाच्या जाहिराती त्याच दरम्यान आलेल्या होत्या. त्यामुळे सर्व बेरोजगार युवक आहेत ते विभागले गेले. त्यामुळे प्रतिसाद कमी मिळाला.

**श्री. जयवंत ओक :** स्वेच्छा निधीतुन वाहन चालक, संगणक तसेच रुग्णांसाठी मदत दिली जात होती. शासनाने बंद केलेले आहे. त्यावर या सभागृहात पुन्हा चर्चा होऊन प्रस्ताव मंजुर केलेला होता. शासनाकडुन काय मार्गदर्शन आलेले आहे. आले नसेल तर मंजुरी येईल या अधीन राहुन स्वेच्छा निधीतुन मदत देण्यात यावी. तसे रूलींग देण्यात यावे.

**मुख्य लेखाधिकारी :** या संबंधी शासनाचे काहीही काहीही मार्गदर्शन आलेले नाही.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** जे दारिद्रय रेषेखाली येत नाही त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. दारिद्रय रेषेखालील व्यक्तींचा सर्वे झाला आहे का? जे आहेत त्यांना वगळलेले आहे. याबाबत कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** असें निदर्शनास आल्यास त्यांना यादीतुन काढण्यात यावे. व जे खरोखरच दारिद्रय रेषेखालील येतात त्यांचा यादीत समावेश करावा.

**डॉ. आशा बिनवडे :** पावसाळयाचे दिवस सुरु झालेले आहेत. जे गॅस्ट्रोचे रुग्ण वाढलेले आहेत. जे रुग्ण दवाखान्यात दाखल झालेले आहे त्या त्या भागातील दुषित पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविलेले होते. त्याचा रिर्पोट सादर झालेला आहे का? काय उपाय योजना केली. क्लोरीन हॅलोजन गोळया वाटप केले का?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** ब्रिजवाडी येथे साथ होती. झाल्टा येथे लग्नास लोक गेले होते. दुषित पाणी पिण्यामुळे झाले असावे. क्लोरीन वाढवण्याकरीता सांगण्यात आले आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** किती टक्के क्लोरीनचा ड्रॉप दिल्या जातो ? ३३% ड्रॉप मध्ये. गोळयात किती प्रमाण असते?

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णयानुसार स्थानीक दारिद्रय रेषेखलील कुटूंबातील प्रशिक्षीत बेरोजगारांना रोजगाराच्या रुपाने दैनंदिन तंत्र कौशल्याची कामे आणि तत्सम सेवा पुरवून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करण्याच्या दृष्टीने प्रस्तावातील अ. क्र. १ ते १२ च्या अटी व शर्तीस अधिन राहुन

अ) सिडको भागसाठी झोन क्र. ७ येथील इमारती मध्ये "युवा सुशिक्षीत बेरोजगारांची रोजगार व स्वयंरोजगार संस्था हर्सुल औरंगाबाद " व

ब) बन्सीलालनगर सांस्कृतीक हॉल येथील लोकसेवा केंद्र महाराष्ट्र विकास युवा केंद्र अशा दोन्ही संस्थांना चालविण्यास देणेत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच लोकसेवा केंद्राची व्यापक स्वरुपात प्रसिध्दती मिळण्यासाठी एसीएन वर जाहिरात देण्याकरीता एक महिण्यासाठी रु. ४५००/- अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**श्री. हिदायत अली :** अग्निशम अधिकारी यांची वेतनवाढ थांबविलेली होती. तसा प्रस्ताव आलेला होता. प्रस्ताव स्थगित ठेवुन अहवाल मागविण्यात आला होता. अहवाल प्राप्त झालेला असुन प्रस्ताव मंजुर करावा. चांगली सेवा करीत आहेत.

**मा. सभापती :** ऐनवेळचा विषय घेण्यात येत आहे.

**विषय क्र. ३१ :**

मुख्य अग्निशमन अधिकारी श्री एस. बी. झनझन यांची मारुती जिप्सी क्र. एम.एच.२०-ए-३३३३ साठी रेडीयल टायर खरेदी प्रकरणात गोठविलेली वेतनवाढ पुर्ववत चालु करण्या संदर्भात अपील. (स्थायी समिती ठराव क्र. १०२/२०, दिनांक २७.३.२००२ अन्वये स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव.

**मा. सभापती :** दिनांक २७.३.२००२ रोजी स्थायी समिती सभेत ठरल्यानुसार प्रशासनातर्फे या प्रकरणी अभिप्राय दिलेला असुन त्यानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी यांची कार्यालयीन आदेश क्रमांक ३२३/२००१ अन्वये एक वर्षासाठी रोखण्यात आलेली वार्षीक वेतनवाढ पुर्ववत चालु करण्यास सहमती दर्शविण्यात आलेली आहे. त्या अहवाल नुसार वेतनवाढ पुर्ववत चालु करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**ठराव :**

श्री. एस. बी. झनझन, मुख्य अग्निशनम अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांची कार्यालयीन आदेश क्र. ९२३/२००१ दि. २३.०२.२००१ अन्वये रोखण्यात आलेली देय वेतनवाढ पुर्ववत चालु करण्यास (प्रशासनाचा अहवाल विचारात घेऊन ) सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-

नगरसचिव सभापती (स्थायी समिती)

महानगर पालिका, औरंगाबाद महानगर पालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ४.७.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक ४.७.२००२ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे याचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त यांचे सह संबंधित अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री प्रशांत देसरडा
२. श्री जयवंत (बंडु) ओक
३. श्री किशोर शिंदे
४. श्री ठकुजी रामसिंग वाणी
५. श्री मीर हिदायत अली
६. श्री कैसर खान बद्रोद्दीन खान
७. श्री चंद्रशेखर जैस्वाल
८. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
९. श्रीमती पार्वतीबाई मानकापे
१०. सौ. ताराबाई जेजुरकर
११. शे. इलियास किरमाणी

**विषय क्र. ३२ :**

दिनांक १३/६/२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** इतिवृत्तातील पान क्र. १७ वर विषय क्र. २३ च्या बाबतीत मुख्य लेखा परीक्षक यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखा परिक्षक :** मागील बैठकीत विषय क्र. २३ च्या संदर्भात खुलासा देण्याबाबत सुचना देण्यात आल्या. संचिकेची पाहणी केली. मुळ निविदा मध्ये रु. ४०००/- प्र. चौ. मी. हा दर निश्चित केला. ज्यांनी टेंडर भरले त्यांनी ७५/- रु. प्र. चौ. मी. दर भरलेला होता. गाळे बांधण्यापुर्वी शहर अभियंता यांचे मार्फत निविदा मागविल्या होत्या. गाळे पुर्ण झाले त्या नंतर जी काही कार्यवाही होणार होती ती मालमत्ता विभागाकडुन झाली. परंतु मालमत्ता अधिकारी यांचे कडुन हे दुकान गेलेले आहे ही माहिती न गेल्यामुळे हे दुकान पुन्हा लिलावामध्ये ठेवण्यात आले. या साठीचा जो लिलाव होता त्यात भाडयाचे दर तेच होते. डिपॉझिट वाढलेले होते. भाडयाचा दर रु. ६०/- प्रती चौ. मी. मागील बाजुच्या दुकानाचा रु. ५०/- प्रती चौ.मी. होता. डिपॉझिट म्हणुन ४०००/- रु. दर होता. निविदा रु. १ लक्ष २१ हजार आले. मुळ ५८ हजार मिळणार त्या ऐवजी १.२१ लक्ष प्राप्त झाले त्यामुळे महापालिकेस ६३ हजार रुपये जास्त प्राप्त झाले. आता हे दुकान लिलावामध्ये टाकल्याने ज्यांना मुळ रु. ७५/- प्रती चौ. मी. प्रमाणे दुकान

दिले होते त्यांना दुसरे दुकान देण्याचा जो प्रस्ताव आहे यात भाडे रु. ६०/- प्रती चौ. मी. व डिपॉझिट ४०००/- रुपये असे केलेले आहे. यात १५/- रु. प्रती चौ. मी. प्रमाणे नुकसान होणार आहे परंतु जे ६३ रुपये जास्त आलेले आहे त्यावर साधारण:१२% प्रमाणे व्याज दर आकारला तर महापालिकेस ७५६०/- रुपये व्याज मिळते. भाडयाचे जे नुकसान होते ते २६१०/- रुपये होते आणि यात ४९५०/- रुपये फायदा आहे. त्यामुळे प्रस्ताव मान्य करण्यात फायदा आहे.

**श्री प्रशांत देसरडा :** पाच वर्षानंतर भाडेवाढ केली तर फायदाच होणार आहे का ?

**मुख्य लेखा परिक्षक :** या नुसार २५ वर्षापर्यंत महापालिकेस फायदाच होणार आहे.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. बीफ संदर्भात मागील बैठकीत चर्चा झालेली होती. त्या संदर्भात संबंधीत अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**संचालक (प्रा. स.) :** मागील बैठकीत वेळेसच्या अगोदरची परिस्थिती अशी की, संबंधीत जे बीफ पुरवठा करीत होते त्यांनी पत्र देवुन पुरवठा करणार नाही असे कळविले होते परंतु नंतर पुन्हा : पत्र दिले की, पुरवठा पुर्ववत चालु ठेवणार. मागील वर्षी रु. २३/- प्रती किलो व या वर्षी रु. ९.९० दर मान्य केले आहे.

**मा. सभापती :** सविस्तर माहिती देण्यात यावी. नविन आयुक्त आलेले आहेत. मा. आयुक्तांना या बाबतीत काहीच माहिती नाही. सविस्तर माहिती दिल्यास प्रकरण समजुन येईल.

**संचालक (प्रा.स.) :** गेल्या वर्षी २३/- रु. प्रति किलो प्रमाणे बीफ खन्नी घेतलेली आहे. या वर्षी साठी टेंडर काढण्यात येऊन दर मागविले असता ९.९० रु. प्रमाणे पुरवठा करण्याबाबत टेंडर भरुन आले. त्यानुसार संबंधीत गुत्तेदार हे पुरवठा करीत आहे. सभागृहात चर्चा झाली. त्यावेळी सभागृहात वेगवेगळया प्रकारच्या सुचना प्रश्न स. सदस्यांनी मांडले. त्यात स. सदस्यांनी ९.९० रनु. प्र. की. प्रमाणे बीफ खन्नी देण्यास परवडतेय का? चांगल्या प्रतीचे बीफ देणार नाही. मार्केटचे दर वाढुन आहेत. असे प्रश्न विचारण्यात आले. तसेच निकृष्ट दर्जाचे दिल्यास जनावरे दगावतील असे प्रश्न उपस्थित झाले. जनावरांना मांस दिला जातो स्लॉटर हॉऊसमध्ये काढले जाते व महापालिकेच्या गाडीमध्ये प्राणी संग्रहालयात आणले जाते. त्यावेळी कर्मचारी बरोबर असतात. कोणत्याही प्रकारचे निकृष्ट यात मिक्स करुन आणले जात नाही. याची काळजी घेतली जाते. संबंधीत पुरवठा धारक यांनी मा. आयुक्त यांचे नावाने दिनांक १२.६.२००२ रोजी पत्र देवुन बीफ खन्नी पुर्ववत चालु ठेवण्याबाबत कळविलेले ते पत्र माझ्याकडे दि. १४.६.०२ ला आलेले आहे.

**मा. सभापती :** संबंधित पुरवठा धारक यांनी यापुर्वी बीफ खन्नी पुरवठा बंद करण्याबाबतचे पत्र दिलेले होते. पुन्हा पत्र देवुन पुरवठा करण्यात येईल म्हणुन पत्र दिले. सत्य परिस्थिती काय ? (दिलेले पत्र सभागृहात वाचुन दाखवावे.)

**संचालक (प्रा. सं.) :** या पत्राची प्रत आपल्याकडे दिलेले आहे. पत्रात असे नमुद केले की, मी अर्जदार वरील विषयी विनंती करतो की, प्राणी संग्रहालय, औरंगाबाद येथे बीफ पुरवठा करण्या संदर्भात दि. ८.२.०२ रोजी निविदा भरलेली होती. ती कार्यालयाने मंजुरही केलेली आहे. निविदेमध्ये दिलेले दर रुपये ९.९० प्र. की. प्रमाणे मी १.४.२००२ पासुन बीफ खन्नी पुरवठा दररोज नियमीतपणे करीत आहे. यासाठी अनामत रक्कम मी ५०,०००/- महापालिकेत जमा

केलेली आहे. मी आपणाकडे बीफ खन्नी पुरवठा करीत आहे. व करीत राहील. याबाबतीत मी कोणत्याही प्रकारचा खंड पडु देणार नाही. आपल्या आदेशाप्रमाणे मी पुरवठा करीत आहे. दिनांक ३१.५.२००२ रोजी मी बीफ पुरवठा बंद करीत असल्याबाबतचे पत्र दिले होते. परंतु तो अर्ज मी माझ्या संपुर्ण विचारांती रद्द करीत आहे व प्राणी संग्रहालयात मी नियमीतपणे बीफ पुरवठा करीत आहे व नियमीत करीत राहील.

**मा. सभापती :** सुरुवातीस जे पत्र दिले तेव्हा मी आजारी आहे मानसिक तणाव होत आहे. आर्थिक परिस्थिती चांगली नाही. असे पुरवठाधारक यांनी नमुद केले होते. पुन्हा पुरवठा नियमित करण्यास तयार आहे असे पत्र दिले. त्यांची प्रकृती खरोखरच खराब होती का? हे सुध्दा तपासले पाहिजे.

**संचालक (प्रा.स.) :** या पुर्वी जे पत्र दिले त्यांनी मेडीकल प्रमाणपत्र सादर केलेले होते.

**श्री जयवंत ओक :** मागील वर्षी २३/- रु. प्रती किलो प्रमाणे बीफ घेतले मार्केटमध्ये ३९ ते ४० रु. प्र. की. प्रमाणे दर आहेत. संबंधित पुरवठाधारक ९.९० रु. प्र. की. प्रमाणे कसा पुरवठा करु शकतो त्यांना परवडणारे आहे का? चांगल्या प्रतीचे बीफ देणार का, प्राणी संग्रहालयात लाखो रुपये खर्च करुन मोठमोठे प्राणी आणलेले आहेत. चांगल्या प्रतीचे बीफ घ्यावयास पाहिजे. नसता संबंधीताने पत्र दिले. पुरवठा बंद करणार. पुन्हा पत्र देतात चालु करणार. निकृष्ट दर्जाचे दिल्यास यात जबाबदार कोण राहणार आहे ? एक-दोन दिवस बीफ तपासणी होईल. नेहमीच तपासणी होईल का ? नंतर जनावरे दगावतात. वृत्तपत्रात बातम्या येतात. सभागृहात चर्चा होते. महापालिकेचे नांव बदनाम होते. यामुळे महापालिकेचे मोठया प्रमाणात होऊ शकते. चांगल्या प्रतीचे  घ्यावे. मागील वर्षी २३/- प्रमाणे घेतले. ९.९० रु. प्रमाणे पुरवठा करणार या संदर्भात तात्कालीन आयुक्त शर्मा साहेब यांनी सुध्दा नाराजी व्यक्त करुन ९.९० रु. प्र. की. प्रमाणे त्याला पुरवठा करणे परवडणारे नाही. ठिक आहे. टेंडर आले. नियमाने घेत आहे. चांगल्या प्रतीचे मिळावे. या संदर्भात १ ते २ दिवसात योग्य तो निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करावी.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** ढोर मेले, रिक्षाने आणले तरी रु. ९.९० प्र. की. प्रमाणे परवडणार नाही. ९.९० रु. प्रती किलो प्रमाणे पुरवठा करण्यास का तयार आहे. याची सखोल माहिती घेतली पाहिजे. दोन तीन बैठकी पासून सतत या विषयावर चर्चा होत आहे. योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

**मा. सभापती :** संबंधित पुरवठा धारक यांनी आतापर्यंत दोन पत्र दिले. त्या पत्रासह संबंधित अधिकारी यांनी पुरवठाधारक यांना मा. आयुक्तांच्या दालनात बोलवावे. मी सुध्दा उपस्थित राहिल. मा. आयुक्तांशी चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**संचालक (प्रा.स.) :** दि. १७.५.०२ च्या बैठकीतील पाच विषयातील लुर्सन घास पुरवठा करण्या संदर्भात प्रस्ताव होता. या प्रस्तावामध्ये नावात दुरुस्ती करायची असून दुरुस्त प्रस्ताव सादर केलेला आहे.

**मा. सभापती :** दुरुस्त प्रस्ताव नगर सचिव यांनी सभागृहाला वाचून दाखवावा. (न.स. प्रस्ताव वाचून दाखवितात.)

**मा. सभापती :** दुरुस्त प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**श्री प्रशांत देसरडा :** बजेट मंजुर करतांना स्थायी समितीने पाच महत्त्वाचे प्रस्ताव सुचविलेले होते. ते ठळक वैशिष्टयामध्ये आलेले आहेत. मागील इतिवृत्तातील पान क्र. ६ वर तशी सुचना मी मांडलेली होती. त्या संदर्भात प्रशासनाने काय कार्यवाही केली. या मध्ये ज्या प्रॉपर्टीला कर लाभलेला नाही त्या बाबतीत सर्वेक्षण करणे तसेच ज्या वार्डात मालमत्ता कराची जास्त वसुली झाली अशा वार्डात खाजगी अभिकर्त्यामार्फत साफसफाई करता येईल का ? असे सुचविलेले होते. तसेच आपल्याकडे विद्युत विभागामध्ये कर्मचाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. सिडको प्रशासनाने जसे विद्युत विभागाची देखभाल दुरुस्तीची कामे खाजगी अभिकर्त्यामार्फत करतात त्या प्रमाणे महापालिकेने सुध्दा किमान १० वार्डाचे करण्याचा निर्णय घेतलेला होता. टेंडर मागवावे असा निर्णय घेतला तरी सुध्दा अद्याप कार्यवाही नाही. तसेच कर आकारणीची ७०० प्रकरणे प्रलंबित आहेत. ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी दर मंगळवारी बोलावुन सुनावणी देणार होतो. तरी त्यांना सुनावणी द्यावी. निकाली काढावेत. मालमत्ता करात १० ते १५ लक्ष वाढ होऊ शकेल. कधी अमंलबजावणी करणार?

**श्री किशोर शिंदे :** एका वार्डसाठी किती लाईनमन दिलेले आहेत. याची माहिती यावी. अशी माहिती मिळाली की, काही लाईनमन कामेच करीत नाही.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** विद्युत विभागाकडुन लाईटच्या बाबतीत फार जास्त सहन कराव्या लागतो. बऱ्याच वेळा फोन करुनही काम होत नाही. उदाहरण द्यावयाची गरज नाही. या विभागाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, लाईनमन यांना वेळोवेळी सुचना करुनही कार्यवाही होत नाही.

या विभागाच्या संपुर्ण कारभार गलथान झालेला आहे.

**श्री ठकुजी वाणी :** विद्युत विभागाचे कोणत्या वार्डात कोणती कामे प्रलंबीत आहेत किंवा करण्याची आवश्यकता आहे याची संबंधित अधिकाऱ्यांनीच पाहणी करुन कार्यवाही करावयास पाहिजे. स. सदस्यांना बोलण्याची वेळ येऊ देऊ नये. संपुर्ण वार्डाचा सर्वे करण्यात यावा.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** स्वेच्छानिधीतुन सुध्दा कामे होत नाही. वार्डात कर्मचारी येतात. जी लाईटची कामे केली जातात केव्हा येतात केव्हा जातात, याची स. सदस्यांना माहिती दिली जात नाही. चांगले प्रतीचे लाईट दुसऱ्या जागेवर नेऊन लावतात. त्या जागेवर जुन लाईट बसवितात अशी शंका येते व लगेच हे लाईट बंद पडतात. जो कर्मचारी काम करण्यास येतात त्या त्या वार्डातील सदस्यांना माहिती दिली पाहिजे.

**श्री जयवंत ओक :** या शहराची स्वच्छता झाली पाहीजे. या बाबतीत नविन आयुक्तांनी लक्ष घातलेले आहे. त्याबद्दल सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन. विद्युत विभागाकडे लाईटच्या बाबतीत सतत मागणी होत आहे. लोकांच्या तक्रारी येत आहेत. त्या तक्रारींचे निवारण करण्या इतपत महापालिकेकडे तेवढे विद्युत साहित्य आहे का? शहरात जेवढे लाईट बंद झाले ते बंदच आहे. चालु करण्यासाठी नगरसेवकांनीच तक्रार करायची का ? हे काम प्रशासनाचे आहे. सर्व्हे करुन कोठे लाईट बंद आहे, कोठे लावण्याची आवश्यकता आहे हे काम प्रशासनाचे आहे. त्या नुसार कार्यवाही करण्यात आली पाहिजे. या पुर्वी विभागामध्ये विद्युत विभागासंबंधीत ज्या ज्या तक्रारी येतात त्यांनी नोंद करण्यासाठी एक रजिस्टर ठेवलेले होते. त्या नुसार त्या त्या झोन अंतर्गत जे ई. व इतर

कर्मचारी प्रत्यक्ष जाऊन तक्रारींचे निवारण करीत असे. व त्यावर संबंधीत नगरसेवकांचे काम केल्याबद्दल स्वाक्षरी घेत असे. परंतु ती पध्दत अता बंद केलेली आहे. यासाठी वार ठरवुन द्यावे. कोणत्या वार्डातील कामे केव्हा होणार. शहरामध्ये ३०/४० टक्के लाईट बंद आहेत. बंद असले तरी विद्युत देयकाची जी आकारणी होते ती होतेच. म्हणुन या पुढे नोंदवही ठेवण्याची पध्दत चालु करावी. त्या नुसार तक्रारीचे निवारण तात्काळ करता येते. जनतेला लाईट, पाणी, ड्रेनेज तसेच नाल्याची साफसफाई इ. सुविधा देण्याची आवश्यकता आहे. हीच अपेक्षा जनतेला आहे. अधिकारी/कर्मचाऱ्यांना फोनवर विचारणा केली तरी साईटवर गेलेले आहे असे उत्तर मिळते. साईटवरही अधिकारी /कर्मचारी नसतात. कामे होत नाही म्हणुन जनता आम्हाला त्रास देते. आम्ही अधिकाऱ्यांना बोलतो. सहा-सहा महिने लाईट लावले जात नाही. ही परिस्थिती कायम ठेवणे बरोबर नाही.

**श्री मीर हिदायत अली :** ४-४ वार्ड मिळुन एक लाईनमन दिलेले आहे. त्यामुळे कामे वेळेवर होत नाही. आज एक लाईनमन माझ्या वार्डात काम करण्यासाठी आले. त्यांचेकडे शिडी नव्हती. मी स्वत: २५० रुपये देऊन शिडी आाणण्यास सांगीतले. त्या नंतर त्यांनी काम केले अशी परिस्थिती असेल तर योग्य नाही. किमान १२५ वॅटचे मटेरियल नाही. त्यांचेकडे साहित्य नाही. निविदा अंतिम व्हावयास आली आहे. परंतु मटेरीयल आले नाही.

**श्री चंद्रशेखर जैस्वाल :** माझ्या वार्डात नेहमी लाईट बंद असतात. नविन साहित्य, बल्ब टाकतात परंतु नविन टाकलेले बल्ब जास्त काळ टिकत नाहीत. तात्काळ खराब होतात. जे जुने बल्ब आहेत ते जास्त दिवस टिकतात २-३ वर्षापासुन चालु आहेत. असे का होते ते तपासण्यात यावे. यावर एक कमेटी नेमावी.

**मा. सभापती :** १२५ वॅटचे बल्ब आलेले नाही का ? खुलासा द्यावा.

**उप. अभि. (वि.-१) :** १२५ वॅटचे २०० बल्ब शिल्लक असल्यामुळे तो आयटम घेण्यात आला नाही. दोन -तीन महिण्यामध्ये ते संपलेले आहे.

**श्री मीर हिदायत अली :** कोणत्या वॅटचे किती बल्ब आलेले होते. त्या बाबतची यादी देण्यात यावी. संबंधित अधिकारी सदस्यांना खरी माहिती देत नाहीत.

**श्री जयवंत ओक :** मनपा हद्दीत किती पोल आहेत, किती पोलवर १२५ वॅटचे बल्ब लागले जातात. सोडीयम व्हेपरचे किती, जी.आय. पोल किती, पोलच्या संख्येनुसार लाईटची मागणी केली जाते का? एक वर्षापासुन तक्रार दिलेली असतांनरा लाईटची व्यवस्था होत नाही. एखादा ठिकाणी उद्‌घाटनाचा कार्यक्रम होतो त्या ठिकाणी तात्पुरता १० ट्युब लागल्या जातात.पदाधिकारी मान्यवरांचे तेथे अभिनंदन होते. सर्व काही कार्यक्रम ठिक होतो. कार्यक्रम पार पडल्यानंतर उर्वरीत टयुब लागल्या जात नाहीत. त्यामुळे जनता उलट लगेच आम्हाला विचारते.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** माझ्या वार्डात स्वेच्छा निधीतुन कामे होत नाहीत. क. अभियंता कामे करीत नाही. त्यामुळे काम होत नाही. त्यांची काम करण्याची इच्छा नसेल तर त्वरीत बदली करावी. निधीतुन कामे करण्यास प्रशासनास काय अडचण येते?

**मा. सभापती :** विद्युत विभागाच्या संदर्भात स. सदस्यांना भावना तीव्र आहेत. सर्वांचे विचार ऐकले. लाईटची कामे करीत असतांना एम.एस.ई.बी. चे कर्मचारी सुध्दा

मनपास वेळेवर मिळत नाही. ही सुध्दा सत्य परिस्थिती आहे. म्हणुन कामे करण्यास वेळ लागतो. स. सदस्यांनी ज्या सुचना केल्या व भावना व्यक्त केल्या त्या संदर्भात श्री. डी. पी. कुलकर्णी हे विभाग प्रमुख आहेत. त्यांनी व उपआयुक्त श्री एम. वाय. कांबळे तसेच मुख्य लेखाधिकारी श्री. खैरनार यांनी एक सविस्तर टिप्पणी तीन दिवसात सादर करावी. नुकतेच केंद्र शासनाचे नगर विकास मंत्री या शहराला भेट देऊन गेले. हे शहर अत्यंत स्वच्छ व सुंदर आहे अशी स्तुती त्यांनी केलेली आहे. शहर स्वच्छ राहण्याच्या दृष्टीने शहरातील साफसफाई तसेच विद्युत व इतर विकास कामे वेळेवर होणे आवश्यक आहे. इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. असे मी घोषित करतो.

**श्री जयवंत ओक :** तक्रारीची नोंद घेण्यासाठी विद्युत विभागामध्ये रजिस्टर ठेवण्याचे आदेशित करावे.

**उप. अभि. (बी-१) :** या पुर्वी ज्या प्रमाणे नोंद रजिस्टर ठेवले जात होते त्या प्रमाणे कार्यवाही होईल.

**मा. सभापती :** नागरीकांना तक्रारी नोंदविण्यासाठी रजिस्टर ठेवण्याची कार्यवाही व्हावी.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** मंत्री महोदय आले. वार्डात फिरले नाही. वार्डात दररोज साफसफाई होत नाही. झोन अधिकारी यांना फोन करुन लेखी पत्र देऊन सुध्दा कार्यवाही होत नाही. तीन-तीन दिवस कचरा पडुन राहतो. झोन ऑफिसर ऐकत नाही. लोक आजारी पडतील. माझ्या वार्डात खुली जागा नाही.

**मा. सभापती :** मी स्वतः झोन अधिकारी यांना वार्डात घेऊन येईल.

**श्री मीर हिदायत अली :** तीन महिने झाले. देखभाल दुरुस्तीचे बजेट संपलेले आहे. आपण रस्ते खोदल्यानंतर दुरुस्तीसाठी चार्जेस वसुल करतो. त्या रक्कमेतुन पॅचवर्क करावे. ३ महिन्यात ही परिस्थिती आली. किराडपुरा ते जैस्वाल दवाखाना इतके खड्डे आहेत की बोलण्यासारखी बाब नाही. पण बोलावे लागते या खड्डामुळे दवाखान्यात जाताना एका महिलेचे रस्त्यातच रिक्षात बाळांतपण झाले. टेलिफोन खात्याकडुन मिळणारी रक्कम पॅचवर्कसाठी घ्यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** तेवढी रक्कम (सब्स्टीट युट अमाऊंट) वाढवुन घ्यावी लागेल. बजेट रिअप्रोप्रिएशन साठी मा. स्थायी समितीसमोर ठेवणार आहे. त्यास तरतुद करण्यात येईल. विभाग प्रमुखांकडुन माहिती घेतली. स्पील ओव्हर मध्ये वाढ झाल्याने देखभाल दुरुस्तीत जी तरतुद ठेवली त्यात आले नाही.

**श्री जयवंत ओक :** टेलीफोन विभाग रस्त्यावर खड्डे केल्यानंतर पॅचवर्क किंवा डांबरीकरण काम करुन देत असे. चांगल्या प्रतीचे करुन देत नसे म्हणुन महापालिकेतर्फे करण्यात येत आहे. अशा खोदकाम झालेल्या रस्त्यावर मनपा केव्हा पॅचवर्क किंवा डांबरीकरण करणार आहे ?

**अति. शहर अभियंता :** टेंडर कॉल केलेले आहे. जे दोन महिण्यात खोदकाम झाले ती सर्व कामे करण्यात येईल. काही ठिकाणी कामाला सुरुवात केलेली आहे.

**श्री कैसर खान :** न्यायालयाच्या निर्देशानुसार शहरातील मुख्य रस्त्यावर व इतर रस्त्याचे रुंदीकरण होत आहे. रस्ता रुंदीकरणाची कार्यवाही करीत असतांना काही लोकांच्या घरासमोरच खड्डे पडलेले आहेत. लहान मुलांचे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रस्ता रुंदीकरणाची कार्यवाही झाल्यानंतर

लगेच रस्ता चांगला करण्यात यावा. अतिक्रमणामध्ये जे येते काढण्यात यावे. गरीब जनतेला त्रास होऊ नये याची दखल घेतली जावी. माझ्या वार्डात आपण रस्ता रुंद करीत आहात त्यांचे डांबरीकरण खडीकरणाची कामे करणार, रस्ता क्रॉस करण्यासाठी रोड तोडावा लागेल. प्रथम त्याचे अंदाजपत्रक करावे. त्या शिवाय काम करु नये. अंदाज पत्रकास तशी विशेष तरतुद करावी.

**मा. सभापती :** रस्ता रुंदीकरणाची कार्यवाही झाल्यास तो रस्ता दुरुस्त करता येईल किंवा कसे याचा खुलासा द्यावा.

**अति. शहर अभियंता :** रस्ता रुंदीकरणात आपण अतिक्रमण काढतो. रस्ता रुंदीकरणासाठी खड्डी रस्ते लेखाशिर्ष अंतर्गत ते करता येईल. मोठया कामासाठी तरतुद करावी लागेल.

**श्री कैसर खान :** अतिक्रमण काढले जाते. परंतु नंतर मला दुरुस्तीचे काम केले जात नाही. रस्त्यावरील विद्युत पोल सुध्दा काढले जात नाही. ते देखील स्थलांतर करावे.

**श्री जयवंत ओक :** रस्ता रुंदीकरणाचे काम झाल्यानंतर लगेच रस्त्याचे दुरुस्तीचे काम सुध्दा तात्काळ झाले पाहिजे. ही बाब गांभीर्याने घ्यावी. तात्काळ पोल शिफ्टींगचे अंदाजपत्रक करावे.

**मा. सभापती :** श्री. डी. पी. कुलकर्णी यांना नोंद घेण्यास सांगीतले आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शहरातील रस्ता रुंदीकरणाचे काम होत आहे. चांगली बाब आहे. परंतु रुंदीकरणानंतर जे मटेरियल असते ते रस्त्यावरच पडुन राहते. उचलले जात नाही. ते तात्काळ उचलण्याची कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री कैसरखान :** माझ्या प्रश्नांचा खुलासा मिळालेला नाही. रस्ता रुंदीकरणाचे कामाबरोबरच रस्ता दुरुस्तीचे काम सुध्दा होणे गरजेचे आहे. ते का होत नाही. अडचण काय आहे ?

**मा. सभापती :** या बाबतीत सन्मानीय सभासदांचे प्रश्न चांगले असतात. लगेच उत्तर मिळणे शक्य होत नाही. आपण लेखी स्वरुपात दिले तर त्यांना माहिती काढता येईल. अधिकाऱ्यांना सुध्दा माहिती घेण्यास वेळ लागतो.

**श्री प्रशांत देसरडा :** नाशिक महानगरपालिकेत घंटा गाडया आहेत. त्यानुसार कचरा उचलण्याची कार्यवाही होते. तसेच नागपुर महानगरपालिकेने तेथील संपुर्ण शहरातील मालमत्तां सर्व्हे केला. तर नियमीत उत्पन्नपेक्षा १७ लक्ष रुपयांनी उत्पन्नात वाढ झाली. तेथे झोन अधिकाऱ्यांमार्फत ३२ टक्केच वसुली होत असे. परंतु जेव्हा बँकेला वसुलीचे काम दिले तेव्हा बँकेनी ८० टक्के वसुली केली.

**मा. सभापती :** मालमत्ता करा बाबत मागच्या सभागृहाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**श्री हिदायत अली :** कचरा वाहुन नेण्यासाठी काही भागात हातगाडया आहेत. त्या गाडयांचा सांगाडा खराब झालेला असुन त्यामध्ये गोण्या किंवा धान्याचे रिकामे पोते. टाकुन कचरा भरला जातो. तरचे तो कचरा वाहुन नेता येतो. अशी अवस्था आहे. हातगाडया व्यवस्थित असाव्यात. तसेच ज्या ठिकाणी गांडयाची आवश्यकता आहे त्या प्रभागात तात्काळ कचरा उचलण्यासाठी हातगाडंयाची व्यवस्था व्हावी. तसेच कचरा कुंडयांची सुध्दा कमतरता आहे.

**मा. सभापती :** हातगाडया खरेदी करण्यास प्रशासनास काय अडचण आहे? खुलासा करण्यात यावा.

**मुख्य लेखाधिकारी :** चालु वर्षाच्या गाडया १५ दिवसाच्या आंत येतील. टेंडर झालेले आहे. हातगाडया नाहीत म्हणुन झोन अधिकारी यांचेकडुन तशी या वर्षीसाठी मागणी झालेली नाही. गेल्या वर्षीसाठी ज्या हातगाडया मागविल्या होत्या, त्या वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

**मा. सभापती :** प्रत्येक झोनचे झोनल आयुक्त येथे उपस्थित आहे. त्यांनी तीन दिवसाचे आत झोन मध्ये लागणारे साहित्य, हातगाडया, कचरा कुंडयांची माहिती पुरवावी. त्यानुसार प्रशासन कार्यवाही करेल. विषय क्र. ३२ मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक १३.६.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३३ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा. शिक्षण संचालक, म. रा. पुणे यांचे पत्र जा. क्र. माशिस/२००२-२००३ /मागणी/नवा-३-१९/५०६ दि. ४.५.०२ अन्वये पुस्तक पेढी योजना सन २००२-२००३ मध्ये अनुसूचित जाती, नवबौध्द धरुन अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जाती, आर्थिक दुर्बल घटाकातील विद्यार्थ्यांना (इयत्ता १ ली, २री व ५वी ) क्रमिक पाठयपुस्तके खरेदी करण्यात यावीत. त्यासाठी शासनाने खालील दर्शविलेल्या सुधारीत तरतुदीमध्ये अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सर्वसाधारण घटक योजना सुधारित तरतुद | रु. ६,०००/- |
| २) | विशेष घटक योजना सुधारीत तरतुद | रु. ३१,५००/- |
| | एकुण | रु. ३७,५००/- |

वरील अनुदान हे अत्यंत कमी असून सर्वच इयत्ता १ली, २री व ५ वीच्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देता येणार नाही. कारण वरील अनुदानामध्ये खालील प्रमाणे इयत्ता १ली, २ री व ५ वी च्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्ते खरेदी करता येतील.

| | |
|---|---|
| इयत्ता १ली | ३५३ संच |
| २ री | ३४१ संच |
| ५ वी | ३१० संच |
| | ९६४ संच |

महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता १ली , २री व ५वी ची विद्यार्थी संख्या सद्य :परिस्थितीत खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| इयत्ता १ ली | ४००० |
| २ री | ४३०० |
| ५ वी | ४२०० |

वरील संख्या पाहता एकुण ११,४९६ विद्यार्थ्यांना सदरील योजनेचा फायदा होऊ शकणार नसल्याने महानगपालिकेने शिक्षण विभागाच्या "पुस्तक पेढी व शिक्षण साहित्य" या

तरतुदीमध्ये रुपये ५ लक्ष तरतुद ठेवलेली आहे. शासनाचे अनुदान मात्र २००३ मध्ये प्राप्त होईल. तो पर्यंत मनपास खर्च करावा लागणार आहे. करीता प्रस्ताव सादर करण्यात येतो की, उपरोक्त दर्शविलेल्या मनपाच्या इयत्ता १ ली, २री व ५वी च्या विद्यार्थ्यांना सदरील योजनेचा लाभ व्हावा. मनपा चय शाळेत शिकणारे विद्यार्थी अनुसूचित जाती, नवबौध्द धरुन अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जाती, आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील आहेत. सदरील योजनेचा लाभ होण्याच्या दृष्टीकोनातुन रुपये ५ लक्ष एवढया रक्कमेची क्रमिक पुस्तके खरेदी करण्यास तसा धनादेश म. रा. पाठया पुस्तके निर्मीती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, औरंगाबाद यांचे नांवे देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री किशारे शिंदे :** प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही परंतु महापालिकेच्या शाळेची सद्य:स्थिती विचारात घेतली तर ५वी, ६वी, ७ वी च्या वर्गामध्ये ५ ते ६ विद्यार्थी सख्यां आहे असे दिसून येते. महापालिकेच्या शाळेतुन पालक टी.सी. ची मागणी करीत आहे व खाजगी संस्थेच्या शाळेत मुलांना प्रवेश देत आहेत. टी.सी. ची मागणी का हेत आहे? शाळेतील मुलांची सख्या काम कमी झालेली आहे? शिक्षण बरोबर शिकवीत नाही का? अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी :** मुले महापालिकेच्या शाळेतुन टि.सी. घेऊन जातात. यास कारणे अशी की, काही पालक संस्थेच्या शाळेमध्ये मुलांना शिक्षण देऊ इच्छितात तसेच काही पालक हे घर सोडुन दुसरीकडे राहण्यास जातात तसेच काही पालकांच्या एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी बदल्या झाल्याने पालक टि.सी. ची मागणी करतात. जास्तीत जास्त विद्यार्थी, महापालिकेच्या शाळेत कसे राहतील या बाबतीत प्रयत्न केले जात आहेत. चौकशी करुनच टी. सी. देण्यात येते.

**श्री किशोर शिंदे :** पालकांचे म्हणणे आहे की, शिक्षकवर्ग मुलांना बरोबर शिकवीत नाही. चांगले मार्गदर्शन करीत नाही. आजा सुध्दा अशी परिस्थिती आहे की, ५ वी च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एक-दोन लिहता येत नाही. शाळेतील शिक्षक आपल्या मुलांसारखी वागणुक देत नाही. कोंडुन टाकतात. एक दुसऱ्या वर्गामध्ये जाऊन आपापसात गप्पा मारतात खाजगी शाळेतील संस्थाचालक तसेच तेथील शिक्षक स्वत: घरोघरी जाऊन पालकांच्या भेटी घेतात व शाळेत मुलांची संख्या कशी वाढेल त्या बाबतीत प्रयत्न करतात. परंतु महापालिकेचे शिक्षक भेटी देतांना दिसत नाहीत. मनपाचे शिक्षक सुध्दा पालकांच्या भेटी घेऊन शाळेच्या दर्जा व विद्यार्थी संख्या वाढविण्याचे प्रयत्न का केले जात नाही ?

**श्री जयवंत ओक :** पाचवीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस अ, ब, क, ड येत नाही ही सत्य परिस्थिती आहे. आताच स. सदस्यांनी सुध्दा चांगला मुद्दा उपस्थित केला. शिक्षक एकमेकांबरोबर गप्पा मारतात असे असेल तर मुलांना शिक्षण देणे शक्य होईल का ? अशा शिक्षकांवर कार्यवाही करण्यात यावी. महापालिकेच्या शाळेत गरीब व कामगारांची मुले शिक्षण घेतात. याची जाणीव ठेवली पाहिजे. मध्यम वर्गीय सुध्दा मनपा शाळेत शिकवीत नाहीत. शासन सुध्दा गरीब मुलांना शिक्षण घेता यावे म्हणुन विविध योजना राबवित

आहे. शिक्षण क्षेत्राकडे लक्ष आहे. वेळोवेळी शासन खर्च करीत आहे. शाळेच्या संदर्भात पालकांच्या नेहमीच तक्रारी येतात. याची कारणे काय व ज्या शाळेच्या अडी अडचणी असतील त्या तात्काळ सोडवाव्या. जे शिक्षक काम करीत नसतील. वेळेचे बंधन पाळणार नाही अशांवर कारवाही झाली पाहिजे. महापालिकेच्या शाळेच्या दर्जा कसा सुधारेल यासाठी प्रयत्न करावे.

**श्री ठकुजी वाणी :** माझ्या वार्डात डी.पी.ई.पी. ची एक शाळा आहे. १ ते ४ वर्ग चालतात परंतु एकच शिक्षक व बसण्यासाठी एकच हॉल अशी परिस्थिती आहे. भाडेकरु व घर मालक यांचे काही देणे-घेणे चालते असे वाटते.

**श्री जयवंत ओक :** वार्डातील सर्व शाळांना मा. सभापती यांनी भेटी द्याव्यात. शिक्षणाधिकारी यांना सुध्दा बरोबर ठेवावे. असे सभागृहाच्या वतीने मागणी करण्यात येते. शाळेतील सर्व परिस्थिती जाणून घेऊन तेथील समस्या सोडविण्यात याव्यात. शाळेचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** माझ्या वार्डातील महापालिकेच्या शाळेतील शिक्षक मनमानीपणे वागतात. शिक्षक घरी येतात व तुमची शाळेतील मुलांची संख्या वाढवण्याकरीता प्रयत्न करावे अशी मागणी करतात. शिक्षक बरोबर शिकवीत नाही. पालकांच्या तक्रारी आहे. मनपाच्या शाळेत मुलांना तांदुळ, गणवेश दिला जातो. तरी सुध्दा मुले शाळेत येण्यास उत्सुक नाहीत. अशी वेळ का आली ? वरचेवर शिक्षणाधिकारी यांनी शाळांना भेट द्यावी. ९-१०२ वाजेपर्यंत कोणीही फिरकत नाही.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** महापालिकेमार्फत माध्यमिक शिक्षणाचे वर्ग नाहीत. म्हणुन ७ वी पास झालेले विद्यार्थी पुढील प्रवेश घेण्यासाठी टी.सी. घेऊन जातात. त्यांची गुणवत्ता कमी असते म्हणुन त्यांना खाजगी शाळेत प्रवेश घेण्यास अडचणीचे होते म्हणुन काही पालक ५ वी किंवा ६वी च्या वर्गामध्ये प्रवेश घेण्याकरीता टी.सी. ची मागणी करतात. म्हणुन ७ वी नंतर पुढील वर्गात प्रवेश घेता येईल व त्या अगोदरच्या वर्गातील टी.सी. ची मागणी होणार नाही यासाठी माध्यमिक शिक्षणाचे वर्ग सुरु करण्यात यावे.

**श्री हिदायत अली :** शहाबाजार येथील महापालिकेच्या उर्दु शाळेत एकुण ३०० विद्यार्थी संख्या आहे. परंतु शिक्षकांची संख्या कमी आहे. शिक्षकांची मागणी केलेली होती. अद्याप कार्यवाही झालेली नाही.

**शिक्षणाधिकारी :** या शाळेत एक शिक्षक देण्यात आले. ७ वी चे वर्ग उघडले. त्याच दिवशी टिप्पणी सादर केली आहे. एक-दोन दिवसात शिक्षक देण्यात येईल.

**श्री प्रशांत देसरडा :** या प्रमाणेच मागील वर्षी सुध्दा विषय आलेला होता. त्यावेळी असा निर्णय घेतलेला होता की, मुलांना दिलेली पुस्तके पुढील वर्षी परत घेण्यात यावीत. ही पुस्तके सुरक्षीत राहण्याच्या दृष्टीने लायब्ररी करण्याचा सुध्दा निर्णय घेतलेला होता. त्यानुसार मागील वर्षाचे किती विद्यार्थ्यांकडुन कोणकोणत्या विषयाची पुस्तके जमा केलेली आहेत. मध्ये वस्ती मधील वसंत भुवन शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे. तसेच फकीरवाडी येथील शाळेत सुध्दा विद्यार्थी संख्या कमी आहे. याची कारण काय ?

**श्री जयवंत ओक :** शाळा किती, त्या शाळेत शिक्षक किती व विद्यार्थी किती व विद्यार्थी संख्येनुसार कोणत्या शाळेत किती शिक्षकांची आवश्यकता आहे. याची माहिती घेऊन पुढील बैठकीत सादर करावी. माध्यमिक शिक्षणाचे वर्ग उघडण्यात येऊ नयेत. ७ वर पर्यंतच शिक्षण देण्यात यावे. नसता भ्रष्टाचार

वाढेल. १ ली, २री व ३री वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अबकउ येत नाही ते आले पाहिजे. यासाठी शिक्षकांवर बंधन घालावे. अशा मुलांना मा. आयुक्तांच्या दालनात प्रत्यक्ष चाचणीसाठी बोलवावे. प्रत्यक्ष परिस्थिती समजेल.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** शिक्षणाधिकारी यांनी शाळेला सतत भेटी दिल्या पाहिजे. परंतु तसे होत नाही. हिवाळयामध्ये शिक्षक वर्ग शाळेत उशीरा येतात. काही शाळा ९ ते १० वाजता उघडण्यात येतात. मुलेही उशिरा येतात.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** माझ्या वार्डात महापालिकेची शाळा नाही. गरीब मुलांची संख्या जास्त असून जवळपास कुठेही खाजगी शाळा नाही. त्यामुळे मनपाची एक प्राथमिक शाळा बांधण्यात यावी.

**श्री जयवंत ओक :** ४ थी, ७ वी च्या वर्गातील किती विद्यार्थी बोर्डात प्रथम आलेले आहेत तसेच नुकत्याच २२ शिक्षकांच्या झालेल्या बदल्या रद्द केल्या अशी माहिति मिळाली. असे निर्णय का बदलल्या जातात. कुणाचा दबाव येतो का ? असे प्रकार होऊ नयेत. प्रशासनाने त्यांचे नियमाने कार्यवाही करावी.

**श्री ठकुजी वाणी :** वार्ड क्र. १ मध्ये भावसिंगपुरा, पडेगांव, मिटमिटा भागात ३ शाळा आहेत. या शाळेत दोन-दोन शिक्षकांची मागणी केलेली होती. अद्याप कार्यवाही झालेली नाही. डी.पी.ई.पी. ची शाळा ही आहे. एक-एक शिक्षक आहे.

**शिक्षणाधिकारी :** महापालिकेतील ४ थी व ७ वी चे विद्यार्थी बोर्डात सर्व प्रथम आलेले आहेत. आताच सुचना झाल्या प्रमाणे महापालिकेच्या शाळेत वर्गनिहाय विद्यार्थी संख्या, तसेच शाळेतील शिक्षक संख्या व आवश्यकतेनुसार किती शिक्षकांची आवश्यकता येईल. मागील वर्षी विद्यार्थ्यांना वाटप केलेले पुस्तके जमा करण्यात आलेली नाहीत.

**मा. सभापती :** महापालिकेच्या शाळेतील मुले टि.सी. घेऊन खाजगी शाळेत प्रवेश घेतात ही परिस्थिती काय निर्माण झाली. असा प्रश्न सदस्यांनी विचारलेला आहे. आमच स. सदस्यांनी बेगमपुरा येथील शाळेच्या संदर्भ देऊन सुचना केली. सुचना केल्यानुसार मी स्वतः मा. उपआयुक्त यांचे समवेत शाळेवर सकाळी ७.०० वाजात भेट देईल. पालकांच्या अडीअडचणी काय आहेत हे जाणून घेतले जाईल. त्यावेळी स. सदस्यांनीही उपस्थित राहावे. तसेच स. सदस्य श्री ठकुजी वाणी यांनी प्रश्न उपस्थित केल्यानुसार मा. आयुक्तांनी या बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** पटसंख्या किती , प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या किती ते पहावे.

**मा. सभापती :** १० दिवसापुर्वीच शाळेला भेट देण्याबाबतचा आराखडा तयार केला होता. प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुस्तकपेढी योजने अंतर्गत सन २००२-२००३ या वर्षामध्ये महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता १ली, २री व ५ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके मोफत देण्याकरीता रक्कम रुपये ५लाख एवढया रक्कमेची क्रमिक पुस्तके खरेदी करण्यास व तसा धनादेश महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मीती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, औरंगाबाद यांचे नावे देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, शासकीय कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांना दि. १.४.२००२ पासुन महागाई भत्ता मुळ मुळ वेतनाच्या ४४.५% या दराने अदा करणे बाबत महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. मभवा/११०२३/प्र.क्र.६/सेवा-९ दि. १५ मे २००२ अन्वये खालील आदेश निर्गमीत केले आहेत.

अ) दिनांक १.४.२००२ पासुन वेतन श्रेणीतील मुळ वेतनाचा ४४.५% या दराने महागाई भत्ता मंजुर करण्यात यावा.

ब) परंतु वरील दराप्रमाणे महागाई भत्ता वाढ दि. १.४.२००२ पासुन मंजुर करण्यात आलेला अतिरिक्त महागाई भत्त्याच्या ३% वाढीतील २% रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी.

उपरोक्त शासन निर्णयानुसार महापालिकेच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी /कर्मचाऱ्यांना माहे एप्रिल-२००२ ते माहे मे २००२ या कालावधीतील वाढीव ३% महागाई भत्त्याची गणना करुन त्यापैकी २% इतकी रक्कम रोखीने व १% इतकी रक्कम सर्व संबंधितांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करणे व माहे जुन २००२ ते माहे मार्च २००३ या कालावधीतील मासिक वेतन देयकातुन ३% ने वाढ करुन पैकी २% इतकी रक्कम रोखीने दर महिना अदा करणे व उर्वरीत १% इतकी रक्कम दरमहा संबंधिताच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**श्री प्रशांत देसरडा :** किती आर्थिक बोजा पडणार आहे?

**मुख्य लेखाधिकारी :** ३% प्रमाणे महागाई भत्त देण्यात येणार असुन २% रक्कम रोखीने व १% रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात येणार आहे. एकुण बोजा ३ लक्ष रुपये प्रती महा पडणार आहे.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय क्र. मभवा/११०२/प्र.क्र.६६/सेवा-९ दिनांक १५ मे २००२ नुसार महापालिकेच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी कर्मचारी यांना दि. १.४.२००२ पासुन वेतन श्रेणीतील मुळ वेतनाच्या ४४.५% या दराने महागाई भत्ता मंजुर करण्यात येतो.

वरील दराप्रमाणे महागाई भत्ता वाढ दि. १.४.२००२ ते ३१.३.२००३ या कालावधीत मंजुर करताना दि. १.४.२००२ पासुन मंजुर करण्यात आलेल्या अतिरिक्त महागाई भत्त्याच्या ३% वाढीतील २% इतकी रक्कम रोखीने मंजुर करावी. व उर्वरीत निधी खात्यात जमा करण्यास मंजुरी देण्यात येते.

वरील प्रमाणे मनपा आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना माहे एप्रिल २००२ ते जुन २००२ या कालावधीतील वाढीव ३% महागाई भत्त्याची गणना करुन त्यापैकी २% इतकी रक्कम रोखीने व १% इतकी रक्कम सर्व संबंधीताच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करुन माहे जुलै २००२ ते मार्च २००३ या कालावधीतील मासिक वेतन देयकातुन ३% नेवाढ करुन पैकी २% इतकी रक्कम रोखीने दर महिना अदा करणे व उर्वरीत १% इतकी रक्कम दरमहा संबंधितांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना दर वर्षीप्रमाणे याही वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेअंतर्गत सन २००२-२००३ साठी तयार गणवेश देणे आहे. यास्तव खालील वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.

१) दै. लोकमत, औरंगाबाद
२) दै. लोकसत्ता, मुंबई
३) दै. सकाळ, पुणे

एकूण १३ निविदा विक्री झाल्या पैकी ०४ निविदा लेखा विभागात प्राप्त झाल्या. सदरील प्राप्त निविदा मधील पॅाकीट क्र. १ उघडण्यात आला. संबंधीताचे मागविण्यात आलेले सर्व कागदपत्रे असल्याने त्यांनी दिलेले कापडाचे नसुन मे. केंद्रीय प्रौद्योगिक अनुसंधान संस्थान मुंबई येथे निविदा विवरण प्रमाणे कापड आहे किंवा नाही हे तपासणास्तव दि. १४.५.२००२ रोजी पाठविण्यात आले.

मे. केंद्रीय कपास प्रौद्योगिक अनुसंधान संस्थान मुंबई, यांच्याकडुन दिनांक १२.६.२००२ रोजी प्राप्त तपासणी अहवालानुसार संबंधितांचे दराचे पाकीट क्र. २ उपस्थित निविदा धारकांचे समोर उघडण्यात आले. मे रवि ड्रेसेस लातुर यांचा निळा कपडा विवरणानुसार नसल्याने ते नाकारण्यात आले आहे. इतरांचे कापडांचे नमुने विभागानुसार प्राप्त आहेत. सदरील चार निविदा धारकांची नावे खालील प्रमाणे आहेत.

१) रवि ड्रेसेस, लातुर
२) शिवानी इंटरप्रायजेस, सोलापुर
३) एम.एस.एस.आय.टी.सी., औरंगाबाद
४) फेना गारमेन्ट, लातुर

वरील निविदा धारकांनी दिलेल्या दरानुसार प्राप्त दराचा तक्ता सोबत जोडण्यात आला असून अधोरेखित केलेले दर हे तुलनात्मक दृष्टया प्राप्त कमी दर आहेत. वेगवेगळया

साहित्यात एकुण दोन निविदा धारकांचे दर तुलनात्मकदृष्टया कमी आहेत ते खालील प्रमाणे.

१) एम. एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद एकुण तीस (३०) बाबी

२) फेना गारमेन्ट, लातुर एकुणन एक (१) बाब

वरील प्रमाणे एकुण ३१ अॅटमच्या दरामध्ये मे. एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांचे ३० अॅटम्स मध्ये तर फेना गारमेन्टस लातुर यांचे एका अॅटममध्ये तुलनात्मक दृष्टया कमी दर आहेत. वरील दोन्ही एजन्सीने दिलेले कापडाचे नमुने निविदा विवरणानुसार प्राप्त असल्याने व प्राप्त दर हे सरासरी गतवर्षीच्या मान्य दराचे तुलनेत कमी प्राप्त झाल्याने प्रस्ताव मंजुरीस्तव मा. आयुक्त यांच्याकडे दिनांक २०.६.०२ रोजी सादर करण्यात आला. पुरवठयाचे सुसूत्रिकरण मे. एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद हे सर्वच अॅटम करीता तुलनात्मकदृष्टया की दर मान्य करते का ? म्हणुन मा. आयुक्त यांच्या तजबिजीनुसार संबंधितास लेखी विचारणा करण्यात आली.

सदरील पत्राच्या अनुषंगाने मे. एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. ३/विपनन/२००२-२००३/८९२ दि. २१.६.२००२ नुसार लेखी संमती दिल्यानुसार मा. आयुक्त यांनी तुलनात्मक दृष्टया प्राप्त कमी दरास मान्यता दिली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे अंदाजे खर्च दर्शविण्यात आला आहे.

नुकत्याच शाळा उघडल्याने नविन प्रवेश व शाळा सोडण्याचे दाखले देणे इत्यादी प्रकीया चालु आसुन अचुक विद्यार्थी संख्या सध्या प्राप्त होणे शक्य नाही. त्यामुळे गतवर्षी खरेदी करण्यात आलेल्या गणवेश संख्येच्या प्रमाणात सरासरी १०% वाढ करुन खर्च दर्शविण्यात येत आहे. साधारणतः जुलै २००२ च्या पहिल्या आठवड्यात महानगरपालिकेच्या शाळेतुन विद्यार्थी संख्या मागविण्यात येतील. त्यामुळे खालील प्रमाणे दर्शविलेली अंदाजीत खरेदीमध्ये कमी किंवा जास्त प्रमाण होऊ शकते.

| **अ.क्र.** | **साहित्याचा तपशिल** | **वयोगट** | **दर (रु.)** | **नग** | **खर्च (रुपये)** |
|---|---|---|---|---|---|
| अ | मुलांसाठी खाकी रंगाचे हाफ पँट | | | | |
| | १) बालवाडी | ५ ते ६ | १६.०० | २६३७ | ४२,१९२ |
| | २) इयत्ता १ ली | ६ ते ७ | १७.०० | २४९० | ४२,३३० |
| | ३) इयत्ता २ री | ७ ते ८ | १८.५० | २३२० | ४२,९२० |
| | ४) इयत्ता ३ री | ८ ते ९ | २०.५० | २१९१ | ४४,९१६ |
| | ५) इयत्ता ४ थी | ९ ते १० | २२.०० | २००२ | ४४,०४४ |
| | ६) इयत्ता ५ वी | १० ते ११ | २३.०० | १८५५ | ४२,६६५ |
| | मुलांसाठी खाकी रंगाची फुल पँट | | | | |
| | ७) इयत्ता ६ वी | ११ ते १२ | ६२.०० | १५२१ | ९४,३०२ |
| | ८) इयत्ता ७ वी | १२ ते १४ | ६८.०० | १०७८ | ७३,३०४ |
| ब) | मुलांसाठी पांढरा हाफ शर्ट | | | | |
| | १) बालवाडी | ५ ते ६ | १६.०० | ३६३७ | ४२,१९२ |
| | २) इयत्ता १ ली | ६ ते ७ | १७.०० | २४९० | ४२,३३० |
| | ३) इयत्ता २ री | ७ ते ८ | १८.५० | २३२० | ४२,९२० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ४) इयत्ता ३ री | ८ ते ९ | २०.५० | २१९१ | ४४,९१६ |
| | ५) इयत्ता ४ थी | ९ ते १० | २२.०० | २००२ | ४४,०४४ |
| | ६) इयत्ता ५ वी | १० ते ११ | २३.०० | १८५५ | ४२,६६५ |
| | ७) इयत्ता ६ वी | ११ ते १२ | २६.०० | १५२१ | ३९,५४६ |
| | ८) इयत्ता ७ वी | १२ ते १४ | २८.०० | १०७८ | ३०,१८४ |
| क) | मुलींसाठी निळा स्कर्ट | | | | |
| | इयत्ता १ ली | ६ ते ७ | २५.०० | १६०५ | ४०,१२५ |
| | इयत्ता २ री | ७ ते ८ | २७.०० | २०५० | ५५,३५० |
| | इयत्ता ३ री | ८ ते ९ | २९.०० | २०६६ | ५९,९१४ |
| ड) | मुलींसाठी पांढरे ब्लाऊज | | | | |
| | इयत्ता १ ली | ६ ते ७ | १६.०० | १६०५ | २५,६८० |
| | इयत्ता २ री | ७ ते८ | १७.०० | २०५० | ३४,८५० |
| | इयत्ता ३ री | ८ ते ९ | १८.५० | २०६६ | ३८,२२१ |
| इ) | मिनी फ्रॉक | ५ ते ८ | ५५.०० | २५३४ | १,३९,३७० |
| ई) | इयत्ता ४ थी | ९ ते १० | ४५.०० | २११६ | ९५,२२० |
| | इयत्ता ५ वी | १० ते ११ | ५०.०० | २११६ | १०५,८०० |
| | इयत्ता ६ वी | ११ ते १२ | ५५.०० | १५२९ | ८४,०९५ |
| | इयत्ता ७ वी | १२ ते १४ | ६०.०० | ११५२ | ६९,१२० |
| फ) | मुलींसाठी पांढरा पंजाबी शर्ट | | | | |
| | इयत्ता ४ थी | ९ ते १० | ४५.०० | २११६ | ९५,२२० |
| | इयत्ता ५ वी | १० ते ११ | ५०.०० | २११६ | १०५,८०० |
| | इयत्ता ६ वी | ११ ते १२ | ५५.०० | १५२९ | ८४,०९५ |
| | इयत्ता ७ वी | १२ ते १४ | ६०.०० | ११५२ | ६९,१२० |
| | **एकुण** | | | | **१८,५७,४५०** |

उपरोक्त नुसार या योजने अंतर्गत एकुण खर्च रु. १८,५७,४५० इतका येणार आहे. योजनेअंतर्गत एकुण ३५ लाखांची अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आली आहे.

करीता उपरोक्त तरतुदीच्या अधिन राहुन प्राप्त होणाऱ्या अचुक विद्यार्थी संख्येच्या आधारे एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांना पुरवठा आदेश देण्याच्या व रु. १८,५७,४५०/- इतका अंदाजीत खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** या विषयास मंजुरी देण्यात येते. शाळेतील शिक्षकांना सुध्दा एका रंगाचा गणवेश वापरण्याच्या सुचना केल्यास योग्य होईल. या बाबतीत प्रशासनाबरोबर चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल. प्रस्ताव स्विकृतीसह मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत सन २००२-२००३ साठी तयार गणवेश खरेदी साठी प्राप्त झालेल्या निविदापैकी कापडाचे नमुने निविदा विवरणानुसार प्राप्त

असलेल्या तुलनात्कमदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस तसेच या कामाकरीता लागणाऱ्या र. रु. १८,५७,४५०/- च्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ३६ :**

(दि. १३.६.०२ च्या बैठकीत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. २३)

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे सादिया टॉकीज जवळील व्यापारी संकुलातील काही दुकाने शहर अभियंता यांच्याकडुन प्रदान करण्यात आलेल्या आहेत. सौ. अनिता गुप्ता यांना दुकान क्रा. २८ ब अनामत र. रु. ५८,०००/- आणि रु. ७५/- प्रती चौ.मी. प्रतीमहा भाडेनुसार देण्यात आले आहे. तथापी सदर दुकान हे नजर चुकीने लिलावामध्ये ठेवण्यात आल्यामुळे ते दुसऱ्यास दिले गेले. सौ. गुप्ता यांनी अनामत रक्कम कार्यालयात जमा केलेली आहे. लिलावामध्ये दुकान क्र. २८ ब हे री उपाध्ये यांना देण्यात आले. त्यांना रु. ६०/- प्रती चौ.मी. प्रती महा प्रमाणे भाडे आकारण्यात आली आहे. करीता सौ. गुप्ता यांना देखील त्याच दराने म्हणजे रु. ६०/- प्रती चौ.मी. प्रमाणे भाडे आकारण्या बाबत ठरले.

करीता दुकान क्र. २८ ब जिचे क्षेत्र १४.६४ चौ.मी. आहे सदरील दूकान री उपाध्ये यांना देण्यात आली असुन दुकान क्र. ८ "क" सौ. गुप्ता यांचे संमतीने पर्यायी ज्याचे क्षेत्र ११.८३ चौ.मी . आहे करीता दुकानाचे क्षेत्र ११.८३ चौ.मी. व अनामत रक्कम ४०००/- प्रती चौ.मी. प्रमाणे ४७,३२० इतके होते. सदर अनामत मधील फरकाची रक्कम रु.ञ ११,२२२/- इतकी आहे. फरकाची रक्कम भाडयात समायोजीत करुन घेऊन दुकानाचा ताबा देणे बाबत मा. स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या मालकीचे सादिया टॉकीज जवळील व्यापारी संकुलातील दुकान क्र. २८ ब चय पर्यायी क्र. ८ए ११.८३ चौ.मी. क्षेत्राचे दुकान रुपये ६०/- प्रती चौ.मी. प्रतीमहा भाडें व अनामत र. रु. ४०००/- प्रती चौ.मी. आकारुन सौ. गुप्ता यांना दुकानाचा ताबा देण्यास तसेच त्यांनी भरणा केलेल्या अनामत र. रु. ५८,०००/- मधून अनामत वजा जाता फरकाची र. रु. ११,२२२/- भाडयामध्ये समायोजीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७ :**

दिनांक १७.५.२००२ च्या स्थायी समिती बैठकीमध्ये विषय क्र. ५ मधील अनुक्रमांक २ मध्ये मनपा प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना लुसर्न घास पुरवठा संबंधी निविदेमध्ये सर्वात कमी दर श्री तुकाराम लक्ष्मण नरवडे पाटील यांचे दर रु. १.३५ प्रती किलो यास मान्यता देण्यात आली असून सदर दर मंजुरी करीता स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेले आहे.

परंतु सदर पुरवठा धारकाने दि.१.४.२००२ पासुन लुसर्न घासाचा पुरवठा सुरु केला असुन कमी प्रमाणात मालाचा पुरवठा केला व दि. ९.४.०२ पासुन लुसर्न घास पुरवठा करणे बंद केले आहे. म्हणुन दुसऱ्या क्रमांकाचे निविदाधारक श्री संतोष लखोटीया यांना लेखी विचारणा करण्यात आली व सदर गुत्तेदाराने लेखी रु. १.३५ प्रती किलो या दराने लुसर्न

घास पुरवठा करणे बाबत कळविले आहे व या दरास मा. आयुक्तांनी दि. २२.४.२००२ रोजी मान्यता दिलेली आहे. करीता वरील प्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार दि. १७.५.०२ च्या स्थायी समिती सभेतील विषय क्र. ५ मधील अनुक्रमांक २ मध्ये दर्शविल्या प्रमाणे प्राणी संग्रहालयातील प्राण्यांसाठी लुसर्न घास पुरवठा करण्यास सर्वात कमी दराचे निविदा धारक असमर्थ ठरल्याने दुसऱ्या क्रमांकाचे निविदाधारक श्री संतोष लखोटीया यांनी संमती दर्शविल्यानुसार रु. १.३५ प्रती किलो या दराने त्यांचेकडुन लुसर्न घास खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्रात जल शुध्दीकरण प्रकियेत क्लोरीन गॅसची आवश्यकता असते. सन २००२-०३ मध्ये क्लोरीन गॅस खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सन २०००-०१ च्या दरसुचीनुसार र. रु. १८,८४,२५५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून मा. आयुक्तांनी दि. २४.६.०२ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर खर्च हा रसायन खरेदी साठीच्या तरतुदी मधुन करण्यात येईल. तरी क्लोरीन गॅस खरेदी साठीचे अंदाजपत्रक र. रु. १८,८४,२५५/- चे विचारार्थ व मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्रात जलशुध्दीकरण प्रकीयेत आवश्यक असणाऱ्या क्लोरीन गॅसची खरेदी करण्या करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १८,८४,२५५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गन मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| नगरसचिव | सभापती (स्थायी समिती) |
|---|---|
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १८.०९.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक १८.०९.२००२ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे याचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजात "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त यांचे सह संबंधित अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री देसरडा प्रशांत सुभाष
२) श्री मीर हिदायत अली
३) श्री शिंदे किशोर रावसाहेब
४) श्री शेख इलियास किरमाणी
५) श्री औताडे रावसाहेब ममतु
६) श्री ओक जयवंत केशवराव
७) श्री फुलारी नंदकुमार माधवराव
८) डॉ आशा उत्तन बिनवडे
९) सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर
१०) सौ सुवर्णा उमेश चंद्रात्रे
११) श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१२) श्री चंद्रशेखर जैस्वाल
१३) श्री कैसरखान बद्रोधीन खान
१४) श्री ठकुजी रामसिंग वाणी

**संवाद :**

**मा. सभापती :** सभागृहात माईक सिस्टीमची व्यवस्था करण्यात आलेली आहे. आज उद्‌घाटन होत आहे.

**उपअभियंता -१ :** सभेचे कामकाम चांगल्या पध्दतीने चालण्यासाठी स. सदस्यांना बोलण्यासाठी माईक सिस्टीमची व्यवस्था करण्यात आलेली आहे. बऱ्याच दिवसांपासुन स. सभासदांची मागणी होती. ती आज पुर्ण होत आहे. या माईक सिस्टीमचे आज मा. सभापती स्थायी समिती यांचे हस्ते उद्‌घाटन होत आहे.

(याच वेळी मा. सभापती यांचे हस्ते माईक सिस्टीमचे उद्‌घाटन करण्यात आले.)

**श्री नंदकुमार फुलारी :** स. सभासदांच्या मागणीनुसार प्रशासनाने या सभागृहात माईक बसविण्याची आज कार्यवाही पुर्ण केली. आताच मा. सभापती यांचे हस्ते उद्‌घाटन करण्यात आले त्याबद्दल या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात यावे.

**मा. सभापती :** या सभागृहात माईक सिस्टीमची कार्यवाही प्रशासनाने तात्काळ केल्यामुळे सभागृहातर्फे प्रशासनाचे अभिनंदन करण्यात येत आहे.

**श्रीमती मानकापे पार्वताबाई :** आस्थापना -२ विभागाचे अधिकारी सभेला उपस्थित नाही. त्या विभागा संबंधीत माझे काही प्रश्न होते. त्याचा खुलासा कोण करणार आहे. ते सुट्टीवर गेले असतील तर त्यांची सुट्टी मंजुर झाली का?

**उपआयुक्त (प्र.) :** सहाय्यक -२ यांची रजा आलेली आहे. स. सभासदांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर उत्तर दिले जाईल.

**मा. सभापती** : जो काही प्रश्न उपस्थित करावयाचा आहे तो करावा त्या प्रश्नासंबंधिचे उत्तर उपआयुक्त (प्र.) देतील. संबंधित अधिकारी रजेवर गेलेले आहेत.

**विषय क्र. ३९ :**

दि. ८/०७/२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री जयवंत ओक :** इतिवृत्तातील पान क्र. ३ वर बीफ खन्नीच्या संदर्भात आपले रुलींग आहेत. संबंधीत ठेकेदारास मा. आयुक्ताच्या दालनात बोलावुन चर्चा करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल. निर्णय काय घेण्यात आला खुलासा देण्यात यावा.

**मा. सभापती :** मा. आयुक्तांच्या दालनात बीफ खन्नीच्या संदर्भात झालेल्या चर्चेचा खुलासा संचालक प्राणी संग्रहालय यांनी करावा.

**संचालक प्राणी संग्रहालय :** दि. ४.७.२००२ च्या स्थायी समिती सभेमध्ये मा. सभापती यांनी घेतलेल्या निर्णयानुसार संबंधित ठेकेदार यांना दि. ५.७.२००२ रोजी चर्चा करण्यासाठी मा. आयुक्तांच्या दालनात बोलविण्यात आले होते. मा. सभापती स्थायी समिती यांचे समोर चर्चा झाली. त्यांनी नमुद केलेलेच दर मान्य करण्यात आले. पशुंची तपासणी शासनाचे डॉक्टर करतात. त्यानंतर पडेगांव येथील पशुधन गृहात कापले जाते. त्या नंतर ते मांस प्राणी संग्रहालयात महानगरपालिकेच्या वाहनाने आणले जाते. त्यांचे सोबत मनपा कर्मचारी असतात. शासनाचे सहा. संचालक पशु संवर्धन मार्फत तपासणी करण्यात येते. त्यानंतरच जनावरांना मांस खाण्यास देण्यात येते.

**श्री जयवंत ओक :** संबंधीत ठेकेदाराकडुन रु. ९.९० प्रमाणे मांस बीफ खन्नी घेणार आहे. वाटाघाटी मध्ये काय निर्णय घेण्यात आला. दर रोज मांस तपासणी होणार आहे का? बीमार असणारे जनावरे आणणार ते कत्तलखान्यात घेवुन त्या जनावरांचे मांस प्राण्यांना खाण्यास देणार त्यामुळे मोठमोठे आजार या प्राण्यांना होण्याची शक्यता आहे. जे प्राणी उद्यानामध्ये आणले आहेत त्यासाठी महापालिकेने १०-१० लाख रुपये अदा करुन आणलेले आहे. निकृष्ट दर्जाचे मांस देऊ नये महापालिकेचे नुकसान होऊ नये याची सुध्दा काळजी घेणे आवश्यक आहे. चांगले काम या विभागाचे अधिकारी करतात म्हणुन डॉ. रझवी यांना पुरस्कार सुध्दा मिळालेला असुन महापालिकेचे नांव बदनाम होऊ नये याची सुध्दा काळजी घेणे गरजेचे आहे. मार्केट दर ३५ ते ४० रुपये किलोचे आहे. आपल्याला रु. ९.९० प्रमाणे घेण्यास योग्य वाटते का संबंधीतास देण्यास परवडणारे आहे का? का कमी दराने पुरवठा करतो मार्केटचे दर व पुरवठा धारकाचे दर या नुसार ऑडीटमध्ये ऑब्जेक्शन येणार नाही का? ऑडीट मध्ये निघाले तर कोण जबाबदार राहणार आहे. यासाठी शासनाचे मार्गदर्शन घ्यावे. मागे सुध्दा वृत्तपत्रात बातम्या आल्या

साप गायब झाले. कुठेतरी सापडले. उद्या हत्तीचा मृत्यु होणार यात महापालिकेचे मोठे नुकसान होईल. चांगल्या प्रतीचे मांस द्यायचे असेल तर दयावे नसतस सर्वच प्राणी केंद्र शासनाकडे पाठवावे. त्यांची जोपासण्याची जबाबदारी केंद्रशासनाचे विभाग घेतील.

**मा. सभापती :** बीफ चांगले दिले जाणार नाही आल्याकडे तशी माहिती आलेली आहे का?

**श्री जयवंत ओक :** जनावरांना देण्यात येणारे बीफ खन्नी चांगल्या प्रतीचे आहे किंवा काय यासाठी प्रशासन काय यंत्रणा वापरणार आहे. यासाठी स्वतंत्र्य डॉक्टर नेमणुक केलेले आहे का? मांस गाडीमध्ये टाकल्यानंतर गाडी मागे कोण जाणार आहे. हा सुध्दा प्रश्न निर्माण होतो.

**संचालक (प्राणी संग्रहालय) :** जी जनावरे प्राण्यांसाठी घेतले जाते त्या जनावरांची तपासणी शासनाचे संबंधित सहसंचालक पशुसंवर्धन विभागाचे डॉक्टर करतात व त्यांनी सदर जनावर जनावर कत्तल करण्यास योग्य आहे. असा सल्ला दिल्यानंतरच कत्तल केली जाते. त्याचे तुकडे करुनच वाहनात आणले जाते. दुपारी १ ते ३ च्या दरम्यान पशुसंवर्धन विभागाचे पॉलीक्लीनीक येथील डॉक्टरामार्फत दररोज तपासण्यात येते. नंतरच प्राण्यांना खायला दिले जाते. याकडे आम्ही विशेष लक्ष देतो. ६ महिन्यात काहीही झालेले नाही. आम्ही दर्जा मेन्टेन करतो.

**श्री फुलारी नंदकुमार :** जे जनावर कापण्यासाठी आणले जातात असे जनावर कुणीही सदृढ जनावर देत नाही. अशक्त झालेले जनावरे लोक विकतात. तेच कापुन जनावरांना देणार असेल तर योग्य नाही.

**संचालक (प्राणी संग्रहालय) :** १२ वर्षाखालील जनावरांची शासन नियमाप्रमाणे कत्तल करता येत नाही. जे जनावर १२ वर्षापेक्षा मोठे आहे असेच जनावरांची कत्तल करावी लागते.

**श्री कैसर खान :** जे मांस जप्त केले जाते ते कुठे जाते.

**बद्रोधीन खान :** खुलासा करावा. अद्याप योग्य खुलासा अधिकाऱ्यांनी दिलेला नाही.

**श्री प्रशांत देसरडा :** मध्यवर्ती जकात नाक्याजवळ रस्त्यावर जाण्या-येण्यास रस्ता राहीलेला नाही. इतके मांस विक्रेते आहे. ही परिस्थिती आजची आहे.

**मा. सभापती :** विक्रेत्यांना आमचा विरोध नाही. एखाद्या बंदीस्त जागेवर विक्री करण्यास हरकत नसावी. जागा निश्चित करुन द्यावी त्या ठिकाणी विक्री करतील. प्रशासनाचे अधिकारी व काही सदस्यात ही आता सभा संपल्यानंतर प्रत्यक्ष मध्यवर्ती जकात नाक्यावर पाहणी करण्यात येईल. जे प्राणी संग्रहालयातील जनावरांसाठी बीफ खन्नी घेणार आहेत ते चांगल्या प्रतीचे असावे ही जबाबदारी संबंधीत अधिकारी यांची राहील.

**संचालक (प्राणी संग्रहालय) :** काही आजार झाले तर त्यांची चिकीत्सा/ट्रिटमेंट करण्यात येईल. जीवन मरणे हे आपल्या हातात नाही.

**श्री जयवंत ओक :** गेल्या ३ बैठकीपासुन या विषयावर चर्चा होत आहे. मोठे किमतीचे जनावर दगावले तर जबाबदारी कुणाची राहणार आहे. अधिकारी जबाबदारी घेण्यास नकार देत आहे. जनावरांना जे टी.बी., कॅन्सर सारख मोठमोठ आजार असतात असे जनावर कत्तल करण्यासाठी घेऊ नये. जेणे करुन जे मांस खातील त्या जनावरांना सुध्दा ते आजार येऊन मृत्यु येईल याची खबरदारी घेण्यात यावी. जो निर्णय मा. आयुक्तांनी घेतला तो बरोबर आहे का ऑडीटमध्ये तर येणार नाही का? ऑडीट मध्ये फायदा बघितला जातो.

का शासनाचे नियमाप्रमाणे आहे का? प्राणी दगावले तर अधिकारीच जबाबदार राहणार आहे. आताच स. स. श्री देसरडा यांनी प्रश्न उपस्थित केला आहे मार्केट बंद करावे. उघड्यावर विक्री होते म्हणुन बऱ्याच नागरीकांच्या तक्रारी आलेल्या आहे. अंदोलने झाली. मारवाडी समाजाच्या लोकांनी तक्रारी दिलेल्या आहे. खाणारांना त्रास होत नाही परंतु जे मांस मच्छी खात नाही त्यांना मोठया प्रमाणात त्रास होतो. व विक्रेत धारक यांना स्वतंत्र्य मार्केटसाठी जागा द्यावी. त्यांनाही व्यावसाय करण्यास अडचण येणार नाही.

**श्रीमती पार्वती मानकापे :** जनावरांची तपासणी करुन कत्तल केली जाते. आता पर्यंत कोणत्या डॉक्टरांनी तपासणी केलेली आहे. खुलासा देण्यात यावा.

**श्री इलियास किरमाणी :** मांसची तपासणी साठी थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करण्यात यावे.

**मा. सभापती :** दोन मुद्दे या ठिकाणी उपस्थित केले आहे. प्राणी संग्रहालयातील जनावरांसाठी जे बीफ खन्नी (मांस) घेतले जाईल ते चांगले व शुध्द असेल तया बद्दल संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी यासाठी थर्ड पार्टी इन्स्पेक्शन राहील. दुसरा मुद्दा असा की, जे मास विक्रेते आहे ते रस्त्यावर विक्री करतात. या संदर्भात आरोग्य समितीच्या बैठकीत सुध्दा चांगल्या प्रकारे चर्चा घडवुन आली व निर्णय घेतलेले आहे. या संदर्भात काही संघटनेचे लोक सुध्दा मला भेटण्यासाठी आलेले होते. शहरात एखाद्या ठिकाणी चांगल्या प्रकारे जागा असेल तर महानगरपालिकेने त्या ठिकाणी अशा विक्रेत्यांसाठी एक मार्केट करता येईल अशा पध्दतीने कार्यवाही करावी. अशा सुचना प्रशासनाला दिलेल्या आहेत. दुकाने करुन दिली तर योग्यच आहे. त्यांचेवर सुध्दा उपासमारीची वेळ येणार नाही या दृष्टीने प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

**श्री कैसर खान/बद्रोद्दीन खान :** जप्त केलेले मांस पंचनामा करुन दफन केले जाते. पचंनामा करतांना नियमाप्रमाणे स्थायी समितीचे एक सदस्य प्रत्यक्ष उपस्थित असले पाहिजे.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे यापुढे नियमाने कार्यवाही व्हावी.

**श्री जयवंत ओक :** मांस, मटन विक्रेत्यांनी कोणत्या अटीचे पान केले पाहिजे याची थोडक्यात माहिती देण्यात यावी.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** सध्या जेथे -जेथे मांस मटनची विक्री होते तेथे बंदीस्तपणे विक्री व्हावयास पाहिजे. स्वच्छता सुध्दा असावी रस्त्यावर बसु नये.

**श्री प्रशांत देसरडा :** बीफ मार्केटचा व विक्रीचा विषय हा आरोग्य समितीच्या अंतर्गत येतो. त्या समितीमध्ये चर्चील्या जावा. जेणे करुन त्या समितीचे कामाचे महत्त्व टिकुन राहील.

**श्री जयवंत ओक :** स्थायी समिती ही सर्वात मोठी कमेटी आहे सर्व नागरिक बांबीचे प्रस्ताव या समितीमार्फत आर्थिक बाबींचे प्रस्ताव या समितीमार्फत मंजुर होतात. या समितीला फार मोठे महत्त्व आहे. मांस विक्रेत्यांची संख्या वाढत आहे. रस्त्यावर घाण पडते. नागरीकांच्या तक्रारी येतात हा मोठा गंभीर स्वरुपाचा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

**मा. सभापती :** या विषयावर आरोग्य समितीच्या बैठकीत पुरेपुर चर्चा झालेली आहे. आता इतिवृत्तावर भरपुर चर्चा झालेली असुन विषय क्र. १ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री मीर हिदायत अली :** थर्ड पार्टी इन्स्पेक्शन होणार आहे. त्या समितीचा वेळोवेळी अहवाल सभागृहापुढे सादर करण्याचे आदेश करावे. अधिकारी कोण होते, कर्मचारी कोण होते त्यांच्या नावाचा पण उल्लेख असावा.

**ठराव :**

दिनांक ४/७/२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४० :**

(सर्वसाधारण सभेकडून आलेला विषय सर्वसाधारण सभा दि. १९/६/२००२, विषय क्र. ६२८/१०)

शहर अभियंता यानी प्रस्ताव सादर केला की, औरंगपुरा भाजी मंडई समोर मनपा दुकानावर पहिला मजला बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु. २५,८७,०००/- चे अंदाजपत्रके तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ४/०८/९८ रोजी मान्यता दिलेली आहे. तसेच मा. सर्वसाधारण सभेत विषय क्र. १४४/९ दिनांक १९/११/९८ च्या इतिवृत्तान्वये सदरील अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी निविदा मागविल्या असता विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण ७ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीचया तारखेपर्यंमत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१० टक्के जास्त दराने निविदेस मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ०६.०७.९९ संबंधीत गुत्तेदाराशी दर बाबत वाटाघाटीस्तव बोलाविले व वाटाघाटी अीं ९.१० टक्के जास्त दराऐवजी ४ टक्के जास्त दराने मान्यता दिली. मान्यतेनुसार संबंधित गुत्तेदारामार्फत काम पुर्ण करुन घेण्यात आले आहे. काम नाल्यातील असल्याने तांत्रिकदृष्टीने नाल्याचे पाया खोल गेल्याने व आर. सी. सी. डिझाईन व (लोखंडामध्ये वाढ ) संबंधित वास्तुविशारद यांनी सुधारीत सादर केल्या प्रमाणे सदर कामात अंदाजपत्रकापेक्षा जास्त खर्च झाला आहे. झालेले काम वगळता सदरील इमारतीमध्ये उर्वरीत कामात अतील व बाहेरील रंगकाम जिन्याचे पुर्ण काम फ्लोरींग, स्वच्छता गृह इत्यादी कामासाठी रुपये ६,०१,०१५/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक २०/०५/२००२ रोजी मान्यता दिलेली आहे. व या वाढीव कामासाठी वर्ष २००२-२००३ अर्थसंकल्पात ६,००,०००/-द चौ. तरतुद ठेवण्यात आलेली आहे. करीता पुर्वीचे अंदाजपत्रक २५,८७,०००/- व सुधारीत ६,०१,०१५/- असे एकुण ३१,८८,०१५/- ची मान्यता देऊन वाढीव काम संबंधीत गुत्तेदाराकडुन होणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री जयवंत ओक :** हा विषय स्थगित करण्यात यावा जेणे करुन प्रस्तावानुसार मा. सभापती, मा. आयुक्त यांनी स्थळ पाहणी करावी. या प्रस्तावावर सर्वसाधारण सभेत सुध्दा चर्चा झालेली होती. एखादे मार्केट जर महापालिका बांधत असेल तर त्या मागे महापालिकेचा काही फायदा व्हावा या उद्देशानेच होते. सदरचे बांधकाम झाले त्यात काय दुरुस्त्या करावयाच्या राहिल्या हे पाहणे गरजेचे आहे. त्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था नाही व्यापाऱ्यांची मागणी काय आहे.

बांधकाम बरोबर झाले का ? हे पाहणे गरजेचे आहे. यात ४० लक्ष रुपये खर्च झालेले आहे. ही जागा फार मोक्याची आहे.

**मा. सभापती :** सर्वसाधारण सभेने हा विषय मंजुर केलेला आहे.

**श्री जयवंत ओक :** विषय स्थगित ठेवावा स्थळ पाहणी करावी. या ठिकाणी २५ हजार रुपया मध्ये पार्किंगचे बांधकाम होऊ शकत होते का करण्यात आले नाही. माहिती द्यावी. आपण स्थळ पाहणी करावी. तेव्हाच विषय मंजुर करावा.

**मा. सभापती :** स्थळ पाहणीसाठी ठेवावे.

**ठराव** :

सदर प्रकरणी स्थळ पाहणी करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४० :**

मुख्य लेखाधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००० साठी नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी जादा काम केल्याबद्दल त्यांना अतिरिक्त कामाचा मोबदला नियमाप्रमाणे देय आहे. औरंगाबाद महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती ठिक नसल्यामुळे एकुण कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी रुपये २४,१४,७०४/- खर्च देणे शक्य नाही. तरी खालील प्रमाणे संवर्ग निहाय अतिरिक्त कामाचा मोबदला देणे बाबत प्रस्ताव प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| निवडणुक निर्णय अधिकारी | : | माहे एप्रिल २००० महिन्याचे मुळ वेतन |
| सहाय्यक निवडणुक अधिकारी | : | माहे एप्रिल २००० महिन्याचे मुळे वेतन |
| अतिरिक्त निवडणुक निर्णय अधिकारी | : | माहे एप्रिल २००० महिन्याचे मुळे वेतन |
| क्षेत्रीय अधिकारी | : | माहे एप्रिल २००० महिन्याचे मुळे वेतन |
| महानगरपालिका अधिकारी | : | रुपये ३०००/- किंवा अतिरिक्त कामाचा मोबदला यापैकी जी कमी असेल. |
| वर्ग -३ कर्मचारी | : | रु. २०००/- किंवा अतिरिक्त कामाचा मोबदला यापैकी जी कमी असेल. |
| वर्ग -४ कर्मचारी | : | रु. १५००/- किंवा अतिरिक्त कामाचा मोबदला यापैकी जी कमी असेल. |

तरी उपरोक्त रक्कमेची मर्यादा ही कमाल मर्यादा असुन किमान संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामाच्या तासाप्रमाणे भत्ता देय राहील यासाठी रु. ११,७१,०००/- खर्च अपेक्षित आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री प्रशांत देसरडा :** या प्रस्तावानुसार ५ ते ६ अस्थायी (दैनिक वेतन) कर्मचाऱ्यांनी सुध्दा जास्तीचे काम केल्याबाबतचा समावेश आहे. त्यांना यातुन डावलण्यात येत

आहे. असे समजते त्यांनी काम केलेले असेल तर इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे सुध्दा जास्तीचा कामाचा मोबदला देण्यात यावा.

**श्री फुलारी नंदकुमार :** काम केले असेल तर त्यांना सुध्दा देण्यात यावे.

**श्री जयवंत ओक :** काम केले असेल तर त्यांना सुध्दा देण्यात यावे.

**मुख्य लेखाधिकारी :** त्यांनी काम केलेले असेल तर देता येईल.

**मा. सभापती :** आताच स. सदस्यांनी सुचना केल्या नुसार जे ५ ते ६ अस्थायी कर्मचारी यांनी निवडणुकीच्या वेळी जास्तीचे काम केलेले असेल तर तपासणी करुन त्यांनाही इतर कर्मचाऱ्याप्रमाणे मोबदला देण्यात यावा हा विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००७ साठी नियुक्त केलेल्यास अधिकारी व कर्मचारी यांनी जादा तास काम केल्याबद्दल खालील दर्शविल्याप्रमाणे संवर्ग निहाय अतिरिक्त कामचा मोबदला देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| निवडणुक निर्णय अधिकारी | : | माहे एप्रिल २००० महिन्याचे मुळ वेतन |
| सहाय्यक निवडणुक अधिकारी | : | माहे एप्रिल २००० महिन्याचे मुळे वेतन |
| अतिरिक्त निवडणुक निर्णय अधिकारी | : | माहे एप्रिल २००० महिन्याचे मुळे वेतन |
| क्षेत्रीय अधिकारी | : | माहे एप्रिल २००० महिन्याचे मुळे वेतन |
| महानगरपालिका अधिकारी | : | रुपये ३०००/- किंवा अतिरिक्त कामाचा मोबदला यापैकी जी कमी असेल. |
| वर्ग -३ कर्मचारी | : | रु. २०००/- किंवा अतिरिक्त कामाचा मोबदला यापैकी जी कमी असेल. |
| वर्ग -४ कर्मचारी | : | रु. १५००/- किंवा अतिरिक्त कामाचा मोबदला यापैकी जी कमी असेल. |

त्याचप्रमाणे सभागृहात झालेल्या प्रत्यक्ष चर्चेनुसार ज्या अस्थायी कर्मचाऱ्यांनी कार्यलयीन वेळेपेक्षा जास्त काम केलेले असेल. त्यांनीही वरील कर्मचाऱ्यांप्रमाणे जादा कामाचा मोबदला देण्यासही सर्वानुमते मंजुर देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सुपर मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील गाळा क्र. १ प्रबोधन प्रकाशन विश्वास संस्था मुंबई यांना दि. १४.०७.९३ पासुन पाच वर्षाकरीता भाडयाने देण्यात आले होते. सदरील पाच वर्षाच्या कालावधी दि. १३.७.९८ रोजी संपलेला आहे. भाडे तत्त्वावर गाळा देतांना करारनाम्यात मुदत वाढवुन देण्याचे ठरेल त्या वेळेस

भाडेवाढ करण्या संबंधिचे अधिकार मा. आयुक्त यांना राहतील अशी तरतुद आहे. तथापी सुपर मार्केट मधील इतर गाळयांची मुदत वाढ करतांना २५% भाडेवाढ करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रबोधन प्रकाशन विश्वस्त संस्था मुंबई यांना दिलेल्या गाळयाची सुध्दा २५% वाढ प्रस्तावित करण्यात आली होती. परंतु सदरील संस्थेचे त्या ठिकाणी सामना वर्तमान पत्राचे कार्यालय असुन ही संस्था सदर वृत्तपत्र ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालवत असल्याने त्यांना २५ टक्के ऐवजी १५% वाढ करण्यास मुख्य लेखाधिकारी यांनी अभिप्राय दिल्यानुसार मा. आयुक्त यांनी त्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

करीता सुपर मार्केट मधील पहिल्या मजल्या वरील गाळा क्र. १ प्रबोधन प्रकाशन विश्वस्त संस्था मुंबई यांना दिलेल्या गाळ्यांचे भाडे दि. १३.७.९८ पासुन १५% वाढुन त्यांना पाच वर्षाची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री मीर हिदायत अली :** अनेक संस्था नफ्यामध्ये चालत आहे. अनेक संस्था अशा पध्दतीची मुदतवाढ मागतील तोटयामध्ये कोणीही संस्था चालवित नाही जुलै ९८ मध्ये मुदत संपलेली होती. उशीरा प्रस्ताव सादर करण्याचे कारण काय ? ४ वर्षानंतर प्रस्ताव येणे बरोबर नाही.

**श्री देसरडा प्रशांत :** स्थायी समितीच्या सर्वच सदस्यांनी महानगरपालिकेचे हित जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे व त्यावर भर देऊनच तसे निर्णय सभागृहात झाले पाहिजे. एखादी संस्था चांगले मत मांडत असेल त्याचा सुध्दा अभ्यास केला पाहिजे.

**श्री मीर हिदायत अली :** माझ्या वार्डात आमदार निधीतुन व्यायाम शाळा बांधण्यात आलेली होती. महानगरपालिकेने चालविले नाही. हेल्थ कल्ब संस्थेला भाडयाने दिले ३०००/- रु. महिना कोण देणार ?

**श्री जयवंत ओक :** एखादी संस्था चांगले काम करीत असेल तर देण्यास हरकत नसावी. गेल्या १० वर्षात अनेक वैयक्तिक नांवे टाकुन दुकाने, जागा देण्या बाबतचे प्रस्ताव मंजुर केलेले आहे. संबंधीत अधिकारी यांना विचारणा करावी. ज्या ठिकाणी चांगले मार्केट होते तेथील दुकाने दिलेली आहे.

**श्री मीर हिदायत अली :** माझ्या वार्डात सुध्दा भाडे तत्त्वावर दिलेले आहे. परंतु या प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे सन १९९८ मध्ये मुदत संपलेली असतांना ४ वर्षांनंतर का प्रस्ताव उशीरा आल याची माहिती द्यावी. माझा ट्रस्टला विरोध नाही.

**श्री देसरडा प्रशांत :** कोटला कॉलनी येथे आमदार बसैये (बंधु) यांच्या स्वेच्छा निधीतुन वाचनालयाची इमारत बांधलेली आहे. एक संस्था घेण्यास तयार होती दिले नाही. एखादी संस्था वाचनालय चालविण्यास तयार आहे व वाचनालयासाठी इमारत बांधलेली आहे. अशी इमारत देण्यास हरकत नसावी. आतच स. सदस्य श्री हिदायत अली यांनी प्रश्न उपस्थित केला जर एखाद्या ठिकाणी हेल्थ क्लब असेल व एखादी संस्था हेल्थ कल्ब चालविण्यास तयार असेल तर देण्यास हरकत नसावी. ज्या ज्या विषयावर या सभेत चर्चा होत आहे. असे सर्व विषय ज्या त्या समितीमध्ये चर्चेला अगोदर घेतले जावे. नंतरच योग्य निर्णय घेण्यात यावा. शासन नियमाप्रमाणे भाडेदर आकारणी करावी जेणे करुन महानगरपालिकेचा सुध्दा फायद होईल.

**मुख्य लेखाधिकारी :** प्रस्तावानुसार सादर गाळ्यामध्ये सध्या सामना वृत्तपत्राचे कार्यालय चालते. भाडेवाढ करण्याचे अधिकार प्रशासनाला आहे. दर वर्षी ५ % प्रमाणे

पुढील ५ वर्षाचे २५% होते परंतु सुपर मार्केटचा संपुर्ण विचार केला. बरेच गाळे असे आहे की काहींना १० % तर काहीनां १५% भाडेवाढ सुचविली आहे. सर्वांना एकच दर करण्याच्या दृष्टीने १५% ची वाढ प्रस्तावित केलेली आहे. दोन ते तीन गाळ्यांना २५% वाढ सुचविण्यात आली होती. ते लोक न्यायालयात गेलेले आहे. इतर गाळे धारकांना १० ते १५% त्याची ३% प्रती वर्षी वाढ होते.

**श्री मीर हिदायत अली :** चार वर्षापुर्वी प्रस्ताव आला नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** गाळे किती रिकामे आहे याचा आढावा घेतला बऱ्याच त्रुट्या आढळल्या. करारनाम्याचे नुतनीकरण नाही ते करुन घेतले. धारकांचे भाडेवाढ झालेले नव्हते ही सर्व माहिती घेऊनच कार्यवाही केलेली आहे.

**श्री जयवंत ओक :** ज्यांना १०% नी भाडेवाढ केली त्याप्रमाणे इतरांना करावे. सेवाभावी संस्था म्हणुन काही संस्था दुसरे व्यवसाय करीत आहे याची चौकशी व्हावी. स. सदस्य श्री हिदायत अली यांचा वेगळा प्रश्न आहे. हा विषय वेगळा आहे. मंजुर करावा.

**श्री मीर हिदायत अली :** या पुर्वी हेल्थ कल्बला रु. १०००/- होते. आता ३०००/- कसे करतात.

**मा. सभापती :** स. सदस्य श्री हिदायत अली यांनी सुचना केल्याप्रमाणे त्या बाबतीत वेगळा प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा. हा विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुपर मार्केट वरील पहिल्या मजल्यावरील प्रबोधन प्रकाशन विश्वस्त संस्था मुंबई यांना दिलेल्या गाळा क्र. १ चे भाडे दिनांक १३.०७.१९९८ पासुन १५% वाढवुन त्यांना ५ वर्षाची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३ :**

उप आयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, उस्मानपुरा चौकातील रस्ता दुभाजकामधील एस.टी.डी. पी.सी.ओ. साठी दिलेल्या जागेतील एसटीडी पीसीओ हलविणे आवश्यक असल्यामुळे ८X१० फुट या आकारची जागा कै. विनायकराव पाटील यांच्या पुतळयाजवळील उद्यानात हॉटेल हवेली लगत पाच वर्षासाठी भाडे पट्टायाने देणे बाबत स्थायी समिती सभा दि. १६/०६/१९९५ मधील विषय क्र. २६ अन्वये ठराव सर्वानुमते पारित झाला होता. सदर जागेचा श्री सुरजितसिंग खुंगर याचे सोबत त्यानुसार करारनामा करुन घेण्यात आला होता.

संबधीताने या जागेवर १३X१७ या आकाराने पक्के बांधकाम केले असुन पुर्व व उत्तर बाजुस ओटयावर काचेचे कंपाऊंड तयार केलेल आहे. तसेच दक्षिणेस स्वच्छतागृहा आहे या १४९ चौरस फुट जास्तीचे बांधकामासाठी दंडापोटी बांधकाम खर्च दर रु. ३००/- प्रती चौ. फुट या प्रमाणे रु. ४२,३००/- आकारणी करण्यात आली असून संबंधीताने दि. २२.३.९९ रोजी उपरोक्त दंडाचे रक्कमेचा भरणा केलेला आहे. तसेच त्यांचेकडुन दरमहा ८००/- रुपये वाढीव दराने वार्षीक भाडे रु. ९४००/- वसुल केले आहे. सन १९९८ पासुन १२X१७ फुट या आकाराच्या जागेसाठी रु. १,७६८/- प्रतीमहा भाडे वसुल करुन भाडे पट्टा नुतनीकरण अटी व शर्तीच्या अधिन राहुन पाच वर्षासाठी करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री प्रशांत देसरडा :** मागील एका स्थायी समितीच्या बैठकीत मी सभापती असतांना अशाच प्रकारचा प्रस्ताव सादर झालेला होता. व शहरात महानगरपालिकेने किती जागा भाडे पट्टयाने दिलेल्या आहे. भाडे किती येते. या संबंधीताचा आढावा घेवुन अहवाल उपआयुक्त यांना सादर करण्याचे आदेशित केले होते. अद्याप अहवाल दिलेला नाही. महानगरपालिकेने एकुण ४६ संस्थांना जागा भाडेतत्त्वावर दिलेल्या आहे याचा अभ्यास केला तर जवळपास २५ एकर जागा भाडेने दिलेली आहे. यात काही नगरपरिषेदेचा काळापासुन च्या सुध्दा जागा आहे. दरमहा १०० तसेच काही जागांना ६००/- रु. दरमहा असे भाडे आहे. एका जागेच्या संदर्भात वृत्तपत्रात सुध्दा आलेले होते. उदा. द्यावयाचे झाल्यास औरंगाबाद पिपल्स बँकेला महानगरपालिकेने १० हजार रुपये दर वर्षाचे भाडे तत्वावर जागा दिली. परंतु या बँकेने खालच्या बाजुस संस्थेने ६ दुकाने काढुन संस्थेने ५० लाख जमा केले. त्याचप्रमाणे बॉम्बे मर्कन्टाईल बँकेला सुध्दा जागा दिली आहे. भाडे कमी आकारणी होते. इतर महापालिकेत अशी परिस्थिती नाही. आजच्या घडीला रु. ३०००/- शिघ्र सिध्द गणक दराप्रमाणे विचार केल्यास रु. ३४ कोटी मिळेल. ४६ ची यादी आहे. १० सेवा भावी संस्था असतील किमान २५-३० कोटी रुपये मनपास मिळावयास पाहिजे. जळगाव नगरपालिका ही व्यापारी संकुलावर चालते. मोठया प्रमाणात उत्पन्न मिळते. त्या प्रमाणे याही महानगरपालिकेच्या जागेचे भाडे वाढवावे. संजय गांधी युथ फेस्टीवल, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ दर वेळेस बील वाढवते. आपण भाडे का वाढवु नये. तसेच समर्थकृपा सहकारी संस्था यांना १९९८ ला जागा दिलेल्या आहे. शासनाचे शिघ्र सिध्द गणकाच्या दराने जागा दिल्या पाहिजे. यामुळे महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात उत्पन्न वाढेल सेवाभावी संस्था बाजुला काढा. मालखरे बिल्डर्स तसेच जयटार्वस इत्यादींना ७५% जागा विकास करण्यासाठी दिल्या करार सुध्दा झालेला आहे. परंतु संबंधीताने सर्व जागा डेव्हलप करुन दुकाने किंवा फ्लॉटस असतील ते सर्व विक्री केलेले आहे. महानगरपालिकेला ठरवुन दिलेला २५% वाटा हस्तांतर करुन दिलेला नाही. ही वस्तुस्थिती आहे. संबंधीतांने महानगरपालिकेचा वाटा विकास झालेला भाग न दिल्यामुळे जवळपास १ कोटीचे वार्षीक नुकसान होत आहे. म्हणुन ज्या ज्या संस्थेला जागा देणार त्या देतांना शासन रेडीरेक्नर प्रमाणे दर लावण्यात यावे. मग ती कोणतीही संस्था असो. आलेल्या प्रस्तावास माझा विरोध आहे. हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**श्री. किशोर शिंदे :** काही जागा झुनका भाकर केंद्रासाठी दिलेल्या आहे. त्या जागेचा यात समावेश झालेला असेल. अशा जागांवर झुणका भाकर केंद्रच चालविण्यात आले पाहिजे. परंतु पदमपुरा भागात एका झुणका भाकर केंद्राच्या जागेवर बियर बार चालविण्या येते.

**श्री मीर हिदायत अली :** देण्यास हरकत नसावी. दंडापोटी ४३ हजार रुपये भरलेले आहे. उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीने प्रस्ताव आहे.

**श्री कैसर खान :** ज्या जागा भाडे तत्वावर दिलेल्या आहेत त्यांचा सर्वे करावा. त्यासाठी कमेटी नियुक्त करावी. तसा अहवाल सभागृहात सादर करण्यात यावा योग्य निर्णय या सभागृहाला घेता येईल.

**श्री किशोर शिंदे :** यात महानगरपालिकेला फायदाच होणार आहे. प्रस्ताव मंजुर करावा. किती जागा भाडयाने दिल्या. भाडे किती येते. याचा अहवाल सभागृहात सादर करण्यात यावा.

**डॉ. आशा बिनवडे :** शासन मंजुर नियमाप्रमाणे जो दर लावुन भाडे यावयास पाहिजे ते येत नाही. लाखो रुपयांचे उत्पन्न महानगरपलिकेचे बुडीत होत आहे. अल्प दरात आकारणी केली जाते. ते तसेच चालु आहे. त्यात बदल करुन वाढ करावी. नविन पध्दतीने आकारणी व्हावयास पाहिजे. तसेच काही बिल्डरांना विकास करण्यासाठी २५%, ७५% प्रमाणे जागा दिलेल्या आहे. विकास केलेल्या जागेवरील दुकाने फ्लॅटस विक्री केलेले आहे. महापालिकेला जो २५% हिस्सा देणार होते तो दिलेला नाही. अशा बिल्डर्सवर प्रशासनाने काय कार्यवाही केली आहे? त्वरीत कार्यवाही झाली पाहिजे. सभागृहाच्या वतीने माझी मागणी आहे.

**श्री देसरडा प्रशांत :** २५%-७५% अशा विकास केलेल्या जागेवरील दुकाने फ्लॉटस संबंधीताने विकलेले आहे. भोगवटा चालु आहे.

**प्र. सहा. स. नगररचना :** समुचित आरक्षणाचा माध्यमातुन विकास या योजने प्रमाणे आतापर्यंत ४ परवानगी दिल्या आहेत. ७५% मालक व २५% महानगरपालिका असे ४ प्रकरणे झालेली आहे. त्यातील एका प्रकरणात गारखेडा भागातील मालखरे बिल्डर्स कडुन २५% विकास जागेचा हिस्सा महापालिकेने ताब्यात घेतलेला आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** मालमत्ता अधिकारी यांचेशी चर्चा केली असता अशा जागांचे कम्प्लीशन नसल्याने ताबा घेतलेला नाही असे कळते.

**प्र. सहा. सं. नगररचना :** अशा विकास परवानगी दिलेल्या जागेवरील ३ प्रकरणात महानगरपालिकेचा ताबा घेण्याचे बाकी आहे. त्यापैकी जय टार्वसचे मालक मा. सर्वोच्च न्यायलयात गेलेले आहे. ५३०० चौरस मीटर जागेवर बांधकाम केले संबंधीताने ७८०० चौ.मी. परवानगी होती. मुळ कराराप्रमाणे ७८०० चौ.मी . साठी १६०० चौ.मी. ताब्यात घ्यावे लागले असते. त्यांनी १३०० चौ.मी. बांधले ते ताब्यात घेण्याच्या संदर्भात तज्ञ वकीलांचा सल्ला घेतला असता न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी असे म्हटले आहे. आणखी दोन प्रकरणाचा बाबतीत २५% विकास झालेली जागा महापालिकेच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** ७५% विकास झालेल्या जागा विक्री केल्या भोगवटा केला महापालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिले नसतांना जागा विक्री कशा केल्या त्यांवर पोलीस गुन्हे दाखल करावे. यात तमहापालिकेचे नुकसान झालेले आहे.

**प्र. सहा. संचालक (न.र.) :** वस्तुस्थिती आहे. त्यांना भोगवटा प्रमाणपत्र दिले नाही.

**मा. सभापती :** गंभीर स्वरुपाचे प्रश्न स. सदस्यांनी उपस्थित केलेले आहे. अशा प्रकरणाचय बाबतीत संबंधीत अधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही करावी. महानगरपालिकेचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**श्री इलियास किरमाणी :** संबंधीत बिल्डर्सवर गुन्हे दाखल करावे.

**डॉ. आशा बिनवडे :** रस्ता दुभाजकावर एस.टी.डी. पी.सी.ओ. अधिकृत होते काय? बेटामध्ये जागा दिलेली होती का अशी जागा देता येता का? असा माझा प्रश्न आहे.

यात चुक झाली संबंधीताने दंडापोटी रक्कम भरलेली आहे. असे नमुद केले. चुकीचा निर्णय मान्य केल्यास उदया या सभागृहाची नक्कीच बदनामी हाईल यात शंका नाही. चुकीचे समर्थन करणे योग्य होणार नाही. हा प्रस्ताव मंजुर करु नये. अशी मागणी सभागृहाच्या वतीने करीत आहे.

**श्री प्रशांत देसरडा :** प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे श्री सुरजितसिंग खुंगर हे महानगरपालिकेचे ट्रस्टी आहेत. हा प्रस्ताव मंजुर केल्यास अशा रितीने त्यांना फायदा घेता येऊ शकतो का?

**श्री इलियास किरमाणी :** मुर्गी नाल्यावर काही लोकांना १०x१० फुटची टपरी साठी जागा दिलेल्या होत्या त्यांचे कडुन भाडे वसुल केले. सद्य स्थितीत तेथील टपऱ्या बुल्डोजर मशीन लावुन काढण्यात आल्या. संबंधितांना पर्यायी जागा द्यावयास पाहिजे होती. भेदभाव करु नये.

**मा. सभापती :** जागा केव्हा दिली होती. नियमाने दिलेली होती का या बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री इलियास किरमाणी :** माझ्या वार्डात होनाजी नगर येथील खुली जागा ताब्यात घेतली. बोर्ड लावण्यात आला व नंतर काढण्यासाठी आला. जागेवर बांधकाम चालु आहे. छत टाकण्याचे काम होत आहे. या संदर्भात मी ले-आऊटची प्रत सुध्दा महानगरपालिकेच्या संबंधीत विभागाकडे दिली. परंतु कोणतीही कार्यवाही होत नाही. न्यायालयात प्रकरण चालु आहे असे सांगीतले जाते. छत टाकेल व स्टेही घेवुन येतील. २ महिने झाले प्रशासकीय अधिकारी कार्यवाही करीत नाही. पत्र देवून दोन महिने झाले आहे. लोकमत पेपरला फोटोही आलेत.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करावी.

**उपआयुक्त (म.) :** कै. विनायकराव पाटील यांचे पुतळया जवळील उद्यानात हॉटेल हवेली लगत १९९५ च्या सर्वसाधारण सभेच्या ठरावा प्रमाणे ८x१० फुट इतकी जागा भाडेपट्टयाने दिली होती. संबंधीताने या जागेवर १३x१७ या आकारचे पक्के जास्तीचे बांधकाम केले आहे. १४१ चौ. फुट जास्तीचे बांधल्यामुळे दंडापोटी ४२,३००/- रु. वसुल करण्यात आले. सदर जागा रेग्युलाईज करुन घेतलेली आहे. व ५ वर्षासाठी भाडेपट्टा नुतनीकरण करण्यासाठी हा प्रस्ताव सादर झालेला आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** दुभाजकावर जागा देता येते का? का देण्यात आलेली होती?

**मा. सभापती :** तपासणी करुन पुढील बैठकीत ठेवावे. तसेच स. सदस्य श्री किरमाणी यांनी त्यांचे वार्डात होत असलेल्या अनाधिकृत बांधकामबद्दल जे पत्र देऊन कार्यवाहीची मागणी केली त्या ठिकाणी उपआयुक्त (म.) यांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी करावी व २ दिवसात अहवाल सादर करावा. महानगरपालिकेच्या जागेवर काम होत असेल तर ते त्वरीत बंद करावे.

**श्री कैसर खान :** स. सदस्य श्री किरमाणी यांनी पत्र देऊन दोन महिने झाले. प्रशासकीय अधिकारी यांनी का कार्यवाही केलेली नाही. त्यांचेवर कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** तक्रार करुनही नियमाने कार्यवाही झालेली नसेल तर उपआयुक्त (म.) यांनी प्रशासकीय अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी.

**श्री इलियास किरमाणी :** माझ्या वार्डात जवळपास १० ले-आऊट मंजुर आहेत. त्या जागेवर लोक अनधिकृतपणे घरे बांधतील त्यानंतर लोक न्यायालयात जातात.

प्रकरणाचा निकाल त्यांच्या बाजुने लागतो. आपले वकील केसेस जिंकतील असे वाटत नाही. यात मनपाचे नुकसान होते.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** माझ्या वार्डात अनधिकृतपणे आर.सी.सी. ची घरे व इतर कच्चा मातीची घरे होत आहे. घराचे काम सुरु होते तेव्हापासुन आपल्या मनपातील संबंधीत विभागाला कळविण्या येते. इमारत निरिक्षक येऊन प्रत्यक्ष पाहणी करतात. संबंधीत मालकाशी चर्चा करतात. परंतु बांधकाम थांबवित नाही. याचे कारण काय? आपले कर्मचारी पैसे घेतात याचा अर्थ असा होऊ शकतो.

**श्री इलियास किरमाणी :** लहान व्यावसायीक जे टपरीधारक असतात त्यांचे टपऱ्या काढल्या जातात परंतु मोठमोठी बांधकामे अनाधिकृतपणे चालु असतांना ते पाडण्यात येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. मोठमोठ्या लोकांना नोटीसा देतात. त्यांना आपले अधिकारी न्यायालयात जाण्याचे सांगतात.

**प्रशासकीय अधिकारी :** स. सदस्य मानकापे यांनी ज्या व्यक्तीच्या बाबतीत तक्रार केलेली होती त्या व्यक्तीने जुने घराचे काम तोडुन नविन बांधण्याचे काम चालु होते. संबंधीताकडे परवानगी नव्हती म्हणुन सामान जप्त करुन आणले त्यांनी सुट्टीचा फायदा घेऊन बांधकाम केलेले आहे. हे प्रकरण तोडायला घेतले आहे.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** नाल्यामध्ये बांधकाम होते वारंवार अधिकाऱ्यांना सांगीतले तरी कार्यवाही होत नाही. स्वत उपआयुक्त हे सुध्दा त्या ठिकाणी येऊन गेलेले होते. सी. एस. सोनी साहेब सुध्दा येऊन गेलेले आहे. अधिकारी येतात परंतु कार्यवाही होत नाही.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** अधिकाऱ्यांची सेवा काय आहे. तक्रार केल्यानंतरच कार्यवाही करायची का असा प्रश्न निमार्ण होतो. जुने काम तोडुन नविन केले व सुट्टीचा फायदा घेऊन संबंधीताने बांधकाम केलेले आहे. असे अधिकाऱ्यांनी उत्तर देणे बरोबर नाही. प्रशासकीय विभाग काय काम करतात. कारवाई करण्यास काय अडचण होती याचा खुलासा अधिकाऱ्यांनी करावा.

**श्री नंदकुमार फुलारी :** मागच्या वेळी शर्मासोबत असतांना ३ पत्र दिले. किराडपुरा सिडको येथील एक नाल्यात १६ आर.सी.सी. पिल्लर पैकी ४ पिल्लाचे काम चालु होते तेव्हा सांगीतले १६ पिल्लर झाले तरी तोडले नाही.

**उप आयुक्त (म.) :** शहरात जे अतिक्रमण होते त्याचे तीन भागात वर्गवारी करता येईल. यात १) रस्त्यावर झालेले अतिक्रमण, २) अनधिकृत वस्त्यात २०X३० चे ले-आऊट, ३) नविन बांधकामाची परवानगी घेऊन त्यापेक्षा जास्तीचे केलेले अनधिकृत बांधकाम तसेच यात नाल्यावर झालेल्या बांधकामाचा सुध्दा समावेश होतो. भाग १ मध्ये रस्त्यावर झालेले अतिक्रमण हाती घेतले. या संदर्भात शहरातील सर्वेक्षणाचे काम येत्या २३ तारखे पासुन मुख्य रस्ते, उप रस्ते तसेच लहान गल्ल्यातील झालेले अतिक्रमण असतील याचे मोजमाप प्रथम घेणार कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेऊन ज्यांनी अतिक्रमण केले त्यांनी केलेले अतिक्रमण काढुन टाकण्यासाठी पुढील एक महिण्यासाठी मुदत दिली जाईल. म्हणजेच कार्यवाही सुरु झाल्यापासुन दोन महिण्याच्या आत अतिक्रमण काढले पाहिजे. ही सर्व कार्यवाही करण्याबाबतचा प्रोग्रॅम महापालिकेतर्फे करण्यात आलेला आहे. अतिक्रमण काढण्या अगोदर कोणते अतिक्रमण कोणत्या भागातील आहे व त्याचे क्षेत्र किती व केव्हा काढले

जाणार याची वृत्तपत्रात तसेच सिटी चॅनल वरुन प्रसिध्दी देऊन कार्यवाही होईल. जेणे करुन नागरीकांनी केलेले अतिक्रमण स्वतःहुन काढुन टाकले पाहिजे.

भाग २ मध्ये अनधिकृत वस्त्यामध्ये होणारे अतिक्रमण येते. या बाबत नगररचना विभागामार्फत कार्यवाही होईल. झालेले अतिक्रमण गुंठेवारी कायद्यात बसत असेल तर रेग्युलर करता येईल. नसता अनधिकृत म्हणुन काढण्याची कार्यवाही होईल.

भाग ३ मध्ये ज्यांनी बांधकामाची परवानगी घेतली परंतु वाजवी पेक्षा जास्तीचे बांधकाम केले. यात घराचे बांधकाम असु शकेल. दुकानाचे असु शकते या बाबतीत नगररचना विभागाकडुन माहिती घेऊन परवानगी किती बांधकामाची दिली होती याची माहिती घेऊन पुढील कार्यवाही नियमाने करण्यात येईल. येत्या २३ तारखेपासुन सर्वेक्षणाचे काम सुरु होईल.

**श्रीमती पार्वती मानकापे :** बांधकाम चालु असतांना संबंधित विभागाला कळविल्यास त्यानंतर सुध्दा कार्यवाही होत नाही.

**मा. सभापती :** शहरात अनधिकृतरित्या बांधकामे होणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी. स. सदस्य श्रीमती मानकापे यांनी जी सुचना मांडली त्या बाबतीत उप आयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन कार्यवाही करावी.

**सुर्वणा चंद्रात्रे :** जे अधिकारी वार्डात पहाणीसाठी येतात त्यावेळी स. सदस्यांना सुध्दा विश्वासात घेणे आवश्यक आहे. थर्ड पार्टी म्हणुन यात समावेश करण्यात यावा.

**मा. सभापती :** अतिक्रमणाच्या बाबतीत स. सदस्यांनी आप आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहे. शहरातील अतिक्रमणे वाढु नये व स. सदस्य यांनी वेळोवेळी संबंधीत विभागास कळविल्यास त्यानंतर तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे. तसेच स. सदस्य श्री प्रशांत देसरडा, स. सदस्य, डॉ. आशा बिनवडे यांनी ज्या ज्या सुचना केल्या त्यानुसार शहरात आशा किती जागा भाडेपट्टयावर दिलेल्या आहे. भाडे किती येते. नविन दराने काय भाडे आकारता येतील महापालिकाने यात फायदा बघीतले आहे किंवा काय? या संबंधीची सविस्तर माहिती येत्या २७ तारखेच्या आत सादर करावी. जेणे करुन या बाबतीत या समिती मार्फत विशेष बैठक आयोजीत करता येईल. तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

शहरातील भाडे पट्ट्यावर दिलेल्या जागा त्यांचे येणारे भाडे, नविन दराने आकारणी करता येईल काय ? या संबंधीची माहिती आगामी सभेपुर्वी सादर करावी. तुर्त हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४४ :**

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ४० फुट रुंद रस्ता काचीवाडा ते शहाबाजार या रस्त्याचे भुसंपादन कार्यवाही विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक यांचे मार्फत सुरु असुन या रस्त्याने एकूण ८४ मिळकती बाधीत आहेत. त्यापैकी पाच मिळकती तुर्त संपादन केल्यास सदरील रस्त्याची वाढुन रस्ता विकसीत करुन रहदारीला खुला करता येईल.

करीता वरील पाच मिळकती धारकांना (मा.भु.क्र. १०३७०, १०३६९, १०४१७, १०४११६, १०४११५) मिळकत धारकांना सुनावणीसाठी मा. आयुक्तांनी बोलाविले असता न. भु. क्र. १०३७०, १०४१६ व १०४१७ हया मिळकत धारकांनी बाधीत मिळकत संपदान करण्यास व निश्चित केलेला मोबदला घेण्यास संमती दिलेली आहे. उर्वरीत दोन मिळकत धारकांनीसंमती घेण्यात येईल तुर्त न. भु. क्र. १०३७१, १०४१६ व १०४११७ हया तीन मिळकतीचे क्षेत्र संपादानासाठी मोबदला अनुक्रमे १६००,०००+१,३०,०००+१,१०,००० असु एकुण रु. १८,४०,०००/- (रुपये अठरा लाख चाळीस हजार) निश्चि केली आहे. तसेच बाधीत क्षेत्र नोदंणीकृत दस्तऐवज करुन घ्यावी लागेल. त्यासाठी खरेदी खताकरीता रु २,२२,०००/- (रुपये दोन लाख बावीस हजार) खर्च येईल. खरेदी खताचा संपुर्ण खर्च महानगरपालिका करणार आहे. तथापी मिळकत धारकाला वरील प्रमाणे द्यावयाचा मोबदला पैकी ५०% मोबदला खरेदी खत करते वेळी द्यावयाचा आहे. तर उर्वरीत ५०% मोठया बाधीत क्षेत्र महानगरपालिकेचे नांवे झाल्यानंतर द्यावयाचा आहे. वरील मिळकतीचे बाधीत क्षेत्राचा ताबा घेतल्यानंतर विशेष भुसंपादन अधिकारी यांना कळविण्यात येईल. परंतु या वर्षासाठी भुसंपादनासाठी अंदाजपत्रकात रु. १.७५ कोटीची तरतुद केलेली आहे आणि २.७५ कोटीचे निवाडे (award) रक्कम देणे बाकी आहे. करीता वाढीव तरतुद उपलब्धी अंती उक्त मोबदला अदा करण्यात येईल.

सबब वरील प्रमाणे न. भु. क्र. १०३७०, १०४११६ व १०४११७ च्या मिळकत धारकास द्यावयाचा मोबदला आणि खरेदीखतासाठी वरील प्रमाणे लागणारी रक्कम अग्रीम म्हणुन श्री डी. डी. काळेले, शा. अ. यांना देणेसाठी वाढीव तरतुद उपलब्धी अंती देणेसाठी प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ४० फुट रुंद रस्ता काचीवाडा ते शहाबाजार या रस्त्याने बाधीत मिळकतीपैकी न. भू. र. १०३७०, १०४१६ व १०४१७ च्या मिळकती धारकांनी संमती दिल्यानुसार या तीन मिळकतीचे क्षेत्र संपादनासाठी अनुक्रमे १६,००,०००+१,३०,०००+१,१०,००० असे एकुण र. रू. १८,४०,०००/- (रुपये अठरा लाख चाळीस हजार ) निश्चित करण्यांत आलेला मोबदला संबंधीतांना ५०% मोबदला खरेदीखत करते वेळी व उर्वरीत ५०% मोबदला बाधीत क्षेत्र मनपाचे नांवे झाल्यानंतर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. त्याच प्रमाणे मोबदला रक्कम व खरेदी खतासाठी लागणारी र. रु. २,२२,०००/- (दोन लाख बावीस हजार) अग्रीम म्हणुन श्री. डी.डी. काळेले, शा. अ. यांना अंदाजपत्रकातील वाढीव तरतुदी अंती देणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४५ :**

शिक्षणाधिकारी महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत असलेल्या विद्यार्थी संख्येनुसार तसेच प्रशासकीय दृष्टीकोनातुन केंद्रीय शाळेची पुर्नरचना करणे आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

१) केंद्रीय प्राथमिक शाळा, औरंगपुरा या शाळेतील विद्यार्थी संख्या १ ते ४ वर्गाची मिळुन फक्त ३५ आहे. मागील ३-४ वर्षापासुन ही संख्या कमी झाली आहे. याच केंद्रातील प्राथमिक शाळा नागेश्वरवाडीला केंद्रीय प्राथमिक शाळेचा दर्जा देणे.
२) केंद्रीय प्राथमिक शाळा, जुना बाजार या शाळेतील विद्यार्थी संख्या १०० आहे. म्हणुन केंद्रीय प्राथमिक शाळाचा दर्जा कमी करणे.
३) प्राथमिक शाळा किराडपुरा या शाळेत विद्यार्थी संख्या ७०० आहे. म्हणुन या शाळेत केंद्रीय प्राथमिक शाळेचा दर्जा देवुन त्यास प्राथमिक शाळा कैसर कॉलनी ही शाळा जोडणे.
४) प्राथमिक शाळा इंदीरानगर बायजीपुरा या शाळेत ७५० विद्यार्थी संख्या आहे. या शाळेस केंद्रीय प्राथमिक शाळेचा दर्जा देवुन प्राथमिक शाळा कैलास नगर ही शाळा जोडणे.
५) केंद्रीय प्राथमिक शाळा, मोतीकारंजा या शाळेत विद्यार्थी संख्या ८३ आहे. त्यामुळे केंद्रीय प्राथमिक शाळेचा दर्जा कमी करुन रोकडीया हनुमान कॉलनी या केंद्रास जोडणे.

या बदलामुळे केंद्रीय प्राथमिक शाळा औरंगपुरा केंद्रीय प्राथमिक शाळा जुना बाजार व केंद्रीय शाळेचा दर्जा कमी होईल व त्या ऐवजी नविन केंद्रीय प्राथमिक शाळा नागेश्वरवाडी केंद्रीय प्राथमिक शाळा किराडपुरा -३ (म/उ.) केंद्रीय प्राथमिक शाळा इंदिरानगर बायजीपुरा केंद्र बनतील मनपा शिक्षण विभागातील एकुण ३३ केंद्रीय प्राथमिक शाळांची संख्या कायम राहील. ही कार्यवाही ०१ सप्टेंबर २००२ पासुन आमलात येईल.

करिता प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद** :

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका शाळांच अंतर्गत असलेल्या विद्यार्थी संख्येनुसार तसेच प्रशासकीय दृष्टीकोनातुन खालील दर्शविल्याप्रमाणे केंद्रीय शाळांची पुर्नरचना करण्यास व या कार्यवाहीची अमलबजावणी दिनांक ०१ सप्टेंबर २००२ पासुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) केंद्रीय प्राथमिक शाळा, औरंगपुरा या शाळेतील विद्यार्थी संख्या १ ते ४ वर्गाची मिळुन फक्त ३५ आहे. मागील ३-४ वर्षापासुन ही संख्या कमी झाली आहे. याच केंद्रातील प्राथमिक शाळा नागेश्वरवाडीला केंद्रीय प्राथमिक शाळेचा दर्जा देणे.
२) केंद्रीय प्राथमिक शाळा, जुना बाजार या शाळेतील विद्यार्थी संख्या १०० आहे. म्हणुन केंद्रीय प्राथमिक शाळाचा दर्जा कमी करणे.
३) प्राथमिक शाळा किराडपुरा या शाळेत विद्यार्थी संख्या ७०० आहे. म्हणुन या शाळेस केंद्रीय प्राथमिक शाळेचा दर्जा देवुन त्यास प्राथमिक शाळा कैसर कॉलनी ही शाळा जोडणे.
४) प्राथमिक शाळा इंदीरानगर बायजीपुरा या शाळेत ७५० विद्यार्थी संख्या आहे. या शाळेस केंद्रीय प्राथमिक शाळेचा दर्जा देवुन प्राथमिक शाळा कैलास नगर ही शाळा जोडणे.

५) केंद्रीय प्राथमिक शाळा, मोतीकारंजा या शाळेत विद्यार्थी संख्या ८३ आहे. त्यामुळे केंद्रीय प्राथमिक शाळेचा दर्जा कमी करुन रोकडीया हनुमान कॉलनी या केंद्रास जोडणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ०३.०८.२००२ रोजी पाऊस चालु असतांना सुंदर नगर नाल्यामध्ये उदय कॉलनी भोईवाडा परिसरातील सायली नावाची मुलगी नाल्यामधील पुरात वाहुन गेली. सदर घटनेची माहिती मिळताच मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, मा. सभागृहनेता, मा. विरोधीपक्ष नेता, सन्माननीय नगरसेवक तसेच मनपाचे वरिष्ठ अधिकारी आदींनी घटनास्थळास भेट दिली. सदर मुलीचा मृतदेह दिनांक ०४.०८.२००२ रोजी मनपाच्या अग्निशमन विभागाने प्राप्त केला. घटनेचे गांर्भीय विचारात घेता मुलीच्या पालकास सहानुभूतीपुर्वक मानवतेच्या दृष्टीकोनातुन रक्कम रुपये १०,०००/- (रु. दहा हजार फक्त ) मदत करण्याची घोषणा मा. महापौर यांनी केली. त्यानुसार र. रु. १०,०००/- चा धनादेश मयत मुलीच्या संबंधीतास धनादेश देण्यात आलेला आहे. त्यास कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री नंदकुमार फुलारी :** सदर पुलाचे बांधकाम केव्हा करणार आहेत.

**श्री चंद्रशेखर जैस्वाल :** पुल व्यवस्थित नव्हता म्हणुन एका मुलीचा बळी गेला यापुढे असा प्रकार होऊ नये यासाठी तात्काळ पुलाचे काम सुरु करावे.

**मा. सभापती :** पुलाचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत कार्यवाही व्हावी. प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक ३.८.२००२ रोजी पावसामुळे सुंदर नगर नाल्यात आलेल्या पुरात उदय कॉलनी भोईवाडा परिसरातील वाहुन गेलेल्या व त्यामुळे मयत झ ाालेल्या सायली नावाच्या मुलीच्या पालकांना सहानुभूतीपुर्वक मानवतेच्या दृष्टीकोनातुन रक्कम रुपये १०,०००/- ची आर्थिक मदत करण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक अँटी करप्शन ब्युरो औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र जा. क्र. सीआर/५४/औबाद/२००२/१४७१ दि. २८.६.०२ नुसार आरोपी लोकसेवक श्री किसनलाल जैस्वाल (निलंबित) दुय्यम आवेक्षक महानगरपालिका औरंगाबाद यांचे विरुध्दची लाचलुचपतीची सापळा केस प्रकरणी त्यांचे विरुध्द न्यायालयात अभियोग लावण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. पत्रा सोबत सदरच्या गुन्हा प्रकरणांच्या तपासाचे संपुर्ण कामगदपत्रे संच त्यांनी पाठविलेला आहे.

सर्व कागदपत्रे बारकाईने तपासली आहेत. संबंधित श्री भरत किसनलाल जैस्वाल यांच्या विरुध्द न्यायालयात अभियोग लावण्यासाठी पुरेसा पुरावा दिसुन येत आहे. सबब प्रस्ताव मान्य करावा.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पोलीस उप-आयुक्त/अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांचे कडील पत्र जा. क्र. सी.आर./५४/औबाद/२००२/१४७१ दि. २८.६.२००२ नुसार आरोपी लोकसेवक श्री भरत किसनलाल जैस्वाल (निलंबीत) दुय्यम आवेक्षक महानगरपालिका औरंगाबाद यांचे विरुध्दची लाचलुचपतीची सापळा केस प्रकरणी त्यांचे विरुध्द न्यायालयात अभियोग लावण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको व शहराच्या निविदा प्रभागामध्ये स. नगरसेवक स्वेच्छा निधीतुन मागणी प्रमाणे विंधन विहीर खोदुन हातपंप बसविण्याच्या कामासाठी दर निश्चित करणे आहे.

या कामाकरीता निविदा सुचना प्रसिध्दीस देवून निविदा मागविण्यात आल्या असता एकण ७ निविदा विक्री झाल्या व चार प्राप्त झाल्या. आलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१) मे. तिरुपती बोअरवेल्स, नाशिक - अं. प. दरापेक्षा १२.५ % कमी

२) मे. उपासना बोअरवेल्स, औरंगाबाद - अं. प. ११.५% कमी

३) मे. यश बोअरवेल्स औरंगाबाद - अं. प. ८% कमी

४) मे. संगिता बोअरवेल्स, लातुर - अं. प. ७.५% कमी

प्राप्त निविदामध्ये तुलनात्मकदृष्टया मे. तिरुपती बोअरवेल्स, नाशिक, यांचे दर सर्वात कमी असुन अंदाज पत्रक दरापेक्षा १२.५% की असे आहेत. सर्वात कमी दरास म्हणजे अंदाज पत्रक दरापेक्षा १२.५% कमी दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**डॉ. आशा बिनवडे :** एक बोअरवेल्स साठी किती खर्च येतो.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** एक बोअरवेल्स २५ ते ३० हजार रुपये खर्च येतो.

**मा. सभापती :** जनतेला पाणी देण्याची गरज आहे. प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको व शहराच्या विविध प्रभागामध्ये नगरसेवक स्वेच्छा निधीतुन मागणी प्रमाणे विधन विहीरी खोदुन हातपंप बसविण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १२.५% कमी दराची मे. तिरुपती बोअरवेल्स, नाशिक यांची निविदा स्विकारणेस सर्वानूमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, श्रेय नगर, अनुपम हौसींग सोसायटी, मंथन सोसायटी, उस्मानपुरा, इत्यादी वसाहतीमधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १४,१७,३००/- च्या अंदाजपत्रकास मा. स्थायी समिती सभा विषय क्र. ८६/४ दिनांक २७/०३/२००२ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण (०९) नऊ कोऱ्या निविदापत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी एकुण (०५) पाच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री के. बी. पाथ्रीकर | - | २९.३१% | कमी दराने |
| २) मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन | - | २६.९९% | कमी दराने |
| ३) मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | - | २६.८८% | कमी दराने |
| ४) मे. जग्गी कन्स्ट्रक्शन | - | १९.५१% | कमी दराने |
| ५) श्री एम. ए. सिद्दीकी | - | निविदा उघडली नाही. | |

तरी तुलनात्मक दृष्टया सर्वात की म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.३१% कमी दराची श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा आहे. करीता निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रेयनगर, अनुपम हौसींग सोसायटी, मंथन सोसायटी, उस्मानपुरा इ. वसाहतीमधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २९.३१% कमी दराची श्री के. बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५० :**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता नवाबपुरा ते राजाबाजार या रस्त्याचे भुसंपादनाची कार्यवाही विशेष भुसंपादन अधिकारी विशेष घटक यांचे मार्फत सुरु असुन या रस्त्याने एकुण ६४ मिळकती बाधीत आहे. या पैकी तीन मिळकती आशा आहेत की, ज्या ३० फुट व ५० फुट जंक्शन/फॅनींग ने बाधीत आहेत. त्या मिळकती न. भु. क्र. ८८५१, ८८५० व ८८४९ आशा आहेत. या पैकी ८८५० ही मिळकत महानगरपालिकेने खाजगी वाटाघाटीने संपादन केलेली आहे. न. भु.क्र. ८८४९ व न. भु. क्र. ८८५१ संपादन केल्यास ३० फुट व ५० फुट रस्त्याचे (Opening) खुले होऊन रस्ता वाहतुकीस खुला होईल.

करीता उक्त मिळकत धारकांना मा. आयुक्तांकडे सुनावणीसाठी बोलविले असता न. भु क्र. ८८५१ च्या मिळकत धारकाने मा. आयुक्तांनी निश्चित केलेला मोबदला ४ लाख ७५

हजार रु. घेण्यास संम्मती दिली आहे. उक्त मिळकतीचे बाधीत क्षेत्र ८५.९० चौ.मी. आहे. सदर बाधित क्षेत्र खरेदी खताद्वारे घ्यावे लागेल. खरेदी खताचा संपुर्ण खर्च महानगरपालिका करणार आहे. संबंधितास वरील प्रमाणे द्यावयाच्या मोबदल्या पैकी ५०% मोबदला खरेदीखत करते वेळी द्याव्याचा आहे. तर उर्वरीत ५०% मोबदला बाधीत क्षेत्र महानगरपालिकेच्या नावे झाल्यानंतर द्यावयाचा आहे. खरेदी खतासाठी रु. ५६,०००/- खर्च येईल.

पंरतु या वर्षाच्या अंदाज पत्रकास भुसंपादनासाठी १.७५ कोटीची तरतुद केली आहे आणि रु. २.७५ निवाडे (Award ) प्रमाणे रक्कम द्यावयाची आहे. करीता निधी उपलब्धतेनंतर संबंधितास मोबदला अदा करता येईल.

सबब वरील प्रमाणे मिळकत धारकास द्यावयाचा मोबदला आणि खरेदी खतासाठी वरील प्रमाणे लागणारी रक्कम अग्रिम म्हणुन श्री. डी. डी. काळेले (शाखा अभियंता) यांना निधी उपलब्धतेनंतर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** सर्वानुमते मंजुर कण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता नवाबपुरा ते राजाबाजार या रस्त्यांनी बाधीत मिळकती पैकी खाजगी वाटाघाटीत ठरल्यानुसार न. भु. क्र. ८८५१ च्या मिळकती मिळकत धारकाने संम्मती दिल्यानुसार बाधीत क्षेत्र ८५.९०% चौ.मी. चा मोबदला रु. ४ लाख ७५ हजार संबंधितांना खरेदी खताचे वेळी ५०% व उर्वरीत ५०% मोबदला बाधीतक्षेत्र मनपाचे नांवे झाल्यानंतर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

त्याचप्रमाणे मोबदला रक्कम व खरेदी खतासाठी लागणारी र. रु. ५६,०००/- अग्रीम म्हणुन श्री. डी. डी. काळेले, शा. अ. यांना अंदाजपत्रकातील निधी उपलब्धतेनंतर देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. ५१ :**

शहर अभियंता यानीं प्रस्ताव सादर केला की, स्वामी विवेकांनद उद्यान टि. व्ही. सेंटर येथे कारगील युध्दात शहीद जवानांचे स्मारक हॉल बांधणे या कामाचे अंदाजपत्रकास रुपये २२,१४,३५० मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. ४२५/१ दि. २०.०६.०१ च्या इतिवृत्तामध्ये मान्यता दिली असुन त्यानुसार उपरोक्त कामाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/२७/०१ दि. २३.०१.०१ अन्वये निविदा मागविल्या असता विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण १७ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेला एकुण ७ निविदा खालील प्रमाणे दर भरुन प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. हायवे कन्स्ट्रक्शन | १८.०९ % | कमी दराने |
| २) | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | १७.८८ % | कमी दराने |
| ३) | एस. ए. नवाब | १५.०० % | कमी दराने |
| ४) | शेख शरीफ | १३.९९ % | कमी दराने |
| ५) | सुजात हश्मी | १३.९७% | कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | मौला अली यार खान | १३.८९% | कमी दराने |
| ७) | मो. सलीम | १२.००४% | कमी दराने |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.०९ कमी दरपत्र मे. हायवे कन्सट्रक्शन यांचे असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी ५% अनामत (Performance Guarantee) घेण्याच्या अटीवर मान्यता दिली आहे.

करीता प्रस्ताव मे. हायवे कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.०९% कमी दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्वामी विवेकांनद उद्यान टी. व्ही. सेंटर येथे कारगील युध्दात शहीद जवानांचे स्मारक हॉल बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १८.०९% कमी दराची मे. हायवे कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२ :**

स्थायी समिती प्रस्ताव क्र. १८ दिनांक १७.५.२००२ अन्वये विविध पशुखाद्यासाठी प्रस्ताव ठेवला होता. त्यावेळी अनुक्रमांक १ वरील बीफ खन्नी चा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला आहे. या संदर्भात दिनांक ४.७.२००२ च्या स्थायी समिती सभेने ठरविले आहे की, संबंधित पुरवठाधारकांना मा. आयुक्तांच्या दालनात बोलवावे त्यावेळी मा. सभापतींच्या उपस्थितीत चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

त्यास अनुसरुन पुरवठा धारक श्री अब्दुल रहिम शेख छोटे, रा. सिल्ली खाना यांना दि. ५.७.२००२ रोजी मा. आयुक्तांचे दालनात चर्चेसाठी बोलाविण्यात आले. मा. सभापती स्थायी समिती यांचे समक्ष पुरवठा धारकासह चर्चा झाली व त्यावेळी बीफ खन्नी चे त्यांनी दिलेले सर्वात कमी दर रु. ९.९०/-प्रती किलो प्रमाणेच खरेदी करण्यात यावे असे ठरविले आहे. तरी दि. १७.०५.२००२ रोजी ठराव क्र. १८ अन्वये बीफ खन्नी चे स्थगित ठेवलेल्या प्रस्तावास मान्यता मिळावी. करीता प्रस्ताव स्थायी समितीच्या फेर विचारार्थ सादर.

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दि. १७.०५.२००२ रोजी स्थगित ठेवण्यात आलेल्या प्रस्ताव क्र. १८ मधील अनु. क्र. १ वरील बीफ खन्नी श्री अब्दुल रहिम शेख छोटे यांनी दिलेल्या रक्कम रुपये ९.९०/- प्रती किलो या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## चर्चा :

**डॉ. आशा बिनवडे :** अनेक दिवसांपासुन महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता पदाच्या पदोन्नतीबाबतची कार्यवाही चालु होती. ती कार्यवाही

प्रशासनाने नुकतीच पुर्ण केलेली आहे. त्या बद्दल प्रशासनाचे अभिनंदन. अनेक दिवसांपासुन प्रलंबित असलेल्या प्रकरणाची कार्यवाही झाली. जेणे करुन या पुढे अधिकारी सुध्दा चांगल्या प्रकारे जनतेची विकास कामे करतील अशी अपेक्षा ठेवण्यास हरकत नाही. सुविधा पुरवितांना उत्साहाने काम करण्याची गरज आहे. जेणे करुन पदोन्नती देण्याची जी कार्यवाही झाली त्यानुसार जी खर्च बाजु असते त्यात भर पडलेली आहे. प्रशासकीय खर्चात वाढ होणार आहे. याच बरोबर खर्च बाजु वाढत असेल तर उत्पन्न बाजुचे सोर्सेस काय आहत हे सुध्दा बघण्याची आवश्यकता आहे. म्हणुन ज्या मधुन महापालिकेला उत्पन्न मिळते असे विभाग जे की, जकात विभाग या विभागाचे अधिकारी सुध्दा प्र. अधिकारी म्हणुन आहे. अशा प्र. चार्ज ज्या ज्या विभागाचा दिलेला आहे. त्या त्या विभागाचे कायमचे अधिकारी पद भरण्यासाठी पदोन्नतीद्वारे तात्काळ नियुक्त्या करण्यात याव्यात. जेणे करुन जनतेला योग्य वेळी चांगल्या प्रकारे सुविधा पुरविता येतील. तसेच अधिकाऱ्यांचाही कामात उत्साह वाढेल.

**श्री नंदकुमार फुलारी :** दैनिक वेतनावरील काही कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यात आले. जे कर्मचारी १९८३ साली सेवेत आले त्यांची ज्येष्ठता डावलुन १९९० साली सेवेत रुजु झालेल्यांना कायम करण्यात आले. याचे कारण काय? जी भरती करण्यात आली ती नियमाने आहे का?

**मा. सभापती :** स. सदस्य श्री फुलारी यांनी जी सुचना मांडली व एखाद्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता डावलुन त्याचेवर अन्याय होत असेल तर योग्य नाही. प्रशासनाने याची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी. व येत्या २७ तारखेला अहवाल सादर करावा.तसेच स. सदस्या डॉ. बिनवडे यांनी जी सुचना मांडली त्या संदर्भात मी प्रशासनाशी प्रत्यक्षात चर्चा करुन कार्यवाही करण्याची सुचना करेल.

या बरोबरच "जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| नगरसचिव | सभापती (स्थायी समिती) |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २४.१०.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक २४ ऑक्टोबर २००२ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी १२.०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री मीर हिदायत अली
२) श्री शिंदे किशोर रावसाहेब
३) श्री औताडे रावसाहेब ममतु
४) श्री ओक जयवंत केशवराव
५) श्री फुलारी नंदकुमार माधवराव
६) डॉ. आशा उत्तम बिनवडे
७) सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
८) सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
९) श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१०) श्री चंद्रशेखर जैस्वाल

## चर्चा

**श्री जयवंत ओक :** दोन दिवस शहराला पाणी येणार नाही. वृत्तपत्रात बातमी आलेली आहे. दिवाळीचा सण आलेला आहे. सणाच्या वेळेसच दुरुस्ती करण्याचे सुचले का? दुरुस्तीच्या काळात प्रशासन पाणी पुरवठा करण्याबाबत काय उपाययोजना करणार आहे. पाण्याचा साठा करणार काय? पाण्याची गळती होत आहे. ती जास्त प्रमाणात होते का? असे असेल तर या पुर्वीच का कार्यवाही केली नाही. सणाच्या वेळेस प्रशासन मुद्दामहुन असे करते अशी शंका येते आहे. ज्या ठिकाणी गळती होते त्या ठिकाणी या कमेटीने प्रत्यक्ष आजच पाहणी करावी. आजच दुरुस्ती करण्याची गरज नसेल तर ०२ दिवस लांबणीवर टाकावे. सणाच्या वेळेसच प्रशासनाने अशा अडचणी आणु नये. प्रथम पाण्याची साठवण नंतर दुरुस्तीचे काम करावे.

**श्रीमती पार्वती मानकापे :** सण म्हटला की, सर्व जाती धर्मामध्ये असतो ईद असतो, डॉ. आंबेडकर जयंती असो सणाच्या वेळेसच अशा अडचणी आणु नये दिवाळीचा सण आलेला आहे. पाण्याची गैरसोय होईल असे काही करु नये. हे काम लांबणीवर टाकावे वार्डात पाणी न आल्यास टँकर मागविले तर देत नाही सर्वच शहरात तीच परिस्थिती आहे.

**मा. सभापती :** पाणी पुरवठा अधिकारी यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** महानगरपालिकेच्या वतीने वृत्तपत्रात जे निवेदन देण्यात आले त्या संदर्भात स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत पाईप लाईन गळतीचे जास्त काम नाही परंतु नक्षत्रवाडी ते क्रांतीचौक पर्यंत येणाऱ्या ७०० व १४०० मी.मी. व्यासाच्या पाईप लाईनचे

दुरुस्तीचे काम जास्त आहे. यात बरेच पाईप कॉंक्रेटचे आहे. व याची दुरुस्ती करण्यासाठी सर्वसाधारण सभेने सुध्दा अनुमती दिलेली आहे. ही यंत्रणा २४ तास काम करीत असते अधुन-मधुन यंत्रणा दुरुस्तीचे काम केले नाही तर मोठया प्रमाणात गळती होऊ शकते व जास्त धोका निर्माण होऊ शकतो. मी स्वत: या पाईप लाईनची प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. हजारो लिटर पाणी वाया जात आहे. म्हणुन जनतेने थोडासा त्याग व त्रास सहन करावा अशी प्रशासना मार्फत विनंती. म्हणुन हे काम हाती घेतलेले आहे. दिवाळीच्या आगोदर हे काम करीत आहोत. त्यानंतर रमजान महिना सुरु होणार आहे. सावधगिरीची उपाय योजना करण्यात येते.

**श्री. जयवंत ओक :** नक्षत्रवाडी ते क्रांतीचौक पर्यंत येणाऱ्या पाईप लाईनची किती ठिकाणी गळती होते. त्याची प्रत्यक्ष बैठक संपल्यानंतर पाहणी साठी जावु. केव्हा पासुन ही गळती आहे याचे रेकॉर्ड आहे का? खुप दिवसापासुनची गळती होती तर अगोदर दुरस्त का केले नाही.

**श्रीमती पार्वती मानकापे :** पाहणी करुनच पण नागरीक दारात यायला नको. दुरुस्ती करणे वगैरे असे अडथळे सणाच्या वेळी निर्माण करुन पाणी पुरवठा खंडीत करणे बरोबर नाही.

**श्री जयवंत ओक :** मनपाच्या मालकीचे शहरात किती जलकुंभ आहे. ते सद्य स्थितीत भरले जाते का? भरले जात नसेल तर त्यात पाणी साठवुन पाईप दुरुस्तीचे काम करून घेणार आहे का. या काळात पुरवठा करुन घेतलेला पाणी साठा सर्वांना देऊ शकतो का?

**कार्यकारी अभियंता (पा. पु.):** जलकुंभा मध्ये पाणी साठविता येणार नाही. येणारे पाणी हे सर्व ग्रॅव्हेटीन घेण्यात येते. दुरुस्तीच्या काळात ७०० व १४०० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनी वरील पाणी पुरवठा बंद करावाच लागेल.

**श्री जयवंत ओक :** नक्षत्रवाडी ते क्रांतीचौक पर्यंत येणारी पाईपलाईन बोगस असुन खराब झालेली आहे. ७००, १४०० मी.मी. व्यासाच्या दोन पाईप लाईन मनपाच्या आहेत. पैठण ते नक्षत्रवाडी पर्यंत लाईन का पुरत नाही. पाणी साठवण्यासाठी व्यवस्था करावी. त्यानंतरच पाईप लाईनच्या दुरुस्तीचे काम करावे. जेणे करुन शहराला दररोज पाणी मिळेल. पुणे, मुंबई, ठाणे या शहरातील पाईप लाईन का फुटत नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** एका वेळी ७०० व नंतर १४०० मी.मी. व्यासाची लाईन बंद करावी लागेल पुर्णच भागात पाणी बंद होणार नाही. काही भागात पाणी येईल काही भागात येणार नाही. सर्वच सण जवळ आलेले आहेत.

**श्रीमती पार्वती मानकापे :** पाणी सोडण्याच्या वेळात लाईट गेल्यास त्या वार्डात पुन्हा पाणी येत नाही. तशा सुचना झोन अधिकाऱ्यांना देण्यात याव्यात.

**श्री जयवंत ओक :** दोन्ही पाईपलाईन द्वारे शहरात किती एमएलडी पाणी येते. जेवढे पाणी ग्रॅव्हेटीने घेतो तेवढे पाणी शहरात येते का, साठवण साठयात पडते का, पंप चालु असतात का? काही पंपींग करतांना वाया जाते अशी माहिती घेतली हे सत्य आहे का? किती पाणी पडते याचा खुलासा करावा. ७०० चे पंप चालु आहेत का? १९५२ ची मशिनरी आहे. सर्व कामे बाजुला ठेवुन पाणी पुरवठ्याच्या सर्व मशिनरी बदलाव्या मी स्वत: मशिनीची पाहणी केलेली आहे. आपणही प्रत्यक्ष पाहणी करावी. परिस्थिती समजुन येईल.

७०० मी.मी. व्यासाच्या पाईपचा पंप नादुरुस्त आहे. एक्स्प्रेस लाईन सुध्दा सेक्सेस होणार नाही असे वाटते.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** गळतीचे प्रमाण थांबविण्यासाठी पाईपलाईनची दुरुस्ती आवश्यक आहे.

**श्री जयवंत ओक :** फारोळा नक्षत्रवाडी येथुन पाणी पंपींग होते. ७०० व १४०० मी.मी. व्यासाचे २ पंप असे ३ पंप बंद आढळुन आलेले आहे. परवाच मी प्रत्यक्ष पाहणी केली. आपण ही प्रत्यक्ष पाहणी करावी अशी विनंती. परिस्थिती समजुन येईल. एक्स्प्रेस लाईन फोल ठरणार आहे. एकस्प्रेस लाईन १४०० व ७०० ला जोडणार आहे. पैठणहुन येत नाही.

**मा. सभापती :** स. सदस्य श्री ओक यांनी जी सुचना केली त्या बाबतीत प्रशासनाने दक्षता घेऊन सणाच्या वेळेस शहराचा पाणी पुरवठा खंडीत होणार नाही याची घ्यावी व सुचना मांडल्यानुसार जी पाण्याची गळती होते ती प्रत्यक्ष सभा संपल्या नंतर पाहणी करण्यात येईल.

**श्री जयवंत ओक :** पाण्यासाठी वाटेल तेवढा खर्च करावा. प्रत्यक्ष सभा संपल्यानंतर पाहणी करण्यात यावी. नागरीकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे.

**विषय क्र. ५३ :**

दिनांक १८.९.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**डॉ. आशा बिनवडे :** मागील बैठकीपासुन सभागृहात माईकची व्यवस्था झाली. इतिवृत्तातील चुका दुरुस्ती करण्याची वेळ पडणार नाही. सर्व रेकॉडींग होईल असे वाटले परंतु पुन्हा काही ठिकाणी दुरुस्ती करण्याची गरज पडत आहे. इतिवृत्तातील पान क्र. ११ वर स. सदस्य सौ. सुवर्णा चंद्रात्रे यांचे नांवासमोर जो परिच्छेद अधिकाऱ्यांची सेवा काय आहे वगैरे पासुन ते अधिकाऱ्यांनी खुलासा करावा पर्यंत मी सुचना मांडलेली होती दुरुस्त करावी तसेच पान क्र. ९ वर मी जो संवाद केला त्या खालीच २५%-७५% वर्गरेच्या संवादाच्या अगोदर स. सदस्याचे श्री देसरडा यांचे नांव टाकण्यात आले. तसेच पान क्र. १७ वर न बोललेले आलेले आहे. जेणे करुन पदोन्नती देण्याची जी कार्यवाही झाली त्यानुसार जी खर्च बाजु असते त्यात भर पडलेली आहे असे मी म्हटलेच नाही. पदोन्नती झालेली आहे. म्हणजेच खर्चाची बाजु एक प्रकारे बळकट केलेली आहे. नियोजन व्यवस्थित करीत आहोत असे मी म्हटलेले होते. खर्चाची बाजु बळकट करण्यासाठी जे मालमत्ता कर तसेच पाणी पट्टी वसुली होण्याच्या दृष्टीने झोन अधिकारी यांना तसे आदेशित करण्या संदर्भात बोलले होते. तशी दुरुस्ती करण्यात यावी. पान क्र. ८ वर विषय क्र. ४३ च्या संदर्भात मी ७५% प्रमाणे ज्या बिल्डरांना जागा विकास करण्यासाठी दिल्या व मनपाचा २५% हीस्सा न देता फ्लॅटस दुकाने त्या बिल्डरांनी विक्री केली आहे. त्याबद्दल प्रश्न केला होता. त्या बाबतीत कार्यवाही चालु आहे. असे उत्तर अधिकाऱ्यांनी दिले होते. ज्या बिल्डरांनी दुकाने विकली त्याचा वापर सुरु केला अशा बिल्डरांवर पोलिसात गुन्हे दाखल करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसारन प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. खुलासा द्यावा. प्रस्ताव स्थगित ठेवुन सविस्तर अहवाल या बैठकीत देणार होते.

**मा. सभापती** : दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते. ७५%,२५% प्रमाणे अशी एकुण चार प्रकरणे होती. त्यापैकी मालखरे बिल्डरने मनपास हस्तांतर केलेले आहे. दोन प्रकरणे न्यायालयात चालु आहेत.

**डॉ. आशा बिनवडे :** ज्या ७५% हिस्साची बांधकाम परवानगी दिली त्याचा वापर सुरु केलेला आहे. अशा बिल्डरवर काय कार्यवाही केली.

**सहा. संचालक (न.र.) :** अशी एकुण चार प्रकरणे आहेत स. न. १५३०४/२० शिवनेरी नगर गारखेडा येथील मालखरे यांचे प्रकरणे आहे. त्यांनी कालच आश्वासन दिले की, २५% बांधकाम आहे त हस्तांतर करणार आहेत. दुसरे प्रकरण जय टावर्स, पद्‌मपुरा येथील आहे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे काही कायदेशीर अडचणी आलेल्या आहेत. त्या संदर्भातील संचिका नुकतीच माझ्याकडे आलेली आहे. उर्वरीत जी दोन प्रकरणे आहेत त्यात मालकी हक्काचा वाद निर्माण झालेला आहे. ही अडचण कशी दुर करता येईल हे बघणे जरुरीचे आहे. दोन प्रकरणात नोटीस देत आहोत.

**डॉ. आशा बिनवडे :** २५% कसे ताब्यात घेणार याचा खुलासा केला परंतु ७५% केलेले बांधकाम यावर परवानगी न घेता वापर सुरु केला अशा बिल्डर वर काय कार्यवाही करणार आहात.

**सहा. संचालक (न.र.) :** च्या संबंधीची सद्य परिस्थिती काय आहे याची माहिती घेऊन सभागृहाला दिली जाईल. नुकताच मी चार्ज घेतलेला आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** प्रस्ताव क्र. ४३ स्थगित ठेवलेला आहे त्याचा अहवाल देणार होते. त्यात असे म्हटले होते की, दुभाजकावर एस.टी.डी. पी.सी.ओ. साठी जागा दिलेली होती परवानगी दिली जाते का?

**मा. सभापती :** आता सध्या जागा देत नाही १०-१५ वर्षापुर्वी दिलेली आहे. भाडे तत्वावर दिलेली होती त्याचा ठराव मंजुर झालेला होता ठरावनुसार बांधकाम केलेले आहे. हा प्रस्ताव भाडेवाढी संदर्भात आहे. नविन काही करीत आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** दुभाजकावर किंवा बेटावर परवानगी देता येते का? हे कायद्याने वधितले होते का? चुक झाली त्या नियमीत करीत आहोत असे व्हायला नये असे माझे मत आहे. एखादी बाब चुकीची झाली दंड वगैरे भरणा केला म्हणुन त्याला मंजुर द्यायची का? कायदा बधितला का? कायद्याच्या बाहेर जावुन काही चुका केल्या असतील त्या दुरुस्त झाल्या पाहिजेत. परवानगी देऊन पहिल्यांदा चुक झाली तर पुन्हा चुक करायची का? दुरुस्ती करावी. आज इतिवृत्त कायम होत आहे.

**मा. सभापती :** आपण आता जागा देत नाही. पुर्वी ठराव झालेला आहे. ठरावा प्रमाणे पैसे भरले भाडेवाढ करीत आहोत.

**डॉ. आशा बिनवडे :** परवानगी नसतांना अतिरिक्त बांधकाम केलेले आहे.८x१० ची परवानगी होती. १३x७ चे बांधकाम केले त्यामुळे दंडात्मक कार्यवाही केली पुन्हा त्यास नियमीत करण्यास मंजुीर देत आहोत. दुभाजकावर जागा देणे. बेटावर जागा देण व दंड वसुल करणे पुन्हा त्यास रेग्युलर भाडे देण्याच्या प्रस्तावास मान्यता देणे. कायद्यानुसार बरोबर वाटत नाही. लेखी अहवाल देणार होते तो का आलेला नाही? मुळात जागा देणेच चुकीचे झालेले आहे.

**मा. सभापती :** प्रस्ताव भाडेवाढी संदर्भात आहे. जागा देण्याबाबतचा नाही. त्यामुळे मंजुर करावा. दंडात्मक कार्यवाही केली दंड वसुल केला आता भाडे वाढ करतो आपण नव्याने जागा देत नाही.

**डॉ. आशा बिनवडे :** १० वर्षापुर्वी चुकीने जागा दिली ती झालेली चुक म्हणुन धरता येणार नाही का? जास्तीचे बांधकाम केले. दंड आकारला व त्या बांधकामाच्या भाडे पट्ट्याला मुदतवाढ देत आहोत हे कितपत योग्य आहे कायद्यात बसते का? या नंतर दुभाजकावर कुणी बांधकाम केले तर त्यांना दंडात्मक कार्यवाही करुन कायम करणार का?

**श्री हिदायत अली :** हा प्रस्ताव भाडेवाढीसाठी आलेला आहे. वाढवाचे आहे किंवा नाही.

**श्री किशोर शिंदे :** नविन प्रस्ताव नाही जुनाच प्रस्ताव आहे.

**मा. सभापती :** भाडेवाढीचा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. तसेच पान क्र. ४ वर औरंगपुरा भाजी मंडईचा प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता त्या संदर्भात काय निर्णय घ्यावचा चर्चा व्हावी.

**श्री जयवंत ओक :** मी त्या वार्डाचा सदस्य आहे. प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी. तेथे लाईट पाणी व इतर सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. तेथे पार्किंग रस्ते झालेले नाहीत. स्थळ पाहणी करण्याचे ठरले होते. पाहणी करणे बरोबर नाही. ४० लक्ष रु. खर्च झालेले आहेत. मार्केटमध्ये सर्व सुविधा देणे आवश्यक आहे. मार्केट कशासाठी करीत आहोत त्या भागात एक ते दीड लाखापर्यंत दुकाने जातात ही दुकाने ४० हजारामध्ये येत आहेत. मनपाचे उत्पन्न वाढवावे विकास कामे व्हावी या दृष्टीने हे करण्यात येत आहे. सभागृहात वेगळीच चर्चा झालेली होती. त्यास वेगळे वळण द्यायचे नाही. स्थळ पाहणी करावी. नंतरच निर्णय घ्यावा.

**श्री मीर हिदायत अली :** पाहणी झालेली आहे मंजुर करण्यात यावा.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी व स. स. श्री ओक यांनी जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी.

**श्री जयवंत ओक :** पार्किंग असावी इतर काही म्हणणे नाही मंजुर करा. पाहणी करा, पार्किंगची तरतुद आहे ताबडतोब काम करावे. डांबरीकरण व पार्किंगची व्यवस्था करावी.

**मा. सभापती :** विषय क्र. ४० मंजुर करण्यात येतो. इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक १८.०९.२००२ रोजीचे इतिवृत्तातील स्थगित विषय क्र. ४० व ४३ मंजुर करण्यात येते. या दुरुस्तीसह दिनांक १८.९.२००२ रोजी इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. (विषय क्र. ४० व ४३ ची स्वतंत्र्य नोंद घेतली आहे)

**चर्चा**

**श्री नंदकुमार फुलारी :** शासनाने गुटखा बंदी केलेली असतांना सुध्दा काही ठिकाणी विक्री होत आहे. लहान मुले गुटखा खाऊन वर्गात बसतात मी स्वत: गुटख्याची माळ बरोबर आणलेली आहे. (सभागृहात दाखवितात) आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना दाखविण्यासाठी गुटखा बरोबर आणलेला आहे. यात एक सुपारी व एक तंबाखु जर्दा आहे हे दोन्ही मिक्स केल्यास गोवा गुटखा तयार होतो. यांचेवर काय कार्यवाही करणार? ४३००० लिटर दुध नष्ट केले त्यात काय होते नव्हते हे माहित नसतांना कार्यवाही झाली. गुटखा विक्री करणाऱ्यांवर काय कार्यवाही करणार खुलासा करावा.

**श्री जयवंत ओक :** स. स. श्री फुलारी यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. दुध सुध्दा ४३००० लिटर नष्ट केले त्यात काय होते. सुपारी व जर्दा वेगळे केले. मिक्स केल्यास गुटखा तयार होतो. शासनाने बंदी घातलेली आहे. अशा विक्रेत्यांवर काय कार्यवाही करता येईल ती तात्काळ करावी. लहान मुले खातात आरोग्य धोक्यात येऊ शकते.

**श्री किशोर शिंदे :** याची जकात वसुल केली का? शासनाने बंदी घातलेली आहे. आढळुन आल्यास नियमानुसार त्या व्यक्तीवर कठोर कार्यवाही व्हावी.

**श्रीमती पार्वती मानकापे :** स्वत: अधिकाऱ्यांनी जप्तीची कार्यवाही करुन संबंधीतावर योग्य ती पुढील कार्यवाही करावी. लहान मुलांचे आरोग्य धोक्यात आल्यास याची जबाबदारी कोण घेणार आहे?

**श्री नंदकुमार फुलारी :** एक सुपारी आहे. त्यात तंबाखु टाकल्यानंतर गुटखा तयार होतो. तंबाखुवर सुपारी विनामुल्य देत आहे.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** अन्न व भेसळ (फुड ॲण्ड ड्रग्ज) विभागाकडुन या बाबतीत कार्यवाही होते. या विभागामार्फत खास कमेटी स्थापन केलेली आहे. त्या कमेटी मार्फत प्रत्येक ठिकाणी धाड टाकुन कार्यवाही होत आहे. मनपाने सुध्दा जाहीर प्रगटन केलेले आहे असे जर निर्दशनास आले तर संबंधीत कार्यालयाशी संपर्क साधायचा त्यानंतर पोलीस विभागाकडुन कार्यवाही होते. माहिती प्राप्त झाली तरच त्या विभागाला कळवायचे काम आहे.

**श्री हिदायत अली :** जे दुध नष्ट करण्यात आले तेच दुध आज विक्री होत आहे.

**श्री नंदकुमार फुलारी :** आरोग्याच्या दृष्टीने दुधाच्या संदर्भात कार्यवाही केली ती योग्य झाली परंतु त्या दुधामध्ये काय होते ते सुध्दा समजले पाहिजे. युरीया, मीठ, साखर काय होते. यात एखाद्या कंपनीचे मोठे नुकसान झालेले असेल त्यास कोण जबाबदार.

**श्री जयवंत ओक :** या संबंधी सर्वसाधारण सभेत चर्चा झाली ०६ आजार होतात असे डॉ. कराड यांनी सांगीतले. दुध चांगल्या दर्जाचे नव्हते तर बंदच करावयास पाहिजे होते ते दुध आजही शहरात येते चांगल्या प्रतीचे नव्हते तर मनपातर्फे वृत्तपत्रात तसे जाहिर प्रगटन देऊन कार्यवाही करावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** उदया फुड ॲण्ड ड्रग्ज कार्यालयात बैठक होणार आहे. सविस्तर चर्चा होणारच असुन त्यानंतर योग्य ती कार्यवाही होणार आहे.

**मा. सभापती :** जी समिती आहे त्या समितीच्या माध्यमातुन शहरात ज्या ज्या ठिकाणी पानटपऱ्या आहे जेथे शंका निर्माण झाली तेथे छापे मारावे व माल जप्त करुन पुढील कार्यवाही करावी.

**डॉ. आशा बिनवडे :** आपण माहिती देवु शकतो जास्तीच काम लावुन घेतले. नुसत्याच धाडी टाकावे त्याचे सॅम्पलही घ्यावे. अहवाल आल्यावर पोलीस केस करावी. गुन्हे दाखल करावे दुधाचे कन्टेन्स कमी होते असे म्हटले होते. परंतु कुठलाही अहवाल आज पर्यंत नाही म्हणुन ते दुध निकृष्ट दर्जाचे होते असे ठामपणे म्हणता येणार नाही. असे असतांना हजारो लिटर दुध फेकुन दिले हे बरोबर वाटत नाही. पहिला अहवाल येण्या पुर्वीच दुसऱ्यांदा धाड टाकुन दुध नष्ट करणे कितपत योग्य आहे. तसेच आरोग्य समितीच्या सदस्यांना यापुढे कळविण्यात यावे. अशी सुचना सुध्दा प्रशासनाला देण्यात यावी.

**मा. सभापती :** सर्वोच्च सभागृह हे सर्वसाधारण सभा आहे त्या सभेत यावर बरीच चर्चा झालेली आहे. आरोग्य विभागाने या बाबतीत दक्षत घ्यावी असे उत्तर देण्यात आलेले आहे.

**श्री किशोर शिंदे :** अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांची तक्रार आलेली आहे. त्या कर्मचाऱ्यांना गणवेश मिळत नाही.

**मुख्य लेखाधिकारी :** संचिका मा. आयुक्तांकडे आहे. विमल कपडयांची मागणी होती. रेमंण्डचे पाहिजे असे म्हटले. इतर मनपाकडुन माहिती मागविली आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही होईल.

**विषय क्र. ५४ :**

सिडको परिसरात एन-११, एन-१२, एन-१३ प्रभाग तसेच जाधववाडी, मिसारवाडी वगैरे परिसराला आज पर्यंत एन-७ येथील जलकुभावरुन पाणी पुरवठा करण्यात येत होता. एन-७ पासुन सदर प्रभाग हा साधारण २.५० ते ३.०० किमी. अंतरावर असल्याने उपरोक्त परिसरात तोकडा पाणी पुरवठा होत होता. करीता एन-११ येथील जलकुभांवरुन एन-११, एन-१२, एन-१३, सुरेवाडी, टी.व्ही. सेंटर भागास व्यवस्थित रित्या पाणी पुरवठा करण्यासाठी सदर जलकुभांपासुन वितरण व्यवस्था टप्पा क्र. १ चे अंदाजपत्रक रक्कम रुपये ११,४३,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदरील अंदाजपत्रक हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन २०००-०१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामावर होणार खर्च हा भांडवली कामे पाणी पुरवठा सन २००२-२००३ या आर्थिक वर्षातील तरतुदीमधुन करण्यात येईल. सदर कामास मा. आयुक्तांची मंजुरी झालेली आहे.

तरी एन-११ येथील जलकुंभापासुन वितरण व्यवस्था टप्पा क्र.१ साठी रक्कम रु. ११,४३,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीसाठी व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री रावसाहेब औताडे :** गरवारे एन-११, एन-१२, सुरेवाडी आहे. हर्सुलचा यात समावेश नाही. वार्डात पाणी येत नाही. आज १ टँकर पाणी मागविले जाते.

**मा. सभापती :** हर्सुल गावाचा यात समावेश करण्यात यावा. वगैरे मध्ये हर्सुल घेतलेले आहे.

**श्री रावसाहेब औताडे :** पाणी मिळाले पाहिजे.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन -११ येथील जलकुभांवरुन एन-११, एन-१२, एन-१३, सुरेवाडी, टि.व्ही. सेंटर भागास व्यवस्थीत रित्या पाणी पुरवठा करण्यासाठी सदर जलकुंभापासुन वितरण व्यवस्था टप्पा क्र. १ साठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ११,४३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५ :**

शहर अभियंता, मनपा औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग क्र. ३१ येथे नविन उद्यान विकसीत करणे बाबत या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खातेच्या जिल्हा दर सुची वर्ष ९९-२००० नुसार रक्कम रुपये १४,४२,५००/- चे तयार करण्यात आले असुन त्यास दि. २०/०८/२००२ अन्वये मा. आयुक्त महोदय यांची मान्यता प्राप्त झालेली

आहे. तसेच वर्ष २००२-०३ या आर्थिक वर्षात नविन उद्यान विकसीत करणे या लेखाशिर्ष अंतर्गत पान क्र. १० अ. क्र. ४ वर सदर कामासाठी रु. १६,००,०००/- ची तरतुद ठेवण्यात आली आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रु. १४,४२,५००/- मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री किशोर शिंदे :** उद्यान विकसीत करण्याची गरज आहे का?

**शहर अभियंता :** वेदांन नगर वार्ड क्र. ३१ मध्ये खुल्या जागेवर एक स्केटींग ट्रॅंक करणार आहेत. हा मा. महापौरांचा वार्ड येतो. खुली जागा मोठी आहे. स्केटींगचे प्रयोजन आहे.

**मा. सभापती :** सर ठिकाणी उद्यान विकसीत झाले आहे का?

**श्री किशोर शिंदे :** माझ्या वार्डातही खुली जागा आहे. तेथेही करणार का?

**शहर अभियंता :** आपला वार्ड एकसारखा भुभाग नाही. टेकडीवर स्केटींग होऊ शकत नाही. स्केटींग हा कॉंक्रीटींगचे करणार आहोत. स्केटींगचे प्रपोजल आहे. उद्यानात करणार आहोत.

**डॉ. आशा बिनवडे :** सुधारीत अर्थसंकल्प झाल्यानंतर हे काम सुरु करावे. असे माझे मत आहे. आवश्यकत असेत तर हा अतिरिक्त खर्च करावा. मलभूत सुविधा लाईट, ड्रेनेज पाणी, इत्यादी सुविधा देण्यासाठी खऱ्या अर्थाने स्थानीक स्वराज्य संस्थेचा उद्देश असतो. सुधारीत अर्थसंकल्पाच्या वेळी विचार करावा.

**श्री हिदायत अली :** माझ्या वार्डात शाळेच्या कामासाठी ५ लक्ष रु. ठेवले होते ते रद्द केले. सध्या शाळेची मुले वाचनालयात खाली फरशीवर बसतात. आपण स्वत: सकाळी येऊन प्रत्यक्ष पाहु शकता. शाळेसाठी ठेवलेले ५ लक्ष रद्द करण्यात आले. या प्रस्तावनुसार १६ लक्ष रु. स्केटींग साठी खर्च करण्याची काय अवश्यकता आहे. मुले फरशीवर बसतात त्यांना पट्टया नाही.

**श्री नंदकुमार फुलारी :** शहरात क्रिकेट, फुटबॉलचे ग्राऊंड आहे. स्केटींगचे ग्राऊंड अद्याप नाही हा प्रस्ताव मंजुर करावा.

**श्री पार्वती मानकापे :** आताच पाण्याच्या बाबतीत प्रश्न उपस्थित झाला त्या प्रमाणे नागरीकांच्या इतर काय समस्या आहेत त्या सोडवाव्यात त्यानंतर अशा प्रकारचे प्रस्ताव आणुन मंजुरी द्यावी. सध्या गरीब मुलांना शिक्षण देण्याची गरज आहे. स्केटींग हे श्रीमंताची मुलेच खेळतात सध्या तरी करण्यात येऊ नये.

**डॉ. आशा बिनवडे :** शाळेचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला तर फायदा होईल असे माझे मत आहे. मला निवडुन येऊन अडीच वर्ष झाले. मनपाच्या दोन शाळा माझ्या वार्डात आहे. मुलांना बसण्यासाठी अक्षरक्ष: पट्टया नाही. फरशीवर लहान-लहान मुले बसतात शाळेला भेट दिल्यास आपल्याला सुध्दा बसण्यासाठी खुर्ची नाही. अशी परिरिस्थती मनपाच्या शाळेची आहे. अशी परिस्थिती असेल तर शाळेचा दर्जा उंचावेल असे वाटत नाही. अशा पैशातुन प्रथम भौतीक सुविधा त्यानंतर प्राथमिक शिक्षण यास प्राधान्य देण्यात यावे हे सर्व करुन उरलेला पैसा अशा कामासाठी खर्च केला तर योग्य होईल.

**श्री हिदायत अली :** प्रस्ताव स्थगित ठेवावा. शाळेसाठी ठेवलेले ५ लक्ष रु. कमी करुन १६ लाख खर्च करण्याची गरज नाही.

**श्री नंदकुमार फुलारी :** या शहरातील मुले परदेशात खेळण्यासाठी जावी हा दृष्टीकोन समोर ठेवुन हा प्रस्ताव मंजुर करावा. या शहरातील मुले या खेळात तयार व्हावीत. शहर ऐतिहासीक आहे नाव होईल. कुणीही राजकारण करुन नये. प्रस्ताव मंजुर करावा.

**श्रीमती पार्वती मापकापे :** मनपाच्या शाळेची दुरावस्था झालेली आहे. पावसाळयात शाळेला मोठया प्रमाणात छतातुन गळती लागते. मुलांना बसण्यास जागा नसते अगोदर प्राथमिक शिक्षण दयावे त्यानंतर परदेशात मुले शिक्षणासाठी जाण्याचा विचार करावा.

**डॉ. आशा बिनवडे :** शाळेतील मुलीसाठी स्वतंत्र्य स्वच्छतागृहाची मागणी वारंवार पत्र देवुन केलेली आहे. स्वेच्छा निधीतुन शाळेतील मुलींसाठी स्वतंत्र्य स्वच्छतागृह बांधण्यात येईल तसे पत्र द्यावे असे उत्तर आम्हाला देण्यात येते या ठिकाणी स्केटींगसाठी १६ लक्ष रु. खर्च करणे योग्य वाटत नाही.

**श्री चंद्रशेखर जैस्वाल :** मनप मार्फत स्विमींग पुलची स्थापना झाली, किक्रेट ग्राऊंड झाले जेणे करुन लोकांची या खेळामुळे प्रकृती सुधारण्यास सहकार्य मिळते. त्याच धर्तीवर स्केटींगसाठी सादर झालेल्या या प्रस्तावास संम्ती द्यावी.

**श्री हिदायत अली :** १६ लक्षचे काम २-३ महिन्यात होणार नाही यातुन ५ लक्ष रु. माझ्या वार्डासाठी देण्यात यावे. शाळेचे काम करणे गरजेचे आहे.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** ज्या मुलभूत सुविधा आहे त्या सोडवाव्यात आवश्यक असलेली पुष्कळ कामे आहेत. त्याकडे दुलर्क्ष होते. तिकडे व्यवस्थित लक्ष द्यावे. प्रस्ताव चांगला आहे. आवडला इच्छा आहे परंतु शहरात ज्या समाजसेवी संस्था आहे. जसे महापौर चषक स्केटींग स्पेर्घेत स्वयंसेवी संस्था मदत करतात आशा संस्थांचा सहभाग करुन ज्यांना खेळाची आवड आहे. अशा संस्थेकडे हे स्केटींग ग्राऊंड विकसीत करण्यास द्यावे जेणे करुन मनपास खर्च करण्याची गरज पडणार नाही. तुर्त प्रस्तावत स्थगित ठेवावा. B.O.T. (बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा) पध्दतीने काही जागा विकसीत करण्यासाठी मनपाने दिल्या त्याप्रमाणे हे सुध्दा देण्यात यावे.

**श्री किशोर शिंदे :** माझ्या वार्डात मनपाची शाळा असुन त्याची दुर्दशा आहे. त्या मुलींसाठी टॉयलेटची व्यवस्था करण्या संदर्भात पत्र दिले लहानशे काम आहे ते सुध्दा होत नाही. यातुन २ लाख रु. द्यावे व कामे करावी.

**श्रीमती पार्वती मानकापे :** माझ्या वार्डात शाळा नाही मी आपल्याकडे तसेच शिक्षणाधिकारी यांना सुध्दा पत्र देऊन इयत्ता ४ थी पर्यंत शाळा उघडण्यात यावी म्हणुन मागणी केलेली आहे. शाळा करण्यात यावी मुलांना शिक्षण द्यावे नंतरच असे प्रस्ताव आणावे.

**डॉ. आशा बिनवडे :** वर्क वाईज बजेट आह. रिवाईज बजेट होईल का? प्रशासनाला शाश्वती नसेल तर रिवाईज बजेट नंतर असे काम व्हावे. आवश्यक कामे अगोदर करावी.

**मुख्य लेखाधिकारी :** वर्क वाईज बजेट मध्ये या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे. आताच प्रश्न उपस्थित केला की, रिवाईज बजेट मध्ये ही तरतुद पुर्ण राहील का? परंतु आर्थिक वसुली व अर्थसंकल्पात मा. स्थायी समिती सर्वसाधारण

सभेने १० कोटीची वाढ केलेली आहे. १० कोटी अतिरिक्त सादर झालेले आहे. बरीचशी कामे सुधारीत बजेट मध्ये कमी करावी लागणार आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** काही कामे करावे लागणार आहे. १० कोटी आले तर त्यात इतर कामे होऊन जर हे काम करता आले तर करावे. आधिची कामे झाल्यानंतर हे काम व्हावे. प्रथम प्राधान्य इतर विकास कामांना दयावे. नंतर हे काम करावे. महत्त्वाची कामे कपात करु नये.

**श्री चंद्रशेखर जैस्वाल :** या आगोदर बरीच कामे झालेली आहे. नागरीकांना फायदाच झालेला आहे. प्रस्ताव कुणाच्या वार्डातील आहे याचा प्रश्न येत नाही. प्रस्ताव मंजुर करावा.

**श्रीमती पार्वती मानकापे :** इयत्ता ४ थी पर्यंत वर्ग माझ्या वार्डात सुरु करण्यासाठी इमारत तयार करावी त्यानंतर असे प्रस्ताव मंजुर करावे १ वर्षापासुन मी मागणी केलेली आहे.

**श्री हिदायत अली :** शाळेमध्ये महिला शिक्षक आहे. त्यांना टॉयलेटची व्यवस्था नाही. १६ लक्ष चे काम एकदम होणार नाही. यातील ५ लक्ष माझ्या वार्डातील शाळेसाठी देण्यात यावे. नसता प्रस्ताव स्थगित ठेवावा. माझ्या वार्डातील शाळेत ३४० मुले आहे. सध्या काही मुले फरशीवर बसतात सुधारीत बजेट मध्ये आमचेही काम करावे व हे ही काम करावे.

**श्री जयवंत ओक :** प्रस्ताव आला तर मंजुर करावा. प्रशासनानेच विचार करुन ठेवावयास पाहिजे होता.

**श्री हिदायत अली :** मा. महापौर यांना मी पत्र दिले होते. मा. सभापती श्री देसरडा यांना सुध्दा पत्र दिले इमारतीचे व कब्रस्तानचे काम या वर्षी करणार नाही असे म्हटले. यानंतर काही इमारतीच्या कामाचे प्रस्ताव कसे येतात. माझ्या वार्डातीलच का रद्द केले हे चुकीचे आहे.

**श्री जयवंत ओक :** जी विकासाची कामे आहे ती करणे गरजेचे आहे हे मी मान्य करु शकतो. एकीकडे प्रशासन प्रस्ताव ठेवते, विरोध होता, १.५० कोटीची कामे कमी करणार, बोनसचा निर्णय घेतला. अडीच वर्ष झाले तरी वार्डात विकास कामे होत नाही. जनता सुध्दा आम्हाला विचारते. म्हणुन वार्डात ड्रेनेज, लाईट, दवाखाना अद्यावत करा अशी कामे करावीत. अशी नागरीक मागणी करतात. विकासाची कामे थांबवु नये. जे मोठे प्रोजेक्ट असतील ते थांबवावे. भुखंडाचे ७ कोटीचे प्रस्ताव मंजुर केले. सध्या तरी गरज नाही. म्हणुन मोठे प्रोजेक्ट बाजुला विकास कामे करावी. प्रस्ताव आलाय तर मंजुर करावा. असे माझे मत आहे.

**श्री हिदायत अली :** माझ्या वार्डातील शाळेसाठी ठेवलेले ५ लक्ष रद्द केले व १६ लक्ष रु. खर्च करण्यासाठी स्केटींगचे प्रस्ताव येणे बरोबर नाही चुकीचा पायंडा पडत आहे.

**मा. सभापती :** सभागृहाच्या भावना लक्षात घेऊ. हा प्रस्ताव ठेवतांना बरोबर ठेवलेला नसुन उद्यान विकसीत असा प्रस्तावात दिले परंतु स्केटींगचे प्रपोजल आहे असे अधिकाऱ्यांनी खुलासा केला म्हणुन सविस्तर सुधारित प्रस्ताव सादर करावा.

**डॉ. आशा बिनवडे :** सुधारीत प्रस्ताव आणण्याची गरज नाही अधिकाऱ्यांनी खुलासा केलेलाच आहे. बराच वेळ चर्चा झाल्यानंतर असे आदेशित करणे बरोबर होऊ शकते का? एक तासापासुन या विषयावर चर्चा चालु आहे. दुरुस्त प्रस्ताव स्केटींग ग्राऊंडचा येणार पुन्हा तीच चर्चा करायची का?

**श्रीमती पार्वती मानकापे :** माझ्या वार्डात शाळा करण्याच्या व स. स. श्री हिदायत अली यांच्या वार्डातील शाळेचे दोन्ही प्रस्ताव मंजुर करावे यास ही मंजुर करावे.

**श्री हिदायत अली :** याचा अर्थ येथे मनमानी होत आहे. जो महापौरांचा खुर्चीवर बसेल त्यांनी त्यांचे वार्डातीलच प्रस्ताव आणुन खर्च करायचे का? ५ लक्षचे कामाचे रद्द केले १६ लक्षचा प्रस्ताव गरज नसतांना कसा येतो?

**श्री जयवंत ओक :** विषय पत्रीकेवर विषय आलेला आहे. मंजुर करावा. सभागृहात दिशाभुल करण्याचे काम होत आहे. जनतेला आम्ही आश्वासन दिलेले आहे. त्यामुळे वार्डातील ही कामे झाली पाहिजे.

**श्री हिदायत अली :** शाळेतील मुले फरशीवर बसतात. निवडुन येऊन अडीच वर्ष झाले आम्ही सुध्दा जनतेला आश्वासने दिलेले आहे.

**मा. सभापती :** या विषयावर बरीच चर्चा झाली मंजुर करायचा की नाही सर्वांनी आपआपले मत नोंदवावे.

**श्री जयवंत ओक :** मंजुर करावा.

**श्रीमती पार्वती मानकापे :** विषय आला त्यास माझा विरोध नाही परंतु मी सुध्दा माझ्या वार्डात शाळा होण्यासाठी पत्र दिले त्याचा का विचार केला नाही वार्डात शाळा करावी. मुलांना शिक्षण घेता येईल तर असे प्रस्ताव यावे तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**सौ. ताराबाई जेजुरकर :** प्रस्ताव मंजुर करावा.

**डॉ. आशा बिनवडे :** यापुर्वीच मी माझे मत मांडलेले आहे. नागरीकांना आगोदर मुलभूत सुविधा द्याव्यात त्यानंतर शिल्लक राहिलेल्या पैशातुन अशी प्रोजेक्टची कामे करावी. रिवाईज बजेट झाल्यानंतर अशी कामे सुरु करावी. तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** असे प्रोजेक्ट समाज सेवी संस्थेला विकास करण्यासाठी द्यावे जेणे करुन मनपाचा पैसा वाचेल व त्यात विकास कामे करता येईल. रिवाईज बजेट पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**श्री चंद्रशेखर जैस्वाल :** मनपा तर्फे जलतरण तलाव करण्यात आलेला आहे. यापुर्वी कुस्ती स्पर्धा सुध्दा घेण्यात आल्या. त्यासाठी सुध्दा १० लक्ष तरतुद करावी. स्केटींग ग्राऊंड सुध्दा असणे गरजेचे असुन प्रस्ताव मंजुर करावा.

**श्री रावसाहेब औताडे :** माझा या प्रस्तावास विरोध आहे. इतर सदस्य विरोध करीत आहे. आमच्याही वार्डातील कामे घ्यावीत. त्यानंतरच अशी कामे करावी.

**श्री हिदायत अली :** एक तासापासुन या विषयावर चर्चा चालु आहे. काम करण्यास विरोध नाही परंतु अशी कामे करण्याआगोदर जी बेसीक कामे आहे ती करावी. त्यानंतरच अशी कामे व्हावीत माझ्या वार्डातील ५ लक्षचे शाळेचे काम करावे नंतर हा प्रस्ताव मंजुर करावा तुर्त स्थगित ठेवावे.

**श्री फुलारी नंदकुमार :** महापौर चषक क्रिकेट स्पर्धा घेतल्या जातात त्याच प्रमाणे स्केटींग ग्राऊंड असणे आवश्यक आहे. स्केटींग स्पर्धा हया गरवारे स्टेडीयम येथे घेण्यात आल्या. त्यामुळे स्वतंत्र्य ग्राऊंड असण्याची गरज आहे. मंजुर द्यावी.

**श्री किशोर शिंदे :** या प्रस्तावार खुप चर्चा झालेली असुन रिवाईज बजेट नंतर कार्यवाही करण्यास यावी तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी आपआपल्या भावना व्यक्त केल्या भावनांची नोंद घेतली २० मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यात येते.

(दुपारी १.३५ वाजता सभा तहकुब केली. सभा दुपारी २.०७ वाजता सुरु झाली)

**मा. सभापती :** पुन्हा कुण्या सदस्यांना या प्रस्तावावर मत मांडायचे असेल तर त्यांनी मांडावे.

**श्री हिदायत अली :** माझ्या वार्डातील शाळेसाठी असलेले बजेट रद्द केले ते येणाऱ्या बजेट मध्ये समावेश करावे. १-२ महिन्यात नविन बजेट सादर होईल नाही तरी हा प्रस्ताव स्थगित ठेवुन फायदा नाही याचे काम सुध्दा नोव्हेंबर डिसेंबर पर्यंत चालेल मंजुर करावे.

**श्री औताडे रावसाहेब :** या प्रस्तवास विरोध नाही परंतु माझ्या वार्डात सुध्दा विकास कामे व्हावीत शाळेमध्ये मुले खाली फरशीवर बसतात आसनपट्टया नाही. मुलांसाठी स्वच्छतागृह नाही, १-२ लक्षच सुध्दा कामे का होत नाही. ही कामे मनपा मार्फत होत नसेल तर आमच्या स्वेच्छानिधीतुन करण्यात यावी. मंजुर करावे.

**श्री किशोर शिंदे :** विकास कामे करण्यास आमचा विरोध नाही. जी कामे आवश्यक आहे त्यास प्रथम प्राधान्य द्यावे असे माझे मत आहे. या पुर्वी १०-१० लक्ष खर्च करुन हायमास्टच्या प्रस्तावास मंजुर दिलेली आहे. या कामास आमचा विरोध नाही.

**मा. सभापती :** या प्रस्तावावर बरीच चर्चा झालेली आहे. या विषयाच्या संदर्भात अर्थसंकल्पात तरतुद सुध्दा केलेली असुन अंदाजपत्रकास मंजुरीसाठी प्रस्ताव सादर झालेला आहे या शहरातील जनतेला वा मिळावा या दृष्टीने प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग ३१ येथे नविन उद्यान विकसीत करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १४,४२,५००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सेवायोजन कार्यालय (कॅप्सुल आयर्लेंड) ते नुतन कॉलनी मार्गे पोलीस वर्क शॉप या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १४,२९,०००/- ला स्थायी समिती विषय क्र. ३/२ दिनांक ४.६.२००१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदर कामाकरीता निविदा विभागामार्फत जा. क्र. /मनपा/लेखा/नि/२६/२००१ दिनांक १९.०७.२००१ अन्वये बी-१ निविदा मागविण्यात आल्या असता एकुण १२ निविदा विक्री झाल्या व त्या पैकी ०८ निविदा प्राप्त झाल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री डी. अजितसिंग | ३१.२१ % कमी दराने |
| २. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन | ३१.०० % कमी दराने |
| ३. | मे. ए. एस. कन्सट्रक्शन | २९.२१ % कमी दराने |
| ४. | श्री एम. ए. सिद्दीकी | २८.९९ % कमी दराने |
| ५. | श्री ए. सी. कोठारी | २७.८९ % कमी दराने |
| ६. | श्री भगवान दांडगे | २७.८७ % कमी दराने |
| ७. | श्री जी. एम. जग्गी | २४.४५ % कमी दराने |
| ८. | मे. मॉस्कॉट कन्सट्रक्शन | ११.८६ % कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.२१% कमी दराने श्री डी. अजितसिंग यांची निविदा असल्यामुळे त्यांच्याकडुन कमी दरामध्ये काम कसे करता येईल यासाठी दर पृथःकरण मागविण्यात आले असता ते सादर करण्यासाठी बराच विलंब झाला.

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ३१.२१% कमी दराने संबंधीत गुत्तेदार काम करण्यास तयार असल्यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक फायदा विचारात घेता तृतीय पक्ष शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांचेकडुन कामाची तपासणी करुन घेण्याचे अटीवर मा. आयुक्तांनी दिनांक १३.०२.२००२ रोजी श्री डी. अजितसिंग यांच्या ३१.२१% कमी दराच्या निविदेस मंजुरी दिली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीच्या विचारार्थ सादर.

**मा. सभापती :** प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. काम चांगल्या प्रतीचे होण्यासाठी अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सेवायोजन कार्यालय (कॅप्सुल आयलँड) ते नुतन कॉलनी मार्गे पोलीस वर्कशॉप या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.२१% कमी दराची श्री डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७ :**

कार्यकारी अभियंता पा. पु. विभाग मनपा यांनी सन २००२-२००३ साला करीता औरंगाबाद पाणी पुरवठा जलशुध्दीकरण केंद्र फारोळा करीता द्रव रुप क्लोरीन पुरवठयासाठी निविदा मागविल्या होत्या एकुण ०३ निविदा प्राप्त झाल्या यामध्ये मे. सपना ट्रेडर्स अमरावती, मे राजदीप ऐंटरप्राईजेस मुंबई, व फोनिक्स केमिकल्स औरंगाबाद असे निविदा धारक होते. यात मे. फोनिक्स केमिकल्स औरंगाबाद यांच्या दर रु. १५,१६५/- प्रती टन असा प्राप्त झाला असुन. तो तुलनात्मकदृष्टया इतर निविदा धारकांपेक्षा कमी असल्याने त्यांची निविदा स्विकारणेस्तव शिफारस करण्यात आली आहे. त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

सन २००२-२००३ सालाकरीता एकुण वार्षीक गरज १६६ टन (१५० टन) ची असुन आज द्रव रुप क्लोरीनचा साठा संपुष्टात आल्याने जल शुध्दीकरणाकरीता ब्लीचिंग पावडर वापर चालु आहे. तो मोठया योजनेकरीता अव्यवहार्य आहे. पाणी पुरवठा संदर्भातील तातडीची गरज पाहता सदर प्रस्तावास मान्यता मिळावी.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**श्री जयवंत ओक :** रोजाबाग येथे दुषित पाणी झाले ९४ लोक आजारी पडले.

**मा. सभापती :** मनपा प्रशासनाची यंत्रणा राबवीत आहे. आपले अधिकारी रुग्णांवर औषध उपचार करीत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००२-२००३ सालाकरीता औरंगाबाद पाणी पुरवठा जलशुध्दीकरण केंद्र, फारोळा करीता द्रवरुप क्लोरीन पुरवठयासाठी प्राप्त झालेल्या निविदा

पैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच रु. १५,१६५/- प्रती टन या दराची मे. फोनिक्स केमिकल्स औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८ :**

(दिनांक १८.०९.२००२ रोजी विषय क्र. ४० अन्वये स्थळ पाहणीसाठी ठेवण्यात आलेला प्रस्ताव )

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगपुरा भाजी मंडई समोर मनपा दुकानावर पहिला मजला बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु. २५,८७,०००/- चे अंदाजपत्रके तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ४.०८.९८ रोजी मान्यता दिलेली आहे. तसेच मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. १४४/९ दिनांक १९/११/९८ च्या इतिवृत्तान्वये सदरील अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी निविदा मागविल्या असता विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण ७ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१० टक्के जास्त दराची निविदेस मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ०६.०७.९९ संबंधीत गुत्तेदाराशी दराबाबत वाटाघाटीस्तव बोलाविले व वाटाघाटी अंती ९.१० टक्के जास्त दराऐवजी ४ टक्के जास्त दराने मान्यता दिली मान्यतेनुसार संबंधीत गुत्तेदारामार्फत काम पुर्ण करुन घेण्यात आले आहे. काम नाल्यातील असल्याने तांत्रिक दृष्टीने नाल्याचे पाया खोल गेल्याने व आर.सी.सी. डिझाईन व (लोखंडामध्ये वाढ) संबंधीत वास्तुविशारद यांनी सुधारीत सादर केल्या प्रमाणे सदर कामात अंदाजपत्रकापेक्षा जास्त खर्च झाला आहे. झालेले काम वगळता सदरील इमारतीमध्ये उर्वरीत कामात आतील व बाहेरील रंगकाम, जिन्याचे पुर्ण काम, फ्लोरींग स्वच्छता गृह इत्यादी कामासाठी रुपये ६,०१,०१५/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक २०/०५/२००२ रोजी मान्यता दिलेली आहे. व या वाढीव कामासाठी वर्ष २००२-२००३ अर्थसंकल्पात ६,००,०००/- ची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

करीता पुर्वीचे अंदाजपत्रक २५,८७,०००/- व सुधारीत ६,०१,०१५/- असे एकुण ३१,८८,०१५/- ची मान्यता देऊन वाढीव काम संबधीत गुत्तेदाराकडुन करुन घेणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा भाजी मंडई समोर मनपा दुकानावर पहिला मजला बांधणेच्या कामासाठी सदरील इमारतीमध्ये उर्वरीत वाढीव कामात आतील व बाहेरील रंगकाम, जिन्याचे पुर्ण काम, फ्लोरींग, स्वच्छतगृह इत्यादी कामासाठी जे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. ६,०१,०१५/- व पुर्वीचे अंदाजपत्रक रक्कम रु. २५,८७,०००/- असे एकुण ३१,८८,०१/- च्या खर्चास मान्यता देऊन वाढीव काम संबंधीत गुत्तेदाराकडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९ :**

(दिनांक १८/०९/२००२ रोजीच्या स्थायी समिती सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव क्र. ४३)

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, उस्मापुरा चौकातील रस्ता दुभाजकामधील एस.टी.डी. पी.सी.ओ.साठी दिलेल्या जागेतील एस.टी.डी. पी.सी.ओ. हलविणे आवश्यक असल्यामुळे ८X१० फुट या आकाराची जागा कै. विनायकराव पाटील यांचे पुतळया जवळील उद्यानात हॉटेल हवेली लगत पाच वर्षासाठी भाडेपट्टयाने देणे बाबत स्थायी समिती सभा दि. १६.०६.९५ मधील विषय क्र. २६ अन्वये ठराव सर्वानुमते पारित झाला होता. सदर जागेचा श्री सुरजितसिंग खुंगर यांचे सोबत त्यानुसार करारनामा करुन घेण्यात आला होता.

संबंधीतांनी या जागेवर १३X१७ या आकाराचे पक्के बांधकाम केले असुन पुर्व व उत्तर बाजुस ओट्टयावर काचेचे कंपाऊंड तयार केलेले आहे. तसेच दक्षिणेस स्वच्छता गृह आहे. या १४१ चौ. फुट जास्तीचे बांधकामासाठी दंडापोटी बांधकाम खर्च दर रु. ३००/-प्रती चौ. फुट या प्रमाणे रु. ४२,३००/- आकारणी करण्यात आली असुन संबंधीताने दि. २२.३.९९ रोजी उपरोक्त दंडाचे रक्कमेचा भरणा केलेला आहे. तसेच त्यांचेकडुन दरमहा ८००/- रुपये वाढीव दराने वार्षीक भाडे रु. ९,४००/- वसुल केले आहे सन १९९८ पासुन १२X१७ फुट या आकाराच्या जागेसाठी रु. १,७६८ प्रतीमहा भाडे वसुल करुन भाडेपट्टा नुतनीकरण अटी व शर्तीच्या अधिन राहुन पाच वर्षासाठी करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री सुरजितसिंग खुंगर यांना भाडे पट्‌ट्याने देण्यात आलेल्या जागेचे सन १९९८ पासुन १३X१७ फुट या आकाराच्या जागेसाठी रु. १,७६८/- प्रतीमहा भाडे वसुल करुन भाडेपट्टानुतनीकरण अटी व शर्तीच्या अधिन राहुन ०५ (पाच) वर्षासाठी नुतनीकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

नगरसचिव
महानगरपालिका औरंगाबाद

सभापती (स्थायी समिती)
महानगरपालिका औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १२/०१/२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक १३ जानेवारी २००३ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे ह्यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम" या गिताने सुरुवात झाली. या सभेला संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री देसरडा प्रशांत सुभाष
२. श्री मिर हिदायत अली
३. श्री शिंदे किशोर रावसाहेब
४. श्री शेख इलियास किरमानी
५. श्री औताडे रावसाहेब ममतु
६. श्री ओक जयवंत केशवराव
७. श्री फुलारी नंदकुमार माधवराव
८. डॉ. आशा उत्तम बिनवडे
९. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
१०. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
११. श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१२. श्री चंद्रशेखर जैस्वाल
१३. श्री कैसरखान बद्रोद्दीन खान

## चर्चा

**श्री जयवंत ओक :** काल भारताचे माजी राष्ट्रपती मा. श्री. के. आर. नारायणन् हे महापालिकेत आलेले होते. त्यांचा महानगरपालिकेतर्फे सत्कार करण्यात आला. सभागृहात आपण सर्वांनी मिळुन सत्कार करण्याबाबत ठराव घेतला परंतु या कार्यक्रमांना स्थानिक नगरसेवकांना सुध्दा बोलविण्यात आले नाही. मान सन्मान सर्वांचा ठेवला पाहिजे. प्रशासन विसरुनच जाते. संबंधित वार्डाचे सदस्यांना सुध्दा बोलाविण्यात आले नाही. पत्रिका द्यावयास पाहिजे होती. विरोधी पक्ष नेते मा. श्री गडकरी भेट दिली त्यावेळी असाच प्रकार प्रशासनाकडुन झालेला होता. त्यावेळी आम्ही आमच्या भावना व्यक्त केल्या होत्या. यापुढे असे होवु नये प्रशासनाला तशा सुचना द्याव्या. व इतिवृत्तात सचिव त्यांनी नोंद करुन घ्यावी.

**मा. सभापती :** सर्वांना पत्रिका दिलेल्या होत्या अशी माहिती मला मिळाली .

**श्री जयवंत ओक :** पत्रिका माझ्यापर्यंत आलेली नाही. कुणी दिली खुलासा घ्यावा. कार्यक्रमपत्रिका दिली असती तर सर्वच स. सदस्य आले असते. यात शंका नाही. मान सन्मान सर्वांचा केला पाहिजे. आपल्याला आठवत असेल गौतम मुन्शी व्यासपीठावर आपण तेथे होता सर्व माझे मित्र आहे त्या शब्दांचा आम्ही मान ठेवला होता. सर्वांचा मान राखणे आमचे कर्तव्य आहे. आज तीन महापुरुष माझ्या मतदारसंघात आहे. मान सन्मान करण्याबाबत झोपलेल्या

प्रशासनाला सुचविण्यात यावे. ज्यावेळी एखाद्या प्रमुख पाहुण्याचे स्वागत केले जाते. तसेच १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी व २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनी सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी हजर राहिले पाहिजे तशा प्रकारचा सुचना प्रशासनाला द्याव्यात. कर्मचाऱ्यांकडुन महापालिकेला काही तरी स्थान आहे असे लोकांना दिसुन आले पाहिजे. अशा राष्ट्रीय कार्यक्रमाला एवढा मोठा स्टाफ असतांना ३००,४०० कर्मचारी उपस्थित असतात. यापेक्षा जास्त नाही. वर्धापन दिनांच्या दिवशी जे खेळ घेतले जातात त्यांना अदयाप बक्षीस देण्यात आलेली नाही.

**मा. सभापती :** स. सदस्य श्री ओक यांनी सुचना मांडली त्याची प्रशासनाने नोंद घेवुन प्रशासनास सुचना देण्यात येता की, ज्या ज्या वेळेस महानगरपालिकेचा कार्यक्रम असेल त्यात सत्कार, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, तसेच वर्धापन दिन कार्यक्रमासाठी स. सदस्यांयना तसेच अधिकारी, कर्मचारी व स्वातंत्र्य सैनीक यांना सुध्दा आमंत्रित केले पाहिजे. ०१ मे व मराठवाडा मुक्ती संग्रामादिनानिर्मीत्त ज्येष्ठ नागरिक, डॉक्टर्स, वकील व सर्व राजकीय/सामाजिक कार्यकर्त्ते लोकप्रतिनिधीनां निमंत्रित करावे. आता येणारे २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनांची तयारी म्हणुन आता पासुन प्रशासनाने तयारी केली पाहिजे. २ ते ३ दिवस सर्वांना अगोदर पत्रिका मिळाल्या पाहिजे. जे अंमलबजावणी करणार नाही. त्यांचेवर कार्यवाही करावी.

**विषय क्र. ६० :**

दिनांक २४/१०/२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री देसरडा प्रशांत :** महानगरपालिकेतर्फे भाडे तत्त्वावर देण्यात आलेल्या जागा किती आहेत याचा तपशील प्रशासन सभागृहासमोर ठेवणार होते. मागील बैठकीत या संबंधी चर्चा झालेली होतीी. अहवाल देणार होते. जवळपास १२० जागा भाडेतत्वावर दिलेल्या आहे. नाममात्र दराने दिलेल्या आहेत. संपुर्ण तपशील ठेवण्याबाबत प्रशासनास आपण आदेश दिले होते. त्याचा खुलासा दयावा. किती जागा दिल्या त्यापासुन मनपास किती उत्पन्न येते त्याचाही अहवाल प्रशासनाने दयावा.

**मा. सभापती :** काही अहवालाच्या प्रती प्राप्त आहेत. सर्वांना झेरॉक्स प्रती काढुन देण्यात येतील. त्यानुसार चर्चा करुन योग्य निर्णय आपल्याला घेता येईल. पुढील विषयावर चर्चा करावी.

**श्री जयवंत ओक :** दि. १८.०९.२००२ रोजीच्या स्थायी समितीतील ठराव क्र. ४१ नुसार जादा काम केल्याबाबत मोबदला देण्यासंबंधीचा प्रस्ताव होता. या निवडणुकीच्या कामामध्ये नगरसचिव ह्यांचे विभागातील अस्थायी ४ ते ५ कर्मचारी यांनी जादा काम केलेले आहे. तसा रिर्पोट मुळ संचिकेत आहे. सर्वांना देण्यात आले परंतु फक्त ४ ते ५ अस्थायी कर्मचाऱ्यांना जादा काम केल्याचा मोबदला दिला नाही. त्याही कर्मचाऱ्यांना देण्यात यावे. असाच ठराव मंजुर केलेला होता. त्यांनी काम केलेले आहे. त्यांचेवर अन्याय होत असेल तर योग्य नाही. ठराव क्र. ४१ नुसार कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** त्यांचवर अन्याय होणार नाही.

**मुख्य लेखाधिकारी :** नगरसचिव विभागातील त्या कर्मचाऱ्यांची नावे असेल तर देण्यात येईल. परंतु ठराव पास केल्यानंतर बऱ्याच स्थायी /अस्थायी कर्मचाऱ्यांनी कामे केल्याबाबत या विभागास कळविलेले ओह. नंतर नावे डिलीट करण्यात आलेली आहे.

**जयवंत ओक :** ज्या ५ लोकांची नांवे आहेत त्यांना देण्यात यावे. त्यांनी निवडणुकीमध्ये इतर कर्मचाऱ्यांबरोबर जादा कामे केलेली आहे. नंतरची आलेली नांवे त्यांना देवू नये याशी मी सहमत आहे.

**मा. सभापती :** काम केल्याबाबतचा सचिव यांचा रिर्पोट असेल ज्यादा काम केलेले असेल तर देण्यात यावे तशी कार्यवाही प्रशासनाने करावी. त्यांची नांव मुळ संचिकेत आहेत काय? तपासणी करुन इतरांना जे देण्यात आले ते देण्यात यावे.

**मुख्य लेखाधिकारी :** काम केलेले असेल व संचिकेमध्ये त्यांची नांवे असतील तर त्यांनाच देण्यात येईल.

**मा. सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी स. सदस्य श्री देसरडा यांच्या प्रश्नाचा खुलासा करावा.

**श्री देसरडा प्रशांत :** महानगरपालिकेने शहरातील किती जागा भाडेतत्वावर दिलेल्या आहेत व त्यापासुन येणारे उत्पन्न किती या बाबतची चर्चा दोन बैठकीच्या अगोदर झालेली होती. त्याचा अहवाल देणार होते.

**मालमत्ता अधिकारी :** संचिका साहेबांकडे दिली आहे. जागा किती आहे याची यादी दिली आहे.

**श्री देसरडा प्रशांत :** जागा किती भाडयाने दिल्या व किती जागेचे किती भाडे येते हे दिलेले नाही फक्त यादी दिलेली आहे. किती उत्पन्न होते हे माहिती असावयास पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे लाखो रुपये उत्पन्न ह्या जागेपासुन येवु शकेल परंतु आजची परिस्थिती पाहिली तर १० हजार रुपये उत्पन्न येते.

**मालमत्ता अधिकारी :** स्थायी समितीकडे सर्व माहिती दिलेली आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे अहवाल दिलेला आहे. सर्व सदस्यांना प्रती देण्यात येतील.

**डॉ. आशा बिनवडे :** इतिवृत्तांतील पान क्र. ३ वर महानगरपालिकेने काही बिल्डर्स यांना जागा डेव्हलप करण्यासाठी दिलेल्या होत्या. २५% -७५% या विषयावर सभागृहात चर्चा झालेली होती. ज्या चार जागा दिलेल्या होत्या त्या २५% प्रमाणे हँड ओव्हर केलेल्या आहेत की नाही. जो वापर परवानगी २५% जागा हॅण्डओव्हर व करता त्यांनी सुरु केला त्या बिल्डरवर काय कार्यवाही केली. पोलीस गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतलेला होता. त्याप्रमाणे कार्यवाही केली का? २५% जागा हस्तांतर करण्याच प्रोसेसमध्ये होते. त्या जागा हॅण्डओव्हर केलेल्या आहे का याबाबती आणखी स्थिती काय आहे तसेच ७५% च्या बाबतीत सुध्दा कोणत्या स्टेजवर आहोत याचा खुलासा करावा.

**सहा. संचालक (न.र.) :** अशी एकुण (०४) प्रकरणे आहेत त्यापैकी मालखरे बिल्डर्स कडुन जी महपालिकेची २५% जागा हँडओव्हर होणार होती ती झालेली आहे. दुसरे जय टावर्स या प्रकरणी संबंधीतांनी महापालिकेकडे मागील आठवडयात प्रस्ताव सादर केलेला आहे. उक्त प्रकरण न्याय प्रविष्ट असल्यामुळे विधी सल्लागार यांचेशी सल्ला मसलत करुन तत्व: २५%

जागेचा ताबा कशा रितीने घेता येईल. तसे प्रयत्न करीत आहो. या आठवडयात ताबा मिळेल असे वाटते. तिसरे प्रकरण श्री पाडळकर यांचे आहे. त्यांनी थर्ड पार्टीला ही जागा विकलेली आहे तरी सुध्दा श्री पाडळकर यांनी महापालिकेस आश्वासन दिले आहे की, संबंधीतांना सोबत घेऊन महापालिकेने हिस्साची जागा जी २५% जागा आहे तीजागा हँड ओव्हर करुन देणार आहे. चवथे प्रकरण हे गारखेडा येथील अर्चना बिल्डर्सचे प्रकरण आहे. तेथे आमचा संपर्क चालु आहे. अदयाप तेथे काही डेव्हलप झालेले नाही. उर्वरीत ७५% जागेवर जो वापर सुरु झालेला आहे त्या बाबतीत महापालिकेचय हिताच्या दृष्टीने महापालिकेच्या हिस्साच्या २५% जागा अगोदर ताब्यात घेऊन त्यानंतर ७५% जागेवर केलेला वापर याबाबतीत कार्यवाही करणे हिताचे होईल असे वाटते. राहीला प्रश्न २५% जी मनपास जागा देणार होते त्यावर वापर सुरु केला असेल तर कायदेशीर सल्ला घेऊन कार्यवाही करता येईल. तीन प्रकरणाच्या जागा मिळण्यास काही अडचण येणार नाही अशी परिस्थिती आहे.

**श्री हिदायत अली :** मागील बैठकीत ही असे सांगण्यात आले की, २५% जागा हँडओव्हर केल्या जातील याही बैठकीत तोच खुलासा करण्यात येत आहे. ८ दिवसाच्या आत कार्यवाही होईल का? नाही झाल्यास प्रशासन काय कार्यवाही करणार आहे? जय हॉक्सचे हँड ओव्हर होईल असे सांगण्यात आले होते.

**सहा. संचालक (न.र.) :** जय टार्वसच्या बाबतीत सदरील प्रकरण न्यायाप्रविष्ट असल्यामुळे जास्त स्कोप नाही असे मी म्हटलेले होते. तथापी हया प्रकरणी न्यायालयीन बाबी तपासणी निर्णय घ्यावा लागणार आहे.

**श्री देसरडा प्रशांत :** मी सभापती असतांना जय टावर्सच्या संदर्भात चर्चा झालेली होती. व सर्वे करण्यास प्रशासनाला सांगीतलेले होते. न्यायाप्रविष्ट प्रकरण आहे तो पर्यंत जागा हस्तांतर करु शकत नाही असे म्हटले गेले जी काही परवानगी जय टॉवर्सला देण्यात आली त्याबाबतीत प्रकरण न्यायालयात चालु आहे. न्यायालय जो निकाल देईल तो देईल परंतु जय टावर्स मालकाने आतापर्यंत महापालिकेला देण्यात येणारी २५% विकास केलीली जागा हस्तांतर करुन घेण्यासाठी ४ पत्र दिलेले आहे. तरी सुध्दा प्रशासन कार्यवाही करीत नाही. सभागृहात झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी का होत नाही. अंमलबजावणी करावयाची नसेल तर तसे प्रशासनाने सांगावे. फक्त न्यायालयाचा निकाल काय लागतो याकडे लक्ष देवुन महापालिकेचे नुकसान करणे योग्य नाही. १९७५ च्या जागेचा तर अहवाल आज सादर होतो तो न्यायाल्याच्या आदेशानुसार आपण रुलींग दिली नसती तर अहवाल सादर केला नसता. प्रत्येक वेळेस या सभागृहात या सभागृहात या ४ प्रकरणाची चर्चा होते. मालखरे यांचेकडुन प्रॉपर्टी घेतली मनपाचा हिस्सा मिळाला तर का आतापर्यंत पुढील कार्यवाही नाही. का भाडेतत्वावर दुकाने दिली नाही. महापालिकेचा फायदा होईल आताच खुलासा केला की, पाडळकर २५% जागा देणार आहे. परंतु संबंधित जागेवरील सर्व दुकाने त्यांनी विक्री केलेली आहे. मागच्या बाजुला एक हॉल तो हॉल २५% चे हिस्सात देणार आहे अशी माहिती आहे. नाविलाजाने तो हॉल घ्यावा लागणार आहे. जास्त

किमतीच्या दुकाने विक्री केली व ज्यांना कुणी घेणार नाही अशी जागा मनपास हस्तांतर करणार आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** आताच अधिकाऱ्यांनी खुलासा केला कि, मालखरे यांचेकडुन २५% मनपाच्या हिस्साची जागा हस्तांतर केलेली आहे. सदर जागा भाडे तत्वावर का देण्यात आलेली नाही तसेच जो वापर त्यांनी आधीपासुन म्हणजे २ ते ३ वर्षापुर्वी केला उत्पन्न मिळविले व त्यानंतर २५% जागा मनपास दिली. आता त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे. नंतर कार्यवाही करणे योग्य होणार नाही व अशीच सवय बिल्डरांना लागेल व मनपाच्या हिस्साचा ज्याना ते तात्काळ हस्तांतर यापुढे होणार नाही असे माझे मत आहे. त्यांचे मनावर ठेवु नये. नंतर कार्यवाही करणे योग्य नाही. एकाच वेळी सर्व काही झाले पाहिजे असे माझे मत आहे. आताच स. सदस्य श्री देसरडा यांनी पाडळकरांच्या बाबतीत सांगितले की, सर्व दुकाने त्यांनी विकल्या व आताच्या जागेला किमंत नाही ती जागा देणार आहे. म्हणुन जागा हस्तांतर होण्याअधिच त्यांनी तो वापर सुरु केला त्याबाबतीत कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री जयवंत ओक :** मनपाच्या उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने जागा ७५/२५, ७०/३० या प्रमाणे विकास करण्यासाठी दिलेल्या होत्या. जेव्हा परवानगीसाठी प्रकरण दाखल झाले जी वाटाघाटी करण्यात आली.२५% जागा देण्याचे ठरले आहे. त्यानंतर त्या बिल्डरांनी कम्लेशन घेतले किंवा नाही हा प्रश्न निर्माण होतो. त्यांनी दुकाने विक्री केली. परंतु जो करार संबंधीत बिल्डर व मनपामध्ये झालेला आहे त्यानुसार कार्यवाही करावी कार्यवाही करण्यासाठी वाट बघण्याची काय आवश्यकता आहे. जेवढी काही प्रकरणे झालेली आहे त्या सर्वांचे बांधकाम झालेले आहे. तो बिल्डर विक्री करतो. असे असतांना सुध्दा मनपाचे संबंधीत विभाग का गप्प आहे का तात्काळ कार्यवाही होत नाही. न्यायालयाच्या आदेशानुसार पार्किगच्या जागा तसेच गोडावुन सील करण्याची कार्यवाही चालु आहे. त्याचप्रमाणे हया बिल्डरवर कार्यवाही व्हावी. ज्या ज्या बिल्डरांनी दुकाने विक्री केली तेथील सामान बाहेर काढावे करारनामा काय झाला ते बघावे. सर्व संचिका तपासणी करुन त्यात काय करार झाला ते बघावे. त्यानुसार कार्यवाही करावी. या ८ प्रकरणीच नव्हे तर शहरातील अशा किती जागा दिलेल्या आहेत त्या सर्व चौकशी करुन कार्यवाही करण्याची आज गरज आहे. आजच्या आज कार्यवाही करावी. कर्मचारी पाठवुन कार्यवाही करावी. कोर्टाची वाट बघण्याची गरज नाही. कार्यवाही करण्याचे आदेश दयावेत.

**श्री देसरडा प्रशांत :** जालनारोडवरील एक प्रकरण अशा पध्दतीने दाखल झालेले होते परंतु परवानगी दिलेली नाही. म्हणजेच ५ वे प्रकरण होते. परवानगी दिली नाही म्हणुन संचिकाच परत घेतली.

**सहा. संचालक (न. र.) :** ५ व्या या प्रकरणाची मला माहिती नाही. माहिती घेवुन खुलासा देता येईल. मालखरे बिल्डर्स प्रकरणात हस्तांतर करुन मालमत्ता विभागाकडे पाठविण्यात आलेले आहे.

**श्री जयवंत ओक :** वाटाघाटी काय झालेल्या आहेत त्या प्रमाणे आजच कार्यवाही करावी. न्यायालयाच्या आदेशाची वाट पहाण्याची आवश्यकता नाही.

**मा. सभापती :** महानगरपालिकेने केलेल्या करारनाम्यानुसार आजच्या आज कार्यवाही करुन २ दिवसात अहवाल सादर करावा. मालखरे बिल्डरने किती जागा हँड ओव्हर करुन दिली. खुलासा दयावा.

**मालमत्ता अधिकारी :** २२% जागा हँड ओव्हर करुन दिलेली आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** संबंधीताने ४ वर्षापासुन त्यांचे हिस्सांचे बांधकाम करुन वापर उत्पन्न मिळविले आहे. उशीरा देऊनही २२% हँडओव्हर कसे केले. तेवढेच बांधकाम झालेले होते का?

**मा. सभापती :** जो करारनामा मनपा व त्या संबंधित बिल्डर यांचे मध्ये झाला त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>गारखेडा येथील सीटीरास क्रमांक १५१८७ आणि सर्वे क्र. ४५/८५ हया संदर्भात सभागृहात झालेली चर्चा.</u>**

**श्री हिदायत अली :** सीटीरास क्रंमाक १५१८७ सीट क्र. ३०७ सर्वे क्र. ४५/८५ या जागेच्या संदर्भात नियमीत वृत्तपत्रात प्रसिध्द होत आहे. ले-आऊट मंजुर २५ जुलै १९८५ ला झालेला असुन एकुण जागा ४१२०० चौ.मी. आहे. ले-आऊट मंजुर करण्यात आलेली ही ४९६५० चौ.मी. एवढी आहे. जे की, ८४५० चौ.मी. जास्तीच्या जागेचे महापालिकेने ले-आऊट मंजुर करुन दिलेले आहे. ले-आऊट मंजुर करण्यासाठी जे चार्जेस आकारण्यात येते. त्यांचा विचार केल्यास ३० लक्ष रुपयाचे नुकसान त्या वेगळया परिस्थितीत झालेले आहे. याबाबत सविस्तर माहिती या विभागाकडुन घेण्यात यावी.

**श्री कैसरखान :** या जागेचा एन. रा. सुध्दा झालेला नाही. त्याचा सुध्दा खुलासा करण्यात यावा.

**श्री जयवंत ओक :** जो प्रश्न आताच उपस्थित झाला आहे गेल्या दोन महिन्यापासुन वृत्तपत्रात प्रसिध्द होत आहे. सदर प्रकरणाच्या बाबतीत महापालिकेने आपले म्हणणे वृत्तपत्रात देऊन जाहीर का केलेले नाही. हा माझा पहिला प्रश्न आहे. ०२) गेल्या ३१ ऑक्टो. २००२ पासुन वृत्तपत्रात वकीलाच्या नावाने जाहीर प्रगटन येत आहे. ०३) सदरील ले-आऊट मंजुर करतांना सिव्हील जज्ज डिव्हीजन बॅच यांचे दि. १२.०८.१९७७ च्या आदेशाचा विचार करण्यात आलेला नाही काय? झालेला नसल्यास त्याची कारणे काय? न्यायालयाचा अवमान करणाऱ्यावर काय कार्यवाही करण्यात आली आहे. मी महानगरपालिकेचे १९८८ चे प्रकरण सादर केले होते. त्यात भुखंडाची अनधिकृतपणे विभागणी करणे याखालील महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९४९ चे कलमानुसार काय कारवाई करण्यात आलेली आहे. व अनाधिकृत बांधकामे झालेली आहे हा गुन्हा समजण्यात येतो की, दृष्टीने महानगरपालिकेची खरोखरच फसवणुक झालेली आहे काय? असल्यास त्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेले आहे काय? ०४) महापालिकेची फसवणुक केलेली असल्यास त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे काय ? सदर प्रकरणात महानगरपालिका भुमापन तसेच नोंदणी विभाग इत्यादी कार्यालयाची दिशाभुल करुन खोटेपणा केलेला आहे ही बाब गंभीर असल्याने कार्यवाही करणे आवश्यक आहे. मी जे मुद्दे उपस्थित केले त्याचा खुलासा करण्यात यावा.

**सहा. संचालक नगररचना :** सी.स. नं. १५१८७ गारखेडा हा ले-आऊट तत्कालीन काळामध्ये मंजुर करण्यात आलेला आहे. टेन्टीव मंजुरी नगरपरिषदेच्या काळात होत. त्यास १९८५ ले-आऊटला मंजुरी मिळालेली आहे. ह्या ले-आऊटच्या संदर्भात क्षेत्रातील तफावती संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यानंतर याबाबत तफावत आढळुन नगररचना विभागाकडुन सुनावणीच्या हद्दीपर्यंत तात्काळ स्थगिती देण्यात आलेली आहे. हे प्रकरण मा. आयुक्तांच्या अखत्यारित असल्यामुळे परंतु नगररचना विभागाशी निगडीत असल्याने प्राथमिक स्वरुपातील सर्व कागदपत्र सुनावणी या प्रकियेची सुरुवात या कार्यालयाकडुन झालेली आहे. उक्त बाबत गैर अर्जदार याची सुनावणी क्लोज करण्यात आलेली आहे. येत्या २० तारखेला अर्जदार यांचे उर्वरीत कागदपत्र सादर करण्याच्या विनंतीनुसार २० तारखेला सुनावणी ठेवली आहे. याबाबतची सर्व माहिती मा. आयुक्तांकडे सादर करण्यात येणार आहे. याबाबतचे अंतिम निर्णयाचे अधिकार हे मा. आयुक्तांचे आहे जी काही कार्यवाही होणार आहे. ती मा. आयुक्तांच्याच स्तरावर होणार आहे. तांत्रिक सर्व माहिती व त्याचा ऊहापोह हा नगररचना विभागामार्फत होणार आहे. उक्त प्रकरणात अर्जदार यांनी फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल केलेले आहे. फौजदारी गुन्हयात आवश्यक असलेल्या कागदपत्राचे सहकार्य महानगरपालिकेच्या वतीने लाभत आहे. की जी माहिती उपलब्ध आहे ती ती सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यात येत आहे. वृत्तपत्रात वेळोवळी जाहीरपणे जी प्रसिध्दी होत आहे त्यांचे अंतिम खंडण करण्यासाठी व ते खंडण करण्यापुर्वी महानगरपालिकेकडे सर्व प्रकारची सुनावणीची प्रकिया पुर्ण होणे आवश्यक आहे. २० तारखेला सुनावणी झाल्यानंतर अंतीम निर्णय मा. आयुक्तांकडुन सादर होणार आहे. व त्यानंतर पुढील कार्यवाही निश्चित केली जाईल. उपलब्ध कागदपत्राच्या आधारे जे स. सदस्यांनी प्रश्न विचारलेले आहे. त्या संदर्भात खुलासा करतो की, एन रा. झालेला आहे किंवा नाही याचा कुठेही बोध होत नाही. प्रकरण अतिशय जुने असुन माझ्याकडे संचिका उपलब्ध आहे. त्या आधारावर आज माहिती देणे हे मला जिकराचे होत आहे. प्रकरणी एन. रा. चा कुठल्याही प्रकारचा आदेश दिसुन येत नाही. सबब तांत्रिक सर्व बाबी पडताळुन आणि माझ्या समक्ष सर्व दाखल होणारे पुरावे त्याची शहानिशा करुन प्रकरण अंतिम निर्णयासाठी मा. आयुक्तांकडे सादर होणार आहे. मा. आयुक्तांच्या स्तरावरील अंतीम निर्णय होईपर्यंत मला संपुर्णतः माहिती देता येणार नाही.

**श्री हिदायत अली :** दोन ते अडीच महिन्यापासुन वृत्तपत्रात बोगस ले-आऊट बद्दल बातम्या प्रसिध्द होत आहे. एन. रा. झालेला नाही. कागदपत्र दिसुन येत नाही. विचार करण्याची आवश्यकता काय आहे. अशा वेळी ताबडतोब कार्यवाही व्हावयास पाहिजे. मनपातर्फे काय कार्यवाही केलेली आहे.

**सहा. संचालक (न.र.) :** उक्त प्रकरणी सुनावणीच्या दरम्यान सर्व कागदपत्र माझ्याकडे जमा झालेली आहे. या प्रकरणाचा उगम आणि उदभव हा न्यायालयीन प्रक्रियेतुन झालेला आहे. कुठल्याही प्रकारचे मी माझ्या स्तरावर भाष्य करण्यापुर्वी मला या गोष्टीची दक्षता घेणे अतिशय आवश्यक आहे. सभागृहानी हे लक्षात घ्यावे की हे प्रकरण १९८५ साली हा ले-आऊट मंजुर झालेला आहे. आज माझ्याकडे याच प्रकरणाची प्राथमिक चर्चा आणि सुनावणी आणि पुरावे

दाखल होत आहे या पुराव्याच्या प्रक्रियेला जवळपास २ महिन्यापासुन सुरुवात झालेली आहे. प्रक्रिया अदयाप चालु असुन मी या क्षणाला पुरावा खोडुन काढणे हे माझ्या अखत्यारीतली बाब नाही. या सर्व बाबी व वस्तुनिष्ठ अहवाल हा मला मा. आयुक्तांसमोर सादर करायचा आहे.

**श्री हिदायत अली :** संबंधीताने स्वत:च्या नावाने हया जागेचे पी.आर.कार्ड तयार केलेले आहे. महापालिकेच्या हे निर्दशनास येवुनही काहीही कार्यवाही आज पर्यंत का करण्यात आलेली नाही. करोडो रुपयाची जागा हडप करण्यात आलेली आहे. त्यापुढे आणखी काही दिवस कार्यवाही करण्यात घातल्यास संपुर्ण जागेवर बांधकामे होतील यात शंका नाही.

**डॉ. आशा बिनवडे :** या जागेच्या बाबतीत न्यायालयीन प्रकरण झालेले आहे किंवा काही आफरातफर झालेली हे प्रशासनाच्या लक्षात येऊनही आजही त्या जागेवर बांधकामे चालु आहे. परवानगी कशाच्या आधारे दिलेली आहे. गेल्या वर्ष भरामध्ये ४ ते ५ इमारती झालेल्या आहेत परवानगी कशी दिली किंवा बांधकामे कशाच्या आधारे चालु आहे याकडे सुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे. एकीकडे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे म्हणुन बांधकामे होवुन जातील व ओपन स्पेसवर सुध्दा बांधकामे होती. दुसरा मुद्दा असा की, सेव्हनहिल ते गजानन महाराज मंदीर पर्यंत जो रस्ता जाणार आहे तो याच सर्वे नंबर मधुन जाणार आहे. रस्त्यासाठी जागा भुसंपदनाचा प्रस्ताव २६.१०.८९ रोजीच्या सर्वसाधारण सभेत पारीत करण्यात आलेला आहे. व आयुक्तांशी वाटाघाटी करुन १.९७ कोटी रुपये देण्याचे मान्य झालेले होते. व पुन्हा २००२ मध्ये गेल्या ८ ते १० याच रस्त्यांची जागा भुसंपादन करण्याचा प्रस्ताव सादर झालेला होता. फक्त किती रक्कम दयायची हे प्रस्तावात नव्हते. दुसऱ्यांदा प्रस्ताव का ठेवण्यात आलेला होता माहितीनुसार हीच जागा पुन्हा वाटाघाटी करुन ७ कोटीमध्ये घेणार आहोत. कोटयावधी रुपयाचे नुकसान करुन घेत आहोत या कोण दोषी आहे. याची शहानिशा होणे आवश्यक आहे.

**सहा. संचालक (न.र.) :** न्याय प्रविष्ट प्रकरण आहे असा मी खुलाशामध्ये बोललेलो नाही. तसे विधान मी केलेल नाही. परंतु या ले-आऊटच्या विकासासंदर्भात मी स्थगिती देऊन स्थगितीचे आदेश दिले असुन त्याची एक प्रत प्रशासकीय अधिकारी यांना दिलेली आहे. कुठल्याही प्रकारचा या प्रकरणाच्या बाबतीत विकास होऊ नये याची दक्षता प्रशासकीय अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे.

**श्री चंद्रशेखर जैस्वाल :** नाथसुपर मार्केट ओपन स्पेस आहे. आतापर्यंत महापालिकेने हॅंड ओव्हर केलेले नाही. संपुर्ण माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.

**मा. सभापती :** नगररचनाकार -२ श्री निकम यांनी नोंद घेऊन पुढील बैठकीत माहिती उपलब्ध ठेवावी.

**श्री जयवंत ओक :** प्रकरण मा. आयुक्तांकडे गेलेले आहे की, नाही.

**सहाय्यक संचालक (न.र.) :** २० तारखेला अर्जदार यांची अंतीम सुनावणी आहे. त्यानंतर त्याचे सर्व पुरावे व तसेच गैरअर्जदार यांनी दिलेले पुरावे याचा सर्व उहापोह करुन जी तांत्रिक बाब या सर्वांचा अहवाल मला मा. आयुक्तांसमोर ठेवावयाचा आहे.

**श्री हिदायत अली :** स्थगिती आदेश काढले परंतु चालु असलेली कामे त्वरीत थांबवावी बांधकामे चालु आहे. सभा संपल्यानंतर आपण प्रत्यक्ष पाहणी केल्यास निर्दशनास येईल. संबंधीतांनी ओपनस्पेसचे पी.आर.कार्ड तयार केलेले आहे. त्यानुसार परवानगी घेतलेली असेल. त्यानुसार बांधकामे चालु आहे. ती त्वरीत थांबविणे गरजेचे आहे.

**श्रीमती पार्वती मानकापे :** मी सहजपणे त्याठिकाणी गेलेले होते. विचारणा केली असता बांधकाम परवानगी आहे म्हणुन सांगण्यात आले. माझ्या वार्डात परवानगी दिली जात नाही. या जागेवर बांधकामे करण्यास कशी परवानगी देण्यात आली खुलासा करावा.

**मा. सभापती :** सहा. संचालक नगररचना यांनी प्रशासकीय अधिकारी यांना कोणताही विकास या जागेवर न घेण्याबाबत पत्र दिले त्यानुसार प्रशासकीय अधिकारी यांनी काय कारवाई केली याचा खुलासा करण्यात यावा.

**प्रशासकी अधिकारी :** या प्रकरणातील मला जास्त माहिती नाही. तपासणी करुन तशी कार्यवाही करण्यात येईल. मी जेव्हापासुन चार्ज घेतला या काळात तसे पत्र माझ्याकडे आलेले नाही. त्यापुर्वीचे असेल तर तपासणी करुन कार्यवाही करण्यात येईल.

**श्री हिदायत अली :** आज लोकांच्या मनामध्ये महापालिकेविषयी वेगळया भावना निर्माण होत आहे. जे की एक व्यक्ती महानगरपालिकेच्या ओपनस्पेसचे पी.आर. कार्ड तयार केले त्याठिकाणी बांधकाम चालु आहे. यात मनपाचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. काम बंद करण्याची कार्यवाही सुध्दा महापालिकेकडुन होत नाही.

**प्रशासकीय अधिकारी :** तीन दिवसात हया प्रकरणाची माहिती सविस्तरपणे देण्यात येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** रस्त्याची जागा भुसंपादनाचा प्रस्ताव सन १९८९ साली आलेला होता त्यावेळी १.९४ कोटी द्यावयाचे होते. पुन्हा २००२ मध्ये प्रस्ताव सादर करुन ७ कोटी देणार आहे का? याची शहानिशा करुन अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती सभागृहात दयावी.

**श्री जयवंत ओक :** २० तारखेला सुनावणी होणार आहे. तो पर्यंत मुदत दिलेली आहे. ले-आऊट मधील दोन मालकांचा मुद्दा १५ ते २० गुंठेचा हा ले-आऊट आहे अशी माझी माहिती आहे. त्यापेक्षा जास्त ले-आऊट मंजुर करुन घेतलेला आहे. २० तारखेला सुनावणी झाल्यानंतर लगेच याच बैठकीवर बैठक आयोजित करावी अशी माझी विनंती आहे.

**मा. सभापती :** या प्रकरणावर बरीच चर्चा या सभागृहात झालेली आहे. स. सदस्य डॉ. बिनवडे यांनी सुध्दा जागा भुसंपादनाचा प्रस्ताव दोन वेळेस कसा सादर झाला म्हणुन प्रश्न उपस्थित केलेला आहे. या विषयावर गंभीर मुद्दा व गंभीर चर्चा झालेली आहे. सहा. संचालक नगररचना यांनी प्रशासकीय विभागासही कार्यवाही करण्यास्तव पत्र दिलेले आहे. त्यानुसार कार्यवाही झाली पाहिजे. आजच्या सभेत जी संपुर्ण चर्चा झालेली आहे या चर्चेचा संपुर्ण अहवाल तीन दिवसांच्या आत दिला पहिजे. ज्या जमीन धारकांनी महापालिकेची फसवणुक केली असेल अशा लोकांवर पोलीस केस दाखल झाल्या पाहिजे व तशी कार्यवाही प्रशासनाने करावी.

**डॉ. आशा बिनवडे :** शहरात चांगल्या प्रतीचे दुध येते किंवा कसे शंका निर्माण झाल्याने काही दुध कंपन्यावर धाडी टाकण्यात आल्या होत्या २ महिने निघुन गेले.

अदयाप त्याचा अहवाल प्राप्त नाही. दोन कंपन्याचे दुध निकृष्ट होते. अशी माहिती आहे. सदरचे दुध निकृष्ट कोणत्या कंपनीचे होते. व निकृष्ट ठरविण्याचे निकष ग्राह्य धरले याचा खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** दिनांक २०.११.२००२ रोजीचा अहवाल प्राप्त झाला. त्यामध्ये योग्य प्रकारे डिटेल्स असे कळविलेले नाही हा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला दोन कंपन्याचे दूध निकृष्ट असल्याचे कळविले सदर कंपन्याचे दुध शहरात येवु नये या संदर्भाने जका अधिक्षक यांना पत्र देवुन कळविलेले आहे. संबंधीतांना नोटीस देवुन कार्यवाही करणार आहोत या संदर्भात आयुक्तांकडुन ही कार्यवाही होईल.

**डॉ. आशा बिनवडे :** सदरचे दुध निकृष्ट का होते त्याचा लॅब मागवावयास पाहिजे जी कार्यवाही करणार ती कशाच्या आधारे करणार आहे. ज्या कंपन्याचे दुध निकृष्ट होते ते तसे जनतेला अवाहन करुन अमुक:अमुक कंपनीचे दुध विकत घेण्यात येवु नये असे जाहिर प्रगटन देवुन का कळविण्यात आलेले नाही. ही जबाबदारी कुणाची होती. या दुध उत्पादक कंपनी मालकावर पोलीस केस दाखल करावी म्हणुन निर्णय घेतला होता पोलीस कसे करण्याचे अधिकार महापालिकेस नसेल तर अन्न आणि भेसळ या विभागाला तसे अधिकार असतील रत त्यांना तसे आदेशित करावे नसता महापालिकेतर्फे आवश्यक काय ती कार्यवाही करता येईल ती तात्काळ करण्यात यावी.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** दुध निकृष्ट असल्याचा रिपोर्ट येतो. तो कशामुळे निष्कृष्ट ठरविले याची मागणी अधिकारी यांनी का केलेली नाही आतापर्यंत का स्वस्थ का बसेल.

**डॉ. आशा बिनवडे :** दोन कंपन्याचे जे निकृष्ट आहे हे जनतेला कळवावयास पाहिजे होते. रिपोर्ट येवुन सुध्दा तेव्हापासुन काहीच कार्यवाही संबंधीत अधिकारी यांनी केलेली नाही.

**मा. सभापती :** दोन कंपन्याचे दूध निकृष्ट असल्याबाबतचा रिपोर्ट आलेला आहे त्या कंपनी मालकावर कायदेशीर जी कार्यवाही करता येईल ती करावी.

**श्री जयवंत ओक :** अडीच महिन्याचा कालावधी गेला या संबंधी कार्यवाही अली नाही लहान मुलांना अशा दूधापासुन आजार होवु शकतो हे दूध गरीब लोक पितात. ज्या कंपन्याचे दुध रिर्पोट नुसार निकृष्ट ठरविण्यात आले त्या संबंधी जाहीर प्रगटन देवुन तसे या शहरातील जनतेस कळवावयास पाहिजे होते. ती जबाबदारी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची होती, का कार्यवाही केली नाही. पल्स पोलिओ मोहिम जशी राबविण्यात येते. त्याप्रमाणे सुध्दा रिक्षा वगैरे फिरुन जनतेला माहिती होईल अशा पध्दतीने कार्यवाही करावयास पाहिजे होती.

**मा. सभापती :** या संबंधी सबंधीत कंपनी मालकावर १० दिवसाच्या आत कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री हिदायत अली :** सभागृहात महत्त्वाचा मुद्दा उपस्थि करण्यात येत आहे. मनपाच्या विविध कामासाठी ठेकेदाराकडुन ५% जादा अनामत रक्कम ठेव म्हणुन ठेवण्यात येते. त्यासाठी कोणताही नियम नाही. तेव्हा मनपाच्या कामासाठी ठेकेदाराकडुन घेण्यात येणारी ५% जादा अनामत रक्कम ठेव म्हणुन घेण्यात येऊ नये. त्यासाठी सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**मुख्य लेखाधिकारी :** ठेका पध्दतीने केलेल्या कामाची क्वॉलिटी चांगली येत नव्हती म्हणुन मनपाच्या विविध कामासाठी ठेकेदाराकडुन ५% ठेव म्हणुन जादा अनामत घेण्याचा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जी कामे ठेका पध्दीने केली जातात त्या कामाचे दर अंदाजपत्रकापेक्षा २०%, ३०%, ३५% कमी दराने निविदा भरल्या जातात. त्याच पध्दतीने मनपाची कामे चांगल्या प्रकारची व्हावी म्हणुन सभागृहाने चर्चा करुन ५% जादा अनामत रक्कम ठेव म्हणुन घेण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**श्री हिदायत अली :** काही कामासाठी ३०% कमी दराच्या निविदा आलेल्या आहेत त्यानुसार थर्डपार्टी इन्स्पेक्शन झाले. त्यानंतर आजही २५%,३०%, २२% कमी दराने कामे घेतलेली आहे गेल्या २० ते २५ वर्षापासुन कमी दराचे कामे चालत आलेले आहे. काही वेळा ५% जास्त दरामध्ये कामे झालेली आहेत.

**मा. सभापती :** दर्जा राखण्याचे करण्याचे काम संबंधीत अधिकाऱ्यांचे आहे. दर्जा चांगला नसेल तर संबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी. त्यांनाच जबाबदार धरावे.

**श्री हिदायत अली :** बी ॲण्ड सी प्रमाणे कामे होतात काय?

**मुख्य लेखाधिकारी :** गाईडलाईन म्हणुन आपण बी ॲण्ड सी चे नियम वापरतो तसे आदेश मनपास आलेले आहे. जास्त दरामध्ये निविदा गेली की एक नियम म्हणुन आपण वापरतो. त्यास काही सुधारणा करावयाच्या असतील तर सभागृह तसा निर्णय घेवु शकते.

**श्री हिदायत अली :** बऱ्याच कामाच्या संदर्भात थर्डपार्टी इन्स्पेक्शन करण्यात आले. लाखो रुपये इंजिनियरिंग कॉलेजला भरलेले आहे. आजपर्यंत कोणते काम खराब झाल्याचा रिपोर्ट आलेला आहे त्याचा खुलासा व्हावा.

**मुख्य लेखाधिकारी :** ८ ते १० कामाच्या अंडीशनला कामा बाबतीत रिपोर्ट आलेले होते. ते सर्व रिपोर्ट मा. आयुक्ताकडे आहे.

**श्री हिदायत अली :** थर्डपार्टी इन्स्पेक्शन कशासाठी ठेवण्यात येते. आपले अधिकारी सक्षम नाही काय? क्वॉलिटी बघण्याचे काम महापालिकेच्या अधिकाऱ्यांचे नाही का? टेक्नीकल विभाग कशासाठी आहे. जादा ५% अनामत रक्कम जी घेण्यात येते ती घेण्यात येऊ नये व कामाची क्वालिटी चांगली राहील यासाठी मनपातीलच अधिकाऱ्यांनी तपासणी केली पाहिजे. काम चांगल्या प्रतीचे व्हावे याची दक्षता घ्यावी.

**मा. सभापती :** अतिरिक्त शहर अभियंता श्री सोनवणे यांनी खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** थर्ड पार्टीच्या माध्यमातुन जे रिपोर्ट आलेले होते त्या अतिरिक्त कामाच्या बाबतीत सुचविलेले आहे काय चांगल्या प्रतीचे झालेले नाही असा रिपोर्ट नाही.

**मुख्य लेखाधिकारी :** मनपाच्या विविध कामासाठी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १५% कमी दरापेक्षा जास्त कमी दराने ज्या निविदा प्राप्त होतात अशा निविदा धारकाकडुन ५% जादा अनामत रक्कम ठेव म्हणुन घेण्यात येते. ब नियम ज्या कामाची निविदा अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १५% कमी दराची आहे. अशा निविदाधारकांना वरील नियम लागु नाही.

**श्री हिदायत अली :** थर्डपार्टी इन्स्पेक्शन आपण ठेवतो तर आपल्या टेक्नीकल विभागातील अधिकारी कशासाठी आहेत ते काय काम करतात. थर्ड पार्टी इन्स्पेक्शन

ठेवुन मनपाचा पैसा खर्च करायचा यात नुकसान होते. कामाची क्वालिटी ही मनपातील अधिकाऱ्यांनी सांभाळावी असे माझे मत आहे.

**मा. सभापती :** मनपातील इंजिनियर सक्षम नाही असेच म्हणणे योग्य होईल. अधिकाऱ्यांनी कामाची क्वॉलिटी चांगली ठेवण्याबाबत सक्षम राहिले पाहिजे. जबाबदारीने कामे करुन घेतली पाहिजे.

**श्री हिदायत अली :** महापालिकेत ४ जे. ई. आहे. एक उपअभियंता थर्डपाटी नेमण्याची आवश्यकता नाही. प्रथम कामाची संचिका टेक्नीकल विभागाकडेच गेली पाहिजे त्यानंतर इतर प्रोसीझर सुरु झाल्या पाहिजे. डिपॉझिट पुर्ण रद्द करण्यात यावे. त्याची गरज नाही.

**मा. सभापती :** सदर बाबतीत सभागृहात बरीच चर्चा झालेली आहे व सभागृहाची भावना लक्षात घेवुन महानगरपालिकेमध्ये सध्या विकास कामावर थर्ड पार्टी इन्स्पेक्शनच्या बाबतीत आता पर्यंत झालेला फायदा व कामांवर त्याचा सकारात्मक परिणाम झाला किंवा कसे ? तसेच थर्ड पार्टी इन्स्पेक्शन यापुढे विकास कामांवर सुरु ठेवावे किंवा कसे याचा सविस्तर अहवाल प्रस्तावासह प्रशासनाने सादर करावा. सभागृहाची भावना अशी झालेली आहे की, ॲडीशनल परफॉर्मन्स गॅरंटीच्या नावावर घेण्यात येत असलेली ५% (अतिरिक्त सुरक्षा अनामत) रक्कम कार्यादेश देण्यापुर्वी घेण्याची पध्दत बंद करण्यात यावी. यासाठी नेहमीच्या पध्दतीप्रमाणे २% सुरक्षा ठेव रक्कम कार्यादेश देण्यापुर्वी व ३% सुरक्षा ठेव रक्कम चालु देयकांमधुन घेण्यात यावी. अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम ५% घेण्याची पध्दत बंद करण्यात यावी. सदर बाबतीत महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम संहिता (पी. डब्ल्यु डी. मॅन्युअल) नुसार प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**श्री चंद्रशेखर जैस्वाल :** औरंगपुरा सुपर मार्केटजवळ ओपन स्पेस आहे. आतापर्यंत का ॲक्वायर करण्यात आलेला नाही.

**मा. सभापती :** स. सदस्यांना संबंधीत अधिकारी हयांनी ३ दिवसात या संबंधीची माहिती द्यावी.

**श्री कैसरखान :** टेक्नीकल अधिकारी कोणत्या दर्जाचे असतात. त्यांचे अधिकार काय माहिती द्यावी.

**मा. सभापती :** मा. आयुक्तांकडुन या संबंधीची माहिती घ्यावी लागेल. विषय क्र. ६० मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक २४/१०/२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६१ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६४५/३ दिनांक १२.०८.२००२ नुसार औरंगाबाद महनगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना दर वर्षी प्रत्येकी दोन गणवेश देण्यास मान्यता देण्यात आली असुन यापुर्वी स्थायी समिती ठराव क्र. ३५ दि. ४.७.२००२ नुसार महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना एका गणवेशाचे वाटप १५ ऑगस्ट २००२ पुर्वी करण्यात आले आहे.

सदरील गणवेश हे शासनाचे अंगिकृत असलेली संस्था मे. एम.एस.एस. आय.डी.सी. यांचेकडुन खरेदी करुन पुरविण्यात आले. प्राप्त गणवेशाचे नमुने हे मा. पदाधिकाऱ्यांचे हस्ते काढण्यात येवुन ते मे. केन्द्रीय कपास प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान मुंबई येथे पाठविण्यात आले होते.प्राप्त साहित्य हे विवरणानुसार असल्याचे अहवाल प्राप्त झाले. तसेच या कार्यालयास गणवेशाबाबत कोणत्यही प्रकारची तक्रार झालेली नाही.

महानगरपालिकेने शालेय गणवेश खरेदीसाठी राज्य स्तरावरील वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. ज्या निविदा प्राप्त झाल्या त्यातील दर हे अत्यंत स्पर्धात्मक आहे. तसेच पुरवठा करणारी एजन्सी ही शासनाचे अंगिकृत संस्था असल्याने व त्यांचे लेखी पत्रानुसार ते मान्य दरानुसार गणवेश देण्यास तयार आहे. त्यामुळे वरील बाबींचा विचार करता मा. सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश देण्याबाबत मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांना आदेश देण्यास मा. आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदरील कामासाठी महानगरपालिकेने रु. ३५.०० लाख एवढी तरतुद केली असुन त्यापैकी रु. १८,२२,९३८/- एवढा खर्च झालेला आहे. शिल्लक रु. १६,७७०६२/- एवढे असुन कमी पडणारी रक्कम रु. १.५० लक्ष एवढी रक्कम आकस्मिक खर्चातुन करण्यात येईल.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | वयोगट | दर (रु.) | नग | खर्च (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| अ | मुलांसाठी खाकी रंगाचे हाफ पँट | | | | |
| | १) बालवाडी | ५ ते ६ | १६.०० | २४५६ | ३९,२९६ |
| | २) इयत्ता १ ली | ६ ते ७ | १७.०० | २३६७ | ४०२३९ |
| | ३) इयत्ता २ री | ७ ते ८ | १८.५० | २०८३ | ३८५३६ |
| | ४) इयत्ता ३ री | ८ ते ९ | २०.५० | १९४७ | ३९९१४ |
| | ५) इयत्ता ४ थी | ९ ते १० | २२.०० | १८३६ | ४०३९२ |
| | ६) इयत्ता ५ वी | १० ते ११ | २३.०० | १६३१ | ३७५१३ |
| | मुलांसाठी खाकी रंगाची फुल पँट | | | | |
| | ७) इयत्ता ६ वी | ११ ते १२ | ६२.०० | १३८६ | ८५९३२ |
| | ८) इयत्ता ७ वी | १२ ते १४ | ६८.०० | १३०१ | ८८४६८ |
| ब) | मुलांसाठी पांढरा हाफ शर्ट | | | | |
| | १) बालवाडी | ५ ते ६ | १६.०० | २४५६ | ३९२९६ |
| | २) इयत्ता १ ली | ६ ते ७ | १७.०० | २३६७ | ४०२३९ |
| | ३) इयत्ता २ री | ७ ते ८ | १८.५० | २०८३ | ३८५३६ |
| | ४) इयत्ता ३ री | ८ ते ९ | २०.५० | १९४७ | ३९९१४ |
| | ५) इयत्ता ४ थी | ९ ते १० | २२.०० | १८३६ | ४०३९२ |
| | ६) इयत्ता ५ वी | १० ते ११ | २३.०० | १६३१ | ३७७१३ |
| | ७) इयत्ता ६ वी | ११ ते १२ | २६.०० | १३८६ | ३६०३६ |
| | ८) इयत्ता ७ वी | १२ ते १४ | २८.०० | १३०१ | ३६४२८ |
| क) | मुलींसाठी निळा स्कर्ट | | | | |
| | इयत्ता १ ली | ६ ते ७ | २५.०० | २१५० | ५३७५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | इयत्ता २ री | ७ ते ८ | २७.०० | २१११ | ५६९९७ |
| | इयत्ता ३ री | ८ ते ९ | २९.०० | २०८० | ६०३२० |
| ड) | मुलींसाठी पांढरे ब्लाऊज | | | | |
| | इयत्ता १ ली | ६ ते ७ | १६.०० | २१५० | ३४४०० |
| | इयत्ता २ री | ७ ते८ | १७.०० | २१११ | ३५८८७ |
| | इयत्ता ३ री | ८ ते ९ | १८.५० | २०८० | ३८४८० |
| इ) | मिनी फ्रॉक | ५ ते ८ | ५५.०० | २३९८ | १३१८९० |
| ई) | मुलींसाठी निळी सलवार | | | | |
| | इयत्ता ४ थी | ९ ते १० | ४५.०० | १९६२ | ८८२९० |
| | इयत्ता ५ वी | १० ते ११ | ५०.०० | १८६१ | ९३०५० |
| | इयत्ता ६ वी | ११ ते १२ | ५५.०० | १५९५ | ८७७२५ |
| | इयत्ता ७ वी | १२ ते १४ | ६०.०० | १२८७ | ७७२२० |
| फ) | मुलींसाठी पांढरा पंजाबी शर्ट | | | | |
| | इयत्ता ४ थी | ९ ते १० | ४५.०० | १९६२ | ८८२९० |
| | इयत्ता ५ वी | १० ते ११ | ५०.०० | १८६१ | ९३०५० |
| | इयत्ता ६ वी | ११ ते १२ | ५५.०० | १५९५ | ८७७२५ |
| | इयत्ता ७ वी | १२ ते १४ | ६०.०० | १२८७ | ७७२२० |
| | **एकुण** | | | | **१८,२२,९३८** |

उपरोक्त नुसार या योजनेअंतर्गत एकुण खर्च रु. १८,२२,९३८/- इतका येणार आहे. करीता प्रस्तावित खर्चास तसचे रुपये १.५० लक्ष एवढा आकस्मिक खर्च वळती करण्यास तथा मे. एस.एस.एस. आय.डी.सी. औरंगाबाद यांना आदेश देण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**डॉ. आशा बिनवडे :** १८ लक्ष रुपये खर्च करुन दुसरा गणवेश शालेय विद्यर्थ्यांना देण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. विनाशुल्क गणवेश विद्यार्थ्यांना देतो म्हणुन कसलेही द्यायचे का? प्रत्येक विद्यार्थ्यांना मापाचा गणवेश दिला गेला पाहिजे. माझ्या वार्डातील शाळेमध्ये आपण प्रत्यक्ष पाहणी केली. तर असे दिसुन येईल की. बऱ्याच मुलांना गणवेश लहान मोठे झालेले दिसुन येतात. जो कुणी शिवुन देतो ही जबाबदारी त्यांचेवर टाकली पाहिजे.

**मुख्य लेखाधिकारी :** प्रत्येक विद्यार्थ्यांचे माप घेवुन त्याप्रमाणे गणवेश देणे शक्य होणार नाही. खुप उशीर लागेल. ज्या पध्दतीने गणवेश दिले जातात ते शासनाचे जी. आर. प्रमाणे दिले जातात. स्टॅन्ड साईजचे माप घेवुन शिवण्यात येतात. उदा. पहिला वर्गातील विदयार्थी किती वर्षाचा असु शकेल वर्ग दुसऱ्यामध्ये किती वर्षाचा असु शकेल याचा अंदाज घेऊन गट तयार केला जातो. थोडया फार लहान मोठया प्रमाणात गणवेश होणारच आहे. पहिलीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना २० नंबर तर २ रीच्या वर्गात असणारा विद्यार्थी यांना

२२ नंबरचा असे गृहीत धरुनच तयार करण्यात येतात. गणवेश वाढवुन देवु शकतो. परंतु सर्वच विद्यार्थ्यांचे माप घेवुन तेवढा वेळ मिळणार नाही व वेळेवर गणवेश दिला जाणार नाही. कृपया सभागृहाने समजुन घ्यावे.

**डॉ. आशा बिनवडे :** शिक्षणाधिकारी यांचे कडुन सर्व माहिती घेवुन मापाचे गणवेश द्यावे. ज्यांचेकडुन घेतो त्यांनी १० व्यक्ती लावुन मापाचा ड्रेस शिलाई करुन दिला पाहिजे.

**मुख्य लेखाधिकारी :** या संबंधीची रिक्वॉयरमेंट शिक्षणाधिकारी यांचेकडुन घेतो. आजपर्यंत एकही तक्रार गणवेशाच्या बाबतीत आलेली नाही. शासन जे काही यावर खर्च करते तर त्या संबंधीची अभ्यासपुर्वक असे गट निर्माण केलेला आहे. त्या प्रमाणेच गणवेश शिलाई करुन घेतले जातात व वेळेवर दिले जाते.

**मा. सभापती :** आताच स. सदस्यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहे. या संदर्भात ज्या ज्या तक्रारी आलेल्या असतील त्याचे निवारण करुन शालेय विद्यार्थ्यांना २६ जानेवारी पुर्वी गणवेश कशारितीने वाटप केले जातील याची प्रशासनाने काळजी घ्यावी.

**श्रीमती पार्वती मानकापे :** माझ्या वार्डात शाळा नाही ज्या ज्या वार्डात मनपाची शाळा आहे अशा ठिकाणी गणवेश वाटप करण्यासाठी त्या त्या वार्डातील नगरसेवकांना बोलविण्यात यावे तसे आदेशित करावे.

**मा. सभापती :** ठिक आहे. स. सदस्यांनी सुचना केल्यानुसार गणवेश वाटपाच्या वेळी त्या त्या वार्डातील नगरसेवकांना बोलविण्यात यावे. प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रत्येकी दोन गणवेश देण्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार दुसरा गणवेश पुरविण्याकरीता ०४.०७.२००२ ठराव क्र. १५ अन्वये मान्यता दिलेल्या दिलेल्या दराने मे. एम. एस.एस.आय.डी.सी. यांचेकडुन खरेदी करण्यास्तव आदेश देण्यास त्याचप्रमाणे या कामासाठी असलेल्या शिल्लक तरतुद रु. १६,७७,०६२/- व कमी पडणारी रक्कम रु. १.५० लक्ष एवढी आकस्मिक खर्चातुन वळती करण्यास अशा एकुण रु. १८,२२,९३८/- च्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आण्णाभाऊ साठे विद्यार्थी वस्तीगृहाची इमारत समाज कल्याण विभागास सर्व साधारण सभेचा ठराव क्रमांक ५८८/६ दिनांक २४.०४.२००२ अन्वये भाडे तत्वावर देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरील इमारत समाजकल्याण विभागास विद्यार्थी वस्तीगृहासाठी भाडे तत्वावर देण्याची कार्यवाही करत असताना दिनांक १.११.२००२ मा. संचालक समाज कल्याण विभाग यांनी इमारतीची पाहणी केली. इमारती मध्ये किरकोळ दुरुस्ती करण्याचे सुचीत केले आहे. त्या अनुषंगाने किरकोळ दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित केले आहे. परुं वस्तीगृहासाठी खरेदी केलेले विविध साहित्य जसे की, गाद्या, उशा, लोकरी ब्लँकेट, चादर, सोलापुरी चादर, उश्यांचे कव्हर, पलंग, फायबर चेअर, स्टुल व टेबल क्लॉथ इत्यादी साहित्य ज्याची किमंत रु. ३,११,५९०/- आहे हे साहित्य घेण्याबाबत मा. संचालक सुचित केले की, सदरील साहित्य मागासवर्गीयांच्या

कल्याणासाठी राखीव ठेवलेल्या ५% निधीतुन खर्च केला असे दर्शवुन समाज कल्याण विभागासाठीच्या मुलांमुलींच्या वस्तीगृहासाठी निःशुल्क हस्तांतरीक करावे. असे चर्चेत व्यक्त केले आहे.

करीता वस्तीगृहासाठी खरेदी केलेली साहित्य किमंत रु. २,११,५९०/- ज्यामध्ये गादया, उश्या, लोकरी ब्लँकेट, चादर, सोलापुरी चादर, उश्यांचे कव्हर, पलंग, फायबर चेअर, स्टुल व टेबल क्लाथ इत्यादी साहित्य मागासर्वीयांच्या कल्याणासाठी राखीव ठेवलेल्या ५% निधीतुन खर्च केला असे दर्शवुन समाज कल्याण विभागासाठीच्या मुलांमुलींच्या निःशुल्क हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** निःशुल्क साहित्य देता येणार नाही. तशी प्रोवीजन नाही मा. आयुक्तांच्या दालनात बैठक झालेली होती. तेव्हा सदर वस्तीगृहातील साहित्य हे गरवारे मध्ये देता येईल. विविध स्पर्धा या गरवारे स्टेडियमवर होत आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल समाज कल्याण विभाग हे शासनाचे आहे. त्या विभागाचे अधिकारी आले होते. त्यांना सांगण्यात आलेले होते. सजेशन देवु शकले नाही.

**डॉ. आशा बिनवडे :** प्रस्ताव कसा आला महानगरपालिकेची कोटयावधीची इमारत भाडे तत्वावर देतो असे प्रस्ताव सभागृहात कसे येतात. महानगरपालिकेने वस्तीगृह बांधुन काय साध्य केले. का पैसा खर्च करण्यात आला.

**मुख्य लेखाधिकारी :** हा प्रस्ताव रद्द करावा. मागचे मिनीट्स वाचले तर वस्तीगृह भाडे तत्वावर दिलेले आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** वस्तीगृह भाडे तत्वावर दिलेले आहे. साहित्याची त्यांना आवश्यकता नाही. साहित्य देण्यात येवुन नये. जबाबदार अधिकारी असतांना प्रस्ताव योग्य रितीनेच सभागृहात आला पाहिजे.

**मा. सभापती :** सुधारीत प्रस्ताव सादर करावा.

**ठराव :**

सदर प्रकरणी सुधारीत प्रस्ताव सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६३ :**

(औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना अंमलबजावणी अहवाल)

औरंगाबाद महनगरपालिका विरुध्द दिंगबर रावळ (याचिका क्रमांक १९१०/२००२ व औरंगाबाद महानगरपालिका विरुध्द श्री गट्टाणी याचिका क्र. ५३१/२००२) दिनांक २२.०७.२००२ रोजी मा. उच्च न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आलेली होती. त्या संदर्भाने मा. न्यायालयाने आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना न्यायालयात उपस्थित राहण्याबाबत आदेशीत केले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद तसेच विशेष भुसंपदान अधिकारी सहाय्यक संचालक नगररचना हे उपस्थित होते. सुनावणीचे वेळी मा. न्यायालयाने सांगितले की, सन १९७५ पासुन आरक्षणातील जमिनी महानगरपालिका ताब्यात होत नाही. किंवा त्यांचा मोबदलाही देत नाही. त्यामुळे नागरीकांच्या जमिनी अडकुन पडत आहेत व सदरील मिळकतीच्या हक्काबाबत नागरीक वंचीत रहात आहेत. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेने सहा महिन्याच्या आत भुसंपादन अधिकारी यांचेकडे २/३ रक्कम जमा करावी. तसेच

औरंगाबाद शहरासाठी असलेली विकास योजना अंमलबजावणी कशी करणार आहेत. याबाबत महानगरपालिका आयुक्तांनी अंमलबजावणी आराखडा दोन महिन्याचे आत न्यायालयास सादर करावा.

उपरोक्त आदेशान्वये मा. आयुक्तांनी वेळोवळी संबंधीत अधिकारी, मुख्य लेखाधिकारी, सहाय्यक संचालक नगररचना शाखा औरंगाबाद तसेच संबंधीत विधीज्ञ यांचे बरोबर घेतलेल्या बैठका व सदरील बैठकानंतर दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे विकास योजना अंमलबजावणी अहवाल तयार करण्यात आलेल्या आहे. त्यानुसार सदर विकास योजना अंमलबजावणीचा अहवाल तयार करण्यात आलेला आहे. सबब औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना अंमलबजावणी अहवाल पुस्तक स्थायी समिती समोर सादर.

**संवाद :**

**श्री फुलारी नंदकुमार :** या प्रस्तावासंबंधीची माहिती इंग्रजी भाषेमध्ये दिलेली आहे. त्याचा मराठीमध्ये संवाद करुन त्याच्या प्रती देण्यात याव्यात त्यानंतर बैठक या विषयावर चर्चा करण्यासाठी आयोजित करावी.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे इंग्रजी भाषेचे मराठीतुन रुपांतर करुन स. सदस्यांना प्रती देण्यात याव्यात व येणाऱ्या बैठकीमध्ये प्रस्ताव सादर करावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मंजुर विकास योजना अंमलबजावणी अहवालच्या मराठी भाषांतरीत प्रती स. सदस्यांना पुरविण्यात याव्यात व हा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६४ :**

उपआयुक्त (म) यांचेकडुन स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वित्तिय वर्ष सन २००३-०४ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ मधील कलम ९९ अन्वये महापालिकेने दि. २०.०२.२००३ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन २००३-०४ या वित्तिय वर्षासाठी खालील प्रमाणे कर प्रस्तावित आहेत. खालील दर हे कर योग्य मुल्यावर आकारले जातील.

महापालिकेचे दर :

सन २००२ ते २००३ चे प्रचलित व सन २००३-०४ साठी प्रस्तावित सामान्य कर व इतर करांचे दर दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | कराचे नांव | सन २००२-०३ चे प्रचलित दर | | सन २००३-०४ साठी प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | करयोग्य मुल्य रु. | दर | करयोग्य मुल्य रु. | दर |
| १) | सामान्य कर | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००० ते १०००० | २४% | १००० ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | ३०% | २०००१ ते ५०००० | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | ३४% | ५०००१ ते १००००० | ३४% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १००००० च्या पुढे | ३६% | १००००० च्या पुढे | ३६% |
| २) | साफसफाई कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | |
| | | अ) निवासी वापर | ३% | अ) निवासी कर | ३% |
| | | ब) निवासेत्तर वापर | | निवासेत्तर वापर | |
| | | क) १) १ ते ५०००० | % | १) १ ते ५०००० | ८% |
| | | २) ५०००१ च्या पुढे | १०% | ५०००१ | १०% |
| ३) | वृक्ष कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | २% | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | २% |
| ४) | अग्नीशमन कर | --//-- | १.५% | --//-- | १.५% |
| ५) | मनपा शिक्षण कर | --//-- | २% | --//-- | २% |
| ६) | पथकर | --//-- | २% | --//-- | २% |
| ७) | जललाभ कर | --//-- | १.५% | --//-- | १.५% |
| ८) | जलनिःसारण लाभकर | --//-- | १.५% | --//-- | १.५% |

९) मोकळया जागेचा कर, कर योग्य मुल्यावर सामान्य कराच्या दराने.

१०) राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर, मोठया निवासी क्षेत्रावरील कर, शासन नियमाप्रमाणे व दराप्रमाणे, कर योग्य मुल्यांवर आकारण्यात येतील.

**मा. सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वित्तिय वर्ष सन २००३-०४ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराचे दर खालील प्रमाणे निश्चित करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | कराचे नांव | सन २००२-०३ चे प्रचलित दर | | सन २००३-०४ साठी प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | करयोग्य मुल्य रु. | दर | करयोग्य मुल्य रु. | दर |
| १) | सामान्य कर | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००० ते १०००० | २४% | १००० ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | ३०% | २०००१ ते ५०००० | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | २४% | ५०००१ ते १००००० | ३४% |
| | | १००००० च्या पुढे | ३६% | १००००० च्या पुढे | ३६% |
| २) | साफसफाई कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | अ) निवासी वापर | ३% | अ) निवासी कर | ३% |
| | | ब) निवासेत्तर वापर | | निवासेत्तर वापर | |
| | | क) १) १ ते ५०००० | % | १) १ ते ५०००० | ८% |
| | | २) ५०००१ च्या पुढे | १०% | ५०००१ | १०% |
| ३) | वृक्ष कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | २% | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | २% |
| ४) | अग्नीशमन कर | --//-- | १.५% | --//-- | १.५% |
| ५) | मनपा शिक्षण कर | --//-- | २% | --//-- | २% |
| ६) | पथकर | --//-- | २% | --//-- | २% |
| ७) | जललाभ कर | --//-- | १.५% | --//-- | १.५% |
| ८) | जलनिःसारण लाभकर | --//-- | १.५% | --//-- | १.५% |

९) मोकळया जागेचा कर, कर योग्य मुल्यावर सामान्य कराच्या दराने.

१०) राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर, मोठया निवासी क्षेत्रावरील कर, शासन नियमाप्रमाणे व दराप्रमाणे, कर योग्य मुल्यांवर आकारण्यात येतील.

वरील प्रमाणे कराचे दर निश्चित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५ :** (सभागृहात ऐनवेळी उपस्थित करण्यात आलेला मुद्दा)

विविध विकास कामासाठी ठेवण्यात येणाऱ्या अतिरिक्त सुरक्षा अनामत व थर्ड पार्टी इन्स्पेक्शन सबंधी निर्णय घेणे.

## चर्चा

**श्री किशोर शिंदे :** एक वर्ष झाले लाईटचे टेंडर काढले नाही. जेव्हा मागणी केल्यास मटेरीयल नाही असे विद्युत विभागाचे अधिकारी सांगतात.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी जो अक्षेप केलेला आहे. अधिकाऱ्यांनी खुलासा करावा ठराविक वार्डात लाईट दिले जातात असा काही प्रकार आहे का?

**उपअभियंता -१ (विद्युत) :** स. सदस्य श्री शिंदे जेव्हा जेव्हा आले तेव्हा त्यांना साहित्य दिलेले आहे. साहित्य खरेदी करण्याबाबत मंजुरी झालेली आहे. तात्काळच पुढील कार्यवाही होईल.

**कार्य. अभियंता (डि. पी. कुलकर्णी ) :** १० दिवसांच्या आत फायनल होईल. वर्क ऑर्डर काढल्या जातील.

**श्री नंदकुमार फुलारी :** महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या काही वाहन चालक व्यवस्थित गाडया चालवित नाही. अशा वाहन चालकांना ताकीद देण्यात यावी.

**मा. सभापती :** स. सदस्य श्री फुलारी यांनी सुचना केल्यानुसार संबंधीत अधिकारी यांनी जे वाहन धारक व्यवस्थित गाडया चालवित नसतील त्यांना तशी कडक ताकीद द्यावी.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सभागृहाची भावना लक्षात घेऊन महानगरपालिकेमध्ये सध्या विकास कामावर थर्ड पार्टी इन्स्पेक्शनच्या बाबतीत आता पर्यंत झालेला फायदा व कामांवर त्याचा सकारत्मक परिणाम झाला आहे किंवा कसे ? तसेच थर्ड पार्टी इन्स्पेक्शन यापुढे विकास कामांवर सुरु ठेवावे किंवा कसे याचा सविस्तर अहवाल प्रस्तावासह प्रशासनाने सादर करावा. सभागृहाची भावना अशी झालेली आहे की, ॲडीशनल परफॉर्मन्स गॅरंटीच्या नावावर ठेवण्यात येत असलेली ५% (अतिरिक्त सुरक्षा अनामत) रक्कम कार्यादेश देण्यापुर्वी घेण्याची पध्दत बंद करण्यात यावी. यासाठी नेहमीच्या पध्दतीप्रमाणे २% सुरक्षा ठेव रक्कम कार्यादेश देण्यापुर्वी व ३% सुरक्षा ठेव रक्कम चालु देयकांमधुन घेण्यात यावी. अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम ५% घेण्याची पध्दत बंद करण्यात यावी. सदर बाबतीत महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात असलेल्या व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहिता (पि.डब्ल्यु डी. मॅन्युअल) नुसार प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

या बरोबरच "जन गण मन " या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

मा. सभापती
स्थायी समिती, महानगरपालिका,
औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १५/०२/२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी २००३ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.४० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेला संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री देसरडा प्रशांत सुभाष
२. श्री मिर हिदायत अली
३. श्री शिंदे किशोर रावसाहेब
४. श्री शेख इलियास किरमानी
५. श्री औताडे रावसाहेब ममतु
६. श्री फुलारी नंदकुमार माधवराव
७. डॉ. आशा उत्तम बिनवडे
८. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
९. सो. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
१०. श्रीमती मानकापे पार्वती लहानु
११. श्री चंद्रशेखर जैस्वाल
१२. श्री कैसरखान बद्रोद्दीनखान
१३. श्री ठकूजी रामसिंग वाणी

**संवाद :**

**मा. सभापती :** जे अधिकारी अनुपस्थित आहेत त्याची सचिव यांनी नोंद घ्यावी.

**श्री फुलारी नंदकुमार :** अंतराळवीर स्व. कल्पना चावला यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**श्री मीर हिदायत अली :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे. सर्वांनी श्रध्दांजली उभे राहावे.
(याच वेळी स्व. कल्पना चावला यांना सभागृहातर्फे ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली)

**श्री देसरडा प्रशांत :** मागील बैठकीचे इतिवृत्त दिलेले नाही. सदर बैठकीत एक मुद्दा उपस्थित केलेला होता महापालिका व लाभधारक जो ७५%-२५% प्रपोजल बाबत कार्यवाही प्रशासन करणार होते व त्याचा अहवाल या बैठकीत म्हणजे आजच्या बैठकीत सादर करणार होते. अशा प्रकारच्या कामास किती परवानगी दिलेल्या आहे. त्यावेळचे अधिकारी यांनी असा खुलासा केला होता की तीन (०३) परवानगी दिलेल्या आहे. संबंधीत अधिकारी या महापालिकेत नविन आलेले आहे कदाचीत त्यांना माहित नसावे. परंतु आणखी एक परवानगी म्हणजे एकुण चार (०४) परवानग्या दिलेल्या आहे. ०४ क्रमांकाची जी परवानगी दिली ती अत्यंत आश्चर्यकारक आहे. अशा परवानग्या प्रशासन देत असेल तर लवकरच मनपास कुलूप लावण्याची वेळ येईल. सामान्य नागरिक परवानगी मागतात. तात्काळ दिली जात नाही. एखादयाने खुल्या

जागेचा टॅक्स भरलेला नसेल तर परवानगी नाकारण्यात येते. तसेच एम.एस.ई.बी. चा पोल असेल तर परवानगी देत नाही. तसेच एखाद्या प्रकरणाचा काही वाद चालु असेल तर परवानगी दिली जात नाही. २५% जे क्षेत्र महापालिकेस मिळणार आहे. दोन वर्षापासुन कार्यवाही चालु असुन अदयाप मिळालेले नाही. क्षेत्र कोणते देणार ती चर्चा होत असतांनाच चवथी परवानगी दिली त्यात स्पष्ट दिले की, खुल्या जागेच्या भुखंडाची भरणा पावती एक महिन्याच्या आत सादर करावी. याचा अर्थ महापालिकेस पैशाची आवश्यकता नाही. जो करारनामा करावयाचा तो एक महिन्याच्या नंतर करावा. विकास शुल्क जे असते ते सुध्दा भरलेले नाही. विदयुत खाबांवरुन तारा गेलेल्या असुन त्यास परवानगी देऊन टाकली त्या व्यक्तीने यानंतर तारा वगैरे नाही काढल्या तरी चालेल. असाच त्याचा अर्थ होतो. हा विषय सर्वसाधारण सभेसमोर जावयास पाहिजे होता. परंतु मा. आयुक्तांनीच त्यांचे अधिकारात मंजुर करुन परवानगी दिली. महानगरपालिकास सदर व्यक्तीकडुन ५० लक्ष ते १ कोटीची मालमत्ता घ्यायची तर त्याचा करारनामा नको का? महापालिकेला गरज नाही का? यापुर्वी तीन परवानगी दिल्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतरच दिलेल्या आहे ही एकच परवानगी सर्वसाधारण सभेच्या मंजुरी विना देण्यात आली. या परवानगीस स्थगिती देऊन चौकशी व्हावी व ज्या तीन विकास झालेल्या जागांचे हस्तांतर करणार होतो ते केलेले आहे का? केलेले असेल तर उद्‌घाटन केला आहे.

**मालमत्ता अधिकारी :** सदर चार प्रॉपर्टी पैकी एक प्रॉपर्टीचे हस्तांतर करण्यात आलेले आहे. उर्वरीत तीन प्रापॅर्टीचे कम्पलीशन प्रमाणपत्र नगररचना विभागाकडुन गेलेले नाही. त्यामुळे या विभागास हस्तांतर केलेले नाही.

**सहा. संचालक न. र. :** एक मिळकत महापालिकेकडे हस्तांतर झालेली आहे. त्यासाठी संबंधीताने मनपाकडे कम्प्लीशन सर्टिफिकेट मागविलेले आहे.१० दिवसापुर्वीच अर्ज दिला परंतु मागच्या वेळेस मुद्दा उपस्थित झाला की २५% विकास जागा हस्तांतर करण्याऐवजी २२% जागा दिली. त्याची चौकशी व पंचनामा करण्यासाठी पाठविले होते. माझ्या माहिती नुसार २५% जागा महापालिकेस हस्तांतर केलेली आहे. पुन्हा खात्री करुन घेणार आहे व कम्पलीशनची कार्यवाही २५% जागा महापालिकेस हस्तांतर केलेली आहे. पुन्हा खात्री करुन घेणार आहे व कम्प्लीशनची कार्यवाही करणार आहे.

**मा. सभापती :** एक महिन्यात एक जनरल स्थायी समिती सभा होते. तीन बैठकीपासुन तोच मुद्दा उपस्थित होतो प्रशासन कार्यवाही करीत नसेल तर योग्य नाही. पुन्हा पुन्हा अधिकारी तेच ते उत्तरे देतात.

**सहा. संचालक :** ०८ दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

**श्री देसरडा प्रशांत :** २२% जागा एका प्रकरणांत मिळाली त्यात ही काही क्युरी निघाली असे अधिकारी यांनी सांगीतले होते.

**सहा. संचालक न. र. :** २५% जागा हस्तांतर करावयास पाहिजे होती ती २२% केली अशी क्युरी होती. या चौकशीसाठी कम्प्लीशन रोखुन ठेवले होते.

**श्री देसरडा प्रशांत :** जवळपास दिड वर्षापासुन हा मुद्दा सभागृहात उपस्थित होत आहे. अधिकारी तेच ते उत्तर देतात. पुढील बैठकीत माहिती दिली जाईल. असे सांगितले जाते. यानंतर हा विषय या सभागृहात चर्चेला घ्यायचा की नाही विनाकारण कशासाठी वेळ घालवायचा अधिकारी सभागृहाची दिशाभुल

करतात महापालिकेचे या जागेमुळे उत्पन्न वाढणार आहे. जवळपास १ कोटी रुपयाची प्रापॅटी मिळणार आहे. यासाठी प्रशासनाने तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे. परंतु तसे होत नाही. अधिकाऱ्यांना कामे करायची नसेल तर तसे त्यांनी सांगावे.

**सहा. संचालक न. र. :** हस्तांतरणाचा मुद्दा होता त्यांनी जे दिले ते २५% होते त्यात ते २२% आहे. एकुण चार प्रापॅटीची कार्यवाही आहे. एका मालमत्तेचे हस्तांतरण केले उर्वरीत दोन प्रापॅटीची बाबतीत त्यांनी अनुक्रमे १०, १२ तारीख दिलेली होती. एक आठवडयाची मुदत दिली होती. पुन्हा त्यांना बोलविण्यात आले.

**मा. सभापती :** जागील ४-५ बैठकीपासुन या विषयावर चर्चा होत आहे. तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे. अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल.

**श्री मीर हिदायत अली :** यापुर्वी जागेचा विकास करण्यासाठी जागा दिलेल्या होत्या प्रत्येक बैठकीस एकच उत्तर दिले जाते. अधिकारी सभागृहाची दिशाभुल करतात. जे स. सदस्य यांनी चवथ्या प्रकरणाचा मुद्दा मांडला त्यांचे खऱ्या अर्थाने अभिनंदन केले पाहिजे एक हस्तांतरण केले दोन जागा हस्तांतर करण्याच्या बाकी आहे. का कार्यवाही होत नाही. इतर जागेचा संदर्भात अमुक कागदपत्र आवश्यक आहे. असे सांगितले जाते वेळ लागतो. काही बाबतीत जागेची परवानगी देण्याचे काम तात्काळ कसे होते. एका प्रकरणात परवानगी दयायची होती. बाजुच्या फ्लॅाट धारकाकडुन एन. रा. भरुन घेतला. असे करु शकतो का? मागील बैठकीत गारखेडयातील प्रकरणात परवानगी दयायची होती बाजुच्या प्लॉट धारकाकडुन एन. रा. भरुन घेतला असे करु शकतो का? मागील बैठकीत गारखेडयातील प्रकरणाबाबत माहिती विचारली आज होईल. आठवडा लागेल अशी उत्तरे अधिकारी देत आलेले आहे. दोन महिने झाले. अदयाप योग्य खुलासा सभागृहाला मिळाला नाही.

**श्री प्रशांत देसरडा :** वेळीच जागा हस्तांतर असती तर ०१ कोटी रु. भाडे आतापर्यंत झाले असते.

**डॉ. आशा बिनवडे :** २५%-७५% विकास झालेल्या संदर्भात बऱ्याच बैठकीपासुन चर्चा होत आहे. एक प्रकरणाच्या बाबतीत जे गारखेडा मालखरे ह्यांचे प्रकरणाच्या बाबतीत कार्यवाही केली आताच खुलासा केला. १० दिवसापुर्वी इमारतींचे कम्पलीशन प्रमाणपत्र मागविले परंतु गेल्या ५ वर्षापासुन जे ७५% जागेचे बांधकाम झाले त्याचा भोगवटा होत आहे. वापर होतो आहे. सर्व दुकाने तेथील विकुन झाली हे विना परवानगी शिवाय कसे करुन दिले आहे. याचा अर्थ बिल्डरांनी वाटेल तेव्हा कम्पलीशन सर्टीफिकेटसाठी यावे. वाटेल त्या जागेचा उपभोग घेणे. ज्या जागेचाला किमंत दर्जा नाही अशा जागा मनपास देणे कितपत योग्य आहे जो त्यांनी ४-५ वर्षापासुन जागेचा विना कम्पलीशन सर्टिफिकेट शिवाय उपभोग घेतला त्याबद्दल त्यांचेवर कुठलीच कार्यवाही झालेली नाही. एवढे मोठे नुकसान महापालिकेचे होत असतांना जागा देवुन महापालिकेचा फायदा काय होतो. तेव्हा करारनामा केला जातो ले आऊट मंजुर करतो त्यावेळेसच कोणती २५% मनपास आहोत हे निश्चित झाले पाहिजे. अशा पध्दतीने कार्यवाही केलील तरच महापालिकेचा फायदा आहे. नसता एवढी मोठी महापालिकेची यंत्रणा लावुन हे काम करणे योग्य नाही. महापालिकेचा यात फायदाच नाही. अशा जागा विकास करण्यासाठी देणे

बरोबर वाटत नाही. मनपाच्या हितासाठी देत नसुन बिल्डरांच्या फायदासाठी हे होत आहे. असेच म्हणणे योग्य होईल. अधिकारी गांभिर्यांने दखल घेत नाही. करारनामा काय आला सादर करीत नाही. आजच्या बैठकीत योग्य तो ठोस निर्णय अशा प्रकरणाच्या बाबतीत घ्यावा व ही चर्चा कायमची बंद करावी.

**श्री प्रशांत देसरडा :** जय टॉवर्सच्या मालकाने चार वेळेस पत्र देऊन महापालिकेची २५% जागा हस्तांतर करावी म्हणुन कळविले. का अदयाप हस्तांतर केलेली नाही.

**सहाय्यक संचालक नगररचना :** या संदर्भात मी अहवाल तयार करुन मा. आयुक्तांकडे सादर केला. जी २५% जागा मनपास हस्तांतरण होणार आहे. त्या प्रापॅर्टीचा नकाशा नाही किंवा कोणती जागा आहे याचा स्पष्ट उल्लेख होत नाही. विधी सल्लागार त्यांचे अभिप्रायासह मी माझा रिपोर्ट सादर केलेला आहे.

**श्री देसरडा प्रशांत :** परवानगी ज्या वेळेस दिली त्यावेळेस ड्रॉइंग पेपर तयार करुन घेतले असेल. त्यानुसार २५% जागा कोणती महापालिकेस मिळणार याचा रिर्पोट ठेवला असेलच. याचा अर्थ असा होत आहे की, परवानगी दिली तेव्हा ड्राईंग पेपर तयार केले नव्हते का? संचिका तयार नव्हती का? मनपाच्या विभागाची संचिका कोठे आहे. याचा खुलासा घ्यावा.

**मा. सभापती :** भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधकारक नाही का?

**सहा. संचालक न. र. :** भोगवटा प्रमाणपत्र घेणे बांधकारक आहे. तशा स्वरुपाने मी वैयक्तिक सर्व आर्किटेक्स लायन्सेस, इंजिनियर लायसेन्स सर्वेअर यांना नोटीस दिलेली आहे. व सन १९९५ पासुन आज पर्यंत त्यांनी ज्या ज्या ठिकाणी बांधकाम परवानगी घेतलेल्या आहे व ज्या ठिकाणी कम्पलीशन घेतलेले किंवा घेतलेले नाही, याची माहिती मागविलेली आहे. त्या अनुषंगाने काही आर्किटेक्टरने रिस्पॉनस दिला आहे. काहीनी उत्तरे दिलेली नाही. ही सर्व माहिती कम्प्लीशनच्या दृष्टीकोनातुन संकलीत करीत आहे. ज्यांनी कम्प्लीशन घेतलेले नसेल तर भोगवटा सुरु केलेला असेल तर अशा बिल्डर्सवर कार्यवाही करावी.

**डॉ. आशा बिनवडे :** पुर्ण प्रॉपर्टीचे कम्प्लीशन त्या बिल्डरांना घ्यावे लागणार नाही का? ७५% आश:जागेचेच कम्पलीशन सर्टिफिकेट देता येते का?

**मा. सभापती :** आताच उल्लेख केला की, संचिकेमध्ये नकाशा आढळुन येत नाही असे होत असेल तर यास जबाबदार कोण? जी २५% रक्कम आपल्याला मिळणार आहे. त्या जागेची संचिका प्रत्यक्ष जागेवर घेवुन गेलो असता ती जागा मिळणार होती. त्या जागेचा नकाशा संचिकेमध्ये नव्हता. जो करारनामा झाला तो क्षेत्राच्या हद्दीपर्यंत झाला. जे बेसमेंट मध्ये बांधकाम केले आहे ते हस्तांतरीत होणार आहे. वैधानिक दृष्टया काही प्रश्न निर्माण होऊ नये म्हणुन या जागेचा नकाशा पाहण्याचा प्रयत्न केला तर नकाशा संचिकेमध्ये नाही ही वस्तुस्थिती आहे.

**मा. सभापती :** नकाशा नाही तर दुसरा करावा लागणार आहे का? यास जबाबदार कोण?

**श्री देसरडा प्रशांत :** संबंधीत जे कुणी अधिकारी जबाबदार असतील त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही करावी. पोलीस गुन्हा नोंदवावा. मनपाचे हित लक्षात न घेता अधिकारी स्वत:च्या स्वार्थासाठी काही करतात हे योग्य नाही. जळगांव

नगरपरिषद भाडेतत्वावर चालते या मनपास असणाऱ्या मालमत्ता घेण्यास वेळ नाही.

**मा. सभापती :** आताच स. श्री देसरडा यांनी जय टावर्सच्या बाबतीत मुद्दाउपस्थित केला. महापालिकेस येणाऱ्या मिळकतीचा नकाशा संचिकेमधुन गायब झालेला आहे. तसा अधिकाऱ्यांनी खुलासा केला एक प्रकारची चोरी झालेली आहे म्हणुन प्रशासनास सुचना करण्यात येते की, आजच्या आज याबाबतीत एफ.आय.आर. दाखल करावा व जे बिल्डर्स भोगवटा प्रमाणपत्र घेत नाही वापरसुरु करतात अशांवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. अशांची यादी आहे का?

**सहा. संचालक न. र. :** अशा बिल्डर्सवर दंडात्मक कार्यवाही करावी लागेल. सर्व आर्किटेक्ट यांना नोटीस पाठविलेली आहे. काहींचा रिस्पॉन्स मिळाला काहींचा मिळत आहे. जे रिस्पॉन्स देत नसतील त्यांचेवर कार्यवाही करावी लागणार आहे.

**मा. सभापती :** जे आर्किटेक्ट रिस्पॉन्स देत नसतील त्यांचे रजिस्ट्रेशन रद्द करावे. जे रिस्पॉन्स देतील त्यांचेवर नियमाने कार्यवाही या प्रकरणात करावी. यादी तयार करावी जे रिस्पॉन्स देत नाही त्यांचे रजिस्ट्रेशन रद्द करावे. जो करारनामा केला जातो त्यास कोणती बाजु महापालिकेस देणार त्या बाबतीत माहिती ठेवली जात नाही का?

**सहा. संचालक न. र. :** या तीन जागेच्या प्रकरणात फ्लॉटमधुन २५% जागेवर इमारत बांधुन जागा दिलेली आहे. या बाबतीत जे टेक्नीकल ओपीनीयन जो पर्यंत होत नाही जे की जे झालेले बांधकाम योग्य पध्दतीने चांगल्या प्रीचे गुणवत्तेनुसार झालेले आहे का? २५% क्षेत्र जो देण्यात येतो ते दयायचे का? केवळ देतो म्हणुन कोणतेही क्षेत्र २५% हस्तांतर करणार नाही. आपल्या नियमानुसार झाले का? याची तपासणी म्हणुनच संचिका पाहिली असता नकाशा दिसुन आलेला नाही. माझ्यापुर्वी जे अधिकारी होते त्यांचे ही सबमिशन मध्ये तसे झालेले आहे. याची संपुर्ण छाननी केल्याशिवाय ती प्रापॅर्टी ॲक्सेप्ट करणार नाही.

**मा. सभापती :** दोन दिवसात सर्व तपासणी करुन अहवाल सादर करावा.

**श्री देसरडा प्रशांत :** जी परवानगी चार क्रमांकाची दिली त्यातही अशाच प्रकारे भविष्यात अडचण येऊ नये म्हणून करारनामा अगोदरच करुन कोणती जागा देणार आहे ते लेखी घ्यावे. म्हणुन जी परवानगी दिली ती रद्द करावी करारनामा करावा. मदनलाल बन्सीलाल अग्रवाल यांना परवाननी दिलेली आहे. कोणती जागा घेणार याचा करारनाम्यामध्ये उल्लेख करावा. एखाद्या सामान्य व्यक्तीची परवानगीसाठी संचिका असेल. टॅक्स भरणा करण्यासाठी चेक दिल्यास नगररचना विभाग स्विकारीत नाही. कॅश रक्कम भरावे. असे सांगण्यात येते. परंतु हया प्रकरणात ओपन जागेचा जो टॅक्स आहेत तो एक महिन्यानंतर भरुन नंतरही करारनामा केला तरी चालेल असे म्हणुन दिनांक १०/१०/२००२ रोजी परवानगी दिली सदर परवानगी रद्द करुन तसा स्पष्ट जागेच्या बाबत करारनामा करुन घ्यावा व त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता सुध्दा घेण्यात यावी.

**मा. सभापती :** सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली किंवा काय तपासुन घ्यावे.

**सहा. संचालक :** या सबंधीची संचिका अदयाप मी बघितलेली नाही. सचिंका बघुन अहवाल सादर करण्यात येईल.

**श्री देसरडा प्रशांत :** ज्या जागेवर विकास होतो वास्तु बदलते. अशा बदलास सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागते असे नियमास आहे. मला दुसऱ्याकडुन या प्रकरणाची माहिती मिळाली म्हणुन पत्र दिले इतर अदयाप मिळाले नाही.

**उपअभियंता (न.र.) :** सदर संचिका दुसऱ्या कामानिमित्त तांत्रिक कक्ष विभागात गेलेली आहे.

**मा. सभापती :** स. सदस्य पत्र देवुन माहिती मागविली. संचिका दुसऱ्या विभागात गेलीली आहे. विकास बांधकामास या जागेवर परवानगी देतांना तशी सर्वसाधारण सभेची मंजुर घेतली किंवा कसे याची तपासणी करुन प्र. मुख्य लेखापरिक्षक श्री खैरनार यांनी येत्या २४ तारखेच्या बैठकीत तसा अहवाल ठेवावा.

**श्री कैसरखान :** हायकोर्टाच्या निर्देशाप्रमाणे पार्कीगच्या जागा रिकाम्या करण्यात येत आहे. बांधकाम तोडले जात आहे. कोणत्या ठिकाणचे बांधकाम तोडले. कोणत्या भागातील बाकी आहे. अपना बाजार येथील तोडले का? २ महिने अदयाप अहवाल सादर झालेला नाही. दोन महिने झाले मी पत्र दिले अदयाप उत्तर मिळाले नाही. अपना बाजार येथे बांधकाम पाहण्यास आपले कर्मचारी गेले होते. बांधकाम पाडु दिले नाही. कर्मचारी परत आले.

**मा. सभापती :** स. स. श्री. कैसरखान यांनी पत्र दिले पार्कीगच्या जागेच्या संदर्भात त्यांना उत्तर दिले नाही. जे काही असेल सत्य परिस्थिती काय आहे. त्याप्रमाणे सदस्यांना पत्राचा खुलासा दयावा. स. सदस्यांचे पत्र थांबवुन ठेवणे व उत्तर न देणे चुकीचे आहे. अपना बाजार येथील दुकान तोडण्याची कार्यवाही झाली का? झाली नसेल तर जशी स. सदस्य नागरीक यांनी मागणी केली अशाच प्रकारच्या काही या पार्कीगच्या बाबतीत तक्रारी आहेत त्याची चौकशी करुन अहवाल प्रशासनाने सभागृहात ठेवावा. काही आढळुन आल्यास सबंधीतावर कार्यवाही होईल.

**श्री कैसरखान :** सी. टी.एस. नंबर सोडुन अपना बाजार इमारतीचे बांधकाम केलेले आहे. मा. जिल्हाधिकारी यांनी सुध्दा ही इमारत तोडण्याचे आदेश दिले. अद्याप कार्यवाही नाही. त्या प्रकरणाची सविस्तर माहिती मागविण्यात यावी.

**श्री नंदकुमार फुलारी :** इतिवृत्तच मिळालेले नाही का देण्यात आलेले नाही.

**मा. सभापती :** माहिती घेतलेली आहे. इतिवृत्त पुढील बैठकीच्या वेळेस दिले जाईल पुन्हा २४ तारखेपर्यंत बैठक घेणार आहोत.

**विषय क्र. ६६ :**

नारेगांव ते ब्रिजवाडी पर्यंत १५० मी.मी. व्यासाची क्लास-१५ ची सिमेंट जलवाहिनी अस्तित्वात आहे. त्यावरुन टप्प्याटप्प्याने ब्रिजवाडी गावास दोन लिटर्सचे जलकुंभ आहे. पाच वर्षापुवी तेथील विंधन विहीरीवरुन जलकुंभ भरुन पाणी पुरवठा करण्यात येत होता. परंतु विधंन विहीरीचे पाणी दुषित झाल्याने जलकुंभ भरणे बंद आहे. करीता एन-५ पंपहाऊसवरुन ब्रिजवाडी जलकुंभ भरण्यासाठी नारेगावं ते ब्रिजवाडी पर्यंत १५० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे.

करीता नारेगांव ते ब्रिजवाडी पर्यन्त १५० मीमी व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याचे रक्कम रु. ११,३६,०००/- चे तयार करण्या आले असुन सदर अंदाजपत्रक जीवन प्राधीरकण यांच्या सन २०००-०१ च्या दरसुचीनुसार करण्यात आलेले आहे. सदरील कामावर होणारा खर्च हा भांडवली कामे पाणीपुरवठा सन २००२-०३ या आर्थीक वर्षाच्या लेखाशिर्षकातील तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची

मंजुरी झालेली आहे. तरी नारेगांव ते ब्रिजवाडी जलकुंभापर्यंत १५० मी.मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ११,३६,०००/- चा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगांव ते ब्रिजवाडीपर्यंत १५० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ११,३६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७ :**

एन-११ हरसिध्दी सोसायटी मधील जलकुंभावरुन वितरण व्यवस्था करण्यासाठी टप्पा क्र. १ चे अंदाजपत्रक रक्कम रु. ११,४३,०००/- चे तयार करण्यात आलेले होते. सदरील अंदाजपत्रकास ठराव क्र. ५४ दिनांक २०.१०.२००२ अन्वये मा. स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानुसार निविदा मागविल्या असता विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण ८ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कन्सट्रक्शन | ११.८९ % | अ. प. दरापेक्षा कमी दराने |
| २. | रास चंद्रपाल | १०.९९९ % | अ. प. दरापेक्षा कमी दराने |
| ३. | श्री मन्नानखान | ०५.९० % | अ. प. दरापेक्षा कमी दराने |
| ४. | श्री व्हि. आर. महाजन | ०३.७८९ % | अ. प. दरापेक्षा कमी दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदामध्ये सर्वात कमी दराची निविदा मे. आदिनाथ कन्सट्रक्शन यांची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८९% कमी दराची आहे. तरी सदरील कामासाठी मे. आदीनाथ कन्सट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८९% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी व विचारार्थ सादर.

**मा. सभापती :** सर्वानुमते हया प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,, एन-११ हरसिध्दी सोसायटीमधील जलकुंभावरुन वितरण व्यवस्था करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८९ % कमी दराची मे. आदीनाथ कन्सट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र. ३१ येथे नविन उदयान विकसीत करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. १४,४२,५००/- ला स्थायी समितीमध्ये विषय क्र. ५५ दिनांक २४.१०.२००२ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

सादर कामाकरीता निविदा सुचना जा. क्र. मनपा/लेखा/नि/५२/२००२ दि. १८.११.२००२ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता एकुण २२ निविदा

विक्री झाल्या व त्यापैकी एकूण ०४ निविदा दरभरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री शे. मसुद | ०.१०% कमी दराने |
| २. | श्री कुलवंत सिंग | ३% जास्त दराने |
| ३. | श्री एस. एम. सज्जाद | ४% जास्त दराने |
| ४. | श्री एस. रा. नवाब | ८% जास्त दराने |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री शे. मसुद यांची निविदा असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. २.१.२००३ रोजी मान्यता दिलेली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. ३१ येथे नविन उदयान विकसित करण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री शेख मसुद यांची निविदा सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९ :**

शहर अभियंता यानी प्रस्ताव सादर केला की, मो. सादत नगर (स्लम) येथे डांबरीकरण करणे या कामाकरीता रु. १४,९९,१३२ चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम दरसुची सन २००१-०२ नुसार तयार करण्यात आले असुन या कामास मा. आयुक्त यांनी दिनांक १४.०१.२००३ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदरील कामाचा खर्च सन २००२-२००३ "स्लम नविन डांबरी रस्ते" या लेखाशिर्षकातुन करण्यात येईल.

करीता अ. प. रु. १४,९९,१३२/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. सादत नगर (स्लम) येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेलया रक्कम रु. १४,९९,१३२/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**विषय क्र. ७० :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सी.टी. आर. मॅन्युफॅक्चरींग लि. एम.आय.डी.सी. चिकलठाणा, औरंगाबाद यांच्या मागणीनुसार कंपनीसाठी आयात मालावर जकात कर भरणा करणेसाठी चालु खाते उघडण्याची परवानगी मागीतली आहे.

औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम १९८४ चे कलम २५ नुसार चालु खातेची सवलत देण्याची तरतुद आहे. अशा प्रकारीच सवलत दैनिक लोकमतचे पृथ्वी प्रकाशन व मे. सिल्वर लाईट इंडस्ट्रिज औरंगाबाद यांना दिलेली आहे.

सी.टी.आर. कंपनीची मासिक उलाढाल १० लाख इतकी आहे. त्यावर ०४% दराने जकात ४०,०००.०० होते. ही रक्कम वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे असल्याने खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन चालु खातेची परवानगी देण्यात येईल.

१. सदर कंपनीकडुन रु. १,००,०००.०० बिनाव्याजी ठेवणे.

२. संबधीतानी त्यांच्या कंपनीस आयात मालाचे विवरण पत्र दर महिण्याच्या ०५ तारखेच्या आत जकात विभागास सादर करुन त्यावर होणारे जकात भरणे बंधकारक राहील.

३. आवश्यकता भासेल त्यावेळी आयात माला संबंधीचे कागदपत्रे व माहिती अभिलेख जकात अधिकारी यांना तपासणीसाठी देणे बंधकारक राहील.

४. आयात मालाची जकात हिशोब केल्यानंतर महापालिकेस देयय आढळुन आलेल्या कोणत्याही रक्कमेबाबत ती भरली न गेल्यास तसेच अनामत ठेव अपुरी असल्यास तर मालाची अटकावणी करुन किंवा मालमत्तेची विक्री करुन जकात कर वसुल करण्यात येईल.

५. जकात नियम १९८४ चे कलम १९ चा चालु खात्याचा समावेश होणार नाही.

६. संबंधीत कंपनीने मा. उच्च न्यायालयात "प्रोटेशोमिटर " या मालाच्या निर्याती संदर्भात याचिका दाखल केली आहे. सदर प्रकरणात अंतिम निर्णय झालेला नाही. त्यामुळे "प्रोटेशोमीटर" हा माल जकात चालु खाते ह्या सवलतीत अंतर्भाव होणार अनाही. वरील अटी शर्तीचा भंग झाल्याचे जकात अधिकाऱ्यांचे निर्दशनास आल्यास अनामत जप्त  करुन चालु खाते परवानगी बंद करण्यास येईल व कायदेशीर कार्यवाही होईल.

वरील प्रमाणे संबंधीत कंपनी यांना अटी व शर्ती घालुन चालु खाते उघडण्याची परवानगी देणे बाबत प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री फुलारी नंदकुमार :** सी.टी.आर. नावाची कंपनी आहे त्यांचे मागणीनुसार कंपनीसाठी आयात मालावर जकात भरण्यासाठी चालु खाते उघडण्यासाठी परवानगी नियमत क्र . १९८४ चे कलम १५ नुसार मागितलेली आहे. १० लक्ष प्रत्यक्ष उलाढाल दाखविण्यात आली निश्चित किती होते माहिती दिली नाही. या कंपनीने किती तरी माल त्यापुर्वी नाक्यावरुन चोरुन आणलेला असेल. त्यांचे साठी अशी का म्हणुन सोय करायची. अशा किती कंपन्यांना यापुर्वी परवानगी दिलेली आहे. खुलासा दयावा. विना व्याजी १ लक्ष कशासाठी ठेवणार आहे.

**श्री देसरडा प्रशांत :** सदर कंपनी मासिक उलाढाल जास्त असेल व जकात १ लक्ष पेक्षा जास्त येत असेल व सदर कंपनी १० लक्ष रुपयाच्या व उत्पन्न दाखविण्यास त्यांना अडचण असेल तर १ लक्ष ऐवजी ५ लक्ष करावे नसता ही प्रथा पाडु नये भविष्यात सर्वच कंपनी मालक अर्ज करतील त्यांना अशाच परवानगी देणार का? हे चुकीचे होईल. नियमात तरतुद आहे का? यात मनपाचा फायदा असेल तर करण्यास हरकत नाही. १० लक्षची उलाढाल आहे हे

कशावरुन प्रशासनाने बघीतले का? पुर्ण तपासणी करावी नंतरच निर्णय घ्यावे.

**उपआयुक्त (म.) :** सदर कंपनीने जकात भरण्यासाठी चालु खाते उघडण्यासाठी १ लक्ष रु. भरुन परवानगीची मागणी दि. १७.०१.२००२ च्या प्रस्तावान्वये केलेली होती. सन २००० ते २००१ या कालावधीत सदर कंपनीने जवळपास १ लक्ष रुपये जकात भरलेला आहे. सन २००१-२००२ या कालावधीत सुमारे ८ लक्ष जकात भरलेला आहे. कंपनीने मागणी केली की, असे चालु खाते उघडण्यास परवानगी दिल्यास प्रत्येक महिन्याच्या जकात भरणा करण्यात येईल. कलम २५ नुसार असे चालु खाते उघडण्यास परवानगी देण्याचे अधिकार मनपास आहे. स. सदस्यांनी शंका निर्माण केल्यानुसार असे चालु खाते उघडुन जकात चोरी होण्याची सभांवणा निर्माण होऊ शकते किंवा हे पडताळुन पहावे लागेल व त्यानुसार सभागृहासमोर माहिति ठेवली जाईल.

**मा. सभापती :** या प्रस्तावासंबधी मनपाच्या हिताच्या दृष्टीने उपआयुक्त (म) तसेच मुख्य लेखाधिकारी यांनी तपासणी करुन पुन्हा हा प्रस्ताव सादर करावा. तो पर्यंत स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सदर प्रस्तावासंबधी उपआयुक्त (म) तसेच मुख्य लेखाधिकारी यांनी तपासणी करुन सुधारीत प्रस्ताव सादर करावा. तो पर्यंत सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ७१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. शहाबाजार येथील व्यायाम शाळा आमदार निधीतुन बाधंण्यात आली असुन सदरील व्यायाम शाळा लोकमान्य शिक्षक प्रसारक मंडळास भाडे तत्वावर देण्यासाठी भाडे समितीने ठरविलेले भाडे दरमहा रु. ५०/- प्रती चौ.मी. असुन सदरील व्यायाम शाळेचे बांधीव क्षेत्रफळ ५४.३७ चौ.मी. आहे. त्यानुसार सदरील व्यायाम शाळेचे दरमहा रु. २७२०/- भाडे ठरविण्यात आलेले आहे.

करीता लोकमान्य शिक्षक प्रसारक मंडळास मो. शहाबाजार येथील व्यायाम शाळा दरमहा रु. २७२०/- प्रथम पाच वर्षासाठी मनपाचे अटी शर्तीस अधिन राहुन देण्यासाठी स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. आशा बिनवडे :** व्यायाम शाळेचा हा विषय असुन भाडे ठरविण्यात आलेले आहे. माझ्या वार्डात सुध्दा एक व्यायाम शाळा व भाजी मंडईचे इमारत बांधुन आहे. सदर इमारत ५ वर्षापासुन आहे. वारंवार या सभागृहात मी त्या इमारतीच्या संदर्भात चर्चा करते. त्या इमारतीत एकुण २५ गाळे बांधुन आहेत ते भाडयाने देण्यासाठी ६ वेळेस ॲक्शन झाले ते कुणीही घेण्यास तयार नाही म्हणुन तसेच पडुन आहे. अशा कितीतरी मालमत्ता आहे. की लाखो रुपये खर्च केले परंतु त्या माध्यमातुन मनपास काहीही उत्पन्न येत नाही. नियमानुसार प्रत्येक वेळी ॲक्शन करुन वेळ वाया जातो. योग्य तो वेगळा निर्णय घेतला तर योग्य होईल. तसेच एक व्यायाम शाळा गेल्या ४ वर्षापासुन बांधलेली आहे. जे की, आतपार्यंत कुणी मागणी केलेली नाही. नुकतेच एका संस्थेने भाडेतत्वावर ही व्यायाम शाळा मागणी केलेली आहे.

परंतु जे भाडे आकारले ते जास्त असुन घेणारांना परवडणारे नाही. मधला मार्ग म्हणुन भाडे कमी करावे. व जे नियम आहे. त्यातील अनावश्यक ते अटी शिथील करावे व सदर गाळे व्यायाम शाळा देण्यात याव्यात मनपाचे उत्पन्न वाढेल. या संदर्भात मी मागील अर्थसंकल्पाच्या बैठकीत मुद्दा उपस्थित केला त्यावर त्यावर मुख्य लेखाधिकारी यांनी असा खुलासा केला की, ठिक आहे. फिक्स डिपॉझिट देवुन भाडे निश्चित कार्यवाही होईल परंतु वर्ष झाले. अदयाप कार्यवाही नाही. काहीच न मिळण्यापेक्षा ४०००/- रु. अपेक्षित असेल तर किमान १५००-२००० मिळु शकतील.

**श्री देसरडा प्रशांत :** अशा इमारती बांधुन तयार आहेत. भाडे समिती शासन रेडीरेक्नर नुसार दर ठरविले. परंतु जे जनतेला न परवडणार आहे. म्हणुन शासनाने जे दर आहे ते कमी करता येत असेल तर त्यानुसार कार्यवाही करावी. जसे सादीया मार्केट, कैलास नगर, येथे ८ दुकान आहे. ४ विक्री झाल्या. उर्वरीत ४ दुकान तशाच आहे. तसेच तरुण भारत प्रेस जवळ आनंद गाडे मार्केट आहे. ३० दुकाने असुन तशीच पडुन आहे. याबाबतीत मार्ग काढुन ती दुकाने भाडयाने द्यावे. मनपास उत्पन्न होईल.

**डॉ. आशा बिनवडे :** अशा ज्या मालमत्ता आहे त्या कमर्शियल भागात नाही. म्हणुन घेण्यास कुणी पुढे येत नाही. लोकेशन असे आहे की, घेणाऱ्यांना परवडणारे नाही व आज बांधुन पडलेल्या असुन शुन्य उत्पन्न आहे. काही तरी उत्पन्न त्यापासुन मिळेल हा दृष्टीकोन समोर ठेवुन तडजोड केल्यास कार्यवाही होवु शकेल शहरात अशा बऱ्याच ठिकाणी मालमत्ता बांधुन आहे. त्यांचा दुरुपयोग होतो आहे.

**श्री हिदायत अली :** या महानगरपालिकेने व्यायाम शाळा व सभागृह इतके बांधलेले आहे की, देखभाल दुरुस्तीसाठी बजेट नाही म्हणुन ज्या व्यायाम शाळा आहेत त्या भाडयाने द्याव्यात ज्यांना दिली जाईल ते लाईट बिल व देखभाल दुरुस्ती करतील. मनपास उत्पन्न सुध्दा येईल. काही इमारतीत लोक घर म्हणुन वापर करु लागले तर काही ठिकाणी लोक पत्ते खेळतात काही मालमत्तेचे पत्रे तर काहींचे खिडक्या/दरवाजे गायब झालेल्या आहे. यात मनपाचे नुकसान होत आहे. भाडे ठरवुन दिले तर १ कोटी उसन येवु शकेल.

**श्री देसरडा प्रशांत :** एखादा भाजी विक्रेता आहे तो एका गाळयाचे २०००/- भाडेदर महा भरु शकणार नाही जे की, त्यांना आज ही रस्त्यावर भाजी विकुन उत्पन्न मिळते. ५००-१०००/- रु. भाडे केल्यास जनता सुध्दा विचार करेल व भाडयाने दुकाने घेतील.

**श्री हिदायत अली :** मंजुरपुरा भागात ५ वर्षापासुन ६ दुकाने झाली अदयाप दिलेले नाही. मनपास उत्पन्न नाही दराच्या तफावतीमुळे कोणीही घेण्यास तयार नाही.

**श्री फुलारी नंदकुमार :** या महानगरपालिकेने आमदार/खासदार निधीतुन बऱ्याच इमारती बांधलेल्या आहे. उत्पन्न काही मिळत नाही. म्हणुन आपण सदर प्रतिनिधीला एक पत्रच देवुन टाकावे. की आपला निधी या मनपात वापरण्यात येवु नये. लोकप्रतिनिधी यांचा निधी सुध्दा जनतेचा निधी आहे त्याचा गैरवापर होत असेल तर योग्य नाही.

**मा. सभापती :** हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. हे सभागृह भाडे समितीला अशी सुचना करते की, जे भाडयाचे दर आहे. त्यानुसार काय कार्यवाही करता येईल. व ज्या इमारती बांधुन आहेत त्यापासुन उत्पन्न जास्तीत जास्त कसे

मिळवीता येईल. या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेवुन या समितीने अहवाल सभागृहास द्यावा. आताच प्रस्ताव मंजुर केला या शाळे व्यतिरिक्त आणखी व्यायामशाळा असेल ग्रंथालय असेल त्या संबधी जाहीर प्रगटन काढुन कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहाबाजार येथील आमदार निधीतुन बांधण्यात आलेली व्यायाम शाळा भाडे समितीने ठरविलेले भाडे दरमहा रु. ५०/- प्रती. चौ.मी. प्रमाणे टाकुन र. रु. २७५०/- प्रतिमहा या दराने लोकमान्य टिळक शिक्षण प्रसारक मंडळास भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. तसेच निविदामध्ये १ वर्षाचे भाडे आगाऊ घेण्याचे मान्य केले आहे. त्या ऐवजी प्रत्येक तीन महिन्याला आगाऊ भाडे घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२ :**

(दिनांक १३ जाने. ०३ च्या सभेतील विषय क्र. ६३ पुढील सभेत ठेवण्याचा निर्णय झाल्यानुसार औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना - अंमलबजावणी अहवाल)

औरंगाबाद महानगरपालिका विरुध्द दिंगबर रावळ (याचिका क्रमांक १९१०/२००२) व औरंगाबाद महानगरपालिका विरुध्द श्री गटटानी (याचिका क्रमांक ५३१/२००२) संदर्भाने दिनांक २२/०७/२००२ रोजी मा. उच्च न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आलेली होती. त्या संदर्भाने मा. न्यायालयाने आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद व जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना न्यायालयात उपस्थित राहण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी मा. आयुक्त, महानगरपालिका औंरगाबाद मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद तसेच विशेष भुसंपादन अधिकारी सहाय्यक संचालक नगररचना हे उपस्थित होते. सुनावणीचे वेळी मा. न्यायालयाने सांगितले की, सन १९७५ पासुन आरक्षणातील जमिनी महानगरपालिका ताब्यात होत नाही. किंवा त्यांचा मोबदलाही देत नाही. त्यामुळे नागरीकांच्या जमीनी अडकुन पडत आहे. व सदरील मिळकतीच्या हक्काबाबत नागरीक वंचित राहत आहेत. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेने सहा महिन्याच्या आत भुसंपादान अधिकारी यांचेकडे २/३ रक्कम जमा करावी. तसेच औरंगाबाद शहरासाठी असलेली विकास योजना अंमलबजावणी कशी करणार आहेत. याबाबत महानगरपालिका आयुक्तांनी अंमलबजावणी आराखडा दोन महिन्याचे आत न्यायालयास सादर करावा.

उपरोक्त आदेशान्वये मा. आयुक्तांनी वेळोवेळी संबंधीत अधिकारी मुख्यलेखाधिकारी, सहाय्यक संचालक नगररचना शाखा औरंगाबाद तसेच संबधीत विधीज्ञ यांचे बरोबर घेतलेल्या बैठका व सदरील बैठकीनंतर दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे विकास योजना अंमलबजावणी अहवाल तयार करण्यात आला आहे. सबब औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना अंमलबजावणी अहवाल स्थायी समिती समोर सादर.

**संवाद :**

**श्री देसरडा प्रशांत :** रंगारगल्लीचा रस्ता रुंद करायचा व सबंधीतास पेमेन्ट सुध्दा केलेले आहे. ७५% लोकांना ४-५ कोटी रुपये दिले याच सारखेच दोन -तीन मालक यांना मनपा पेमेन्ट करीत नाही. या विषयाला अनुसरुन दुसऱ्या विषयावर बोलत आहेत. एका मालमत्तेमुळे रस्ता होणार नसेल तर सर्वच

भुसंपदानाची कार्यवाही झाली पाहिजे. ७५% लोकांना देणार २५% लोकांमुळे रस्ता होत नसेल तर ७५% पेमेन्ट करुन अर्थ नाही.

**मा. सभापती :** सबंधीत अधिकारी यांनी खुलासा दयावा. आजची सभा १० मिनीटांसाठी तहकुब करण्यात येते.

(वेळ दुपारी १.१५ वा. सभा सुरु १.२५)

**श्री फुलारी नंदकुमार :** बांधकाम परवानगी देतात अकृषीक परवानगी एन.रा. ऑर्डर आवश्यक आहे का? एन.रा. ऑर्डर शिवाय बांधकाम परवानगी देण्यात यावी. जेणे करुन मनपाचे उत्पन्न बुडीत होणार नाही. एन. रा. ची परवानगी तात्काळ मिळत नसल्याने अनधिकृत बांधकाम होत आहे.

**श्री किशोर शिंदे :** एन. रा. कोणी मागावावयास पाहिजे. खुलासा दयावा.

**सहाय्यक संचालक नगररचना :** बांधकाम परवानगीसाठी जेव्हा प्रस्ताव दाखल होतो त्यासोबत एन.रा. ऑर्डर असणे आवश्यक आहे. एन. रा. ची आर्डर असणे आवश्यक आहे. एन. रा. आर्डर नसल्यामुळे एक खिडकीद्वारे असे अपुर्ण प्रस्ताव स्विकारत नाही. एन. रा. चे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहे. जो पर्यंत तेथे अकृषी जागा म्हणुन होत नाही तो पर्यंत तेथे अकृषी म्हणुन वापरण्याची परवानगी देत नाही. एन. रा. साठी लागणाऱ्या विलंबाबाबत मा. जिल्हाधिकारी यांचेकडे झालेल्या बैठकीत हा विषय चर्चेला गेला होता. येणाऱ्या अडचणी सुध्दा कळविलेल्या आहे. ज्यांचे अर्ज आले त्यासंबधी नियम क्र. ४४ नुसार एन. रा. ऑर्डर आवश्यक जेथे बांधकामाची मागणी असते. व त्यानुसार सेक्शन ४७ (ब) नुसार आदेशाची मागणी करीत असतो. एन.रा. साठी वेळ लागतो. अशा तक्रारी आहे. बऱ्याच लोकांची मागणी अशी आहे की, एन.रा. ऑर्डरचा मुद्दा तुर्त बाजुला ठेवुन आमचे बांधकामाचे प्रस्ताव स्विकारावे कालांतराने हे करता येईल. परंतु सध्या तर एन. ची ऑर्डर नसल्यास तसे प्रस्ताव आपण स्विकारत नाही. बांधकाम परवानगीचा अर्ज दाखल झाल्यापासुन ६० दिवसांच्या आत परवानगी देणे आवश्यक आहे.

**श्री फुलारी नंदकुमार :** कोणकोणते कागदपत्र आवश्यक आहे. त्याचा खुलासा द्यावा.

**सहा. संचालक न. र. :** एम. आर. टी. पी. कायद्यानुसार सर्वच कागदपत्राची आवश्यकता आहे असे स्पष्ट म्हटलेले नाही. ज्या कागदपत्राची आवश्यकता आहे त्यापैकी एन. रा. हे एक महत्त्वाचे कागदपत्र असणे आवश्यक आहे. ॲक्टमध्ये प्रत्येक बांबीचा स्पेसिफिक अशी रिक्वॉयरमेंट नाही. परवानगी मागणी होते म्हणजे आकृषी वापराची परवानगी मागणी करीत आहे.

**श्री हिदायत अली :** एन. रा. ची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत होते. कार्यवाही होत नाही म्हणुन महापालिकेचे नुकसान का म्हणुन करायचे. अनेक संचिका परवानगीसाठी पडुन आहे. ज्यांनी दाखल केल्या त्यांची बांधकाम चालु आहे. केवळ एन. रा. मुळे मनपाचे नुकसान होत असेल तर योग्य नाही. योग्य निर्णय घ्यावा. कार्यवाही तात्काळ होत नाही म्हणुन बेकायदेशीर बांधकाम होतात.

**मा. सभापती :** एन. रा. ऑर्डर मिळाली नाही तर पुढील प्रोसीजर काय आहे.

**सहा. संचालक :** एन. रा. ऑर्डर नसेल तर प्रस्ताव स्विकारत नाही.

**श्री हिदायत अली :** लोकांना जाण्या येण्यास त्रास होतो. त्यासाठी त्यांचे कार्यालयाचे एक टेबल मनपात लावण्यात यावा जेणे करुन एन.रा. ची परवानगी तात्काळ मिळेल.

**उपआयुक्त (म) :** कोणत्याही जमिनीचा पहिला युप्प ब प्राथमिकते प्रमाणे कृषी म्हणुन आहे. त्यांनतर बाकीच्या वापरासाठी करण्यात येतात. कृर्षी व्यतिरिक्त इतर उपयोगासाठी त्या जागेचा वापर करायचा असेल तर अकृषी परवाना म्हणुन मा. जिल्हाधिकारी येथुन परवाना वाढावा. जर अशा जमिनीवर कुणी अतिक्रमण करुन बांधकाम केले तर कलम ४७ प्रमाणे कार्यवाही करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकाऱ्यांना आहेत व ४५ प्रमाणे दंड लावुन कार्यवाही करु शकते.

**मा. सभापती :** जेवढा वेळ इथे दिला जातो तेवढाच वेळ जिल्हाधिकारी यांचेकडे दिला तर कार्यवाही तात्काळ होवु शकते. विषय क्र. ७२ संबंधीत माहिती द्यावी.

**सहा. संचालक न.र. :** रिट पिटीशन क्र. ५३१/२००२ व १९१०/२००२ या अनुषंगाने मा. हायकोर्टाने भुसंपादन कार्यवाहीमध्ये अनावश्यक विलंब होत असल्याकारणाने भुसंपादन कार्यक्रम कशा पध्दतीने करणार या बाबतीत कालबध्द कार्यक्रम सादर करण्याविषयी आदेशित केलेले आहे. सदर सुचनेनुसार दोन महिन्याचा कालावधी दिलेला होता. मा. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन अहवाल उच्च न्यायालयात सादर केलेला आहे. सादर केलेल्या अहवालातच विभाजन अ.ब.क.ड.ई व क मध्ये केलेले आहे.

अ) यामध्ये भुसंपादन रस्ते या संबंधीची जी आरक्षणे आहे त्याचा आपण समावेश केलेला आहे.

ब) या सदरामध्ये विकास योजनेची अंमलबजावणी याचा दशवार्षीक गोषवारा सादर केला आहे. उर्वरीत

क) मध्ये इतर प्राधिकरणासाठी जी आरक्षण ठेवलेली आहे त्यात पोलीस खाते एस. टी. महामंडळ, पोस्ट ऑफिस, टेली फोन ऑफिस अशी जी आरक्षणे दाखविलेली आहे त्याची यादी दिलेली आहे.

इ) मध्ये भुसंपानाची कार्यवाही चालु असलेल्याचा गोषवारा दिलेला आहे. पुरवणी

ई) पुरवणी १० वर्षामध्ये भुसंपादनाची कार्यवाही प्रॅायरीटीज केलेल्या आहे आणि यात साल कालब्ध कार्येक्रम प्रस्तावित केलेला आहे. पुरवणी

फ) मध्ये जे शेवटच्या पानावर जे आहे. तेथे आगामी दशवार्षीक अंदाजपत्रकातील तरतुदीचा उल्लेख केलेला आहे.

महानगरपालिकेकरीता रस्ते व इतर साठी आरक्षणाची जे आहे ते स्वतंत्र्य पुरवणी "ई" मध्ये आहे. एकुण भुसंपादनासाठी पान क्र. ७९ वर १६ कोटी रुपये दर्शविण्यात आलेले आहे. एकुण रस्ते व इतर भुसंपादनासाठी लागणारा खर्च हा ४७२ कोटीचा आहे व आरक्षणाकरीता ४४४ कोटी रुपये दाखविण्यात आलेले आहे. पान क्र. ११७ चा जे विविध प्राधिकरणासाठी भुसंपादन करावे लागणार आहे. ते आरक्षण सहक्षेत्रासह नमुद केले पान क्र. १३१ वर दशवार्षिक अग्रक्रम नुसार लागणारा अंदाजित खर्च दर्शविण्यात आलेला आहे. तसेच क्षेत्र सुध्दा दर्शविण्यात आलेले आहे याचा सर्व अहवाल सभागृहाच्या मान्यतेच्या अधिन राहुन मा. उच्च न्यायालयात सादर केलेला आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** अगोदरच २ महिन्यापुर्वीच अहवाल न्यायालयात सादर केलेला आहे. त्या अगोदर २ महिने तो अहवाल या सभागृहासमोर यावयास पाहिजे होता. जे की, या सभागृहाने काही योग्य मार्गदर्शन ज्या त्रुटी असतील त्याचे मार्गदर्शन झाले असते व ते नमुद करता आले असते. मंजुरी दिल्यानंतर पुन्हा अहवाल न्यायालयासमोर जाणार आहे का? जाणार नसेल तर चर्चा करुन अर्थ नाही.

**मा. आयुक्त :** समितीला अधिकार आहे काय निणर्य घ्यायचा तो सभागृहापुढे ठेवणे बंधनकारक होते. उदा. माझ्याकडे प्रस्ताव आहे. तो करु शकतो बजेट मंजुर करु शकत नाही बजेट बैठक लावण्याचे अधिकार कुणाला आहे. स्थायी समिती आणि सर्वसाधारण सभेला आहे. असे करु शकणार नाही की १० वर्ष विकाच करायचा नाही. पुढील लोकांना हे बंधनकारक ठेवावयाचे की नाही हे सभागृहाने ठरवावे. ९०० कोटीचे बजेट कोठुन आणावे. १० वर्षात ही ९०० कोटी होणार नाही. हे दाखवायचे आहे. व एकाच कामावर ९०० कोटी खर्च ही करु शकत नाही. १० वर्षात १०० कोटी वापरु शकतो. असे अंदाज आहे. परंतु तसे ही म्हटलेले नाही. प्रशासन व कमेटीने अभ्यासानुसार व नगररचना विभागाच्या नियमाप्रमाणे दरवर्षी शहर सुधारण्यास किमान ७ कोटी व दरवर्षी ही रक्कम वाढविली पाहिजे. ७ कोटीचे १० कोटी पुढील वर्षी ११ कोटी कदाचित कोर्ट विचारु शकते की आपल्या कमेटीने काय निर्णय घेतला. सदर प्रस्ताव हा बऱ्याच दिवसापुर्वी सादर केलेला आहे. ४ महिन्यापुर्वी सादर केलेला आहे.

**मा. सभापती :** सदर प्रस्ताव सादर झाला होता. काही सदस्यांनी सांगितले की, महत्त्वाचा प्रस्ताव आहे. प्रशासकीय स्कुटनी करुन घ्यावी अशा सूचना मांडल्या होत्या. या एकाच विषयावर विशेष बैठक बोलविण्यात येईल स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

सदर प्रस्तावासंबधी विशेष बैठक घेण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**ऐनवेळीचे प्रस्ताव**

**विषय क्र. ७३ :**

कार्यकारी अभियंता (पाणिपुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणीपुरवठा योजनुतील जायकवाडी जुना पंपगृह येथे नविन ४०० अश्व शक्तीचे दोन पंप इतर उपकरणासह बसविण्याच्या कामासाठी रु. ३९,१११,७९०/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मान्यता प्राप्त झालेली आहे. सदरील कामासाठी राज्यस्तरीय वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्दी करुन निविदापत्रके मागविण्यात आली असता. निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारेखपर्यंत एकुण नऊ कोरी निविदापत्रके विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत आठ निविदा पत्रके प्राप्त झाली. त्यापैकी चार निविदा पत्रके निविदेतील अटीच्या पुर्ततेअभावी उघडण्यात आली नाही. उघडण्यात आलेल्या चार निविदा पत्रकातील दर खालील प्रमाणे प्राप्त झालेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. अमित इंजिनियर्स | अ. प. दरापेक्षा २८.१७% कमी |
| २. | मे. आनंद असोसिएटस, नाशिक | अ. प. दरापेक्षा १४.००% कमी |
| ३. | मे. पी. एच एस. इंजिनियर्स, मुंबई | अ. प. दरापेक्षा १२.४७% कमी |
| ४. | मे. मोर इंजिनियरिंग क. जालना | अ. प. दरापेक्षा ०९.९०% कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. अमित इंजिनियर्स, औरंगाबाद यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.१७% कमी आहेत. करीता सर्वात कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव मंजुरी तथा विचारार्थ सादर.

**मा. सभापती :** प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेतील जायकवाडी (जुना) पंपगृह येथे नविन ४०० अश्वशक्तीचे दोन पंप इतर उपकरणांसह बसविण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २८.१७% कमी दराची मे. अमीत इंजिनियर्स औरंगाबाद यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४ :**

उपआयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केला की, मा. आमदार यांचे स्थानिक विकास निधीतुन मो. शास्त्रीनगर गारखेडा येथील बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळा जीच बांधीव क्षेत्र १२५.६० चौ.मी. असुन भाडे समितीने निश्चित केलेले भाडे रु. ३०/- प्र. चौ. मी. प्र. महा म्हणजे रु. ३७६८/- दरमहा ठरविण्यात आलेले आहे.

करिता सदरील व्यायाम शाळा हरी ओम समाज विकास मंडळाच्या विनंती अर्जानुसार दर महा रु. ३७६८/- प्रमाणे मनपाच्या अटी-शर्तीस अधिन राहुन प्रथमचः (०३) तीन वर्षासाठी देण्याकरीता प्रस्ताव स्थायी समिती सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला शास्त्रीनगर गारखेडा येथे मा. आमदार यांचे स्थानिक विकास निधीतुन बांधण्यात आलेली १२५.६० चौ.मी. क्षेत्रफळाची व्यायाम शाळा भाडे समितीने निश्चित केलेल्या रु. ३०/- प्रती चौ.मी. प्रतिमहा या भाडेदराने (म्हणजेच रु. ३७६८/- प्रतिमहा भाडे) महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस राहुन प्रथमतः तीन वर्षासाठी "हरिओम समाज विकास मंडळास" भाडयाने देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५ :**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मौजे मुस्तफाबाद येथील स. क्र. ४/पैकी जमिन औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार १२ मीटर रुंद विकास योजना रस्ता हया प्रस्तावाने बाधित क्षेत्र (५९१ चौ.मी.) संपादन करण्यासाठी व सदर क्षेत्राचा मावेजा रक्कम सदर मिळकती वरील हया कार्यालयातच दाखल रेखांकनाचे विकास खर्च रक्कमेतुन वळती करुन घेण्यासाठी मिळकत धारक श्री. श्रीकांत रामचंद्र शिंदे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतुदीनुसार प्रस्ताव दिला आहे. एकुण बाधीत क्षेत्र व त्याचा प्रचलित

पध्दतीनुसार (शिघ्र गणक दर आधारे दर १२८० चौ.मी.) मोठया रक्कम रु. २,२३,०२०/- इतका मोबदला दयेय आहे.

सदर रक्कम सबंधीतांना त्याचे मिळकती वरील दाखल रेखांकन प्रस्तावामधुन वळती करुन घेण्यात येवुन रस्त्याखालील बाधित क्षेत्राचा रितसर ताबा घेण्यात येणे योग्य.

प्रकरणी वरील विकास खर्चाचे फरकाची रक्कम सबंधीताकडुन रितसर वसुल करण्यात आली असुन सबंधीतांनी १२ मीटर रुंद विकास योजना रस्त्याचा भाग महानगरपालिकेस नोंदणीकृत दस्ताऐवजाचे हस्तांतरीत केला आहे.

करीता वरील प्रमाणे विकास योजना (वाढीव हद्द) १२ मीटर रुंद रस्त्यात बाधीत क्षेत्राचा मावेजा रक्कम रु. २,३/२ २,२३,०२०/- विकास खर्चातुन वळती करणेचे कारवाईस (भुसंपादन) प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. आशा बिनवडे :** बेंटरमेंट चार्जेस किती भरलेले आहे.

**उपअभियंता नगररचना :** एकुण विकास खर्च रु. २,९४,३००/- इतका आकारण्यात आलेले होते. त्यामधुन डी.पी. रोडचा मोबदला म्हणुन २ लक्ष २९ हजार ३९० रु वळती कराचे उर्वरीत रक्कम त्यांनी ३४,९१०/- भरलेले आहे.

**मा. सभापती :** हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. परंतु गेल्या ५ वर्षात असे प्रस्ताव स्थायी समिती समोर का आलेले नाही. याचा अर्थ या समितीच्या हक्काला वेगळी कलाटणी मिळण्याची शक्यता आहे. म्हणुन मा. आयुक्तांना सूचना करेल की, जे कुणी अधिकारी या संबंधीत येत असेल त्याची चौकशी होवुन त्यांचेवर हक्कभंगाची कार्यवाही झाली पाहिजे जेणे करुन या सभागृहाचा अवमान होणार नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे मुस्तफाबाद येथील स. क. ४/पैकी जमिन औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढिव हद्द) नुसार १२ मिटर रुंद विकासयोजना रस्ता हया प्रस्ताति बाधित क्षेत्र (५९१ चौ.मी.) संपादन करण्यास सदर क्षेत्राचा मावेजा रक्कम रु. २,२३,०२०/- सदर मिळकती वरील हया कार्यालयात दाखल रेखांकनाचे विकास खर्च रक्कमेमधुन वळती करुन घेण्यास (भुसंपादन) सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६ :**

कार्यकारी अभियंता, पाणिपुरवठा हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, वर्ष १९९९ पुर्वी अनधिकृत नळ अधिकृत करण्यासाठी दंडापोटी रु. ६०० चा भरणा करुन घेण्यात येत असे. त्यानंतर वर्ष १९९८-९९ या कालावधीत अनाधिकृत विशेष नळ तपासणी मोहिम राबविण्यात आली या मोहिमेअंतर्गत रु. १०००/- दंडापोटी व अनाधिकृत नळ कनेक्शन जेव्हापासुन घेतले असेल, तेव्हा पासुनची पाणी अधिक चालु वर्षाची आगाऊ पाणीपट्टी (Advance) व प्रत्यक्ष मोक्यावर असलेल्या स्थीतीनुसार रस्ता दुरुस्ती चार्जेस आणि बोअरींग चार्जेस भरणा करुन घेऊन अनाधिकृत नळ जोडणी अधिकृत करुन दिल्या जात असे.

सदरची योजना मार्च १९९९ पर्यंत चालु होती. नंतर ती बंद करण्यात आली. सदरची योजना बंद झाल्यावर देखील या योजनेअंतर्गत अनाधिकृत नळावर करण्यात आलेली कार्यवाही व ही पध्दत पुढे एक मार्गदर्शक पध्दत म्हणुन वापरण्यात आली. व त्या अंतर्गत अनाधिकृत नळ अधिकृत करण्यात येत असत.

तद्नंतर दिनांक १५.०४.२००२ ते १४.०५.२००२ पर्यंत पुढे सदर मोहिमेस मुदत वाढ देण्यात येवुन दिनांक ३०.११.२००२ या कालावधीत महानगरपालिकेतर्फे पुन्हा एकदा अनाधिकृत नळ अधिकृत करुन घेण्यासाठी नागरिकांना संधी देण्यात आली ही योजना "अभय योजना" म्हणुन राबविण्यात आली. सदरची योजना सर्व साधारण सभा दिनांक १८.०२.२००२ मधील ठराव क्रमांक ५६३/२ अन्वये राबविण्यात आली.

सदर योजनेस मिळाळेला अल्प प्रतिसाद पाहाता व शहरात अजुनही बऱ्याच प्रमाणात अनाधिकृत नळ असल्याची शक्यता गृहीत धरुन आता पुन्हा नव्याने "अनाधिकृत नळ शोधन व धडक कृती मोहिम" हाती घेण्यात आली आहे.

अनाधिकृत नळ धारकांविरुध्द मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी अंतर्गत कार्यवाही करण्याचे प्रयोजन आहे. या मोहिमेअंतर्गत अनाधिकृत नळ धारंकावर करावयाच्या कार्यवाहीचा एक भाग म्हणुन दंड लावण्याचे प्रयोजन आहे. ही दंडाची रक्कम खालील प्रमाणे राहील.

| **अ. क.** | **नळाचा प्रकार** | **व्यास** | **दंडाची रक्कम** |
|---|---|---|---|
| ०१. | घरगुती | २५मीमी १/२" | ३०००/- |
| | | २० मीमी ३/४" | ४०००/- |
| | | २५ मीमी १" | ७०००/- |
| | | ३४ मीमी १ १/२ " | १२०००/- |
| | | ५० मीमी २" | २०,०००/- |
| ०२. | व्यावसायिक | २५मीमी १/२" | ४०००/- |
| | | २० मीमी ३/४" | ५०००/- |
| | | २५ मीमी १" | ८०००/- |
| | | ३४ मीमी १ १/२ " | १३०००/- |
| | | ५० मीमी २" | २१,०००/- |

तरी वरील प्रमाणे माहितीस्तव व मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. आजच्या बैठकीचे इतिवृत्त कायम समजुन प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अनाधिकृत नळ धारंकाविरुध्द मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी अंतर्गत कार्यवाही करण्याचे प्रयोजनानुसार अनाधिकृत नळ धारकांवर करावयाच्या कार्यवाहीचा एक भाग म्हणुन खालील प्रमाणे दंड आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क. | नळाचा प्रकार | व्यास | दंडाची रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | घरगुती | २५मीमी १/२" | ३०००/- |
| | | २० मीमी ३/४" | ४०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २५ मीमी १" | ७०००/- |
| | | ३४ मीमी १ १/२ " | १२०००/- |
| | | ५० मीमी २" | २०,०००/- |
| ०२. | व्यावसायिक | २५मीमी १/२" | ४०००/- |
| | | २० मीमी ३/४" | ५०००/- |
| | | २५ मीमी १" | ८०००/- |
| | | ३४ मीमी १ १/२ " | १३०००/- |
| | | ५० मीमी २" | २१,०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गन मन" या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

सभापती
स्थायी समिती महानगरपालिका
औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १७/०२/२००३ रोजी संपन्न झालेल्या (अर्थसंकल्पीय) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक १७ फेब्रुवारी २००३ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी १२.१५ वाजता "वंदेमातरम" या गिताने सुरुवात झाली. या सभेला संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री देसरडा प्रशांत सुभाष
२. श्री मिर हिदायत अली
३. श्री शिंदे किशोर रावसाहेब
४. श्री शेख इलियास किरमानी
५. श्री औताडे रावसाहेब ममतु
६. श्री ओक जयवंत माधवराव
७. श्री फुलारी नंदकुमार
८. सौ. आशा उत्तम बिनवडे
९. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
१०. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
११. श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१२. श्री चंद्रशेखर जैस्वाल
१३. श्री कैसरखान बद्रोद्दीन
१४. श्री ठकुजी रामसिंग वाणी

**चर्चा :**

**मा. सभापती :** मुख्य लेखाधिकारी यांनी अर्थसंकल्पाबाबत थोडक्यात माहिती दयावी.

**मुख्य लेखाधिकारी :** सन २००२-०३ मध्ये सुधारित हा १०८.०४ कोटीचा होता. सन २००३-०४ साठी रुपये १३४.२९ कोटीचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. यावर सविस्तर चर्चा घेवुन स्थायी समिती मंजुरी दयावी अशी प्रशासनाची विनंती आहे. यात वर्गनिहाय उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे. जकात ६७ कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे. पाणीपट्टीच्या संदर्भात दरवर्षी वाढ सुचविण्यात येते. परंतु वाढ मंजुर होत नाही. नसेल अनाधिकृत नळाची शोध मोहिम राबविण्यात येणार असुन शासनाच्या धोरणाप्रमाणे अनाधिकृत वस्त्यामध्ये गुंठेवारी कायदा लागु करुन पाणीपुरवठा करणे योग्य होईल. जेथे गुंठेवारी कायदयाची अंमलबजावणी होत आहे. तेथे टँकरद्वारे पाणीपुरवठा करणार आहोत. त्यावर शुल्क आकारणी करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. ही खर्चाची बाब असुन यात आर्थिक खर्च जास्त होत असुन उत्पन्न बाजु कमी झालेली आहे. यावर सर्व बाबीचा विचार करुन गांभीर्याने यावर चर्चा करुन योग्य तो निर्णय घ्यावा.

**डॉ. आशा बिनवडे :** या वर्षी मालमत्ता कराची वसुली किती होणार आहे. जे वसुली दाखविण्यात आली तेवढी वसुली आलेली आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** पान क्र. ४ वर दर्शविण्यात आलेली आकडेवारीनुसार १.४.२००३ थकबाकी २४ कोटीची आहे. चालु वर्षाची मागणी १३.०९ कोटीची आहे. झोन निहाय माहिती दिलेली आहे. झोन क्र. ०१ ची मार्च २००३ पर्यंत अपेक्षित वसुली १२० लक्षची आहे. अशी एकुण ०७ झोन मिळुन ०१ एप्रिल २००३ पर्यंती अपेक्षित थकबाकी २४.२८ कोटीची असुन आता एकुण अशी मागणी ३७.७८ कोटीची राहणार आहे. उद्दीष्ट २० कोटीचे राहणार असुन ३१ मार्च पर्यंत अपेक्षित वसुली आकडेवारी दिलेली आहे. मागील ७ वर्षाची वसुलीची आकडेवारी बघितली तर वसुलीची क्षमता कमी झालेली आहे. मालमत्ता कर तसेच पाणीपट्टीची वसुली प्रभावीपणे व्हावी म्हणुन तहसिलदार संवर्गातील अधिकारी मागविण्याचा प्रस्ताव आहे. कर्मचारी स्टॉफ वाढविण्याची कार्यवाही चालु आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** पान क्र. १४ वर दिलेले आहे. ही काही उत्पन्नाची बाजु आहे का?

**मुख्य लेखाधिकारी :** सिडको कडुन जेव्हा ही योजना मनपाकडे हँड वर्क झाली आतापर्यंत १५ ते १७ वर्षाचा कालावधी निघुन गेलेला आहे. सिडकोची लोकसंख्या वाढलेली आहे. नविन नविन योजना होत आहे. काही ले-आऊट मंजुर झालेली आहे. ही जी वाढ होत आहे. त्यामुळे एक्स्ट्रा जलवाहीन्या टाकाव्या लागत आहे.

**श्री जयवंत ओक :** किर्लोस्कर समितीने जो अहवाल दिला होता त्याचे पालन केले का? त्यावेळी असे वाटले नाही का भविष्यात अशी वाढ होणार आहे. करार काय झाला त्यावेळेसच आवश्यकता म्हणुन का टाकण्यात आले नाही. म्हणुन सदर समितीचा अहवाल मागवावा व या विषयावर नंतर चर्चा करण्यात यावी.

**श्री प्रशांत देसरडा :** उत्पन्न बाजुवर चर्चा करायची असेल तर प्रथम जकात वसुलीवर सुरुवात करावी.

**मा. सभापती :** पान क्र. ३ पासुन चर्चेला करावी. जकात विषयावर चर्चा करावी.

**श्री जयवंत ओक :** जकात या विषयावर जी चर्चा करीत आहे. आपल्या समोर हा तिसऱ्यांदा अर्थसंकल्प सादर होत आहे. या वर्षीचा अर्थसंकल्पास वेगळी अशी चालना द्यावी. अशी अपेक्षा आहे. महापालिकेचे उत्पन्न कसे वाढेल अशा प्रकारच्या योजना हया सभागृहास चर्चेला येतात. परंतु कार्यवाही होत नाही. मागील वर्षी सभापतीनी रुंलीग दिले त्यानुसार कार्यवाही झालेली नाही. जकात वसुली तर खुप मागे आहोत किंवा कसे याबाबत चर्चा झाली पाहिजे. गेल्या वर्षीच्या बजेट पुस्तिकेमध्ये घराला नंबर पाहिजे म्हणुन निर्णय घेतलेला होता. आता पर्यंत कार्यवाही केलेली नाही. उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मालमत्ता जकात तसेच पाणीपट्टी वसुलीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**मा. सभापती :** स. सदस्यांना सुचना करण्यात येते की, ठरल्याप्रमाणे प्रथमतः जकात विषयावर चर्चा करावी.

**श्री जयवंत ओक :** तीन बाबी उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. प्रशासनाने काय उपाय योजना केलेली आहे. जकात मालमत्ता तसेच पाणीपट्टी या तीनही बाबीच्या माध्यमातुन मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, उत्पन्न कमी आहे. दरवर्षी अशाच प्रकारे बजेट सादर होणार वसुली कमी होणार ही परंपरा अशीच चालु द्यायची का ? या शहरात ४ ते ५ मजली इमारती आहे. त्यांना कर लागला जात नाही. जो मागील बजेटच्या बैठकीत जकात पाणीपट्टी

तसेच मालमत्ताच्या संदर्भात घेतलेला होता त्याची अंमलबजावणी करण्यास इतका उशीर का लागलेला आहे. १ ते २ महिन्यात कार्यवाही व्हावयास पाहिजे होती. २० कोटी ऐवजी ४० कोटी रुपये मिळाले असते. फक्त एकाच मजल्याची नोंद आहे. जकातीच्या बाबतीत खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतला खाजगीकरण झाले नाही प्रशासनाने जकातीचे उद्दीष्ट पुर्ण होण्यासाठी काय अशी कठोर कार्यवाही करणार आहे. आम्ही आमच्या योजना सुचवितो परंतु प्रशासन काय योजना वसुलीसाठी आहे. या वर्षाचे पुर्ण टारगेट झाले की नाही. होणार की नाही? गेल्या १४ वर्षापासुन बघत आलो नमुद केलेली कामे होत नाही. प्रशासनाने आगळा वेगळा ठसा उमटा व टारगेट पुर्ण करुन दाखववे. जे अनाधिकृत नळ घेतात. घराला नंबर दिल्यास ते घेणार नाही. ताबडतोब कार्यवाही करता येईल. जकात वसुलीसाठी प्रशासन काय उपाययोजना करणाार आहे.

**श्री प्रशांत देसरडा :** मी सभापती असतांना त्यावेळेचे आयुक्त व इतर पदाधिकारी यांच्याशी समन्वय साधुन वर्कवाईज बजेट ठेवण्याचा प्रथा पाडण्यात आली. त्यास मान ठेवुन याही वर्षी मा. सभापती तसेच मा. आयुक्त यांनी या वर्षीही वर्कवाईज बजेट ठेवण्यात आले त्याबद्दल त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करतो. जकात विभागावर चर्चा करायची झाल्यास मागील वर्षी मी सभापती बजेटमध्ये ९ ठळक वैशिष्टे ठेवण्यात आले होते. त्यापैकी अभ्यास केला तर फक्त एकाच वैशिष्टयावर अंमलबजावणी झाली उर्वरीत ८ वैशिष्टयावर कार्यवाही नाही. मालमत्ता कराचे दर ४ वर्षांनी करावयास पाहिजे. अदयाप का करण्यात आले नाही. जकातीची ६७ कोटीची उद्दिष्ट ठेवले. सुधारीत कमी केले. एक महिना बाकी आहे. आता पर्यंत किती वसुली झाली.

**उपआयुक्त म :** एकुण वसुली जकातीची ४७.६० कोटी झालेली आहे.

**श्री प्रशांत देसरडा :** या वर्षीच्या बजेटवर चर्चा तर होईलच परंतु मागील जे बजेट होते त्यात जे रिवाईज केले ते सुध्दा वसुल होईल की नाही. गेल्या वेळेस २५% चुका करायच्या या वर्षी ५०% व नुसते पुस्तक मंजुर करायचे व पुन्हा सुधारित सादर करायचे हे व्हायला नको. जे मागील वर्षी रिवाईज बजेट केले ते सुध्दा वसुल होत नसेल तर शरमेची बाब आहे. मागील वेळेस निर्णय घेतला होता. वस्तु वाईज ठेवल्यास कोणत्या वस्तुवर किती जकात आली हे समजुन येईल. सोने चांदीवर जकात बघितली तर १०% सुध्दा जकात वसुली होत नाही. ईद दिवाळी महिन्यात किती जकात आली याचा ताळमेळ लागेल. नसता अधिकाऱ्यावर आरोप केले जाता अमुक वेळेत जकात का कमी आली. म्हणुन वस्तुवाईज जकात घेतल्यास वसुलीत वाढ होईल. तसेच सेन्ट्रल नाका व नगर नाका या भागात होण्यासाठी निर्णय घेतला होता. आज काही ट्रान्सपोर्टधारक त्याचा मालाचा जकात सेन्ट्रल नाक्यावर भरतो म्हणुन जालना रोडवर त्याचे गोडावुन मध्ये २० ते ४० रु. ट्रान्सेस फीस भरुन माल उतरुन घेतात, यात जकात चोरी होते. ज्यावेळेस छावणी बोर्डाला जका हिस्सापोटी रक्कम वाढवुन दिली त्यावेळेस २ एकर जागा छावणी बोर्डाकडुन होण्याचा निर्णय झाला होता. व सेन्ट्रल नाका हलविण्याबाबत ठरले जेणे करुन व्यापाऱ्यांना त्रास होणार नाही व चोरीचे प्रमाण थांबवुन उत्पन्नात वाढ होईल व जे ६७ कोटी उद्दीष्टे ७० कोटी ते ७१ कोटी पर्यंत जाऊ शकते राहीला प्रश्न कर्मचाऱ्यांवर जकात अधिक्षक यांनी

स्वतः हुन ५४ कर्मचारी जास्तीचे म्हणुन या विभागातुन कमी केले म्हणुन वसुली उद्दीष्ट पुर्ण होत नाही का? अधिकारी असा विचार करतात की दोन बैठक असते झालेले निर्णय एकुण घेतात प्रशासन पुढे काहीच कार्यवाही करीत नाही. उर्वरीत ३६५ दिवसातले सर्व दिवस आपलेच. शासनाकडुन महसुली उत्पन्न घेण्यासाठी उपआयुक्त मागवितो त्यांचेकडे किती दिवस महसुल उत्पन्नाची कामे करुन घेतली जाते माझ्या माहितीप्रमाणे २ तास सुध्दा महसुली उत्पन्नाची बाबतीत हे अधिकारी कामे करीत नाही म्हणुन त्यांना पुर्णवेळ या वसुलीच्या कामासाठी देण्यात यावा त्यांचे कडुन इतर कामे होवु नये जेणे करुन उत्पन्न वाढवण्यास मदत होईल अशी प्रथा आहे का, झोन अधिकारी वसुलीची यादी तयार करतात तीच यादी उपआयुक्त (म) यांचेकडे जाते. उपआयुकत मा. आयुक्तांकडे यादी पाठवितात पध्दत पध्दत प्रश्न बंद केली पाहिजे. जकात विभागाची टान्झीस फिस वाढविण्यास हरकत नसावी. बऱ्याच वेळा रिवाईज बजेट येते ते आता यापुढे कमी करु नये. जे दिले तेवढे वसुल झाले पाहिजे. तसा निर्णय घ्यावा. तसेच जे काही दोन-तीन निर्णय बोललो त्यात वस्तुवाईज बजेट सेन्ट्रल नाका शिफ्ट तसेच जकात विभागात जी कागदपत्रे ठेवलेली आहे ती सुरक्षीत नाही नुकताच काही दिवसापुर्वी रक्कमेच्या अफरातफरीचे प्रकरण आहे. हा विभाग संगणकीकरण केला असता तर मुद्दा येथे उपस्थित झाला नसता. जी चोरी प्रकार घेतात ते थांबतील त्यासाठी संगणीकरण करण्याचा निर्णय घेतला होता त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

**श्री मीर हिदायत अली :** जकात वसुली जास्तीत जास्त होऊन मनपाचे गोडावुन करावे. तेथे जकात घ्यावी. मेडीकल सारख्या अनेक लहान वस्तु मोठ्या गाड्यातुन शहरात आणला जातो. वाळुज पंढरपुर भागात व्यापाऱ्यांनी मोठयामोठया गोडावुन तयार करुन तेथे माल उतरवितात तेथुन माल शहरात आणला जातो. जकात विभागाच्या कर्मचाऱ्यांना माहिती सुध्दा होत नाही. म्हणुन अशी कार्यवाही केलयास कोटी मध्ये आणखी १० कोटी वाढ होवु शकेल.

**श्रीमती पार्वती मानकापे :** जागा जो पर्यंत मिळत नाही तो पर्यंत अशा जकात चोरी करण्याच्या गाडयांच्या बाबत पदाधिकाऱ्यांनी सुध्दा नियमीत भेटी दिल्या पाहिजे. मी स्वतः एक फर्निचर गाडी जकात न भरता निघुन गेली. अशा कितीतरी गाडया जात असतील ही चोरी थांबविण्यासाठी त्वरीत कार्यवाही झाली पाहिजे.

**सौ. सुवर्णा चद्रात्रे :** माजी राष्ट्रपती स. देसरडा यांनी सुचना केल्याप्रमाणे वसुलीसाठी उपआयुक्तांची नेमणुक व्हावी जकात वसुली जास्तीत जास्त वाढविण्यास प्रशासनामार्फत प्रयत्न व्हावे व या विभागाचे संगणकीकरण करावे.

**श्री नंदकुमार फुलारी :** जकात विभागाचे संगणीकरणे करावे म्हणुन निर्णय घेतला होता. सभागृह ट्रस्टी असुन काळजी घेते प्रशासन का कार्यवाही करीत नाही. जकातीचे खाजगीकरण करता येत असेल तर तसे प्रयत्न व्हावे खाजगीकरण करता येईल का? उत्पन्न येईल कामे होतील.

**मुख्यलेखाधिकारी :** खाजगीकरण करण्यास प्रशासनाचे दुभत नाही. दोन वेळेस प्रयत्नही केलेले आहे. परंतु ज्या वेळेस निविदा वगैरे निघतात त्यावेळेस आपल्याच काही पदाधिकाऱ्यांकडुन स्टेटमेंट केलेले आहे. खाजगीकरणास विरोध म्हणुन एवढे मोठे पॉलिसी डिसीजन घेतो व ते सभागृहाच्या सम्मतीनेच घेत

असतो. त्यानुसारच कार्यवाही होते. जो निविदा भरतो त्यास शाश्वती सुध्दा पाहिजे की तो व्यक्ती मनपाकडे जवळपास १०-१५ कोटीची कॅपीटल गुंतवणूक होते. जवळपास आठ कोटीची अरनेस्ट म्हणुन दयावे लागते बँक गॅरंटी दयावे लागले. कर्मचारी वर्ग घ्यावा लागतो. गाडया घ्याव्या लागतात. एवढा खर्च करायचा म्हणुन त्या व्यक्तीला विश्वास अर्हता नसेल जे की बॉडीकडुन आपल्याला सहकार्य मिळणार नाही. निविदा धारक निविदा भरण्यास तयार होत नाही यासाठी एकमताने ठराव पास झाल्यास सर्वाचे पाठबळ असावे तरच निविदाधारक निविदा भरेल व निश्चितच ८-१० कोटी खाजगीकरण केल्यास मिळु शकेल.

**श्री प्रशांत देसरडा :** याचा अर्थ जकातीमध्ये चोरी होतेच

**मुख्य लेखाधिकारी :** चोरी म्हणुन नाही परंतु शासनाने ज्या पध्दतीने जकात खाजगी करण्याची पध्दत निर्माण करुन दिली आहे. जे की वाढीव त्या पध्दतीने दयावे. जो कुणी खाजगी रित्या देईल. ती निश्चितच १०.१२ जास्त मिळवु शकेल ज्यावेळेस निविदा वगैरे गेल्या त्यावेळेसच वृत्तपत्रात स्टेटमेंट गेले कर्मचारी/व्यापारांचा विरोध होतच राहीला परंतु जेव्हा स्टटीकडुन विरोध होतो तेव्हा कुणी येणार नाही कारण संबधीत व्यक्ती निविदा भरतो तेव्हा त्याचे १०.१२ कोटी रु. येथे इन्व्हेसमेंट झालेली असेल.

**मा. सभापती :** ६७ कोटीचे उद्दीष्ट कशा रितीने पुर्ण करणार आहे.

**उपआयुक्त (म) :** जकात हे महागगरपालिकेचे महत्त्वाचे स्त्रोत आहे. जकातीचे वसुलीचे पमाण व होत असलेली तुट याचा अभ्यास करुन सर्व कारणांची दोन विभागामध्ये करतो आहे. शहरात जो व्यापार उदित आहे. यात मी कमी आहे. त्याचा परिणाम जकात वाढीवर झालेला आहे. वाळुज पंढरपुर एम.आय.डी.सी चिकलठाणा भागातील बऱ्याच कंपन्या बंद पडलेल्या आहे. त्यामुळे येणारा कच्चा मालाचे प्रमाम कमी असुन त्याचाी परिणाम वसुलीवर झालेला आहे. जे कन्सुमर आहे त्याचा व्यापारात उलाढाल कमी झाली त्यामुळे आवक कमी झाली वसुलीवर परिणाम झाला. व्यापारी म्हणा उत्पादन कमी म्हणा त्यांच्य स्थायी खर्च भागविण्यासाठी चोरीची सुध्दा वृत्ती वाढलेली आहे. दुसरे असे की, प्राथमिक स्वरुपाचा प्रश्न आहे की, जो कर्मचारी वर्ग आहे तो कमी करण्याची कारणे अनेक आहे. ज्या कर्मचाऱ्यांकडुन चोरी होण्याची भिती होते त्यांना कमी केलेले असुन अनावश्यक म्हणुन कमी केले व काम करण्यासाठी पर्यायी त्या क्षमतेने कर्मचारी मिळालेले नाही. जो स्टॉफ आहे तो अप्रशिक्षीत आहे. उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांयना कल नाही अशी परिस्थिती आहे. कामाचे जे प्रेशर आहे. त्या परिस्थिताचे कामाचे प्रशिक्षण दिले गेलेले नाही. असे अभिलेखावरुन दिसुन येते. तसेच जकात विभागात काम करण्यासाठी सक्षम कर्मचारी आवश्यक आह त्यात तो प्रशिक्षित तसेच काम करण्याची जिद्द असावयास पाहिजे. त्या क्षमतेने त्यांनी काम केले पाहिजे ते होत नसल्याने वसुलीत वाढ होत नाही जे उद्दिष्ट ठेवण्यात आले ते पुर्ण करण्यासाठी ज्या उपाय योयजना करावयाच्या त्या खालील प्रमाणे महत्त्वाचा मुद्दा असा की, जो जकात सेन्ट्रल नाका आहे तो मध्ये मार्केट मध्येच असुन सर्व रस्ते मार्केट मधुन जातात. त्यामुळे चोरी ही आपोआप चालुन येते. म्हणुन सेन्ट्रल नाका जकात ठिकाण बदल्याची आवश्यकता

आहे यासाठी छावणी परिषदेकडुन जागा घेण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. त्याबाबतचे अंतीम कार्यवाहीचे स्वरुप झाले असुन छावणी परिषदेचे मुख्य प्रशासक हे ५-६ महिन्यापासुन रजेवर असल्याने ते रुजु झाल्यानंतर हा प्रश्न निकाली लागेल. सेन्ट्रल नाका बदलण्यात आल्यावर निश्चितपणे जकातीमध्ये वाढ होऊ शकेल. या विभागात जो कर्मचारी वर्ग (आकृतीबंध) आहे. त्यात अमुलाग्र बदल करणार आहोत. नाका म्हटला की, स्वच्छता असली पाहिजे. जबाबदारी किती प्रमाणात कुणावर असावी. किती स्पेस जबाबदारीचे असावेत. तसेच २४ तास काम या विभागाचे चालु असते यावेळात कशा पध्दतीने काम वेळीच पार पडेल या संबधी सुधारणा करण्यात येणार आहे. या सर्व सुधारणा प्रशासकीय आकृती संबधी सुधारणा करण्यात येणार आहे. या सर्व सुधारणा प्रशासकीय आकृती बंध मध्ये करणार आहोत. जकातीचे संगणीकरण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे व मा. आयुक्तांच्या दालनात ज्या वेळोवेळी बैठक झाल्या त्यानुसार या बैठकामध्ये हा निर्णय ठाम झालेला आहे या बजेटमध्ये जकात नव्हे तर सर्वच विभाग संगणीकरण करण्याचा विचाराधीन असुन तरतुद ठेवण्यात आलेली आहे. संगणीकरण करण्याची कार्यवाही चालु आहे. हे संगणीकरण झाल्यानंतर कर्मचाऱ्यांकडुन ज्या मानवी त्रुटी निर्माण होतात मी प्रत्यक्ष बघितले १६ कोटीचे जकात येण्यासाठी जवळपास ३०-४० कोटीच्या वस्तुंचा टर्न होतो. नुसत्या पावत्या फाडल्या जातात. एक जास्तीचे काम होते. एक दिवसाच्या पावत्याचे ट्रान्सलेशनचे ऑडीट करावयाचे झाल्यास १५ दिवस लागतात ही वस्तुस्थिती आहे. जकातीचे कामकाज हे मॅन्युल पध्दतीने होते आहे. म्हणुन संगणकीकरण करणे आवश्यक आहे व जे उद्दीष्ट ठेवण्यात आले ते प्रशासन पुर्ण करु शकेल.

**श्री जयवंत ओक :** आताच खुलासा दिला या उपाय योजना प्रशासनाने केल्यानंतर उद्दीष्ट पुर्ण होणार याचा अर्थ एका प्रकारची चोरी आहेतच. बोलण्यावरुन दिसुन येते, ज्या उपाययोजना करणार आहे त्या झाल्याच पाहिजे. गेल्या वर्षीच निर्णय घेतला कार्यवाही कोणत्या स्टेपला संगणीकरणाची आहे. प्रशासनाने खुलासा करावा वारंवार सभागृहात एकाच विषयावर चर्चा होते. आतापर्यंत का कार्यवाही झाली नाही. तसेच सर्वसाधारण सभेत मी मुद्दा उपस्थित केलेला होता. एम.एस.ई.बी. तसेच इतर सरकारी कार्यालयाचे जे साहित्य स्टेशनरी येतात असे १० मुद्दे उपस्थित केले होते त्या मालाच्या बाबतीत मुद्दा केला होता. त्यावर जकात आकारणी करण्याची कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त :** वारंवार मुद्दा मांडला जातो की, जकातीमध्ये सुधारणा झाली पाहिजे चोरी करणे हा मनु या प्रवृत्तीचा एक भाग असेल परंतु प्रशासनाच्या मध्ये हा मनुष्य प्रवृत्तीचा एक भाग असेल परंतु पशासनाच्या मध्ये हा महत्त्वाचा भाग आहे की चोऱ्या होत असतात. त्या कमी कशा करायच्या यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे. नगरसेवक व प्रशासन यांच्या माध्यमातुन चोऱ्या कशा कमी करता येईल यासाठी प्रयत्न असावेत. संगणीकरण झालयानंतर चोऱ्या अमेरीकेतुन झालेल्या व भारतातुन बँकेतुन झालेल्या चोऱ्या आपणास माहीतच असेल. म्हणुन विषय असा आहे की, चोऱ्या कमी कशा करायच्या हा महत्त्वाचा एक भाग आहे. इतर मनपा पेक्षा १०% नव्हे तर १५%

ग्रोथरेट जास्त या मनपाची आहे. इतर मनपाची आकडेवारी माझ्याकडे आहे. नसती शाबासकी मानुन घ्यावी याही मताशी मी नाही असे बघायचे की १५% २०% हा वसुलीचे प्रमाण कसे जाईल यापुर्वी मी राज्यस्तरीय पदावर होतो राज्याच्या जे १५ हजार कोटी उत्पन्न येणार होते ते सुध्दा इकवल म्हणजे गेल्या वेळेस प्रमाणेच झाले नुकत्याच भांडे नावाच्या कर्मचाऱ्यांनी चोरी केली. म्हणुन एक भाग म्हणुन प्रशासनाने सतर्क राहण्याचा एक भाग आहे. संगणकीकरणाची प्रक्रिया निविदा स्तरावर आहे. मनपाचे प्रजेन्टेशन करुन घेतली की तुम्ही आम्हाला काय देणार मनपाचा दिलेला पैसा वेस्ट होवु नये व त्यामुळे स्पर्धा झाल्यास कमीत कमी किमतीत कसे खरेदी करता येईल हा बघणे गरजेचे आहे. हा एक भाग आहे.

जर कल्याण मनपाने ६ कोटीमध्ये ठेका दिला तर तोच आपणांस दिड कोटी मध्ये मिळतो का हे बघतो आहेत. आतच सेंट्रल नाका हलविण्याचा मुद्दा उपस्थित झाला आणि छावणी परिषदेकडुन जागा घेणार आहेत. सर्व कार्यवाही झाली. संबधीस अधिकारी रजेवरुन आल्यानंतर कार्यवाही होईल शेवटच्या आठवडयात सही होईल अशी शाश्वती आहे. जकात पोटी जी रक्कम छावणी परिषदेला दिली जात होती. ती डिस्टाबल रक्कम मी याच कारणामुळे थांबवुन ठेवलेली आहे. म्हणुन हे निश्चित आहे की, वर्षभरामध्ये जकात वाढविण्यासाठी आमचे बरेच प्रयत्न आहेत. या मनपाच्या इतिहासामध्ये दुकानदारांच्या कायदयांच्या अंतर्गत कधीच चौकशी झाल्या नाहीत. आपल्या कर्मचाऱ्यांनी दुकानात जाऊन चौकशा केल्या मी माझ्या सहीने तसेच अधिकार त्यांना दिले. त्यानुसार चौकशी काही दुकानांवर फौजदारी गुन्हा दाखल, तर काहींवर खटले भरण्यात आले. यासाठी दोन्ही मिळुन प्रयत्न करणे आवश्यक आहे. ६७ कोटी होईल याची मला खात्री आहे. गेल्या वर्षीचे जकातीचे उद्दीष्ट ६२ कोटी होते. वसुली ही ५८-५९ कोटी होत असेल तर ३-४ कोटीची चोरी होते असे म्हणता येणार नाही. कारण प्रायव्हेट व्यक्ती हा त्याला उत्पन्न करावयाचे असते. तो त्याचे वैयक्तिक दृष्टीने वसुली करणार त्याची प्रवृत्ती वेगळी असेल आपण मला मदत केली तर मी पुष्कळ बाबतीत खाजगीकरण करु इच्छितो. स्वच्छतेसाठी खाजगीकरण करण्याची होते असे म्हणता येणार नाही. कारण प्रायव्हेट व्यक्ती हा त्याला उत्पन्न करावयाचे असते. तो त्याचे वैयक्तिक दृष्टीने वसुली करणार. त्याची प्रवृत्ती वेगळी असेल आपण मला मदत केली तर मी पुष्कळ बाबतीत खाजगीकरण करु इच्छितो स्वच्छतेसाठी खाजगीकरण करण्याची गरज आहे. मी पुण्याला असताना त्या विभागात कामाचे खाजगीकरण केलेले होते. मला त्याचा अनुभव आहे. जिल्हा आमचे कर्मचारी ठेवले असते तर १०० कर्मचारी लागले असते. परंतु त्यांची सर्व्हिस बुकाची नोंद घेण्यास दोन कर्मचारी नेमावे लागले असते. खाजगीकरण केल्यामुळे दिवसातुन तिलाही दोन वेळेस विचारतो आणि त्य ऑफिसमध्ये एन्ट्री केली की, कंपनीचेच ऑफिस वाटते. म्हणुन खाजगीकरण केल्यास वसुलीत फरक पडतोच तसेच काही वस्तुवर दरवाढीचा प्रस्ताव सुध्दा शासनाकडे गेलेला आहे. त्याची मजुरी अपेक्षीत आहे. ६७ कोटी जकातीचे उद्दीष्ट संयुक्तीक वाटते. १५% वाढ दाखवित आहे.

**श्री नंदकुमार फुलारी :** सन २००३-२००४ साठी ६७ कोटीचे उद्दीष्ट ठेवले. शहरात इतका माल येईलच हे अपेक्षीत धरुन ६७ कोटी ठेवणे बरोबर नाही. दर वाढ झाली तर होवु शकते. परंतु एक सिमेंटची गोणी दोन रुपये असेल तर तीन रुपये केल्यास ६७ कोटी टार्गेट पुर्ण होवु शकेल.

**मा. आयुक्त :** यात इम्पीलशन होत असते. भाववाढ नाही. नॉर्मल वाढ होत असते. उदा. एक रुपयाची वस्तु १.२० रु. झाल्यास जी ७ ते ८ टक्के वाढ होते. देशामध्ये इन्स्ट्रेशनच रेट कमी झालेला आहे. पुर्वी इन्ट्रेक्शन रेट वाढला तर उत्पन्न सुध्दा वाढत होते. त्यामुळे पुर्वीच सांगितले की, जकातीचे उत्पन्न कमी येत आहे. जे की वस्तुच्या किमती झालेल्या आहे. नॅचरल वाढ झाल्यस उत्पन्न होईल.

**डॉ. आशा बिनवडे :** किमतीमध्ये वाढ झाली नाही आताच खुलासा केला परंतु लोकसंख्येत वाढ झालेली आहे. मालाची आवक वाढलेली आहे. आताच खुलासा केला की, स्टाफ हा अप्रशिक्षीत आहे. त्या कर्मचाऱ्यांना कसे प्रशिक्षीत करणार आहात खुलासा केलेला नाही काम करण्याची प्रवृत्ती क्षमता वाढली पाहिजे. यासाठी प्रशिक्षण देणे दुसरी बाब अशी की, शासनाची मालमत्ता आहे. शासकीय कर्मचारी हे स्वतःची मालमत्ता समजुन काम करीत नाहीत. खाजगी व्यक्ती जसे काम करतो त्याप्रमाणे शासकीय कर्मचारी का करीत नाही? ही प्रवृत्ती बदलली पाहिजे. त्यासाठी एफएसआय सारखे प्रशिक्षण संस्था मार्फत दिले जाते याची सुध्दा त्यास जोड असावी. मानवी प्रवृती बदल्याण्यासाठी आपण काय करणार आहोत याचा खुलासा द्यावा.

**श्री जयवंत ओक :** दरवर्षी आपण १०% वाढ दाखवितो तेच उद्दिष्ट पुर्ण होत नाही. प्रशासनाने मान्य केले १५% वाढ दाखविली जाते. उद्दिष्ट पुर्ण न झाले तर वेगळया भावनेतुन बघितले जाते. आरोप प्रत्यारोप होतात. चर्चेला उधाण प्रशासनच देते असे वाटते. खऱ्या अर्थाने जे उद्दिष्ट गाठणार आहोत तेच द्यावे. आताच स्वच्छतेच्या बाबतीत मा. आयुक्त बोलले सभागृहाने थांबविले नाही. खाजगी तत्वावर होत असेल तर करावे. हिताच्या योजना राबवाव्यात.

**मुख्य लेखाधिकारी :** मागील वेळेस खाजगीकरण प्रयत्न चालु होता २०% वाढ गृहीत धरले होते. जानेवारी महिन्यात बजेट सबमिट झालेले होते. त्यावेळेस खाजगीकरण प्रक्रिया चालु होती. निविदा प्रोसेसमध्ये होत्या. त्यामुळे बजेटला १६२ कोटीचे उद्दीष्ट घेतलेले होते. ५१ कोटी वसुली झाली होती. त्यावर २०% वाढ धरलेली होती. म्हणुन ६२ कोटी होतात. नॅचरल वाढ ही १५% आहे. दरवर्षी नैसर्गिक वाढ होते. जे की दर वाढतात. लोकसंख्या वाढते. गतसालाच्या तुलनेत १५% उत्पन्न वाढलेले आहे. ही नैसर्गिक वाढ लक्षात घेवुन जे ३१ मार्च २००८ पर्यंत ५९ कोटी वसुल होणार त्यावर १५% काढले तर ६७ कोटी होतात. म्हणुनच पुढील वर्षात एवढे उत्पन्न प्राप्त होईल. हे गृहीत आहे. नैसर्गिक आपत्तीत भुकंप तसेच ट्रान्सपोर्ट धारकांचा संप वगैरे होऊ शकतो. पाणी पट्टी तसेच मालमत्ता सारखे यात फिक्स अशी वसुली नसते. जकातीमध्ये तसे नाही. काही वेळा जास्त वसुली होऊ शकते. ६७ कोटीचे ७० कोटी होऊ शकते. सन १९९९ साली १६ कोटीचे उद्दिष्ट २४ कोटीवर गेलेले होते. त्याची कारणे वेगळी होती. दरवाढ सुचविलेली होती. ती मंजुर होवुन कार्यवाही केली म्हणुन २४ कोटी रुपये मिळाले.

**मा. सभापती :** आताच खुलासा केला कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणार. कल्पना काय आहे. कोणत्या स्वरुपाचे प्रशिक्षण देणार आहोत.

**उपआयुक्त (म) :** नगरपरिषदेचे महानगरपालिका झालेली आहे. परंतु मनपात ज्या शक्तीने क्षमतेने दिशेने काम करावयास पाहिजे त्याचा आभास कर्मचाऱ्यांमध्ये दिसुन येतो. ज्यावेळेस कर्मचाऱ्यांना कामे दिली जाता. व्हिजीट होते. त्यावेळी हिशोब ठेवण्याचा जो भाग आहे तो अत्यंत तकलादु स्वरुपाचा आहे. म्हणुन प्रशिक्षणाची बाब समोर आलेली आहे. अनेक कर्मचाऱ्यांना साधा अर्ज रिर्पोटींग, पंचनामा, स्थळपाहणी करता येत नाही. या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावयाचे झाल्यास शासनाच्या दोन प्रशिक्षण संस्था आहेत. मराठवाडा महसुल विकास प्रबोधीनी पैठणला आहे. प्रबोधीनी म्हणुन शासकीय दूध डेअरीच्या बाजुला आहे. प्रशिक्षण हे आकृतीबंधरित्या दिले जाते. यात योगापासुन फॉरमचे प्रशिक्षण असले. तसेच लेखा भाग कसा लिहीला जातो. याबाबत माहिती दिली जाते. मुख्य लेखाधिकारी, उपआयुक्त (प्र.) यांचेशी माझी खाजगीमध्ये चर्चा झाली. प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. एक प्रकारची दृष्टी निर्माण होणे गरजेचे आहे. एक वेळेस मी व श्री पानझडे जात असतांना ज्या पाणीपुरवठ्ठयाच्या लिजेस आहे त्या त्यांनी चालतांनाच मोजक्या याचा अर्थ सातत्य व तेवढी कार्यक्षमता त्यांचेमध्ये आहे. ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. म्हणुन जे सोर्सेस निर्माण केले पाहिजेत. त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. मनपातर्फे आकृतीबंध ठेवले जाईल. अनेक कर्मचारी असुन वेगवेगळया स्तरावर काम करतात. प्रशिक्षण कसे दिले पाहिजे अभ्यास कसा असला पाहिजे. या संस्थेचे जे वर्षाचे कॅलेंडर आहे. किती लोकांना प्रशिक्षण देता येईल, त्याप्रमाणे प्रशिक्षण दिले जाईल. बॅच निहाय व कालावधी वेळ निश्चित करण्यासाठी प्रस्ताव देण्यात येईल. त्यास त्यांचेकडे मंजुरी मिळाल्यानंतर कार्यवाही होईल. यास वर्षभराचा कालावधी लागेल.

**श्री प्रशांत देसरडा :** व्यापाऱ्यांच्या दुकानामध्ये जाऊन त्यांना जाब विचारुन कार्यवाही योग्य आहे. चांगला उपक्रम आहे. परंतु १००% चोरी पैकी व्यापारी हा २५% चोरी करीत असेल व ७५% चोरी ट्रान्सपोर्ट धारक करतात १०० व्यापारावर लक्ष ठेवण्याऐवजी ५-६ ट्रान्सपोर्टधारकावर कार्यवाही केल्यास योग्य होईल उद्दीष्ट पुर्ण होईल. आमच्या तीन वर्षाच्या कार्यकाळात आता पर्यंत एकही ट्रान्सर्पोट धारकावर कार्यवाही झालेली नाही. ट्रान्सर्पोट असोसिएशनच्या काय मागण्या आहेत. त्याचे अडचणी समजावुन घेवुन त्याकडे लक्ष देवुन कार्यवाही करावी. ट्रान्सपोर्ट धारकाकडे लक्ष दिल्यास ६७ कोटी उद्दीष्ट पुर्ण होण्यास अडचण येणार नाही. ट्रान्सपोर्ट नगरची त्यांची मागणी होताी. जसे नाशिक मनपाने केलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करुन त्यात काही थोडया फार कमी प्रमाणात ही करता आले तर वसुली सुध्दा होईल. म्हणुन ट्रान्सर्पोट धारकावर कार्यवाही करावी. व्यापारी हे डायरेक्ट माल आणत नाही. ट्रान्सपोर्ट धारक मार्फत येतो. त्याकडे मनपाचे दुर्लक्ष असते. सिडको वाळुज महानगरातील कंपन्यांनी एम.एस.ई.बी. कडे १.८० कोटी जास्तीचे वीज बील भरले. चिकलठाणा एम.आय.डी.सी. ने १.५० कोटी जास्त बिल भरले याचा अर्थ कंपन्या चालु आहे मनपाकडे काही कर्मचारी व्यापाऱ्यांना मार्गदर्शन करतात कुलकर्णी नावाचे एक

कर्मचारी वसंत भुवन मध्ये आहे. जास्त प्रशिक्षीत कर्मचारी आहे. त्यांना घेण्यात यावे जेणे करुन जे अप्रशिक्षित आहे ते प्रशिक्षित होतील.

**श्री जयवंत ओक :** व्यापाऱ्यामध्ये ट्रान्सपोर्टधारक जास्त प्रमाणात चोऱ्या करतात आताच सांगण्यात आले. त्यांचे बाबतीत काय कार्यवाही करणार आहेत. तीन जकात नाक्यांच्या संदर्भात काय उपाययोजना करणार आहात.

**उपआयुक्त (म):** ट्रान्सपोर्ट धारकाचे जे गोडावुन आहेत. त्यावर धाडी टाकण्याचे अधिकार मनपास आहे व याबाबत कार्यवाही केलेली सुध्दा आहे. सध्या जी ट्रान्सपोर्टनगरची जी कल्पना आहे ती जकात वाढीवासाठी पोषक नाही. वाळुज भागात ट्रान्सपोर्टचे संकुल आहे. त्या आधारे जकात चोरी चे प्रयत्न जास्त झालेले आहे. ट्रान्सपोर्टनगर हे तीनंगाव किंवा दौलताबाद टि पॉईंटजवळ कुठेतरी उभे रहावे म्हणुन असोसिएशनच्या अध्यक्षांची मागणी आहे. त्याच्या विकासासाठी मनपाने खर्च करावा. परंतु हे मनपा हद्दीच्या बाहेर आहे. त्यांच्या मागणीय आमचे समर्थन आहे. मा. विभागीय आयुक्त हे ट्रान्सपोर्टच्या सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या समितीचे अध्यक्ष आह. ते त्याच्या विचार करतील. परंतु हे ट्रान्सपोर्ट नगर जकात वाढीसाठी जास्त उपयुक्त असेल असे मला वाटते नाही. जे की, वाळुज येथे ट्रान्सपोर्टनगर आहे. त्यामुळे जे आता लिकेजेस आहे ते होते.

**श्री नंदकुमार फुलारी :** शहरात किती जकात नाके आहेत. बऱ्याच जकात नाक्यावर मोबाईल नाही. दूरध्वनी व्यवस्था नाही. दोन कर्मचारी रात्री-बेरात्री नाक्यावर असतात त्यांचा विचार करावयास पाहिजे. दरोडेखोरांचे प्रमाण वाढलेले आहे. रात्रीचे वेळी दोनच कर्मचारी कार्यरत असल्याने रक्कम जवळ ठेवण्यास भिती निर्माण होत असेल. प्रशासनाने या बाबतीत विचार करुन कार्यवाही करावी. बीड नाका तसेच हर्सुल नाक्यावर फोनची व्यवस्था नाही.

**उपआयुक्त मा.** : वायरलेसची सुविधा सध्या बंद आहे. कारण जुन्या काळातील यंत्रणा झाल्याने ती बंद पडली आहे. सध्या पाच नाक्यावर टेलिफोनची व्यवस्था नाही. बीड व हर्सुल नाक्यावर होते ते डिस्कनेट झालेले आहे. कार्यवाही करण्यात येईल.

**श्री प्रशांत देसरडा :** नाशिक मनपाप्रमाणे कमीत कमी ५ व जास्तीत जास्त किती मोबाईल ग्रुपमध्ये घेवु शकतो. तसे घेतल्यास महिन्याला फक्त ३७५ खर्च येतो. असे १०० मोबाईल घ्यावेत. काही अधिकारी मोबाईल बंद करुन ठेवतात. पी.बी.एक्स वर फोन लागत नाही. ग्रुपमध्ये त्यांचे अधिकारात त्यांनी कमी दराने मोबाईल दिलेले आहे. नाशिक मनपाने ६० मोबाईल घेतले तशी आपण कार्यवाही करावी.

**श्री जयवंत ओक :** मोबाईल घेवुन जो खर्च येणार आहे. तो वसुल होणार आहे कां? वायरलेस मध्ये १५ त २० लाख खर्च झाला ती यंत्रणा धुळ खात पडुन आहे. तसे होवु नये.

**मा. सभापती :** जकात वसुलीचे उद्दीष्टे हे ६७ कोटीचे ठेवण्यात आले. १५ टक्के दाखविण्यात आली. दैनंदिन जकात वसुलीच्या संदर्भात पदाधिकाऱ्यांकडे जी माहिती येते. त्यात १७ टक्के वाढ झाल्याचे दर्शविण्यात येते. असे असतांना १५ टक्के वाढ दर्शविलेली आहे. दुसरा मुद्दा असा की, स. सदस्यांनी या सभागृहात यापुर्वीच संगणकाची मागणी केलेली होती. या विभागाचे

संगणकीकरण झाले पाहिजे ते तात्काळ करण्यासाठी मार्चच्या पहिल्या आठवडयात कार्यवाही करावी. तसेच पी.बी.एक्स च्या बाबतीत सुध्दा आता मार्चमध्ये आचारसंहिता असेल तरी उद्‌घाटन होईल. त्यानुसार कार्यवाही व्हावी. जागेच्य संदर्भात जो करारनामा झालेला आहे. त्याबाबत मा. आयुक्तांनी ताबडतोब कार्यवाही करावी. महसुल आयुक्तांचे एक पद प्रतिनियुक्तीने घेवुन शासनाकडे मागणी करावी व तसा प्रस्ताव पाठवावा. इतर जो कर्मचारी वर्ग लागणार आहे त्याबाबतीत सुध्दा कार्यवाही करावी. या विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षीत करण्यात यावे. स. सदस्यांना सुचना व भावना लक्षात घेवुन जकातीचे उद्दीष्ट ९ कोटीने वाढ करुन ६८ कोटी करण्यात येते. वस्तु निहाय जकात आकारणी बाबत प्रशासनाने प्रयत्न करावे. मध्यवर्ती जकात नाक्यांचे स्थलांतर नगरनाका परिसरात करावे.

**श्री जयवंत ओक :** जकातीचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :** तो विषय या सभेत नाही. यापुर्वी कार्यवाही केलेली आहे. पुन्हा करावयाचे असल्यास तसा प्रस्ताव प्रशासनामार्फत यावा. मालमत्ता कर या विषयावर चर्चा करावी.

**श्री जयवंत ओक :** शहरात ११४ अनाधिकृत वसाहती आहेत. मनपाची खाजगी मालमत्ता आहे. ५२ स्लम आहेत. गृहनिर्माण संस्था आहेत. अनाधिकृत सोसायटी आहेत. सालारंजन बागशेरजंन आहेत. या सर्व भागातील घरांना गेल्या वर्षीच्या बजेटच्या बैठकीत जो संगणकीकरणाचा बाबतचा मालमत्तेला नंबर देवुन सवेक्षण झाले पाहिजेहे झाले नाही निर्णय घेतला होता की, या मालमत्तेचे सर्वेक्षण करुन नंबर देण्यासाठी प्रशासन कोणती यंत्रणा राबविणार आहे. जे उद्दिष्ट २० कोटीचे ते ३० कोटी वसुल होवु शकेल तयासाठी सर्वेक्षण करुन घरांना नंबर द्यावे. मागील वर्षाच्या बजेटमध्ये हा निर्णय घेतलेला असतांना अदयापपर्यंत घरांना नंबर देवुन त्यांचे संगणकीकरण करण्यात आले नाही. यास जबाबदार कोण आहे. त्यामुळे उत्पन्नात वाढ झाली असती.

**श्रीमती पार्वती मानकापे :** मालमत्तेच्या बाबतीत चर्चा होत आहे. स. सदस्यांनी जो मुद्दे मांडले तसे बरोबर आहे. मालमत्ता कर आकारणी होतांना काही घरांच्या ५ व्या मजल्यावरील मालमत्तेला ३००० तर काहींच्या त प्रकारच्य दुसऱ्या घरांना २०००/- हजार तर काहींच्या घरांना ५०००/- हजार रुपये आकारणी केलेली आहे. अधिकारी/कर्मचाऱ्यांमध्ये कामाची उपाययोजना नाही. कमी जासत कर आकारणीमुळे लोक कर भरण्यास पुढे येत नाही. याचा उत्पन्न वाढीवर परिणाम होतो.

**श्री नंदकुमार फुलारी :** नाशिक महानगरपालिकेस मोठया प्रमाणात मालमत्ता कराची वसुली राबविली जाते. मागील सभापती श्री प्रशांत देसरडा यांनी मालमत्ता कर वसुली करण्याच्या दृष्टीने प्रत्येक घरांना नंबर दिले व त्याचे संगणकीकरण केल्यास उत्पन्न वाढविता येईल म्हणुन घेतलेला होता. त्यामुळे त्या मालमत्ता धारकांने नळ कनेक्शन घेतलेले किंवा नाही हे सुध्दा तात्काळ दिसुन येऊ शकते. तसेच या शहरात पुर्वीचे एक घर होते त्यावर १०-१० मजली इमारती झालेल्या आहेत. तरी सुध्दा पुर्वीच्या घराचीच किमंत २००/- रु. चे मालमत्ता कर आकारणी होते. सर्वेक्षण करुन जशा प्रकारचे घर आहे. त्याप्रमाणे कर आकारणी झाली पाहिजे.

**डॉ. आशा बिनवडे :** २१ वा अर्थसंकल्प आपण चर्चा करीत आहोत. या शहरातील नागरीकांना बेसीक अशा सुविधा दयायच्या असतील तर त्यासाठी आपणांस उत्पन्नाची बाजु मजबुत करणे अत्यंत गरजेचे आहे. मालमत्ता कराच्या माध्यमातुन या मनपाचे मोठया प्रमाणात उत्पन्न वाढु शकते. परंतु दरवर्षी आपण बघतो उद्दीष्ट काही तेवढे वाढ नाही. एकीकडे मालमत्ता वाढतात. परंतु उत्पन्न वाढ नाही. यास बरीच कारणे आहेत. त्यात कर्मचारी स्टॉफ नाही. कर्मचाऱ्यांची काम करण्याची कार्यक्षमता कमी आहे. जे की ते कर्मचारी अप्रशिक्षीत आहे. सर्वसाधारणपणे १०,०००/- मालमत्तेचे वसुली साठी १ कर्मचारी आहेत. कर वसुल करणे जनतेच्या खिशातुन पैसा काढणे ही फार अवघड बाब आहे. जेवढी यंत्रणा वसुलीसाठी राबवायास पाहिजे तेवढी राबविली जात नाही. कमीत कमी २ हजार मालमत्तेच्या कराची वसुलीसाठी एक कर्मचारी असणे गरजेचे आहे. १०हजार मालमत्तेसाठी गेल्या १० वर्षापासुन एकच कर्मचारी असुन वसुली तेवढया प्रमाणात होत नाही त्यांचे क्षमतेच्या बाहेर वसुलीचे काम दिले जाते. मागील सभापती यांनी कराधान २१ नुसार दर चार वर्षानी मालमत्तेचे संरक्षण व्हावयास पाहिजे होते असा निर्णय घेतला होता ते करण्यात आलेले नाही. १०-१५ वर्षापासुन मालमत्तेचे सर्वेक्षण करण्यात आलेले नाही. शिवाय व्हॅल्युशन सुध्दा आता वाढलेले असुन नविन सर्वेक्षणानुसार व्हॅल्युवेशन सुध्दा आकारले गेले पाहिजे. याबाबतीत प्रशासनास काय अडचण आहे. ती अडचण या प्रशासनाने या सभागृहात आज दयावी. त्यानंतर आपणासं उपाययोजना करता येईल. प्रशासनाच्या समोर काही असे नियोजन आहे का? उत्पन्नाच्या बाजुसाठी प्रयत्न केले नाही तर खर्चाच्या बाजुवर बोलणे बरोबर होणार नाही. कर्मचारी वर्ग वाएविणार आहोत. शासनाची मान्यता घेणार आहोत दिले आहे. मालमत्तेच्या बाबतीत सुध्दा तसा निर्णय घेण्यात यावा. कराची आकारणी हेड ऑफिसमध्ये तर वसुली ही झोन मार्फत होते. यासाठी दोन्ही कार्यालयाचा समन्वय साधता आला पाहिजे. यासाठी प्रशासन काय उपाय करणार आहे. वसुलीची जबाबदारी फिक्स कुणावर आहे. झोन अधिकाऱ्याकडे टारगेट प्रमाणे वसुलीची जबाबदारी फिक्स करतो व वसुली न झाल्यास वेतन वाढ रोखणे. शिक्षा करण्यात येईल. असे निर्णय होतात. परंतु आता पर्यंत कार्यवाही कुठल्याच अधिकाऱ्यांवर केल्याचे आढळुन येत नाही. असे किती अधिकाऱ्यांवर केल्याचे आढळुन येत नाही. असे किती अधिकाऱ्यांवर आतापर्यंत कार्यवाही केलेली आहे. प्रशासनाने खुलासा करावा किंवा ज्यांनी जास्तीचे उद्दीष्ट पार पाडले त्यांना बक्षीस रुपाने काही दिले का?

**मा. आयुक्त :** आताच सुचना केल्याप्रमाणे मालमत्तेचे सर्वेक्षण झाले पाहिजे. अशा भावना स. सदस्यांनी व्यक्त केल्या त्या अत्यंत बरोबर आहे. बऱ्याच दिवसांपासुन सवेक्षणाचे काम केलेले नाही. दिल्लीची फायर नावाची सर्वेक्षण करणारी संस्था आहे. मुख्य लेखाधिकारी इंदौर दौऱ्यावर गेले होते. त्यावेळी त्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी स्वतःहुन सांगितले की, आपल्या महानगरपालिकेचे मालमत्तेचे सर्वेक्षण करण्याची कार्यवाही आम्ही करु. त्यांना मी स्वतः त्यांचेशी चर्चा केली व सुट्टीवरुन आल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल. असे सांगण्यात आले. त्यानंतर त्या संस्थेचा रिस्पॉन्स कमी मिळत गेला त्यानंतर

असे लक्षात आले की, या संस्थेकडून काम करणे शक्य होणार नाही म्हणुन टेंडर प्रक्रिया सुरु केली व सर्वेक्षणाच्याच माध्यमातुन जवळपास २० कोटी रु. जास्तीचे मिळतील इतर नंबर वगैरे दिल्यास आणखीच उत्पन्न वाढेल. सर्वेक्षण झाल्यानंतर नंबर पडतील त्यात नळ आहे किंवा काय कर किती भरला किती बाकी आहे हे सर्व निर्दशनास येईल.

**श्री जयवंत ओक :** फायर नावाच्या संस्थेकडे सर्वेक्षणाचे काम देण्यास वर्ष निघुन गेले. काही घरांना नंबरींग दिलेले आहे. जे डिस्सुट केसेस आहे. अशा बाबतीत आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत नंबरींग देवुन कार्यवाही का केली नाही. कमी जास्त कर आकारणी झाली निदर्शनास आले कार्यवाही का केली नाही. आताच सांगितले संगणकीकरण करणार या अगोदर घरांना नंबरींग दिल्या पाहिजे. त्यानंतर संगणकीकरण करावे. मा. महापौर दालन मा. सभापती तसेच मा. आयूक्त दालन या ठिकाणी संगणकीकरण करण्यात यावे सर्व रेकॉड जागेवर मिळतील अशी कार्यवाही करावी. जकात मालमत्ता तसेच पाणी पट्टी या संदर्भात १ ही उत्पन्नाचे साधन आहे. संगणकीकरण करण्यात यावे. उद्यापासुनच यंत्रणा कामाला लावण्यात यावी. उत्पन्न नाही म्हणुन विकास कामे सुध्दा होत नाही. दरवर्षी स्पील ओव्हरची कामे होते. संचिका पडुन आहे. रिमार्क येतात. ३ वर्ष गेली फक्त २ वर्षच राहीली. मा. आयुक्त यांना या शहराची सर्व माहिती आहे. झोपडपट्टीतील जनतेच्या समस्या काय असतात याची जाणीव त्यांना आहे. त्यांनी आगळेवेगळे असे काम करुन दाखवावे. मालमत्तेच्या सर्वेक्षणाचे काम १५ दिवसांच्या आत सुरु करावे. २० कोटी ऐवजी ४० कोटी मिळतील तसेच कर जास्त लागल्याबाबत ज्याच्या तक्रारी असतील त्यांचे निवारण करावे. जेणे करुन जनता स्वत: हुन कर भरण्यास पुढे येईल.

**उपआयुक्त (म) :** प्रलंबित असलेल्या मालमत्तेत सर्वेक्षण करण्याची सभागृहात समोरच आहे. मनपातर्फे मालमत्तेचा सर्वेक्षण करण्याची सभागृहात समोरच आहे. मनपातर्फे मालमत्तेचा सर्वेक्षण करण्यासाठी प्रबल करण्यात येईल. सर्वेक्षण साठी लागणारी मनुष्यबळ व यंत्रणा कमी आहे. या संदर्भात मागे सुध्दा करमुल्य निर्धारण अधिकारी यांनी किमान एक वर्षाचा तरी मालमत्तेचा सर्वेक्षण करावे म्हणुन प्रस्ताव होता. परंतु मनुष्यबळ कमी असल्यामुळे हे काम करणे अशक्य आहे. म्हणुन आता टेंडर प्रोसेस प्रमाणे ज्या अनुभवी तज्ञ अशा संस्था आहे त्यांचे मार्फत हे काम करुन घेणार आहोत. तसा प्रस्ताव मा. आयुक्तांकडे सादर केलेला आहे दोन प्रकारे कामे करावी लागतात त्या कर लावणे, असेंसमेंट करणे, व कर वसुल करणे करण्यासाठी ८ झोन मध्ये २२ पदे कर निरिक्षकाची मालमत्तेचे सर्वेक्षण व त्याचा व्हॅल्युअेशन आकारणी करायची त्यासाठी २४ आवेक्षकाची नेमणुक करण्यात आलेली आहे. तसेच दोन करमुल्य निर्धारक अधिकारी यांनी नेमणुक केलेली आहे. करमुल्य निर्धारण उपआयुक्त दर्जाचे आपण शासनाकडे मागणी करुनही मिळालेले नसल्याने त्यांचे अतिरिक्त काम सध्या मी करतो आहे. २२ पदापैकी ५ पदे सध्या रिक्त आहे. कार्यरत सध्या १७ पदे आहेत. झोन अधिकारी हे वसुली नियंत्रक अधिकारी आहे. तसेच झोन अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने अतिरिक्त कार्यभार सोपवुन काम करुन घेण्यात येते.

**डॉ. आशा बिनवडे :** असेसमेंट मुख्य कार्यालयात होते. वसुल झोन मार्फत होते याचा समन्वय असावा तरच वसुलीत फरक पडेल. जो रेकॉर्ड वेळेवर झोनमध्ये जात नाही ती सर्व कामे झोन अधिकाऱ्याकडे देता येणार नाही का?

**उपआयुक्त (म) :** मुल्यमापन केल्यानंतर रेकॉर्ड झोन अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येतो. नोव्हेंबर पर्यंत जेवढे असेसमेंट केले होते ते दोन्ही विभागामार्फत पाठविण्यात आलेले आहे. झोन अधिकारी यांनीच असेसमेंट करणे कर आकारणक वगैरे तसेच त्यांना लागणारा कर्मचारी वर्ग, यंत्रणा याबाबतचा अदयाप केलेला नाही. हे करतांना झोन अधिकारी यांना अतिरिक्त अधिकार द्यावे लागतील नविन आकृतीबंध करावा लागणार आहे. प्राथमिक चर्चा सुध्दा या संदर्भात झालेली आहे. तज्ञ समिती मार्फत झोनच्या पॅटर्न कसा असावा. कोणते अधिकार झोन अधिकारी यांना प्रदान करायचे याबाबत निर्णय दयावा लागेल. त्यानंतर पुढील कार्यवाही होईल. आताच सभागृहात चर्चा झाली त्यानुसार प्रशासन कार्यवाही करेल वेगळा निर्णय होण्याची आवश्यकता नाही.

**डॉ आशा बिनवडे :** कर आकारणी, वसुलीचे काम त्या त्या झोन अधिकाऱ्यांना द्यावे असा निर्णय घ्यावा.

**श्री प्रशांत देसरडा :** एका वर्षात का कार्यवाही केली नाही असा आमचा प्रश्न होता. परंतु सत्य परिस्थिती उपआयुक्त यांनी सांगितलेली आहे. दुसरा एक निर्णय असा घेतलेला होता की, ज्या मालमत्ता कराच्या केसेस आहे त्याबाबतीत दर मंगळवारी लोक अदालत भरुन त्या नागरिकांना बोलावुन एक दिवसात प्रकरण निकाली काढावीत. परंतु त्याबाबतीत कार्यवाही केलेली नाही जवळपास अशा प्रकरणात मनपाचे ४ कोटी रुपये अडकुन पडलेले आहे. एकुण ३७-३८ कोटी बाकी असतांना २० कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले. दरवर्षी १७ कोटी रु. बाजुला ठेवले जाते. यास वाली कोण सन १९९३पासुन मालमत्ता कराचे सर्वेक्षण झालेले नाही. नियमानुसार सर्वेक्षण झाले नाही तर पोलिस केस दाखल होवू शकते. हा प्रकारच्या गुन्हा आहे. जी थकीत रक्कमा आहे त्या खाजगी अभिकर्त्या मार्फत वसुल करता येईल का? म्हणून निर्णय घेतला होता. त्याबाबतीत निर्णय घेतला का? प्रशासनाने काय प्रयत्न केले. नागपुर मनपाने १ वार्ड बँकेला वसुलीसाठी दिलेला आहे. त्या धरतीवर ट्रायल बरोबर कर वसुल करण्यासंदर्भात प्रशासनाने काय प्रयत्न केले. खुलासा करावा. वसुली होण्याच्या दृष्टीने अनेक वेळा वृत्तपत्रात जाहीर केले परंतु वसुल होत नाही. १० लक्ष रु. जाहिरातीमध्ये खर्च झाले. म्हणुन थकीत रक्कम खाजगी संस्था मार्फत वसुल करण्याचा निर्णय घेण्यात यावा. नुकतेच काही दिवसापुर्वी पासुन अग्निशमन विभागाने नाहरकत प्रमाणपत्र बंधकारक केले, परंतु शहरात २५ हजार मालमत्ताधारक आहे. लोकांकडे प्रमाणपत्र नाही. शहागंज भागात एक पेट्रोलपंप मी बघतो. २५ वर्षापासुनचा टॅक्स त्यास लावलेला नव्हता. अग्निशमन प्रमाणपत्रामुळे जवळपास १५ वर्षाचा त्या व्यक्ती कडून टॅक्स वसुल केला. १७६ मालमत्ता धारकांनी अग्निशन विभागाचे प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. पुन्हा ते लोक आलेच नाही. यासाठी दोन्ही अधिकाऱ्यांनी एकमेकांची समन्वय साधल्यास वसुली मोठया प्रमाणात वाढ होऊ शकेल. म्हाडाचे प्रपोजल आपल्याकडे आले. म्हाडाचे हस्तांतरण झाले. अदयाप टॅक्स आकारणी

झाली नाही. म्हाडा हस्तांतरण झाले हे अधिकाऱ्यांना सुध्दा माहिती नाही. न्यायालय स्थापन करणार होते ते झाले नाही. सर्व केसेस निकाली काढता आल्या असत्या ९० कोटीचे उद्दिष्ट ठेवले उर्वरीत १७-१८ कोटी रु. खाजगी अभिकर्त्यांमार्फत वसुल करता येतील. का त्यासाठी प्रयत्न करावेत.

**उपआयुक्त (म) :** थकबाकी रक्कम खाजगी पध्दतीने वसुल करण्याबाबत प्रशासनाकडे कोणताही तसा प्रस्ताव नाही. म्हाडाच्या दोन वसाहतींना कर आकारणी केलेली नाही. असेसमेंट करण्याची कार्यवाही चालु आहे. त्यात एन-८ व उस्मानपुरा ज्योतीनगर भागातील वसाहती आहेत. एका वसाहतीच्या बाबतीत हेअरसिंग साठी माझ्याकडे आलेले आहे. दुसऱ्यांदा तारीख दिलेली आहे. खाजगी अभिकर्त्यामार्त थकीत रक्कम वसुल करण्याचा प्रस्ताव यावर्षी ठेवण्याचे प्रशासन प्रयत्न चालु आहे.

**डा आशा बिनवडे :** थकीत कर वसुल करण्यासाठी खाजगी संस्थांना देणे आहेत तसेच मोठमोठया मालमत्तांना कर आकारणी आलेली नाही. त्यासाठी का उपाययोजना प्रशासन करणार आहेत माझ्या वार्डात एका कॉम्प्लेक्समध्ये ८० दुकाने अनाधिकृत रित्या बांधलेले असुन १००% अनाधिकृत आहे. व्यवसाय करतात एकीकडे आपण मालमत्ता कर वसुल करण्यासंदर्भात चर्चा करतो. तर एकीकडे जे १००% अनाधिकृत बांधकाम करुन व्यवसाय करतात त्याकडे लक्ष दिले जात नाही. अनाधिकृत बांधकाम नसतांना त्याठिकाणी एम.एस.ई.बी. विभागाने मीटर देवुन लाईट व्यवस्था केली. पाण्याचे कनेक्शन तसेच ड्रेनेज लाईनची व्यवस्था कशी होते या सुध्दा बाबी बघीतल्या पाहिजे. व्यंकटेश प्लाझा ३१ दुकाने काढलेली आहे. त्रिमुत्ती चौकात आहे. शिवाय हे बांधकाम शैक्षणिक झोन मध्ये बांधलेले नाही. तसेच माझ्या दवाखान्यासमोर नंदीग्राम सोसायटी मध्ये अनाधिकृत मोठमोठया दुकाने अनाधिकृत झालेल्या आहेत. त्यांचेकडुन कुठलाही कर मिळत नाही. काहींना सुविधा नसतील तो भाग वेगळा ज्यांना दिल्या त्या अनाधिकृत असुन सुविधा कशा दिल्या हा प्रश्न आहे. ट्रॅफिक सुध्दा या इमारतीसमोर मोठया प्रमाणात आहे. येणाऱ्या सर्व गाडया रस्त्यावरच उभ्या असतात. यातुन जनतेला त्रास होतो. या इमारतीच्या बाबत न्यायालयात प्रकरण गेले तेथे मनपा केस हरतात कोर्टाने सुध्दा निकाल दिला की तेथे पाच खोल्या व पार्कींगची जागा आहे. परतुं तेथे ३५ दुकाने आज कार्यरत आहे.

**मा. सभापती :** संबंधी अधिकारी यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** या प्रकरणात खालच्या कोर्टात प्रकरण होते. सर्व कागदपत्रे जवाब घेऊन सर्व कॅसेटसह दाखल करुन ही कोर्टाने मनपाच्या विरोधात निकाल दिला. हायकोर्टाने सुध्दा कन्सीडर केले नाही. म्हणुन पुन्हा खालच्या कोर्टात अपील केले परंतु यात कोर्टाने असे म्हटले की, हे फार जुने बांधकाम आहे. सदर बांधकाम हे २००१ मध्येच केलेले आहे.

**श्री जयवंत ओक :** जुने बांधकाम आहे असा निर्णय कोर्टाने घेतला. न्यायालयात सत्य बाजु मांडुनही पॅनल वकील केस हारतात या शहरात ११४ अनाधिकृत वसाहती आहे. ५२ स्लम आहेत. गुंठेवारी कायदयाची अंमलबजावणी होणारच आहे. २००१ पुर्वी जे बांधकाम झाले ते गुंठेवारी बांधकाम येते हे सुध्दा येते. त्यांचेकडुन कर वसुल करावा. सर्व अनाधिकृत वस्त्यांना नंबर द्यावे. केव्हा

बांधकाम केले दिसुन येईल. २००१ नंतर जे बांधकाम झाले असेल ते पाडण्याचे आदेश द्यावे.

**डॉ. आशा बिनवडे :** बांधकाम परवानगी घेतलेली नाही. कर लागलेला नाही. एक इमारतीचे उदा. दिले अशा ४-५ इमारती वार्डात आहेत.

**विधी सल्लागार :** ते बांधकाम अनाधिकृत असुन सदर जागा ही राखीव स्वरुपातील डेव्हलपमेंट प्लॅन मधील आहे. त्यावर बांधकाम केले म्हणुन मनपाने पुढील कार्यवाही केली म्हणुन संबधीताने न्यायालयात प्रकरण दाखल केले व सदर बांधकाम हे जुने आहे असे दर्शवुन त्या स्टॅण्डवर झालेला निर्णय मिळविला.

**डॉ. आशा बिनवडे :** ५ रुम पार्कींग प्लेस न्यु करीत आहोत असे स्पष्ट असुन प्रत्यक्षात तेथे ३५ दुकाने उभी आहेत. कोर्टाने जो आदेश केले त्यात ५ रुम्स पार्कींच्या जागे संदर्भात दिले आहे. हायकोर्टात अपील केले किंवा नाही हे मला माहित नाही. परंतु सर्व काही प्रत्यक्ष होत असतांना कोर्टात केस हारतो हे बरोबर नाही जे अधिकृत आहे त्यांचेकडुन कर वसुल करण्याबाबत चर्चा करतो परंतु जे १००% चोरी करुन बांधकाम करतात कर वसुल होत नाही अशा मालमत्ता धारकांवर काहीच कार्यवाही आपण करीत नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** यानंतर जे होईल ते पुर्णच मालमत्तेचा होणार आहे. डिटेल त्याचे मेजरमेंट होणार असुन संगणकीकरण होणार आहे. त्यानंतर असे प्रकरण डिटेल्स माहित झाल्यास पुढील कार्यवाही करता येणार आहे. अनाधिकृत बांधकाम असेल तरी आपण मालमत्ता कर वसुल करु शकतो. अनेक अनाधिकृत वस्त्यातुन मालमत्ता कर वसुल केलेला आहे. सर्वेक्षणाचे काम हाती घेणार आहोत. आताच मा. आयुक्तांनी तसे अवगत केलेले आहे. १५ दिवसात टेंडर प्रोसेस पुर्ण होवुन अशा प्रकरण त्यात आल्या निश्चित त्या तुर्त दुर करता येतील. मालमत्ता कर घेतला न सेल तरी सुविधा देणे हा वेगळा भाग होतो. आत स. स. श्री देसरडा यांनी सुचना मांडल्यानुसार ज्या डिस्प्युट प्रकरणे आहे ते निकाली काढण्याकरीता आपण एक समिती नियुक्त केली असुन त्या समितीमार्फत या केसेस निकाली काढता येतील.

**मा. सभापती :** शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षणाची करण्याची कार्यवाही १० मार्चच्या आत करावी. टेंडर काढले गेले पाहिजे. १७ कोटीची थकबाकी आहे. खाजगी संस्थेमार्फत वसुल करण्यात यावे. आताच त्रिमुर्ती चौकातील ३५ शॉपींग सेंटरच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला. प्रकरण हायकोर्टात असेल तरी त्या प्रकरणाची तपासणी करुन कशा अध्दतीने अपील करुन कार्यवाही करता येईल ते पहावे. या शॉपींग सेंटर मध्ये ड्रेनेज नळ कनेक्शन दिलेले आहे. त्या मालकांचे इमारतीला कर लागला नाही म्हणुन नळ व ड्रेनेज कनेक्शन दिलेले असेल ते कट करण्यात यावे. तसेच म्हाडाचे जे प्रोजेक्ट आहे त्यांना सुध्दा कर लावण्याची कार्यवाही झाली पाहिजे. तसेच कर आकारणी व वसुली करणे हे अधिकार झोन अधिकाऱ्यांना देण्याचे आदेश करावेत एकुण शहरात ४८ मंगलकार्यालय आहेत त्यांना कर कोणत्या पध्दतीने लावण्यात येतो. खुलासा करावा.

**श्री देसरडा प्रशांत :** रजिस्ट्री कार्यालयात प्लॉट खरेदी-विक्री होते आणि ओपन प्लॉटच्या टॅक्स भरलेला नसतांना मनपाची नाहरकत प्रमाणपत्र नसतांना रजिस्ट्री होते. मनपाच्या नाहरकत प्रमाणपत्राशिवाय रजिस्ट्री ऑफिसला जागेची रजिस्ट्री होवु नये म्हणुन असा निर्णय घेण्यात यावा.

**श्री हिदायत अली :** एन.रा. भरणा केल्याशिवाय परवानगी मिळत नाही. त्याप्रमाणे ओपन प्लॉटचा टॅक्स भरणा पावती दखविल्याप्रमाणे मनपाची एन.ओ.सी. असल्याशिवाय रजिस्ट्री करु नये तसा निर्णय घेवुन रजिस्ट्री कार्यालयास पाठवावा जेणे करुन मनपाची टॅक्स भरल्याची एन.ओ.सी. घेवुनच कार्यवाही होईल.

**श्री देसरडा प्रशांत :** बिल्डर प्लॉट विकतात. ४-५ वर्ष प्लॉट पडुन राहतो. त्यानंतर विक्री केली जाते. मधल्या काळातील टॅक्स कुणी भरायचा वाद निर्माण होतो. जो प्लॉट होतो. त्यांचे नावार नविन नविन कर भरणा होतो. त्यामुळे थकीत टॅक्स कुणीच भरीत नाही.

**मा. सभापती :** मंगल कार्यालयास कशा पध्दतीने कर आकारला जातो खुलासा करावा.

**मा. उपआयुक्त (म) :** मंगल कार्यालयाचे जे क्षेत्र असेल त्याचे व्यावसायिक म्हणुन असेसमेंट करुन कर आकारणी होते.

**श्री देसरडा प्रशांत :** यात झोन क्र. १ चे मागील वर्षाचे उद्दीष्ट १.२० कोटीचे होत यावर्षी १.२४ कोटी दिले. एक वर्षात ४ लक्षची वाढ एका झोन मध्ये होते का? कोणता निकाल लावुन उद्दीष्ट ठेवलेले आहेत.

**मुख्य लेखाधिकारी :** ३१/०३/२००३ पर्यत अपेक्षीत वसुली ही होणार आहे असे अपेक्षित म्हणुन दाखविलेले आहे. सन २००२-२००३ ची साठी १२४ कोटी व थकीत २५३ असे मिळुन ३.७७ कोटी पुर्ण मागणी या झोनची आहे. कर आकरणी विभागाकडुन एप्रिल मध्ये समदी रजिष्टर झोन विभागाकडे जाते. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये डिमांड रेज होतात. पुढील आर्थिक वर्षात रेग्युलेशन होईल. ज्या झोनच्या असेसमेंट रजिस्टर दिले असेल त्या झोनची उद्दीष्ट वाढविलेली आहे.

**श्री प्रशांत देशपांडे :** ज्या काही त्रुटी आढळुन येतात याचा अर्थ दोन्ही अधिकाऱ्यांच्या समन्वय नाही हे शहर जुने राहिलेले नाही. २५ कोटीचे उद्दिष्ट करावे.

**मुख्य लेखाधिकारी :** काही नोंद घेण्याच्या बाकी असेल तर दुरुस्ती करुन घेण्यात येतील. १३.५० कोटी चालु आर्थिक वर्षाची डिमांड दाखविलेली आहे. २४.८८ कोटी ही १/४/२००३ पर्यंतची अपेक्षित थकबाकी आहे. ३७.७८ कोटीच्या अगेन्समध्ये २० कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे.

**श्री प्रशांत देसरडा :** नियमानुसार दर ४ वर्षानी मालमततेचे सर्वेक्षण करण्यात येत न ाही. प्रश्न विचारल्यास त्याचा खुलासा दिला जात नाही. थकीत वसुली झाली पाहिजे.

**मुख्य लेखाधिकारी :** यावर रामबाण उपाय म्हणुन खाजगी संस्थेमार्फत काम हाती घेवुन लवकरच सर्वेक्षण होवुन त्याप्रमाणे कर आकरणी करता येईल.

**मा. सभापती :** मालमत्ता करामध्ये दोन कोटीची वाढ करण्यात येते. कर्मचारी वर्ग मिळविण्यासाठी मा. आयुक्तांनी शासनाची मान्यता घेवुन कार्यवाही करावी.

**मुख्य लेखाधिकारी :** थकबाकी वसुलीसाठी कर्मचारी स्टॉफसाठी शासनाकडे तसा प्रस्ताव पाठवुन कार्यवाही करण्यात येईल. कराची वसुली करण्याकरीता कर्मचारी संस्था बघीतली तर कमी प्रमाणात आहे. शहरात १.२५ लक्ष मालमत्ता आहे. थकबाकी वसुलीची रक्कम ही मोठया प्रमाणात असुन त्यासाठी कर्मचारी व इतर संस्था असणे आवश्यक आहे मागील ४ वर्षाची वसुली पाहता फक्त १०,११,१२ कोटीपर्यंत वसुली झालेली आहे. एकदमच वाढ होईल असेही

गृहीत धरत येणार नाही. शासनाकडे प्रस्ताव देवुन कर्मचारी भरती करण्यास मान्यता होणार आहोत. त्यानुसार चालु वर्षी १३.५० कोटी व थकीत ६.५० कोटी दिले आहे. नागपुर मनपाने बँकेद्वारे कराची वसुली सुरु केली त्यात जवळच्या बँकेला मनपाचे बँक खाते कर द्यायचा त्यानुसार ज्या त्या भागातील नागरीक जवळच्या बँकेत मनपाच्या खात्यावर कराचे पैसे भरता डायरेक्ट खाजगी अभिकर्त्यामार्फत वसुली केलेली नाही. या मनपास सुध्दा तसे करता येणार नाही. जसे एम.एस.ई.बी. विभागात बीले वाटप करण्याचे काम खाजगी अभिकर्त्यामार्फत होते. तसेच मनपास सुध्दा डिमांड वगैरे देण्यास तशी कार्यवाही करता येईल. २० कोटीचे उद्दिष्ट हे कर्मचारी वर्ग व इतर यंत्रणा बघुनच ठेवलेले आहे. झोनचे जो पर्यंत सक्षमीरण होणार नाही तोपर्यंत पुर्णत: थकबाकी वसुल करता येणार नाही. शासनाकडून कर्मचारी भरतीस मोन्यता मिळेल हया कामासाठी होईल. एक वर्षात ही थकीत वसुल करु शकतो. मागे २ वर्षापुर्वी आकृतीबंध पुस्तक सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आले होते. त्यास मान्यता दिली नाही. सभागृहाचा असा गैरसमज झाला की, आकृतीबंध म्हणजे कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीवर घेणे परंतु वेतनश्रेणीचा यात संबंध येत नाही. फक्त कोणत्या विभागासाठी किती कर्मचारी कोणत्या पदाचे आवश्यक असते. त्याचा तो तपशील असतो. उदा. ५ हजार मालमत्तेसाठी १ कर्मचारी तर १.२५ लक्षसाठी किती लागणार हे नमुना नमुद केलेला होता. आता पुन्हा मा. आयुक्त यांनी उपआयुक्त तसेच अस्थापना विभाग यांना आकृतीबंध पुस्तक सादर करण्याचे आदेशीत केलेले असून लवकरच आकृतीबंध सभागृहासमोर सादर होईल त्यास सभागृहाची मान्यता मिळाल्यास तसाच प्रस्ताव शासनाकडे पाठवुन मान्यता घेवुन झोनमध्ये कर्मचारी वर्ग देवुन वसुलीचे काम सक्षम केले जाईल व कर्मचारी वर्ग पुरेसा दिल्यास मायोकोलॅन नुसारच कार्यवाही करता येईल.

**श्री देसरडा प्रशांत :** झोनवाईज वसुली होते. वार्ड वाईज केल्यास जे कर भरती नाही. ते आढळुन येईल. वसुली सुध्दा वाढेल.

**मुख्य लेखाधिकारी :** मालमत्तेचे सर्वेक्षण होईल त्यामध्ये सर्वच कार्यवाही होणार आहे. सर्वेक्षण झाल्यानंतर संगणीकरण होईल. ४-६ महिन्याचा कालावधी लागेल. वार्ड वाईज गल्लीवाईज टारगेट निश्चित होणार आहे.

**मा. सभापती :** जी सुचना प्रशासनाने सेलच्या संदर्भात मांडली त्यास मान्यता देण्यात येत आहे व तात्काळ कार्यवाही करुन जास्तीत जास्त उत्पन्न कसे मिळविता येईल यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. सभा ३० मिनीटासाठी तहकुब करण्यात येते. (वेळ दुपारी ३.१५ वा सभा सुरुवात दु. ४.१५ वा.)

**मुख्य लेखाधिकारी :** ज्या प्रमाणे मालमत्ता कर वसुल करण्यासाठी यंत्रणा राबविणार आहोत. त्या पध्दतीने पाणीपट्टी साठी राबविणार आहोत.

**श्री जयवंत ओक :** अभय योजनेची अंमलबजावणी होते किंवा नाही.

**मा. सभापती :** १० मार्च पर्यंत सर्वेक्षणाची कार्यवाही सुरु होईल जेथे घर तेथे कर असेल ज्यांनी अनाधिकृत नळ कनेक्शन घेतले असेल त्यांना दंडात्मक कार्यवाही होत आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** मालमत्ता कराची वसुली जानेवारी अखेर ७.५२ कोटी झालेली असुन पाणीपट्टी वसुली ६.१३ कोटी झालेली आहे. २० कोटीचे टारगेट होते. रिव्हीजन मध्ये १३ कोटी केले त्यांचे अगेन्समध्ये ७.५२ कोटी वसुल झाले.

**श्री प्रशांत देसरडा :** सुधारीत टारगेट देवुनही १०० टक्के वसुली न घता ६०% वसुली झालेली आहे. १३ कोटी का झालेली नाही.

**उपआयुक्त (म) :** पाणीपट्टी वसुली ही फेब्रुवारी/मार्च मध्येच जास्त होते. लोकांच्या भरल्याचा रिस्पॉन्स मिळतो. १३ कोटीचे टारगेट पुर्ण होईल असे वाटते.

**श्री देसरडा :** झोन वाईज किती वसुली झाली कमी वसुली करणाऱ्या झोन अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याचा आजच्या बैठकीत निर्णय घ्यावा सुरुवाती पासुनच डिमांड पावती देवुन वसुलीचे काम व्हावयास पाहिजे.

**उपआयुक्त (म.) :** १ एप्रिल मागणी केल्यास सुध्दा ३१ मार्च रोजी काही लोक कर भरतात. शिवाय व्याज माफ करण्याचा निर्णय सभागृहाने घेतला त्यानुसार कर किती भरायचा यावर जनतेच्या मनात संभ्रम निर्माण झालेला आहे त्यामुळे वसुली कमी झालेली आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला असतांना कर्मचारी व्याज भरण्याची मागणी करतात. व्याज माफ झाले म्हणुन लोकांची मागणी आहे. म्हणुन जो कर भरणार असतात तो सुध्दा लोक देत नाही त्यामुळे वसुलीवर परिणाम झाला. यात मनपाचे नुकसान होते. त्यावर काय उपाययोजना करणार आहेत.

**उपआयुक्त (म) :** मालमत्ता कर मागील वर्षी ७.४० कोटी तर यावर्षी ७.८६ कोटी झालेला आहे. नोव्हेंबर महिन्याच्या बैठकीत व्याज आकरणी रद्द करण्याचा निर्णय घेतल्याने जनतेत संभ्रम निर्माण होवून लोक कर भरण्यास पुढे येईना त्यामुळे वसुलीवर परिणाम झाला आहे.

**डॉ आशा बिनवडे :** दरवर्षी उद्दीष्टाच्या ५४ टक्के सुध्दा वसुली होत नाही. प्रशासनाकडुन तसे प्रयत्न होत नाही म्हणुन ही परिस्थिती दरवर्षी निर्माण होत आहे. असे होत राहिले तर विकास कामे कशा रितीने करणार म्हणुन ज्या अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी वसुली कामात कुचराई केली अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कठोर निर्णय घेण्याची आज आवश्यकता आहे.

**उपआयुक्त (म) :** वसुली जास्तीत जास्त घेण्याचे प्रयत्न प्रशासन करीत आहे. नुकतीच नळ कट करण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे.

**श्री प्रशांत देसरडा :** अधिकारी/कर्मचाऱ्यावर वसुलीचे उद्दीष्ट पुर्ण न केल्यास कार्यवाही करण्याचा ठोस निर्णय आज घेण्याची गरज जेणे करुन १३ कोटीचे उद्दीष्ट पुर्ण होईल.

**मा. सभापती :** जे अधिकारी/कर्मचारी वसुलीच्या संदर्भात कामचुकार करीत असतील त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री हिदायत अली :** जे अधिकारी वसुलीचे उद्दीष्ट पुर्ण करतील त्यानां एक वेतनवाढ करण्यात यावी. जेणे करुन प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्यांना काम करण्याची उत्सुकता निर्माण होईल.

**मा. सभापती :** चांगले काम करण्याचा अधिकाऱ्यांचा प्रशासनाने गौरव सुध्दा करावा.

## पाणीपट्टी वसुली

**श्री देसरडा प्रशांत :** पाणीपट्टीची वसुली ही ५०% सुध्दा झालेली नाही.

**उपआयुक्त (म) :** जानेवारी अखेरपर्यंत पाणीपट्टीची वसुली ही ६.६२ कोटी झालेली आहे. मागील वेळेस ६.१६ कोटीच झालेली होती. व्यावसायिक नळ कनेक्शन ८२४ आहेत.

**श्री प्रशांत देसरडा :** एकुण १३१० व्यावसायिक नळ धारकांनी अग्निशमन विभागाकडे नाहरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज केले. रेकॉर्डवर ८२४ नळ कनेक्शन का दाखविण्यात आले.

**उपआयुक्त (म) :** कन्फर्म होवुन व्हेरीफाय झालेले ८२४ नळ कनेक्शन आहेत. आता अग्निशमन विभागाकडुन यादी आलेली असुन ती यादी पडताळणी करुन कार्यवाही करता येईल.

**श्री प्रशांत देसरडा :** १३१० मध्ये गॅस गोडावुन १. मंगलकार्यालय ६. पेट्रोलपंप फक्त ३ दाखविण्यात आले. सर्विसिंग सेंटर कारखाने ३१, रेकॉर्डवर ८२४ दाखविण्यात येते. अग्निशमन विभागाकडे १३१० अर्ज नाहरकत प्रमाणपत्रासाठी येतात. प्रशासन रेकॉर्ड सुध्दा ठेवू शकत नाही. यासाठी असा निर्णय घ्यावा की, मालमत्ता वसुलीचे कर्मचारी पाणीपट्टीसाठी घ्यावे. नसता पाणीपट्टी वसुली कर्मचारी मालमत्तेसाठी घ्यावे. कोणता तरी एक वसुली करण्याचा निर्णय घ्यावा. दोन्ही वसुलीसाठी कर्मचारी स्टाफ कमी पडतो. त्यामुळेच कोणतेच उद्दीष्ट पुर्ण होत नाही.

**मा. आयुक्त :** वसुली होत नाही हा परिणाम नाही. कर्मचारी वसुलीसाठी कमी आहे. त्याचा परिणाम वसुलीवर होतो. नविन २००.३०० नळ कनेक्शन फक्त वाढलेले आहे. न्यायालयात सुध्दा आम्ही असे सादर केले की, एक-एक क. अभियंता आम्ही प्रत्येक झोनमध्ये ठेवले जे की, त्यांनी अनाधिकृत नळ शोधणे तसेच एखादा व्यावसायीक बाजुच्या घरगुती नळाचे पाणी वापर करतो तो सुध्दा अनाधिकृतपणे पाण्याचा वापर होतो असे आपण समजु शकतो असे १०.१२ हजार नळ कनेक्शन असावयास पाहिजे हे कुणी ही सांगु शकेल. यात सुधारणा कशी करायची हा मुद्दा आपल्या समोर आहे. नगर परिषदेच्या काळापासुन ही परिस्थिती निर्माण झाली असुन हा मुद्दा आपल्या समोर आहे. नगर परिषेदेच्या काळापासुन ही परिस्थिती निर्माण झाली ही आमची परिस्थिती नाही. गेल्या १० वर्षातील हे सर्व अनाधिकृत झालेले असावेत म्हणुन आता प्रत्येक झोन मध्ये एक क. अभियंता त्यांचे सोबत २ सबशीअर तसेच त्यांचे सोबत ३-४ मजुर असा ग्रुप तयार केला. त्यांना नळ कट करण्याची परवानगी दिलेली आहे. तेच कर्मचारी कमर्शियल नळ कनेक्शनचा सर्वे करतील परंतु एक प्रश्न असा उपस्थित झाला की, कमर्शियल नळाचा सर्वे करावा की, खाजगी संस्थेमार्फत करावा. असा प्रश्न उभा आहे. म्हणुन एक प्रस्ताव आपण मंजुर केला त्यात दंडाची रक्कम वाढविण्यात आलेली आहे. अभय योजनेनुसार १२५०/- रु. भरुन मिळतो. या योजनेत न आल्यास व नळ अनाधिकृत आढळुन आल्यास १०००/- रु. दंड भरावा लागतो म्हणुन दंड भरुन नळ कनेक्शन घेणे परवडणारे नाही. त्यासाठी अभय योजनेत आल्यास फायदाच आहे. अनाधिकृत नळ शोध मोहीम राबवुन कोर्टापुढे अहवाल ठेवावयाचा आहे. म्हणुन ही मोहीम राबविणे बंधकारक आहे. फौजदारी केस दाखल करण्यात येईल हा मुद्दा मांडला परंतु सर्वावरच फौजदारी केस करुन योग्य होणार नाही मोठया पाईप लाईन द्वारे कनेक्शन घेतले अशावर फौजदारी करायची. अशा अनाधिकृत नळ धारंकावर

कार्यवाही करण्यासाठी नगरसेवक तसेच प्रशासनाचा सहभाग तेवढाच असावा तरच सफल होवु शकेल.

**श्री प्रशांत देसरडा :** जिल्हा परिषदेमध्ये ३ नळ कनेक्शन असुन रेकॉर्डवर एकच दिले शासनाचे कार्यालयातच २००,३०० नळ कनेक्शन अनाधिकृत आहेत.

**मा. आयुक्त :** यापेक्षाही जास्त अनाधिकृत नळ कनेक्शन शकती. जे पाणी शहराला सध्या देण्यात येते. त्याचे प्रमाणपत्र इतर शहरामध्ये जास्त आहे. ज्यांनी अनाधिकृत नळ घेतले असेल व ते मेन लाईनमन वरुन घेतले असेल अशा व्यक्तींवर का फौजदारी गुन्हा करण्यात येवु नये. ती सुध्दा कार्यवाही अशा नागरीकांवर यापुढे करण्यात येईल.

**श्री किशोर शिंदे :** नळाला पाणी सोडले जाते त्यावेळेस पाहणी केली जावी.

**मा. सभापती :** ज्या ज्या वेळी पाणी सोडले जाते त्यावेळी पाहणी करावी. बरेच अनाधिकृत कनेक्शन दिसुन येतील व या कामासाठी मोठा कर्मचारी वर्ग द्यावा.

**मुख्य लेखाधिकारी :** पाणी पट्टी दर करण्या संदर्भात दरवर्षी प्रस्ताव येतो. पाणी प्रश्न हा जिव्हाळयाचा आहे. तसेच मोठया प्रमाणात उत्पन्न प्राप्त होण्याचा सुध्दा भाग आहे. प्रस्ताव सादर केल्यानुसार ती दर वाढ मंजुर होत नाही. कमी प्रमाणात होते काही वेळा दर वाढच केली जात नाही. नेहमीच येतो पावसाळा अशी परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे दरवर्षी दरवाढीचा प्रस्ताव आणण्याची गरज पडते. आताच अनाधिकृत नळ कनेक्शन बाबत चर्चा झाली. सर्वेक्षणाच्या माध्यमातुन यावर सर्व उपाय योजना करणार आहोत. थकबाकी वसुली करण्यासंदर्भात उपाय योजना करणार आहोत. थकबाकी वसुली करण्या संदर्भात उपाय योजना करणार आहोत. मुळात जे खर्च यावर होतो तो तरी वसुल करण्यासाठी पाणी पट्टी दरवाढ करणे अनिवार्य आहे. पाणीपुरवठ्याचा खर्च २९.६० कोटी घेतो. उत्पन्न फक्त १४३९ कोटीच होते. यात जवळपास १५.२० कोटी रु. तोटा होतो. वसुली झाली नाही तर विकास कामे करण्यास पैसा नसतो. नंतर अमुक काम राहिले असे बोलले जाते. इतर मार्गांनी जी वसुली होती ती विकास कामावर खर्च केली जाते या योजनेत १४ कोटीचे डिमांड १८ कोटी एम.एस.ई.बी. ला भरणा करतो. म्हणुन या विषयात गांभीर्याने चर्चा करुन कार्यवाही करावी. आता नमुद केलेली दरवाढीनुसार महिन्याला २२५ रु. पडतात. इतर बाबतीत विचार केल्यास केबलसाठी नागरीक २०० रु. महिन्याला भरतात. टेलीफोन बील २५० रु. दर महिन्याला येते. जी दर वाढ प्रस्तावित केली ती बरोबर असुन मान्य करावी.

**श्री प्रशांत देसरडा :** २७०० रु. प्रस्तावित केले तसे मत प्रशासनाचे आहे. खर्चाचा विचार केल्यास एक नळ कनेक्शन वर ३५०० रु. दरवर्षी खर्च येतो. असे माझे मत आहे. या बाबतीत निर्णय होतांना राजकारण समाजकारण याचा विचार करुन निर्णय घ्यावा लागतो. पाणपट्टी काहीतरी प्रमाणात वाढ झाली पाहिजे. या मता ाशी मी सहमत असुन मागच्या बजेटच्या वेळी दरवाढ नाही त्यानंतर का होईना प्रशासनाने दर वाढीचा प्रस्ताव आणावयास पाहिजे होता. परंतु तसा प्रस्ताव न देता आता एकदम २ ते २५ पटीने वाढ करण्यात येते. म्हणुन २७०० रु. दरवाढीचा प्रस्ताव नागरीकांच्या हिताच्या दृष्टीने योग्य नाही. गेल्या बजेटनंतर दर ६ महिने किंवा ३ महिन्याला २००-३०० ची वाढ केली असती तर आजच्या घडीला १७००-१८०० पाणीपट्टी वाढ करण्यास

अडचण आली नसावी. नागरीकांनी सहजरित्या भरणा केली असती. एकदम वाढ करण्याऐवजी विकास कामाच्या दृष्टीने थोडयाफार प्रमाणात वाढ करणे योग्य आहे.

**श्री जयवंत ओक :** जनता आम्हाला कशासाठी निवडुन देते हा प्रश्न पुढे येतो. १२०० रु. एकदम २७०० रु. करणे बरोबर नाही. प्रशासनाने जो प्रस्ताव ठेवला त्या संबधी येथे कोणीही राजकारण करुन नये. या मताशी सहमत आहे. प्रशासनाने दर वाढ करण्याचे सुचविले परंतु मुबलक पाणी देण्याचे आश्वासन देत नाही. मनपाची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. वार्डात विकास कामे करावी लागतात. जनतेला ड्रेनेज, लाईट, पाणी, रस्ते या सुविधा देणे हे मनपाचे कर्तव्य आहे. प्रत्येक वेळेस १०० ते १२५ रु. वाढ केली असती तर आज २७०० रु. वाढीचा प्रस्ताव आला नसता. असे माझे मत आहे. प्रशासन सुध्दा कोठेतरी चुकते हे प्रशासनाने लक्षात घेतले पाहिजे. प्रस्ताव आणायचा सभागृहाचे मत घ्यायचे मंजुर झाला की, नागरीकांच्या डोक्यावर एकदम बोजा करुन ठेवणे बरोबर नाही. असे केल्यास जे कर भरतात ते सुध्दा वेळेवर भरणार नाहीत. याचा सुध्दा विचार झाला पाहिजे. या शहराला ११०एम.एल.डी. पाणीपुरवठा होतो असे वृत्तपत्रात येते. एवढे पाणी खरोखरच येत असेल तर शहराला पाणी पुरुन उरेल तसेच यातुनच सिडको-हडको भागात सुध्दा २०-२१ एम.एल.डी. पाणी दिले गेले तर पुरे होवु शकते. परंतु प्रशासनाचे नियोजन नसल्याने ही परिस्थिती काही ठिकाणी १५ मिनीटे पाणी पुरवठा होतो. नियोजन करायची जबाबदारी कुणाची हा प्रश्न आहे. यासाठी प्रशासन जागरुक का रहात नाही. अभय योजना राबविण्यात येते. सरकारी नळांना तोटया नाहीत पाणी वाया जाते. पाणी सोडणाऱ्या मॅनेज केले तर ३-३ तास पाणी सोडले जाते. दर वाढीला माझा विराध नाही वाढ करणे आवश्यक आहे परंतु ती करीत असतांना जनतेला अगोदर पाणी देणे आवश्यक आहे. पाणी नाही म्हणुन लोक मोटार लावुन पाणी घेतात. शहरात जवळपास ५० टक्के लोक मोटार लावुन पाणी घेतात. जायकवाडी पासुन जो पाणी पुरवठा घेतो तेथुन सर्वे करावा. ७००, १४०० चे ४-४ पंप तेथे चालतात रिपेअरींग बदल केला असेल. अर्धेपाणी तेथेच वाया जाते. १४०० च्या वाहीनीने जे पाणी ते पुर्णतः येत नाही. जलसाठे नियमीत भरले पाहिजेत. एखादया वेळेस या जलसाठयातुन पाणी घेता येईल. टाक्यांची सफाई किती दिवसांनतर होते. बऱ्याच वेळा पक्षांचे पंख मांसाचे तुकडे नळामधुन येतात गढुळ पाणी येते. त्यामुळे नागरीकांची ओरड होते. जी पाण्याची गळती होते. त्यासाठी एम.आय.डी.सी. भागातील नळ कनेक्शनची तपासणी व्हावी. त्यांना किती पाणी दिले जाते व वसुली किती होते याचा विचार केला पाहिजे. या शहरात ११०० ते १५०० हॉटेल्स असतील सर्वे केल्यास होणारा खर्च तरी मनपास मिळेल का याचा सुध्दा विचार व्हावा म्हणुन पाणी पट्टी २०० रु. वाढ करुन १२०० ऐवजी १४०० रु. करावी. जनतेच्या तक्रारीची दखल घेतली पाहिजे. नसता मोर्चे अंदोलन होता होतात. उन्हाळयात पाण्याला प्रश्न निर्माण होणार आहे. पाणी वाढविण्यासाठी जनजागरण मोहिम राबविली पाहिजे.

**श्री किशोर शिंदे :** अगोदर जनतेला पाणी द्या नंतर दर वाढ करा. माझ्या वार्डातील ५० टक्के नागरिक मोटारीने पाणी भरतात. सर्वांना सारखे पाणी मिळाले पाहिजे. ज्यांना पाणी मिळत नाही ते कर भरण्यास पुढे येत नाहीत. म्हणुन प्रशासनाने नियोजन करावे. २०० रु. वाढ करावी.

**श्रीमती पार्वती मानकापे :** पाणी सोडताना नियोजन नसल्याने कमी जास्त प्रमाणात पाणी सोडले जाते.

**श्री हिदायत अली :** पाणी पट्टी वाढविण्यास हरकत नाही. जनतेला मुबलक पाणी दिले जाते. २-२ जे. ई. काम करतात. माझ्या वार्डातील पाण्याच्या बाबतीत माहीती दिली तरी कार्यवाही होत नाही. कमी दाबाने पाणी येते.

**श्री जयवंत ओक :** यात अधिकाऱ्यांचा दोष नाही. पाणी सोडणाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

**डॉ. आशा बिनवडे :** शहरातील नागरीकांना मुलभूत सुविधा देण्याच्या दृष्टीने उत्पन्न बाजु बळकट करावी लागते. यात शंका नाही. राजकारण, भावनेचा प्रश्न येवु न देता आपल्याला निर्णय घ्यावा लागणार आहे. उत्पन्न व शुन्य व खर्च जास्त असे होवु नये. ही सेवा देण्याची जबाबदारी मनपाची असली तरी शेवटी किती तुट सहन करायची हा सुध्दा प्रश्न आहे. आताच मुख्य लेखाधिकारी यांनी एम.एम.ई.बी. टेलफोन बिलाच्या बाबतीत उदा. दिले ती वाढ अपरिहार्य असते. भरणे बंधनकार असते. म्हणुन कुणी बघत सुध्दा नाहीत. येणारे बिल भरुन टाकतात. परंतु पाण्याच्या बाबतीत तसे नसते. वर्षाला भरले तरी चालते. जनतेने स्वतः होवुन पाणी पट्टी किंवा मालमत्ता कर भरला पाहिजे. अशी मानसिकता निर्माण  झाली पाहिजे. प्रशासनाने पाणीपुरवठ्याचे नियोजन केले पाहिजे. वाटप व्यवस्थेत नियोजन करणे गरजेचे आहे. अनाधिकृत नळांचा बाबतीत कठोर निर्णय घेतलेले आहेत. १६ कोटींची तुट सहन करणार आहात का. काहीतरी वाढ करणे गरजेचे आहे. विदयुत बील दरसाल वाढतच जाणार आहे. एकदम बोजा पडणार नाही. दर महिन्याला वसुली भरणा करण्याचा निर्णय घ्यावा. १५० रु. महिन्याला आकाराचे १२ महिन्याचे १८०० होतील. भरणा न करणाऱ्यांकडुन वसुली होत नाही. अशी जनतेची भावना झालेली आहे. जे कर भरतात त्यांचेवर आपण कर लादतो. १५० रु. दर महिन्याला भरण्याचे आदेश करावेत त्यामुळे उद्देश सफल होईल. अनाधिकृत नळ धारकांवर अनाधिकृत नळ धारकांवर कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री जयवंत ओक :** एक महिन्यापुर्वी दोन-दोन महिन्याचे बील देवून कार्यवाही करण्याचे आदेश दयावेत.

**मा. सभापती :** आताच स. सदस्यांनी काही भागात येत नाही सुचना मांडल्या मी अधिकाऱ्यांच्या बाजु घेणार नाही. परंतु आपण भाग्यवान आहाते जे की, काही तरी पाणी आपणांस मिळते. परंतु काही भागाचा आपण विचार केल्यास त्यात चाळीसगांव, धूळे , सिल्लोड, वैजापुर भागात ४-६ दिवसातुन एकदा पाणी दिले जाते. पशी परिस्थिती या शहराची नाही. मा. विलासराव देशमुख यांचे शहरात सुध्दा ३ दिवसाआड मिळते म्हणुन या शहरातील जे नागरीक विदयुत मोटारीने पाणी घेतात त्या मोटारी जप्त करण्यात जो नियोजनाचा अभाव आहे. या बाबतीत कार्यकारी अभियंता यांनी तात्काळ कार्यवाही करावी.

**जयवंत ओक :** ९९ टक्के लोकांना मोटार लावुन पाणी घेण्याची गरज पडते. खाल खड्डयात जावुन सुध्दा पाणी मिळत नाही म्हणुन मोटारी लावुन पाणी घेतात त्यासाठी मुबलक पाणी दयावे त्यानुसार कार्यवाही करण्यासाठी नियोजन करावे.

**डॉ. आशा बिनवडे :** ज्या ठिकाणी पाणी दिल्या जाते तेथे एखादाच निवासी मोटार लावतो. अशा वेळी जप्तीची कार्यवाही करणे योग्य होईल. परंतु बऱ्याचशा भागात पाणीच मिळत नाही. म्हणुन लोक मोटार लावुन पाणी घेतात.

**कार्य. अभि. (पा.पु.) :** ९९ टक्के ठिकाणी मोटारीने पाणी घेतले जाते. अशी परिस्थिती नाही. बऱ्याच ठिकाणी मोटार लावल्याचे आढळुन आले. त्यानुसार कार्यवाही सुध्दा केली. एखादया गल्लीत २४ लोकांनी मोटारीने पाणी घेतल्यास पुढील घरांना पाणी मिळत नाही किंवा कमी पाणी मिळते. त्यामुळे तेथे खरोखरच पाणी मिळत नाही त्याची सत्यता पडताळुन कार्यवाही केली जाईल. मोटारी लावण्याची प्रथा अगोदर बंद करुन जेथे पाणी मिळत नाही त्याची प्रत्यक्ष पाहणी करुन कार्यवाही केली जाईल.

**श्री जयवंत ओक :** जनतेशी सुसंवाद करावा. एका एका वार्डात पाणी सोडण्याच्या वेळेस करावी. दोन दिवस अगोदर मोटारी लावु नये अशी सुचना त्या भागातील जनतेला दयावी. एका एका भागात जावुन पाणी कूठे येत नाही पाहणी करावी म्हणजे परिस्थिती समजुन येईल. उपाययोजना करुन समान पाणी वाटप केल्यास जनता साथ देईल.

**श्री पार्वती मानकापे :** अनाधिकृत नळ कनेक्शनचा सर्वे करावा. मोटारी लावुन जे पाणी घेतात त्यांना पाणी मिळते की नाही याची चौकशी पाणी सोडल्यावरच कळेल. ज्या भागात पाणी सोडले जाते त्यावेळी विदयुत पुरवठा बंद करायला पाहिजे. जेणे करुन सर्वेचे काम तात्काळ होईल.

**मा. आयुक्त :** एम.एस.ई.बी. चे दर महिन्याला १.४० किंवा १.५० कोटी बील येते ते भरायचे कोठुन हा प्रश्न आहे. मागच्या थकबाकीबद्दल शासनाकडे काय कार्यवाही केली हा त्यांच्या कमेटीचा भाग आहे. महाराष्ट्रात आपली एकमेव महापालिका अशी आहे की, जिथे पाणी भरपुर आहे. परंतु त्यावर खर्च जास्त आहे.

**मा. सभापती :** दर ६ महिन्याला एम.एस.ई.बी. चे बील वाढत आहे. हा पैसा कोण भरणार आहे.

**श्री जयवंत ओक :** एस.एस.ई.बी. चे देणे आहे तर मोठमोठे प्रकल्प घेण्याची आवश्यकता नाही जनतेला मूलभूत सुविधा कशा देता येतील याकडे लक्ष दयावे.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे त्या संदर्भात कार्यकारी अभियंता यांना सुचना करेल की, त्यांनी या सर्व बाबींवर निरिक्षण करावे. शोध घ्यावा. लोकांना सुचना कराव्या व योजनेची अंमलबजावणी करावी. सर्वाच्या भावना लक्षात घेवुन या शहराचा विकास कसा गतीने करता येईल व एम.एस.ई.बी. चे बील कशा रितीने भरता येईल यासाठी दरमहा १७५ रु. प्रत्येक नळ धारकांकडुन घेण्यात यावे. अशी प्रशासनाला सुचना करतो. घरगुती नळासाठी हा निर्णय घेतलेला आहे. उर्वरीत जसेच्या तसे दर ठेवण्यात येतात.

**डॉ. आशा बिनवडे :** सामान्य नागरिकांवर एवढा बोजा टाकु नये. एकदम ९०० वाढ करणे अन्याय केल्यासारखे होईल. त्यामुळे जनता पाणीपट्टी भरण्यास पुढाकार घेणार नाही.

**श्री प्रशांत देसरडा :** क. ५ मध्ये दोन इंची नळ कनेक्शनला ६१५० रु. होते ते आता ५०००० करण्यात आले. डोळे झाकुन मंजुर केल्यासारखे होईल. एवढी रक्कम ठेवल्यास १० नळ कनेक्शन सुध्दा रहाणार नाहीत नाहीत कमी करावेत.

**कार्य. अभि. (पा.पु.) :** याचे दर कॅलक्युलेशन करुनच काढलेले आहेत. असे नळ कनेक्शन सर्वसामान्य नागरीकांचे नाहीत मोठमोठया संस्था, अभियांत्रिकी महाविदद्यालय असे नळ कनेक्शन आहेत. यात काही सरकारी कार्यालये सुध्दा असतील.

**श्री जयवंत ओक :** ६०० रुपयांच्यावर वाढ करु नये. नसता आमचा विरोध राहील अर्धा इंची दिड.

**श्री प्रशांत देसरडा :** इंची पर्यंत ६०० रु. वाढ करावी.

**कार्य. अभि. (पा.पु.) :** अर्धा अंची नळातील जे पाणी येते त्यापेक्षा ४ पटीने दीड इंची नळातुन येते.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे** : अर्धा इंची घरगुती नळ कनेक्शन जास्त आहेत त्यावर जास्तीचा बोजा टाकु नये. जे रेग्युलर कर भरतात त्यांवर बोजा टाकला जातो. वाढ करण्यास विरोध नाही. परंतु जास्त वाढ करु नये.

**डॉ. आशा बिनवडे :** ९०० रु. वाढ जास्त होते. ६०० रु. कराची उत्पन्न वाढ व्हावी म्हणुन पाणीपट्टी वाढ करीत आहोत. उत्पन्न वाढविण्याचे सोर्सेस आहेत.

**श्री प्रशांत देसरडा :** जे देणार आहेत त्यांचेवरच बोजा लादतो आहोत जे देत नाही.

**श्री जयवंत ओक :** त्यांचेकडुन का वसुल केले जात नाहीत. ६०० वाढ स्विकारण्यास मान्यता व्हावी. प्रत्येक महिन्याला १५० वसुल करावे किंवा दोन महिने मिळुन करावेत. ६०० रु. च्या वर वाढ करु नये. नसता आमचा विरोध आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** एकाच बाबीतुन उत्पन्न वाढविण्याच्या जास्त प्रयत्न नसावा. जास्त प्रमाणात वाढ केल्यास जनता भरणा करणार नाही. मनपाच्या मालकीच्या कोर्टाच्या मालमत्ता बांधुन आहेत. भाडेतत्त्वावर देत नाही. डिपॉझिट होत नाही. त्याकडे लक्ष दिले जात नाही. जो सामान्य माणुस आहे. त्याच्यावर जास्त प्रमाणात पाणीपट्टी वाढविणे योग्य होणार नाही.

**श्री प्रशांत देसरडा :** मनपाच्या रिकाम्या पडलेल्या मालमत्ता असुन रेडीरेक्नर प्रमाणे कुणी घेण्यास तयार नाही. दर कमी करावयास पाहिजे. तर उत्पन्न मिळु शकेल वेळेवर कार्यवाही झाली नाही तर नागपुर मनपात जशी चौकशी करण्यात आली त्याप्रमाणे कार्यवाही.

**मा. सभापती :** १७५ दरमहा पाणीपट्टी भरावी निर्णय घेतलेला आहे.

**श्री हिदायत अली :** सर्वांना सारखेच दर असु नये फरक ठेवावा नसता सर्वच लोक एक इंची नळ कनेक्शन घेतील.

**मा. सभापती :** अर्धा इंची नळासाठी ६०० रु. पाऊण इंची नळासाठी ९७५ तर एक इंची नळासाठी २२७५ ने वाढ करण्यात येते. उर्वरीत तक्ता क्र. २ मध्ये अनुक्रमांक ४ ते ८ साठी प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या दरास मान्यता देण्यात येते.

**श्री प्रशांत देसरडा :** पान क्र. ९ वर पिण्याचे पाणी टँकरद्वारे पुरविणे मध्ये रा.प. मंडळ यांना ७५ रु. ऐवजी १३५ केलेले आहेत हे २०० रु. करावेत.

**मा. सभापती :** ठिक आहे. राज्य परिवहन मंडळास १३५ ऐवजी २०० रु. करण्यास मंजुरी देण्यात येते. उर्वरीत सर्व दर कायम करण्यात येतात. पाणीपट्टी वसुलीचे उद्दीष्ट १७कोटी ऐवजी १८ कोटी करण्यात येते. तसेच पाणीपट्टी दर वाढीमुळे येणारे ८ कोटी उत्पन्न गृहित धरुन एकुण २८ कोटी वसुल करावेत. क. ३ व ५ वर निर्णय घेतला क. ४ च्या संदर्भत चर्चा झाल्यानुसार प्रशासनाने मालमत्ता व पाणीपट्टी थकबाकी वसुलीची मोहिम प्रभावीरित्या राबवावी.

**सिध्दार्थ उद्यान व इतर उद्याने प्रवेश शुल्क व इतर दरवाढ प्रस्ताव**

**श्री हिदायत अली :** लहान मुलांसाठी १ रू प्रवेश फि दर्शविण्यात आली ती रद्द करावी. प्रौढा करिता ३ रु करण्यात यावेत.

**मा. सभापती :** लहान मुलांसाठी प्रवेश मोफत ठेवावा. प्रौढांसाठी ३ रु. करण्यात येते. उर्वरीत अ. क्र. २ ते ५ मंजुर करण्यात येते.

**पशु संवर्धन विभागाशी सबंधीत दर वाढ प्रस्ताव**

**श्री.हिदायत अली :** बकरा बकरीसाठी ४५ रु. फिस असु दयावी. ७५ नमुद केले ती रद्द करावी.

**मुख्य लेखाधिकारी :** यापासुन उत्पन्न वाढविण्याचा उद्देश नाही. जनतेला शिस्त लागावी स्वतःची जनावरे त्यांनी सांभाळावीत यासाठी आहे.

**मा. सभापती :** मान्यता देण्यात येते.

**रोड कटींग चार्जेस वसुलीबाबत प्रस्ताव**

**मा. सभापती :** मान्यता देण्यात येते.

**व्यापारी नळ कनेक्शन घेणाऱ्यावर फौजदारी कार्यवाही करणे :**

**मा. सभापती :** मान्यता देण्यात येते.

**अनाधिकृत नळ कनेक्शन शोधमोहीम विभागीय बक्षीस योजना**

**मा. सभापती :** मान्यता देण्यात येते.

**विकास शुल्क निधी वसुलीबाबतचा प्रस्ताव**

**मा. सभापती :** मान्यता देण्यात येते.

**श्री प्रशांत देसरडा :** मान्यता देवु नये. १०० रु विकास शुल्क लावतो.

**मुख्य लेखाधिकारी :** खर्चाचा विचार केल्यास १८० रु. येतो. एखादया जागेवर विकास करावयाचा झाल्यास नवीन डी.एस.आर. नुसारच करावा लागतो.

**मा. सभापती :** १८० करण्यात येते. जो सेल्फ डेव्हलपमेंट करणार असेल त्यांचा प्रश्न येत नाही. विकास करावयाचा झाल्यास आजच्या डि.एस.आर. नुसार करावा लागतो.

**श्री प्रशांत देसरडा :** १८० रु. आकारण्यात येवु नये. कमी करावे नसता माझा विरोध आहे.

**प्रसुतीशुल्क व बाह्य रुग्ण नोंदणी फि मध्ये वाढ करणे**

**डॉ. आशा बिनवडे :** यामध्ये क्र. ४ वर प्रचलित दर ५० आहे. प्रस्तावित मध्ये मोफत का करण्यात आले. उत्पन्नाच्या बाबीमध्ये असे करु नये. यासाठी वेगळया योजना आहेत. पहिल्या वेळेस आपल्याकडे येतील. दुसऱ्या तीसऱ्या बाळंतपणाला मेडीकल कॉलेजला जातील. आपल्याकडे कुणीही येणार नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** याचे प्रयोजन असे आहे की, प्रथम वेळेसची डिलेवरी स्त्रीला महत्त्वाची असते. मातेचा मृत्यु तसेच अपाय न होण्याचे दृष्टीने शासनाने प्रथम डिलेवरीसाठी उद्दीष्ट ठेवलेले आहे व शासन नियमानुसार प्रस्ताव ठेवलेला आहे.

**श्री हिदायत आली :** २ अपत्यासाठी शासन मान्यता सवलती देते. तिसऱ्या बाळंतपणासाठी ५०० रु. करावे.

**मा. सभापती :** अनु. क्र. ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पहिले बांळतपण ५० होते. त्यास मोफत न ठेवता ५० रु. करण्यात येत आहे. दुसरे बाळंतपण १०० आणि तिसरे व त्यानंतरच्यासाठी ५०० रु. करण्यात येते. उर्वरीत सर्व दर प्रस्तावित नुसार मान्य करण्यात येतात.

**गुंठेवारी अंतर्गत वस्त्यात टँकरद्वारे पाणी पुरवठा शुल्क आकारणे :**

**मा. सभापती :** या संदर्भात सबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** बऱ्याच अनाधिकृत वस्त्यात पाणीपुरवठा मनपामार्फत केला जात नाही व कोणत्याही विकासाच्या सुविधा अशा वस्त्यात देवु नये हे शासनाचे धोरण अवलंबिले आहे. अशा परिस्थितीत सध्या काही वस्त्या मनपातर्फे पाणी पुरवठा केला जातो. यावर ८०-८२ लक्ष रु. खर्च मनपास करावा लागतो. यातुन मनपास कोणतेही उत्पन्न प्राप्त होत नाही. यानंतर अशा वस्त्यात पाणीपुरवठा करता येणार नाही. जे शासनाने अशा वस्त्यामध्ये गुंठेवारी कायदा लागु करता येणार नाही. जे शासनाने अशा वस्त्यामध्ये गुंठेवारी कायदा लागु करण्याचे आदेशित केले आहे. २८ फेब्रूवारी २००३ पर्यंत त्या वस्त्याचे गुंठेवारी कायदयानुसार कार्यवाही होईल त्याच वस्त्यांना पाणीपुरवठा करता येईल. जो पर्यंत महानगरपालिका या वस्त्यांत पाणी पुरवठा योजना करीत नाही. इतर सुविधा देवु शकत नाही व तो पर्यंत जो घेणारा टँकरद्वारे पाणीपुरवठा याचा खर्च वसुल करण्यासाठी प्रत्येक घरास ६०० रु. या प्रमाणे आकारणी करण्याचा हा प्रस्ताव आहे. या प्रस्तावास मान्यता द्यावी. अशी प्रशासनातर्फे विनंती आहे.

**श्री जयवंत ओक :** पाणी हा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. शासनाचे डायरेक्शन असतील मनपा ही स्वायत्त संस्था आहे. आपला निर्णय घ्यावा. कोर्टाचे आदेश नाही. हा विषय येथे आणण्याची गरज नव्हती. तो रद्द करावा. शासन मोठमोठया योजना राबविते. पाणी बंद करावे असे म्हणु शकत नाही. प्रशासनाकडे तसे आदेश आहे का? आता पर्यंत अनाधिकृत वस्त्यात पाणी देत आलो. यानंतर ही दयावे लागणार आहे. जनतेला अडथळा व अडचणीत येवु नये.

**मुख्य लेखाधिकारी :** अनाधिकृत वस्त्यात कोणत्याही सुविधा पुरविण्यात येवु नये असे शासनाचे धोरण आहे. देखभाल दुरुस्तीची कामे सुध्दा त्या भागातील बंद केली आहे.

**श्री जयंवत ओक :** ड्रेनेज लाईट ई. सुविधा तर देत आहे. १४ वर्षापासुन या वस्त्यात मोफत करीत आहोत. ६०० रु. प्रत्येक घरास कशा पध्दतीने आकारली जाणार

आहे. प्रत्येक व्यक्ती म्हणेल मला पाणीच मिळाले नाही. कसे वसुल करणार कुणीही देण्यास तयार राहणार नाही. शासनाचे तसे पत्र नाही. काही पाणीपुरवठा बंद करतो.नसता शासनास पत्र द्यावे. तसे पत्र शासनाचे मागवावे. पाणीपुरवठा बंद करण्याचे आदेश शासन देते की नाही. हा प्रस्ताव मंजुर केल्यास माझा विरोध नोंदवावा. २४ फेब्रुवारीच्या नंतर हा विषय यावयास पाहिजे होत सर्वसाधारण सभेत ठेवावा. निर्णय घेता येईल. तुर्त स्थगित ठेवावा.

**मुख्य लेखधिकारी :** ३१ मार्च नंतर यानुसार कार्यवाही होणार आहे. पुढील वर्षाचे बजेट मंजुर करीत आहोत.

**मा. सभापती :** मान्यता देण्यात येते.

**श्री जयवंत ओक :** जनतेला विश्वासात घेतले नाही. फक्त पुंडलीकनगर भागात पाणी चालु आहे. तसेच राजु शिंदे सदस्य यांचे वार्डात आतापर्यंत १४ वर्षापासुन पाणी देत आलो. एवढे काय नुकसान मनपाचे यामुळे होणार आहे. जनतेला नाराज करु नये. माझ्या आपल्या निर्णयास विरोध असुन मी निषेध करुन सभागृह सोडतो आहे. (त्याच वेळी स. सभासद श्री जयवंत ओक सभागृहाबाहेर जातात.)

**विना परवानगी जाहीरात फलक व रस्त्यावर कमानी उभारण्यास दंड आकारणे :**

**मा. सभापती :** मान्यता देण्यात येते.

**उघडयावर घाण टाकणे शौचास बसणे यावर दंड आकारणी करणे :**

**मा. सभापती :** मान्यता देण्यात येते. उत्पन्न बाजुवर दि. २९/०२/२००३ रोजी सकाळी ११.३० वाजता बैठक आयोजित करण्यात येते. सर्वांनी उपस्थित रहावे. तोपर्यंत सभा तहकुब करण्यात येते.

| | |
|---|---|
| नगरसचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद | मा. सभापती<br>स्थायी समिती महानगरपालिका,<br>औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**(अर्थसंकल्पीय सभा)**

**दिनांक २१.०२.२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त**

**दिनांक १५.०२.२००३ रोजी स्थगित झालेली स्थायी समिती सभा (अर्थसंकल्पीय बैठक ) दिनांक २१.०२.२००३ रोजी सकाळी ११.३० वाजता सभापती श्री रतनकुमार पंडागळे हयांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली. या सभेस खालील सन्माननय सदस्य, उपआयुक्त (प्र) मुख्य लेखाधिकारी व इतर विभाग शाखा प्रमुख उपस्थित होते.**

१) श्री देसरडा प्रशांत सुभाष
२) श्री मीर हिदायत अली मीर बसालत अली
३) श्री शेख इलियास किरमाणी
४) श्री औताडे रावसाहेब ममतु
५) श्री ओक जयवंत केशवराव
६) श्री फुलारी नंदकुमार माधवराव
७) डॉ. आशा उत्तम बिनवडे
८) सौ. जेजुरकर ताराबाई सुधाकर
९) सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश
१०) श्रीमती मानकापे पार्वती लहानु
११) श्री चंद्रशेखर जैस्वाल
१२) श्री कैसरखान बद्रादिन खान
१३) श्री वाणी ठकूजी रामसिंग

**संवाद :**

**मा. सभापती :** दि. १५.०२.२००३ च्या स्थायी समिती सभेत अर्थसंकल्पातील उत्पन्नाच्या बाजुवरती चर्चा करण्यात आली होती. आजच्या बैठकीत कोणास उत्पन्नाच्या बाजुवरती बोलायचे असल्यास बोलावे.

**डॉ. आशा बिनवडे :** उत्पनाच्या उर्वरीत बाजुवरती आपण विचार करीत आहोत. उत्पन्न वाढविण्यासाठी आपणांस इतर रिर्सोससाठी विचार करावा लागेल. अशा रिर्सोसमधुन मिळणाऱ्या उत्पन्नाचाही विचार करावा. लागेल. अर्थसंकल्पाचे पुस्तीकेतील पृष्ठ क्र. ३७ व ३८ पहावे. कराच्या व्यतिरिक्त मनपाच्या मिळकतीपासुन मिळणारे उत्पन्न दर्शविलेले आहे. भाजी मंडई, आठवडी बाजार यापासुन सन २०००-२००१ साली जास्त उत्पन्न झालेले दिसुन येते. मात्र यावर्षी या हेड खाली कमी उत्पन्न दर्शविण्यात आलेले आहे. दुकानांचे भाडे हे फिक्स आहे तर मग त्यापासुन मिळणारे उत्पन्न कमी दर्शविण्याचे कारण काय? मागील दोन-तीन वर्षातील आकडेवारी पाहिली तर टार्गेट कमी कमी का होत आहे?

**मुख्य लेखाधिकारी :** टार्गेट कमी झालेले नाही. बरीचशी दुकाने डिपॉझीट तत्वावर दिली जातात. मागील काही वर्षात दुकान, जागा भाडे व डिपॉझीट यांचे वर्गीकरण न होता ते एकत्रीत दाखविण्यात आल्याने वसुली जास्त असल्याचे दिसुन येते. दोन वर्षापुर्वी नवीन दुकाने बांधुन भाडयाने देण्यात आलेली होती.

**डॉ. आशा बिनवडे :** ज्या मालमत्तांपासुन शुन्य उत्पन्न मिळणार आहे. त्यांच्या बाबत आपण काय करणार आहोत. आपल्या काही मालमत्ता या डेड इन्व्हेस्टमेंट आहेत. ज्या मालमत्तांपुन शुन्य उत्पन्न आहे. अशा मालमत्ताबाबत आपण काय करणार आहोत. याबाबत मी मागील २-३ वर्षापासुन प्रश्न मांडत आहे. काही प्रॉपर्टीजचे आपण पुन्हा पुन्हा ॲक्शन करत आहोत. परंतु त्या भाडयाने दिल्या जात नाहीत. या प्रॉपर्टीजसाठी भाडे फिक्स करुन दिल्यास मनपाच्या उत्पन्नात निश्चितच भर पडु शकेल.

**मुख्य लेखाधिकारी :** जवाहर कॉलनी सादिया मार्केट हर्षनगर या मार्केट मधील काही गाळे/दुकाने भाडयाने गेलेली नाहीत. प्रशासनातर्फे यावर विचार करुन भाडे समितीसमोर ठेवुन त्यांचे रेटस् रिवाईज करण्यात येतील. या आर्थीक वर्षात करावयांच्या कामाबाबत सबंधीत विभागास कळविण्यात येत आहे. पुढील अर्थसंकल्पात ही त्रुटी दिसुन येणार नाही.

**श्री नंदकुमार फुलारी :** महानगरपालिकेची एकुा विश्रामगृहे किती आहेत? यापासुन मनपास किती भाडे मिळते? याचा खुलासा व्हावा.

**डॉ. आशा बिनवडे :** शहरात अनेक प्रकारचे व्यवसाय चालतात. कोणकोणत्या व्यवसाय धारकांना मनपाचे लायसन्स घेणे कंपल्सरी करणे आवश्यक आहे. याची माहिती देण्यात यावी. अशा प्रकारच्या लायन्सकडुन मनपास मोठया प्रमाणात उत्पन्न मिळु शकेल.

**श्री प्रशांत देसरडा :** गतवर्षी जलतरण तलावाचे उत्पन्न १०.७६ लाख अपेक्षीत होते. यावर्षी यापासुन २० लाखाचे उत्पन्न अपेक्षिले आहे. मागील वर्षी जलतरा तलावाचे रेट डबल करण्यात आले होते. यामुळे पोहण्यास येणारांची संख्या कमी झाली. त्यामुळे उत्पन्न घटले आहे काय? आपण ज्या प्रमाणात फिस घेतो त्या प्रमाणात तेथे फॅसिलिटीज देतो काय? नागरीकांच्या याबाबतीत रोष आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी सभासद संख्या किती आहे? त्यात काही तफावत आहे काय?

**अति. शहर अभि.** : फिस रु. १२ हजार वरुन रु. २० हजार करण्यात आली होती. त्यामुळे सभासदांत वाढ झालेली नाही. आतापर्यंत रु. १५ लाख एवढी रक्कम वसुल झालेली आहे. जलतरण तलावावरती आपण सर्व प्रकारच्या सुविधा देत आहोत.

**श्री प्रशांत देसरडा :** जलतरण तलावावरील मोटारी बंद पडलेल्या आहेत. या किती दिवसांपासुन खराब आहेत. पुर्वी आपला तलाव सर्वात चांगला मानला जात होता आता नाही हेल्थ क्लबही चालु नाही.

**अति. शहर अभि. :** सध्या जलतरण तलावाचे काम चालु आहे. मागील १५ वर्षात तेथे कोणतेही काम झालेले नव्हते.

**श्री प्रशांत देसरडा :** जलतरण तलावावरती प्रशिक्षणासाठी सोय नाही. सभासद शुल्क वाढवल्यामुळे बरेचशे सभासद सोडुन गेलेले आहेत.

**श्री नंदकुमार फुलारी :** या तलावाची साफसफाई एक वर्षापुर्वीच व्हावयास हवी होती. जलतरण तलावावरील व्यवस्था बरोबर नसल्याने विदयापीठ तसेच पोलीस दलाच्या स्पर्धा यावर्षी आपल्या तलावावर होवू शकल्या नाहीत. त्यामुळे आपले उत्पन्नही बुडाले.

**अति. शहर अभि. :** मागील वर्षी या स्पर्धा आपल्याकडेच झालेल्या होत्या. तेथे सध्या काम चालु आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** अंदाजपत्रक पृष्ठ क्र. ३८, बाब क्र.६, नाटयगृह, वसंतभवन, नेहरुभवन, संत एकनाथ रंगमंदीर, सर सय्यद हॉल ई. चे मागील वर्षाचे उत्पन्नापेक्षा यावर्षीचे उत्पन्न कमी प्रमाणात दाखविले आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** डिसेंबर पर्यन्तच्या जमा खर्चाचा आढावा घेवुन पुढील उत्पन्न धरले जाते. यामध्ये उत्पन्न कमी जास्त होत असते.

**मा. सभापती :** अर्थ संकल्पाची सभा चालु असतानांही मालमत्ता अधिकारी श्री गिरी सभागृहात उपस्थित नाहीत. प्रशासनाने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी.

**डॉ. आशा बिनवडे :** मनपाने ज्या उद्देशाने नाट्य मंदीर बांधलेले आहे. त्याप्रमाणे नाट्य चळवळीस प्रोत्साहन दिले पाहिजे. आपण स्वत: तेथे भेट दिलेली आहे. मागील २-५ वर्षा पासुन नाट्यसेवा संस्थेच्या नावाने दर सोमवारी बुकींग केले जाते. परंतु तेथे कमर्शियल मिटींग्ज घेतल्या जाता व त्यासाठी रु. १८००/- भाडे भरले जाते. त्यांनी प्रत्यक्षात रु. २५००/- भाडे भरावयास हवे. मागील २-५ वर्षात नाटयसेवा संस्थेने मनपाचे साधारण: एक लाख रुपयांचे उत्पन्न बुडवले आहे. ज्या परपजसाठी रंगमंदीर बुक केले त्या परपजसाठी ते वापरले गेले नाही. या संस्थेच्या विरुध्द आपण काय कार्यवाही करणार आहात. मनपाचे बुडालेले उत्पन्न आपण त्यांच्याकडुन कशा पध्दतीने वसुल करणार आहात. तेथे अेरवेजच्या कमर्शियल बैठका चालतात. रंग मंदीरात घेणाऱ्या नेटवर्क, स्वदेशी यांच्याकडुन मात्र आपण रु. २५००/- भाडे घेतो अशी तफावत का. बुक केलेल्या वेळेमध्ये बैठक होत नाही. त्यामुळे मनपाच्या दुहेरी लॉस झालेला आहे. याची जबाबदारी सबधीत अधिकाऱ्यांवर फिक्स करावी.

**श्री नंदकुमार फुलारी :** मुंबई पुणे येथील नाटयसंस्था रंगमंदीर बुक करीत नाहीतर त्यांच्या नांवावर येथे कुणीही रंगमंदीर बुक करतात.

**मुख्य लेखाधिकारी :** प्रोग्राम्स अरेंज करणाऱ्या एजनसीज असतात ते स्वत:च्या नांवाने रंगमंदीर बुक करतात.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** शासनाने प्रकाशित केलेल्या जी.आर. नुसार हॉटेल्स, रेस्टॉरंट, हातगाडीवाले किरकोळ व्यापारी किरकोळ व्यापारी वाहन, फ्रुटस् मटन दुकाने अशा प्रकारच्या व्यापाऱ्यांना लायसन्स देणे आवश्यक आहे. मनपाने या वर्षी दिलेल्या लाययन्स मधुन रु. ७ लाखाचे उत्पन्न प्राप्त झालेले आहे. स्टाफ पुरेसा नसल्यामुळे सर्व्हे पुर्ण कता आला नाही. मागील दोन महिन्यात अशा प्रकारच्या लायसन्स पासुन २ लाखाचे उत्पन्न मिळालेले आहे. पानटपरी चहाची टपरी यांना लायसन्स देण्यास सुरुवात केलेली आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** लायसन्स इश्यु करण्यासाठी एखादया खाजगी संस्थेमार्फत सर्व्हे करण्यात यावा तसेच हे काम लवकर व्हावे यासाठी एक स्वतंत्र्य सेल स्थापन करण्यात यावा.

**मुख्य लेखाधिकारी :** या संदर्भात मा. आयुक्तांनी ही काही निर्देश दिलेले आहेत. मनपाने सर्व प्रकारचे मिळुन सुमारे ३५०० लायसन्सेस दिलेली आहेत. महाराष्ट्र शासन जे गॅझेट प्रकाशित केलेले आहे त्यानुसार एकंदर ७० प्रकारच्या कमोडीटीजसाठी लायन्सेस देणे आवश्यक आहे. आता पर्यंत हे काम झालेले नव्हते. मा. आयुक्तांनीही कर्मशिअल सर्वे करण्याबाबत सुचना दिल्या

आहेत. हे सर्व्हेचे काम पुढील ३-४ महिन्यात पूर्ण करण्यात येईल. याचा परिणाम पुढील आर्थिक वर्षात दिसुन येईल.

**श्री जयवंत ओक :** हा सर्व्हे आपण आता का करु शकत नाही. पुढील आर्थिक वर्षात का ? नागरीकांना आपण जाहीर आवाहन केले तर ते मनपास सहकार्य करतील. यास एक खिडकी योजना राबविण्यात यावी व सर्व प्रकारचे लायन्सेस तेथुनच देण्यात यावेत.

**मुख्य लेखाधिकारी :** यामध्ये सर्वेक्षणाचे काम करणे गरजेचे आहे. हे सर्वेक्षण झाल्यास उत्पादनात निश्चित वाढ होईल. पुढील वर्षासाठी १० लाखाचे टार्गेट ठेवण्यात येईल. या प्रकरणात जाहीर निवेदन देण्यात येईल. जे लोक लायसन्स घेणार नाहीत त्यांच्यासाठी सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

**श्री प्रशांत देसरडा :** किराणा दुकानदारास मार्केट कमेटीचे सभासद व्हावे लागते. मनपाचे लायसन्स असेल तरच मार्केट कमिटीने सभासदत्व द्यावे. असा निर्णय आपणांस घेता येईल का याचा विचार करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** आपण त्यांना फक्त विनंती करु शकतो. त्यांच्यावर तसे बंधन घालता येणार नाही.

**श्री नंदकुमार फुलारी :** हातगाडीवाल्यांना लायसन्स घेतांना आपण त्यांना मालमत्ता पाणीपट्टी कर भरण्याबाबत बंधन घालणार का? त्यांची मालमत्ताच नसेल तर त्यांनी एन.ओ.सी. कशी द्यायची.

**मुख्य लेखाधिकारी :** त्यांच्याकडे मालमत्ता, पाणीपट्टीची बाकी नाही असे ॲफीडेव्हिट घेता येईल.

**श्री जयवंत ओक :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी चांगले काम केलेले आहे. त्यांचे अभिनंदन करावयास हवे. नागरीकांनी त्यांच्या व्यवसाया संदर्भाने लायसन्स काढुन घेण्याबाबत जाहीर प्रगटन देण्यात यावे. जी. आर. मध्ये कोणकोणत्या कमोडीज सांगितल्या आहेत याची माहिती व्हावी त्यासाठी सर्व स. सदस्यांना त्यांच्या कॉपीज देण्यात याव्यात.

**मा. सभापती :** जी. आर. नुसार ७० कमोडीटीजना लायसन्स आवश्यक आहे. या लायन्सेसमुळे मनपाचे उत्पन्नही वाढणार आहे. नागरीकांनी त्यांच्या व्यवसाय संदर्भाचे लायसेन्स घ्यावीत असे जाहीर प्रगटन देण्यात यावे. नळ कनेक्शन व मालमत्तांचा आपण सर्व्हे करणार आहोत. याच बरोबर लायसेन्स बाबतही सर्व्हे करण्यात यावा. त्यापुर्वी आपणांकडे आरोग्य सेवक यांनी संबधीत टपरी, दुकान मालकांना प्रत्यक्षात भेटुन लायसन्स घेण्याबाबत सूचना द्याव्यात. या वर्षात यापासुन २५ लाखाचे उत्पन्न मिळु शकेल. रंग मंदीरास आम्ही मागे भेट दिली होती. एक संस्था १८००/- रुपये भाडे देवुन कमाई करते. इतर संस्थाकडुन मात्र आपण २५००/- रुपये घेतो. या मागे नेमके कोण आहे? मनपाचा अधिकारी वगैरे यात सहभागी आहे काय, याची चौकशी झाली पाहीजे. जर अशा संस्था मिटींग करत असतील तर त्यांना ब्लॅक लिस्ट करावयास पाहिजे. यात जे जे अधिकारी/कर्मचारी दोषी आढळतील त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात यावी. मुख्य लेखा परिक्षक यांची चौकशी करुन अहवाल घ्यावा.

**श्री जयवंत ओक :** रंग मंदीरासाठी एक स्वतंत्र्य अधिकारीच नेमण्यात यावा.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** रंग मंदीराची कामे पाहणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर वचक असावयास हवा.

**डॉ. आशा बिनवडे :** रंग मंदीराचे बुकींग रंग मंदीरावरच व्हावे. काही एजन्सीज १५-२० दिवसांसाठी रंग मंदीराची बुकींग करतात अशा एजन्सीजकडुन एकदाच २५ हजार, ५०हजार डिपॉझीट घेण्यात येते. यामुळे मनपाचे उत्पन्नही वाढेल. तसेच बचत होईल.

**मा. सभापती :** संताच्या भुमीत असलेल्या या नाट्यगृहाबाबत चांगल्या सूचना मांडल्या आहेत. रंग मंदीरासाठी स्वतंत्र्य अधिकारी असावयास हवा जो तेथील दैनंदिन व्यवस्था पाहु शकेल. रंग मंदीराबाबत वारंवार वृत्तपत्रातही बातम्या असतात. रंग मंदीरासाठी सक्षम अधिकारी नेमण्यात यावा.

**श्री जयवंत ओक :** रंग मंदीरासाठी चांगला अधिकारी ज्यास सांस्कृतीक कार्यक्रमाची जाण आहे. नेमण्यात यावा. उच्च न्यायालयाने टपऱ्या देण्यावर बंधन घातले आहे. पृष्ट क्र. ३८ वर टपरी जमिन भाडयाचा उल्लेख आह. १०० फुट व ८० व्यतिरिक्त ज्या टपऱ्या आहेत त्यांच्याकडुन भाडे घेणार का? याचा खुलासा व्हावा.

**मुख्य लेखाधिकारी :** व्यायाम शाळा, जागा ज्या मनपाने भाडयायने दिलेल्या आहेत त्यांचे हे भाडे आहे. टपऱ्यांचे प्रकरण प्रलंबित आहे. प्रलंबित भाडयाचा यात उल्लेख आहे. नविन काहीही प्रस्तावित केलेले नाही.

**श्री प्रशांत देसरडा :** जळगांव नगरपालिका ज्या पध्दतीने व्यापारी संकुल उभारुन चालवते त्याच पध्दतीने बजेट तत्वावरती औरंगाबाद शहरात व्यापारी संकुले उभारण्यात यावीत. उत्पन्नात वाढ होईल. वसंतभवन तसेच महापौर बंगल्याच्या बाजुच्या जागेवरती व्यापारी संकुल बांधण्यात यावे. तसेच पैठण गेट जवळील पार्कीगच्या जागात व्यापारी संकुल बांधण्यात यावे. व खाली पार्कीगसाठी जागा ठेवण्यात यावी. भडकल गेट शेजारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाशेजारी जागा, मछली खडक, पैठणगेट आदी पार्कीगच्या /खुल्या जागांवरती व्यापारी संकुले बांधावयाची ठरल्यास २५०-३०० दुकाने काढतो येतील. ही दुकाने बोट पध्दतीने बांधण्यात यावीत. वसंत भवनची जागा आपल्या नांवावर नसल्याचे समजते याचाही खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** स. सदस्य श्री प्रशांत देसरडा यांनी चांगल्या सुचना मांडल्या आहेत. या संदर्भात सर्वसाधारण सभेने धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत. त्याची अंमलबजावणी व्हावयास हवी. प्रशासनाने सर्वसाधारण सभेच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी.

(दुपारी १.३० वाजता मा. सभापती यांनी अर्ध्या तासासाठी सभा तहकुब केली.)

(दुपारी १.३० वाजता तहकुब झालेली स्थायी समिती सभा २.३० वा. मा. सभापती, स्थायी समिती यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली.)

**मा. सभापती :** उत्पादन वाढी संदर्भाने बैठकीत चर्चा करण्यात आली. प्रशासनाने पाणीपट्टीचे उद्दीष्ट रु. १७ कोटी ठेवले आहे. ते वाढवुन रु. १८ कोटी करण्यात येत आहे. स्पील ओव्हर व खर्चाच्या बाजुवर चर्चा करण्यात यावी. पाणी पुरवठा विभागाने त्यांच्या विभागाकडील कामा संदर्भाने सविस्तर माहिती दयावी.

**मुख्य लेखाधिकारी :** प्रशासनातर्फे एकंदर १३४ कोटीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे. खर्चाचे अंदाज सादर करत असतांना त्यात ७३ कोटीचे कमिटेड एक्सपेडीचर्स दाखविण्यात आलेले आहेत. पगार व भत्ते ४१ कोटी वीज

मंडळ १७.४५ कोटी, जीवन प्राधिकरण ३ कोटी, गोदावरी विकास ७५ लक्ष, सरकारी कर्ज परतफेड २.६० कोटी पोलीस दल ५० लक्ष, छावणी हिस्सा ७० लक्ष, रस्ते विकास महामंडळ १.५० कोटी वेतन पेन्शन, घसारा निधी १.५५ कोटी, शासन शिक्षण व इतर कर १.७० कोटी, ठेकेदार व नगररचना अनामत परतावा १.९३ कोटी अशा प्रकारे एंकदर ७३ कोटी रुपये कमीटेड एक्सपेंडीचर आहे. सिडको एक्सप्रेस लाईनसाठी मार्च २००३ अखेर पर्यन्त ३ कोटी रुपये खर्च येणार आहे. पुढील आर्थिक वर्षात रु. २ कोटी त्यांना दयायचे आहेत. मनपा या प्रकल्पावर ५ कोटी रुपये खर्च करणार आहे. असे आपण न्यायालयासाठी सांगितलेले आहे. मागील सर्वसाधारण सभेमध्ये ठरावही पारित झालेला आहे. त्यादृष्टीने काम प्रगतीपथावर असुन ते ३१ मार्च पर्यन्त पुर्ण करावयाचे आहे. त्या व्यतिरिक्त भुसंपादन करण्यासाठी ७.२५ कोटीची तरतुद केलेली आहे. संगणकीकरणासाठी १.५० कोटीची तरतुद केलेली आहे. देखभाल दुरुस्तीची कामे चार एक्झीक्युटिव्ह इंजिनियर्स मार्फत केली जातात. देखभाल दुरुस्तीसाठी साधारण: ३५.४७ कोटी रुपये इतकी रक्कम उपलब्ध होणार आहे. या आर्थिक वर्षात शहर अभियंता विभागासाठी ९.३० कोटी, अति. शहर अभियंता विभागासाठी ९.३२ कोटी, कार्यकारी अभियंता (पापु) विभागासाठी ८.०९ कोटी, कार्यकारी अभियंता (ज.नि. व विदयुत) विभागासाठी ८.७६ कोटीची तरतुद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अशा प्रकारे देखभाल व दुरुस्तीसाठी व विकासासाठी ३५.४७ कोटीचा निधी उपलब्ध होणार आहे. या आर्थिक वर्षात ३५.४७ कोटीख्वा निधी उपलब्ध होणार आहे. या आर्थिक वर्षात ज्या कामांचे आदेश देण्यात आलेले असतील ती कामे ३१ मार्च पर्यन्त पुर्ण होणार नसतील तर त्यांचा समावेश ओव्हर मध्ये करण्यात यावा. अशा सुचना मा. आयुक्तांनी दिलेल्या आहेत. अंदाजपत्रक पृष्ठ क्र. ८७ ते १५० वरती जी कामे दर्शविण्यात आलेली आलेली आहेत. त्यात स्पील ओव्हरची कामे दर्शविण्यात आलेली आहेत. तसेच २००३-२००४ मध्ये हाती घ्यावयाच्या कामाचा तपशील दिलेला आहे. नविन कामे व स्पील ओव्हरचय कामासाठी विधि विभागांनी सुमारे ३८.४१ कोटींचे प्रस्ताव दिलेले आहेत. मात्र अंदाजपत्रकात ३५.४७ कोटीची तरतुद उपलब्ध करुन दिलेली आहे. याचा अर्थ सुमारे २.९६ कोटीचे अतिरिक्त प्रस्तावही या अंदाजपत्रकात समाविष्ठ केलेले आहेत. ज्या कामांचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. अशाच कामांचा यात समावेश करण्यात आलेला आहे. गतवर्षी ज्या कामांचा कार्यादेश देण्यात आलेला नव्हता त्यांचा नविन कामे म्हणुन समावेश करण्यात आलेला आहे.

विकास कामांसाठी जवळपास ३५ कोटींचा निधी उपलब्ध होणार आहे. जवळ जवळ १०० कोटींचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. परंतु अंदाजपत्रक बनवतांना प्रथमत: कमीटेड एक्सपेडीरचा विचार करावा लागतो व उर्वरीत पैसा देखभाल दुरुस्ती व विकासासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. जे असेंटस् मनपाने निर्माण केलेले आहेत त्यांचे जतन करणे, देखभाल दुरुस्ती करणेही आवश्यक आहे. त्याचाही प्रामुख्याने विचार करावा लागतो. ही सर्व परिस्थिती पाहता कार्यकारी अभियंत्यांना विशिष्ट रक्कमेची अट घालुन देण्यात आली होती. कामांची प्रायोरिटी लक्षात घेवुन नविन कामे

प्रस्तावित करण्याबाबत सबंधीतांना सुचना देण्यात आलेल्या होत्या. अंदाजपत्रकात कोणत्या कामांचा समावेश करावा याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.

**श्री प्रशांत देसरडा :** विकासात्मक कामांसाठी अंदाजपत्रकात ३५.४७ कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहे. स्लम एरियामध्ये आपण किती खर्च करणार आहोत. शासनाने याबाबत काही निर्देश दिलेले आहे. काय याची माहिति देण्यात यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** स्लम डेव्हलपमेंटसाठी आपण ५% तरतुद करत असतो. १८ खेडी विकास कार्यक्रम हा स्लम डेव्हलपमेंट अंतर्गत येतो. खडी रस्ते क्राँकीट करणाची कामे, खुल्या गटारी बांधणे आदी कामांचा यात समावेश आहे. बजेट मधील वैधानिक खर्च. पगार भत्ते आदि बाबी सोडुन जी रक्कम शिल्लक राहते त्याच्या ५% रक्कम स्लम डेव्हलपमेंटसाठी ठेवली जाते.

**मा. सभापती :** काहि काही भागांमध्ये वादग्रस्त जागा असतात अथवा काहि कामांची जागांची प्रकरणे न्याय प्रविष्ट आहेत. अशा ठिकाणी प्रस्तावित केलेली कामे करणे शक्य आहे काय याचाही विचार करावयास पाहिजे एम.पी. लॉ कॉलेजसमोर जलकुंभ बांधण्याचे प्रस्तावित आहे. परंतु तेथे जागेचा वाद आहे. प्रस्ताव पूर्ण करता येणार आहे का? प्रस्ताव अर्थ संकल्पातुन वगळण्यात यावेत.

**अति. शहर अभि./कार्य. अभि. (पापू) :** वादग्रस्त कामे कमी करण्यात आलेली आहेत.

**श्री जयवंत ओक :** एम.पी.लॉ कॉलेज येथे जलकुंभ बांधण्यासाठी जागेचा वाद आहे. या कामाचे हेड बंद करण्यात येवू नये.

**मा. सभापती :** एम.पी. लॉ कॉलेज जलकुंभासाठी हेड ओपन ठेवण्यात यावे. नागसेन नगर मधील डांबरीकरणाचे स्पील ओव्हरचे काम आहे.

**श्री नंदकुमार फुलारी :** मयुरपार्क मध्ये काही सोसायटया आहेत. त्यांनी आपल्याकडे काही रक्कमा भरलेल्या आहेत. परंतु तेथे् अदयाप रस्ते, पाणी, ड्रेनेज लाईन्स दिलेल्या नाहीत. हरसिध्दी सोसायटी, जगदाळे ले-आऊट अशा प्रकारच्या २३ सोसायटया आहेत. त्यांनी बेटरमेंट चार्जेस वगैरे सर्व चार्जेस भरलेले आहेत. त्यांना आपण काही सुविधा देणार आहात की नाही?

**श्री प्रशांत देसरडा :** अर्थ संकल्पावर प्रथमतः चर्चा करण्यात यावी व त्यानंतर कोणती कामे हाती घेणे आवश्यक आहे यावर विचार करण्यात यावा.

**श्री जयवंत ओक :** मागील अडीच वर्षापासुन आपण अनाधिकृत वसाहतींना रस्ते लाईट ड्रेनेज देत नाही. ज्या सोसायटयांनी पैसे मनपाकडे भरलेले आहेत त्यांना सुविधा का देण्यात आलेल्या नाही अशा एकंदर किती सोसायटया आहेत ज्यांनी पैसे भरुनही विकास होत नाही. अशांची माहिती देण्यात यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** मनपाकडे उत्पन्नाची स्त्रोत कमी आहेत. विकासासाठी जो ३५ कोटीचा निधी उपलब्ध होतो त्यात ७.८० कोटी रक्कम मागील वर्षीच्या कामावर खर्च होणार आहे. उर्वरीत २७ कोटी रुपयांत नविन कामे हाती घेणे शक्य आहे. ही रक्कम विविध लेखा शिर्षाखाली खर्च करावी लागेल. अनेक सोसायटयांमध्ये विकासात्मक कामे आलेली माहिती हे खरे आहे. ही कामे टप्याटप्याने हाती घेता येतील. स्थायी समितीने काही हेड पासुन घेणाऱ्या उत्पन्नात वाढ केलेली आहे. या वाढीव उत्पन्नातुन काही कामे हाती घेता येईल. अंदाजपत्रकात प्रस्तावित कामे स्थायी समितीस मान्य नसतील तर

नविन कामे स्थायी समितीस प्रस्तावित करता येतील. या दृष्टीने विचार करण्यास हरकत नाही.

**श्री जयवंत ओक :** ज्या सोसायटयांनी १००% बेटरमेंट चार्जेस भरलेले आहेत अशा सोसायटयाची यादी देण्यात यावी. अशा सोसायटीयांनी किती वर्षापुर्वी चार्जेस भरलेले आहेत व त्यांना किती कालावधीत सेवा देणे आवश्यक होते. ज्या भागात यापुर्वीच सुविधा दिलेल्या आहेत. त्यांनाच पुन्हा पुन्हा सुविधा न देता ज्यांनी बेटरमेंट व इतर चार्जेस भरलेले आहेत त्यांना प्राधान्याने सुविधा द्या.

**मुख्य लेखाधिकारी :** अंदाजपत्र पृष्ठ क्र. १९ वर प्रशासकीय खर्च वेतन भत्ते कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाची द्यावयाची थकबाकी यांचाही या ४०.७० कोटीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. तसेच सेवा निवृत्ती उपदान पेन्शन यांचाही याम समावेश आहे. बोनससाठी प्रशासनातर्फे तरतुद करण्यात आलेली नाही. प्रकरण मा. उच्च न्यायालयात असल्याने न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

**मा. सभापती :** न्यायालयात बोनस बाबतचे प्रकरण चालु आहे. अर्थसंकल्पात बोनसचे हेड काढुन न टाकता ते चालु ठेवण्यात यावे. व न्यायालयाचा जो आदेश येईल त्याप्रमाणे नंतर निर्णय घेतला जाईल.

**उपआयुक्त (प्र) :** बोनससाठी तरतुद ठेवु नये असे कोर्टाचे आदेश आहेत.

**मा. सभापती :** बोनसचे हेड चालु ठेवण्यात यावे व कोर्टाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी.

**मुख्य लेखाधिकारी :** राज्य शासनातर्फे गेल्या २-३ वर्षापासुन बोनस दिला जात नाही. त्यामुळे अर्थसंकल्पात बोनसची तरतुद केलेली नाही. तथापी स्थायी समितीस तशी तरतुद करता येईल.

**मा. सभापती :** महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. गतवर्षी जे लोक न्यायालयात गेले ते एका विशिष्ट ऑर्डरच्या विरोधात गेले होते. बोनसचा हेड चालू ठेवण्यात यावा या हेड खाली २० लाख रुपये टोकन अमाऊंट ठेवण्यात यावी. कोर्टाचे आदेश व सभागृहाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**श्री प्रशांत देसरडा :** रु. २० लाखांऐवजी ५ लाखांची बोनससाठी तरतुद करण्यात यावी. मागील बऱ्याच काळापासुन काही शिक्षक निवडणुकीच्या कामासाठी म्हणुन जिल्हाधिकारी कार्यालयात गेलेले आहेत.

**शिक्षणाधिकारी :** दोन शिक्षक श्री सिध्दकी व श्री जाधव कलेक्टोरेटमध्ये चार-पाच वर्षापासुन काम करत आहे.

**श्री प्रशांत देसरडा :** मागे मुकूंदवाडी शाळेस आपण भेट दिली होती. चौथी व पाचवीचे वर्ग एकाच वर्गात भरतात. त्यांना शिकविण्यासाठी एकच शिक्षक कलेक्टोरेटमध्ये निवडणुकीच्या कामासाठी गेलेले आहेत त्यांच्या बायकाही तिकडेच कामासाठी गेलेल्या आहेत. श्री शेख, शिंवंगीकर, पवार यांची कलेक्टोरला गरज असेल तर त्यांना तिकडेच घेण्यात यावे.

**श्री प्रशांत देसरडा :** दरवर्षी जवळपास ५० शिक्षक मतदार यादया तयार करणे त्या तपासणे यासाठी तिकडेच काम करत आहेत.

**मा. सभापती :** मी डॉ. शेळके, निवडणुक अधिकारी यांना या संदर्भात बोललो आहे. त्यांनी सांगितले की, केवळ निवडणुकीचे काम असेल तेव्हाच त्यांना बोलावतो.

आपण २४ तारखेस डॉ. शेळके यांना भेटून कर्मचाऱ्यांची त्यांना आवश्यकता आहे काय हे विचारुन प्रशासनाने याची पुर्ण चौकशी करावी.

**श्री प्रशांत देसरडा :** मागील वर्षात जकात विभागातील काही कर्मचारी कमी केलेले होते तर त्यांचे पगार जकात विभागातच कसे काढले जातात. तसेच अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी यांच्याकडे किती अग्रीम वसुल होणे बाकी आहे?

**मुख्य लेखाधिकारी :** पूर्ण अग्रीम समायोजित झालेली नाहीत. ही प्रोसेस सारखी चालु असते. जुना अग्रीम समोयाजित झाल्याशिवाय नवीन अग्रीम दिला जात नाही.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** मनपाच्या अस्थापनेवरील खर्च ४० कोटी एवढा आहे. अस्थापनेवरील खर्च जसा बांधलेला असतो तसा टॅक्स वसुल करणे आदी बाबीही त्यांच्यावर बंधनकारक असाव्यात.

**मुख्य लेखाधिकारी :** पाणी पुरवठयासाठी एम.एस.ई.बी. साठी १४ कोटी रुपये करावा लागतो. यामध्ये १२ कोटी एम.एस.ई.बीस तर उर्वरीत २ कोटी इतर पंपीग स्टेशनसाठी खर्च येतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पाणीपट्टीची थकबाकी सुमारे ६० ते ६५ कोटीची आहे. याच्या प्रित्यर्थ २.५० कोटी या वर्षात प्रस्तावित केलेले आहेत. पाणी पुरवठा योजनेसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी २.५० कोटी, गोदावरी विकास महामंडळ पाणी खरेदी व थकबाकीसाठी ७५ लक्ष देणे आहे. शहरातील नवीन भागात जलवाहिन्या टाकणे व काही भागातील जुन्या लहान आकाराच्या जलवाहिन्या काढुन नवीन जलवाहिन्या टाकण्याच्या कामासाठी ३ कोटी खर्च येणार आहे. तसेच शहरातील अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या देखभालीसाठी व जायकवाडी प्रकल्प पाईप लाईन देखभालीसाठी २.१० कोटी तर इतर किरकोळ खर्च रासयनिक सामुग्री मशिनरी यासाठी २.९८ कोटी रुपये खर्च अशी तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आलेली असुन हा कमीटेड एक्मोडीचर आहे. खर्च, हाती घ्यावयाची कामे याचा सविस्तर गोषवार देण्यात आलेला आहे.

**श्री प्रशांत देसरडा :** मनपाच्या पंप हाऊसवरती लोड शेडींग करु नये अशी विनंती एम.एस.ई.बी. स केली होती. तथापी ते ऐकत नाहीत. या महिन्याच्या त्यांचा चेक देण्यात येवू नये. त्यांनी पंप वसुलीसाठी लोड शेडींग करु नये.

**मुख्य लेखाधिकारी :** विहीत कालावधीत बिल दिले नाही तर ते बिलावर व्याज लावतात.

**मा. सभापती :** सफाई कामाचे खाजगीकरण रद्द करण्यात यावे.

**श्री प्रशांत देसरडा :** अंदाजपत्रक पृष्ठ क्र. १२३ वरती अ. क्र. २८ वरती १४२२ मीमी व्यासाची वाहीनी टाकणे असे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. हे काम कोठे करणार आहोत त्याचे नाव देण्यात यावे. प्रत्येक स. नगरसेवकांची कामे घेण्यात यावी. पोलादी पाईप पुरवठा करण्याच्या कामाचे विश्लेषण करण्यात यावे.

**डॉ. आशा बिनवडे :** जनतेस मनपाने प्रमुख सुविधा पुरविणे आवश्यक आहे. या सुविधा आपण समाधानकारक पणे दिल्या आहे काय याचा विचार करण्यात यावे. रस्ते, पाणी, आरोग्य, ड्रेनेज या मुलभूत सुविधा पुरविणे आवश्यक आहे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. मनपाची आर्थिक स्थिती पाहता जी मजबुत करण्यासाठी काही कठोर उपाययोजना कराव्या लागतील. आवश्यक गरजा पुरविण्यासाठी आपणांस गंभीरपणे विचार करावा लागणार आहे. अनावश्यक

खर्चाच्या बाबी टाळाव्या लागणार आहेत. प्राथमिक सुविधांकडे दुर्लक्ष करुन केवळ डेव्हलपमेंटकडे आपण जास्त लक्ष देत आहोत. स्वच्छता व आरोग्य चांगले ठेवणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. नागरीकांच्या तक्रारी आहेत की शहरातील स्वच्छता बरोबर होत नाही. लोकप्रतिनिधींना याबाबत नागरीकांना तोंड द्यावे लागते. शहरातील कचरा विल्हेवाटीचा प्रश्न गंभीर झालेला आहे. या संदर्भात न्यायालयात ही केस चालु आहे. शासनाकडे २००३ अखेर पावेतो सॉलीट वेस्ट मॅनेजमेंट प्रकल्प पुर्ण करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. बेसिक सुविधांसाठी ७.८२ कोटी रुपयांची तरतुद केलेली आहे. शहरासाठी आणखी एखादे जेटींग मशीन घेणे आवश्यक आहे. शहरातील नाला स्वच्छता हा विषय आरोग्य विभागाकडे पूर्णपणे करण्यात यावा. कारण तो आरोग्याशी निगडीत आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** प्रशासकीय दृष्टीकोनातुन केलेली तरतुद योग्य आहे. कचरा कुंडया दरवर्षी आपण घेत असतो. यासाठी विभागीय कार्यालयाकडुन मागणी घेण्यात येते. व त्यानुसार तरतुद आलेली आहे. आरोग्य व विभागीय कार्यालयाकडुन ज्या मागण्या आलेल्या आहेत. त्यानुसार तरतुद करण्यात आलेली आहे. घन कचरा निर्मुलन कचरा मोहीम राबविण्यासाठी लँड फिल साईट शोधण्यात येत आहे. तिसगाव करोडी गावाजवळ पाहण्यात येत असुन विविध खात्यांच्या बैठका घेण्यात येत आहे. प्राथमिक दृष्टया ही साईट निश्चित झालेली आहे. या आर्थिक वर्षात जवळपास ५० लाखांची तरतुद केलेली आहे. ही साईट डेव्हलप करण्यासाठी रु. २.५० कोटीचा खर्च लागणार आहे. परंतु हा खर्च एकाच वर्षात होणार नाही. या दृष्टीकोनातुन खर्च प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** शहरातील कचराकुंडया या अत्यंत खराब आहेत. कचरा उचलण्यासाठी गाबेज कॉन्ट्रॅक्टर घंटा गाडया छोटया रिक्षा घेणे आवश्यक आहे. नारेगांवचा कचरा प्रकल्प ढेपाळलेला आहे. यासाठी १० लाखांची तरतुद ठेवण्याची गरज नाही असे वाटते.

**मुख्य लेखाधिकारी :** नाशिक मनपाने सुमारे १०० घंटा गाडया खाजगीकरणाच्या माध्यमातुन घेतलेल्या आहेत. साफसफाई साठी घंटा गाडया खाजगीकरणाच्या माध्यमातुन घेण्याचे प्रशासनाने प्रस्तावित केले आहे. अर्थसंकल्पात मंजुरी प्राप्त झाल्यानंतर एप्रिलपासुन त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** ड्रेनेजची कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गमबुट व इतर साहित्य द्यावयास हवे.

**डॉ. जयवंत ओक :** आपल्याकडे बांधणीचे झाडु घेतले जात नाहीत. तीन तीन खराटयांच्य एक खराटा केला जातो. यासाठी साफसफाईचे खाजगीकरण करण्यात यावे.

**मुख्य लेखाधिकारी :** प्रशासनाच्या दृष्टीकोनातुन इतर अनुषंगीक खर्च लक्षात घेता केलेली तरतुद बरोबर आहे. आरोग्याच्या दृष्टीकोणातुन ऐनवेळी लागणारे खर्च केले जातात. त्यासाठी खर्च कमी पडु दिला जाणार नाही.

**मा. सभापती :** अंदाजपत्रकात पाणी पुरवठा विभागाची दाखविलेली कामे, स्पील ओव्हरची कामे मान्य करण्यात येतात.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** प्रत्येक नगरसेवकांची किमान २-३ कामांचा अर्थसंकल्पात समावेश असावा. परंतु तसे झालेले नाही. यात काही नगरसेवकाच्या

विभागातील कामाचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही. आमच्यावर अन्याय झालेला आहे. आमच्या वार्डात ३-३ वर्ष कामे होत नाहीत.

**श्री इलियास किरमाणी :** कंपोड वॉलची कामे ही फार तातडीची नाहीत ती का हाती घेतली जात आहे. त्यावर होणारा खर्च इतर आवश्यक कामासाठी वापरता येईल.

**मा. सभापती :** अंदाजपत्रकात प्रस्तावित पाणी पुरवठा भांडवली कामांना सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**श्री प्रशांत देसरडा :** सिडको भागातील पाणीपुरवठयाबाबत सिडकोकडुन पैसा दयावयास हवा.

**मुख्य लेखाधिकारी :** सिडको बरोबर जे अग्रीमेंट झालेले आहे त्यात सिडकोचे म्हणणे आहे की, किर्लोस्कर कन्सल्टन्सी कडुन सर्व्हे करुन २०१० सालाची लोकसंख्या गृहित धरुन जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहे. तथापी सिडको भागामध्ये काही नविन लाईन्स टाकाव्या लागणार आहेत. हा पैसा सिडकोने द्यावा. अशी त्यांना मागणी करण्यात येत आहे.

**मा. सभापती :** अर्थसंकल्पातील कामात सर्व स. सदस्यांच्या वार्डातील कामे व्हावीत सर्व सदस्यांची समिती स्थापन करण्यात येते. समितीची बैठक घेवुन समिीचा निर्णय प्रशासनास कळविण्यात येईल. आजच्या बैठकीत स्पील ओव्हरच्या कामांबाबत चर्चा झालेली आहे. काही वादग्रस्त जागांवर प्रस्तावित करण्यात आलेली कामे वगळण्यात यावीत. कामा संदर्भाने स. सदस्यांनी बऱ्याच महत्त्वाच्या सुचनाहि केलेल्या आहेत. समितीची पुढील सभा २६.२.२००३ रोजी घेण्यात येईल. तोपर्यंन्त सभा तहकूब करण्यात येते.

| | |
|---|---|
| नगरसचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | मा. सभापती<br>स्थायी समिती महागनरपालिका,<br>औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २८.०२.२००३ रोजी संपन्न झालेल्या (अर्थसंकल्पीय) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दिनांक २८.०२.२००३ (दि. २१.०२.०३) ची तहकुब सभा मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम" या गिताने सुरुवात झाली. या सभेला संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री देसरडा प्रशांत सुभाष | सदस्य |
| २. | मा. श्री मिर हिदायत अली | --//-- |
| ३. | मा. श्री शिंदे किशोर रावसाहेब | --//-- |
| ४. | मा. श्री शेख इलियास किरमानी | --//-- |
| ५. | मा. श्री औताडे रावसाहेब ममतु | --//-- |
| ६. | मा. श्री ओक जयवंत माधवराव | --//-- |
| ७. | मा. श्री फुलारी नंदकुमार | --//-- |
| ८. | मा. सौ. आशा उत्तम बिनवडे | --//-- |
| ९. | मा. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर | --//-- |
| १०. | मा. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | --//-- |
| ११. | मा. श्री चंद्रशेखर जैस्वाल | --//-- |
| १२. | मा. कैसरखान बद्रोद्दीन खान | --//-- |

**संवाद :**

**मा. सभापती :** खर्च बाजुवर चर्चा करावी. उत्पन्न बाजुवर आपण चर्चा केलेली आहे. गेल्या मागील दोन दिवस अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा झालेली आहे.

**श्री देसरडा प्रशांत :** मागील वर्षात जी विकास कामे झाली नाही ती या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात आलेली नाही. सुराणा नगर भागात बॅडमिंटन हॉलचे काम मागील अर्थसंकल्पात होते ते झालेले नाही. का घेण्यात आले नाही.

**मा. सभापती :** खुलासा करण्यात यावा.

**शहर अभियंता :** सदर काम तात्काळ करणे गरजेचे नव्हते व तसा लेखा विभागाकडे ज्येष्ठ यादी दिली जाते. त्यात त्या कामाच समावेश केलेला नव्हता अशी कामे वगळण्यात आलेली आहे.

**श्री देसरडा प्रशांत :** मागील वर्षाच्या अर्थ संकल्पात जी कामे होती न झालेली कामे या बजेट पुस्तिकेत द्यावयास पाहिजे.

**शहर अभियंता :** काही कामे जी घेण्यात आली नाह त्यास फायनान्सची अडचण येते म्हणुन घेतलेली नाही.

**श्री जयवंत ओक :** अर्थसंकल्पात तरतुद करण्यात येते ती कामे होत नाही त्या वर्षात ती कामे झालेली नसेल तर या वर्षाच्या बजेटमध्ये यावयास पाहिजे जी कामे मागील बजेटमध्ये होती ती झालेली नसेल व या बजेटमध्ये घेतली नसेल तर सबधीत अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांचेवर कार्यवाही व्हावी याला जबाबदार कोण? मागील वर्षी बजेटमध्ये नमुद केलेली कामे व घेण्याचे

कारण काय कोणास जबाबदार धरायचे जे दोषी असेल त्यांचेवर हे सभागृह काय कार्यवाही करण्याचा निर्णय घेणार त्या नंतरच सभेला सुरुवात करावी. मागणी करुनही कामे झालेली नाही पत्र देवुन कार्यवाही होत नाही रिसवत दयावी लागते. दिल्यास तात्काळ जे. ई. ईस्टिमेट तयार करतात असे असेल तर तर कठोर कार्यवाहीचा निर्णय घ्यावा त्यानंतर इतर विषयावर चर्चा करावी.

**देसरडा प्रशांत :** स. सदस्य श्री ओक यांनी जे शब्द वापरले ते इतिवृत्तातुन वगळण्यात यावे.

**मा. सभापती :** रिसवत कोणते अधिकारी/कर्मचारी घेतात त्यांचे नाव दयावे. विनाकारण आरोप करणे बरोबर नाही नसता आपण आपले शब्द परत घ्यावे.

**श्री जयवंत ओक :** पैसे कोण मागतात. अधिकाऱ्याचे नांव मी घेतलेले नाही हे सर्व आपणांस माहीत असेलच. तशी परिस्थिती आहे. निर्माण करण्याचे काम अधिकारी करतात सत्य परिस्थिती आहे. आरोप नाही. मागील वर्षी जी कामे बजेटमध्ये ठेवली ती पुर्ण होतील की नाही ज्या भागात १००% बेटरमेंट चार्जेस भरतात त्या वार्डातील सुध्दा कामे झाली नाहीत अशा भागात कामे झाल्यास त्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

**मा. सभापती :** स. सदस्य श्री ओक यांनी जे शब्द वापरले ते त्यांनी मागे घ्यावे जबाबदार स. सदस्यांनी असे बोलणे बरोबर नाही.

**श्री देसरडा प्रशांत :** कोणते अधिकारी/कर्मचारी पैसे घेतात त्यांचे नांव डिक्लेर करावे आताच कार्यवाही करण्याचा निर्णय घेता येईल. नसता हा विषय बंद करावा. इतिवृत्तातुन शब्द वगळावे.

**श्री जयवंत ओक :** मागील बजेट मधील कामे झाली नाही. जे. ई. इस्टिमेट तयार करतात. कामे झाली नाही याचा अर्थ पैसे हातात असा होतो तरच कामे होणार मी माझे शब्द परत घेतो. परंतु १ महिन्याच्या आत सर्व मागील बजेट मधील कामे झाली पाहिजे. अर्थसंकल्पात मंजुर झाल्यानंतर स. सदस्य पत्र गेल्यानंतरच त्या त्या वार्डातील कामे लगेच सुरु झाली पाहिजे. ती जबाबदारी प्रशासनाची आहे.

**मा. सभापती :** स. सदस्य ओक यांनी जे शब्द वापरले ते वगळण्यात यावे. अर्थसंकल्पात काम ठेवुनही का झाली नाही खुलासा दयावा.

**श्री हिदायत अली :** माझ्या वार्डात एक ईमारतीचे काम होते ते झालेले नाही या अर्थसंकल्पात घेतले नाही इतर ८ कामे घेतली एकच घेतले नाही.

**मुख्य लेखाधिकारी :** महापालिकेचे गत वर्षीचे जे मुळ अंदाजपत्रक प्रशासनाने प्रस्तावित केले होते ते ११७ कोटीचे होते. त्यात वाढ करुन स्थायी समितीने १२१ कोटी तर सर्वसाधारण सभेने वाढ करुन १२८ कोटीस मान्यता दिली. ११ कोटीचे अंदाजपत्रक वाढीव झाले. ११ कोटींची वाढीव कामे समाविष्ट करण्यात आलेली होती. त्यातील काही कामे अनाधिकृत वस्त्यातील होती काही इमारती बांधण्या संदर्भात होती. अंतिम मंजुरी प्राप्त झाल्यानंतर वर्षभरात होणारी वसुली एवढी पुर्ण होईल असे प्रशासनाला सुध्दा वाटत नव्हते. म्हणुन प्रशासनाने जी कामे प्रस्तावित केलेली होती त्यात ड्रेनेज, लाईट, पाणी या कामांवर जास्तीत जास्त भर देऊन उर्वरीत बिल्डींग बांधकाम उदयानाची कामे संरक्षीत भिंतीची कामे मागे ठेवण्याचा प्रयत्न प्रशासनाने घेतलेला आहे. मा. सभागृहाने या संदर्भात जरी निर्णय घेतलेला होता व ही कामे करण्याचा निर्णय घेतला तर निविदा निघाल्या असत्या तर मार्चच्या

शेवटला का होईना या कामांचे बिले पेड करावी लागली असती, म्हणुन वर्षीही प्रशासनाने नागरिकांची जी दैनंदिन स्वरुपाची कामे आहे. तीच घेण्याचा निर्णय घेतलेला आहे त्यात ड्रेनेज, पाणी, लाईट, रस्ते ई. कामे असतील अशा कामाच्या माध्यमातुन नागरिकांना त्यांच्या गरजा पुर्ण करण्यास नियमाने महापालिका बांधील आहे. या वर्षीही मोठमोठी भांडवली स्वरुपाची कामे ॲक्शनसाठी होती. परंतु उत्पनाचा भाग लक्षात घेऊन एवढीमोठी कामे मंजुर करणे सुध्दा चूकीचे होऊ शकते. जर अशी कामे केली व वेळेवर न देता आली तर आरोप होतात व महापालिकेची त्यात बदनामी होते व प्रशासनाने या बांबीकडे नियंत्रण नव्हते. असे निर्दशनास गृहीत धरले जाते. या बाबींचा विचार करुन मुद्दामहुन अशी काममे या वर्षीही नमुद केलेली नाही. आजही शाश्वती नाही की, पुढील वर्षी अशी कामे होऊ शकतील. १२८ कोटींचे बजेट १०८ कोटीवर गेले याचे कारणे आहे. एक तर ११ कोटीने बजेट वाढवुन दिले होते शासनाकडुन जे १० कोटीचे अनुदान येणार होते ते आले नाही. कुटूंब कल्याण योजनेचे जे अनुदान आहेते सुध्दा ४ ते ५ वर्षापासुन प्राप्त होत नाही. या सर्व बाबींचा परिणाम अर्थसंकल्पावर होतो. पर्यायाने कर्मचारी वेतन, भत्ते, एम.एस.ई.बी. चे बिल व इतर प्रशासकीय खर्च हा करुन उर्वरीत रक्कम विकास कामांसाठी घेता येते. व यापुर्वी जी विकास कामे हाती घेतली होती त्यास प्रथम देखभाल दुरुस्तीचे कामास प्राधान्य दयावे लागते दुरुस्तीच्या कामांना प्राधान्य नंतर नविन कामांना घेण्याबाबत विचार करतो. मागील वेळेस घेतलेली कामे पडण्याचे कारण म्हणजे आर्थिक बळ कमी पडते. बजेटचे अवलंब केले तर विविध लेखा शिर्षक व विविध कारणांसाठी पैसा उपलब्ध करुन दयावा लागतो. या आर्थिक वर्षात ४.५० ते ५ कोटींची रस्त्यासाठीची तरतुद आहे हे करीत असताना सर्वच ९६ वार्डात एवढी एकदम रक्कम वापरता येणार नाही कमी पडते म्हणुन जे ३०-३५ वार्डात कामे घेतली. सर्वच वार्डात एकच काम एका आर्थिक वर्षात करावयाची झाल्यास सर्वच बजेट एकाच कामावर खर्च करावा लागणार इतर कामे होणारच नाही. बजेटनुसार ७३% हा वैधानिक खर्च होतो. पगार भत्ते ४१ कोटी जातात. एम.एस.ई.बी. बील पेड, सरकारी कर्ज परतफेड गोदावरी विकास महामंडळ, रस्ते विकास मंडळ, वेतन निधी पेन्शन निधी यात एकुण ७३% बजेट नुसार वैधानिक खर्च होतो.

**डॉ. बिनवडे आशा :** महापालिकेस आतापर्यंत किती उत्पन्न प्राप्त झाले. मालमत्ता कर किती वसुली झाली. जकात किती पाणीपट्टी माहिती दयावी.

**मुख्य लेखाधिकारी :** सुधारीत अंदाजपत्रकात जी आकडेवारी दिली होती ती नमुद केलेलीच आहे. मालमत्ता कराचे २० कोटीचे उद्दीष्टे होते. सुधारीत उद्दीष्टानुसार हे सादर आहे.

**श्री देसरडा प्रशांत :** सुधरीत बजेट जे करण्यात आले तेवढी सुध्दा वसुली होते की, नाही सुधारीत बजेट प्रशासनाने मंजुर केले मान्य केले सुधारीत बजेट नुसार वसुली न झाल्यास कुणास जबाबदार धरायचे.

**मुख्य लेखाधिकारी :** हा अंदाज बांधलेला आहे. वसुल होईल असे सांगता येणार नाही. उदा. जकातीचे उद्दीष्ट ५९ कोटी केले. ४ दिवस संप झाल्यास वसुली कमी होवु शकते. मालमत्ता कर पाणीपट्टीचे वसुली जास्तीत जास्त घेण्यासाठी

प्रयत्न केले. मागील वर्षी ९ कोटी तर गेल्या वर्षी १२ कोटी या चालु आर्थिक वर्षात १३ कोटी वसुली होईल असे अपेक्षित आहे. वसुली वरील कर्मचारी हे विविध कामांसाठी दिला जातो. मनपामध्ये दैनंदिन स्वरुपाची जी फुटकळ कामे असतात ती जास्त प्रमाणात निघतात. आकडेवारी बघीतली तर ४ कोटीची कामे फुटकळ वसूलीवर परिणाम होती जी कामे राहिली ती यामुळेच राहीली आहे. व ४ ही कार्यकारी अभियंत्यांना सुचना देण्यात आल्या की जी महत्त्वाची कामेच बजेट मध्ये घ्यावी.

**श्री देसरडा प्रशांत :** काही इमारतीची कामे कशी दिली?

**श्री जयवंत ओक :** खरोखरच नागरीकांची दैनंदिन कामे करायची असेल तर मोठमोठी जी कामे घेतलेली आहे ती सुध्दा वगळण्यात यावी. ज्या कामासाठी जनतेनी १००% बेटरमेंट चार्जेस कर भरलेला आहे. अशा भागातील जनतेला ड्रेनेज, लाईट, पाणी, रस्ते या सुविधा देण्या संदर्भात प्रथम प्राधान्य दयावे. त्यानंतर स्लम भागातील कामांना प्राधान्य दयावेहेच आमचे म्हणणे आहे.

**मा. सभापती :** काही बाबींची हे सभागृह सहमत आहे. त्यांची नोंद घेतलेली आहे. आताच स. सदस्यांनी मागील वर्षातील कामे बजेटमध्ये आली नाही तक्रार मांडली त्यावर लेखाधिकारी यांनी खुलासा केला परंतु ती कामे का झाली नाही का होऊ शकली नाही याची जाणीव सर्व सदस्यांना आहेतच म्हणुन पून्हा पुन्हा त्यावर चर्चा करणे बरोबर नाही. प्रभाग समितीच्या संदर्भातुन मंजुर झालेली काही कामे होती त्यामुळे काही कामे झाली नाही अशी अनेक कामे स. सदस्यांच्या यबाबत रोष असेल परंतु तो दुर करण्याचा दृष्टीने अधिकारी सुध्दा पुढे आले पाहिजे. सभागृह व अधिकारी यांच्या संमतीने कामे झाली तर कोणतेच काम थांबणार नाही असे वाटते. यासाठी स्पील ओव्हरची कामे गतीमान करुन तात्काळ कशी करता येईल या संदभीने कार्यवाही करावी. जेणे करुन पुढील बजेटमध्ये या स्पील ओव्हरच्या कामांच्या बाबतीत चर्चा होता कामा नये. शासकीय अनुदान मिळाले नाही असे सांगण्यात आले यासाठी एक कन्सलंट अधिकारी नियुक्त करुन अनुदान कसे मिळविता येईल प्रयत्न करावे. अडचण आल्यास हे सभागृह सुध्दा स्थानिक लोक प्रतिनिधीच्या माध्यमातुन प्रयत्न करेल. कन्सल्टंट अधिकारी यांनी फक्त पत्रव्यवहार न करता प्रत्यक्ष संचिकेचा पाठलाग करुन अनुदान मिळविण्यासाठी प्रयत्न करावे. अधिकारी संपर्क करीत नसेल व कार्यवाही करीत नसेल जे उघडकीस आल्यास त्यांना समोर यावे लागेल. आजच्या अंदाजपत्रक कामांचा समावेश हा येणाऱ्या २० तारखेच्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव जातील व त्यानंतर १ एप्रिल पासुन या सर्व कामे होण्यासाठी प्रशासनाने पाठपुरावा केला पाहिजे. जी कामे आली ती कोणती वादग्रस्त नाही असे वाटते कोर्ट मॅटर मध्ये नाही. म्हणुन १ एप्रिल पासुन ही कामे सुरु केल्यास वर्ष भरात पुर्ण होतील.

**श्री किरमाणी इलियास :** यात नमुद केलेल्या सर्व कामे होतील आमचा प्रशासनावर व सभापती यांचेवर विश्वास आहे बजेट मंजुर करावे.

**श्री जयवंत ओक :** स्थायी समितीच्या सदस्यांनी जी कामे दिली ती तंतोतंत झाली पाहिजे. काही कामे निधी अभावी थांबुन रहातात. २ लक्ष खर्च कालांतराने लागतो. तात्काळ झाल्यास १ लक्ष मध्ये होते. बजेटमध्ये १ लक्ष असते. काम २ लक्ष ७५ हजार पर्यंत जाते. ती कामे होत नाही.

**डॉ. आशा बिनवडे :** बजेट पुस्तिकेमध्ये जी कामे आहेत ती वगळणार आहे का? रक्कम कमी करणार आहात काय? कोणती कामे वगळली कोणती कामे घेतली याची माहिती सदस्यांना मिळाली पाहिजे.

**मा. सभापती :** या संदर्भात माहिती देण्यात यावी. यात दुरुस्ती असेल ती करता येईल.

**श्री जयवंत ओक :** यात संत एकनाथ रंग मंदीरासाठी तसेच आहिल्याबाई होळकर यांच्या पुतळयाचा उल्लेख केलेला नाही.

**मा. सभापती :** काही त्रुटी असेल त्या दुरुस्ती करता येईल.

**श्री फुलारी नंदकुमार :** स. सदस्यांनी पत्र दिल्यानंतर ती कामे मार्गी लागली पाहिजे. इस्टीमेट तयार होतात व मंजुर करुन घेण्यासाठी वारंवार शिपाई सारखे अधिकाऱ्यांच्या मागे फिरावे लागते ही पध्दत प्रशासनाची बरोबर नाही.

**मा. सभापती :** सर्व अधिकारी वर्गांना सुचना देण्यात येते की, स. सदस्य हे जनतेचे लोक प्रतिनिधी आहेत. जनतेची कामे घेवुन प्रशासनाच्या दरबारात येतात. एखादे काम नियमाने होत नसेल तरी सुध्दा करणे गरजेचे असेल तर करावे लागते म्हणुन प्रत्येक स. सदस्याच्या पत्राची दखल घेणे प्रशासनाचे काम आहे. जर कुणी दखल घेणार नसेल त्या अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही केली पाहिजे.

**श्री जयवंत ओक :** हे शहर मोठे होत आहे. अग्निशमन विभागासाठी गाडी घेणार होतो. आग लागली तर कठीण प्रसंग समोर येतो यात तशी तरतुद झालेली नाही. काही वस्त्यातील अरुंद रस्त्यात मोठी गाडी जात नाही म्हणुन अत्यावश्यक सेवा म्हणुन ही गाडी घेण्यात यावी.

**मा. सभापती :** स्लम भागात आता पर्यंत किती ठिकाणी आग लागली.

**मुख्य अग्निशमन अधिकारी :** ८००-२०० कॉल वर्षाला येतात. गेल्या १ ते दीड पुर्वी मुंबईची एक बस आली होती. अपघात झाल्यामुळे जवळपास ७० मुली कापल्या गेल्या तीन मुलींना काढण्यास उशीर लागला त्यामुळे त्या मृत झाल्या एक बसचा अपघात झाला कॉल आला होता ट्रकचा वाहन चालक यांना काढण्यासाठी ७ तास लागले होते तरी सुध्दा संबधीत वाहन चालक जागेवरच मृत झाला. ६ वर्षापासुन बजेटमध्ये या गाडीसाठी तरतुद करण्या संदर्भात सुचविल्या जाते परंतु तरतुद होत नाही. या विभागातील कर्मचाऱ्यांना साधा गणवेश सुध्दा नाही. एका केमीकल कंपनीचा कॉल होता. काम करीत असतांना अडचण येत होतील. केमीकल अंगावर पडले असते तर ६ कर्मचारी जागीच ठार झाले असते. गेल्या वेळेस प्रशासकीय प्रस्ताव गाडीबाबत होता. यावर्षी तो सुध्दा नाही. ३ वर्षापासुन बुट नाही. या विभागाची ७०-७५ कक्ष वसुली दोन वर्षात झाली. व्हॅनसाठी तरतुद होत नाही. या विभागाच्या माध्यमातुन मालमत्ता कर पाणीपट्टी वसुली घेण्यास मदत झाली.

**मा. सभापती :** अर्थसंकल्पामध्ये व्हॅन घेण्याबाबत आले नाही. आवश्यक वाटले नाही का? अधिकाऱ्यांनी आता तसा लेखी प्रस्ताव दयावा.

**श्री जयवंत ओक :** कर्मचारी जे आवश्यक आहे ते देण्यात यावे. त्यांना गणवेश बुट जे साहित्य आवश्यक आहे ते देण्यात यावे. लहान गाडी घेण्यात यावी ५० ते ६० लक्ष तरतुद गाडीसाठी करावी.

**देसरडा प्रशांत :** गाडी खरेदी होईल न होईल परंतु कर्मचाऱ्यांना ज्या सोय सुविधा पाहिजे ते देण्यात यावे.

**श्री मीर हिदायत अली :** आपल्याकडे २ घटना अशा घडल्या मनुष्य हानी झाली जे जिवंत राहु शकले नाही. एका ठिकाणी अपघात झाला त्या घटनेच्या ठिकाणी मनपाची गाडी अरुंद रस्त्यामुळे जावु शकली नाही. दोन लेडीज जागेवरच मृत झाल्या त्यासाठी लहान गाडी घेण्याची आवश्यकता आहे. रस्त्यामध्ये एक मालमत्ता मध्येच आहे त्यामुळे अपघात होतात. यासाठी मी बऱ्याच दिवसांपासुन म्हणतो आहे ती मालमत्ता भुसंपादन करावी. ३ ते ३.५० लक्ष खर्च येईल.

**मा. सभापती :** २१ व्या अर्थसंकल्पावर आपण ३ दिवस चर्चा केली. स. सदस्यांनी चांगल्या सुचना या ठिकाणी केल्या त्यांचा आदर करणे या सभागृहाचे काम आहे. चांगल्या पध्दतीने कामे व्हावीत म्हणुन सर्वच सदस्यांनी माझ्यावर एक जबाबदारी टाकली त्याबद्दल अभिनंदन करतो व आपल्या विश्वासाल तडा जाऊ देणार नाही याची नोंद घेतली आहे. प्रशासनाने पाठविलेले प्रस्ताव आणि सभागृहात स. सदस्यांनी केलेल्या सुचना या ठिकाणी आदर केलेला आहे. असे पत्रकारांना सुध्दा सांगु इच्छितो. सर्वांच्या भावनांचा विचार करुन लवकरच कामाची यादी प्रशासनाकडे सादर करु. अर्थसंकल्प मी जाहीर करतो. सन ०३-०४ साठी एकुण जमा १४६.४३ कोटी खर्च १४६.१५ कोटी शिल्लकी अंदाजपत्रक आपण २८.५० लक्ष मंजुर करण्यात येत आहे. सन ०२-०३ चे जमा रु. १०८.४ कोटी व सर्व १०७.८७ कोटीचा खर्च व शिल्लकी १७ लक्ष ७५ हजार अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. ज्या ज्या सूचना या अर्थसंकल्पातच्या वेळी स. सदस्यांनी केल्या व जी कामे नमुद केली त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. ०७ मार्च पर्यंत संगणकीकरण सुरु करण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी. या बैठकीस सर्व अधिकारी यानी साथ दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. असेच सहकार्यची गरज असुन जनतेच्या विकास कामांसाठी सर्वांनी एकत्र येवून विकास कामास हातभार लावण्यात आला पाहिजे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रशासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये स्थायी समिती सभागृह समोर सादर करण्यात आलेले सन २००२-०३ चे सुधारित अंदाजपत्रक रु. १०८कोटी ८७ लाख ०५ हजार खर्च व रु. १७ लाख ३५ हजार शिल्लकी आणि सन २००३ चे मुळ अंदाजपत्रक रु. १४९ कोटी ४३ लाख ५० हजार जमा रु. १४६ कोटी १५ लाख १० हजार खर्चास व २१.२८ लाख ४० हजाराच्या शिल्लकी अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येवुन सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रशासनातर्फे सन २००३-०४ वर्षाकरीता सभागृहासमोर सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात खालील प्रमाणे फेरफार/दुरुस्तीसह मान्यता प्रदान करुन त्यानुसार सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | मुळ अंदाजपत्रकीय तरतुद | स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली वाढ |
|---|---|---|---|---|
| १. | जकात | ६७ कोटी | ६८ कोटी | १ कोटी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | मालमत्ता कर | २० कोटी | २२ कोटी | २ कोटी |
| ३. | पाणीपट्टी | २७ कोटी | २६ कोटी | ९ कोटी |

पाणी पट्टी वसुलीचे उद्दीष्ट निश्चित करतांना प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या १७.०० कोटी उद्दीष्टात १.०० कोटीची वाढ दर्शविण्यात येते. तसेच प्रशासनाने सादर केलेल्या पाणपट्टी दरवाढ प्रस्तावास काही बाबी मध्ये फेरफार करुन पाणीपट्टीच्या दर वाढीपासुन अपेक्षित उत्पन्न ८.०० कोटीचे गृहीत धरण्यात आलेले आहे. या दर वाढीपासुन अपेक्षित उत्पन्नातुन पाणी पुरवठा योजनेवर होणारा विदयुत खर्चाचे देयके अदा करण्यात यावेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | अन्नभेसह प्रतिबंधक कायद्यान्वये येणारी वसुली | १० लाख | २४ लाख | १४ लाख |

**५. पाणीपट्टी दरवाढ प्रस्ताव :**

प्रशासनाने पाणीपट्टी दरवाढ संदर्भात प्रस्तावित करण्यात आलेला तक्ता "६ अ-९" "अ-२" व "ब" मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात येते.

**घरगुती वापर**

| तपशील | प्रचलित दर (रु) प्रतीवर्ष | प्रशासनाने प्रस्तावित केलेले दर (रु. प्रतिवर्ष) | स्थायी समितीने मान्य केलेले दर (रु.) प्रतिवर्ष |
|---|---|---|---|
| १) १/२ इंच | १२०० | २७०० | १८०० |
| २) ३/४ इंच | १९५० | ५५०० | २९७५ |
| ३) १ इंच | ४५५० | १०००० | ६९२५ |

**पिण्याचे पाणी टँकरद्वारे पुरविणे**

अ) १० हजार लि. क्षमता प्रती टँकर

| अ. क्र. | लेखाशिर्ष | मुळ अंदाजपत्रकीय तरतुद | स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली वाढ |
|---|---|---|---|---|
| १. | राज्य परिवहन मंडळ | ७५ | १३५ | २०० |

**६) सिध्दार्थ उद्यान व इतर उद्याने प्रवेश शुल्क व इतर दरवाढ प्रस्ताव :**

**प्रस्ताव :** सध्या सिध्दार्थ उद्यान येथील प्रवेशासाठी प्रौढांकरीता आकारण्यात येणारी फि रु. २.००मध्ये रु. १.०० ची वाढ करुन रु. ३.०० प्रौढांसाठी प्रवेश शुल्क आकारण्यात यावा तसेच लहान मुलांना पूर्वी प्रमाणे मोफत प्रवेश देण्यात यावा तसेच प्राण संग्रहालयाचे शुल्क व सिध्दार्थ उद्यान प्रवेश शुल्क हे पुर्वी प्रमाणेच वेगवेळया ठिकाणी करण्यात यावे.

**७) पशु संवर्धन विभागाशी संबधीत दर वाढ प्रस्ताव :**

मुख्य पशु संवर्धन अधिकारी यांनी पशु संवर्धन विभागाशी संबधीत सादर केलेल्या दर वाढ प्रस्तावास प्रशासनाने सादर केल्यानुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**८) शेट कटींग चार्जेस वसुलीबाबत प्रस्ताव :**

महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. जमीन १०/२०००/पीअर/केआर२८/९१ जे -१/ मंत्रालय मुंबई-३२ दि. २७ एप्रिल २००२ नुसार आदेशीत केल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील खोदकाम व टेलीफोन लाईनच्या कामाकरीता व शहरातील इतर बाबींकरीता ही याच नविन दराने प्रशासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे दराने सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**९) विकास शुल्क निधी वसुली बाबत प्रस्ताव**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत प्रशासनामार्फत करण्यात येणारी नविन रस्ते, नविन इमारत, नविन जलनि:सारण व पाणी पुरवठा वाहिन्यांची कामे विकासात्मक कामे हे महाराष्ट्र शासनाच्या डि.एस.आर. दरानुसार करण्यात येतात. तथापी महानगरपालिका विकास खर्च (बेटरमेंट चार्जेस) हे महाराष्ट्र शासनाच्या डि.एस.आर. दरानुसार करत नाही ज्यामुळे महानगरपालिकेस विकास कामांवर प्राप्त निधी पेक्षा अतिरिक्त खर्च करावा लागतो. करिता सन २००३-२००४ या आर्थिक वर्षापासुन विकास खर्च महाराष्ट्र शासनाच्या डि.एस.आर. नुसारच वसुल करण्यात यावे जेणे करुन महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडुन शहर विकासाची कामे होण्यास मदत होईल करिता विकास खर्च (बेटरमेंट चार्जेस) महाराष्ट्र शासनाच्या डि.एस.आर. दरोन वसुल करणे बाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देणे.

**१०) प्रसुती शुल्क व बाह्य नोंदणी प्रस्ताव :**

आरोग्य विभागासंबधी प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या दर वाढीस खालील प्रमाणे बदल करुन उर्वरीत प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

| सेवा सुविधा | प्रचलित दर (रु) | प्रशासनाने प्रस्तावित केलेले दर (रु) | स्थायी समितीने मान्य केलेले दर (रु) |
|---|---|---|---|
| बाळंतपण | | | |
| पहिले | ५० | मोफत | ५० |
| दुसरे | ५० | ५० | १०० |
| तिसरे व तिसऱ्यानंतर | ५० | २५० | ५०० |

**११) विना परवानगी जाहिरात फलक व रस्त्यावर कमानी उभारणीस दंड आकारणी :**

प्रशासनाने उपरोक्त विना परवानगी जाहिरात फलक व रस्त्यावर कमानी उभारणे दंड आकारणीच्या प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास रस्ता खोदण्याचे नियमीत शुल्क वसुल करुन दंड आकारणीस मान्यता देण्यात येते.

**१२) उघडयावर घाण टाकणे, शौच्यास बसणे यावर दंड आकारणी करणे :**

शहराची स्वच्छता राखण्याकरीता उघडयावर शौचास बसविणे यावर प्रतिबंध घालवण्याकरीता सबंधीताकडुन पुढील प्रमाणे दंड आकारणी करण्यात येत होती. तथापी उघडयावर शौचास बसणे, केर कचरा कुंडीत न टाकणे इत्यादी बाबींकरीता प्रस्तावित दंडाच्या रक्कमेत वाढ करण्यात येत आहे. या प्रस्तावाची अंमलबजावणी विभागीय कार्यालयामार्फत करण्यात येईल असे झाल्यास या गोष्टींना आळा बसुन नागरीकांमध्ये जागरुकता निर्माण होईल व शहर स्वच्छ राहण्यास हातभार लागेल. स्वच्छतेबाबत जागरुकता निर्माण करण्याचा आहे. अस्वच्छता केली तर होवु शकतो ही मानसिकता रुजविण्याचा प्रशासनाच्या प्रस्तावित दंड वाढीचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**१३) खाजगी करणाच्या माध्यमातुन साफसफाई :**

प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या खाजगीकरणाच्या माध्यमातुन विभाग क्र. ३ व ६ अंतर्गत होणाऱ्या साफसफाईचे काम प्रायोगिक तत्त्वावर सादर केलेला प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

ब) सन २००३-०४ च्या अर्थसंकलपाच्या जका रक्कमेतुन आवश्यक खर्च वजा जाता उर्वरीत रक्कमेतुन शहरातील विविध विकासाची कामे करण्यासाठी सर्व संबंधीत विभागाकडुन एकुण ३९.५७ कोटीची मागणी होती. परंतु जमा बाजुचा विचार करता सर्व संबधीत विभागांना प्रशासनाने ३५.५७ कोटी इतक्या रक्कमेची तरतुद उपलब्ध करुन दिली होती. या सर्व बाबींचा बैठकीत विचार विनिमय करुन स्थायी समितीने काही कामांची कपात व नविन शहर विकासाची रु. ४३.६८ कोटीच्या कामांना मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु निधी असावी. या सर्व सबंधीत विभागाना एकुण रु. ४१.५८ कोटी इतकीच तरतुद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याची सविस्तर माहिती व गोषवारा खालील प्रमाणे आहे.

(आकडे हजारात)

| अ .क्र | विभाग | सुधारित तरतुद | ०३-०४ स्पील ओव्हर रक्कम | विभागाची मागणी व स्थायी समितीने केलेली दुरुस्ती | एकुण (४+५) | स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १) | शहर अभियंता | ६५२७५ | १९१६० | ९७६९९ | ११६८५९ | ११०९५० |
| २) | अतिरिक्त शहर अभियंता | ६४२०० | ८२३० | १११४२५ | ११९६५५ | ११५२०० |
| ३) | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) | ५५१२० | २११०७ | ७४७२४ | ९५८३१ | ९०८५० |
| ४) | कार्यकारी अभियंता (जलनिःसारण ) | ४८३०० | ३३५९०२ | ७०८९१ | १०४४८१ | ९८८०० |
| | **एकुण** | २३२८९५ | ८२०८७ | ३५४७३९ | ४३६८२६ | ४१५९०० |

उपरोक्त नुसार फेरफार व दुरुस्त्या करुन प्रशासनाने सादर केलेलय अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

नगरसचिव
महानगरपालिका औरंगाबाद

सभापती
स्थायी समिती महानगरपालिका औरंगाबाद.